TIGHT BINDING BOOK

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192251
UNIVERSAL LIBRARY

# श्रीरामकृष्ण-चरित्र

( प्रथम भाग )

लेखक—कै. न. रा. परांजपे

( तृतीय आवृत्ति )

श्रीरामकृष्ण आश्रम,
नागपूर, मध्यप्रदेश.

[डिसेंबर १९४९ ]

[ किं. ४ रु. ४ आ.

प्रकाशक—

**स्वामी भास्करेश्वरानंद,**
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१, मध्यप्रदेश.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला

पुष्प पहिलें

( श्रीरामकृष्ण आश्रम नागपूर द्वारा सर्वाधिकार स्वरक्षित )

मुद्रक—

**ल. म. पटले,**
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस,
सीताबर्डी, नागपूर.

# प्रस्तावना

श्रीरामकृष्ण परमहंसांचें, जीवन-चरित्र म्हणजे व्यवहारधर्माचें विवरणच होय. त्यांचें चरित्र वाचून आपणांस परमेश्वराचा साक्षात्कार करून घेतां येईल. त्यांच्या चरित्राचें पठण करीत असतां केवळ एक परमात्माच सत्य असून इतर सर्व आभासमात्र आहे याची खात्री पटल्यावांचून राहणार नाही. श्रीरामकृष्ण हे देवत्वाची सजीव मूर्तिच होत. त्यांच्या उक्ति म्हणजे पढिक पंडितांची कोरडीं वचनें नव्हत; तर तीं त्यांच्या जीवनग्रंथांतील पृष्ठेंच होत. त्यांत त्यांचे स्वतःचे अनुभवच प्रकट झालेले आहेत; व म्हणूनच त्यांचा वाचकांच्या मनावर अचुक परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. ह्या संदेहवादी युगांत ज्यांना एरव्ही आत्मज्योतीच्या प्रकाशाला मुकल्यामुळे अंधःकारांत चांचपडत राहावे लागले असते, अशा हजारो स्त्री-पुरुषांना श्रीरामकृष्ण म्हणजे तेजोमय व प्रत्यक्ष धर्माचें जिवंत उदाहरणच असून तें त्यांना आधारस्थान वाटेल. श्रीरामकृष्णांचें चरित्र म्हणजे अहिंसेचें नमुनेदार उदाहरणच होय. त्यांच्या अपरंपार प्रेमाला भौगोलिक किंवा इतर कसल्याहि मर्यादा ठाऊक नव्हत्या. प्रस्तुत चरित्र-ग्रंथ जे जे वाचतील त्या सर्वांना श्रीरामकृष्णांचें दैवी प्रेम अन्तःस्फूर्ति देवो अशी माझी प्रभूजवळ प्रार्थना आहे.

साबरमती,<br>
मार्गशीर्ष कृष्ण १<br>
विक्रम संवत् १९८१

**मो. क. गांधी**

# प्रकाशकाचे चार शब्द

परमेश्वरकृपेने " श्रीरामकृष्ण-चरित्र " या पुस्तकाची तृतीय आवृत्ति आज प्रकाशित होत आहे.

श्रीरामकृष्ण देव हे " समन्वय व विश्वबंधुत्व " ह्या दिव्य संदेशाचे प्रणेते होते. 'श्रीरामकृष्णाच्या जीवनसंगीतांतून जगांतील हजारों धर्मपंथ व उपपंथ, यांच्या भिन्न भिन्न व विसदृश स्वरांच्या मीलनाचा मंजुळ ध्वनि निघतो' हे रोमाँ रोलाँ ह्या पाश्चात्य महापुरुषाचे उद्गार खरोखरच मोठे अन्वर्थक आहेत. आधुनिक जगांतील मतामतांच्या गलबल्यांत व परस्परविरोधी हितसंबंधांत प्रेमाची व विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करण्याचे कामीं ह्या महान् जगद्गुरूच्या अद्वितीय जीवनाने अमूल्य अशी कामगिरी केली आहे, असा आमचा विश्वास असून महात्मा गांधींनी लिहिलेल्या प्रस्तावनेमुळे आमचा हा विश्वास दृढमूल झाला आहे प्रस्तुत पुस्तकांत ग्रंथकार कै. न. रा. परांजपे यांनी श्रीरामकृष्णांचें चरित्र व संदेश यांचें यथायोग्य दिग्दर्शन केलें आहे. श्रीरामकृष्णांचे दिवंगत शिष्य स्वामी शारदानन्द यांच्या बंगाली भाषेंतील 'श्रीरामकृष्णलीलाप्रसंग' ह्या अत्यंत अधिकृत चरित्रांतून व इतर अनेक विश्वसनीय ग्रंथांतून मिळविलेल्या माहितीवरून कै. परांजपे ह्यांनी हें पुस्तक लिहिलें असून सर्व आधारभूत ग्रंथांची यादी त्यांनी पुस्तकास जोडली आहे. लेखकाने वंग साहित्याचें सम्यक् परिशीलन केले होतें व रामकृष्ण मिशनचे माजी अध्यक्ष ब्रह्मीभूत स्वामी शिवानंद व कार्यवाह शारदानन्द ह्या श्रीरामकृष्णांच्या लीलासहचरांच्या निकट सहवासाचा लाभ त्यांना कांही कालपावेतों घडला होता.

हा चरित्र-ग्रंथ वाचकांच्या आदरास पात्र होईल असा आमचा विश्वास आहे.

नागपूर,<br>
ता. १-१२-१९४९

—प्रकाशक

# अवतरणिका

१. भगवान् श्रीरामकृष्ण परमहंसदेव यांच्यासारख्या अत्यंत श्रेष्ठ महापुरुषाचें चरित्र यथार्थ समजणें अशक्य आहे. "त्यांचें चरित्र मलासुद्धा नीट समजलें नाही," असें जेथे श्रीविवेकानंद म्हणतात, तेथे माझ्यासारख्याने तें लोकांना सांगण्याचा प्रयत्न करणें व त्यास प्रस्तावना लिहिणें, हें केवढें धाडस आहे? तरी पण श्रीरामकृष्णांच्या कृपेवर भरवसा ठेवून व—

**आकाशअंत न कळूनिहि अंतरिक्षीं ।**
**आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥**

हें उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून, मी हे धाडस करण्यास उद्युक्त होत आहे.

२. प्रस्तावना म्हणजे ग्रंथ व त्याचा विषय यांच्याविषयी "थोडक्यांत सगळे कांही" ग्रंथाविषयी थोडक्यांत सगळें कांही जें काय असेल त्याचा विचार यथाक्रम येईलच. त्यांतील विषय म्हणजे अर्थात् भगवान् श्रीरामकृष्ण यांच्या विषयी "थोडक्यांत सगळें कांही" सांगावयाचें, तर इतकेंच सांगतां येईल की, ज्यांनी पूर्वापर तोयनिधींचें अवगाहन करणाऱ्या नगराजाप्रमाणे, वैदिक व अवैदिक संस्कृतींचें स्वतः अवगाहन करून शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेंत वैदिक धर्माचा झेंडा नाचविला: काळनिद्रेंत घोरत पडलेल्या भारताला 'उत्तिष्ठत, जाग्रत' अशा रणदुंदुभीनादानें खडबडून जागें करून, पौरुषत्वाच्या महामंत्राची दीक्षा देऊन त्याचें ध्येय त्याला दाखवून दिलें; भोगैकनिष्ठ पाश्चात्य जगांत 'त्यागा'ची मंजुळ गीता गाऊन त्याच्या विचारांत क्रांति घडवून आणली; त्या पुण्यश्लोक श्रीमद्विवेकानंद स्वामींचे हे सद्गुरु होतें. ताजमहालासारखी सुंदर शिल्पसीमा पाहिली की मनुष्याचे मन आश्चर्यानें थक्क होतें आणि 'एवढी उदात्त कल्पना ज्याने प्रथमतः केली तो मनुष्य कसा असेल,' असा विचार

लागलीच त्याचे मनांत उभा राहातो व त्याची माहिती स्वतःस व्हावी, म्हणून मनांत उत्सुकता उत्पन्न होते. असाच प्रकार येथेहि होतो. त्रिखंडकीर्ति यतिश्रेष्ठ विवेकानंद ! तेव्हां त्यांचाहि ज्ञानदाता कसा असेल ?—असें सहजच प्रत्येकाला वाटूं लागतें.

३. 'अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय' हें वाचून असें वाटण्याचा संभव आहे की, आपल्या सद्गुरुविषयी स्वामी विवेकानंदांनी भक्तीच्या आवेशाने काढलेले हे उद्गार आहेत कोणीहि सच्छिष्य स्वतःच्या गुरुविषयी असेंच म्हणेल. पण थोडासा विचार केला तर असे आढळून येईल की, ते निव्वळ आवेशोद्गार नसून त्यांत खोल अर्थ आहे. एकाच जातीचे व साधारण सारख्याच किंमतीचे कांही हिरे पुढे ठेऊन त्यांत तारतम्य करूं म्हटले तर असे आढळून येईल की, ते सर्वच एकमेकांपेक्षा वरिष्ठ आहेत. जरी जात व मूल्य एकच असलें, तरी त्या प्रत्येकांत कांही तरी 'अपूर्वता' असते. कोणी वजनाने हलका पण तेजाने उज्वल, कोणी तेजाने सौम्य पण आकाराने सुंदर, तर कोणी सर्वच बाजूंनी अलौकिक, असे त्यांत भेद सापडतात. स्वतःच्या आंगच्या विशिष्ट गुणांमुळे सर्वच अपूर्व असतात. परंतु एकाची 'अपूर्वता' बाकीच्यांत नसल्यामुळे त्या गुणांमुळे तो इतरांहून वरिष्ठ ठरतो. तसलाच प्रकार येथेहि आहे. ईश्वराचे अनेक अवतार झाले व स्वतःच्या 'अपूर्वतेंत' त्याचें प्रत्येकाचें वरिष्ठत्व आहे. भगवान श्रीरामकृष्णांची 'अपूर्वता' कशांत आहे हें जर आपण पाहिलें, तर आपल्यालाहि त्यामुळे 'अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय ते नमः।' असेंच म्हणावे लागेल.

४. धर्मस्थापनेकरिता ईश्वराचे अवतार पुनः पुनः होतात आणि ते नवीन युगधर्म-प्रवर्तन करतात, ही गोष्ट शिष्टसंमत आहे. प्रत्येक अवतार, गतकालाचा पुत्र असून, भविष्यकाल त्याचे ठिकाणीं बीजरूपाने असतो. योग्य अशा मानव-क्षेत्रांत त्याचें निक्षेपण करून भविष्यकालास जन्म देणें, हें त्याचें अवतारकार्य असतें. अर्थात्, हे बीज तत्कालीन जगताला अत्यंत आवश्यक अशा स्वरूपाचें असतें. सांप्रतकाळीं मानवजातीचा ओघ, कोणत्या दिशेने वाहात आहे, हें जर पाहिलें

तर भविष्यकालीं कोणत्या धर्मयुगाची त्यास आवश्यकता आहे हें समजून येईल व तो युगधर्म जर भगवान् श्रीरामकृष्णांच्या चरित्रांत उत्क्रांत झालेला दिसत असेल, तर त्यांना धर्मस्थापनेचे अवतार म्हणून म्हणण्यास कांहीच हरकत वाटणार नाही.

५. मानवी कल्पनेस गोचर अशा अनंत विश्वमालांचें निरीक्षण केले तर असें दिसून येते की, या परम सुंदर रचनेत प्रत्येक लहान मोठे विश्वपरमाणु आपल्या ठिकाणी स्वतंत्र असून, या त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश होणार नाही, अशा कांहीं विशेष नियमबद्धतेने ते इतके परस्परतंत्र आहेत की, एकमेकांचा केवळ एक जीव होऊन, सर्व मिळून एकच वस्तु बनली आहे. अनेकतेमध्ये एकता व एकतेमध्ये अनेकता हेच विश्वाचे रहस्य आहे. एकच अद्वितीय सत्ता ह्या भिन्न भिन्न रूपांनी प्रकट झालेली आहे आणि यांतच या विश्वरचनेचें सौंदर्य आहे. चिमुकल्या मनुष्यप्राण्याने हे विश्वरहस्य जाणावे व तदनुरूप आपल्या कुटुंबाची रचना करावी, यांतच त्याचे मनुष्यपण आहे. हीच त्याच्या ऐहिक कर्तव्याची उत्क्रांतिसीमा आहे. आर्यजातीस हें ह्ृद्गत अंतःस्फूर्तीने समजलें व तदनुरूप त्यांनी आपल्या संस्कृतीची अत्युच्च उभारणी केली. परंतु नवीन मानववंश निर्माण झाले व त्यांच्या नवीन नवीन संस्कृति झाल्या, त्यांनी आर्येतर जगताला उत्क्रांत करून प्रस्तुत स्थितीस आणून ठेविलें, तेव्हां कुठे आर्य संस्कृतीचा विचार करण्याची त्यांना पात्रता आली व या विश्व-सत्याचा त्यांना भास होऊं लागला. Liberty, Equality, Fraternity, Democracy, Republicanism, Self-determination हे सर्व या भासाचेच खेळ होत. होतां होतां या विश्वरचनेचें पुष्कळसे अनुकरण त्यांनी शासनशास्त्रापुरतें तरी केलें, हें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या घटनेवरून दिसून येतें. हळूहळू त्यांचें अनुकरण इतर मानववंशहि करतील. जसें बाह्य व्यवहारांत हें काम झालें, तसेंच धर्मक्षेत्रांतहि व्हावें व निरनिराळ्या धर्मांनी आपआपल्यापरी पूर्ण स्वतंत्र राहून सर्व मिळून जगभर एकच समन्वयस्वरूप विश्व-धर्म व्हावा, ही गोष्ट आतां मानवजातीच्या दृष्टीने फारच आवश्यक झाली आहे. ही गोष्ट

जांगतील सर्व विचारी लोकांस पटली असून, सर्व धर्म हे एकच सद्वस्तु मिळवून देणारे भिन्न भिन्न मार्ग आहेत, म्हणून कोणी कोणाचा द्वेष करूं नये, तर स्वतःच्या धर्मकक्षेंत राहून आपली उन्नति करून घ्यावी व इतर धर्मा-विषयी उदासीन असावें, असा ध्वनि सर्वत्र शहाण्या लोकांच्या लेखनादिकांतून निघूं लागला आहे व तसें आचरणहि हळूहळू सर्वांच्या अंगवळणीं पडूं लागलें आहे. तरी पण त्यांत एक उणीव राहात असे; ती ही की, या सर्व मथितार्थाने, भिन्न मतांविषयी उपेक्षा उत्पन्न होत होती, तरी आत्मीयत्वाच्या अभावामुळे प्रेम उत्पन्न होण्यास मार्गच नव्हता. निरनिराळ्या धर्मपंथीयांस आपण त्या त्या धर्माचे असतांच एकमेकांच्या धर्माचे आहों व प्रत्यक्ष एकाच खाणींतून बाहेर पडलों आहों, असा आपलेपणा वाटण्यास मार्ग नव्हता. ही अडचण दूर करण्याकरिता भगवान् श्रीरामकृष्णाचा अवतार झाला. श्रीकालिकेच्या अखंड प्रत्यक्ष सहवासांत असून तिच्या कृपेने पूर्णतेचा अनुभव घेत असताहि, निरनिराळ्या धर्मांची पद्धतशीर दीक्षा घेऊन प्रत्यक्ष त्यांचें आचरण करावयाचें ही त्यांची अत्यद्भुत लीला पाहिली म्हणजे मन गोंधळून जातें. "याचा अर्थ काय? जें कांही आहे तें श्रीजगदंबाच, असा साक्षात् अनुभव प्राप्त झाला असतां, पुनः हा खटाटोप कां?" असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो व कांही केल्या समाधान-कारक रीतीने त्याचा उलगडा होत नाही. परंतु यांतच त्याच्या अवताराची अपूर्वता आहे. श्रीरामकृष्णाचें चरित्र आणि त्यांची शिकवण म्हणजे जगाच्या भावी धर्माचा सूत्रमय अवतारच. कालांतराने त्याचें व्याख्यान व्हावयाचें इतकेंच. 'जितकी मते तितके मार्ग,' 'सर्व मार्ग एकाच ईश्वराकडे घेऊन जातात'–ह्या युगधर्माचें जो अनुसरण करील त्याला आपल्याच धर्मात राहून देखील अन्य धर्मीयांच्या बाबतींत बंधुत्वाचा अनुभव येईल, भिन्नतेंत अभिन्नता कशी असते, हें त्याच्या प्रत्ययास येईल. भगवान् श्रीरामकृष्ण स्वतः वैदिकधर्मी होते. त्यामुळे वैदिक लोकांचें गुरुपण त्यांना योग्यच होतें. पुढे त्यांनी इस्लाम धर्माची दीक्षा घेतली; परंतु त्यामुळे त्यांचें वैदिकपण मोडलें नाही, कारण वर्णाश्रम धर्माचें यथार्थ पालन करून पाचवी 'परमहंस' दीक्षा

घेऊन ' को विधि : ' ' को निषेध : ' अशी त्यावेळीं त्यांची स्थिति होती. म्हणून, ते मुसलमान झाल्यामुळे त्यांच्या वैदिकतेस बाध न येतां मुसलमान शिष्यांना मात्र मुसलमान गुरु मिळाला! हीच गोष्ट खिस्ती, बौद्ध वगैरे धर्मांसहि लागू पडेल. याप्रमाणे आपापला विशिष्ट धर्म न सोडतां परस्पराविषयी भ्रातृभाव कसा अनुभवतां येतो, हे त्यांनी आपणांस प्रत्यक्ष दाखवून दिलें आहे व यातच त्यांच्या अवताराची अपूर्वता आहे. त्यांनी स्वतःच्या आचरणाच्या द्वारें सर्व धर्मांचा समन्वय करून दाखविला आणि ही गोष्ट इतर अवतारांमध्ये दृष्टोत्पत्तीस येत नाही. हा समन्वय घडवून आणण्याकरिता त्यांना त्या त्या धर्माची लौकिक दीक्षाच घेणें भाग होतें. कारण त्याखेरीज, हे प्रत्यक्ष आपल्या धर्मांचे आहेत, असें लोकांस समजलें नसतें. ईश्वरदर्शनानंतर निरनिराळ्या धर्मांची प्रत्यक्ष दीक्षा घेऊन, त्या त्या धर्मांत सांगितल्याप्रमाणे साधना करण्याच्या त्यांच्या प्रचंड खटाटोपाचा या दृष्टीनेच विचार केल्यास काही अर्थ लागतो.

६. याप्रमाणे भावी मानवधर्मांचे सूत्रपाठ जगास देण्याकरिता भगवान् श्रीरामकृष्णाचे जें हें अलौकिक चरित्र झालें, त्याचें जर आपण परिशीलन केलें तर त्यांतून काय सार निघतें, तें स्वतःच्या कल्याणाकरिता आपण पाहूं. जर तेवढ्याचें यथाशक्ति आचरण घडेल, तर श्रीरामकृष्णांच्या कृपेने कृतार्थ होणे काय दूर आहे ?

७. ' प्रत्येक बाबतींत शास्त्रमर्यादा संभाळली पाहिजे, ' हा श्रीरामकृष्णांचा नियम त्यांच्या आध्यात्मिक चरित्रांतहि उत्तम दिसून येतो. मुमुक्षु, साधक आणि सिद्ध अशा क्रमानेच त्यांनी सर्व लीला केली. या विश्वाचा चालक व नियंता असा कोणी तरी ईश्वर असला पाहिजे, हें बहुतेक सर्वांस पटते, परंतु तेवढ्यावरच त्यांचें समाधान होतें. भगवान श्रीरामकृष्णांचें येवढ्याने समाधान होईना. ' जर ईश्वर आहेच तर इतर सर्व वस्तूंप्रमाणे तो व्यवहार्य असला पाहिजे. सगुण सृष्टीस अगोचर असें जे कांही आहे, ते तर तो आहेच; पण जर सगुण

सृष्टि तोच चालवितो, तर इतर सर्व वस्तूप्रमाणे परमार्थ वस्तु देखील प्रत्यक्ष व्यवहार्य असलीच पाहिजे' असे त्यांना वाटे. तर मग तसा अनुभव कां येऊं नये? ही जी तळमळ त्यांना लागली, तीच त्यांची मुमुक्षुदशा होय. या एका तळमळीमुळेच ते साधनचतुष्टयसंपन्न होऊन त्यांना गीतेंत सांगितल्याप्रमाणे बुद्धियोगाची सप्रचीत प्राप्ति झाली व त्यांच्या साधकभावास प्रारंभ झाला. त्यांची सिद्धावस्था ही अनुकरणाच्या पलीकडे आहे व आम्हां सामान्य जीवांना तिच्याविषयी विचार करण्याची आवश्यकताहि पण नाही; पण त्यांचा मुमुक्षु व साधकभाव आम्हांस शिकविण्याकरिताच असल्याने त्यांपासून आपण काय शिकलें पाहिजे, हें पाहूं. केवळ ईश्वर आहे असे बौद्धिक समाधान न मानतां तो व्यवहार्य कसा होईल, हा विचार प्रत्येकाने पाहिला पाहिजे. ही त्यांच्या मुमुक्षुदशेची शिकवण आहे. त्याकरिता त्यांनी स्वतः ज्या अनेक साधना केल्या, अंगावर कांटा येण्याजोगी उग्र तपस्या केली व जे अनुभव घेतले, ते आम्हांस अशक्यच आहेत, पण त्यामुळे जी निश्चयात्मक तत्वें त्यांनी सांगितलीं तीं अत्यंत उपयोगाची आहेतः—

१. ईश्वर आहे,

२. जे कांही आहे आणि घडतें, ते त्याचें कर्तृत्व आहे. म्हणून

३. त्याला पूर्णपणे शरण जाणें हेंच योग्य व हितकर आहे.

४. हे सत्य जाणून ह्या भावनेचा अधिकाधिक परिपोष करणें हेंच मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय.

या चार तत्त्वांचा निश्चय त्यांनी साधक अवस्थेंत केला व त्याचबरोबर ही निश्चयबुद्धि घेऊन चालणाऱ्याचें आचरण, हळूहळू विहित मार्गाने विधिपूर्वकच कसें होतें, हें दाखविलें आणि अकर्मण्यता व आळस नष्ट करण्याकरिता ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करणें, हें जें गीतोक्त कर्मयोगाचें रहस्य तेंहि त्यांनी उघड करून दाखविलें. कलकत्त्यासारख्या भोगपरायण, पाश्चात्यांचें आंधळ्यासारखे

अनुकरण करून भडकलेल्या शहरांत राहून, कामिनीकांचनाचा त्याग केवळ मनानेच नव्हे, तर प्रत्यक्ष कायेने करतां येतो आणि वरीलप्रमाणे बुद्धीचा एकदा पक्का निश्चय झाला म्हणजे कोणत्याहि परिस्थितीचा अडथळा मनुष्यास न होतां, उलट ती अनुकूल होऊन दहा पांच हजार वर्षांच्या अनुभवाचें संपादन केवळ चाळीस पन्नास वर्षांच्या आयुष्यांत करितां येतें, ही गोष्ट त्यांनी सिद्ध करून दाखविली. बुद्धींत ज्ञान, अंतःकरणांत भक्ति आणि कायेंत कालोचित प्रचंड कर्मस्फूर्ति हा हल्लीच्या बदललेल्या परिस्थितींत अत्यंत आवश्यक असा त्रिकांडसमुच्चय त्यांनी शिकविला. दुर्बलतेचा त्याग करून वीर्यवान व्हा असा उपदेश केला.

९. परंतु वरीलप्रमाणे बुद्धीचा निश्चय करूं म्हटल्याने नुसता होत नाही. कित्येकदा मनुष्याची धैर्यशक्ति कमी पडते व मोह, विषाद, आपत्ति यांच्या माऱ्यापुढे दीन बनलेल्या जीवास जर कांही साह्य न झालें, तर त्याची गति पुढे चालणें अशक्य होतें. अशा वेळीं ईश्वरावर सर्व भार सोपवून, तो जर त्याची अत्यंत व्याकुलतेने प्रार्थना करील तर त्यास असें साह्य मिळतें, हें त्यांच्या साधनाकालाच्या इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें.

१०. अशा या अपूर्व अवतारश्रेष्ठाच्या चरित्रांतहि एक प्रकारची अपूर्वता आहे. आजपर्यंत अनेक साधुसंतांचीं चरित्रें झालीं, परंतु त्या सर्वांत एक अशी उणीव राहात होती की, त्या थोर पुरुषांच्या साधनाकालाचा इतिहास, म्हणजे त्यांनी कोणत्या कोणत्या साधना केल्या हा भाग नव्हे, तर त्या कालांत त्यांच्या अंतःशक्तीचा विकास कसा कसा झाला, त्यांना कोणते कोणते अनुभव आले, कशा तऱ्हेच्या अडचणींतून त्यांना जावें लागलें व त्या त्या प्रसंगीं त्यांनी काय काय केलें, वगैरेची साद्यंत हकीगत सापडत नव्हती. कारण सत्पुरुष हे स्वतः फार निरभिमानी असल्यामुळे व त्यांच्या कमालीच्या गांभीर्यामुळे, ती हकीगत त्यांच्या तोंडून येणेंच अशक्य असतें, परंतु श्रीरामकृष्णांच्या बाबतींत तसें झालेलें नाही. एकाचवेळीं अनेक भाव असावयाचे व ते पराकाष्ठेचे उत्कट

असावयाचे, हा श्रीरामकृष्णांचा जो विशेष, त्यामुळे जगतास मोठा अपूर्व लाभ झाला आहे. त्यांच्या चरित्रांतील पुष्कळसा भाग जशाच्या तसा खुद्द त्यांच्याच तोंडून ऐकावयास मिळणें शक्य झालें आहे. त्यामुळे 'भैरवी आपणांस चैतन्य-देवांचा अवतार समजत असे,' असल्या गोष्टीपासून तो 'जो राम आणि कृष्ण होऊन गेला, तोच सांप्रत रामकृष्ण होऊन आला आहे' अथवा 'या तसबिरीची पूजा घरोघरीं होईल,' 'आम्ही सरकारी लोक' अथवा 'मजवर सारा भार सोपवून राहा' वगैरे उद्गार त्यांच्या तोंडून सहज बाहेर पडत! त्यामुळे ते फार गर्विष्ठ होते असा गैरसमज होण्याचेंहि कारण नाही. त्यांच्या ठिकाणीं जो बालकभाव सदैव उत्कट असे, त्यामुळे गांभीर्य मागे सरून, प्रसंग आला असतां त्यांना बोलावेंसेच वाटे आणि कमालीच्या निरभिमानतेमुळे या गोष्टी त्यांच्या तोंडून बाहेर येत. अशा रीतीने त्यांचें सर्व चरित्र बहुतेक सर्व त्यांच्याच तोंडून सहज बाहेर येत आहे. 'अभिमानी जीव ज्याप्रमाणे वागतात, तसें हुबेहूब सहज वागणें,' हीच निरभिमानतेची पराकाष्ठा आहे. यामुळे, इतर व्यक्तीविषयी बोलावें, तसेंच स्वतःविषयीहि त्यांच्या तोंडून तिऱ्हाईतपणे शब्द बाहेर पडत.

११. अशा रीतीने त्यांनी जगत्कल्याणाकरिता जें चरित्र आचरून दाखविलें आणि त्याच परमकारुणिकतेने स्वतःच उघड करून सांगितलें, तें किती मनोरम व बोधप्रद असेल हें सांगण्याची जरूरीच नाही. हें प्रस्तुतचें चरित्र मुख्यतः ज्या चरित्राच्या आधारें लिहिलें, तें चरित्र (श्रीरामकृष्णलीलाप्रसंग) मूळ बंगालींत असून, तें श्रीरामकृष्णांच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ मिळून धन्य झालेल्या त्यांच्या प्रमुख शिष्यमंडळींपैकीच एकाने—स्वामी शारदानंदजींनी—अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेलें आहे; या चरित्राचे पांच भाग आहेत व त्यांत श्रीरामकृष्णांच्या अखेरच्या दुखण्यापर्यंतची हकीगत आलेली आहे. पुढील आठ महिन्यांची हकीगत त्यांच्या आजारीपणाबद्दल असून अजून लिहावयाची आहे, प्रस्तुत चरित्रांत ती हकीगत त्रोटक रूपाने श्रीरामचंद्र दत्त यांनी लिहिलेल्या श्रीरामकृष्णांच्या चरित्रावरून व

'एम्' च्या 'श्रीरामकृष्णकथामृता' वरून घेतली आहे. त्याचप्रमाणे श्रीशारदानंदजींच्या चरित्रांत न आलेल्या कांही गोष्टी इतर कांही पुस्तकांवरून घेतल्या आहेत (आधारभूत पुस्तकांची यादी पाहा.) तरी पण अशा गोष्टी फारच थोडया असून, या मराठी चरित्राला आधार सर्वस्वी श्रीशारदानंदजींच्या चरित्राचाच आहे. या चरित्रांतील ठिकठिकाणच्या शास्त्रीय विषयप्रतिपादनावरून श्रीशारदानंदजींचा अधिकार किती मोठा आहे हे वाचकांना कळून येईल. स्वामी शारदानंदजींच्या चरित्राची भाषा अत्यंत मनोहर असून, तिचा एखाद्या संथ वाहणाऱ्या नदीप्रमाणे शांत, धीरगंभीर ओघ वाचकांच्या मनाला तल्लीन करून सोडतो. अगोदरच श्रीरामकृष्णांचे चरित्र अत्यंत अद्भुत व रमणीय आणि त्यांत स्वामीजींची नितांत सुंदर भाषा व विषयप्रतिपादनाची हातोटी, मग काय विचारावें ? या त्रिवेणी संगमांत मज्जन करीत असतां वाचकाचे देहभानहि हारपून जाते. या मराठी चरित्राच्या वाचनानें वाचकांना कसा काय अनुभव येईल, हें सांगवत नाही, तरी पण हे चरित्र वाचून श्रीरामकृष्णांच्या उदार जीवनांकडे वाचकांचे लक्ष वेधल्यास माझ्या सर्व श्रमांचे सार्थक झालें, असें मी समजेन.

प्रस्तुत चरित्रांत ठिकठिकाणीं "आम्ही म्हणालों," "आम्हांला ते सांगत," वगैरे शब्दयोजनांपैकी 'आम्ही' हा शब्द मूळ ग्रंथकर्त्याचा असून आम्ही म्हणजे "श्रीरामकृष्णांचे शिष्य" अशा अर्थी त्यांचा उपयोग त्यांनी केलेला आहे.

प्रस्तुत चरित्र लिहितांना मला ज्यांनी मदत केली त्या सर्वांचा नुसता नामनिर्देश करूं लागल्यास एक पान लागेल; तरी पण श्री. विष्णुपंत पाळेकर, श्री. श्रीराम वासुदेव सोमण व श्री. रामचंद्र गणेश परांजपे, यांनी जी मदत केली ती केवळ बिनमोल आहे. किंबहुना त्यांच्या मदतीशिवाय हें चरित्र या स्वरूपांत प्रसिद्धच झालें नसतें. म्हणून त्यांनी केलेल्या मदतीबद्दल व अनेक मार्मिक सूचनांबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेंच माझ्या अनेक बालमित्रांनी मला अनेक प्रकारची मदत केली, त्याबद्दल मी त्यांचाहि फार आभारी आहे.

१२. याप्रमाणे, [ १ ] **सर्व धर्म एकाच ध्येयाकडे पोहोचण्याचे भिन्न भिन्न मार्ग आहेत. [ २ ] ईश्वर ही वस्तु मंगळावरील समुद्राप्रमाणे केवळ अनुमानावयाची नसून, इंद्रियातीत भावद्वारा ती प्रत्यक्ष अनुभवावयाची आहे [ ३ ] कोणतीहि कल्पना केवळ कल्पनेंतच न ठेवतां, मनाने, वाचेने आणि कायेने देखील अनुष्ठावयाची** यांतच साधकाच्या यशाचे बीज आहे; ही भावप्रणाली जगास देण्याकरिता झालेली ही भगवंतांची लीला मराठी वाचकांपुढे मांडली जात आहे. भगवंतांच्या अत्यंत समर्थ अवताराचें चरित्र तें ! तें तसेच अमोघ असावयाचें. ज्याच्या ज्याच्या कानीं तें पडेल, त्याचें त्याचे तें कांहीना कांही तरी कल्याणच करील, यांत मला स्वतःला तर कांहीच शंका वाटत नाही. हा एवढा कल्याण-विषय उपलब्ध झाल्याबद्दल मी स्वतःला अत्यंत भाग्यवान समजतों व या सर्वस्वी हीन दीन झालेल्या वैदिक राष्ट्राकरिता, म्हणजे पर्यायाने अर्थातच स्वतःकरिता,—

**किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होउनि तिहीं लोकीं ॥**
**भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥**

अशी श्रीज्ञानेश्वर माउलीच्या शब्दांत प्रार्थना करून श्रीस्मरणांत विराम पावतों.

**उमरावती,**
विजयादशमी शके १८४५.

**नरहर रामचंद्र परांजपे**

### श्रीरामकृष्णांच्या चरित्रांतील

# मुख्य मुख्य सनांचें टांचण

## प्रथम भाग

१७७५ क्षुदिरामांचा जन्म

१७९१ चंद्रादेवींचा जन्म

१७९९।१८०० क्षुदिरामांचा चंद्रादेवींशीं विवाह

१८०५।०६ रामकुमारांचा जन्म.

१८१४ देरे गांवाहून कामारपुकुरास आगमन

१८२० रामकुमारांचा विवाह

१८२४ क्षुदिरामांची रामेश्वरची यात्रा

१८२६।२७ रामेश्वरांचा जन्म

१८३५ क्षुदिरामांची गयेची यात्रा

१८३६ फेब्रुवारी १७ गदाधराचा (श्रीरामकृष्णांचा) जन्म

१८४३ क्षुदिरामांचा मृत्यु

१८४५ गदाधराचा व्रतबंध

१८४८ रामेश्वरांचा विवाह

१८५३ गदाधराचें कलकत्त्यास आगमन

१८५५, ३१, मे दक्षिणेश्वरच्या कालीमंदिरांत देवीची प्राणप्रतिष्ठा

१८५६ श्रीरामकृष्णांचें विष्णुमंदिरांत पूजकपदग्रहण

१८५६ कालीमंत्रदीक्षा-ग्रहण

१८५७ रामकुमारांचा मृत्यु

,, हृदयचें दक्षिणेश्वरीं आगमन

,, श्रीरामकृष्णांचें देवीमंदिरांत पूजकपदग्रहण

,, दिव्योन्माद

,, प्रथम दर्शन

१८५८ हालधारीचें दक्षिणेश्वरीं आगमन

१८६० श्रीरामकृष्णांचा विवाह (कामारपुकुरास)

१८६१ राणी रासमणीचा मृत्यु

,, भैरवी ब्राह्मणीचें दक्षिणेश्वरीं आगमन

१८६१–६३ श्रीरामकृष्णांची तंत्रसाधना

१८६४ चंद्रादेवींचें दक्षिणेश्वरीं आगमन

१८६४।६५ जटाधारीचें दक्षिणेश्वरीं आगमन

,, वात्सल्य व मधुरभावसाधना

# प्रस्तुत चरित्रास आधारभूत ग्रंथ


| | |
|---|---|
| श्रीरामकृष्णलीलाप्रसंग बाल्यजीवन | स्वामी शारदानंद |
| ,, साधकभाव | |
| ,, गुरुभाव ( पूर्वार्ध ) | |
| ,, ,, (उत्तरार्ध) | |
| ,, दिव्यभाव व नरेंद्रनाथ | |
| श्रीरामकृष्ण देवेर उपदेश ... ... ... ... | सुरेशचंद्र दत्त |
| श्रीरामकृष्ण परमहंस देवेर जीवनवृत्तांत ... ... | श्रीरामचंद्र दत्त |
| परमहंसदेव ... ... ... ... ... ... | देवेंद्रनाथ बसू |
| श्रीरामकृष्णकथामृत ( चार भाग ) ... ... | एम्. |
| स्वामीशिष्यसंवाद ( दोन भाग ) ... ... ... | शरच्चंद्र चक्रवर्ती |
| श्रीनागमहाशय ... ... ... ... ... | ,, ,, |
| Men I have seen ... ... ... ... ... ... | शिवनाथ शास्त्री |

उद्‌बोधन व प्रबुद्ध भारत या मासिकांतील कांही लेख.

# अनुक्रमणिका


| विषय | पान |
|---|---|
| १. उपोद्घात | १ |
| २. कामारपुकूर व मातापितरें | ८ |
| ३. कामारपुकुरचा शिवाचा संसार | १५ |
| ४. चंद्रादेवींचे विचित्र अनुभव | २४ |
| ५. श्रीरामकृष्णांचा जन्म | ३० |
| ६. बाल्यकथा व पितृवियोग | ३३ |
| ७. गदाधराचा कैशोरकाल | ४३ |
| ८. यौवनाच्या आरंभीं | ५५ |
| ९. साधकभाव | ६५ |
| १०. साधक व साधना | ७२ |
| ११. साधकभावाचा आरंभ | ८२ |
| १२. राणी रासमणी व दक्षिणेश्वर | ८७ |
| १३. पूजकपदग्रहण | ९८ |
| १४. व्याकुळता व प्रथमदर्शन | ११० |
| १५. मथुरबाबू व श्रीरामकृष्ण | ११९ |
| १६. श्रीरामकृष्ण आणि मथुरबाबू ( पुढे चालू ) | १३६ |
| १७. साधना आणि दिव्योन्माद | १५६ |
| १८. पहिल्या चार वर्षांतील आणखी कांही गोष्टी | १७२ |
| १९. विवाह व पुनरागमन | १९८ |

| विषय | पान |
|---|---|
| २०. भरवी ब्राह्मणींचें आगमन .... .... .... .... | २२२ |
| २१. वैष्णवचरण व गौरीपंडित यांची हकीगत .... .... | २३९ |
| २२. विपरीत क्षुधा व गात्रदाह .... .... .... .... | २४२ |
| २३. ब्राह्मणी, चंद्र व गिरिजा यांची हकीगत .... .... | २४८ |
| २४. श्रीरामकृष्णांची तंत्रसाधना.... .... .... .... | २५३ |
| २५. जटाधारी व वात्सल्यभावसाधना .... .... .... | २७१ |
| २६. नाना साधुसंप्रदाय, पद्मलोचन व नारायणशास्त्री .... | २८७ |
| २७. मधुरभावाची मीमांसा .... .... .... .... | ३०० |
| २८. श्रीरामकृष्णांची मधुरभावसाधना .... .... .... | ३१८ |
| सूची | |



# श्रीरामकृष्ण-चरित्र

## १. उपोद्घात

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
गीता, अ. ४, श्लो. ७

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥
गीता, अ. ४, श्लो. ८

" जो राम, जो कृष्ण ( झाला होता ),
तोच आता रामकृष्ण ( होऊन आला आहे )".
—श्रीरामकृष्ण

विद्या, संपत्ति व उद्योग यांच्या साहाय्याने मानव-जीवन सांप्रत किती उन्नत झाले आहे हे एखाद्या वरवर पाहणाऱ्यालाहि स्पष्ट दिसून येईल. कोणत्याहि एका विशिष्ट परिस्थितीत जखडून पडणे, हे जणु काय आता मनुष्य-स्वभावाला असह्यच झाले आहे. जमिनीवर व पाण्यांत वाटेल तसा अनिरुद्ध संचार करण्याने तृप्त न होऊन, त्याने आता आकाशालाहि काबीज करण्याचा प्रयत्न चालविला आहे. आपल्या कौतुकाची निवृत्ति करण्यासाठी त्याने अंधकारमय सागरगर्भात नि पर्वताच्या ज्वालामय भीषण विवरांत प्रवेश करून पाहिला आहे; सदैव हिमाच्छादित पर्वतावर व भूपृष्ठावर फिरून, त्याने तेथील चमत्कार अवलोकन केले आहेत; पृथ्वीवरील लहानमोठ्या सर्व पदार्थांचे गुण-धर्म जाणण्याचा त्याने दीर्घ प्रयत्न केला असून, लता, औषधी व वृक्ष यांच्या-

तहि आपणासारखें प्राणस्पंदन असल्याचें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें आहे. ह्या सर्व गोष्टी नीट समजून घेण्यासाठी त्यानें नानातऱ्हेचीं विलक्षण यंत्रें शोधून काढलीं आहेत. पृथ्वी-आप-तेज वगैरे भूतपंचकावर बरेंच आधिपत्य मिळवून पृथ्वी-संबंधी बहुतेक गोष्टी समजून घेऊन, तेवढ्यानें तृप्त न होता त्यानें आता सुदूर आकाशस्थ ग्रहनक्षत्रादिकाकडे आपली तीक्ष्ण दृष्टि फिरवली आहे, व त्यांची खबर मिळविण्यांत बरेंच यशहि संपादिलें आहे ! हें झालें स्थूल दृष्टीसंबंधी सूक्ष्म दृष्टीसंबंधी ज्ञान मिळविण्यातहि त्यानें असेंच अपार परिश्रम केले आहेत जीवनरहस्याचें अनुशीलन करून त्यानें उत्क्रांतितत्व शोधून काढलें आहे शरीर व मन याचे सूक्ष्म गुणधर्म त्यानें समजून घेतले आहेत. स्थूल जगताप्रमाणेच सूक्ष्म जगातील व्यापारहि कांहीं अचिंत्य नियम-सूत्रानें बद्ध असतात असें त्यानें पाहिलें आहे आणि मानवी आकलन शक्तीच्या बाहेरहि कांहीं घटना असूं शक-तात या गोष्टीवर त्याचा विश्वास बसूं लागला आहे.

पाश्चात्य देशामध्ये जरी पूर्वोक्त उन्नतीचा व शक्तींचा उदय झाला असला तरी भारतवर्ष वगैरे पौर्वात्य देशांतहि त्यांचा प्रसार कांहीं कमी झाला नाही. प्राच्य व पाश्चात्य देशांचा जसजसा अधिकाधिक संबंध येत आहे तसतसा प्राचीन प्राच्य जीवनसंस्कार परिवर्तित होत असून पाश्चात्यांच्या धर्तीवरच त्याची घडण होत चालली आहे. चीन, जपान, भारतवर्ष वगैरे देशातील हल्लीची स्थिति पाहिली म्हणजे वरील सिद्धान्तांची सत्यता दिसून येईल. याचा परिणाम भविष्यकाळीं कांहीहि होवो, परंतु पौर्वात्य देशांवर पाश्चात्य देशांच्या विचारांचा पगडा दिवसेंदिवस जास्त बसत चालला आहे व कालेंकरून तो पृथ्वीवरील सर्व देशांवर बसेल, असें मात्र निःसंशय वाटतें

भारतवर्ष व इतर सर्व देश यांचे भाव, विचार व कल्पना यांचा तुल-नात्मक विचार केला तर असें दिसून येतें की ईश्वर, आत्मा परलोक इत्यादि इंद्रियातीत वस्तूंचें स्वरूप यथायोग्य समजून घेणें, हेंच फार प्राचीन कालापासून भारतानें आपलें ध्येय ठरविलें आहे, व या प्रकारचा साक्षात्कार अथवा उप-

रूढिय करून घेणे हेच व्यक्तीचे तिथे सर्वश्रेष्ठ कर्तव्य समजले जात आहे. भारताच्या सर्व आचारविचारांच्या बुडाशी हेच आध्यात्मिक उच्च ध्येय असल्याचे दिसून येते. तर इतर देशाचे लक्ष ऐहिक सुखोपभोगाकडेच असल्याचे दिसते.

पंचेंद्रिय-प्रमाणाने जड विज्ञानाची पुष्कळशी उन्नति पाश्चात्यांनी केली तरी आत्मविज्ञानासंबंधी या पूर्वोक्त प्रमाणाने त्यांना काहीच मार्ग दाखविला नाही. कारण संयम, स्वार्थहीनता नि अंतर्मुखता, हाच तर आत्मविज्ञानाचा मार्ग, व निरुद्ध मन हेच तर आत्मोपलब्धीचे साधन. अर्थात् बहिर्मुखी पाश्चात्य हे आत्मविज्ञानाचा मार्ग सपशेल चुकून दिवसेंदिवस देहात्मवादी व नास्तिक बनले यात आश्चर्य ते कोणते ? म्हणून ऐहिक भोगसुखच पाश्चात्यांच्या दृष्टीने जीवन-सर्वस्व झाले आहे आणि ते मिळविण्यासाठीच त्यांचे सर्व प्रयत्न चालले असतात. जडविज्ञानाच्या मागे लागून पदार्थांचे जे ज्ञान त्यांनी कमाविले, त्याचा उपयोग मुख्यतः भोगसुखलाभाकडेच करून, ते दिवसानुदिवस अधिकाधिक दांभिक नि स्वार्थपरायण बनत चालले आहेत. पाश्चात्यांच्या समाजातील श्रीमंती व गरिबीच्या तत्त्वावर उभारलेले जातिविभाग, त्यांनी शोधून काढलेली तोफाबंदुकादि भयंकर यंत्रे, अलोट संपत्तीबरोबरच नांदत असलेले अपार दारिद्र्य व असंतोष, भयंकर धनतृष्णा व तज्जन्य परदेशहरण व परजातिपीडन हे सर्व त्यांच्या भोगसुखलालसेचेच फल होय. असेहि दिसून येते की, भोगसुखाची पराकाष्ठा प्राप्त करून घेऊनहि पाश्चात्यांच्या मनास शांति मुळीच नाही, आणि मरणोत्तर अस्तित्वावर अळंबळं विश्वास ठेवूनहि त्यांना सुख कसे ते मुळीच लाभत नाही. अधिकाधिक शोध करून पाश्चात्यांना आता कुठे उमजूं लागले आहे की पंचेंद्रियजन्य ज्ञानाने देशकालातीत अशा वस्तुतत्त्वाचा ठाव केव्हांहि लागणार नाही. विज्ञान फार तर त्या वस्तुतत्त्वाचा क्षणिक आभास मात्र प्राप्त करून देईल, परंतु त्याचे यथार्थ ज्ञान प्राप्त करून देणे ही विज्ञानाच्या शक्तीबाहेरची गोष्ट आहे. म्हणून ज्या देवतेच्या प्रसादाने, हा वेळपर्यंत पाश्चात्य आपणांस बलवान समजत होते, व जिच्या प्रासादानेच त्यांना एवढी धनसंपदा

लाभली होती, तिचेच आसन डळमळूं लागल्यामुळे, पाश्चात्यांच्या मनांतील अशांति आता अधिकच वाढत आहे.

वरील विवेचनावरून दिसून येईल की, पाश्चात्यांच्या जीवनाच्या मुळाशी विषय-प्रवणता, स्वार्थपरता नि धर्मविश्वासराहित्य ह्या गोष्टी आहेत म्हणून, ज्याना पाश्चात्यांसारखी उन्नति पाहिजे असेल त्यांना सहज अगर मुद्दाम, पाश्चात्यांसारखेच बनले पाहिजे, आणि म्हणूनच असे दिसून येतें की, जपानादि ज्या प्राच्य देशानी पाश्चात्यांचें अनुकरण चालविले आहे, त्यांच्यांत स्वजाति व स्वदेश-प्रीतीबरोबरच पाश्चात्यांचे उपरोक्त दोषहि उतरूं लागले आहेत. पाश्चात्यांचे अनुकरण करण्यांत हाच मोठा दोष आहे, आणि पाश्चात्यांच्या संसर्गानें आपल्या भारतवर्षांत ज्या कल्पना खेळूं लागल्या आहेत, त्यांचा विचार करतां वरील सिद्धान्त अधिकच दृढ होतो.

भारतवासीयांचे जीवन धर्माच्या पायावर प्रतिष्ठित झाले असल्याने त्यांची संस्कृति अर्थातच एका अपूर्व व निराळ्याच उपादानानें घडविली गेली आहे. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे संयम हाच या संस्कृतीचा प्राण आहे. व्यक्ति व समाज या दोघांनीहि आपआपले जीवन संयमाच्या साहाय्यानेच नियमित करावें, अशीच भारतवर्षांतील शास्त्रांची आज्ञा असे. त्यागासाठीच भोगांचे ग्रहण, व परलोकासाठीच ऐहिक जीवन, ह्या गोष्टींची सर्वांना सर्व अवस्थेत आठवण देऊन व्यक्ति व समाज यांचे लक्ष या उच्च ध्येयाकडेच शास्त्रांनी लावलेले असे. पाश्चात्यांच्या संसर्गानें या भावनांमध्ये केवढा फरक झाला, तो कोणालाहि स्पष्ट दिसेल. भारतवर्षांतील पूर्वपरंपरागत संस्कार व आचारविचार यांतहि विलक्षण क्रांति घडून आली असून, भारतवर्षानें आपलें पूर्वीचें त्याग व संयम-प्रधान जीवन टाकून भोगप्रधान असें जीवन पत्करलें. या योगानें पूर्वीच्या संस्कृतीचा व शिकवणुकीचा लोप झाला, व भारतवर्षांत नास्तिकता, परानुकरणप्रियता नि आत्मविश्वासराहित्य यांचा उदय होऊन अवघा भारतवर्ष पिळलेल्या उसाच्या चोयटीप्रमाणे नि:सत्व बनला. त्याला वाटूं लागलें की

आपण इतके दिवस ज्या प्रकाराने आयुष्य घालवीत आलों तो प्रकार म्हणजे केवळ भ्रम होय: आणि विज्ञानाच्या जोरावर उन्नति प्राप्त करून घेणारे पाश्चात्य आपल्या पूर्वपरंपरागत संस्कारांना व आचारविचारांना जें रानटी म्हणतात, तें कांही खोटं नाही. भोग-लालसेने मोहित झालेला भारत आपला पूर्वेतिहास नि पूर्वगौरव विसरून गेला. अशा स्मृतिभ्रंशाने भारताचा बुद्धिनाश झाला व या बुद्धिनाशानें भारताच्या अस्तित्वाचा लोप होण्याची वेळ आली ! शिवाय ऐहिक भोगलाभासाठी त्याला आता दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागत असल्याकारणाने ते भोग मिळणेहि अधिकाधिक कठीण होऊ लागले. अशा रीतीने परानुकरण केल्यामुळे, योग व भोग ह्या दोन्ही मार्गातून भ्रष्ट होऊन, कर्णधार नसलेल्या एखाद्या नावेप्रमाणे इच्छारूप वारा जिकडे नेईल तिकडे भारतवर्ष भडकू लागला!

अशा रीतीनें पाश्चात्यांच्या बरोबर त्यांची धर्मग्लानीहि भारतात शिरली. सनातन धर्माची जेव्हा कालप्रभावानें ग्लानि होते, मायेच्या अनिर्वचनीय प्रभावाने मुग्ध होऊन मनुष्य जेव्हां ऐहिक भोगसुखलाभालाच सर्वस्व समजून आपले आयुष्य व्यर्थ घालवूं लागतो, आणि आत्मा, ईश्वर मुक्ति इत्यादि अतींद्रिय पदार्थ म्हणजे सर्व झूट असून, त्या नुसत्या कोणत्या तरी भ्रमांध युगातील स्वप्नराज्यातील कविकल्पना आहेत असे समजूं लागतो, ऐहिक संपत्ति व इंद्रियसुखें यांचा नानातऱ्हेने उपभोग घेऊनहि जेव्हा त्याला शांति मिळत नाही, व अशांतीच्या वेदनांनी तो हाहाःकार करूं लागतो, तेव्हा श्रीभगवान् स्वतःच्या महिम्याने सनातन धर्माचा उद्धार करण्यासाठी अवतीर्ण होतात नि दुर्बल मनुष्यावर कृपा करून, सदय अंतःकरणाने त्याचा हात धरून त्याला पुन्हा धर्माच्या मार्गावर प्रतिष्ठित करतात !

खरोखर, ही धर्मग्लानि सांप्रत सर्व जगभर किती प्रबल झाली आहे हें पाहिले असता मन चकित होतें; धर्म म्हणून जर काही वास्तविक पदार्थ असेल, व विधात्याच्या नियमानुसार मनुष्यप्राण्याला त्याचा लाभ करून घेतां येत असेल, तर सांप्रतकाळीं भोगपरायण मानवजीवन त्यापासून फार फार दूर आहे, असेच म्हणावे लागतें

विज्ञानाच्या साहाय्याने नानातऱ्हेचीं ऐहिक सुखें मिळविण्यास मनुष्य सांप्रत काळीं जगी समर्थ झाला असला तरी त्याच्या मनाला शांति जी मिळालेली नाही ती यामुळेच. या धर्मग्लानीचा कोण प्रतिकार करणार ? ती कोण निवारणार ?

गीतेमधें भगवंतांनी आश्वासन दिले आहे की, जगतामधें जेव्हां धर्मग्लानि उपस्थित होते, तेव्हां स्वमायाशक्तीचें अवलंबन करून मी शरीर धारण करतो, आणि ती ग्लानि दूर करून मानवाला पुन्हा शांतिसुखाचा अधिकारी करतों. अशा अवतारपुरुषांचे श्रीचरण आपल्या वक्षःस्थलावर धारण करून हा भारतवर्ष आजपर्यंत अनेक वेळ धन्य झाला आहे. युगप्रयोजन उपस्थित झाल्यास अमितगुणसंपन्न अशा अवतारपुरुषाचें शुभागमन भारतवर्षात अजूनहि होत असलेले दिसून येते. नुकते चारशे वर्षांपूर्वी श्री चैतन्य महाप्रभूंच्या अदृष्टपूर्व महिम्याने श्रीहरीच्या नामसंकीर्तनाने भारतवर्ष उन्मत्तप्राय झाल्याची गोष्ट लोकप्रसिद्धच आहे आताहि काय पुन्हा तसलीच वेळ आली होती ? सर्व जगाने तुच्छ मानलेल्या नष्टगौरव दरिद्री अशा पुरातन भारतवर्षात आताहि काय पुन्हा युगप्रयोजन उपस्थित होऊन, परम कारुणिक अशा भगवानांना सनातन धर्म-रक्षणार्थ पुन्हा अवतार घेणे भाग पडले होते ? वाचकहो, अशेषकल्याणगुणसंपन्न अशा ज्या महापुरुषाची कथा आता आम्ही सांगणार आहों, ती साद्यंत ऐकून तुमची खात्री होईल की खरोखरच असे घडून आले आहे. श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादि रूपांनी पूर्वीच्या युगांत अवतीर्ण होऊन ज्यांनी सनातन धर्म संस्थापित केला, त्यांचे चरणरज युगप्रयोजन साधण्यासाठी भारतवर्षाला पुन्हा एकवार लागून पुरातन भारतवर्ष खरोखरच धन्य झाला आहे !

" जितकीं मते तितके मार्ग, " " अंतःकरणपूर्वक कोणत्याहि मार्गाचें अनुष्ठान करा, तुम्हांला भगवानांचा लाभ होईलच होईल " हे त्यांचे पवित्र आशीर्वचन श्रद्धायुक्त अंतःकरणाने श्रवण करा.

वाचक ! पराविद्या या जगांत पुन्हा आणण्यासाठी त्यांनी केलेला अलौकिक स्वार्थत्याग व तपस्या यांचे मनन करून त्यांच्या कामगंधहीन पुण्यचरित्राचें यथाशक्ति आलोचन व ध्यान करूं या ! या, आपण दोघेहि पवित्र होऊं ! !

# २. कामारपुकूर व मातापितरें

माझे बाबा रस्त्यानें जाऊं लागले म्हणजे आजूबाजूचे लोक घाईघाईनें उठून उभे राहात व आदरानें म्हणत "हे पाहा, ते येत आहेत !"

"जेव्हां ते तळ्यांत स्नान करीत, तेव्हां त्यांचें स्नान होईतों दुसरें कोणीहि तळ्यांत उतरत नसे !

"ईश्वराचें नामस्मरण करीत असतां त्यांचे वक्षःस्थल आरक्त होत असे !"

"गावांतील लोक त्यांना ऋषीप्रमाणें मान देत."

—श्रीरामकृष्ण

ईश्वरावतार समजून ज्या महापुरुषाची जग आजपर्यंत पूजा करीत आलें आहे, त्यांपैकी भगवान् श्रीरामचंद्र व भगवान् बुद्ध यांची गोष्ट बाजूस ठेवल्यास असें दिसून येईल की, त्या सर्वांच्या ऐहिक जीवनाचा आरंभ दुखःदारिद्र्यांत, सांसारिक अभावांत, एवढेच काय, पण हालअपेष्टेंत झाला आहे. उदाहरणार्थ, क्षत्रियकुलदीपक भगवान् श्रीकृष्णांचा जन्म कारागृहांत झाला, व त्यांना आपलें बाल्यजीवन आत्मीयांपासून दूर, गवळी लोकांमध्यें घालवावें लागलें; भगवान् श्री येशु ख्रिस्तांचा जन्म दरिद्री मातापितरांच्या पोटीं एका धर्मशाळेतील गोठ्यांत झाला; श्रीशंकराचार्यांचा जन्म एका दरिद्री जननीच्या पोटीं झाला; भगवान् श्रीकृष्णचैतन्य यांचाहि जन्म अगदी सामान्य व दरिद्री अशा गृहांतच झाला. इस्लामधर्मप्रवर्तक श्री महमद यांच्याहि जन्माची हीच गोष्ट; तरीपण, ज्या दुखःदारिद्र्यांत संतोषाची शांति नाही, ज्या सांसारिक अभावांत निःस्वार्थता व प्रेम नाही, ज्या दरिद्री मातापितरांच्या हृदयांत त्याग, पवित्रता, कोमलता व दया नाही, अशा स्थलीं या महापुरुषांचा जन्म कधीहि झालेला दिसत नाही.

विचार करून पाहता, अवतार पुरुषाचे दारिद्र्यांत जन्मग्रहण व त्याचे भावी जीवन यामध्ये एक प्रकारचा गूढ संबंध दिसून येतो. कारण यौवनांत व प्रौढपणीं त्यांना विशेषतः दरिद्री, दु:खीकष्टी अशा लोकांतच मिसळून त्यांच्या हृदयाची अशांति दूर करण्याचे काम करावयाचे असल्यामुळे, अशा लोकांच्या अवस्थेशी ते जर मुळापासून परिचित नि सहानुभूतिसंपन्न नसतील तर मग हे काम त्यांच्याकडून व्हावे कसे ? एवढेच नव्हे तर आपण पूर्वीच पाहिले आहे की, समाजातील धर्मग्लानि दूर करण्यासाठीच अवतारी पुरुषाचा जन्म होत असतो. हे कार्य संपादण्यासाठी त्यांना पूर्वीपासून चालत आलेल्या धर्मसंप्रदायांची तत्कालीन अवस्था माहीत असावी लागते व या सर्व प्राचीन संप्रदायांच्या तत्कालीन ग्लानीच्या कारणाची मीमांसा करून, त्यांना पूर्णता प्राप्त करून देणारा नवा संप्रदाय शोधावयाचा असतो हा परिचय मिळण्याचा विशेष सुयोग श्रीमंतांच्या मोठमोठ्या हवेल्यांत येत नसून, दरिद्र्याच्या झोपडीतच येत असतो कारण सांसारिक सुखोपभोगाला आंचवलेल्या मनुष्याचेच, ईश्वर व धर्म या गोष्टींकडे विशेष लक्ष जाते. म्हणून इतर सर्वत्र धर्मग्लानि झालेली असली तरी दरिद्र्याच्या झोपडींत पूर्वकालीन धर्मविधाने थोडीफार तग धरून असतात; आणि म्हणूनच जगद्गुरु महापुरुषांना दरिद्री परिवारांतच जन्म घेणे आवडत असावेसे दिसते.

ज्या महापुरुषांची कथा आता आम्ही सांगणार आहो, त्यांच्या जीवनाचा आरंभ पाहिला असता, त्यांतहि पूर्वोक्त नियमांचे उल्लंघन झालेले नाही, असेच दिसून येते.

हुगळी जिल्ह्याचा वायव्य भाग ज्या ठिकाणीं बांकुरा व मेदिनीपूर या जिल्ह्यांना मिळालेला आहे त्या जागेलगतच एका त्रिकोणांत एकमेकांना लागून श्रीपूर, कामारपुकूर आणि मुकुंदपूर या नांवाचीं तीन खेडीं वसलेलीं आहेत. हीं तीन खेडी निरनिराळीं असलीं तरी तिऱ्हाइताला एकाच गावाच्या या निरनिराळ्या पेठा असाव्यात असे वाटते. जवळपासच्या सर्व गावांत, या तिन्ही खेड्यांना मिळून कामारपुकूर हे एकच नांव प्रसिद्ध आहे. कदाचित् गांवचे

जमीनदार कामारपुकुरांतच पुष्कळ दिवसांपासून राहत असल्यामुळे या तिन्ही खेड्याना कामारपुकूर हे नाव मिळालेले असावे. ज्या काळची गोष्ट आम्ही सांगत आहों, त्या काळीं बर्द्वानच्या महाराजाच्या गुरुवंशातील श्रीयुत गोपी-लाल सुखलाल वगैरे गोस्वामी कामारपुकूरचे जमीनदार होते

कामारपुकूरच्या उत्तरेस १६ कोसावर बर्द्वान शहर असून तेथून कामा-रपुकूरला येण्यास पक्का रस्ता आहे. हा रस्ता या गावास अर्धा वेढा देऊन, पुढे नैऋत्य दिशेस असलेल्या श्रीजगन्नाथपुरीस गेला आहे. पायी जाणारे पुष्कळ यात्रेकरू व वैराग्यसंपन्न साधु बैरागी या रस्त्याने जगन्नाथाला जात येत असतात.

सन १८६७ साली बंगालमध्ये प्रथमच मलेरियाचा प्रादुर्भाव झाला. त्यापूर्वी कृषि-प्रधान बंगालमधील खेडीपाडी म्हणजे आनंद व शांति यांनी काय जणु काय भरलेली असत. विशेषत. हुगळी प्रांतातील विस्तीर्ण धान्य-क्षेत्रातील मधेमधे वसलेली ही लहान लहान खेडी म्हणजे एखाद्या विशाल हिरव्यागार समुद्रात तरंगणारीं लहान लहान बेटेच आहेत की काय असे वाटे. सुपीक जमीन, खाण्यापिण्याची चगळ, स्वच्छ व निर्मल हवेत नित्य परिश्रम, या योगाने ह्या खेड्यापाड्यातील लोकांची शरीरे धष्टपुष्ट राहून त्यांच्या मनांत नेहमी संतोष व प्रेम यांचे वास्तव्य असे खेडींपाडी नेहमी माणसांनी गजबज-लेलीं असून त्यांत शेतकीशिवाय इतरहि लहानसहान घरगुती धंदे चालत. कामा-रपुकूरांत ब्राह्मण, कायस्थ, काष्टी, गवंडी, कुंभार, कोळी, बुरूड वगैरे सर्व प्रका-रच्या जातींचे लोक आहेत. गावात तीन चार मोठीं तळीं आहेत. त्या सर्वात हाल-दारपुकूर हे तळे मोठे आहे. त्यातील कांही तळ्यात शतदल व इतर प्रकारचीहि कमळे असून त्यांनी या तळ्यांस काही अवर्णनीय शोभा आलेली आहे. गावां-तील बहुतेक घरे विटांची आहेत. ठिकठिकाणी पडकीं घरे व देवळे दृष्टीस पड-तात, व त्यावरून गावाच्या पूर्वस्थितीची कल्पना येते. गावाच्या वायव्येस व ईशान्येस दोन स्मशानें आहेत. पहिल्या स्मशानापलीकडे गायरान, माणिक-राजाने सर्वांच्या उपयोगासाठी दिलेली आमराई व आमोदर नद हीं आहेत.

कामारपुकूरच्या उत्तरेस एक मैलावर भूरसुबो नांवाचें एक गाव आहे. श्री माणिकचंद वंद्योपाध्याय या नांवाचे एक धनाढ्य गृहस्थ या गावीं राहत असत. जवळपासच्या गावात " माणिकराजा " या नांवाने त्याची ख्याति असे पूर्वोक्त आमराईशिवाय लोकोपयोगासाठी त्यांनी मोठमोठीं तळीं बांधलीं आहेत. त्यांच्या घरीं लक्ष ब्राह्मणभोजनें अनेकवेळा झालीं, असे म्हणतात.

कामारपुकूरच्या पश्चिमेस एका कोसावर सातवेडे, नारायणपूर व देरें अशीं तीन खेडीं जवळजवळ आहेत. पूर्वी ही गावें चागलीं संपन्न होती. आम्ही ज्या काळची गोष्ट सागणार आहो, त्या काळी या तीन गावाचा रामानंदराय या नांवाचा जमीनदार होता. तो विशेषसा धनाढ्य नव्हता, तरी पण आपल्या कुळांना तो फार गांजणारा होता. कांही कारणानें कोणाशी त्याचें वाकडे आल्यास त्याचा सर्वनाश करण्यास तो मागेंपुढे पाहात नसे. त्याची सर्व संतति अल्पायु झाली. लोकाना छळल्यामुळेच त्याचा असा निर्वंश झाला व त्याच्यामागे त्याच्या संपत्तीची वाताहत झाली, असे लोक म्हणत.

सुमारें १५० वर्षांपूर्वी मध्यम स्थितींतील धर्मनिष्ठ, सदाचारी कुलीन व श्रीरामचंद्रोपासक चतर्जी आडनांवाचें एक घराणें देरे या गावी राहत असे. या घराण्यातील श्रीयुत माणिकराम चतर्जी याला तीन मुलगे व एक मुलगी अशीं चार अपत्यें होतीं सर्वात वडील मुलगा क्षुदिराम हा सुमारें १७७५ सालीं जन्मला. त्याच्या पाठीवर रामलीला नांवाची मुलगी व निधीराम व कानाईराम नांवाचे मुलगे झाले.

श्रीयुत क्षुदिराम तरुणपणी चरितार्थ-साधनाचा कांही धंदा शिकले होते की नाही हे समजण्यास मार्ग नाही. परंतु सत्यनिष्ठा, संतोष व त्याग इत्यादि जे गुण ब्राह्मणाच्या अंगीं स्वभावसिद्ध असावे असे शास्त्रें म्हणतात, ते गुण त्यांच्या अंगीं पूर्णपणे वसत होते. त्यांची शरीरयष्टि उंच व सडपातळ असून त्यांचें अंगीं ताकत चांगली होती. त्यांचा वर्ण गौर असन. चेहरा हंसतमख

संध्यावंदनादि आटोपून श्रीरामचंद्रांची पूजा केल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. शूद्रांकडून तर ते दान कधीच घेत नसत. एवढेच काय पण शूद्रांची यजमानकृत्ये करणाऱ्या ब्राह्मणांच्या घरींहि ते कधी जेवावयास जात नसत. कन्याविक्रय करणाऱ्या ब्राह्मणांच्या हातचें पाणीहि ते कधी घेत नसत. ते अशा तऱ्हेचे निष्ठावान् व सदाचारसंपन्न असल्यामुळे गावातील लोकांची त्यांच्यावर फार भक्ति असे व ते त्यांना अतोनात मान देत.

पित्याच्या मृत्यूनंतर संसाराचा सर्व भार क्षुदिरामावरच पडला व धर्म-मार्गातच राहून त्यांनीं संसार करण्यास सुरुवात केली पित्याच्या मृत्यूचे अगो-दरच त्यांचा विवाह झाला होता, परंतु त्यांची पत्नी अल्पवयातच मरण पावली. म्हणून त्यांनी आपल्या २४ व्या वर्षी ( १७९९ ) पुन्हा लग्न केलें. त्यांच्या द्वितीय पत्नीचें नांव चंद्रामणी होतें, पण घरची मंडळी तिला ‘ चंद्रा ’ या नांवानेच संबोधीत असत. तिचें माहेर ‘ सराठी मायापूर ’ नावाच्या गावी होतें. ती सुस्वरूप, सरल अंतःकरणाची असून तिची देवब्राह्मणांवर फार निष्ठा असे. विशेषतः तिचे अंतःकरण अत्यंत श्रद्धासंपन्न व प्रेमळ असल्यामुळे ती सर्वांना प्रिय असे. लग्नाच्या वेळी तिचें वय केवळ ८ वर्षांचें होतें. ( जन्म १७९१ ). लग्नानंतर ६-७ वर्षांनी ( १८०५-०६ ) तिचा पहिला मुलगा रामकुमार हा जन्मला. पुढे ५-६ वर्षांनी ( १८१०-११ ) तिला कात्यायनी नांवाची मुलगी झाली व तिच्यानंतर १६ वर्षांनी ( १८२६-२७ ) दुसरा मुलगा रामेश्वर हा जन्मास आला

धर्माप्रमाणे वागून संसारयात्रा चालविणें ही गोष्ट किती कठिण आहे याचा अनुभव क्षुदिरामांना लवकरच आला. बहुधा कात्यायनीच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांनी ( १८१४ ) परीक्षेचा एक भयंकर प्रसंग त्यांच्यावर ओढ-वला. देरें गावचा जमीनदार रामानंदराय याचा स्वभाव दुष्ट होता असे वर सांगितलेच आहे. देरें गावांतील एका गृहस्थावर त्याची खप्पा मर्जी होऊन त्याने त्याच्यावर खोटाच खटला भरला आणि आपल्या बाजूने साक्ष देण्यास क्षुदिरामांस सांगितलें. धर्मपरायण क्षुदिरामांना नेहमी कायदे, कोर्टें, वकील

वगैरेंची मोठी भीति वाटे, आणि खऱ्या गोष्टीसाठीसुद्धा कोर्टाची पायरी चढण्यास त्यांचे मन घेत नसे. अर्थातच जमीनदाराच्या त्या कृतीने ते पेंचांत पडले. जमीनदाराच्या बाजूने खोटी साक्ष दिली नाही तर आपल्यावर त्याचा रोष होईल ही गोष्ट पूर्णपणे जाणूनहि त्यांनी खोटी साक्ष देण्याचें नाकारलें. अर्थातच, त्याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. जमिनदाराने कांही तरी कुभाड रचून त्याच्यावरहि फिर्याद केली, आणि त्या खटल्यात जय मिळवून त्याने त्यांची मालमत्ता जप्त करून तिचा लिलाव केला ! बिचाऱ्या क्षुदिरामांना देरे गावात राहण्याला आता एक टीचभरसुद्धा जागा उरली नाही. त्यांच्यावर ओढवलेल्या या संकटाने सारे गाव हळहळले पण जमीनदाराविरुद्ध त्यांना मदत करण्यास कोणाचीहि छाती नव्हती.

अशा रीतीने चाळिसाव्या वर्षाच्या सुमारास क्षुदिरामाचे सर्वस्व एकाएकी नष्ट झाले ! वडिलोपार्जित व स्वकष्टार्जित त्याची सर्व संपत्ति—अंदाजे १५० बिघे जमीन—अशा रीतीने झंझावाताच्या तडाख्यांत सापडलेल्या एखाद्या एकाकी अभ्राप्रमाणे क्षणार्धात नष्ट झाली ! परंतु या दारुण प्रसंगानेहि त्याची धर्मनिष्ठा बिंदुमात्र विचलित झाली नाही. त्यानी श्रीरामचंद्राच्या पादपद्मावर आपला सर्व भार समर्पण करून, दुर्जनापासून दोन हात दूर राहिलेले बरे असा विचार करून, आपल्या राहत्या घराचा व आपल्या गावाचा शांत चित्ताने कायमचा निरोप घेतला!

वर सांगितलेच आहे की, त्यावेळीं कमारपुकूर येथे सुखलाल गोस्वामी राहत असत. समानशील असल्यामुळे क्षुदिराम व ते यांचा एकमेकांशी पुष्कळ परिचय होता. क्षुदिरामावर आलेले संकट त्यांना समजताच त्यांनी आपल्या घरातील काही भाग रिकामा करून त्यात राहण्यास येण्यास क्षुदिरामास बोलावणे पाठविले. क्षुदिरामांना संकटसमुद्रात हा मोठाच आधार मिळाला आणि श्रीभगवानांच्या अचिंत्य लीलेनेच गोस्वामींना आपल्याला बोलवावयाची बुद्धि झाली असा विश्वास त्यांच्या मनांत उत्पन्न होऊन त्यांनी कृतज्ञतापूर्वक या

निमंत्रणाचा स्वीकार केला आणि तेव्हापासून ते कामारपुकुरात राहू लागले. उदार अंतःकरणाच्या सुखलालांना यायोगें फार आनंद झाला, आणि धर्मपरायण क्षुदिरामांची संसारयात्रा नीट चालावी म्हणून त्यांनी दीड बिघे जमीन क्षुदिरामांच्या नांवाने करून दिली.

# ३. कामारपुकूरचा शिवाचा संसार

"माझी आई अत्यंत सरळ स्वभावाची होती. तिला लोकांना खाऊ घालणें फार आवडत असे. ती लहान मुलांवर फार प्रेम करी."

—श्रीरामकृष्ण

ज्या दिवशीं क्षुदिराम आपली पत्नी, मुलगा व तान्ही मुलगी यांना घेऊन कामारपुकूरच्या पर्णकुटिकेंत प्रथम राहण्यास गेले, त्या दिवशीं त्यांच्या मनांत काय विचार घोळत असतील हे सांगत बसण्यापेक्षा समजणेंच अधिक बरें! ईर्ष्याद्वेषपूर्ण संसार त्या दिवशीं त्या दोघांनाहि अमावस्येच्या काळ्याकुट्ट भयाण स्मशानासारखा भास लागला. सुखलालांच्या स्नेह, औदार्य, दया इत्यादि गुणांचा अनुभव येऊन त्यांच्या अंतःकरणांत सुखाशेचा जरी थोडा वेळ प्रकाश पडला, तरी दुसऱ्याच क्षणीं तो नाहीसा होऊन, त्यांच्या अंतश्चक्षूंना पुन्हा जिकडे तिकडे अंधारच दिसूं लागला. आपली पूर्वीची व हल्लीची स्थिति, यांतील फरक वरचेवर त्यांच्या मनापुढें येऊं लागला. संकटें आल्यानेंच माणसाला संसाराची असारता आणि अनित्यता नीट पटूं लागते हे लक्षांत ठेवतां, क्षुदिरामांच्या हृदयांत त्यावेळी वैराग्याचा उदय झाला हे साहजिकच होय. वर सांगितलेल्या चमत्कारिक व अयाचित रीतीनें मिळालेल्या आश्रयाची आठवण होऊन त्यांचें हृदय ईश्वराच्या भक्तीनें व निर्भरतेनें अधिकच भरून गेलें आणि श्रीरामचंद्राच्या पायीं पूर्णभावानें आत्म-समर्पण करून व संसाराविषयीं उदासीन होऊन, त्यांनीं आपला वेळ आतां भगवानांच्या पूजाध्यानांत घालविण्यास सुरवात केली. संसारांत राहूनहि संसाराविषयीं उदासीन झाल्यामुळें ते एखाद्या वानप्रस्थाप्रमाणें आपले दिवस घालवूं लागले.

याच सुमारास घडलेल्या एका गोष्टीने त्यांचा धर्मविश्वास अधिकच वाढला. एक दिवस कांही कामासाठी त्यांना जवळच्या एका गावीं जावें लागलें. तेथून परत येत असतां थकून जाऊन क्षणभर विश्रांति घेण्यासाठी ते एका झाडाखाली बसले, व लगेच त्यांना झोप लागली. झोपेत त्याना एक विलक्षण स्वप्न पडले. श्रीरामचंद्र बालवेषांत त्यांच्यापुढे उभे राहून एका जागेकडे बोट दाखवून त्याना म्हणाले, " मी या जागीं आज कित्येक दिवस उपाशी पडलो आहे मला आपल्या घरीं घेऊन चल. तुझी सेवा ग्रहण करण्याची मला फार इच्छा आहे. " भगवताची अशी अयाचित कृपा पाहून त्यांचे हृदय भरून येऊन नयनांतून आनंदाश्रु वाहूं लागले व इतक्यात ते जागे झाले.

या अद्भुत स्वप्नाचा अर्थ काय असावा अशा विचारात ते आहेत, इतक्यांत त्यांची दृष्टि एका जागेवर गेली व स्वप्नांत श्रीरामचद्रानी दाखविलेली जागा हीच असे त्यांनी ओळखले. ते तत्क्षणींच उठले व जवळ जाऊन पाहतात तो एका सुंदर शालिग्राम शिळेवर एक भुजंग फणा काढून डुलत आहे! त्यांची चाहूल लागतांच भुजंग कोठे नाहीसा झाला. क्षुदिरामांनी पुढे होऊन ती शिळा हातांत घेतली व तिच्या लक्षणांवरून पाहतात तो ती खरोखरच रघुवीर शिळा! हे पाहून त्यांचा आनंद गगनांत मावेना. पुढे घरी परत आल्यावर त्यांनी त्या शिळेची प्राणप्रतिष्ठा केली आणि तेव्हांपासून ते तिची नियमित पूजा करूं लागले.

श्रीरामाशिवाय ते श्रीशीतला देवीचीहि पूजा करीत असत वाईट दिवस एकामागून एक निघून जात चालले, आणि क्षुदिरामहि सर्व प्रकारच्या दुःखकष्टांविषयी उदासीन राहून, परमेश्वरावर भार घालून शांत चित्तानें व धर्ममार्गानें कालक्रमणा करूं लागले. घरीं एखाद्या दिवशीं मूठभरहि धान्य नसावें; साध्वी चंद्रादेवींनी ही गोष्ट दुःखित अंतःकरणानें पतीजवळ निवेदन करावी; क्षुदिरामानी हे ऐकूनहि लेशमात्र विचलित न होतां तिला आश्वासन देऊन म्हणावें, " कांही हरकत नाही, जर श्रीरामचंद्रालाच आज उपवासी राहाव-

याचे असेल तर त्याच्यावरोबर आपणहि उपवासी राहूं!" सरळ अंतः-करणाच्या चंद्रादेवीनींहि पतीप्रमाणेच परमेश्वरावर भार घालून आपली गृहकृत्ये करूं लागावें, आणि आश्चर्याची गोष्ट—त्या दिवशींचे त्याचे संकट कसे ना कसे तरी दूर व्हावें!

परंतु अशा प्रकारचे अत्यंत कठीण प्रसंग क्षुदिरामांस फार दिवस भोगावे लागले नाहीत. श्रीसुखलालजींनी त्याना जी दीड बिघे जमीन दिली होती, तींत लवकरच त्यांच्या लहानशा संसारास पुरून अतिथीअभ्यागतांच्या सेवेस उरेल, इतके धान्य उत्पन्न होऊं लागलें. ते शेतकऱ्यास आपली जमीन वांट्यानें देत, व पेरणीच्या वेळीं श्रीरामचंद्रांचें नांव घेऊन प्रथम स्वतः कांही मुठी धान्य पेरीत, नि मग बाकीचे काम इतर लोक करीत. अशा प्रकारें २।३ वर्षें लोटली व क्षुदिरामाचा संसार, जाडें भरडें अन्नवस्त्र मिळत राहून कसा बसा चालूं राहिला. परंतु या दोन तीन वर्षांत त्यांच्या हृदयांत जशी शांति, संतोष व ईश्वरनिर्भरता दृढ झाली, तशी होण्याचें फारच थोड्यांच्या भाग्यांत असते. मन निरंतर अंतर्मुख राहूं लागल्याकारणानें मधून मधून त्यांना दिव्य दर्शनें होऊं लागलीं. रोज सकाळीं व संध्याकाळीं संध्या करतांना गायत्री-ध्यानाचे वेळीं ते इतके तन्मय होत की त्याचे वक्षःस्थळ आरक्त होई व मिटलेल्या डोळ्यां-तून एकसारख्या प्रेमाश्रुधारा वाहूं लागत! प्रभातसमयीं हातांत परडी घेऊन पूजेसाठीं फुलें तोडीत असतां त्याना असें दिसावें की, आपली आराध्य देवता श्रीशीतलादेवी आठ वर्षांच्या मुलीचें रूप घेऊन, तांबडें वस्त्र नेसून नि नाना-प्रकारचे अलंकार घालून, हासत हासत आपल्याबरोबर येत आहे व फुललेल्या झाडाच्या फांद्या वाकवून धरून फुलें तोडण्याला आपणांस मदत करीत आहे! या व अशाच इतरहि दिव्य दर्शनांनी त्यांचे हृदय नेहमी उत्साहपूर्ण राही आणि अंतःकरणांतील दृढ विश्वास व भक्ति मुखावर उमटून त्याचें वदन नेहमी तेजस्वी दिसे. त्याची ती धीरगंभीर, शांत व तेजस्वी मुद्रा पाहून गावांतील लोकांत हळूहळू त्यांच्याविषयी फार भक्ति व श्रद्धा उत्पन्न झाली आणि ते त्यांस एखाद्या ऋषीसारखा मान देऊं लागले. ते रस्त्यानें येत आहेत असें पाह-

तांच त्यांनी आपल्या गप्पा बंद कराव्यात व मोठया आदराने उठून त्यांस सन्मान द्यावा. तळ्यांत ते स्नान करीत असतांना त्याचें स्नान होईतो इतरांनी स्नानास उतरूं नये ! त्यांचा आशीर्वाद कधीहि विफल होणार नाही, या दृढ भावनेने त्यांनी सुखदुःखाच्या प्रसंगीं त्यांचा आशीर्वाद घ्यावा !

श्रीमती चंद्रादेवी स्नेह व सरलता यांची मूर्तिमंत पुतळीच होत्या. त्यांची अलौकिक दया व प्रेम यांनी मोहित होऊन जाऊन गावांतील लोक त्यांना आईसारखा मान देत. संकटसमयी त्यांना त्यांच्याकडून सहानुभूति व यथाशक्ति साहाय्य हटकून मिळे. दरिद्री लोकांची पूर्ण खात्री असे की चंद्रादेवीकडे गेल्यास आपल्याला एक मूठभर भिक्षा तर मिळेलच, पण शिवाय त्यांच्या स्नेह-दयामय दर्शनाने आपल्या अंतरात्म्याला शांतीहि मिळेल ! साधु, संन्यासी, फकीर यांना माहीत असे की त्यांच्या घराचें दार आपल्यासाठी नेहमी खुलेंच आहे ! शेजारच्या मुलांना ठाऊक असे की, चंद्रादेवीजवळ जर एखाद्या गोष्टीबद्दल हट्ट घेऊन बसले तर तो कोणत्या तरी मार्गाने पूर्ण होईलच ! अशा प्रकारें गावांतील लहानथोर स्त्री, पुरुष क्षुदिरामांच्या पर्णकुटिकेकडे नेहमी जात येत असत आणि ती दरिद्री पर्णकुटीहि नेहमी एक प्रकारच्या अपूर्व शांतीने भरलेली असे.

पूर्वी सांगितलेंच आहे की, क्षुदिरामाना रामशीला नांवाची एक बहीण व निधिराम व कानाईराम ( रामकानाई ) या नांवाचे दोन लहान भाऊ होते. देरे गावचें सर्वस्व नाहीसें होण्याचे वेळीं रामशीलेचे वय ३५ वर्षांचे व भावांचीं वयें ३० व २५ होतीं. पश्चिमेस ६ कोसांवर असलेल्या छिलीमपूरच्या भागवत बंद्योपाध्यायांशीं रामशीलेचा विवाह झाला होता व तिला रामचांद नांवाचा एक मुलगा व हेमांगिनी नांवाची एक मुलगी झाली होती. क्षुदिरामांवर आलेल्या संकटाचे वेळीं ह्या मुलांचीं वयें अनुक्रमे सुमारे २१ व १६ अशी होती. श्रीयुत रामचांद मेदिनीपूर गावीं वकिली करूं लागले होते. हेमांगिनीचा जन्म देरें गावीं मामाच्याच घरीं झाला होता व मामाच्या घरच्या सर्वांचा तिच्यावर फार लोभ होता. क्षुदिराम तर तिच्यावर स्वतःच्या मुलीसारखें प्रेम करीत व तिचें

विवाहाचें वय झालें तेव्हां कामारपुकूरच्या वायव्येस २५ कोसांवर असलेल्या शिरुड गावच्या श्रीकृष्णचंद्र मुकर्जीशीं तिचें लग्न त्यांनी स्वतः करून दिलें. हेमांगिनीला पुढे राघव, रामरतन, हृदयराम व राजाराम असे चार पुत्र झाले.

क्षुदिरामांचा भाऊ निधिराम याला कांही मूलबाळ झालें की नाही ह्याचा पत्ता लागला नाही सर्वांत लहान रामकानाई याला रामतारक उर्फ हलधारी व कालिदास असे दोन पुत्र होते. रामकानाई हा भक्तिमान् व भाविक असे. एकदा कुठल्याशा जत्रेंत रामचरित्रावर नाटक चालले होते ते तो पाहात होता. रामाच्या वनवासगमनाचा प्रसंग होताः तो पाहात असतां त्यांत तो इतका तन्मय होऊन गेला की, सर्व प्रकार आपल्या समोर खरोखरीच घडत आहेत, अशा बुद्धीने रामाला वनवासाला पाठविण्याचें कारस्थान रचणाऱ्या कैकयीचें सोंग घेणाऱ्याला मारण्यासाठी तो रंगभूमीवर धांवून गेला !

रामशीलेचा मुलगा रामचांद हा मेदिनीपुरांत वकिली करूं लागला होता असें वर सांगितलेंच आहे. त्याला आपल्या धंद्यांत हळूहळू बराच पैसा मिळूं लागला. आपल्या मामांवर आलेलें संकट पाहून, तो क्षुदिरामांना दरमहा १५ रुपये व निधिराम नि कानाईराम यांस प्रत्येकी १० रुपये पाठवूं लागला. आपल्या भाच्याची खबर वेळचेवेळीं न कळल्यास क्षुदिरामांस चैन पडत नसे, व त्याचें कुशल समजण्यासाठी ते मेदिनीपुरास जाऊन २।४ दिवस राहून, परत कामारपुकूरास येत असत. मेदिनीपुरास ते असेच एकदा जात असतां वाटेंत घडलेली एक गोष्ट आम्हीं ऐकली आहे, तिच्यावरून क्षुदिरामांचें अंतःकरण कसें भक्तिपूर्ण होतें, हें दिसून येईल.

मेदिनीपूर गाव कामारपुकूराच्या नैऋत्येस सुमारें ४० मैलांवर आहे. रामचांदाकडील हकीगत बरेच दिवसांत न समजल्यामुळे क्षुदिरामांस फार काळजी लागली व मेदिनीपुरास जाण्यास ते एक दिवस घरून निघाले. तेव्हां माघ की फाल्गुन महिना असावा. बेलाच्या झाडाचीं सर्व पानें यावेळीं गळून

पडतात व नवीन पानें येईतों, महादेवास वाहण्यास लोकांना पाने मिळण्यास फार त्रास पडतो. घरून निघण्यापूर्वी कांही दिवसपर्यंत क्षुदिरामांना असाच त्रास पडला होता.

क्षुदिराम अगदी पहाटेस उठून निघाले व १५।१६ मैल वाट चालून एका गावी पोहोचले. तेथील बिल्ववृक्षांना नुकतीच पाने फुटली होती व ती पाहून त्यांच्या मनास फार आनंद झाला. मेदिनीपुरास जाण्याची गोष्ट अगदी विसरून जाऊन ते त्या गावात गेले व तेथून एक परडी व फडके विकत घेऊन आले. तीं नीट धुऊन त्यांत तीं नवीन बेलाचीं कोवळी कोवळी पाने भरून, त्यांनी ते फडके भिजवून त्यावर घातले व पुन्हा कामारपुकूराची वाट धरली आणि १२ वर दोन वाजता ते आपल्या घरी पोहोचले घरी पोहोचताच त्यांनी स्नान केले व त्या बिल्वपत्रांनी मोठया आनंदाने व भक्तीने श्रीमहादेव व शीतलादेवी यांची यथासांग पूजा करून मग स्वारी जेवावयास बसली! चंद्रादेवींनी आता वेळ पाहून, मेदिनीपुरास न जातां परत येण्याचे कारण त्यांना विचारलें व नव्या नव्या बिल्वपत्रानी देवतार्चन करण्याच्या लोभांत आपल्या पतीला गावास जाण्याचे विस्मरण झाले हे ऐकून त्यांना अत्यंत विस्मय वाटला. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून क्षुदिराम पुन्हा मेदिनीपुरास गेले. असो.

एक दोन होतां होतां कामारपुकूरास येऊन क्षुदिरामांस ६ वर्षे झाली (१८२०). रामकुमार व कात्यायनी आता १५ व २० वर्षांची झाली होती. त्यांचे विवाहयोग्य वय झालेले पाहून, त्यांनी कामारपुकूरच्या वायव्येस एक कोसावर असलेल्या आनुर गावच्या केनाराम बंद्योपाध्यायाशी कात्यायनीचा विवाह केला व केनारामाची बहीण रामकुमारास करून घेतली. रामकुमाराचे जवळच्याच एका पाठशाळेत साहित्यशास्त्र व व्याकरण यांचे अध्ययन झाले होते व हल्ली तो स्मृतिशास्त्राचा अभ्यास करीत होता.

आणखी तीन चार वर्षे लोटलीं. या अवधींत श्रीरामचंद्रांच्या कृपेने क्षुदिरामांची संसारयात्रा ठीक चालली होती. रामकुमाराने आपले अध्ययन

समाप्त केलें होतें व यथाशक्ति द्रव्योपार्जन करून तो आपल्या पित्यास संसार चालविण्यास मदत करूं लागला होता. क्षुदिरामहि निश्चिंत मनानें ईश्वर-आराधनेंत अधिक काल घालवूं लागले होते. याच अवधींत क्षुदिरामांचे आश्रयदाते श्री सुखलाल गोस्वामी यांस देवाज्ञा झाली; क्षुदिरामांना त्यांच्या मृत्यूमुळे फारच दुःख झालें

रामकुमार मोठा होऊन संसाराचा भार वाहण्यास समर्थ झाल्यामुळे क्षुदिरामांस इतर गोष्टींकडे लक्ष देण्यास आता अवसर सापडला. तीर्थयात्रा करण्याची इच्छा होऊन त्यांनी या सुमारास दक्षिणेकडील बहुतेक तीर्थे केलीं व सेतुबंधाहून एक बाणलिंग आणून आपल्या देव्हाऱ्यांत ठेवलें. हें बाणलिंग कामारपुकूरास क्षुदिरामांच्या घरी अजून आहे. तीर्थयात्रेहून परत आल्यावर सुमारें २ वर्षांनीं चंद्रादेवींना बऱ्याच वर्षांनंतर एक मुलगा झाला (१८२६). रामेश्वराच्या यात्रेहून परत आल्यावर हा मुलगा झाला म्हणून त्याचे नांव क्षुदिरामांनी रामेश्वर हेंच ठेवलें.

यानंतर आणखी ८ वर्षे लोटलीं. रामकुमार पुराण सांगून व शांति-स्वस्त्ययनादि कर्मे करून आपल्या पित्याच्या संसारास मदत करू लागले होतेच. म्हणून, आता पूर्वीप्रमाणे क्षुदिरामांना सांसारिक कष्ट नव्हते. शांतिस्वस्त्ययनादि कर्मांत रामकुमार फार प्रवीण झाले होते व असे सांगतात की या कामीं त्यांना दैवी शक्ति प्राप्त झाली होती. शास्त्राच्या अध्ययनानें त्यांची शक्तीच्या उपासनेवर फार श्रद्धा उत्पन्न झाली होती व त्यांनी एका गुरूकडून देवीमंत्रहि घेतला होता. आपल्या इष्ट देवतेची पूजा करतांना एक दिवस त्यांना एक अद्‌भुत दर्शन झालें. ज्योतिषशास्त्रांत आपणांस सिद्धि प्राप्त व्हावी या हेतूनें प्रत्यक्ष देवी आपल्या जिव्हाग्रीं कांही एक मंत्र आपल्या अंगुलीनें लिहीत आहे असे त्यांनी पाहिलें! त्या दिवसापासून रोग्याला पाहतांक्षणींच, तो बरा होईल की नाही हें त्यांना समजत असे! आणि म्हणून रोग्यासंबंधी ते जे म्हणत ते खरे होत असें. एके वेळीं एक गृहस्थ सस्त्रीक नदीवर स्नानास आले होते. रामकुमार नदीवरच होते.

त्या स्त्रीचें तोंड नजरेस पडतांच त्यांनी जाणलें की ही स्त्री उद्या मरणार आहे, व त्यानी तिच्या नवऱ्यासहि ते सांगितले. स्त्री निरोगी असल्यानें ही गोष्ट तिच्या नवऱ्यास खोटी वाटली, पण ती स्त्री खरोखरच दुसऱ्याच दिवशी एकाएकी मरण पावली ! रामकुमारास स्वतःच्या स्त्रीचाहि मरणकाळ समजला होता. प्रसूत होतांच ती मरेल असे त्यांनी जाणले होते व पुढे घडलेंहि तसेंच.

इ. स. १८३५ त क्षुदिरामांना पुन्हा तीर्थयात्रा करण्याची प्रबल इच्छा झाली. त्यांचे वय आता ६० वर्षांचें झालें होते, तरी गयेस पायी जाण्याचा त्यांनी बेत केला. तीर्थयात्रेसंबंधी हृदयनें आम्हांस असे सांगितलें की कात्यायनी आजारी होती म्हणून एक दिवस क्षुदिराम तिच्या समाचारास आनूर गावीं गेले. आपल्या कन्येची सारखी बडबड व हातवारे पाहून त्यांनी जाणले की, हिला भूतबाधा झाली आहे. त्यानी श्रीभगवानांचे स्मरण करून भुतास म्हटले, "तूं भूत अस, नाहीतर कोणीहि अस, माझ्या मुलीला सोडून जा." तें भूत म्हणाले, "तूं गयेस जर पिंडदान करशील तर मी या योनीतून मुक्त होईन, म्हणून गयेस जाण्यास तूं निघतांच मी तुझ्या मुलीस सोडीन." यावरून क्षुदिरामांनी गयेची यात्रा करण्याचें ठरविलें. कारण कोणतेंहि असो, या साली क्षुदिरामांनी गयेची यात्रा केली हे खास.

क्षुदिराम गयेत जाऊन पोहोचले त्यावेळीं चैत्र मास होता. येथे चैत्रांतच पिंडदान करावें अशी शास्त्राज्ञा असल्यामुळे ते चैत्रांत गेले असावेत. एक महिना तेथे राहून यथाशास्त्र सर्व कर्मे केल्यावर शेवटी श्रीगदाधराच्या चरणीं त्यांनी पिंडदान केलें. यथाशास्त्र क्रिया करून पितृऋणांतून आज आपण मुक्त झालों या विचाराने त्यांना अत्यंत समाधान वाटलें, आणि परमेश्वराने आपल्यासारख्या यःकश्चित माणसाकडून आपली नीट सेवा करून घेतली, हा विचार मनांत येऊन त्यांचें अंतःकरण कृतज्ञतेने, नम्रतेने व प्रेमाने भरून आलें. दिवसाची तर गोष्टच नाही, रात्रीं निजतांना सुद्धा हाच एक विचार त्यांच्या अंतःकरणांत घोळूं लागला. एके रात्रीं त्यांना एक स्वप्न पडलें. त्यांनी असें

पाहिले की, श्रीगदाधराच्या चरणीं पितरांना आपण पिंडदान करीत आहोत, व आपले सर्व पितर दिव्य देह धारण करून ते पिंड मोठ्या आनंदानें ग्रहण करून आपणास आशीर्वाद देत आहेत! त्यांच्या दर्शनानें आपणांस आनंद झाला असून आपण सद्गदित होऊन पितरांना वारंवार नमस्कार करीत आहोंत. इतक्यांत त्यांना असें दिसलें की एका अदृष्टपूर्व ज्योतीनें मंदिर भरून गेलें आहे व आपले सर्व पितर एका सिंहासनाच्या बाजूनें दोन ओळींत गंभीरपणें उभे राहून त्या सिंहासनावर बसलेल्या एका अद्भुत पुरुषाची हात जोडून स्तुति करीत आहेत! इतक्यांत तो दिव्य तेजस्वी व श्यामसुंदर असा पुरुष स्नेहमय दृष्टीनें आपणाकडे हासत हासत पाहात आहे व जवळ येण्यासाठीं इशारा करीत आहे असें त्यांना दिसलें. क्षुदिराम एखाद्या यंत्राप्रमाणें ओढले जाऊन त्याचे समोर उभे राहिले आणि भक्तियुक्त अंतःकरणानें त्या पुरुषाला साष्टांग नमस्कार घालून, सद्गदित चित्तानें त्याची नानाप्रकारें स्तुति करूं लागले. तो दिव्य पुरुष त्यांच्या स्तुतीनें संतुष्ट होऊन घनगंभीर पण मधुर वाणीनें त्यांना म्हणाला, " क्षुदिराम! तुझ्या भक्तीनें मी अत्यंत संतुष्ट झालों आहे. पुत्ररूपानें तुझ्या घरीं अवतीर्ण होऊन मी तुझी सेवा ग्रहण करीन!"

इतक्यांत त्यांची झोंप मोडली. आपण कोठें आहोंत हेंच त्यांना बराच वेळ समजेना. हळूहळू त्यांना सर्व आठवण झाली आणि परमेश्वराचें नामस्मरण करीत ते उठून बसले. स्वप्नाबद्दल त्यांच्या मनांत नानाप्रकारचे विचार घोळूं लागले, पण शेवटीं त्यांच्या श्रद्धासंपन्न हृदयाची खात्री झाली की देवस्वप्न कधींहि खोटें होत नाहीं. आपल्या उदरीं कोणी महापुरुष जन्म घेणार आणि आपल्याला येवढ्या वृद्ध वयांतहि पुत्रमुखावलोकनाचें सौख्य मिळणार, हें खास. शेवटीं ह्या अद्भुत स्वप्नाचें फल प्रत्यक्ष पाहिल्यावाचून हें स्वप्न कोणासहि सांगावयाचें नाहीं, असा त्यांनी निश्चय केला आणि कांहीं दिवस गयेंत राहून वैशाख महिन्यांत ते कामारपुकूरास परत आले

# ४. चंद्रादेवींचे विचित्र अनुभव

"माझी आई सरलपणाची मूर्तीच होती. संसारांतील साध्या साध्या गोष्टीहि तिला समजत नसत, तिला पैसेसुद्धा नीट मोजतां येत नसत! कोणती गोष्ट दुसऱ्याजवळ बोलावी, कोणती बोलूं नये, हेंहि तिला समजत नसे—म्हणून लोक तिला 'भोळी' 'भाबडी' असे म्हणत!"

—श्रीरामकृष्ण

जगत्पावन महापुरुषांचा जन्म होण्याचे वेळीं त्यांच्या मातापितरांना असाधारण आध्यात्मिक अनुभव प्राप्त होतात व अनेक दिव्य दर्शनेंहि होतात, ही गोष्ट जगांतल्या सर्व धर्मग्रंथांत सांगितली आहे. भगवान् श्रीरामचंद्र श्रीकृष्ण, येशूख्रिस्त, बुद्ध, शंकराचार्य, कृष्णचैतन्य वगैरे ज्या अवतारिक पुरुषांची जग अजून पूजा करितें, त्यांच्या मातापित्यांच्या संबंधीं वरील गोष्ट शास्त्रांत सांगितलेली आढळते. उच्च प्रकृतिसंपन्न अशा मातापितरांपासूनच उदार चरित्रवान् पुरुष निपजतात, असा जर आधुनिक शास्त्रें सिद्धान्त सांगतात, तर श्रीकृष्ण, बुद्ध, येशू यांच्यासारख्या महापुरुषांचीं मातापितरें विशेष सद्गुणसंपन्नच असलीं पाहिजेत, ही गोष्ट खरी मानल्यावाचून गत्यंतरच नाही. ह्या महापुरुषांच्या जन्मग्रहणकालीं त्या मातापितरांचीं मनें साधारण मानवापेक्षा कितीतरी उच्च भूमीवर असलीं पाहिजेत व तीं अशीं असण्यासाठीच त्यांना त्यावेळीं असाधारण दर्शनें व अनुभव प्राप्त झाले असले पाहिजेत, ही गोष्ट सुद्धा मानणें भाग पडते.

परंतु पुराणांनी ही गोष्ट सांगितली असली, अथवा ही गोष्ट युक्तीसहि पटत असली तरी संशयी मनामधे यासंबंधी पूर्ण विश्वास उत्पन्न होत नाही,

ही गोष्ट खरी. कारण, स्वतःला साक्षात् अनुभव येणाऱ्या विषयांवरच ते मन विश्वास ठेवतें व म्हणून अपरोक्षानुभूति होण्याचे पूर्वी ईश्वर, आत्मा, मुक्ति, परलोक वगैरे इंद्रियातीत विषयांवर ते कधींहि पूर्णपणे विश्वास ठेवीत नाही. परंतु असें असलें तरी, एखादा विषय अलौकिक व असाधारण येवढ्याचसाठी तो त्याज्य, असें मात्र निरपेक्ष विचारवान् पुरुष समजत नाहीत, तर त्या विषयाच्या दोन्ही बाजू पाहून मगच ते खऱ्याखोट्याचा निर्णय करतात.

ते कांही असो, ज्या महापुरुषाचा जीवनेतिहास लिहिण्यास आम्ही बसलों आहों, त्याच्या जन्माच्या वेळींहि त्याच्या मातापित्यांना नानाप्रकारची दिव्य दर्शनें व अनुभव प्राप्त झाले होते. ही गोष्ट आम्हांस अशा लोकांनी सांगितली आहे की त्यांच्यावर विश्वास न ठेवणें अशक्य आहे. म्हणून, आम्ही ज्या गोष्टी एकल्या आहेत, त्या जशाच्या तशा येथे नमूद करणें, हें आमचें कर्तव्य होय. क्षुदिरामांसंबंधीच्या काही गोष्टी मागील भागांत सांगितल्या, आतां चंद्रादेवी-संबंधीच्या गोष्टी येथे सांगूं.

क्षुदिराम गयेहून परत आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांना असें दिसून आले की, आपल्या पत्नीच्या स्वभावात एक प्रकारचा अद्‌भुत फरक झाला आहे व मानवी चंद्रा खरोखरीच एखाद्या देवीसारखी झाली आहे! तिचे हृदय भूत-मात्राच्या प्रेमानें भरून गेलें असून, तिचे मन या वासनामय संसाराच्या गोंधळांतून निघून एका उच्च अवस्थेंत सदैव राहत आहे. तिला स्वतःच्या संसारापेक्षा जवळपासच्या गरीब लोकांच्या संसाराचीच जास्त काळजी वाटावी! गृहकृत्यें करीत असतां मधेच तिने शेजारच्या घरीं जावें व त्यांना काय पाहिजे याची चौकशी करून ते आपल्या घरून नेऊन त्यांना द्यावें! घरांत सर्वांचीं जेवणींखाणीं झाल्यावर, तिसरे प्रहरीं स्वतः जेवण्यास बसण्यापूर्वी, असेंच पुन्हा एकदा सर्वांच्या घरीं जाऊन, त्यांचीं जेवणें झाली की नाही ते पाहावें! व एखाद्या दिवशी कुणी उपाशी असलेले तिच्या दृष्टीस पडल्यास, लगेच त्याला

मोठया आनंदाने स्वतःच्या घरीं नेऊन जेवूं घालावें व आपण काहीतरी थोडासा फराळ करून तो दिवस घालवावा!

चंद्रादेवींना शेजाऱ्यापाजाऱ्याची मुलें म्हणजे स्वतःच्या मुलांसारखीं वाटत. क्षुदिरामांना असे दिसलें की, आपल्या पत्नीच्या हृदयातला वात्सल्यभाव आता देवदेवताकडे वळला आहे! श्रीरामचंद्र आपले अपत्य आहे असे तिला वाटावे! इतके दिवस या सर्व देवताच्या पूजेच्या वेळी त्यांचे हृदय एक प्रकारच्या श्रद्धायुक्त भयानें भरलेले असावयाचें; पण आता, या अपत्यप्रेमापुढे ते भय कोठच्या कोठे नाहींसे झाले होते! देवताविषयीं आता त्यांच्या मनात भय नाही, संकोच नाही—त्यांच्यापासून लपविण्यासारखे काही नाही! की त्यांना मागण्यासारखे कांही नाही! नाही म्हणावयाला, त्यांच्या मनात देवांविषयी प्राणाहून प्रेम, त्यांना सुखी करण्यासाठी प्राणसुद्धा खर्च करण्याची इच्छा व त्यांची संगति सदैव मिळावी अशी अत्यंत उत्कट इच्छा, ही मात्र भरलेली होती.

अशा प्रकारच्या निःसंकोच देवभक्तीनें, आणि देवावर आपला सर्व भार समर्पण केल्याच्या योगानें उत्पन्न झालेल्या उल्हासानेंच, आपल्या पत्नीचा स्वभाव इतका उदार झाला आहे व यामुळेच ती सर्वांवर सारखा विश्वास ठेवते व सर्वांनाच आपले समजते, असे क्षुदिरामास समजण्यास वेळ लागला नाही.

सरळ स्वभावाची चंद्रादेवी आपल्या पतीपासून कोणतीहि गोष्ट अगर विचार कधीहि लपवून ठेवीत नसे. बरोबरच्या स्त्रियांशी बोलतांनासुद्धा तिनें आपल्या अगदी मनांतील गोष्टीहि सांगाव्या, मग पतीची तर गोष्टच नको!

क्षुदिराम गयेस असेपर्यंत मागे घरीं काय काय गोष्टी घडल्या, हे तिनें ते परत आल्यावर, त्यांना सावकाश वेळ पाहून सांगितले. अशाच रीतीनें ती एक दिवस क्षुदिरामांस म्हणाली, " ऐकलें का, गयेला जाणें झाल्यावर एक दिवस रात्रीं मला एक अद्भुत स्वप्न पडलें असे पाहिलें की, कोणी एक दिव्य पुरुष माझ्या अंथरुणावर निजला आहे! असलें रूप कोणाचेंहि

मीं पाहिलें नाही. इतक्यांत माझी झोपमोड झाली आणि पाहतें तों, तो पुरुष अजूनहि अंथरुणावर आहेच ! हे पाहून मात्र भीति वाटली व कोणी पुरुष संधि साधून घरांत शिरला असावा, असे वाटून मीं लगेच दिवा लावला व पाहते तों कुठे कोण आहे ? दार जसेंच्या तसें ! अडसर जशाचा तसा ! मग त्या रात्रीं मात्र भयानें आणखी झोप लागली नाही. सकाळ होतांच धनी लोहारीण व धर्मदास लाहांची बहीण ह्यांना बोलावलें व त्यांना रात्रीची हकीकत सांगून म्हटलें, "यावर तुमचा काय तर्क चालतो ? खरेंच का माझ्या घरांत कोणी शिरलें असेल ? पण तसें पाहिलें तर माझें कुणाशीं भांडणहि नव्हते ! नाही म्हणायला मधु युगीशीं त्या दिवशीं थोडीशी बोलचाल झाली होती खरी, मग काय तो दात ठेवून घरात शिरला म्हणावा की काय ? " त्या दोघींनी तर हे ऐकून माझी थट्टाच केली व म्हणाल्या, "तुला आता म्हातारपणी वेड लागत चाललें आहे खास ! अग हें तर स्वप्न, आणि त्याने एवढी भ्यालीस ? दुसऱ्या कोणी ऐकलें तर काय म्हणेल ? सारें गाव तुझ्याबद्दल भलतेंसलतें बोलायला लागेल ना ! आता येवढा तरी शहाणपणा कर, पुन्हा कोणाजवळ ही गोष्ट बोलूं नकोस ! " त्यांचे म्हणणें ऐकून वाटलें की, खरेंच हें स्वप्नच असेल ! आणि मग निश्चय केला की, आता ही गोष्ट दुसऱ्या कोणास सांगावयाची नाही.

" आणखी एक दिवस धनीबरोबर बोलत असतांना आपल्या घरासमोरच्या शिवमंदिरापुढे उभी होते, इतक्यांत असें दिसलें की, महादेवाच्या अंगांतून एक दिव्य ज्योति बाहेर पडून, तिने सर्व मंदिर भरून टाकलें आहे. आणि वायूप्रमाणे तरंगाकार होऊन ती माझ्याकडेच वेगाने येत आहे ! आश्चर्याने चकित होऊन मी ती धनीला दाखवितें तों ती ज्योति माझ्याजवळ आली आणि माझ्या अंगांत शिरली ! विस्मयाने आणि भयाने मी एकदम मूर्छित होऊन जमिनीवर पडलें. धनीने डोक्यावर पाणीबिणी शिंपून मला सावध केल्यावर झालेली सर्व हकीगत मीं तिला सांगितली. तिलाहि अत्यंत आश्चर्य वाटून ती म्हणाली, ' तुला वात झाला आहे ! ' पण त्या दिवसापासून मला आपलें असें वाटतें की, ती ज्योति माझ्या उदरांत शिरली आहे व माझ्या

उदरांत गर्भसंचार झाला आहे ! हें मुद्दा मीं धनीला आणि प्रसन्नला सांगितलें, पण त्यांनी मला ‘ वेडी मूर्ख ’ अशीं एक ना दोन शेकडो नांवें ठेवलीं आणि तुला भ्रमच झाला आहे, तुला वायुगुल्मच झाला आहे, अशा नानातऱ्हेच्या गोष्टी सांगून ‘ ही गोष्ट कुणाजवळहि बोलूं नको ’ असे सांगितले ! त्यांचें राहूं द्या. पण आपल्याला काय वाटते ? मला रोग झाला आहे, की माझ्यावर देवाची कृपा झाली आहे ? पण मला आपले अजून वाटते की, माझ्या उदरांत गर्भ-संचार झाला आहे ! ”

क्षुदिरामांनी सर्व हकीकत ऐकली व त्यांना आपले स्वत:चे स्वप्न आठवलें. मग आपल्या पत्नीची नानातऱ्हेने समजूत घालून ते म्हणाले, “ हा रोग नाही. तुझ्यावर देवाची कृपा झाली आहे. मात्र, यापुढे जर तूं असें कांही पाहिलेंस तर माझ्याशिवाय दुसऱ्या कोणापाशी बोलूं नको श्री रघुवीर कृपा करून जें कांही दाखवील, ते आपल्या कल्याणाचे आहे असें समज. गयेत असतां मलाहि देवाने दाखविले आहे की, आपल्याला लवकरच पुत्रमुख दिसणार. ”

ह्या आश्वासनाने चंद्रादेवी निश्चिंत झाल्या. या गोष्टीला ३।४ महिने झाले आणि सर्वांना दिसून आलें की, क्षुदिरामाची पत्नी ४५ व्या वर्षीं खरोखरच पुन्हा गर्भवती झाली आहे ! गर्भवती स्त्रियांचें रूपलावण्य अधिकच वाढत असते, चंद्रादेवींचेंहि तसेंच झालें. धनी वगैरे तिच्या शेजारणी सांगत की, यावेळीं चंद्रादेवीच्या अंगावर असामान्य तेज चढले होते व कोणी कोणी बाया तर असें म्हणूं लागल्या की–“ म्हातारपणीं गर्भवती होऊन हिच्या अंगीं येवढें तेज ! हें कांही ठीक चिन्ह दिसत नाही. प्रसूत होऊन ही म्हातारी मरण पावणार असें वाटते ! ”

गर्भारपणीं चंद्रादेवींचीं दिव्यदर्शनें व अनुभव दिवसेंदिवस अधिकच वाढूं लागले. असें सांगतात की यावेळीं त्यांना बहुतेक रोज देवदेवताचीं दर्शने होत ! कधी त्यांना वाटावें की, त्यांच्या आंगचा सुगंध साऱ्या घरांत दरवळला आहे !

कधी त्यांना देव बोलत आहेत, असे वाटावे ! देवदेवींवरचें त्यांचे अपत्यवत् प्रेम यावेळी फारच वाढले होते. त्यांना जे काय दिसे व ऐकूं येई, ते सर्व त्यांनी आपल्या पतीस सांगावे व " मला असे कां होते ? " असे विचारावे. क्षुदिरामांनी त्यांची नाना तऱ्हेने समजूत घालावी व यामुळे साशंक होऊं नको, असे त्यांना सांगावे. असे रोज चालले होते. एक दिवस चंद्रादेवी भयभीत होऊन आपल्या पतीस म्हणाल्या, " शिवमंदिराच्या ज्योतीच्या दर्शनापासून, मधून मधून मला इतक्या देवदेवतांचे दर्शन होते की, सांगता सोय नाही त्यांच्यापैकी कित्येक देव, मी चित्रात सुद्धा कधी पाहिले नाहीत. आजची दुपारचीच गोष्ट— असे दिसले की, हंसावर बसून एकजण येत आहे ! त्याला पाहून मला भय वाटले. पण ऊन लागून त्याचे तोंड तांबडे लाल झालले पाहून मला त्याची दया आली व त्याला हाक मारून मी म्हटले, " अरेरे बिचाऱ्या हंसावर बसलेल्या देवा ! उन्हाने तुझे तोंड कसे करपून गेले आहे ! घरांत थोडी कण्हेरी आहे, ती देऊं का तुला ? म्हणजे ती पिऊन जरा थंड होशील. " हे ऐकून तो हसला व एकाएकी वाऱ्यात मिसळून जाऊन दिसेनासा झाला ! असे एक ना दोन किती देव सांगूं ! ते म्हणजे पूजा आणि ध्यान करतानाच दिसतात असे नव्हे, तर केव्हांहि वाटेल तेव्हा दिसतात. कधी कधी माणसाची रूपे घेऊन येतात व जवळ येऊन दिसेनासे होतात ! हीं अशीं रूपे मला कां दिसतात बरे ? मला कांही रोगबीग तर नाही ना झाला ? भूतबाधा तर नाही झाली ? "

क्षुदिरामांनी पुन्हा नानातऱ्हेच्या गोष्टी सांगून त्यांचें सांत्वन केले आणि ' तुझ्या उदरीं असलेल्या महापुरुषाच्या पवित्र स्पर्शानेच तुला ही सर्व रूपे दिसतात ' अशी त्यांची समजूत केली.

अशा रीतीने दिवस लोटूं लागले व हे गरीब ब्राह्मणदांपत्य देवावर आपला सर्व भार घालून पुत्ररूपाने आपल्या पोटी येणाऱ्या महापुरुषाच्या आगमनाची उत्सुक चित्ताने मार्गप्रतीक्षा करीत दिवस कंठूं लागले.

# ५. श्रीरामकृष्णांचा जन्म

" माझे बाबा गयेला गेले होते तेथे श्रीरघुवीरांनी स्वप्नांत येऊन त्यांना सांगितलें की, मी तुमचा पुत्र होणार आहे. "

—श्रीरामकृष्ण

---

शरत्, हेमंत व शिशिर हे ऋतु जाऊन क्रमाने ऋतुराज वसंत प्राप्त झाला. शीत व ग्रीष्म कालांचें सुखदायक संमिश्रण असा मधुमय फाल्गुन मास, स्थावर जंगमामधे नव्या प्राणांचा संचार करीत सुरू झाला. सहा दिवस निघून गेले. जीवजगतामधे एक प्रकारचा विशेष उत्साह व आनंद सर्वत्र दिसून येऊं लागला. शास्त्रे म्हणतात—ब्रह्मानंदाच्या केवळ एका कणाने हे सारे पदार्थ रसवान झाले आहेत. या दिव्योज्ज्वल आनंदकणांचे प्रमाण थोडे फार अधिक झाल्यामुळेच संसारांत इतका उल्हास उत्पन्न झाला असावा की काय ?

श्रीरघुवीराच्या नैवेद्याचा स्वयंपाक करीत असतां आसन्नप्रसवा चंद्रादेवींचे मन आज दिव्य उत्साहाने भरून गेले होते, पण शरीरांत मात्र अतिशय थकवा आलेला होता. एकाएकी त्यांच्या मनांत विचार आला की जर मी याक्षणीं प्रसूत झालें तर श्रीरामाच्या नैवेद्याचें कसे व्हायचे ? घरांतहि दुसरें कोणी नाही. क्षुदिरामांजवळ ही भीति सांगतांच ते म्हणाले, " भिऊं नको. ज्या महापुरुषाचें तुझ्या उदरीं आगमन झालें आहे, तो असा श्रीरामचंद्रांच्या पूजासेवेंत विघ्न उत्पन्न करून, कधीच संसारांत प्रवेश करणार नाही, असा माझा दृढ विश्वास आहे. यासाठी आजची काळजी करूं नको. उद्यापासून मी याबद्दल निराळी व्यवस्था करीन आणि धनीला तर आजपासून इथेच निजण्यास मीं मघाच सांगून ठेवलें आहे." पतीच्या या आश्वासनाने चंद्रादेवींचा संशय दूर झाला व ती आपल्या गृहकृत्यांत निमग्न झाली

तो दिवस संपून गेला व रात्र आली. धनी लोहारीण येऊन चंद्रादेवीं-जवळच निजलेली होती. हळूहळू पहाट झाली व इतक्यांत चंद्रादेवीस प्रसववेदना सुरू झाल्या आणि थोडयाच वेळांत त्या प्रसूत होऊन त्याना पुत्र झाला. धनीने चंद्रादेवींची तत्कालोचित अशी सर्व नीट व्यवस्था केली व मुलाकडे पाहते तों ठेविलेल्या जागी मूल कोठेहि दिसेना! भयभीत होऊन तिने दिवा मोठा केला व इकडे तिकडे पाहते तो मूल नाळीसह, सरकत सरकत स्वयंपाकाच्या चुलींत जाऊन पडले आहे व त्याचे सर्व अंग राखेने भरले आहे! धनीने धांवतच जाऊन त्याला घाईघाईने उचलून घेतले आणि त्याच्या अंगावरची राख पुसून पाहते तों, मुलाचे रूप अत्यंत सुंदर असून, मूल सहा महिन्याच्या मुलाएवढे मोठे आहे! धनीला अत्यंत आश्चर्य वाटून तिने शेजारच्या लाहाबाबूंच्या घरच्या प्रसन्नमयी वगैरे बायांना बोलावून मूल दाखविले व सारी हकीगत सांगितली.

अशा रीतीने, पवित्र व शांत अशा ब्राह्ममुहूर्ती क्षुदिरामांच्या दरिद्री पर्ण-कुटींत या अलौकिक महापुरुषाचा जन्म झाला. (सन १८३६).

नंतर क्षुदिरामांनी ज्योतिषाकडून मुलाचें जातक वर्तविलें तें असें.— शके १७५७ फाल्गुन शुद्ध द्वितीया बुधवार, सन १८३६, १७ फेब्रुआरी अर्ध-घटका रात्र अवशिष्ट राहिली असता मुलाचा जन्म झाला. नक्षत्र पूर्वाभाद्रपदा, जन्मलग्नीं रवि, चंद्र व बुध हे ग्रह असून शुक्र, मंगळ व शनी हे ग्रह उच्चीं होते. उच्च ग्रहांवर गुरूची दृष्टि होती.

या जन्मलग्नाचें भृगुसंहितेप्रमाणे असें फल आहे:—

धर्मस्थानाधिपे तुंगे धर्मस्थे तुंगखेचरे
गुरुणा दृष्टिसंयोगे लग्नेशे धर्मसंस्थिते।

केंद्रस्थानगते सौम्ये गुरौ चैव तु कोणभे
स्थिरलग्ने यदा जन्म संप्रदायप्रभुर्हि सः।

धर्मविन्माननीयस्तु पुण्यकर्मरतः सदा
देवमंदिरवासी च बहुशिष्यसमन्वितः।
महापुरुषसंज्ञोऽयं नारायणांशसंभवः
सर्वत्र जनपूज्यश्च भविष्यति न संशयः ॥

"अशा प्रकारचा मनुष्य धर्मवित् व माननीय होईल व सदा पुण्यकर्माचें अनुष्ठान करीत राहील. तो नवीन धर्मसंप्रदाय सुरू करून परमेश्वराचा अवतार म्हणून गणला जाईल व सर्व लोकांस पूज्य होईल."

गयेस पडलेलें स्वप्न अशा रीतीनें खरें झालेलें पाहून क्षुदिरामांस फार विस्मय व आनंद वाटला व त्यांचें अंतःकरण कृतज्ञता व भक्ति यांनीं भरून आलें. गयेस श्रीगदाधरांनीं स्वप्नांत कृपा केल्यामुळें हा पुत्र झाला, म्हणून क्षुदिरामांनीं बालकाचें नांव गदाधर असें ठेविलें.

# ६. बाल्यकथा व पितृवियोग

" आमच्या बाबांनी शूद्राचें दान कधींहि घेतलें नाहीं "
" सारा दिवस त्यांनी पूजा, जप, ध्यान यातच निमग्न असावें."
" गांवांतील लोक त्यांना ऋषीप्रमाणें मान देत ! " —श्रीरामकृष्ण

---

पुराणांत असें वर्णन आहे कीं, श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादि अवतारपुरुषांच्या मातापितरांना त्यांच्या जन्मग्रहणापूर्वी व नंतर नानाप्रकारची दिव्य दर्शनें होऊन आपल्या मुलांसंबंधी आपल्याला काळजी करण्याचें कारण नाही असें पक्कें समजूनसुद्धा थोड्याच वेळांत अपत्यस्नेहवशात: त्यांच्या लालनपालनासंबंधी चिंता वाटूं लागावी ! क्षुदिराम व चंद्रादेवी यांचीहि अशीच स्थिति झाली. आपल्या मुलाच्या तोंडाकडे पाहतांच त्यांना स्वत:च्या स्वप्नांचें व दर्शनादि इतर गोष्टींचें विस्मरण व्हावें आणि त्याच्या रक्षणाची व पालनाची त्यांना काळजी वाटूं लागावी चंद्रादेवीना पुत्र झाल्याची वार्ता मेदिनीपुरास रामचांदांस समजतांच आपल्या मामाची दरिद्री स्थिति डोळ्यापुढें उभी राहून मुलाच्या दुधासाठी त्यांनी एक दुभती गाय लगेच कामारपुकूरास पाठवून दिली ! अशाच रीतीनें मुलाला लागणाऱ्या सर्व वस्तूंची कशी ना कशी व्यवस्था होऊं लागली नि एकामागून एक दिवस जाऊं लागले.

इकडे या अद्भुत मुलाची चित्ताकर्षणशक्ति दिवसेदिवस वाढूं लागली व आईबापांचेंच काय पण शेजारपाजारच्या सर्व लोकांचें आणि विशेषत: स्त्रीवर्गाचें तें मूल जीव की प्राण होऊन बसलें ! बायकांना जरा फुरसत सापडली की, त्यांनी चंद्रादेवीच्या घरीं जावें व येण्याचें कारण विचारतां म्हणावें– ' हा तुमचा लबाड आहे ना इथें ! त्याच्यामुळें यावं लागतं ! ' जवळपासच्या खेड्यांतल्या

चंद्रादेवींच्या नात्यागोत्यांतल्या स्त्रियाहि त्यांच्या घरीं मूल पाहण्यास वारंवार येऊं लागल्या.

हळूहळू मूल पांच महिन्यांचें झालें व त्याचा उष्टावणाचा दिवस आला. क्षुदिरामांनी ठरवून ठेविलें होतें की, उष्टावणाचे वेळीं फक्त शास्त्रोक्त विधि करावयाचे, आणि श्रीरामाच्या नैवेद्याने मुलाचें उष्टावण उरकावयाचे व अगदी जवळची अशी चार दोन मंडळी जेवावयास बोलवावयाची. परंतु झालें निराळेंच. गावांतील ब्राह्मण मंडळींनी आग्रह धरिला की उष्टावणाचे दिवशीं आम्हां सर्वांना जेवण घातलें पाहिजे ! हे ऐकून क्षुदिरामांस चिंता उत्पन्न झाली. परंतु गावचे जमीनदार धर्मदास लाहा यांना ही गोष्ट कळतांच त्यांनी क्षुदिरामांना या कार्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले, आणि त्यांच्या मदतीने क्षुदिरामांनी गावातील सर्व ब्राह्मण व इतर वर्ग यांनाहि जेवण घालून तो प्रसंग पार पाडला !

गदाधर जसजसा मोठा होऊं लागला तसतसा आपल्या मधुर बाललीलांनी तो आपल्या मातापित्यांच्या हृदयाला अधिकाधिक आनंद देऊं लागला. पुत्रजन्माचे पूर्वी जी चंद्रा चुकूनसुद्धा देवाजवळ एकहि सांसारिक गोष्ट मागत नसे, तीच आपल्या मुलाच्या कल्याणासाठी आता रात्रदिवस देवाजवळ धरणे धरून प्रार्थना करूं लागली ! गदाधर हाच आता त्यांच्या सर्व विचारांचा विषय होऊन बसला.

गदाधर सात आठ महिन्यांचा असतांना एके दिवशीं सकाळी दूध पाजून तिने त्याला आंथरुणावर निजविलें व आपण गृहकृत्ये करण्यांत निमग्न झाली. थोडया वेळाने परत येऊन पाहते तों आंथरुणावर गदाधर नसून त्याच्या जागीं कोणी एक अपरिचित नि लांबलचक मोठा पुरुष निजला आहे ! भयाने किंकाळी फोडून पतीस हाक मारण्यासाठी ती खोलींतून बाहेर धावली. क्षुदिराम घाईघाईने आले व ते दोघे खोलींत जाऊन पाहतात तों कुठे काय ! गदाधर आपला जशाचा तसा निजला आहे ! पण चंद्रादेवींची एवढयाने भीति जाईना. त्या पतीला म्हणाल्या–'तुम्ही कांही म्हणा. मी आपल्या डोळ्यांनी

तो पुरुष पाहिला. तुम्ही कुणी देवऋषि बोलवा नि शांति करवा." क्षुदिरामांनी शांतपणानें उत्तर दिलें, "तूं कांही भिऊं नको. या मुलासंबंधी आपण आजपर्यंत अनेक विचित्र गोष्टी पाहिल्या आहेत. त्यांतलीच हीहि एक असें समज. आपल्या घरीं स्वतः श्रीरामचंद्र देव्हाऱ्यात आहेत, तेव्हां मुलाचें कोणत्याहि तऱ्हेनें अनिष्ट होणार नाही, हें पक्कें समज."

पतीच्या या आश्वासनानें चंद्रादेवींना धीर आला, पण त्यांची भीति मात्र कांही केल्या जाईना. आईचेंच हृदय तें! त्यांनी त्या दिवशीं मुलाच्या कल्याणासाठी देवाजवळ कितीतरी वेळ सद्गदित होऊन प्रार्थना केली!

अशा रीतीनें ६।७ वर्षे लोटलीं. या काळांत सांगण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे चंद्रादेवींना १८३९ सालीं सर्वमंगला नांवाची एक कन्या झाली.

हळूहळू गदाधराची अलौकिक धारणाशक्ति व बुद्धिमत्ता क्षुदिरामाच्या नजरेस येऊं लागली. त्यानें एकदा जें ऐकावें तें बहुतेक तोंडपाठ व्हावें! पुन्हा कधी म्हणावयास सांगितलें तरी त्यांतील बहुतेक भाग त्यानें म्हणून दाखवावा! क्षुदिरामांच्या हेंहि लक्षात आलें की, कांही कांही गोष्टींविषयी त्याला स्वाभाविक आवड आहे व कांही कांही गोष्टींविषयी तो स्वाभाविकच उदासीन आहे; कांही म्हणून कांही केल्या त्याला त्या आवडत नाहीत. उजळणींतले पाढे कांही केल्या त्यानें म्हणूं नयेत! मग क्षुदिरामांनाच वाटावें, 'आताच घाई कशाला? अमळ मोठा झाल्यावर शिकेना का?' असा विचार करून त्यांनी पाढे शिकविण्याचा नाद सोडून द्यावा.

परंतु गदाधर दिवसेंदिवस जास्तजास्तच खोडकर होऊं लागला, म्हणून त्यांनी त्याला लवकरच शाळेत घातलें. गदाधरालाहि समवयस्क सोबती मिळाल्यामुळें आनंद झाला व हळूहळू ते व त्याचे शिक्षक त्याच्यावर अनोनात प्रेम

गावचे जमीनदार लाहाबाबू यांच्या घरासमोरच पाठशाळा होती व तिचा सर्व खर्च तेच चालवीत असत. शाळा सकाळीं व तिसरे प्रहरीं अशी दोनदा भरे. गदाधरासारख्या लहान मुलांना दोन्ही वेळ अभ्यास नसे, पण हजर राहावे लागे, म्हणून अभ्यासाखेरीज बाकीचा वेळ त्यानी शाळेच्या जवळपास कुठे तरी खेळण्यात घालवावा.

गदाधराच्या जन्मापूर्वी पडलेल्या स्वप्नांवरून त्याच्या भावी मोठेपणाची कल्पना सदैव मनांत घोळत असल्यामुळे असो, अथवा तसा त्याचा स्वभावच होता म्हणून असो, क्षुदिराम गदाधराला त्याच्या खोड्याबद्दल अगर दाडगाईबद्दल कधींहि रागे भरत नसत, मग मारणे तर बाजूसच राहिले अशा वेळीं त्यांनी त्याला फक्त मृदु शब्दांत बोध करावा. अलीकडे गदाधराचा अवखळपणा वाढत चालला होता. कधी कधी शाळेस न जाता त्याने सोबत्याना बरोबर घेऊन गावाबाहेर खेळावयास जावे, अथवा कुठे यात्रानिमित्त नाटक वा भजन असेल तर तिकडेच जावे. परंतु विचारल्यास मात्र नेहमी खरे सांगावे. तसेच त्याने हूडपणा करावा, पण दुसऱ्याचें नुकसान होईल असें कांहीहि करूं नये.

पण गदाधराबद्दल क्षुदिरामांना जास्त काळजी वाटण्याचे कारण निराळेंच होते. एखादी गोष्ट कां करावी अगर करूं नये, याचे त्याला पटेल असे कारण कुणी सांगितले नाही तर त्याने आपल्या मनास येईल तसें आचरण करावे ! क्षुदिरामांना वाटे, मुलाची प्रत्येक गोष्टींचे कारण समजून घेण्याची इच्छा योग्य आहे; पण प्रत्येक गोष्टीचे त्याला समजेल असे कारण कोण सांगणार ? व न सांगितले तर संसारांतील पूर्वापार चालत आलेले धार्मिक विधीसुद्धा हा मान्य करणार नाही ! गदाधराच्या ह्या स्वभावासंबंधीची या वेळी घडलेली एक गोष्ट सांगितली असता क्षुदिरामाची काळजी किती यथार्थ होती हे वाचकांना समजून येईल.

क्षुदिरामांच्या घरामागेच एक हालदारपुकूर नांवाचे मोठे तळे होते असे पूर्वीच सांगितलें आहे. या तळ्यावर गावांतील सर्व स्त्रीपुरुष स्नान करीत. या

सळयाला पुरुषासाठी एक व बायकांसाठी एक, असे निरनिराळे घाट होते. गदाधरासारखीं लहान मुलें बायकांच्याहि घाटावर स्नान करीत. एकदा गदाधर आपल्या दोनचार सोबत्यांसह बायकांच्याच घाटावर स्नान करीत असतां त्या सर्व मुलांनी पाण्यांत उडया मारून व एकमेकांच्या आंगावर पाणी उडवून मोठा धुमाकूळ मांडला. बायकानाहि त्यापासून त्रास झाला. त्यांच्याहि आंगावर पाणी उडाल्यामुळे रागवून जाऊन एक स्त्री त्याना म्हणाली-" कशालारे आलात या घाटावर कारट्यांनो ? तिकडे पुरुषांच्या घाटावर जाऊन घाला गोंधळ. इथे आम्ही लुगडींबिगडीं धुतो,—समजत नाही—बायकाना कधी विवस्त्र पाहूं नये म्हणून?" गदाधराने विचारले-" का पाहूं नये ? " यावर त्या स्त्रीला काहीच बोलता येईना व म्हणून ती त्या मुलावर जास्तच रागावली! ह्या बाया फार रागावल्या आहेत व कदाचित् आपल्या घरीं जाऊन आपल्या आईबापांना सांगतील या भीतीने सर्व मुले तेथून पळून गेली ! गदाधराने एक निराळाच बेत ठरविला. तो लागोपाठ तीन दिवस त्या बायकांच्या घाटावर गेला व एका झाडाआड दडून त्याने स्नाने करीत असता बायकांकडे लक्ष लावून पाहिले ! तिसऱ्याच दिवशीं पूर्वी रागावलेली बाई भेटतांच, तो तिला म्हणाला-" काकू, परवा मी चौघी जणी स्नान करीत असतां त्यांच्याकडे पाहिलें. काल सहाजणींकडे पाहिलें, आणि आज तर आठजणींकडे पाहिलें. मग कांहो, मला कुठे काही झाले नाही तें ? " ती बाई गदाधराला घेऊन चंद्रादेवीकडे गेली व हासत हासत तिने सर्व हकीकत तिला सांगितली. ती ऐकून चंद्रादेवी म्हणाल्या, " बाळ, असें करण्यानें तुला काही होणार नाही हे खरें. पण या योगाने बायकाना आपला अपमान झाला असें वाटतें. त्यांना तर तूं माझ्याचसारख्या समजतोस ना ? मग त्यांचा अपमान झाला तर तो माझाच नव्हे का बरें ? म्हणून उगीच त्यांच्या व माझ्याहि मनाला दुःख होईल, असे करणें चांगलें का ? "

आईचा हा गोड उपदेश गदाधरला पटला व तेव्हांपासून त्याने अशी गोष्ट कधी केली नाही; असो.

पाठशाळेत गदाधराचा अभ्यास ठीक चालला होता. लिहिणें व वाचणें थोडयाच वेळांत त्यास येऊं लागलें; गणिताचा मात्र त्याला मनापासून तिटकारा होता पण इकडे त्याची अनुकरणशक्ति वाढत चालली. नव्या नव्या गोष्टी शिकण्याची त्यास फार आवड असे. देवदेवींच्या मूर्ति करणाऱ्या एका कुंभाराकडे जाऊन त्यानें तेथील सर्व क्रिया नीट पाहून तशा मूर्ति घरीं करण्यास सुरवात केली व हा एक त्याचा खेळण्याचा विषयच होऊन बसला. कापडाच्या नव्या घडीवरील चित्रें पाहून त्यानें तशीं चित्रें काढण्यास सुरवात केली. गावांत कुठे पुराण चालू असले म्हणजे त्यानें हटकून तेथें जावें व सर्व पुराण नीट लक्ष लावून ऐकावें आणि पुराणिकबोवांची श्रोत्यांना समजावून देण्याची धाटणी कशी आहे तें पाहावें. त्याची स्मरणशक्ति अलौकिक असल्यामुळे तो जे ऐके अथवा पाही, तें सर्व त्याच्या सदैव स्मरणांत राहत असे.

शिवाय त्या बालकाची आनंदी वृत्ति, गमती स्वभाव व दुसऱ्याचें हुबेहुब अनुकरण करण्याची शक्ति वयाबरोबर जसजशी वाढत चालली, तसतशी इकडे त्याच्या मनाची स्वाभाविक सरलता व देवभक्ति, आपल्या मातापित्यांच्या प्रत्यक्ष उदाहरणानें दिवसेंदिवस वाढत चालली. मोठेपणीहि दक्षिणेश्वरीं आमचेजवळ ते आपल्या आईबापांच्या या सद्गुणांचा गौरव करीत, यावरून त्यांच्या मनावर त्यांच्या प्रत्यक्ष उदाहरणाचा किती परिणाम झाला होता हें स्पष्ट दिसते. ते म्हणत–" माझी आई सरलपणाची मूर्तिच होती. संसारांतील साध्या गोष्टीहि तिला समजत नसत! तिला पैसेमुद्धा मोजतां येत नसत! कोणती गोष्ट दुसऱ्याजवळ बोलावी, कोणती बोलूं नये हे समजत नसे, म्हणून सारे लोक तिला 'भोळी' 'भाबडी' म्हणत. दुसऱ्याला खाऊं घालण्यानें तिला फार आनंद होत असे. आमच्या बाबांनी शूद्राचें दान कधीहि घेतलें नाहीं. सारा दिवस त्यांनी पूजा, जप, ध्यान यांतच निमग्न असावें. रोज संध्या करतांना 'आयाहि वरदे देवि,' इत्यादि मंत्रांनी गायत्रीचें आवाहन करीत असतां त्यांचें वक्षस्थल आरक्त होऊन नयनांतून अश्रुधारा वाहत असत!

पूजा वगैरे झाल्यावर नामस्मरणांत, पूजेची सामग्री तयार करण्यांत, माळा वगैरे गुंफण्यांत त्यांनी बाकीचा वेळ घालवावा. खोटी साक्ष देण्याच्या भयाने त्यांनी आपल्या वडिलोपार्जित संपत्तीवर लाथ मारली! या सर्व गुणांनी गावांतील लोक त्यांना ऋषीप्रमाणे मान देत." गदाधर अत्यंत साहसी व निर्भय असे. मोठमोठी माणसेसुद्धा भुतांच्या भयाने जेथे जाण्यास कचरत, तेथे त्याने खुशाल जावें! त्याची आत्या रामशीला हिच्या अंगांत शीतला देवी येत असे. कामारपुकूरास ती आली असतां एके दिवशीं तिच्या अंगांत आलें. तिचे ते हातवारे व बडबडणें पाहून घरांतील सर्व मंडळी घाबरून गेली. गदाधर निर्भयपणें खुशाल तिच्याजवळ जाऊन तिची अवस्था लक्षपूर्वक पाहून, आपल्या आईस म्हणाला, "आत्याबाईच्या जसे अंगांत आले आहे तसे माझ्या अंगांत येईल तर किती छान होईल!"

भूरसुबो येथील माणिकराजांची हकीकत वर आलीच आहे. क्षुदिरामांची धर्मपरायणता पाहून त्यांस क्षुदिरामांविषयी फार आदर वाटे व ते क्षुदिरामांस वरचेवर आपल्या गावी बोलावीत असत. गदाधरास सहावें वर्ष लागल्यावर एक दिवस त्याच्या पित्याने त्यास माणिकराजाकडे नेले होतें. तेथे सर्व मंडळींशीं तो इतक्या गोड आणि मोकळ्या रीतीने वागला की त्यांना हा येथील नेहमी येणारा जाणारा व नेहमीच्या ओळखीचा मुलगा आहे असे वाटलें! माणिकराजांचे बंधु रामजय हे त्याला पाहून इतके मोहित झाले की, ते क्षुदिरामांस म्हणाले "बाबा! हा तुमचा मुलगा सामान्य दिसत नाही, याच्यांत काही दैवी अंश दिसतो! तुम्ही येथे आलांत म्हणजे याला नेहमी आपल्याबरोबर आणीत जा. याला पाहिल्याने मोठा आनंद होतो!"

यानंतर क्षुदिरामांना कांही कारणाने बरेच दिवस पुन्हा तिकडे जातां आलें नाही. माणिकराजांना चैन पडेना; त्यांनी आपल्या घरच्या एका स्त्रीला क्षुदिरामांचें कुशल आणण्यास व शक्य तर गदाधराला घेऊन येण्यास कामारपुकूरास पाठविलें. पित्याच्या परवानगीने गदाधर त्या स्त्रीबरोबर मोठ्या आनंदाने भूरसुबोला गेला व सारा दिवस तेथे राहिल्यावर संध्याकाळी माणिक-

राजांनी त्याच्या अंगावर एक दोन अलंकार घालून व बरोबर खाऊचे पुडे देऊन त्याला घरीं पोहोचतें केलें. हळूहळू गदाधर या माणिकराजांच्या घरांत सर्वांस इतका प्रिय झाला की, तो कांही दिवस आला नाही म्हणजे त्यांनी कोणाला तरी कामारपुकूरास पाठवावें व त्याला आपल्या घरी घेऊन जावें.

गदाधर आता सात वर्षांचा झाला (सन १८४३) व मधुरता, सरलस्वभाव, आनंदी वृत्ति इत्यादि गुणांनी तो सर्वांस अधिकाधिक प्रिय होत चालला. शेजारपाजारच्या आयाबायानी एखादे दिवशी घरीं कांही पक्वान्न केले तर हटकून त्यांनी गदाधरासाठी त्यांतील कांही भाग राखून ठेवावा व सवड सापडतांच त्याच्या घरीं जाऊन तो त्याला खायला घालावा' गदाधराच्या समवयस्क बालगोपालांना कुणी कांही खायला दिले तर त्यांनीहि गदाधरासाठी त्यांतील कांही भाग काढून ठेवावा. त्याचे मधुर भाषण, त्याचा गोड आवाज व आनंदी स्वभाव यांनी मोहित होऊन त्याच्या खोडया सर्वांनी आनंदाने सहन कराव्या!

ईश्वरकृपेकरून जन्मापासूनच गदाधराचे शरीर गुटगुटीत व मजबूत असून, त्याची प्रकृति निरोगी असे. यामुळे त्याची वृत्ति नेहमी एखाद्या पक्षा-प्रमाणे स्वच्छंदी नि आनंदी असे. शरीरबोधराहित्य हेंच शरिराच्या पूर्ण स्वास्थ्याचें लक्षण होय, असें मोठमोठे धन्वंतरी समजतात. अशा प्रकारचें स्वास्थ्यसुख गदाधराला लहानपणापासूनच लाभलें होतें. त्याचें स्वाभाविक एकाग्र चित्त एखाद्या विषयाकडे लागले म्हणजे तो इतका तन्मय होऊन जाई की, त्याचें शरीराचे भान सर्वतोपरी नाहीसें होई! शुद्ध वायूने डोलणारी हिरवींगार शेतं, शांत गंभीर नि स्वच्छ नदीची कलकल, पक्षांचा किलबिलाट व विशेषतः निळे आकाश व त्यांतील क्षणोंक्षणीं रूप बदलणारीं अभ्रें अशा एखाद्या देखाव्याचें प्रतिबिंब त्याच्या शुद्ध मनावर पडतांक्षणीं तो एकाएकी बेहोष होऊन जाई व त्याचे मन भावराज्यांतील कुठल्या तरी एका दूरच्या प्रदेशांत निघून जाई. हा प्रकार त्यांच्या असामान्य भावप्रवणतेमुळेच होत असे. एकदा गदाधर एका माळा-

वरून जात असतां आकाशांत एक काळाकुट्ट ढग वर येत होता व त्याच्यावरून दुधासारखे पांढरे शुभ्र कांही बगळे उडून जात होत. हा देखावा पाहतांच तो त्यांतच इतका कांही तन्मय होऊन गेला की, तो एकाएकी बेहोष होऊन खाली पडला ! डोक्यावर पाणी वगैरे शिंपल्यावर बऱ्याच वेळाने तो सावध झाला.

या प्रकाराने गदाधराचे आईवडील व इतर मंडळी यांना काळजी वाटूं लागली व हा मूर्छेचा रोग कायमचा न जडावा म्हणून त्यांनी औषधोपचार सुरू केले व शांति केली. गदाधर मात्र म्हणाला की, " मला आलेली मूर्छा रोगाची नव्हती, तर त्या स्थितींत मला अत्यंत आनंदाचा अनुभव होत होता. असो, पण यायोगे त्याच्या प्रकृतीत कांही एक बिघाड झाला नाही, म्हणून सर्वांची काळजी किंचित कमी झाली. पण, पुनः कुणाची दृष्ट लागूं नये म्हणून चंद्रादेवींनी त्याला काही कालपर्यंत शाळेत मात्र जाऊं दिले नाही. मग काय, गदाधराची चैनच झाली ! त्याने साऱ्या गावात मौजेने हिंडावे व सारा दिवस नाना तऱ्हेचे खेळ खेळांव व खोडया कराव्या !

गदाधराचे सातवे वर्ष अशा रीतीने अर्धे अधिक निघून गेले व हळूहळू १८४३ चा दुर्गापूजेचा शारदीय महोत्सव प्राप्त झाला. क्षुदिरामाचे भाचे रामचांद हे बहुतेक वर्षभर मेदिनीपुरास राहत असत. पण या उत्सवाच्या वेळीं सेलामपुरास—याच ठिकाणी त्यांच्या वाडवडिलाचे राहणे असे—जाऊन तेथे हा उत्सव ते मोठ्या समारंभाने साजरा करीत. या वर्षाच्या उत्सवास त्यांनी आपल्या मामांस निमंत्रण केलें होते. क्षुदिरामांना आता ६८ वें वर्ष लागले होतें व अलीकडे कांही दिवस ते संग्रहणीने आजारी असल्यामुळे त्यांचें सुदृढ शरीर आताशा अशक्त झाले होते, म्हणून जावें की न जावें असा त्यांस विचार पडला, पण आपलें वय झालेलें, पुढील वर्ष दिसेल की नाही, हें कोणी सांगावें, असा विचार करून त्यांनी जाण्याचें ठरविलें.

सेलामपुरास पोहोचल्यावर एक दोन दिवसांतच त्याच्या रोगाने उचल खाल्ली. रामचांदांनी औषधोपचार सुरू केले. षष्ठी, सप्तमी, अष्टमी, तीन दिवस

कसे तरी निभावले. नवमीच्या दिवशी रोग फारच वाढला व सारी रात्र मंडळींनी जागून काढली. विजयादशमी उजाडली. क्षुदिराम आज इतके अशक्त झाले होते की, त्यांच्याने एक शब्दहि बोलवत नव्हता. दुपार झाली व रामचांदांनी जाणलें की मामांचा अंतकाल जवळ आला आहे. क्षुदिरामांना निपचित पडलेले पाहून त्यांचे डोळे भरून आले व ते म्हणाले, " मामा! तुम्ही सदासर्वदा ' रघुवीर ' ' रघुवीर ' असा जप करीत असतां आणि आताच असें कां बसला आहांत ? " रघुवीर हे नांव ऐकताच क्षुदिराम सावध झाले व खोल आणि कांपऱ्या आवाजाने म्हणाले, " कोण रामचांद ? प्रतिमा विसर्जन करून आलास ? ठीक तर. मला एकदा उठवून बसव पाहूं ? " रामचांद, हेमांगिनी व रामकुमार यांनी त्यांना हलकेच उठवून बसवितांक्षणीं क्षुदिरामांनी गंभीर स्वराने तीन वेळ " रघुवीर " असा नामोच्चार करून प्राण सोडला! बिंदु सिंधूंत मिळून गेला; रामरायांनी आपल्या भक्ताला आपल्या जवळ नेऊन त्याला चिरशांतीचा अधिकारी केलें! नंतर त्या गंभीर रात्रीं उच्च संकीर्तनाने ते गाव हालून गेलें व मंडळींनी क्षुदिरामाचा नश्वर देह नदीच्या तीरीं नेऊन तेथे त्याला अग्नि दिला.

दुसऱ्या दिवशीं ही दारुण बातमी कामारपुकूरास क्षुदिरामांच्या घरीं पोहोचली व आनंदाचा बाजार मोडून जाऊन तेथे एकच हाहाकार झाला. अशौच सरल्यावर रामकुमारांनी यथाशास्त्र पित्याची क्रिया केली. रामचांदांनी आपल्या प्रिय मामांच्या श्राद्धासाठी रामकुमारास पांचशे रुपये दिले.

# ७. गदाधराचा कैशोरकाल

"दहा अकरा वर्षांचा होतो तेव्हां विशालाक्षीच्या दर्शनास जातांना वाटेंत मला भावसमाधि लागली."
"लहानपणीं लाहाबाबूंच्या घरीं पंडित मंडळी जमली असतां त्यांचें जें बोलणे चाले, ते बहुतेक सर्व मला समजे."

—श्रीरामकृष्ण

---

क्षुदिरामांच्या निधनानें त्यांच्या संसाराची सारी घडी बिघडून गेली. श्रीमती चंद्रादेवींनी सहचरी या नात्यानें त्यांच्या सुखात–दुःखांत, सुस्थितींत–दुस्थितींत त्यांच्याबरोबर छायेप्रमाणे त्रेचाळीस वर्षे काढलीं होती! अर्थात् क्षुदिरामांच्या मृत्यूचा सर्वात अधिक परिणाम त्यांच्यावर व्हावा व सारें जग त्यांना ओकें वाटावें यांत नवल ते काय? श्रीरामचंद्रांच्या चरणकमलाचें निरंतर ध्यान करणारें त्यांचें चित्त आता संसार सोडून तेथेच कायमचें राहण्यास धडपड करूं लागलें. पण मन संसार सोडण्यास तयार झाले तरी संसारानें त्याला सोडलें पाहिजे ना? सात वर्षांचा गदाधर व चार वर्षांची सर्वमंगला, त्यांच्या मनाला हळूहळू संसारांत पुन्हा ओढूं लागली! अर्थातच, श्रीरामचंद्रांच्या चरणीं सर्वस्व समर्पण करून, आपल्या दोन्ही लहान मुलांकडे पाहून पतिनिधनाचें दारुण दुःख कसे बसे विसरण्याचा प्रयत्न करीत चंद्रादेवी दिवस कंठूं लागल्या.

रामकुमार ज्येष्ठ पुत्र; संसाराचा सर्व भार आता त्यांच्याच खांद्यावर पडल्यामुळे त्यांना दुःख करीत व्यर्थ कालक्षेप करण्यास अवसरच नव्हता. शोकसंतप्त परमपूज्य जननी, लहान भाऊ व बहीण, यांना दुःखाचा विसर

पाहून, त्यांना कसलीहि उणीव भासूं न देण्यासाठी आपण काय केलें पाहिजे, मधला भाऊ रामेश्वर याचें अध्ययन पूर्ण होऊन तो संसारास कशी मदत करूं लागेल, आपली स्वतःची आय कशा रीतीने वाढेल, अशा एक ना दोन—शेकडो चिंतांनी त्यांचें मन सदा भरलेलें असे. त्यांची पत्नी गृहकर्मात दक्ष होती. आपल्या पूज्य सासूवरील दारुण प्रसंग पाहून तिने गृहकृत्यांचा बराचसा भार स्वतःच्या शिरावर घेतला.

"बाळपणीं मातृवियोग, लहानपणी पितृवियोग व तरुणपणी पत्नीवियोग, होणें यासारखें दुःखदायक काहीहि नाही," अशी म्हण आहे. बाळपण बहुतेक मातेच्याच संगतींत व लालनपालनात जातें, म्हणून त्या काळी पितृवियोग झाला तर मुलाला त्या वियोगाची जाणीव होत नाही. परंतु त्याला जेव्हां जरा समजूं लागतें व पित्याच्या अमोल प्रेमाचा त्याला लाभ होऊं लागतो, मातेकडून पुरविले न जाऊ शकणारे त्याचे लाड जेव्हां पिता पुरवूं लागतो व म्हणून आईपेक्षा त्याचाच लळा जेव्हां लागूं लागतो, तेव्हां त्याला पितृवियोग झाला तर मात्र त्याच्या दुःखास पारावार उरत नाही. हीच अवस्था गदाधराची झाली! क्षणोक्षणीं पित्याची आठवण होऊन त्याला सर्वत्र अंधार दिसूं लागला. परंतु त्याची बुद्धि या लहान वयांत मुद्धा इतर मुलांपेक्षा अधिक परिपक्व झालेली असल्यामुळे त्याने आपलें दुःख आईकडे पाहून बाहेर दिसूं दिलें नाही. सर्वांना वाटावें की, गदाधर पूर्वीप्रमाणेच आनंदांत व मजेंत दिवस घालवीत आहे. आणि म्हणूनच, गावाजवळच्या 'भूतांचे स्मशान,' 'माणिकराजांची अमराई' वगैरे जनशून्य स्थानीं कधी कधी एकटाच हिंडतांना त्याला पाहूनहि लोकांना, तो तेथे कांही विशेष कारणाने हिंडत असेल, असें मुळीच वाटत नसे; त्यांना वाटे "पोर अवखळ आहे, आलें असेल सहज भटकत" इतकेंच. गदाधराचा स्वभाव मात्र पित्याच्या मृत्यूपासून एकांतप्रिय व विचारशील असा बनला.

समदुःखी माणसे एकमेकाकडे आकृष्ट होतात. गदाधराच्या अंतःकरणात आपल्या मातेविषयी या वेळीं जास्तच प्रेम उत्पन्न झालें होतें, याचें कारण

कदाचित् हेंच असावे. त्याने आतागा पूर्वीपेक्षा जास्त वेळ आपल्या मातेजवळच असावे व पूजा वगैरे कर्मांत व गृहकृत्यात तिला आनंदाने मदत करावी. कारण आपग जवळ असलो म्हणजे तिचे दुःख थोडेसे कमी होते हे त्या बुद्धिवान व समजूतदार मुलाच्या लक्षांत येऊन चुकले होतें. पित्याच्या मृत्यूपासून त्याने आईजवळ कोणत्याहि गोष्टीसाठी हट्ट धरून बसूं नये, कारण त्याला कळूं लागले होते की आपला हट्ट जर आपल्या आईस पुरवितां आला नाही, तर तिला अत्यंत वाईट वाटेल व तिचा शोकाग्नि अधिकच भडकेल.

गदाधर पूर्वीप्रमाणे शाळेत जाऊं लागला. पण शाळेपेक्षा पुराणें व भजने ऐकणें व देवदेवीन्च्या मूर्ति तयार करणे या गोष्टींकडेच त्याचे लक्ष जास्त लागले आणखीहि एका गोष्टीकडे त्याचे यावेळी लक्ष लागलें· ती ही—गावाच्या आग्नेयेस जगन्नाथपुरीस जाण्याचा जो रस्ता आहे त्यावर गावचे जमीनदार लाहाबाबू यांनी एक धर्मशाळा बांधली होती. जगन्नाथास जागारे साधु, बैरागी या धर्मशाळेत मुक्काम करीत व गावांत भिक्षा मागत. गावांत पुराणे ऐकत असतां, संसार अनित्य आहे वगैरे गोष्टी गदाधराने ऐकल्या होत्या व प्रिय पित्याच्या मृत्यूने या गोष्टीची प्रत्यक्ष जाणीव त्यान्च्या शुद्ध व कोवळ्या मनांत उत्पन्न झाली होती. साधु, बैरागी या अनित्य संसाराला सोडून देऊन भगवानाच्या दर्शनासाठी, त्यांची सेवा करीत काल घालवितात व अशा साधूंच्या संगतीने मनुष्याला शांति मिळून तो कृतार्थ होतो हीहि गोष्ट त्याने ऐकिली असल्यामुळे अशा साधूंची ओळख करून घ्यावी ह्या हेतूने त्याने मधूनमधून त्या धर्मशाळेंत येणें जाणे सुरू केलें. सकाळीं व संध्याकाळी धुनींतील अग्नि प्रज्वलित करून ते कसे भगवच्चिंतनांत निमग्न होतात, मिळालेली भिक्षा प्रथम इष्ट देवतेला समर्पण करून मग आनंदाने ती प्रसाद म्हणून कशी ग्रहण करतात, आजारी पडल्यास ते भगवंतांवर भार टाकून आजारीपणाचीं दुःखे कशीं शांत मनाने सहन करतात, जे मिळेल त्यांतच ते कसे संतोष मानतात, वगैरे गोष्टी या बुद्धिमान बालकाच्या तीक्ष्ण नजरेंतून सुटल्या नाहीत. हळूहळू गदाधराने साधु बैराग्यांची थोडी फार सेवा करण्याचें, त्यांना लाकडे पाणी वगैरे आणून

देण्याचे, त्यांच्या जागेची झाडलोट करण्याचें काम सुरू केले व त्यांच्यांत तो मिसळूनहि राहूं लागला. त्या साधू बैराग्यांनाहि या सुंदर बालकाच्या मधुर आचरणाचे कौतुक वाटावे आणि त्यांनी त्याला नानाप्रकारचीं गाणीं, दोहे, भजनें शिकवावीं, गोष्टी सांगाव्या, उपदेश करावा व आपल्या भिक्षान्नातून कांही प्रसाद त्याला खावयास द्यावा !

गदाधराच्या आठव्या वर्षी असेच काही साधू त्या धर्मशाळेत बरेच दिवस राहिले होते. गदाधर त्यांच्यात मिळून वागूं लागला व लवकरच त्यांना तो फार आवडूं लागला. प्रथम प्रथम गदाधर धर्मशाळेतील साधु बैराग्यांत मिळून असतो ही गोष्ट कोणाच्या लक्षांत आली नाही, पण त्याचा दिवसांतील बराच वेळ जेव्हां तेथे जाऊं लागला, तेव्हां ही गोष्ट सर्वांस समजली. एखादे दिवशी बैराग्यांनीं कांही खावयास द्यावे व घरीं आल्यावर त्याने आईला सर्व हकीकत सांगून “मला आता भूक नाही,” असे म्हणावे प्रथम प्रथम ही एक प्रकारची साधूंची कृपाच आहे असें वाटून तिला काही काळजी वाटली नाही. परंतु एखादे दिवशीं सर्वांगाला विभूति चर्चून, तर एखादे दिवशीं टिळे लावून किंवा एखादे दिवशीं साधूप्रमाणें लंगोटी लावून व पंचा गुडाळून त्याने घरीं येऊन म्हणावे, ‘ आई ! बघ मला साधूंनी कसे सजविलें आहे ते !” तेव्हां मात्र चंद्रा-देवींना काळजी वाटूं लागावी ! त्यांना वाटावे, हे साधुफकीर माझ्या गदाधराला फसवून कुठे घेऊन तर जाणार नाहीत ना ? एक दिवस गदाधर घरीं परत आल्यावर त्यांचें आईचें हृदय उचंबळून आलें व त्याला पोटाशीं धरून, डोळ्यांत पाणी आणून त्या म्हणाल्या, “बाळ ! सांभाळ बरें ! ते लोक तुला फसवून घेऊन जातील !” गदाधराने आपल्याकडून त्यांच्या या भीतीचें निरसन केलें पण त्यांच्या मनांतील संशय जाईना. तेव्हां आपल्यासाठी आपल्या आईस दुःख होत आहे हें पाहून गदाधरहि म्हणाला, “बरें तर आई ! आजपासून मी तिथे जाणा-रच नाही, म्हणजे तर झालेंना ?” हें ऐकून चंद्रादेवींचा जीव खाली पडला व त्यांच्या मनांतील भीति दूर झाली.

त्या दिवशीं सन्ध्याकाळीं धर्मशाळेत जाऊन ' आजपासून मी तुमच्या सेवेस येणार नाही, ' असें त्याने त्या साधूंस सांगितले व तसें करण्याचे कारण विचारतां, सर्व हकीकत मोकळपणे त्याने त्यांना सांगितली. ती ऐकून गदाधराबरोबरच ते साधुलोक त्याच्या घरीं आले व चंद्रादेवींस आश्वासन देऊन म्हणाले की, " मुलाला अशा रीतीने फसवून नेण्याचे कधीहि आमच्या ध्यानीं मनींहि आले नाही व आम्ही असे कधी करणारहि नाही. आम्ही संन्यासी फकीर लोक; आम्ही उगीच एखाद्या अल्पवयी मुलाला त्याच्या आईबापांच्या परवानगीशिवाय नेऊ तरी कसे ? असे करणे तर घोर पाप आहे. तेव्हां तुम्ही याबद्दल अगदीं निश्चिंत असा " हे ऐकून चंद्रादेवींचा सर्व संशय अगदी दूर झाला व साधु लोकांच्या इच्छेप्रमाणे गदाधराला पुन्हा त्यांचेकडे जाण्यासहि त्यांनी अनुमति दिली.

याच सुमारास घडलेल्या एका गोष्टीने चंद्रादेवींना गदाधराबद्दल पुन्हा काळजी उत्पन्न झाली. कामारपुकूराहून एक कोसावर आनूर गाव आहे. तेथे श्री विशालाक्षी देवीचे जागृत स्थान आहे. एक दिवस गावांतील बऱ्याच बायका कांही नवस फेडण्यास त्या देवीस निघाल्या. त्या मंडळीत धर्मदास लाहांची विधवा भगिनी प्रसन्नमयी हीहि होती.

प्रसन्नची सरलता, धर्मशीलता, पवित्रता वगैरे गुणांबद्दल रामकृष्णांची उच्च धारणा होती व पुढे तिच्या सांगण्याप्रमाणे वर्तन करण्यास त्यांची आपल्या धर्मपत्नीला आज्ञा असे. त्यांनी आपल्या स्त्रीभक्तांपुढेहि प्रसन्नचे गुण वर्णावेत. प्रसन्नचेहि गदाधरावर अत्यंत प्रेम असे. कधी कधी तो प्रत्यक्ष गदाधर आहे. असेंहि तिला वाटत असे; सरल स्वभावाची प्रसन्न गदाधराच्या तोंडून देवादिकांचीं भक्तिपूर्ण गाणी ऐकून म्हणे-" गदाई ! तूं प्रत्यक्ष देव आहेस असे मधून मधून कां वाटतें बरें ? तूं कांही म्हण, पण तूं काही माणूस नव्हस खास !" असो.

बायकामंडळी निघालेली पाहतांच गदाधरहि म्हणाला, " मी येतों. " बायकांनी प्रथम " तूं येऊं नको, वाट लांब आहे, दमशील, " वगैरे पुष्कळ

सांगून पाहिलें पण गदाधर ऐकेना. तेव्हा त्यांनी नाइलाजानें त्याला येण्यास परवानगी दिली. गदाधराला फार आनंद झाला व तो देवादिकांची गाणी म्हणत त्याच्याबरोबर जाऊं लागला.

गदाधर अशा रीतीनें आनंदात देवीची गाणी म्हणत चालला असतां, एकाएकी त्याचा आवाज थांबला, डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या व संज्ञा-शून्य होऊन तो जमीनीवर पडला. बायकांची एकच तारांबळ उडाली. कुणी इक-डून तिकडून पाणी आणून त्याच्या डोक्यावर शिपडलें कुणी वारा घालूं लागल्या, कुणी देवीला नवस करूं लागल्या, पण काही केल्या गदाधर सावध होईना. तेव्हा एकाएकी प्रसन्नच्या मनात विचार आला, की गदाधराच्या अंगात देवी तर आली नसेल? कारण सरलस्वभाव व भक्तिपरायण लोकांच्या अंगांत देवी येते असा तिचा विश्वास होता. त्याबरोबर तिनें देवीचा धावा करण्यास बायकांना सांगितलें. तिच्या पुण्यचरित्रावर बायकांची अत्यंत श्रद्धा होती व तिनें सांग-तांच त्या सर्वजणी मनात देवीचा धावा करूं लागल्या व आश्चर्याची गोष्ट, देवीचा धावा सुरू होताच थोडयाच वेळात गदाधर सावध होऊन उठून बसला! त्याच्या अंगावर आता अशक्तपणा किंवा दमल्याचें कांहींसुद्धा चिन्ह नव्हते हे पाहून बायकांनाहि वाटलें की खरोखरच याच्या अंगात देवी आली होती. असो. मग सर्वजणी देवीस गेल्या. तेथून घरी परत आल्यावर गदाधरासबंधीची सर्व हकीकत त्यांनी चंद्रादेवींना सांगितली. ती ऐकून चंद्रादेवीस फार काळजी वाटली व त्यांनी त्याची दृष्ट काढून रघुवीराची व विशालाक्षी देवीची आपल्या मुलाच्या कल्याणासाठी पुन्हापुन्हा प्रार्थना केली.

असो, पाहता पाहता आणखी वर्ष दीड वर्ष निघून गेले व गदाधर हळूहळू पित्याची आठवण थोडीफार विसरून गेला. धर्मदास लाहांचा मुलगा गयाविष्णु त्याच्याबरोबर यावेळीं गदाधराची अतोनात गट्टी जमली. ती इतकी की, या दोघांनी नेहमी एकत्र असावें; खेळणे, अभ्यास, जेवण एकत्रच करावें. गदा-धराला पैसा आयाबायांनीं खावयाला बोलावलें तर त्याने गयाविष्णूला घेतल्या

वांचून कुठे जाऊंच नये. या दोघांचें असे एकमेकावरचे अकृत्रिम प्रेम पाहून धर्मदासांच्या घरच्या व गदाधराच्या घरच्या मंडळीस फार आनंद वाटत असे.

गदाधराचें नववें वर्ष सरत आले आहे असे पाहून रामकुमारांनी त्याचें उपनयन करण्याचें ठरविलें. धनीने गदाधराजवळ एकदा असें मागितलें होतें की मुंजीच्या वेळीं तूं माझेकडून प्रथम भिक्षा घ्यावी. तिच्या अकृत्रिम प्रेमाने मुग्ध होऊन गदाधराने हीहि गोष्ट कबूल केली होती गदाधर बोलल्याप्रमाणे करण्यास कधीहि चुकणार नाही, अशी खात्री असल्यामुळे धनीला फार आनंद झाला होता, व मोठ्या प्रयत्नाने चार पैसे जमवून ती त्याच्या मुंजीची वाटच पाहात होती. मुंजीच्या अगोदर काही दिवस धनीला दिलेलें वचन गदाधराने रामकुमारांस सांगितले. परंतु त्यांच्या कुळांत अशी चाल नसल्यामुळे रामकुमार चिंतेंत पडले व गदाधरहि हट्ट धरून बसला. तो म्हणाला, 'मी जर असे न करीन तर खोटे बोलल्याचा दोष मला लागेल व खोटे बोलणाऱ्याला जानवें धारण करण्याचा अधिकार मुळीच नाही.' मुंजीचा दिवस जवळ आला व गदाधराच्या या हट्टाने मुंज लांबवावी लागते की काय, अशी रामकुमारांस सहेतुक भीति वाटूं लागली. ही गोष्ट धर्मदास लाहांच्या कानांवर गेली नि त्यांनी रामकुमारांना बोलावून नेऊन म्हटले, " अशा प्रकारची चाल तुमच्या कुळांत नसली तरी इतर कुणा कुणा कुलीन ब्राह्मणांच्या घराण्यांत ती आहे. तेव्हां मुलाच्या समजुतीसाठी तुम्हांलाहि तसें करण्यास कांही हरकत नाही. " वडिलासमान असणाऱ्या धर्मदासांचे हें बोलणें ऐकून रामकुमारांची चिंता दूर झाली व गदाधराला आपल्या इच्छेप्रमाणे करण्यास त्यांनी हरकत घेतली नाही. गदाधराने प्रथम भिक्षा धनीकडूनच घेतली व तिला याप्रमाणे गदाधराच्या भिक्षामातेचा मान मिळून फार धन्यता वाटली.

लाहाबाबूंच्या घरीं एके दिवशीं बरीच पंडित मंडळी जमली होती. चार पंडित एके जागी जमल्यावर वादास काय तोटा! झाले, कांही प्रश्न निघून

लगेच त्यावर पूर्वपक्ष उत्तरपक्ष चालू झाले ! वादास रंग चढत चालला. वाद चालतां चालतां एकाने असा कांही एक बिकट प्रश्न सर्व मंडळींस विचारला की त्या प्रश्नाचें योग्य उत्तर त्यांपैकी कोणासच सुचेना. त्या दिवशीं गदाधरहि तेथे होता. त्याची नुकतीच मुंज झाली होती. तो प्रश्न ऐकून त्यानें जवळ बसलेल्या एका ओळखीच्या पंडितास म्हटलें-" काहो, या प्रश्नाचें हें उत्तर नाही का होणार ? " त्याला तें पटल्यामुळे त्याने दुसऱ्यास तें सुचविलें व सर्वांस ते पटून या प्रश्नाचें हेंच एक उत्तर असे त्या सर्वांनी कबूल केलें. हे उत्तर कुणी सुचविलें याचा शोध करितां, एका नऊ दहा वर्षाच्या लहान मुलाने ते सुचविलें असें जेव्हां त्यांस कळलें तेव्हां त्यांच्या आश्चर्यास सीमा राहिली नाही व चकित होऊन हें मूल खास दैवीशक्तिसंपन्न असले पाहिजे अशा समजुतीने त्यांनी त्याची प्रशंसा केली व त्यास आशीर्वाद दिले.

उपनयन झाल्यानंतर अर्थातच गदाधराला देवांची पूजा करण्याचा अधिकार प्राप्त झाला. अगोदरच त्याचे हृदय भक्तिपूर्ण होते व आता हा अधिकार मिळाल्यामुळे तर संध्यावंदनादि कर्मे करून तो आपला बराचसा वेळ पूजा व ध्यान यांत घालवूं लागला. आपल्या पित्याप्रमाणे आपणांसहि मधे मधे दर्शन प्राप्त व्हावें, स्वप्ने पडावीं या हेतूने त्याने देवांची मनापासून सेवा नि भक्ति आरंभिली. पवित्र मनाच्या गदाधरावर देवांनीहि कृपा केली; अधून मधून त्याला भावसमाधि लागूं लागली व दिव्य दर्शनेंहि प्राप्त होऊं लागलीं !

याप्रमाणे गदाधराचा दिनक्रम चालला असतां, त्या वर्षीचा महाशिवरात्रीचा दिवस आला. गदाधराने त्या दिवशीं उपवासी राहून यथाविधि महादेवाची पूजा-अर्चा केली. त्याचा सोबती गयाविष्णु यानेहि उपास केला व रात्री सीतानाथ पाईन यांच्या घरीं शिवचरित्रपर नाटक व्हायचें होतें, तेथे जाऊन ते पाहात जागरण करावयाचें असा त्याने बेत केला. पहिल्या प्रहराची पूजा आटपून गदाधर शिवाचें ध्यान करीत बसला होता. इतक्यांत त्याचे कांही सोबती तेथे आले व " शंकराचें काम करणारा मुलगा एकाएकी आजारी

पडला आहे तर त्याच्याबद्दल आज तुला तें काम केलें पाहिजे" असें गदाधरास म्हणाले, "या योगाने पूजेंत बिघाड होईल म्हणून मी ते काम करणार नाही" असें गदाधर म्हणूं लागला. सोबती तें कांही ऐकेनात. ते म्हणाले, "शिवाची भूमिका तूं घेनलीस म्हणजे तरी तुझ्या मनांत शिवाचेच विचार घोळतील. आणि हें कांही पूजेपेक्षा कमी आहे काय? शिवाय आज तूं काम केलें नाहीस तर लोकांचा किती हिरमोड होईल बरें? याचा कांही विचार कर." त्यांचा असा आग्रह पाहून गदाधर कबूल झाला.

नाटकाची वेळ झाली. गदाधर शिव सजला नि शिवाचें चिंतन करीत आपल्या भूमिकेच्या वेळाची वाट पाहात बसला. वेळ येतांच तो पडद्याबाहेर आला. त्याची ती रुद्राक्षधारी, जटामंडित, विभूतिभूषित अशी शिवमूर्ति पाहून "हा खरोखर शंकरासारखाच दिसतो!" असें सर्वजण म्हणूं लागले. पण इकडे शिवाच्या ध्यानांत गदाधर इतका तन्मय होऊन गेला की त्याचें भाषण व गाणें बंद पडून त्याला भावसमाधि लागली! सर्व मंडपांत एकच गोंधळ उडाला. मंडळींनी गदाधराला उचलून आंत नेले व अंगावर पाणी वगैरे शिंपडल्यावर कितीतरी वेळाने तो सावध झाला. त्या दिवशींचें नाटक झाल्या प्रकारामुळे अर्थातच तेवढयावरच थांबलें.

या वेळेपासून गदाधराला मधे मधे भावसमाधि लागूं लागली. देवादिकांचें ध्यान करीत असतां, अथवा देवांचीं स्तुतिपर गाणीं ऐकत असतां त्याने इतकें तन्मय व्हावें की, कांही वेळपर्यंत त्याचें देहभान नष्ट व्हावें. ज्या दिवशीं ही तन्मयता अतिशय वाढे त्या दिवशीं तर त्याचे बाह्यज्ञान अगदी नष्ट होऊन जाऊन त्याचा देह एखाद्या लाकडी ठोकळ्याप्रमाणे जड होऊन पडावा! सावध झाल्यानंतर विचारतां त्याने सांगावें, "ज्या देवतेचें ध्यान मी करीत होतों, जिच्या स्तुतीचें गाणें ऐकत होतों त्या देवतेचें दिव्य दर्शन मला झाले!"

गदाधराची ही देहभान नष्ट होण्याची अवस्था पाहून त्याची आई व इतर सर्वजण यांस फार भीति वाटावी. परंतु त्यांनी जेव्हां पाहिलें की, या

अवस्थेपासून गदाधराच्या आरोग्यांत कांही बिघाड होत नाही, तेव्हां त्यांची भीति पुष्कळ कमी झाली. गदाधराची धर्मप्रवृत्ति मात्र या वेळेपासून अधिकच वाढली. गावांत कुठेहि उत्सव असला किंवा जयंति असली की तो तेथे जाऊं लागला व अंतःकरणपूर्वक तेथील कामांत मिसळूं लागला. अशा रीतीने त्याच्या धर्मप्रवृत्तीची वाढ होत होती खरी, पण त्याचा विद्याभ्यास मात्र मागे पडूं लागला. तीक्ष्णदृष्टिसंपन्न गदाधराने या एवढ्या लहान वयांतहि, मोठमोठे पंडित, तर्कालंकारादि पदव्यांनी भूषित असे थोर विद्वान लोकसुद्धा, ऐहिक भोगसुखाच्या व कीर्तीच्या कसे मागे लागलेले असतात, हा प्रकार पाहिला होता, म्हणून, त्यांच्यासारखी विद्या मिळविण्याविषयी तो अधिकाधिक उदासीन बनत चालला होता. या वेळीं, त्याची सूक्ष्म दृष्टि सर्व लोक कोणत्या उद्देशाने कार्य करतात हे पाहण्याकडे जाऊ लागली व आपल्या पित्याचे वैराग्य ईश्वरभक्ति, सत्यनिष्ठा, सदाचार, धर्मपरायणता इत्यादि अनेक सद्गुण स्वतः पुढे आदर्श म्हणून ठेऊन त्याच्याशीं तुलना करून, इतरांची तो किंमत ठरवूं लागला. पुराणांतील संसाराच्या क्षणभंगुरतेचे वर्णन ऐकून, त्याला अशा स्थितीतहि संसारात राहून दुःखे भोगणाऱ्या लोकांचे आश्चर्य वाटावे व दुःख व्हावे, आणि आपण असल्या अनित्य संसारांत मुळीच राहणार नाही, असा त्याने आपल्या मनाशीं निश्चय करावा! अकरा बारा वर्षाच्या लहान वयांत, एवढे गंभीर विचार गदाधराच्या मनांत कसे आले, याविषयी आश्चर्य अथवा शंका वाटावयास नको. कारण त्याची बुद्धि, प्रतिभा व मानसिक संस्कार, हीं सर्वच कांही अलौकिक व असाधारण होतीं. असो.

विद्याभ्यासाविषयी गदाधराचा उदासीन भाव अधिकाधिक वाढत होता, तरी तो पूर्वीप्रमाणेच पाठशाळेत अजूनहि जात असे. त्याचें वाचन आता बरेच सुधारले होते. रामायण महाभारत वगैरे धर्मग्रंथ त्याने अशा भक्तीने व सुंदर तऱ्हेने वाचावे की ते ऐकून लोकांनी तन्मय व्हावें! गावांतल्या साध्या व सरलहृदयी लोकांनी, ते ग्रंथ वाचण्यास त्यास आग्रह करावा व त्यानेहि त्यांचें

मंडळी त्याला आपल्या घरीं घेऊन जात व अनेक मंडळी जमा करून, गदाधराच्या तोंडून प्रल्हादचरित्र, ध्रुवोपाख्यान अथवा रामायण महाभारतापैकी इतर कोणतें एखादें आख्यान मोठ्या भक्तिभावाने ऐकत. तसेंच गावांतील व जवळपासच्या खेड्यांतील देवदेवतांवरची गाणीं, कवनें, नेहमी गदाधराच्या कानी पडत. त्याची स्मरणशक्ति असाधारण असल्यामुळे त्याने तीं ऐकून मनांत ठेवावी व कधी कधी तीं लिहूनहि काढावी. गदाधराने स्वहस्ते लिहिलेली "रामकृष्णायन पोथी" "योगाद्यंच गाणे" "सुबाहूचे गाणे" वगैरे गाणीं कामारपुकूर येथे त्यांच्या घरी आम्ही प्रत्यक्ष पाहिलीं आहेत.

गणिताचा गदाधराला तिटकारा असे, असे मागे सांगितलेच आहे. पाठशाळेंत त्याची या विषयांत फारच थोडी प्रगति झाली. बेरीज, वजावाकी, गुणाकार, भागाकार व कांही कोष्टके, इतके त्याचे गणित झाले. परंतु दहाव्या वर्षापासून त्याला मधे मधे भावसमाधि लागूं लागल्यापासून, त्याच्या घरच्या मंडळींनी त्याला वाटेल तेव्हां शाळेंत जाण्यास व वाटेल तर शिकण्यास परवानगी दिली होती व शिक्षकालाहि ही गोष्ट माहीत असल्यामुळे तोहि गदाधरास त्रास देत नसे. या कारणाने गदाधराचा गणित विषयाचा अभ्यास तितकाच राहिला.

हळूहळू गदाधरास बारावे वर्ष लागले. त्याच्या मधल्या भावाला—रामेश्वराला—आता बाविसावे व धाकट्या बहिणीला—सर्वमंगलेला—नववे वर्ष लागले होते. रामेश्वरचे लग्नाचे वय झालेले पाहून रामकुमारानी कामारपुकूर-जवळच्या गौरहाटी गावच्या रामसदय बंद्योपाध्याय यांच्या बहिणीशी त्याचा विवाह करून दिला व रामसदयांना आपली बहीण सर्वमंगला दिली.

भाऊ व बहीण यांचीं लग्नें करून रामकुमार त्या काळजींतून मुक्त झाले खरे पण आता त्यांच्यामागे दुसऱ्याच काळज्या लागल्या. त्यांची पत्नी या सुमारास गर्भवती झाली व यायोगे त्यांना एक प्रकारें आनंद झाला खरा; पण

"प्रसूतिकालीं आपली पत्नी मरण पावणार," असें त्यांस पूर्वीच कळून चुकल्यामुळे त्यांना फार काळजी वाटूं लागली. तसेंच धाकटा भाऊ रामेश्वर याचा विद्याभ्यास संपला होता, तरी तो अजून कांही मिळवूं लागला नव्हता. म्हणून संसाराची स्थिति पूर्वीप्रमाणेच खालावत चालली होती; व आता यास काय उपाय, अशी एकसारखी चिंता त्यांना लागलेली होती.

प्रसूतिकाल जसजसा जवळ येत चालला तसतशी रामकुमारांची चिंता अधिकाधिक वाढूं लागली. सरते शेवटी १८४९ सालीं एक दिवस त्यांची पत्नी एका अत्यंत सुंदर मुलास जन्म देऊन मृत्यु पावली. या घटनेने रामकुमारांच्या दरिद्री संसारावर पुन्हा शोकाची छाया पडली.

# ८. यौवनाच्या आरंभीं

"लहानपणीं—जेव्हां बुद्धीला फांटे फुटलेले नसतात तेव्हां—मन ईश्वराकडे सहज लागतें. मोठेपणीं बुद्धीला फांटे फुटल्यावर तें ईश्वराकडे लागतां लागत नाही."

—श्रीरामकृष्ण

---

रामकुमारांची सहधर्मिणी त्यांस सोडून गेली, तेव्हांपासून तर रामकुमारांच्या दरिद्री संसारांतील दुःखें अधिकच वाढलीं, मिळकत कमी झाली व संसाराची दिवसेंदिवस अवनति होत चालली. त्यांच्या दीड बिघे जमीनींत संसारास कसेंबसें पुरेसें धान्य निघे, पण वस्त्रप्रावरणादि नित्योपयोगी इतर वस्तूंचा अभाव दररोज वाढत चालला. शिवाय वृद्ध माता व मातृहीन बालक अक्षय यांस रोज दूध अवश्य पाहिजे असे. अर्थात् हा सर्व खर्च कर्ज काढून कसातरी चालू लागला व कर्जहि दिवसेंदिवस वाढूं लागलें. त्यांनी आपल्याकडून शक्य ती खटपट करून आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण व्यर्थ. तेव्हां इष्टमित्रांच्या सांगण्यावरून त्यांनी दुसरीकडे कोठे तरी जाण्याचा बेत केला. जाण्याचें दुसरें कारण म्हणजे, ज्या घरांत त्यांनी वीस वर्षें आपल्या पत्नीसह काढिलीं व ज्यांत तिची आठवण पदोपदी येण्याचा संभव; त्या घरापासून चार पावलें दूर राहिलें तरच कांही मनाला शांति मिळण्याचा संभव; म्हणून त्यांनी आपलें गाव सोडून कलकत्त्यास जाण्याचा बेत केला व पत्नीच्या मृत्यूनंतर थोडयाच दिवसांत रामेश्वरांवर संसाराचा भार टाकून रामकुमार कलकत्त्यास गेले व तेथे झामापुकूर नामक पेठेंत त्यांनी एक शाळा उघडली.

इकडे रामकुमारांच्या पत्नीच्या मृत्यूनंतर संसारांतील सर्व कृत्यांचा भार चंद्रादेवींवरच पुन्हा पडला. रामकुमारांचा मुलगा अक्षय, याला सभाळण्याच्या कामीं रामेश्वरांची बायको तिला थोडी फार मदत करूं लागली, पण तीहि कसे झालें तरी लहानच; तेव्हां संसारांतील कामकाज, देवादिकांची सेवा, अक्षयाचे लालनपालन, वगैरे सर्व कर्मांचा बोजा वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी त्यांच्या शिरावर पुन्हा पडून त्यांना क्षणभरहि फुरसत सापडेनाशी झाली.

रामेश्वरांवर मिळवून आगण्याचा बोजा पडल्यामुळे, आपण चार पैसे मिळवून आपला ससार कशा रीतीने बरासा चालवावा, ही चिंता त्यांच्यामागे लागली. परंतु, ससारास पुरेसा पैसा त्यांनी कधीच मिळविला नाही. उलट, त्यांचा बराचसा वेळ सन्यासी बैरागी यांच्याच संगतींत जात असे व त्यांना कशाचीहि गरज लागल्यास, ती वस्तू आपल्या घरी असेल तर, ते ती त्यांना देण्यास मागे पुढे पाहात नसत. अशा रीतीने मिळकत नाही व खर्च फार अशी स्थिति असल्यामुळे पूर्वीचे कर्ज कमी न होतां उलट वाढूंच लागले. ससारी होऊन सुद्धा ते संचयी होऊं शकले नाहीत व आयापेक्षा जास्त खर्च करून " रामराय कसें तरी चालवील ! " असें म्हणून स्वस्थ बसण्यापलीकडे त्यांनी कांही केलेहि नाही

गदाधरावर रामेश्वरांचें फार प्रेम असे, पण त्याच्या विद्याभ्यासाकडे ते मुळीच पाहात नसत. एक तर त्यांना तसें करण्याचा कंटाळा असे व दुसरें, संसाराच्या काळजींत व इतर उलाढालींत त्यांना वेळ मिळत नसे. गदाधराची धर्मवृत्ति पाहून त्यांना फार आनंद होई व हा पुढे कोणी तरी मोठा पुरुष होईल असें वाटून ते त्याच्यासंबंधी निश्चिंत असत. याप्रमाणे, रामकुमार कलकत्त्यास गेल्यापासून गदाधराकडे कोणीच पाहात नसल्यामुळे तो अगदी मोकळा झाला व स्वतःचें शुद्ध व धर्मपरायण मन जिकडे नेईल तिकडे खुशाल जाऊं लागला.

या एवढया लहान वयांतसुद्धा गदाधराची बुद्धि फार प्रगल्भ झालेली होती, असें मागे सांगितलें आहे. त्याने पाहिलें होतें की, विद्याभ्यास वगैरे ज्या

गोष्टी लोक करीत असतात, त्या पैशासाठी होत. बरें, एवढी विद्वत्ता मिळवून तरी आपल्या पित्यासारखी सत्यनिष्ठा, भक्ति, धर्मपरायणता, कितीशा लोकांत दिसून येते ? पैशाविषयी गावातली भांडणें वगैरे पाहून, पैसा हाच सर्व अनर्थांचें मूळ आहे हे त्याच्या मनांत बिंबले होते. तेव्हां अशा अर्थकारी विद्येविषयी व अनर्थकारी अर्थाविषयी उदासीन राहून ईश्वराचा लाभ हेंच जीवनाचें ध्येय करण्याचें त्यानें ठरवावें, ह्यांत आश्चर्य नाही. शाळेंत वगैरे सोबत्यांच्या बरोबर तो जाई, पण तो आपला बहुतेक वेळ देवाच्या पूजअर्चेत व गृहकृत्यांत आपल्या मातेला थोडीफार मदत करण्यांतच घालवीत असे.

शेजारपाजारच्या बायकांना गदाधर फार आवडत असे व आताशा तो बहुतेक तिसऱ्या प्रहरपर्यंत घरीच असल्यामुळे जेव्हां त्या चंद्रादेवींकडे येत तेव्हां गदाधर तेथे आल्यास, त्या त्याला गाणी, पदें वगैरे म्हणावयाला लावीत. तो चंद्रादेवीस गृहकृत्यात मदत करण्यांत गुंतला असेल, तर त्या बायांनी सर्वांनी मिळून चंद्रादेवींचें कामकाज आपणच झटपट आवरून टाकावें व गदाधराला अशा रीतीनें, गाणीं पदें वगैरे म्हणण्यास मोकळे करावे ! गदाधराच्या रोजच्या कार्यक्रमांतील हा एक भागच होऊन बसला. बायकांनाहि दिवसेंदिवस तेथे आल्यावांचून करमेनासें झाले व दुपारीं आपआपलीं कामें लौकर आटोपून त्या चंद्रादेवींच्या घराकडे धांव घेऊं लागल्या.

गदाधरानें ह्या साध्याभोळ्या व धर्मपरायण बायकांना, कधी पुराण वाचून दाखवावे, कधी गाणीं, पदें म्हणून दाखवावीं; कधी एखाद्या विशेष प्रसिद्ध व्यक्तीचे अनुकरण करून, त्याच्यासारखे भाषण व हावभाव करून त्यांना हसवावे ! गदाधराचा आवाज अत्यंत मधुर असे व तो इतक्या तन्मयतेनें देवादिकांचीं गाणीं म्हणत असे की, त्या बायकाहि क्षणभर देहभान विसरत. एखादे वेळीं गदाधराचीहि—गाणीं म्हणत असतां—भावसमाधि लागावी व ती सरेतों त्या बायकांनी अत्यत भक्तिभावाने त्याच्याकडे पाहात असावें ! त्याच्या जन्माचे अगोदर त्याच्या मातापित्यांस पडलेलीं स्वप्नें त्यांनी ऐकिलीं होतीं व त्यांस

जुळणारी त्याची धर्मपरायणता, निःसीम भक्ति व आकर्षकता हीं सर्व प्रत्यक्ष पाहून, त्या बायकांस हा पुढे कोणीतरी महान् सत्पुरुष होणार आहे असें वाटावें व त्यांच्या हृदयांत गदाधराविषयी जास्तच प्रेम उत्पन्न व्हावें. आम्हीं ऐकले आहे की धर्मदास लाहाची बहीण प्रसन्न व आणखी कांही स्त्रिया, यांना एके दिवशीं, गदाधराकडे पाहात असतां श्रीकृष्णाचे दर्शन झालें होतें व इतरहि पुष्कळ सरल अंतःकरणाच्या स्त्रिया त्याचे अलौकिक गुण पाहून त्याला देवच समजत.

एखादे वेळीं गदाधराने स्त्रीचा वेष घेऊन स्त्रियांसारखा अभिनय व भाषण करावें; तें इतकें हुबेहुब व्हावें की, माहीत नसलेल्या कोणाहि मनुष्यास 'तो पुरुष आहे,' असे ओळखतां येऊं नये. अशा प्रकारचा स्त्रीचा वेष घेऊन गदाधराने एकदा इतर स्त्रियांबरोबर हालदारपुकूर तळ्यावरून पाणीसुद्धा आणले, पण त्याला कोणीहि ओळखले नाही! त्या गावांत, गुजरगल्लींत, सीतानाथ पाईन म्हणून एक श्रीमंत गृहस्थ असे. याची स्त्री व कन्या यांची गदाधरावर फार प्रीति होती. त्यांनी अनेकदा गदाधराला आपल्या घरी न्यावे व त्यांची गाणीं व पदें ऐकावींत. कित्येकदा त्यांनीहि त्याला स्त्रीवेष द्यावा व त्याचे हावभाव व स्त्रियांसारखें भाषण ऐकावे! सीतानाथांचे गदाधरावर प्रेम असे व म्हणून त्याला त्यांच्या घरीं केव्हांहि जाण्यास पूर्ण मोकळीक होती.

त्याच गल्लींत दुर्गादास पाईन नांवाचे गृहस्थ होते. गदाधरावर त्यांचे प्रेम होतें. पण त्यांच्या घरीं गोषाची चाल फार कडक होती. गदाधराला सुद्धा ते आपल्या बायकामंडळींत येऊं देत नसत. आपल्या घरांतील गोषाचा त्यांना फार अभिमान असे, व "माझ्या घरांतील बायका मंडळी कधीहि कोणाच्या नजरेस पडली नाहीत," असे ते आढयतेने म्हणत. सीतानाथ वगैरे इतर गृहस्थांचे घरीं गोषापद्धत नाही, म्हणून ते त्यांस हलके मानीत असत. एक दिवस कोणा एका गृहस्थाशीं आपल्या गोषाबद्दल दुर्गादास बढाई मारीत होते, इतक्यांत गदाधर सहज तेथे आला. त्यांची बढाई ऐकून त्याने

म्हटलें, " गोषाने का कधी स्त्रियांच्या पावित्र्याचे रक्षग होत असते ? चांगली शिकवगूक व देवभक्ति याच्याच योगें त्याचें रक्षग होत असतें; मी मनांत आगल्यास तुमच्या गोषांतील सर्व स्त्रियास पाहूं शकेन व त्यांची सर्व हकीगत जाणूं शकेन. " दुर्गादास अधिकच आढयतेने म्हगाले, " कसे पाहातोस पाहूं बरें ?" गदाधर शांतपगें म्हगाला, " येईल एखादे दिवशीं वेळ, तेव्हां पाहीन." असे म्हगून तो निघून गेला. पुढे एके दिवशी, संध्याकाळचे सुमारास, कोगासहि कांही समजूं न देता त्याने स्त्रीवेष घेतला; आपलें तोंड वस्त्राने झाकून घेतले व काखेंत एक पाटी घेऊन दुर्गादासाच्या दारापुढे उभा राहून म्हणाला, "जवळच्या खेडयांतून बाजारांत सूत विकावयाला इतर बायाबरोबर आले, पग त्या मला चुकवून गेल्या, म्हगून आता रात्र कोठे तरी काढण्यास जागा बघत आहे. तुम्ही मला आपल्या घरांत आजची रात्र जागा द्याल काय ? " दुर्गादासांनी तिचें व गावाचे नांव विचारलें व आगखी एक दोन प्रश्न विचारून म्हटले, " बरें तर, आंत बायका मंडळींकडे जा व त्या सांगतील तेथे रात्रभर रहा. " गदाधर मोठया कृतज्ञतेने त्यांना प्रणाम करून आत गेला व तेथेहि त्याने पुन्हा हीच कहागी सांगून 'आजची रात्र राहायला जागा द्या,' अशी त्यांस विनंती केली व इतर गप्पा गोष्टी सुरू करून त्यास अगदी गारेगार करून टाकलें ! त्या स्त्रिया, तिचें तरुण वय व मधुर भाषग यांनी अगदी मोहून गेल्या व त्यांनी तिला रात्री निजण्यास एक खोली दिली व थोडेंफार फराळाचेंहि दिलें ! गदाधराने घरांतील सर्व गोष्टी सावकाश बारकाईने पाहून घेतल्या. इकडे इतकी रात्र झाली तरी गदाधर कां येत नाही, अशी काळजी वाटून, रामेश्वरांस त्याचा तपास करण्यास चंद्रादेवींनी सांगितले. रामेश्वरांनी त्याचीं जाण्याचीं सर्व ठिकाणें शोधलीं. सीतानाथांच्या घरीं तपास केला, तरी गदाधर कोठे दिसेना. तेव्हां दुर्गादासांच्या घराजवळ उभे राहून, त्यांनी सहज त्याचें नांव घेऊन, दोनतीन हाका मारल्या. तेव्हां त्यांचा आवाज ओळखून व आता रात्र बरीच झाली असें पाहून गदाधराने, आंतूनच " आलों रे दादा ! " असें उत्तर दिलें व दाराकडे धांव ठोकली ! दुर्गादासांना हा प्रकार तेव्हांच समजला व हा गदाधर आपल्याला

फसवून गोषांत शिरला, असें वाटून प्रथम त्यांना फार राग आला. पण त्याचा तो स्त्रीवेष आणि त्याचें भाषण आणि त्याची चालचलणूक, किती हुबेहुब स्त्रियांसारखी होती, हें लक्षांत घेऊन या पोरानें आपल्याला चांगलेंच चकविलें असें वाटून त्यांना फार हसूं आलें. लवकरच साऱ्या गावांत ही गोष्ट पसरली व गदाधरानें दुर्गादासांची चांगली खोड मोडली, असें जो तो म्हणूं लागला. यानंतर दुर्गादासांनीहि सीतानाथांच्या घरीं गदाधर येईल तेव्हां तेथें जाण्यास आपल्या बायकांस परवानगी दिली!

ह्या गुजर गल्लींतील इतरहि स्त्रियांच्या मनांत गदाधराविषयी हळूहळू फार प्रीति उत्पन्न झाली. गदाधर कांहीं दिवस सीतानाथांच्या घरीं आला नाहीं म्हणजे त्यांनी त्याला मुद्दाम बोलावणें पाठवावें. सीतानाथांच्या घरीं पदें वगैरे म्हणत असतां गदाधराला कधीं कधीं भावावेश उत्पन्न होई व तो पाहून तर त्या स्त्रियांची त्याच्यावरील भक्ति अधिकच वाढे. असें म्हणतात कीं, ह्या भाव-समाधीच्या वेळीं त्या बायका गदाधराची श्रीगौरांग अथवा श्रीकृष्ण या भावानें पूजा करीत! श्रीकृष्णाचा वेष त्याला चांगला दिसे, म्हणून एक सोन्याची मुरली व एक सुंदर मुकुट व स्त्रीवेषासाठीं लागणारें सर्व सामान त्यांनी करून ठेवलें होतें!

धर्मपरायणता, पवित्र आचरण, तीक्ष्णबुद्धि, गोडस्वभाव, गंधर्वासारखा आवाज व प्रेमळ नि सरळ स्वभाव इत्यादि गदाधराच्या गुणांनी त्यावर कामारपुकूर येथील स्त्रिया किती प्रेम करीत असत, हे आम्हीं कांहीं कांहीं त्याच्याचपैकीं कित्येकांच्या तोंडून स्वतः ऐकलें आहे. सन १८९३ सालीं वैशाखाचे आरंभीं आम्ही स्वामी रामकृष्णानंद यांच्याबरोबर कामारपुकूर पाहण्यास गेलों असतां, आम्हांला सीतानाथ पाईन यांची कन्या श्रीमती रुक्मिणी देवी यांच्या दर्शनाचा लाभ झाला. त्यांचें वय तेव्हां साठ वर्षांचें होतें. गदाधराच्या बालपणच्या हकीगतीसंबंधीं विचारतां त्या म्हणाल्या:--

" त्या काळीं आमचें घर येथून एका हांकेवर उत्तरेस होतें. आज काल तें सर्व पडून गेलें आहे. माझें वय जेव्हां सतरा अठरा वर्षांचें होतें, तेव्हां आमचें

घर म्हणजे एखाद्या मोठया श्रीमंताच्या हवेलीसारखे होते. माझे वडील सीतानाथ पाईन. आम्ही घरीं चुलत बहिणी, आते बहिणी, मामे बहिणी मिळून, एकंदर सतरा अठरा बहिणी होतों. आम्ही साधारण सारख्याच वयाच्या होतों. गदाधर लहानपणापासून आमच्यांत खेळत असे व त्याच्यावर आम्ही फार प्रेम करीत असूं. आम्ही मोठया झाल्यावर सुद्धा तो आमचे घरीं येत असे. तो आमच्या बाबांना फार आवडे व त्याच्यावर त्यांची आपल्या इष्टदेवतेप्रमाणे भक्ति व प्रीति असे! आळींतल्या कोणी कोणी त्यांना म्हणावे— 'आतां मुली मोठया झाल्या, त्याच्यात तुम्ही त्यास मिसळूं देऊं नये.' यावर त्यांनी म्हणावे, 'त्याची तुम्हाला काळजी नको. गदाधराला मी चांगला ओळखतो!' गदाधर घरीं आला, म्हणजे त्याने पुराणांतील कथा सांगाव्या, गाणी पदें गावीं, आमच्या चेष्टा करून आम्हांस हासवावे! हे सर्व ऐकत, आम्हीं अपाआपलीं कामे मोठया मजेत करावीं, तो जवळ असतो वेळ म्हणजे कसा वाऱ्यासारखा निघून जाई! एखादे दिवशीं तो आला नाही, तर 'त्याला कांही झालें तर नाही ना?' अशी काळजी वाटून आम्हास चैन पडूं नये! आमच्यापैकीच कोणी चंद्रादेवीकडे जाऊन त्याची वार्ता आणीपर्यंत आमच्या जिवांत जीव नसावा. त्याच्यासंबंधी प्रत्येक गोष्ट आम्हांस अमृताप्रमाणे गोड वाटावी म्हणून, ज्या दिवशी आमच्या घरीं त्याचे येणे होत नसे, त्या दिवशीं त्याच्याच गोष्टी बोलत आम्हीं तो दिवस घालवावा!"

केवळ स्त्रियांनाच तो प्रिय असे असे नाही, तर गावांतील लहान थोर पुरुषांनाहि तो फार आवडे. गावांतील लहान थोर मंडळी रोज संध्याकाळीं एके जागी जमून, भागवतादि पुराण ग्रंथ मोठया भक्तीने वाचून आनंद करीत असत तेव्हां गदाधरहि अवश्य तेथे असे. तो असला म्हणजे सर्वांच्या आनंदसमुद्रास जणुं भरती येई. कारण त्याच्यासारखें पुराण वाचण्यास व भक्तिभावाने पौराणिक गोष्टी सांगण्यास व निरनिराळी देवदेवतांचीं गाणीं व पदें म्हणण्यास कोणासच येत नसत. गाणीं म्हणत असतां, भावावेशाने तन्मय होऊन त्याचे नृत्य सुरू झाले म्हणजे सर्वांचीं अंतःकरणें भक्तिभावाने भरून जावीं व त्यांच्या डोळयांतून अश्रुधारा वाहूं लागाव्या! एखादे वेळीं, त्याने चांगल्या चांगल्या गोष्टी सांगून

त्यांचें मनोरंजन करावें, स्त्रियांच्या सारखा हुबेहुब अभिनय करून त्यांना चकित करावें, एखादे वेळीं मजेदार गोष्टी सागून त्यांना पोट धरधरून हसवावें ! या त्याच्या गुणांनी तो लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांस हवा असे. संध्याकाळ झाली, म्हणजे सर्वजण तो येण्याची उत्कंठेने वाट पाहात !

गदाधराची भक्ति जसजशी वाढत चालली, तसतसें त्यास वाटूं लागलें की, आपलें जीवन अर्थकरी विद्येत प्राविण्य मिळविण्यांतच खर्च करण्यासाठी नाही, तर ईश्वराचा लाभ करून घेण्यासाठी आहे. संन्याशांचीं भगवीं वस्त्रें, त्यांचा पवित्र अग्नि, त्यांचें भिक्षान्न व त्यांचे निःसंग फिरणे, याचें चित्र त्याच्या डोळ्यापुढे सदा दिसावें व ‘ आपण त्यांच्यासारखे ईश्वरावर भार टाकून पूर्ण निर्भय व संसाराविषयी पूर्ण उदासीन कधी तरी होऊं काय ? ’ असे विचार त्याच्या मनांत वरचेवर यावे. पण लगेच आपल्या मातेची व भावाची सांसारिक अवस्था त्याच्या डोळ्यापुढे यावी व त्यांना ससार चालविण्यास मदत करणें हें आपले कर्तव्य आहे, असे विचार मनांत येऊन तें द्विधा व्हावें. शेवटी ‘ परमेश्वर काय करील तें खरें, ’ असें वाटून तो आपलें मन परमेश्वराच्या चरणीं समर्पण करून व आपला सर्व भार त्याच्यावर टाकून त्याच्याकडूनच कांही आदेश येण्याची वाट पाहात बसे.

गदाधराचें हृदय मूळचेच विलक्षण सहानुभूतिसंपन्न असे. त्यांत गावांतील सर्व प्रकारच्या, सर्व वयाच्या, लोकांत मिसळून त्याने त्यांचीं सुखदुःखें पाहिल्यामुळे तर ती सहानुभूति अत्यंत वाढली होती व त्यांचीं सुखदुःखें तीं आपलींच अशा तऱ्हेचा अत्यंत उदार भाव त्याच्या हृदयांत यावेळीं उत्पन्न झाला होता. त्या सरल स्वभावी लोकांचें आपल्यावर असलेले अपार प्रेम त्याला आठवावें व त्यास वरचेवर वाटावें की, परमेश्वराची भक्ति यांना शिकवून आपल्याला त्यांचें दुःख कमी करून सुख वाढवितां येईल, तर किती बरें होईल ?

त्याचे असे विचार चाललेले असत, तरी तो पाठशाळेंत जातच असे. आपल्या गयाविष्णू वगैरे सोबत्यांच्या संगतींत त्याला फार आनंद वाटे व

आपण त्यांना वरचेवर भेटलों नाही, तर त्यांना वाईट वाटेल म्हणून तो शाळेंत जाई. याच सुमारास त्याच्या सोबत्यांनी मिळून एक छोटीशी नाटक कंपनी काढण्याचे ठरविलें; अर्थातच पात्रांना आपआपलीं कामें शिकविण्याचें कामीं गदाधराचीच सर्वानुमतें नेमणूक झाली. पण ही कंपनी निघावी कशी व कोणास न समजूं देतां हिचा कारभार चालवावा कसा ? कारण मुलांना वाटे की ही गोष्ट आपल्या पालकांस समजली, तर सर्वच फिसकटेल. तेव्हां याला तोड काय काढावी ? शेवटी गदाधराने सुचविलें की आपण माणिकराजांच्या आमराईत जमत जाऊं, म्हणजे ही गोष्ट कोणासहि माहीत होणार नाही. सर्वांना हा विचार पसत पडून असें ठरलें की, सर्वांनी रोज नेमलेल्या वेळीं शाळेंतून पलायन करून तेथे जमावें !

एकदा ठरल्यावर कृतीला काय उशीर ? लवकरच ती आमराई मुलांच्या भाषणांनी व गाण्यांनी दुमदुमून जाऊं लागली. त्यांनी रामकृष्णादिकांच्या चरित्रांवर नाटकें बसवावीं; कोणी कसें बोलावयाचें, कोठें कसा अभिनय करावयाचा, वगैरे सर्व ज्याचें त्यास शिकवून, गदाधराने मुख्य भूमिका स्वतः करावी ! थोडयाच दिवसांत नाटकें बरीं जमूं लागलीं, हें पाहून मुलांसहि आनंद वाटूं लागला. असें सांगतात की, निरनिराळ्या भूमिका करीत असतां गदा-धरास केव्हां केव्हां भावसमाधि लागत असे !

गदाधराचा बहुतेक वेळ अशा रीतीने जाऊं लागल्यामुळे त्याची आपल्या आवडत्या विषयांत–चित्रकलेंत–विशेषशी प्रगति झाली नाही, तरी पण त्याचें या विषयांतील ज्ञान अगदीच साधारण नव्हतें. एक दिवस आपल्या बहिणीस भेटण्यासाठी तो गौरहाटी गावास गेला होता. बहिणीच्या घरांत शिरतांच सर्वमंगला आनंदाने आपल्या पतीची सेवा करीत असल्याचें त्यास दिसलें. घरीं परत आल्यावर त्याने अशाच आशयाचे एक चित्र काढून तें घरांतील सर्व मंडळीस दाखविलें व सर्वांनी त्यांतील सर्वमंगला व तिचा पति यांचे चेहरे सहज ओळखले.

देवदेवतांच्या मूर्ति गदाधराला फारच उत्तम तयार करतां येत असत. कित्येकदा एखादी मूर्ति तयार करून आपल्या सोबत्यासह त्याने तिची पूजा-अर्चा करावी.

अशा रीतीने आणखी तीन वर्षे हां हां म्हणतां निघून गेली व गदाधराला १७ वे वर्ष लागलें. तिकडे कलकत्त्यास रामकुमारांची शाळा, त्यांच्या अश्रांत परिश्रमाने बरीच ऊर्जितावस्थेस आली होती व आता त्यांना तीन चार पैसेहि मिळूं लागले होते. ते वर्षातून एकवेळ कामारपुकूरास येऊन कांही दिवस राहात असत. गदाधराची विद्येविषयी उदासीनता पाहून त्यांना फार चिंता वाटे. इ. स. १८५३ मध्ये तो घरीं आला असतां याबद्दल ते, चंद्रादेवी व रामेश्वर यांच्यांत बरीच चर्चा होऊन असे ठरलें की गदाधराने रामकुमारांबरोबर कलकत्त्यास जाऊन राहावे. रामकुमार तेथे एकटेच असत व घरचीं कामें करून शाळा चालविण्यास त्यांना फार त्रास होई म्हणून गदाधर तेथे गेल्यास त्याचा विद्याभ्यासहि होईल व रामकुमारांसहि त्याची थोडी फार मदत होईल, असा यांत हेतु होता. गदाधराला यासंबंधी विचारतां, तो तेथे जाण्यास तेव्हाच तयार झाला व आपल्याला आता आपल्या पितृतुल्य वडील भावाला थोडी फार मदत करतां येईल या विचाराने त्याला समाधान वाटलें.

नंतर थोडक्याच दिवसांनी एक सुमुहूर्त पाहून रामकुमार व गदाधर यांनी आपल्या कुलदेवतेस व आईस वंदन करून कलकत्त्यास प्रयाण केलें ( स. १८५३ ). कामारपुकूरचा आनंदाचा बाजार मोडला व तेथील लोक गदाधराचे गुण आठवीत आपले दिवस कंठूं लागले.

# १. साधकभाव

" कोणतेंहि साधन करावयास मला तीन दिवसांपेक्षा अधिक वेळ लागला नाही ! "

" माझी अवस्था उदाहरणादाखल आहे. "

—श्रीरामकृष्ण

---

जगाचा आध्यात्मिक इतिहास वाचून पाहतां असे दिसून येतें की, भगवान बुद्धदेव व श्रीचैतन्य देव यांच्याखेरीज इतर कोणत्याहि अवतारी पुरुषांच्या साधकावस्थेंतील हकीकत कोठेंच लिहिलेली सापडत नाही. उद्दाम अनुराग व उत्साह यांनी आपले हृदय भरून घेऊन ईश्वरप्राप्तीच्या बिकट मार्गांत प्रगति करीत असतां त्यांच्या मनाची स्थिति कशी बदलत गेली, त्यांना आपल्या आशानिराशांशीं कसे झगडावें लागले, त्यानी आपल्या दोषांवर कसे जय मिळविले, त्यांना इतरहि नानाप्रकारच्या अडचणी कशा आल्या व आपल्या ध्येयाकडे सदैव दृष्टि ठेवून व परमेश्वरावर पूर्ण विश्वास ठेवून त्यांनी त्या कशा दूर केल्या इत्यादि गोष्टींची सविस्तर हकीकत त्यांच्या चरित्रांत कोठेच सापडत नाही.

असें कां असावें, याचें कारण शोधणें फार कठीण आहे. कदाचित् भक्तीच्या आधिक्यानेच त्यांच्या भक्तांनी त्या गोष्टी लिहून ठेविल्या नसाव्यात. त्या त्या महापुरुषांवर परमेश्वराप्रमाणे भक्ति असल्यामुळे ' साधनाकालचा इतिहास लिहून त्या देवचरित्राची असंपूर्णता लोकांना न दाखविलेलीच बरी, ' असे त्यांच्या भक्तांस वाटलें असावें. कदाचित असेंहि असेल की, महापुरुषांच्या चरित्रांतील सर्वांग--संपूर्ण भावच लोकांपुढे ठेवल्याने तो लोकांचें जितकें कल्याण

करील तितकें कल्याग त्यांच्या चरित्रांतील साधनाकालीन असंपूर्ण भाग ठेवल्याने होणार नाही, असेंहि त्यांच्या भक्त मंडळीस वाटलें असावें.

आपलें आराध्य दैवत सर्वांगपूर्ण आहे, असेंच नेहमी भक्तास वाटत असतें. ' मानवशरीर धारण केल्यामुळे त्याच्यांत मानवोचित दुर्बलता आणि शक्तिहीनता कधी कधी दिसून येणें शक्य आहे, ' ही गोष्ट तो मुळींच मानीत नाही. त्याच्या बालमुखांत विश्वब्रह्मांड कोठें सापडतें की काय, हें तो पाहात असतो ! बालवयांतील असंबद्ध चेष्टामध्ये पूर्णबुद्धि व दूरदृष्टि, तो धुंडाळत असतो; एवढेंच नाही तर तेवढया बालवयांतहि, सर्वज्ञता, सर्वशक्तिमत्ता, उदारता व अगाध प्रेम हींहि तो शोधीत असतो !

यामुळेच " आपलें ईश्वरीस्वरूप लोकांना कळूं देऊं नये म्हणूनच अवतारी पुरुष, साधनभजन वगैरे इतरांच्यासारख्याच गोष्टी करून, आहार, निद्रा, क्लांति, व्याधि वगैरे इतरांच्या सारखेच विकारहि आपल्यांत आहेत असे उगीच खोटेंच दाखवीत असतात," असें त्यानें म्हणावें, हें विचित्र नव्हे. श्रीरामकृष्णांच्या अखेरच्या दुखण्याची अशा रीतीनें मीमांसा केलेली आम्हीं प्रत्यक्ष ऐकली आहे.

भक्त अशा प्रकारचे सिद्धांत काढतो, यास कारण त्याची दुर्बलताच होय. अवतारी पुरुषांना मनुष्याप्रमाणे समजल्यास आपल्या भक्तीची हानि होईल, अशी त्याला भीति वाटते असते. म्हणून अशा लोकांच्या विरुद्ध आम्हांस कांहीच म्हणावयाचें नाही; एवढें मात्र खरें की, त्यांची भक्ति अपक्व असल्यामुळेच अशा प्रकारची दुर्बलता त्यांच्यांत असते. भक्तीच्या प्रथमावस्थेंतच भगवंताला ऐश्वर्य-विवर्जित करून त्याचें चिंतन करणें भक्ताला शक्य नसते. परंतु भक्ति परिपक्व झाली, ईश्वरावरचें त्याचें प्रेम अत्यंत वाढलें, म्हणजे ऐश्वर्याचें चिंतन हा भक्तिलाभाच्या मार्गातील मोठा अडथळा आहे, असें त्यास दिसूं लागते व तो या ऐश्वर्याच्या कल्पनेला दूर ठेवण्याचा प्रयत्न करूं लागतो. भक्ति-शास्त्रांत ही गोष्ट वरचेवर सांगितली आहे. यशोदेला श्रीकृष्णाचें ईश्वरत्व वरचे-

वर पडून सुद्धा ती त्याला आपला मुलगाच समजून त्याचें लालनपालन करी. गोपींनाहि कृष्ण ईश्वर आहे असें पटूनहि त्या त्याच्याकडे सवगड्याच्याच दृष्टीने पाहात असत; इतर अवतारांविषयीहि असेच घडून आल्याचे दिसून येतें.

भगवंताची अलौकिक शक्ति—त्याचे ऐश्वर्य—प्रत्यक्ष पाहतां येईल, अशा प्रकारच्या एखाद्या दर्शनाचा लाभ करून देण्यासाठी श्रीरामकृष्णांच्याजवळ एखाद्याने आग्रह धरल्यास ते कित्येकदा त्यास म्हणत, "बाबा रे! अशा प्रकारच्या दर्शनाची इच्छा करणें चांगले नाही. ऐश्वर्यदर्शनाने मनांत भय उत्पन्न होतें आणि मग खायला घालणें, सजवणें, लाडाने 'मी तूं' करणें, असा प्रेमाचा—भक्तीचा—भाव राहात नाही!" हे ऐकून त्यांच्या भक्तांना कित्येकदा वाटावे की 'आम्हांला असे दर्शन करून देणें यांच्या मनांतच नाही, म्हणून आम्हांला कांही तरी करून गप्प बसवितात, झाले!' अशा वेळीं एखाद्याने जरा धिटाईने म्हणावें, "आपल्या कृपेने सर्व कांही होऊ शकतें! आपण कृपा करून अशा प्रकारचे दर्शन आम्हांला करवाच." त्यांनी यावर मोठ्या नम्रतेने म्हणावें, "मी करीन म्हटल्याने कांही होईल काय रे? आईची जशी इच्छा असेल तसेंच होत असते!" यावरहि गप्प न बसतां, जर एखाद्याने म्हटले की "आपण इच्छा केलीत, म्हणजे आईलाहि इच्छा होईल!" तर त्यांनी म्हणावे, "माझी तर फार इच्छा आहे रे, की तुम्हा सगळ्यांना सर्व पकारच्या अवस्था आणि सर्व प्रकारचीं दर्शनें प्राप्त व्हावीं म्हणून! पण तसं होतंय कुठे?" एवढ्यावरहि त्या भक्ताने आपला आग्रह सोडला नाही, तर त्यांनी हसून म्हणावें, 'काय सांगूं बाबा! आईची जशी इच्छा असेल तसेच होईल!" असें म्हणून सुद्धा त्याचा विश्वास मात्र ते कधीहि नष्ट करीत नसत. असा व्यवहार आम्हीं कित्येकदा प्रत्यक्ष पाहिला आहे व त्यांना वरचेवर म्हणतांनाहि ऐकले आहे की "कुणाचाहि भाव कधी नष्ट करूं नये!"

अखेरच्या दिवसांत श्रीरामकृष्ण गळ्याच्या रोगाने काशीपूर येथील बगीच्यांत आजारी असतां नरेंद्रनाथ (स्वामी विवेकानंद) वगैरे भक्तमंडळी,

त्यांनी सांगितलेल्या मार्गाने साधना करण्यांत निमग्न असत. साधनांच्या प्रभावाने दुसऱ्याच्या अंगीं नुसत्या स्पर्शाने धर्मभाव संचारित करण्याची थोडी फार क्षमता त्यावेळी नरेंद्रांच्या अंगीं उत्पन्न झाली होती व एका शिवरात्रीच्या दिवशीं रात्रीं ध्यानांत निमग्न असतां आपल्या अंगच्या शक्तीचा प्रयोग करून पाहण्याची त्यांना अनावर इच्छा झाली. जवळच काली ( स्वामी अभेदानंद ) बसले होते. त्यांना आपल्याला कांही वेळ स्पर्श करून बसण्यास नरेंद्रांनी सांगितलें व स्वतः ते गंभीर ध्यानांत निमग्न झाले. कालींनी त्यांच्या गुडघ्यास हात लावला होता व तो एकसारखा कापत होता. एक दोन मिनिटांनी ध्यान संपवून नरेंद्र म्हणाले, " बस्स, पुरे! तुला काय अनुभव आला सांग पाहू ? "

काली म्हणाले, " विजेची बॅटरी धरली असतां ज्याप्रमाणे आपल्या अंगांत कांही शिरत आहे असा भास होतो व सर्वांग कापतें, तसे झाले ! हात कापूं न देण्याचा प्रयत्न करूनहि तो व्यर्थ गेला ! "

यावर कोणी कांही बोलले नाही. द्वितीय प्रहराची पूजा झाल्यावर काली ध्यानस्थ बसले व त्यांत इतके तन्मय होऊन गेले की, त्यांचे तसे ध्यान कोणी कधीच पाहिलें नव्हतें ! शरीर वांकडेंतिकडे झाले, मानहि वाकडी झाली व त्यांचे बाह्य जगाचे भान कांही वेळ अगदीच नष्ट होऊन गेलें !

पहाटे शशी ( स्वामी रामकृष्णानंद ) नरेंद्रांकडे येऊन म्हणाले, "तुम्हांला ठाकूर* बोलावीत आहेत." निरोप ऐकतांच नरेंद्रनाथ उठले व माडीवरच्या श्रीरामकृष्णांच्या खोलींत जाऊन त्यांना प्रणाम करून उभे राहिले. त्यांना पाहतांक्षणीं श्रीरामकृष्ण म्हणाले, " कारे ? जराशी कुठे जमायला सुरुवात होते न होते, तोंच खर्च ? अगोदर आपल्या स्वतःच्या अंगीं नीट संचय होऊं दे; मग कुठे कसा खर्च करायचा, हें तुला समजेल,—आईच तुला समजावून देईल !

---

*भक्तमंडळी श्रीरामकृष्णांना "ठाकूर" किंवा "महाशय" असेंहि म्हणत.

त्याच्या अंगीं स्वतःचा भाव संचारित करून तूं त्याचें केवढें नुकसान केलें आहेस, पहा बरें? तो इतके दिवस एका भावाने चालला होता—तो त्याचा सारा भाव नष्ट होऊन गेला!—सहा महिन्यांचा गर्भपात व्हावा तसे झालें!! असो, झालें तें झालें. फिरून असें एकदम भलतेच कांही तरी करीत जाऊं नकोस. तें असो; बाकी पोराचे नशीब बरे दिसते."

नरेंद्रनाथ म्हणत "मी तर हें ऐकून चकितच होऊन गेलों! आम्ही खाली काय करीत होतों तें सारे ठाकूरांनी वर बसून जागले! या त्यांच्या कानउघाडणीने मी एखाद्या अपराध्यासारखा गप्प बसून राहिलों झालें!"

पुढे खरोखरीच असें दिसून आले की, कालींचा पूर्वीचा भाव तर नष्ट झालाच, पण नवीन अद्वैत भावाच्या धारणेस त्यांचे मन तेव्हा तयार नसल्यमुळे त्याहि भावाची त्यांना यथायोग्य धारणा होईना! यामुळे त्यांचें वर्तन एखाद्या नास्तिकासारखें होऊं लागलें! श्रीरामकृष्णानी त्यांना यापुढे अद्वैत भावाचाच उपदेश करण्यास सुरुवात केली व आपल्या नेहमीच्या गोड पद्धतीने ते त्यांना त्यांच्या चुका दाखवूं लागले. तरी सुद्धा श्रीरामकृष्णांनी शरीर सोडल्यानंतरहि कांही दिवसपर्यंत त्यांचे आचरण पूर्ववत् सुधारले नाही! असो.

सत्याचा लाभ करून घेण्यासाठी अवतार पुरुषांच्या जीवनांत जे प्रयत्न दिसून येतात त्यांना "सोंग" असे समजणाऱ्या भक्तमंडळीस आमचे* एवढेंच सांगणें आहे की श्रीरामकृष्णांच्या तोंडून अशा प्रकारचे मत आम्हीं कधींच ऐकलें नाही; उलट अनेकदां त्यांच्या तोंडून असे ऐकले आहे की, "नरदेह धारण केल्यावर सर्व कार्ये माणसासारखीच होतात. ईश्वराला माणसाप्रमाणेच सुखःदुखांचा भोग घ्यावा लागतो आणि माणसाप्रमाणेच उद्योग व प्रयत्न करून सर्व विषयांत पूर्णत्व मिळवावें लागतें." जगाचा आध्यात्मिक इतिहासहि हेंच

---

*आम्ही, आमचे इत्यादि शब्द 'श्रीरामकृष्णलीला-प्रसंग' नामक मूळ ग्रंथाचे कर्ते स्वामी शारदानंदजी ह्यांनी स्वतःस उद्देशून वापरले आहेत.

सांगतो व विचारानेहि असें स्पष्ट दिसतें की असें जर नसेल तर साधकावर दया करण्याच्या हेतूने नरदेह धारण करण्यांत ईश्वराचा तो हेतु मुळीच सिद्धीस जात नाही व नरदेह धारण करण्याच्या त्याच्या खटाटोपाची कांही सार्थकताहि होत नाही.

नरदेह धारण केल्यावर अवतारी पुरुषांनाहि माणसाप्रमाणेच दृष्टिहीनता, अल्पज्ञता वगैरेंचा थोडाफार तरी अनुभव कांही वेळपर्यंत घ्यावाच लागतो. माणसांप्रमाणेच या दोषांतून पार पडण्यासाठी त्यांनाहि प्रयत्न करावा लागतो व जोपर्यंत हा प्रयत्न पूर्ण होऊन त्याचें फल त्यांना मिळालेलें नसतें, तोंपर्यंत त्यांना स्वस्वरूपाची जाणीव ( मधून मधून होत असली तरी ) सदैव अखंडित असत नाही. त्यांना साधारण जीवाप्रमाणेच संसारांतील अंधकार व निराशामय मार्गांतूनच जावें लागते. इतकेंच की स्वार्थबुद्धीचा लवलेशहि त्यांच्यांत नसल्यामुळे त्यांना आपल्या मार्गांत इतरांपेक्षा अधिक प्रकाश दिसत असतो. म्हणून ते आपली सर्व शक्ति एकवटून स्वतःच्या जीवनाची समस्या लवकरच पुरी करून लोककल्याणाचें कार्य सुरू करतात.

मानवाच्या अंगीं असणारा अपुरेपणा श्रीरामकृष्णांच्यांतहि प्रथम होता, अशा दृष्टीने जर आपण त्यांच्या चरित्राचा विचार केला तरच त्यांच्या चरित्राच्या चिंतनाने आपल्याला फायदा होईल: आणि म्हणूनच त्यांचा ‘ मानवभाव ’ सर्वदा दृष्टीपुढे ठेऊनच त्यांच्या ‘ देवभावा’चा विचार करण्यास आम्ही वाचकांस विनंती करतों. ते आमच्यांपैकीच एकजण होते, अशा दृष्टीने जर त्यांच्याकडे पाहिलें नाही, तर साधनाकालचा त्यांचा विलक्षण उद्योग नि विलक्षण आचरण यांचा कांहीच अर्थ आपणांस समजणार नाही. आपल्याला असें वाटेल की, जे मूळचेच पूर्ण होते त्यांना सत्यलाभासाठी एवढा खटाटोप कशाला पाहिजे होता ? असें वाटेल की, त्यांचा हा प्रचंड खटाटोप म्हणजे सर्व बाह्यात्कारीच होता. इतकेंच नव्हे तर, ईश्वरप्राप्तीसाठी त्यांनी केलेली अलौकिक तपस्या, असाधारण त्याग आणि त्यांची जबरदस्त

निष्ठा पाहूनहि, आमच्या मनांत स्फूर्ति उत्पन्न होणार नाही व त्यांच्या चरित्रापासून आम्हांला कांही बोधहि प्राप्त होणार नाही.

श्रीरामकृष्णाच्या कृपालाभाने धन्य झालेल्या आम्हांला ते आमच्या सारखेच मानव होते, असेंच समजून चाललें पाहिजे, कारण ते आमच्या सारख्यांची सुखदुःखें जाणणारे होते, म्हणून तर आमचीं दु:खें नाहीशीं करण्याचे प्रयत्न त्यांनी केले ! त्यांना 'मानवभावापन्न' समजल्यावाचून आम्हांस गत्यंतरच नाही, आणि खरेंच पाहिलें तर जोंपर्यंत आम्ही सर्व बंधनांतून मुक्त होऊन परब्रह्मस्वरूपांत लीन झालों नाही, तोंपर्यंत जगत्कारण ईश्वर व त्याचे अवतार, यांना मानवभावापन्न अशाच दृष्टीने आम्हांला पाहिले पाहिजे. "देवो भूत्वा देवं यजेत्" ही म्हण अशा दृष्टीनेच खरोखर सत्य आहे. तुम्ही जर स्वतः समाधिबलाने निर्विकल्प भूमिप्रत पोहोचूं शकाल तरच तुम्ही ईश्वराचे यथार्थ स्वरूप समजून त्याची खरी खरी पूजा करूं शकाल.

देव होऊन देवाची यथार्थ पूजा करण्यास समर्थ, असे पुरुष फार विरळा. आमच्यासारखे दुर्बल अधिकारी या स्थितीपासून फार दूर. म्हणूनच आमच्या सारख्या साधारण लोकांवर कृपा करून त्यांच्या हृदयाची पूजा ग्रहण करण्यासाठीच ईश्वराचे नरदेह-धारण ! प्राचीन कालीं होऊन गेलेल्या अवतारी पुरुषांशीं तुलना केली तर श्रीरामकृष्णांच्या साधनाकालचा इतिहास समजण्यास आम्हांस अधिक अनेक साधनें आहेत असें आढळून येईल. एक तर आपल्या साधनाकालच्या कित्येक गोष्टी श्रीरामकृष्णांनी स्वतः आपल्या शिष्यांस सविस्तर सांगितल्या आहेत, दुसरें, आम्ही त्यांच्या चरणकमलांचा आश्रय घेण्याचे थोडे अगोदर त्यांचें साधनाकालचें चरित्र ज्यांनी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर दक्षिणेश्वरी घडलेले पाहिलें होतें, त्यांतील बहुतेक व्यक्ति तेव्हांहि तेथे होत्या व त्यांच्याच तोंडून आम्हांला कांही हकीकत कळली. असो; श्रीरामकृष्णांच्या साधनाकालीन अलौकिक इतिहासाकडे वळण्यापूर्वी साधनातत्वाच्या मूळ सूत्रांचा थोडक्यांत विचार करूं.

# १०. साधक व साधना

" स्थूलभावाने, समाधि दोन प्रकारची आहे. ज्ञानमार्गाने विचार करतां करतां 'अहं' काराचा नाश झाल्यावर जी समाधि, तिला 'स्थिर' अथवा 'जड' अथवा 'निर्विकल्प' समाधि असें म्हणतात. भक्तिमार्गाच्या समाधीला 'भावसमाधि' म्हणतात. या प्रकारच्या समाधींत संभोगासाठी, आस्वादनासाठी, थोडासा 'अहं' भाव शिल्लक असतो."

" शुद्ध ज्ञान व शुद्ध भक्ति एकच."

—श्रीरामकृष्ण

---

श्रीरामकृष्णांच्या जीवनांतील साधकभावाची हकीकत सांगण्यापूर्वी प्रथम साधना कशाला म्हणतात, हें पाहावयाचें आहे. कदाचित् कोणी असें म्हणतात की भारतामधें तर प्राचीनकाळापासून साधना-तपस्या चालूच आहेत. मग येथे आणखी त्यांचा काथ्याकूट कशाला? इतर कोणत्या देशांत भारताप्रमाणे साधना-तपस्या वगैरे दिसून येतात? कोणत्या देशांत या देशाइतके ब्रह्मज्ञानी थोर थोर महात्मे झाले आहेत? साधना म्हणजे काय, याची थोडीफार कल्पना या देशांत तरी सर्वांनाच आहे. म्हणून साधनेसंबंधी पुन्हा येथें विचार करण्याचें कारण नाही.

हें म्हणणें अनेकांशीं खरें असलें तरी साधना म्हणजे काय याचा येथे विचार केलाच पाहिजे. कारण या विषयासबंधाने लोकांत कांही विचित्र व भलत्याच कल्पना प्रचलित असल्याचें दिसून येते. आपलें ध्येय काय इकडे लक्ष न देतां शरीरास पीडा देणें, दुष्प्राप्य वस्तूंच्या मागें लागणें, कांही विशिष्ट स्थानींच

विशिष्ट क्रियांचें अनुष्ठान करणें, श्वासोच्छ्वासाकडेच लक्ष देणें—वगैरे क्रियांनाहि कित्येकदा लोक साधना असें म्हणतात. असेहि दिसून येतें की, आपल्या मनांतील कुसंस्कार घालवून त्याला योग्य वळण लावण्यासाठी व त्याला योग्य मार्गावर अग्रेसर करण्यासाठी मोठमोठ्या महापुरुषांनी ज्या क्रियाचें अनुष्ठान केलें, त्याच क्रिया म्हणजे साधना, इतर कोणत्याहि क्रिया साधना नव्हत, असाहि चुकीचा समज लोकांमधे दिसून येतो. विवेक-वैराग्यवान् होण्याची खटपट न करतां, संसारांतील भोगसुखाची लालसा सोडण्याचा प्रयत्न न करतां कांही विशिष्ट क्रिया करून अथवा कांही विशिष्ट अक्षरें घोकून ईश्वराला एखाद्या मंत्रमुग्ध सर्पाप्रमाणे वश करून घेतां येतें, अशा भ्रामक कल्पनेने कित्येकजण त्या त्या क्रिया करीत व ती ती अक्षरें घोकीत व्यर्थ कालक्षेप करीत असल्याचें दिसून येते. म्हणून पूर्वकालीन थोर थोर ऋषींनी गहन विचार करून साधनेसंबंधीचीं जी तत्वे शोधून काढलीं आहेत तीं येथे थोडक्यांत सांगितलीं म्हणजे या विषयाची बरीचशी यथार्थ कल्पना वाचकांस येईल.

श्रीरामकृष्ण म्हणत असत–" सर्वाभूती ब्रह्मदर्शन अथवा ईश्वरदर्शन ही अत्यंत उच्च व शेवटची अवस्था आहे. " तें साधनांचें अखेरचें फल आहे, असें उपनिषदें सांगतात. तीं म्हणतात–" या सृष्टीमधे स्थूल-सूक्ष्म, चेतन-अचेतन वगैरे जें कांही तुमच्या नजरेस येतें, तें सर्व एक—ब्रह्म आहे. या एका अद्वितीय ब्रह्मवस्तूलाच तुम्ही निरनिराळी नांवें देतां व निरनिराळ्या दृष्टींनी पाहतां. जन्मापासून मरेपर्यंत, सर्वकाळ तुमचा त्याच्याशींच संबंध येतो, परंतु तो न ओळखल्यामुळे तुम्हांस असें वाटतें की, आम्ही भिन्नभिन्न वस्तु व व्यक्तीशींच संबंध ठेवीत आहोंत. "

वर सांगितलेला सिद्धान्त ऐकून मनामधे काय संदेह उत्पन्न होतात व शास्त्रें त्यावर काय उत्तर देतात, हें येथे थोडक्यांत प्रश्नोत्तर रूपानें सांगितलें आहे.

**प्रश्न**:—ही गोष्ट आमच्या प्रत्यक्ष अनुभवास कां येत नाही?

**उत्तर**:—भ्रमामुळे. जोंपर्यंत हा भ्रम दूर झाला नाही तोंपर्यंत हा भ्रम आहे हे कळणार कसें ! यथार्थ वस्तु व अवस्था यांच्याशीं तुलना करूनच आपण बाहेरील व आंतील भ्रम ठरवीत असतों.

**प्र**:—ठीक. पण असा भ्रम होण्याचें कारण काय ? व आम्हांस असा भ्रम केव्हापासून झाला ?

**उ**:—भ्रम होण्याचे कारण म्हणजे सर्वत्र जें दिसून येतें तेच अज्ञान. हे अज्ञानच केव्हांपासून उत्पन्न झालें हें कसें समजावें ? अज्ञानमधेच जोंपर्यंत आपण पडलेले आहोत, तोपर्यंत हे जाणण्याचे प्रयत्न व्यर्थ आहेत. जोंपर्यंत स्वप्न पडत असतें तोपर्यंत तें खरेंच आहे अशीच भावना असते; निद्राभंग झाल्यानंतर जागृतावस्थेशीं त्याची तुलना करून ते खोटें आहे असें आपण ठरवितो. तुम्ही कदाचित असे म्हणाल की, स्वप्न पडत असतानाच कित्येकदा, "मी स्वप्न पाहात आहे" अशीहि जाणीव असते. पण या ठिकाणीहि जागृतावस्थेशी तुलना केल्यामुळेच अशी जाणीव उत्पन्न होत असते. जागृतावस्थेत जगाशीं संबंध असताना सुद्धा कोणा कोणाला अशाच रीतीनें अद्वयब्रह्मवस्तूची स्मृति होत असलेली दिसून येते.

**प्र**:—मग हा भ्रम नाहीसा करण्याला उपाय ?

**उ**:—उपाय म्हणजे एकच—हे अज्ञान, दूर केले पाहिजे. हे अज्ञान, हा भ्रम दूर करतां येतो, हें निःसंशय आहे. पूर्वकालीन ऋषींनी हा भ्रम दूर केला होता व तो कसा दूर करावा हेंहि त्यांनी सांगून ठेवले आहे.

**प्र**:—ठीक. पण हा उपाय समजून घेण्यापूर्वी आणखी एक दोन प्रश्न करावेसे वाटतात. सारे जग जे प्रत्यक्ष पाहात आहे त्याला तुम्ही भ्रम म्हणतां व मुष्टिमेय ऋषींनी जगाला जसे पाहिले, तें सत्य असें म्हणतां हें कसे ? का ऋषींनाच भ्रम झाला होता ?

**उ**:—पुष्कळ लोक विश्वास ठेवतात म्हणूनच एखादी गोष्ट खरी असें म्हणतां यावयाचें नाही. ऋषींचेच अनुभव सत्य असें म्हणावयाचें कारण, त्या

अनुभवामुळेच ते सर्व प्रकारच्या दुःखांतून मुक्त झाले, सर्वतोपरी भयशून्य झाले व चिरशांतीचे अधिकारी झाले. क्षणभंगुर मानवजीवनाचा उद्देश त्यांनी बरोबर ओळखला. याशिवाय, यथार्थ ज्ञानाने मनुष्याच्या मनांत नेहमी सहिष्णुता, संतोष, करुणा, नम्रता वगैरे गुणाचा विकास होऊन त्याचें हृदय अत्यंत उदार होतें. ऋषींच्या जीवनांत अशा प्रकारच्या गुणाचा विकास दिसून येतो व जे कोणी त्यांनी दाखविलेल्या मार्गाने जातात त्यांच्याहि अंगीं हे गुण उतरतात, असे अजूनसुद्धा आपण प्रत्यक्ष पाहूं शकतो.

प्रः—बरें, पण आपल्याला सर्वांनाच, एकाच प्रकारचा भ्रम कसा झाला ? ज्याला मी पशु म्हणतो, त्याला तुम्हीहि पशूच म्हणतां, ज्याला आम्ही माणूस म्हणतों, त्याला तुम्हीहि माणूसच म्हणतां. असेच सर्व बाबतींत ! सर्वांना एकाच वेळी, सर्व प्रकारच्या विषयांसबंधाने, एकाच प्रकारचा भ्रम व्हावा हे केवढे आश्चर्य आहे ! कांहीची एखाद्या विषयाबद्दल चुकीची धारणा झालेली असली तर कांहींची तरी खरी असते असें सर्वत्र दिसून येतें. पण इथे पाहावे तों सर्वच प्रकार निराळा ! म्हणून तुमचें म्हणणे पटत नाही.

उ.—याचे कारण असे आहे की, तुम्ही या सर्वांमधून ऋषींना वेगळें काढतां ! सर्वांमधे ऋषींचीहि गणना करीत नाही, म्हणून येथे सर्वच प्रकार निराळा आहे असें तुम्हांस वाटते. नाही तर, तुमच्या प्रश्नांतच या शंकेचें तुम्हींच उत्तर देऊन टाकलें आहे. आता, सर्वांना एकाच प्रकारचा भ्रम कसा झाला हा जो तुमचा प्रश्न आहे, त्यावर शास्त्रें असे उत्तर देतात की–" एकाच 'असीम, अनंत अशा समष्टिमनांत जगत-रूप कल्पनेचा उदय झाला आहे. तुमचें आमचें, सर्वांचे व्यष्टि मन, त्या विराट मनाचा अंश नि अंगीभूत असल्यामुळे आपणा सर्वांस या एकाच प्रकारच्या कल्पनेचा अनुभव येतो. म्हणूनच आपण सर्वजण पशूंना पशू, माणसांना माणूस म्हणतों आणि म्हणूनच आपणांपैकी एखादा यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेऊन सर्व प्रकारच्या भ्रमांतून मुक्त होऊन गेला तरी आपण इतर बाकीचे सर्वजण पूर्वी जसें भ्रमांत पडलेले होतों, तसेंच असतों.

आणखी एक गोष्ट; विराट पुरुषाच्या विराट मनामधे जगत्कल्पनेचा जरी उदय झाला तरी तो आपल्याप्रमाणे अज्ञानबंधनांत पडत नाही. कारण तो सर्वदर्शी असल्यामुळे अज्ञानप्रसूत जगत्कल्पनेच्या आंत, बाहेर सर्वत्र, अद्वय, ब्रह्मवस्तूच ओतप्रोत भरलेली तो सर्वदा पाहात असतो. आम्ही तसें करीत नाही, म्हणून आम्हांला भ्रम होतो. श्रीरामकृष्ण म्हणत असत-" सापाच्या तोंडांत विष असतें, साप त्याच तोंडाने खातो, पण त्याला त्यायोगें कांहीएक होत नाही ! पण ज्याला तो चावतो त्याचा त्या विषाने तत्काळ प्राण जातो. "

अतएव शास्त्रदृष्टया दिसून आलें की विराट मनांतील कल्पनासंभूत जग एक प्रकारें आमच्याहि मनाद्वारा कल्पित होय, कारण आमचे क्षुद्र व्यष्टि मन समष्टिभूत विश्व मनाशीं शरीर व त्याच्या अवयवाप्रमाणे अविच्छेद्य संबंधाने नित्य संबद्ध. शिवाय ही जगत्कल्पना विराट मनांत एकेकाळीं नव्हती व मागून उत्पन्न झाली असेंहि म्हणतां येत नाही. कारण नाम-रूप, देश-काल ह्या जोडया—ज्यांच्या अभावीं कसल्याच तऱ्हेची सृष्टि होणें असंभवनीय—म्हणजे तर जगद्रूपकल्पनेतील मध्यवर्ती गोष्टी. अथवा ह्या कल्पनेसहित त्या अविच्छेद्य भावाने नित्य विद्यमान असतात. थोडयाशा विचारांतीं ही गोष्ट स्पष्ट दिसेल व वेदादि शास्त्रांत जगत्कर्त्री मूल प्रकृति अथवा माया हिला अनादि व कालातीत कां म्हटलें आहे, याचा उलगडा होईल. जग जर मनःकल्पित आहे, व त्या कल्पनेचा आरंभ जर आपण ज्याला ' काल ' असे म्हणतों त्याच्या कक्षेंत येत नाही, तर हें स्पष्टच झालें की कालाची कल्पना व जगाची कल्पना, या दोन्ही विराट मनांत बरोबरच उत्पन्न झाल्या. आमचें क्षुद्र व्यष्टि मन पुष्कळ वेळेपासून जगाच्या अस्तित्वावरच दृढ धारणा ठेऊन बसलें. व जगत्कल्पनेच्या पलीकडील अद्वय ब्रह्मवस्तूचें साक्षात् दर्शन गमावून बसलें. जग ही एक केवळ मनःकल्पित वस्तु आहे ही गोष्ट पूर्णपणें विसरून जाऊन त्याला आपला भ्रमहि समजेनासा झाला आहे. कारण वर सांगितलेंच आहे की यथार्थ वस्तु व अवस्था यांच्याशीं तुलना करूनच आपण आंतील व बाहेरील भ्रम समजूं शकत असतों.

यावरून असें दिसून येईल की, जगासंबंधीच्या आमच्या धारणा व अनुभव, हें आमच्या बहुकाल संचित अभ्यासाचें फल आहे व त्या संबंधीचें यथार्थ ज्ञान जर प्राप्त करून घेणें असेल तर आम्हांला नाम-रूप, देश-काल, मन-बुद्धि वगैरे जगदंतर्गत विषयांच्या अतीत असलेल्या वस्तूची ओळख करून घेतली पाहिजे. ही ओळख करून घेण्याच्या प्रयत्नासच वेदप्रमुख शास्त्रांत "साधना" म्हटलें आहे व जो कोणी समजून अगर न समजून या प्रकारचा प्रयत्न करीत असतो त्याला "साधक" असें म्हटले आहे.

साधारणपणे असे दिसून येतें की, देशकालातीत जगत्कारणाचे ज्ञान करून घेण्याचा हा प्रयत्न दोन प्रकारचा आहे. पहिला—शास्त्रांत ज्याला "नेति नेति" अथवा "ज्ञानमार्ग" म्हटलें आहे तो, व दुसरा—ज्याला "इति इति" अथवा "भक्तिमार्ग" म्हटले आहे तो. ज्ञानमार्गाचा साधक आपले अंतिम ध्येय, प्रथमपासूनच सर्वकाळ मनांत समजून ठेऊन आपलें प्रयत्न चालू ठेवतो. भक्तिमार्गाच्या साधकाला, आपण अंती कोठे जाऊन पोहोचूं, याचे पुष्कळदा ज्ञान नसतें; परंतु तो त्या मार्गात असतां त्याला उत्तरोत्तर उच्च अवस्था प्राप्त होत जाऊन शेवटी तो जगदतीत अद्वैत वस्तूचा साक्षात्कार करून घेतोच. कांही झाले तरी जगासंबंधीची साधारण लोकाची जी धारणा असते ती या दोन्ही प्रकारच्या साधकांना सोडून द्यावी लागत असतेच. ज्ञानमार्गाचा साधक प्रथमपासूनच ती टाकून देण्याचा प्रयत्न करीत असतो व भक्तिमार्गातील साधक ती अर्धी सोडून अर्धी राखून साधना सुरू करतो; शेवटी मात्र त्याची ती धारणा पूर्णपणे सुटून जाते व तो "एकमेवाद्वितीय" अशा ब्रह्मवस्तूचा साक्षात्कार करून घेतो. जगासंबंधीची स्वार्थपर, भोगसुखैकलक्ष्य अशा प्रकारची धारणा सोडून देणें यालाच शास्त्रांत "वैराग्य" असें म्हटलें आहे.

मानवजीवन क्षणभंगुर आहे हें ज्ञान मनुष्याला तेव्हांच होतें. यामुळेच जगासंबंधीची साधारण धारणा सोडून "नेति नेति" मार्गाने जगत्कारणाचा शोध करण्याची कल्पना प्राचीन काळीं मनुष्याच्या मनांत उत्पन्न झाली असावी,

असें वाटतें. म्हणूच, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग हे दोन्ही सारखेच सुरू असतां, भक्तिमार्गाची पूर्णता होण्याचे अगोदर उपनिषदांमधे या " नेति नेति " अथवा ज्ञानमार्गाची पूर्णता झालेली दिसून येते.

नेति नेति मार्गाने चालूं लागल्यावर थोडक्याच वेळांत मनुष्य अंतर्दृष्टि-संपन्न झाला, ही गोष्ट उपनिषदांवरून दिसून येते. मनुष्याने हें जाणलें की, इतर कोणत्याहि बाह्य वस्तूपेक्षा देह व मन यांनीच, जगाशीं आपला अधिक संबंध येतो; म्हणून इतर सर्व बाह्य वस्तूंच्या साहाय्यापेक्षा देह व मन यांच्याच साहाय्याने आपल्याला जगत्कारण ब्रह्मवस्तूचा शोध अधिक लौकर लागेल. " शितावरून भाताची परीक्षा " या न्यायाने स्वतःमधे जगत्कारणाचा शोध लागला, म्हणजे सहजच बाह्य वस्तूमधेहि त्याचा शोध लावणें सोपे जाईल. म्हणून, " मी म्हणजे काय, " हा प्रश्न सोडविण्याकडे ज्ञानमार्गातील साधकांचे सर्व लक्ष वेधतें.

नुकतेंच सांगितले आहे की, ज्ञान व भक्ति या दोन्ही मार्गातील साधकांना जगासंबंधीची साधारण धारणा टाकून द्यावी लागते. ह्या धारणेच्या निःशेष त्यागानेच मानवमन सर्ववृत्तिरहित होऊन समाधीचे अधिकारी होते. अशा प्रकारच्या समाधीलाच शास्त्रांत " निर्विकल्प समाधि " हें नांव दिलेलें आहे. निर्विकल्प समाधीसबंधी अधिक विवेचन पुढे केव्हां तरी करण्याचें ठेऊन, येथे " सविकल्प समाधि " संबंधी थोडक्यांत कांही माहिती देऊं.

भक्तिमार्गाला दुसरें नांव " इति इति " मार्ग, असें वर सांगितलेंच आहे. कारण या मार्गातील साधकाने जगताचें क्षणभंगुरत्व जरी जाणलेलें असलें तरी जगत्कर्त्या ईश्वरावर त्याचा विश्वास असतो व त्याने निर्मिलेलें हें जग सत्य आहे असे त्यास वाटत असते. जगांतील सर्व वस्तु व व्यक्ति यांचा ईश्वराशीं असा संबंध पाहून, भक्ताला त्या सर्व आपल्या आहेत असें वाटतें. ह्या सबंधाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या मार्गात जे जे म्हणून अडथळे आहेत असें त्यास वाटतें, ते सर्व तो नाहीसे करण्याचा प्रयत्न करतो. याशिवाय

ईश्वराच्या कोणत्या तरी एका रूपावर प्रेम करणें व त्या रूपाचेंच ध्यान करण्यांत तन्मय होणें व ईश्वरार्पण बुद्धीने सर्व कर्म करणे इकडेच त्याचे लक्ष वेधतें.

ईश्वराचे ध्यान करतांना, प्रथम प्रथम, त्याची सर्वच मूर्ति, भक्त आपल्या मानसचक्षूंसमोर आणूं शकत नाही. कधी त्याचा हात, कधी पाय, कधी मुख असे एक एक तुकडे अवयवच त्याच्या चक्षूंसमोर येतात आणि हे सुद्धा दिसल्याबरोबर नाहीसे होतात, फार वेळपर्यंत स्थिर राहात नाहीत. अभ्यासाने ध्यान अधिकाधिक जमूं लागले म्हणजे हळू हळू ती सर्वांगसपूर्ण मूर्ति त्याच्या मानसचक्षूंसमोर स्थिर राहूं लागते. ध्यान जसजसे अधिकाधिक तन्मयतेने होऊ लागते, तसतसा त्या मूर्तीत त्याला जिवतपणा दिसूं लागतो. ती हासत आहे, बोलत आहे असे दिसूं लागून अखेरीस तो तिला स्पर्शहि करूं शकतो, तेव्हां मात्र ती मूर्ति जिवत आहे, याविषयी त्याला मुळीच शंका उरत नाही व डोळे मिटून अथवा उघडून कशाहि स्थितींत, त्या मूर्तीचे स्मरण करतांच, तो तिला पाहूं शकतो. पुढे " माझी इष्टदेवता वाटेल ती रूपे घेऊं शकते " या विश्वासाच्या बळावर त्याला आपल्या इष्टमूर्तीत नानाप्रकारच्या दिव्य रूपांचें दर्शन होतें. श्रीरामकृष्ण म्हणत असत–" जो कोणी एकाच रूपाचे अशा जिवंत भावाने दर्शन घेतो, त्याला इतर सर्व प्रकारच्या रूपांचें दर्शन सहज होऊं शकतें. "

अशा रीतीने जिवंत मूर्तीच्या दर्शनाचा लाभ ज्यांना झालेला असतो त्यांना जागृतावस्थेंत दिसणाऱ्या पदार्थाप्रमाणेच ध्यानकालीं दिसण्याऱ्या मूर्तीहि तितक्याच सत्य आहेत, असा प्रत्यक्ष अनुभव येतो. पुढें बाह्य जगत् व भावराज्यांतील अवस्था या दोहोंचेहि अस्तित्व सारखेंच सत्य आहे, हा बोध जसजसा अधिकाधिक दृढ होत जातो, तसतशी, हें बाह्य जगत् म्हणजे केवळ मनःकल्पित गोष्ट आहे, अशी त्याची धारणा होऊं लागते. शिवाय, अत्यंत गभीरध्यानकालीं भावराज्यांतील अनुभव भक्ताच्या मनांत इतका प्रबल होतो की, त्यावेळी त्याला बाह्यजगताचा लेशमात्रहि अनुभव येत नाही. अशा प्रकारच्या अवस्थेलाच शास्त्रांत " सविकल्प समाधि " असे नांव आहे. अशा प्रकारच्या समाधींत बाह्य

गताचा पूर्णपणे लोप झाला तरी, भावराज्याचा पूर्ण लोप होत नाही. जगांतील वस्तु व व्यक्ति यांच्याशीं संबंध आल्याने, आपणांस सुखदुःखांचा जसा नुभव येतो अगदी तसाच अनुभव, आपल्या इष्टमूर्तीसंबंधाने भक्ताला येतो. याच्या मनांत त्या अवस्थेंत उत्पन्न होणारे सर्व संकल्प–विकल्प, हेहि त्याच्या ष्टमूर्तीच्याच संबंधाचे असतात. भक्ताच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या साऱ्या वृत्ती, या अवस्थेत एकाच विषयाच्या अवलंबनाने उत्पन्न होतात, या कारणाने शास्त्रांत या अवस्थेला “ सविकल्प समाधि ” अथवा “ विकल्पसंयुक्त ” समाधि असे म्हटले आहे.

या प्रकारें भावराज्यांतर्गत विषयांचेंच एकसारखे चिंतन करीत राहिल्याने भक्ताच्या मनांतून स्थूल ( बाह्य ) जगाचा सहजच लोप होतो. ज्या भक्त-साधकाने इतकी मजल मारली, त्याला येथून निर्विकल्पसमाधि कांही फारशी दूर नसते. जगाचें कित्येक जन्मांपासून अभ्यासिलेलें अस्तित्वज्ञान जो इतकें पूर्ण नष्ट करूं शकतो, त्याचें मन अत्यंत शक्तिसंपन्न झालेलें असते, हे निराळे सांगावयास नको. मन पूर्णपणे निर्विकल्प करितां आले तर, ईश्वराशी आपला अत्यंत निकट संबंध येईल, ही गोष्ट एकदा त्याच्या पक्की लक्षांत आली, म्हणजे त्या दृष्टीने तो आपली सर्व शक्ति एकवटून प्रयत्न करूं लागतो, आणि श्रीगुरु व ईश्वर यांच्या कृपेने, भावराज्याच्या अत्युच्च भूमीवर आरोहण करून, अद्वैतज्ञानाचा साक्षात् अनुभव घेऊन चिरशांतीचा अधिकारी होतो अथवा असेंहि म्हणतां येईल की, इष्टदेवतेवरचें अत्युत्कट प्रेमच त्याला हा मार्ग दाखवितें व त्याच्या प्रेरणेनेच तो आपल्या इष्टदेवतेशी एकत्वाचा अनुभव घेतो.

ज्ञान व भक्ति या दोन मार्गांतील साधकांचा, आपल्या अंतिम ध्येयास पोहोचण्याचा क्रम अशा प्रकारचा आहे. परंतु अवतारिक महापुरुषांच्या अंगीं देव व मानव या दोन्ही भावांचें सम्मीलन आजीवन विद्यमान असल्यामुळे, साधनाकालींहि कधी कधी, त्यांच्यांत सिद्धांची शक्ति व पूर्णता दिसून येते. देव व मानव या दोन्ही भूमींवर विहार करण्याची शक्ति त्यांच्यांत स्वभावतःच

स्वभावतःच असल्यामुळे अथवा आंतील देवभाव हीच त्यांची स्वाभाविक अवस्था असल्यामुळे, बाहेरील मानवभावाचें आवरण ते मधून मधून दूर करून प्रकाशित होतात. या रीतीने या विषयीची कशीहि मीमांसा करण्याचा प्रयत्न केला, तरी अवतारिक महापुरुषांचें जीवनचरित्र यथार्थ रीतीनें समजण्यास मानवाची बुद्धि असमर्थ होऊन हात टेकते, हें खास. त्यांच्या जीवनाच्या गूढ रहस्याचा पूर्ण उलगडा मानवी बुद्धीला कधी तरी करतां येणें शक्य आहे की नाही, याची शंकाच वाटते. तरी पण एवढे खास की, श्रद्धायुक्त अंतःकरणाने त्यांच्या चरित्राचा विचार केला, तर मनुष्याचें कल्याणच होईल. प्राचीन काळीं अशा महापुरुषांच्या जीवनांतील मानवभाव बाजूला ठेवून, त्यांच्या देवभावाचाच विचार करण्यांत आला; संदेहशील अशा सांप्रतच्या काळीं, त्यांच्या देवभावाची सर्वस्वी उपेक्षा करून, त्यांच्या मानवभावाचाच विचार करण्यांत येतो. प्रस्तुत प्रसंगीं आम्ही अशा महापुरुषांच्या जीवनांत, देव व मानव हे दोन्ही भाव एकाच काळीं विद्यमान असल्याचे दिसून येतें हीच गोष्ट स्पष्टपणे दाखविण्याचा प्रयत्न करूं. देवमानव श्रीरामकृष्णांच्या पुण्यदर्शनाचा लाभ जर आम्हांला घडला नसतां, तर अशा महापुरुषाचे चरित्र उपरोक्त दृष्टीने आम्ही कधीच पाहूं शकलों नसतों, ही गोष्ट निर्विवाद आहे.

---

# ११. साधकभावाचा आरंभ

" भातभाकरी मिळविण्याची विद्या मला नको. मला अशी विद्या पाहिजे की जिने हृदयांत ज्ञानाचा उदय होऊन मनुष्य कृतार्थ होतो. "

—रामकुमारांस श्रीरामकृष्णांचें उत्तर

---

श्रीरामकृष्णांच्या भावतन्मयतेसंबंधी मागे सांगितलेल्या गोष्टींशिवाय, त्यांच्या लहानपणच्या इतरहि अनेक प्रकारच्या गोष्टी ऐकूं येतात. अनेक लहान लहान गोष्टींवरून त्यांच्या तेव्हांच्या मनोवृत्तीचा सहज परिचय होतो. जसें:-

गावांतील कुंभार शिव, दुर्गा, वगैरे देवदेवींच्या प्रतिमा तयार करीत असतां, आपल्या बालमित्रांसह हिंडत हिंडत एक दिवस गदाधर सहज तेथे आला व त्या प्रतिमांचे निरीक्षण करतां करतां एकदम म्हणाला, " हें काय केले आहे ? देवांचे डोळे असे असतात का ? ते असे असायला पाहिजेत, हे बघ-" असें म्हणून, भुवया कशा असल्या, डोळ्यांचा आकार कसा असला, दृष्टि कशी असली म्हणजे, डोळ्यांत अमानुष शक्ति, करुणा, अंतर्मुखीनता, आनंद इत्यादि गुण एकत्र दिसून, मूर्ति जिवंत असल्याचा भास होतो, याविषयी त्या कुंभाराला गदाधराने प्रत्यक्ष माहिती दिली ! त्याची ती माहिती ऐकून तो कुंभार व इतर लोक चकित होऊन गेले.

अथवा—आपल्या बाळमित्रांसह खेळत असतां, मधेच एखाद्या देवतेची पूजा करण्याचें मनांत येऊन, गदाधराने लगेच मातीची अशी सुंदर मूर्ति तयार करावी की ही कोणातरी कुशल कारागिरानेच केली आहे, असें लोकांस वाटावें !

अथवा—कांही कल्पना नसतां, अथवा कांही संबंधहि नसतां, एखाद्याला त्याने असें एखादें वाक्य बोलावें की तें ऐकून त्याच्या मनांतील कित्येक दिवसांच्या एखाद्या प्रश्नाचा उलगडा व्हावा व त्याचा सर्व संशय नाहीसा व्हावा!

श्रीरामकृष्णांच्या बालपणच्या अशा ज्या अनेक गोष्टी ऐकण्यांत येतात, त्या सर्वच म्हणजे त्यांच्या उच्च भावभूमीवर आरोहण करण्याच्या सामर्थ्याचीच साक्ष देतात असें नाही, त्यांतील कांही तशा असल्या तरी, बाकीच्या साधारणपणे खालील प्रकारच्या दिसतात. कांही त्यांची अद्भुत स्मरणशक्ति दाखविणाऱ्या; कांही त्यांची प्रबल विचारशक्ति दाखविणाऱ्या; काही त्यांचा दृढनिश्चय दाखविणाऱ्या कांही विलक्षण साहस दाखविणाऱ्या; कांही त्यांची रंगरसप्रियता दाखविणाऱ्या; व कांही त्यांचें अपार प्रेम दाखविणाऱ्या. परंतु या सर्वांच्या बुडाशीं, त्यांचा असाधारण विश्वास, पवित्रता व निःस्वार्थता ओतप्रोत भरलेलीं असल्याचें दिसून येते. असें वाटतें की त्यांचें मन वास्तविक विश्वास, पावित्र्य, स्वार्थहीनता-रूप उपादानाचेंच घडलेले असून, संसारांतील आघाताने त्यांत स्मरणक्ति, निश्चय, साहस, विनोद, प्रेम, करुणा इत्यादि लाटा मधे मधे उठत असाव्या!

यासंबंधी कांही गोष्टी येथे दिल्या म्हणजे वाचकांना वरील गोष्टीचा सहज समज पडेल.

राम, कृष्ण इत्यादिकांच्या चरित्रांवरचीं नाटकें पाहून, गदाधराने घरीं आल्यावर त्यांची पुनरावृत्ति करावी व आपल्या बाळगोपाळ मंडळींना घेऊन माणिकराजांची आमराई गांठावी. तेथे त्याने मुलांना निरनिराळ्या पात्रांचीं कामें शिकवावीं व आपण स्वतः मुख्य नायकाचें काम करावें; व अशा रीतीने पाहिलेले नाटक बहुतांशीं जसेंच्या तसें वठवावे.

"मुंजीच्या वेळी प्रथम भिक्षा तुझ्या हातून घेईन" असें आपल्यावर अत्यंत प्रेम करणाऱ्या लोहार जातीच्या धनी नामक स्त्रीला, गदाधराने लहान असतांच वचन दिलें होतें व मुंजीच्या वेळीं घरच्या मंडळींना तसेंच सामाजिक चालीरीतींना बाजूला ठेवून, कोणाचेंहि न ऐकतां तें वचन त्याने अक्षरशः पाळलें!

" गदाधर कधी काळीं माझ्या हातचें खाऊन मला धन्य करील काय ?" असें त्या प्रेमळ स्त्रीला वाटावें; पण आपली जात हलकी, तेव्हां आपली इच्छा कसची पूर्ण होत ? असें वाटून तिनें मनांतल्या मनांत नेहमी दुःखित व्हावें. गदाधराला ही गोष्ट कशावरूनशी कळतांच, कसलीहि भीति न बाळगतां, त्यानें तिच्या हातचें खाऊन त्या सरळ व प्रेमळ स्त्रीला आनंदित केलें !

अंगाला भस्म लावलेला, जटा वाढविलेला, हातांत एक भला लांबच्या लांब चिमटा घेतलेला गोसावी पाहून, मुलांना साधारणपणे भीति वाटते. पण गदाधराला भीति हा पदार्थ ठाऊक नसे. गावाबाहेर धर्मशाळेंत उतरलेल्या अशा गोसाव्यांत त्यानें खुशाल मिसळावें, त्यांच्याशीं गप्पागोष्टी कराव्या, त्यांच्या हातचें खावें, त्यांची रहाणी नीट न्याहाळून पाहावी; एखादे वेळीं त्या गोसाव्यांनी त्याला टिळे वगैरे लावून सजविलें असतां, त्याला उलट गंमत वाटावी व आपल्या घरीं जाऊन, घरच्या माणसांना तो वेष त्यानें मोठ्या हौसेनें दाखवावा !

गावांतील हलक्या जातीच्या लोकांना लिहितां वाचतां येत नसे, म्हणून ते लोक रामायण महाभारत वगैरे ग्रंथावर पुराण सांगण्यासाठीं, एखाद्या पुराणिकास मोठ्या सन्मानानें बोलावीत. त्याची त्यांनी केवढी बरदास्त ठेवावी ! त्याला पाय धुण्यास पाणी, त्याला हातपाय पुसण्यास रुमाल, त्याला तमाखु ओढण्यास एक नवा कोरा हुक्का, त्याला बसण्यासाठीं एखादें शृंगारलेलें व्यासपीठ, वगैरे सर्व सरंजाम त्यांनी मोठ्या भक्तिभावानें तयार ठेवावा ! पुराणिकबुवा या सन्मानानें खुष होऊन स्वतःला साक्षात् बृहस्पति समजत ! मग त्यांचें तें ऐटीनें बसणें, त्यांचे तें विचित्र हातवारे करणें, पोथीकडे पाहात असतां चाळशीच्या भिंगांतून व श्रोतृसमाजाकडे पाहातांना, मान किंचित् खाली वाकवून चाळशीच्या वरच्या कडा व भुवया यांच्यामधून, अथवा चाळशीच डोक्यावर चढवून नुसत्याच डोळ्यांनी, त्यांचें ते ऐटीचे पाहाणें, त्यांचे तें चेहऱ्यावर गांभीर्य आणणें,—वगैरे सर्व प्रकार तीक्ष्णदृष्टिसंपन्न गदाधरानें नीट पाहून ठेवावे व पुढे एखाद्या वेळीं, लोकांपुढे तें सर्व हुबेहुब करून दाखवून त्यांची हसतां हसतां मुरकुंडी वळवावी !

वरील गोष्टींवरून रामकृष्णांच्या लहानपणच्या स्वभावाची थोडीशी कल्पना येईल. असो.

मागे सांगितलेंच आहे की, आपल्या कनिष्ठ भावाचा विद्याभ्यास नीट चालावा व आपणांसहि थोडीफार मदत व्हावी म्हणून रामकुमारांनी गदाधराला कलकत्त्यास आपल्याजवळ आणून ठेवलें होतें. त्यांनी झामापुकुरांत आपली शाळा उघडली होती व आळींतल्या कांही घरांतील देवपूजेचाहि भार स्वीकारला होता. परंतु त्यांचा बहुतेक वेळ शाळेच्याच कामांत निघून जाई व देवपूजेस वेळ मिळत नसे. बरें, हें काम सोडून तरी चालावें कसें? म्हणून त्यांनी देवपूजेचें काम गदाधरवर सोपविलें. गदाधरालाहि त्यामुळें आनंद झाला व तो आपलें देवपूजेचें काम दोन्ही वेळां मोठ्या दक्षतेनें करून वडील भावाजवळ थोडेफार शिकूंहि लागला. थोड्याच दिवसांत आपल्या आंगच्या गुणांनी गदाधर आपल्या यजमानांच्या घरांतील सर्व माणसांना फार आवडूं लागला. त्याचें सुंदर स्वरूप, त्याची कर्मदक्षता, सरळ व्यवहार, गोड भाषण, देवभक्ति व मधुर आवाज, यांनी त्यानें कामारपुकुराप्रमाणें तेथेंहि सर्वांना एक प्रकारची मोहनीच घातली! कामारपुकुराप्रमाणें येथेंहि त्यानें आपल्या भोंवतीं अनेक बालगोपाल जमा केले व त्यांच्या संगतींत तो आपले दिवस मोठ्या आनंदानें घालवूं लागला. कलकत्त्यास येऊनहि अभ्यासांत त्याची विशेष प्रगति झाली नाही.

हें पाहून मात्र रामकुमारांस चिंता वाटूं लागली. परंतु गदाधर आज अभ्यास करूं लागेल उद्या करूं लागेल या आशेनें ते त्याला कांही न बोलतां बरेच दिवस स्वस्थच राहिले, परंतु तरीहि गदाधराचें अभ्यासाकडे लक्ष लागण्याचें कांहीच चिन्ह दिसेना. तेव्हां मात्र आता याची कानउघाडणी केल्यावाचून गत्यंतर नाही, असें जाणून एक दिवस त्यांनी त्याला अभ्यास करूं लागण्याचा उपदेश केला. वडील भावाचें सर्व बोलणें शांतपणें ऐकून घेऊन, गदाधरानें त्यांना नम्रतेनें, पण स्पष्ट उत्तर दिलें की "भातभाकरी मिळविण्याची

विद्या मला नको. मला अशी विद्या पाहिजे की, जिने हृदयांत ज्ञानाचा उदय होऊन मनुष्य कृतार्थ होतो ! ”

गदाधराचें हें उत्तर रामकुमारांस त्यावेळीं नीटसें समजलेंच नाही. त्यांचें गदाधरावर फार प्रेम होते व म्हणून त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला अभ्यास करावयास लावून त्याला दुःखित करण्याचें त्यांच्या जिवावर आलें. म्हणून, यानंतर गदाधराला कांही न बोलतां, तो वागेल तसें वागूं देण्याचें त्यांनी ठरविलें.

पुढील दोन वर्षांत रामकुमारांची स्थिति चांगली न होतां उलट अधिकच खालावली. शाळेंतील मुलांची संख्या कमी कमी होत चालली. अनेक तऱ्हेने परिश्रम करूनहि पैसा मिळेनासा झाला. तेव्हां आता शाळा बंद करून दुसरें कांही काम करावें की काय, असा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला; परंतु कांहीच निश्चय होईना व अशाच रीतीने जर आणखी कांही दिवस संसार चालला तर कर्जाचा बोजा वाढून आपली स्थिति फार भयंकर होईल अशी चिंता लागून त्यांना कांही सुचेना. तरी पण करतात काय ? यजन-याजन, अध्यापन, यांशिवाय दुसरें करावयाचें तरी काय ? पैसा मिळविण्याची दुसरी कोणतीच विद्या त्यांना येत नव्हती. तेव्हां आता याला तोड काय ? असा विचार करीत, ईश्वरावर भरवसा ठेवून आपली स्थिति उन्नत होण्यासारखी एखादी संधि आकाशांतून पडण्याची वाट पाहात हे साधुवृत्तीचे रामकुमार, आपलें पूर्वीचेंच काम कसेंबसें करीत राहिले; आणि ईश्वराच्या अचिंत्य लीलेने अशी एक संधि खरोखरच, लौकरच आकाशांतून पडली !

---

# १२. राणी रासमणी व दक्षिणेश्वर

" राणी रासमणी जगदंबेच्या अष्टनायिकांपैकी एकजण होती. ,,
" आई जेवणखाण करते कालीघाटावर आणि विश्रांति घेते दक्षिणेश्वरीं. "

—श्रीरामकृष्ण

---

इकडे, रामकुमार आपल्या संसाराच्या चिंतेंत निमग्न असतां तिकडे कलकत्त्याच्या दुसऱ्या बाजूस, श्रीरामकृष्णांचें साधनास्थान त्यांच्या उत्तर वयांतील कार्यक्षेत्र आणि त्यांच्या विचित्र लीलाभिनयाचें ठिकाण निर्माण होत होते ! ईश्वराच्या अचिंत्य लीलेने, त्यांच्या भावी चरित्राशीं अत्यंत निकट संबंध असलेलें दक्षिणेश्वराचे राणी रासमणीचें प्रचंड कालीमंदिर बांधून तयार होत होतें !

कलकत्त्याच्या दक्षिणभागांत जानबाजार नामक पेठेंत, सुप्रसिद्ध राणी रासमणीचें निवासस्थान असें. ती कोळी जातीची होती. आपल्या मागे आपली पत्नी राणी रासमणी व चार कन्या यांना ठेवून रामचंद्र दास इहलोक सोडून गेले. त्यावेळीं राणी रासमणीचें वय ४४ वर्षाचें होतें. आपल्या प्रिय पतीच्या अपार संपत्तीचा कारभार पाहण्याचें बिकट काम तिच्यावर पडलें. ती अत्यंत व्यवहार-चतुर असल्यामुळे संपत्तीची सर्व व्यवस्था ती स्वतःच पाहूं लागली. तिच्या सुव्यवस्थेने तिच्या अपार संपत्तीची उत्तरोत्तर वाढच होऊन तिचें नांव साऱ्या कलकत्ता शहरभर लवकरच गाजूं लागले. स्वतःच्या संपत्तीची व्यवस्था लावण्यांत दक्ष असल्यामुळे तिचें नांव प्रसिद्ध झालें असें नव्हे, तर साहस, बुद्धिमत्ता, मानी

व तेजस्वी स्वभाव, ईश्वरभक्ति व विशेषतः दुःखी दरिद्री लोकांविषयींची तिची कळकळ इत्यादि गुणहि तिच्या प्रसिद्धीस कारण होते. या तिच्या गुणांच्या कांही गोष्टी खाली दिल्या आहेत.

जानबाजारांतील तिच्या निवासस्थानापासून थोडया अंतरावर पूर्वी इंग्रज शिपायांची बराक असे. एक दिवस कांही शिपाई दारू पिऊन धुंद होऊन, राणीच्या दरवाज्यावरील पहारेकऱ्यांस न जुमानतां, बेधडक वाडयांत घुसले व तेथे हवी तशी धामधूम करूं लागले. मथुरबाबू वगैरे पुरुष मंडळी कोठे बाहेर गेली असल्यामुळे, त्यांना प्रतिबंध करण्यास कोणीच धजेना. बाहेरच्या चौकांत गोंधळ घालून शिपाई आंत शिरूं लागले. हे पाहतांच स्वतः राणी रासमणी हातांत शस्त्रास्त्रें घेऊन, त्यांना मज्जाव करण्यास तयार झाली! इतक्यांत मंडळीहि जमली व त्या शिपायांचा योग्य तो बंदोबस्त झाला.

एकदा सरकारने कोळी लोकांवर, गंगेतील मासे धरण्याबद्दल कर बसवला. त्या लोकांपैकी बरेच लोक राणीच्याच जमीनदारींत राहात असत. ही कर बसवल्याची गोष्ट राणीस समजतांच तिने त्यांना अभय दिले व सरकारपासून मासे धरण्याचा हक्क पुष्कळ पैसा खर्चून, आपण स्वतः विकत घेतला. असें सांगतात की, हक्क मिळाल्याचें सर्टिफिकेट सरकारांतून येतांच, राणीने नदीच्या एका तिरापासून दुसऱ्या तिरापर्यंत मोठमोठे जाड साखळदंड, जाळ्यासारखे करून पक्के बांधून टाकले! यामुळे नदींतून जहाजांची वाटच बंद झाली! सरकारने वाट अडविण्याचें कारण विचारतां, राणीने उत्तर दिलें की, "येथे जहाजांची ये जा एकसारखी सुरूं असल्यामुळे, नदींतील मासे दुसरीकडे निघून जातात, त्यामुळे माझे अतिशय नुकसान होईल. मासे धरण्याचा हक्क मीं विकत घेतला आहे व माझ्या सोईसाठी, मला असे करणें भाग आहे! तरी पण नदींतील मासे धरण्याबद्दल, सरकार जर यापुढे कर बसविणार नाही, तर मीहि आपला हक्क सोडून देऊन साखळदंड ताबडतोब काढून टाकीन!" असें सांगतात, की या युक्तिवादाने सरकार निरुत्तर झालें व त्यांनी तो कर रद्द करून टाकला!

राणी रासमणीची श्री कालीमातेच्या पादपद्मीं अत्यंत भक्ति असे. तिच्या शिक्कामोर्तबावर "कालीपदाभिलाषी श्रीमती रासमणी दासी" अशीं अक्षरें असत. श्रीरामकृष्ण सांगत असत–"तेजस्वी राणीची देवीभक्ति, अशीच सर्व विषयांत, गोष्टींत व कार्यांत दिसून येत असे."

लोकहिताचीं कामें करण्यांत राणी सदैव तत्पर असे. तिने ठिकठिकाणीं नद्यांस घाट बांधले, वाटसरांच्या सोईसाठी दोन तीन ठिकाणीं रस्ते बांधले, कांही ठिकाणीं विहीरी बांधल्या व कोठे कोठे अन्नसत्रे घातली. आपल्या जमीनदारींतील लोकांच्या सुखासाठी ती फार झटे. तिने अनेक देवस्थानांच्या यात्रा करून देवास पुष्कळ संपत्ति दान केली. अशा रीतीने या थोर स्त्रीने आपल्या गुणांनी व सत्कार्यांनी आपले राणी हें नांव सार्थक केलें.

ज्या काळची गोष्ट आम्ही सांगत आहों, त्या कालीं राणीच्या चारी कन्यांचे विवाह होऊन त्यांना संततीहि झाली होती. तिसरी मुलगी करुणामयी इचा विवाह तिने मथुरानाथ विश्वास नांवाच्या एका कुलीन पण गरीब घराण्यांतील मुलाशी केला परंतु लग्नानंतर थोड्याच दिवसांनी करुणामयीस देवाज्ञा झाली. मथुरानाथावर राणीचा फार लोभ होता व ते राणीजवळच राहून तिला आपल्या संपत्तीची व्यवस्था पाहण्यांत मदत करीत असत. करुणामयीस देवाज्ञा झाल्यावर, दूरदृष्टि व व्यवहारचतुर राणीने आपली कनिष्ठ कन्या जगदंबादासी इचा मथुरानाथांशींच विवाह करून दिला.

फार दिवसांपासून काशीयात्रा करण्याचा बेत राणीच्या मनांत होता व तिने यात्रेची सर्व पूर्वतयारी करून यात्रेसाठी बरेचसे पैसे निराळे काढून ठेवले होते. कलकत्त्याहून यात्रेला निघण्याच्या आदल्या दिवशींच्या रात्रीं देवी तिच्या स्वप्नांत येऊन म्हणाली, "तूं काशीस जाऊं नकोस, भागीरथीच्या तिरावर माझें एक सुंदर देवालय बांध व माझ्या नित्यपूजेची व्यवस्था कर; म्हणजे मी तेथे राहून तुझी पूजा घेत जाईन." या आदेशाने राणीने स्वतःस धन्य मानलें

व काशीयात्रेचा बेत रहित करून देवीच्या आदेशाप्रमाणे वागण्याचा तिने तत्काळ निश्चय केला.

नंतर राणीने भागीरथीच्या तिरावर बऱ्याचशा जागा पाहून, त्यांतून कलकत्त्याच्या उत्तरेस असलेल्या दक्षिणेश्वर खेडयाजवळ एक जागा पसंत केली व सन १८४७ च्या सप्टेंबर महिन्यांत तेथे ५० बिघे जागा खरेदी करून लगेच त्या ठिकाणीं भव्य व विस्तृत कालीमंदिर बांधण्याचें काम सुरू केलें. सात वर्षे काम चालूनहि १८५४ मध्ये ते पुरें झालें नव्हतें, तरी पग देहाचा भरवसा नाही व काम असेंच रेंगाळत चालत राहिल्यास तें पुरें होईपर्यंत स्वस्थच बसावयाचें की काय असा विचार करून, मुख्य कालीमंदिर पूर्ण होतांच, राणीने सन १८५५ मध्ये देवीची प्राणप्रतिष्ठा केली.

परंतु या कामांत तिला अनेक विघ्नें आली. देवीचे मंदिर तयार झाले खरें; परंतु पूजा-अर्चा, नैवेद्य वगैरे नित्यसेवा चालविण्यास योग्य ब्राह्मण कसा मिळावा ? ती जातीची कोळीण; शूद्राची सेवा करण्यास कोण तयार होतो ? यावेळी समाजाची चाल अशी होती, की शूद्राने बांधलेल्या देवालयांत पूजा करणे तर बाजूलाच राहो, पण कर्मठ ब्राह्मण तेथील देवाला नमस्कारहि करीत नसत ! देवीवर तिची अत्यंत भक्ति असल्यामुळे तिला वाटे, “ पूजा करावयास ब्राह्मणच कशाला पाहिजे ! देवी माझ्या हातची सेवा घेणार नाही काय ? मीच स्वतः पूजा करीन व देवीची सर्व सेवा करीन. ” पण लगेच तिच्या मनांत विचार आला की, “ त सर्व खरें, पण मीच स्वतः नित्यसेवा करूं लागेन तर शास्त्रविरुद्ध आचरण केले असें होऊन, भक्त, ब्राह्मण वगैरे मंडळी येथे येऊन प्रसादहि ग्रहण करणार नाहीत ! मग एवढें मंदिर बांधल्याचा उपयोग काय ? ” तिने याबद्दल पुष्कळ शास्त्री-पंडितांचा सल्ला घेतला पण तिच्या मनाप्रमाणे कांहीच व्यवस्था जुळण्याचें चिन्ह दिसेना.

इकडे मंदिर व मूर्ति तयार झाली. परंतु देवीच्या नित्यपूजेची व्यवस्था जुळेना व एवढें मंदिर बांधून तें व्यर्थ जाणार की काय या चिंतेने राणीस

रात्रंदिवस दुसरा विचारच सुचेना. ती अशा संकटांत असतां झामापुकूरच्या पाठशाळेंतील अध्यापकाने अशी व्यवस्था सुचविली की, जर देवीचें देऊळ व सर्व संपत्ति, राणी एखाद्या ब्राह्मणास दान करील व तो ब्राह्मण पुढे देवीची नित्यसेवा करण्याची व्यवस्था करील तर शास्त्रनियमांचें उल्लंघन न होतां ब्राह्मणादि उच्च वर्गांना तेथे प्रसाद ग्रहण करण्यास कांहीएक हरकत राहणार नाही.

ही व्यवस्था ऐकून राणीस धीर आला व देवीची संपत्ति आपल्या गुरूंच्या नांवें करून, आपण स्वतः त्यांच्या अनुमतीने त्या संपत्तीचे व्यवस्थापक म्हणून राहावे, असा तिने बेत केला. त्यानंतर हा बेत शास्त्रज्ञ मंडळीस कळवितां त्यांनी सांगितलें " अशी चाल कोठेहि नाही, व असें केलें तरी कोणीहि ब्राह्मण मंडळी त्या मंदिरांत येणार नाहीत." मात्र, त्या पंडित मंडळींनी " असे केल्यास शास्त्राविरुद्ध आचरण होईल " असें सांगण्याचें धाडस केलें नाही.

सर्व पंडितांच्या मताविरुद्ध मत रामकुमार स्पष्टपणे सांगतात, त्यांची मुळीच पर्वा करीत नाहीत, असें पाहून राणीस रामकुमारांविषयी बरीच आशा वाटूं लागली व त्यांच्याबद्दल तिच्या मनांत आदर उत्पन्न झाला.

तिच्या पदरीं शिरूड गावचा महेशचंद्र चतर्जी म्हणून एक गृहस्थ कामकाज पाहण्यास असे. त्याला एखादा सदाचारसंपन्न, निष्ठावान व सुविद्य असा ब्राह्मण पाहण्यास तिने सांगितलें. आपण हें काम केलें तर ही बक्षीस मिळण्याची बरी संधि आहे असें जाणून, त्याने श्रीराधागोविंदजींच्या पूजेसाठी आपल्या वडील भावाची–क्षेत्रनाथची–वरणी लावली. परंतु श्रीकालीच्या पूजेसाठी मात्र त्याला कोणीच योग्य ब्राह्मण सापडेना. रामकुमारांचें गाव त्याच्या गावाजवळच असल्यामुळे ते त्यास माहीत होते, व घरची स्थिति चांगलीशी नसल्यामुळे ते कलकत्त्यास पाठशाळा चालवून आपला उदरनिर्वाह चालवितात, हेंहि त्यास ठाऊक होतें, परंतु शूद्राचें दानहि न घेणाऱ्या क्षुदिरामांचा तो मुलगा ! तेव्हां ते या गोष्टीस संमत होतील की नाही, याचा त्याला जबरदस्त संशय होता, म्हणून

त्याने स्वतः रामकुमारांस न विचारतां राणीस सर्व हकीगत सांगून, तिलाच त्यांस विचारण्यास सांगितलें. रामकुमारांनी देवीच्या पूजेचा भार स्विकारल्यास किती चांगलें होईल या विचाराने राणीस आनंद झाला व तिने एक पत्र लगेच लिहून, तें त्यांचेकडे घेऊन जाण्यास महेशचंद्रालाच सांगितले.

हे पत्र पावल्यावर, रामकुमारांनी विचार करून, राणीच्या विनंतीस मान देण्याचें ठरविलें. अशा विलक्षण रीतीने रामकुमारांचा व त्याच्यामुळे गदाधराचा दक्षिणेश्वराशीं संबंध जुळून आला. श्रीजगदंबेच्या अचिंत्य लीलेने रामकुमार पूजकपदासाठी निवडले गेले व राणीस योग्य पुजारी सापडून तिची चिंता दूर झाली.

श्रीकालीच्या नवीन मंदिरांत देवीची प्राणप्रतिष्ठा इ. स. १८५५ च्या मे महिन्याच्या ३१ तारखेस अत्यंत समारंभाने झाली. त्या साऱ्या दिवसभर दक्षिणेश्वरची कालीवाडी आनंदाने गजबजलेली होती. राणीने त्या दिवशीं या समारंभाप्रीत्यर्थ पाण्यासारखा पैसा खर्च केला. काशी, प्रयाग, कनोज, नवद्वीप वगैरे ठिकाणांहून मोठमोठे विख्यात पंडित व विद्वान ब्राह्मण त्या समारंभासाठी आले होते. आलेल्या सर्व ब्राह्मणांस, राणीने प्रत्येकीं एकेक रेशमी वस्त्र, एकेक उपरणे व एकेक होन दक्षिणा दिली. सारा दिवसभर लोकांच्या पंक्तीवर पंक्ति उठत होत्या. देऊळ बांधून, देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यास राणीला एकंदर ९ लक्ष रुपये खर्च आला! याशिवाय देवीच्या नित्यपूजेची व्यवस्था सुरळीत चालावी, म्हणून तिने २,२६००० रुपये खर्चून दिनाजपूर जिल्ह्यांतील शालवाडी परगणा खरेदी करून, त्याचें उत्पन्न त्या खर्चास लावून दिलें.

त्या दिवशींच्या एवढया मोठया समारंभांत तेथे प्रसाद न घेणारी एकच व्यक्ति होती. ती म्हणजे गदाधर! तेथील सर्व कार्यक्रमांत त्याने हौसेने भाग घेतला, लोकांच्याबरोबर आनंद केला परंतु आहाराच्यासंबंधाने तो अत्यंत चिकित्सक व निष्ठावान असल्यामुळे म्हणा अथवा दुसऱ्या कोणत्या तरी कारणामुळे म्हणा,

त्याने सारा दिवस उपवास करून, संध्याकाळी जवळच्या एका दुकानांतून एक पैशाचे पोहे आणून खाल्ले व रात्र झाल्यावर तो पायींच झामापुकूरला परत गेला !

देवीच्या प्राणप्रतिष्ठेची हकीकत कधी कधी रामकृष्ण स्वतः आम्हांला सांगत. ते म्हणत—" राणीने काशीयात्रेची सर्व तयारी केली, यात्रेला निघण्याचा दिवसहि ठरवला, बरोबर लागण्यासारखे सर्व प्रकारचे सामान भरून शंभर नावा घांटावर तयार करून ठेवल्या, आदल्या दिवशीं रात्री 'तूं काशीला जाऊं नको येथेच माझे देऊळ बांध,' असें तिला देवीने स्वप्नांत सांगितल्यामुळे जाण्याचा बेत रहित करून, लगेच ती देवळास योग्य अशी जागा पाहण्याच्या कामास लागली व लवकरच सध्याची जागा तिने पसंत केली. या जागेपैकी कांही भाग एका साहेबाच्या मालकीच्या होता व कांही भागांत मुसलमानांचे कबरस्थान होतें. जागेचा आकार कासवाच्या पाठीसारखा होता. तंत्रशास्त्रांत सांगितलेलें आहे की, साधनासाठी व शक्तिप्रतिष्ठेसाठी अशाच आकाराची जागा विशेष प्रशस्त असते."

श्रीदेवीची प्रतिष्ठा करण्यास योग्य अशा दिवसाऐवजी विष्णुपर्वकालींच हा समारंभ राणीने उरकून घेतला. याचें कारण रामकृष्ण असे सांगत-" देवीची मूर्ति तयार होऊन घरीं आल्यादिवसापासून, राणीने यथाशास्त्र कठोर तप आचरण्यास सुरुवात केली. तिने त्रिकाल स्नान करावें, हविष्यान्न खावें, भुईवरच निजावें व दिवसाचा बराचसा वेळ, जप, तप, ध्यान, पूजा यांत घालवावा. देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी मुहूर्त पाहण्याचें काम हळू हळू चाललें होतें. देवीची घडून आलेली मूर्ति, राणीने एका मोठया पेटाऱ्यांत कडी कुलूप लावून, बंदोबस्ताने ठेविली होती. एके रात्रीं देवी राणीच्या स्वप्नांत येऊन म्हणाली—'मला आणखी किती दिवस असें कोंडून ठेवणार आहेस ? या तुझ्या बंदीखान्यांत मला फार त्रास होत आहे. शक्य तितक्या लौकर माझी प्रतिष्ठा कर.' हें स्वप्न पाहून राणी ताबडतोब मुहूर्त कायम करण्याच्या मागे लागली व विष्णुपर्वकालाशिवाय

जवळपास दुसरा चांगला मुहूर्त न सापडल्यामुळे तिने तोच दिवस कायम केला. " असो.

दक्षिणेश्वराच्या देवळांत पूजकाचें काम कायमचेंच स्वीकारण्याचा रामकुमारांचा मानस नसावा, असें त्यांच्या त्या वेळच्या वर्तनावरून अनुमान होतें. त्यांचा बेत असा असावा की, देवीच्या प्रतिष्ठापनेचा विधि व समारंभ उरकला म्हणजे परत झामापुकूरला जावें. त्या दिवशीं देवीच्या पूजकाचें काम स्वीकारून आपण म्हणजे कांही अशास्त्रीय गोष्ट करीत आहों, असें त्यांना मुळीच वाटलें नव्हतें, असें गदाधराशीं त्यांच्या त्या वेळेच्या वर्तनावरून स्पष्ट दिसून येतें. तो प्रकार असाः—

समारंभ आटोपल्यावर गदाधर रात्री घरीं परत गेला. रामकुमार रात्रीं घरीं आले नव्हते, त्यांची विचारपूस करण्यासाठी असो, अगर, कांही विधि अजून शिल्लक राहिले होते, ते पाहण्याच्या कौतुकाने असो, तो सकाळींच दक्षिणेश्वरीं गेला. बराच वेळ झाला तरी रामकुमार परत फिरण्याचें कांहीच चिन्ह दिसेना, म्हणून तो दुपारींच परत फिरला व तेथील काम संपलें म्हणजे आपला भाऊ परत येईल या विचाराने पुढे ५।७ दिवस, तो दक्षिणेश्वरीं गेलाच नाही. तरीहि रामकुमार परत आले नाहीत! तेव्हां हा प्रकार आहे तरी काय हें पाहावें, म्हणून पुन्हा सातवे आठवे दिवशीं गदाधर दक्षिणेश्वरीं गेला, व तेथे त्याला समजलें की आपल्या वडील भावाने, तेथे पूजकाचें काम कायमचेंच स्वीकारलें आहे! हें ऐकून त्याला कसेसेंच वाटलें. आपल्या पित्याने शूद्राचें नुसतें दानहि कधी घेतलें नाही व आपला भाऊ तर शूद्राची चाकरीहि करूं लागला आहे, याला काय म्हणावें? अशा विचाराने, त्यांनी नोकरी सोडावी म्हणून गदाधराने त्यांना मनापासून विनविलें. राजकुमारांनी आपल्या धाकटया भावाचें सर्व म्हणणें शांतपणे ऐकून घेतलें व नानाप्रकारांनी शास्त्र व युक्ति यांच्या साहाय्याने, आपल्या भावाची समजूत करण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. सरते शेवटीं, ही गोष्ट रामकुमारांनी चांगली केली की वाईट केली, हें ठरविण्यासाठी चिठ्ठया टाकण्याचें ठरलें; व

चिठ्ठींतहि जेव्हां "रामकुमारांनी हें चांगलें केलें," असेंच आलें, तेव्हां गदाधराची समजूत पटली!

हें सर्व ठीक झालें. पण "आता पाठशाळा बंद होणार व वडील भाऊ दक्षिणेश्वरीं राहणार, तेव्हां आता आपली वाट काय?" असा प्रश्न गदाधरापुढे आला. त्या विचारांत त्याचा बराच वेळ गेला व घरीं परत फिरण्यासहि फार उशीर झाला, म्हणून त्या दिवशीं तो तेथेच राहिला. रामकुमारांनी त्याला देवीचा प्रसाद घेण्यास सांगितलें; पण कांही केल्या तो प्रसाद म्हणून घेईचना! रामकुमार म्हणाले, "अरे, गंगेच्या पवित्र पाण्यानें स्वयंपाक केलेला, व पुन्हा तो देवीचा प्रसाद, असें असून तूं तो प्रसाद कां घेत नाहीस?" तरीहि गदाधर तो घेण्यास तयार होईना. मग रामकुमार म्हणाले, "हे बघ; तर मग असें कर-कोठींतून शिधा घे व गंगेच्या वाळवटांत आपल्या हातानें स्वयंपाक करून खा म्हणजे तर झालें? गंगेच्या पात्रांतील सर्व वस्तु पवित्र असतात, हें तर तुला मान्य आहे?" गदाधराची आहारविषयक निष्ठा, त्याच्या गंगाभक्तीपुढे पराजित झाली. रामकुमार शास्त्र व युक्ति यांच्या साहाय्यानें जी गोष्ट करूं शकले नाही ती, विश्वास व भक्ति यानी सहज करून टाकली! गदाधर त्या दिवसापासून स्वहस्तें स्वयंपाक करून जेवूं लागला व दक्षिणेश्वरींच राहूं लागला.

खरेंच, श्रीरामकृष्णांची गंगेवर कांही विलक्षण भक्ति असे! गंगेच्या पाण्याला ते "ब्रह्मवारि" म्हणत! ते म्हणत-"गंगेच्या तिरावर राहिल्यास, माणसाचें मन अत्यंत पवित्र होऊन त्यांत धर्मबुद्धि आपोआप उत्पन्न होते. गंगेच्या पवित्र उदकाला स्पर्श करून वाहणारा वारा गंगेच्या दोन्ही तिरांवर जेथपर्यंत वाहतो, तेथपर्यंतची भूमि पवित्र असते! त्या प्रदेशांतील रहिवाशांच्या अंतःकरणांत सदाचार, ईश्वरभक्ति, निष्ठा व तपश्चर्या करण्याची इच्छा, गंगामातेच्या कृपेनें, सदासर्वकाळ विद्यमान असते." पुष्कळ वेळपर्यंत सांसारिक गप्पागोष्टी बोलून अथवा विषयी लोकांत मिसळून जर कोणी त्यांच्या दर्शनास आला, तर ते त्याला म्हणत, "जा थोडें गंगेचें पाणी पिऊन ये, जा!"

आपल्या भेटीस आलेल्या मंडळीपैकी एखादा, घोर विषयासक्त व ईश्वर-विमुख आहे, असें त्यांना दिसून आल्यास तो मनुष्य निघून गेल्यावर तो बसलेल्या जागेवर ते गंगेचें पाणी शिंपडीत ! प्रातर्विधीस जर कोणी गंगेच्या पाण्याचा उपयोग करीत असल्याचें त्यांना दिसलें, तर त्यांना अत्यंत दुःख होई ! असो.

सारा दिवस जेथे पक्ष्यांचा किलबिलाट चालला आहे, अशा पंचवटीने सुशोभित उद्यान, गंगेचा धीरगंभीर प्रवाह, सुंदर व प्रचंड असे देवीचें मंदिर, त्यांत अहर्निश चाललेली देवसेवा, वगैरे गोष्टींनी गदाधराचें मन, हळू हळू दक्षिणेश्वरीं रमूं लागलें व लवकरच कामारपुकूर, झामापुकूर, यांची त्याला आठवणहि येईनाशी झाली. त्याचा सर्व काळ मोठया आनंदांत जाऊं लागला.

रामकृष्णांची पूर्वोक्त आहारनिष्ठा पाहून कोणी कोणी म्हणतील की, "अशा प्रकारची अनुदारता तर सर्वच ठिकाणीं दिसून येते, मग रामकृष्णांच्याहि ठिकाणीं ती होती, असें सांगण्याने असें सिद्ध करण्याचा तुमचा हेतु आहे काय, की— 'अशी अनुदारता नसेल, तर कोणाचीहि आध्यात्मिक उन्नति होणें शक्य नाही?' त्यांना इतकेंच सांगणे आहे की, अनुदारता व अत्यंत दृढ निष्ठा या दोन गोष्टी एकच नव्हत. पहिलीचा जन्म अहंकारामध्ये आहे; व ती असेल तर, आपण जें समजतों तेंच ज्ञान व जें कांही करतों तेंच योग्य, असे वाटावयास लागून मनुष्य प्रगतीचा-उन्नतीचा-मार्ग हरवून बसतो. शास्त्र व आप्तवाक्यावर विश्वास यांमध्ये दुसरीचा जन्म आहे. तिचा उदय झाला असतां अहंकाराच्या कचाट्यांतून निसटून, मनुष्य उन्नतीच्या मार्गात अग्रसर होतो व क्रमाक्रमाने सत्याचा अधिकारी होतो. निष्ठेचा उदय झाला असतां प्रथम प्रथम मनुष्याच्या वर्तनांत अनुदारपणा दिसूं लागणें शक्य आहे, परंतु पुढे तिच्या योगाने त्याला आपला मार्ग अधिकाधिक उज्ज्वल दिसूं लागतो व त्या निष्ठेवरील संकुचितपणाचें, अनुदारतेचें आवरण आपोआप गळून पडतें. म्हणून आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गांत निष्ठेची एवढी महती वर्णिलेली आहे. रामकृष्णांच्या जीवनांतहि ती दिसत असल्यामुळे ही गोष्ट निःसंशय समजते की, "दृढ निष्ठा ठेवून शास्त्रांच्या

आज्ञेप्रमाणे जर आपण आध्यात्मिक मार्गांत अग्रसर होऊं, तरच यथाकालीं आपण उदारतेचे अधिकारी होऊं व शांतिसुखाचा लाभ करून घेऊं; नाहीं तर नाहीं." श्रीरामकृष्ण म्हणत असत—" काट्यानेच काटा काढावा लागतो." त्याचप्रमाणे निष्ठेचें अवलंबन करूनच आपल्याला उदारता प्राप्त करून घेतली पाहिजे. शासन नियम यांना अनुसरूनच, शासनातीत, नियमातीत अशी अवस्था प्राप्त करून घ्यावी लागते.

यौवनाच्या आरंभीं रामकृष्णांच्या जीवनांत अशा प्रकारची असंपूर्णता पाहून कोणी म्हणेल-" तर मग त्यांना 'ईश्वरावतार' असें कशाला म्हणतां? मनुष्यच म्हणावयास काय हरकत आहे? आणि जर त्यांना ईश्वरावतार म्हणावयाचेच तुमच्या मनांत असेल, तर मग अशा प्रकारची असंपूर्णता दृष्टी-आड झांकून ठेवणेंच बरें." यावर आम्ही इतकेंच सांगून ठेवतों की--" बंधो! आमच्याहि आयुष्यांत एक काळ असा येऊन गेला आहे की, जेव्हां ईश्वर नरदेह धारण करून अवतीर्ण होत असतो, या गोष्टीवर आमचा स्वप्नांत सुद्धा विश्वास बसत नसे. परंतु 'ही गोष्ट शक्य आहे,' असें जेव्हां त्यांच्याच कृपेनें आम्हांला समजूं लागलें, तेव्हां असेंहि कळून आलें की, नरदेह धारण करून देहाच्या असंपूर्णतेप्रमाणे, मनाचीहि असंपूर्णता ईश्वरास स्वीकारावी लागते: रामकृष्ण म्हणत असत, ' सोनें वगैरे धातूंत कांहीं मिसळ घातल्यावांचून ती नीट घडली जात नाहीं.' आपल्या जीवनांतील असंपूर्णता त्यांनी आमच्यापासून कधींच लपवून ठेवली नाहीं, की ठेवण्याचा प्रयत्नहि केला नाहीं. तसेंच वरचेवर आम्हांस उघड उघड असेंहि म्हणून दाखविण्यास कमी केलें नाहीं, की " जो राम आणि कृष्ण झाला होता, तोच सांप्रत (स्वतःकडे बोट करून) या शरीरांत गुप्त रूपानें आला आहे. राजा जसा वेष बदलून शहर पाहण्यास बाहेर पडतो, तसा! म्हणून आम्हांला जें जें माहीत आहे, तें तें सर्व तुम्हांला सांगूं. तुमची इच्छा असेल, त्याप्रमाणें मत बनविण्यास तुम्ही पूर्णपणे मोकळेच आहां."

# १३. पूजकपदग्रहण

## ( १८५६ )

" हृदय नसता तर साधनकाळीं हें शरीर टिकले नसते. त्याची सेवा मी कधी विसरणार नाही."

—श्रीरामकृष्ण

---

देवीची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर थोड्याच दिवसांत गदाधर दक्षिणेश्वरीच राहण्यास गेला व आपला काळ आनंदाने घालवूं लागला, असें वर सांगितलेंच आहे. त्याचे सुंदर स्वरूप, मनोहर आवाज, नम्र व विनयशील वृत्ति व एवढ्या लहान वयांतहि एवढी धर्मनिष्ठा पाहून राणीचा जावई मथुरबाबू यांचा त्याचेविषयीं फार अनुकूल ग्रह झाला व हळू हळू त्याची त्याजवर फार मर्जी बसली. असें अनेकदा दिसून येते की, आयुष्यांत ज्यांचा व आपला विशेष जिव्हाळ्याचा संबंध येणार असतो, त्यांच्या प्रथम भेटीच्या वेळीं कधी कधी आपल्या हृदयांत एक प्रकारें प्रेमाचें आकर्षण उत्पन्न होत असतें. शास्त्रें म्हणतात की असें होण्याचें कारण पूर्वजन्मांतील संस्कारच होत; आणि, रामकृष्णांचा व मथुरबाबूंचा यानंतरचा चौदा वर्षांचा अलौकिक व दिव्य संबंध पाहिला, म्हणजे असें मानल्यावांचून गत्यंतरच नाही, असें वाटूं लागते. असो.

देवीची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर सुमारें एक महिनाभर गदाधर स्वस्थच होता. पुढे काय करावयाचें, याबद्दल त्याचें कांहीच ठरलें नव्हतें. मथुरबाबूंच्या मनांत देवीच्याच सेवेंत, मुख्य पूजकाच्या हाताखालीं त्याला नेमावयाचें होतें व रामकुमारांजवळ त्यांनी तसें बोलूनहि दाखविलें. परंतु आपल्या भावाची

मनःस्थिति त्यांना पक्की माहीत असल्यामुळे, तो याला कबूल होणार नाही, असे त्यांनी मथुरबाबूंना सांगितलें. मथुरबाबू येवढयानेच स्वस्थ बसणारे नव्हते. तरी पण यावेळी त्यांनी विशेष आग्रह धरला नाही व योग्य संधि येण्याची ते वाट पाहात बसले.

श्रीरामकृष्णांच्या जीवनांत ज्याचा अत्यंत निकट संबंध होता अशी एक व्यक्ति याच सुमारास दक्षिणेश्वरीं आली. ती म्हणजे, त्यांची आतेबहीण हेमांगिनी इचा मुलगा * हृदयराम मुकर्जी. हा यावेळीं कांही काम मिळेल तर पाहावें म्हणून तेथे आला होता व आपले मामा तेथेच राहतात असे पाहून तो

---

* माणिकराय चट्टोपाध्याय

- क्षुदिराम = चंद्रमणी
  - रामकुमार
    - अक्षय
  - रामेश्वर
    - रामलाल, लक्ष्मी, शिवराम.
  - कात्यायनी
  - गदाधर (**श्रीरामकृष्ण**)
  - सर्वमंगला
- रामलीला = भागवत वंद्योपाध्याय
  - रामचांद
  - हेमांगिनी = कृष्णचंद्र मुखोपाध्याय
    - राघव
    - रामरतन
    - **हृदयनाथ**
    - राजाराम
- निधिराम
- रामकानाई
  - रामतारक
  - कालीदास

तेथेच त्यांच्याबरोबर मोठ्या आनंदाने राहूं लागला. श्रीरामकृष्ण व तो हे दोघेहि समवयस्कच होते व त्यांना लहानपणापासून एकमेकांची चांगली माहिती होती.

हृदय चांगला उंच व देखणा पुरुष असे. तो शरीराने जसा सुदृढ व बलिष्ट असे, तसाच मनानेहि उद्यमशील व निर्भय असे. संकटसमयीं तो मुळीच डगमगून जात नसे व त्यांतून बाहेर पडण्याचा कांही तरी मार्ग तो हटकून शोधून काढी. त्याचें आपल्या धाकट्या मामावर—गदाधरावर—अत्यंत प्रेम असे, व त्यांना सुखी ठेवण्यासाठी वाटेल ते कष्ट सोसण्यास तो सदैव तयार असे. हृदयाला, आळस कसा तो मुळीच ठाऊक नसे. तो नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी कामांत गुंतलेला असे. हृदयाचा स्वभाव कांहीसा स्वार्थपरायणहि असे व त्याच्या हृदयांत भक्तिभाव मुळीच नसल्यामुळे, त्याचे परमार्थाकडे फारसें लक्ष नसे. त्याची स्वार्थपरायणता कधींच समूळ नष्ट झाली नाहीं. पुढे पुढे त्याच्यामध्ये थोडीशी भाविकता व निःस्वार्थ बुद्धि दिसे, पण तो केवळ रामकृष्णांच्या दिव्य संगतीचाच परिणाम होय. शरीराला आवश्यक अशा आहारविहारादि सर्व प्रकारच्या गोष्टींमध्ये पूर्ण उदासीन, सर्वदा विचारशील व स्वार्थगंधशून्य अशा रामकृष्णांना, हृदयासारखा उद्योगी, साहसी, श्रद्धासंपन्न व आपल्यावर जिवापलीकडे प्रेम करणारा, असा कोणीतरी मदतगार अवश्य पाहिजेच होता. श्रीजगदंबेने एवढ्याचसाठी रामकृष्णांच्या साधनकालीं हृदयाला त्यांच्याजवळ आणून ठेवले असावें काय ? कोणी सांगावें ? एवढे मात्र खास, की हृदय जर नसता, तर साधनकाळीं रामकृष्णांचें शरीर टिकणेंच अशक्य होतें आणि याचमुळे त्याचे नांव श्रीरामकृष्णांच्या चरित्रांत अमर झालें असून, याचमुळे हृदयराम आम्हां सर्वांना सदैव पूज्य झाला आहे.

हृदय दक्षिणेश्वरीं आला तेव्हां गदाधरांना २१ वे वर्ष लागले होते. हृदय आल्यामुळे त्यांचे दिवस अधिकच आनंदांत जाऊं लागले. त्या दोघांनी स्नान-संध्या, उठणें बसणें वगैरे सर्व व्यवहार एकत्रच करावे. हृदय आपल्या मामांच्या मनाविरुद्ध कोणतीहि गोष्ट करीत नसे, अथवा त्यांच्या बाह्यात्कारी

निरर्थक व निष्कारण अशा वर्तनासंबंधीं उगीच पंचाइत करीत नसे, की त्यांना त्याबद्दल कांही विचारीतहि नसे. गदाधरांना असा स्वभाव फार आवडे व म्हणून हृदय त्यांना अत्यंत प्रिय वाटूं लागला.

हृदय आमच्यापाशी कित्येकदा म्हणे–" या वेळेपासून रामकृष्णांबद्दल माझ्या हृदयांत कांही विलक्षण प्रेम व आकर्षण उत्पन्न झालें. मीं नेहमी छाये-प्रमाणे त्यांच्याबरोबर असावें. त्यांना सोडून कुठेहि जाऊं नयेसे वाटावें ! ते कुठे पांच मिनिटें दृष्टीआड झाले, तर मन अगदी अस्वस्थ व्हावें. आम्ही सर्व व्यवहार एकत्रच करावे. फक्त दुपारी कांही वेळ आमची ताटातूट होई, कारण ते शिधा घेऊन पंचवटीखाली स्वयंपाक करून जेवीत व मी देवीचा प्रसादच घेत असे. त्यांच्या स्वयंपाकाची सर्व तयारी मीच करून देई. ते आपल्या हाताने करून खात, तरी तेथे जेवण कित्येक दिवसपर्यंत, त्यांना कसेसेच वाटे ! आहारासंबंधीची त्यांची निष्ठा इतकी प्रबळ होती ! दुपारीं हाताने करून रात्रीं मात्र ते देवीचा प्रसादच ग्रहण करीत पण कित्येक वेळां हा प्रसाद खात असतां त्यांचे डोळे पाण्याने भरून यावे व रडत रडत त्यांनी जगदंबेला म्हणावें, " आई ! मला कोळ्याचें अन्न कां खायला लावतेस ? "

रामकृष्ण स्वतः या संबंधाने कधी कधी म्हणत, " कोळ्याचे अन्न खावें लागते, म्हणून मनाला फार वाईट वाटावें. गरीब कंगाल भिकारी सुद्धा, ' कोळ्याचे देऊळ ' म्हणून, प्रथम प्रथम, तेथे भिक्षा घेत नसत. अन्न घ्यायलाच कोणी न मिळाल्यामुळे कित्येकदा तें सारें अन्न गुरांनाच खायला घालीत अथवा गंगेंत टाकून देत ! "

रामकृष्णांनी तेथे फार दिवस हाताने करून खाल्ले नाही हे मात्र आम्हीं ऐकले आहे. यावरून असे वाटतें की, देवीचे पुजारी होईपर्यंतच ते हातांनी करून खात असावे. दक्षिणेश्वरीं आल्यानंतर २।३ महिन्यांतच ते पुजारी झाले. असो.

आपल्यावर आपल्या मामांची फार प्रीति आहे, ही गोष्ट हृदय जाणून असे. रामकृष्णांचे सर्व व्यवहार त्याचेसमोरच होत; पण एका गोष्टीचा मात्र

त्याला बरेच दिवस उलगडा झाला नाही. ती गोष्ट ही.—तो आपल्या वडील मामांना—रामकुमारांना—कांही मदत करण्यांत गुंतलेला असे त्यावेळीं दुपारीं जेवणानंतर तो थोडीशी वामकुक्षी करीत असे, त्यावेळीं व संध्याकाळी तो आरती पाहात उभा असे, त्यावेळीं गदाधर त्याला तेथे तसेंच सोडून कोठे तरी नाहीसे होत ! हृदयने त्यांना पुष्कळ शोधावें; पण व्यर्थ. मग, तास दीडतासाने ते परत आल्यावर—" मामा तुम्ही कोठे होतां ? " असे विचारतां त्यांनी स्पष्ट काहीच सांगू नये, म्हणावे–" हा इथेच तर होतों ! " पुष्कळ दिवस पाळत ठेवल्यावर एकदा ते पंचवटीच्या बाजूने परत येत असतांना त्याला दिसलें. तेव्हां त्याला वाटलें की बहुधा हे बहिर्दिशेस गेले असावे. तेव्हांपासून त्याने याबद्दल फारशी चौकशी केली नाही.

हृदय सांगत असे–" एके दिवशी शिवमूर्ति तयार करून तिची पूजा करण्याची मामांना इच्छा झाली. लहानपणापासूनच त्यांना उत्तम प्रकारच्या मूर्ति करतां येत असत, मनांत येतांच त्यांनी गंगेतील माती आणून नंदी व शिव यांच्या दोन उत्कृष्ट प्रतिमा तयार केल्या व त्यांच्या पूजेंत ते निमग्न झाले. इतक्यांत मथुरबाबू सहज तेथे आले व एवढया तन्मयतेने मामा काय करीत आहेत, हें पाहात असतां त्या प्रतिमा त्यांच्या दृष्टीस पडल्या. मूर्ति लहानच होती पण फार उत्कृष्ट साधली होती. ती मूर्ति मामांनीच तयार केल्याचें ऐकून मथुरबाबूंना फार आश्चर्य वाटले व पूजा झाल्यावर ती मूर्ति माझ्याजवळून घेऊन त्यांनी पुन्हा नीट निरखून पाहिली व मोठया कौतुकाने ती राणीकडेहि पाहण्यास पाठवून दिली. ती मूर्ति पाहून राणीसहि आश्चर्य वाटलें." गदाधरांना नोकरीवर ठेवण्याचे बरेच दिवस त्यांचे मनांत होतेंच; आज गदाधरांच्या अंगचा हा नवीन गुण पाहून त्यांची ती इच्छा फार वाढली व रामकुमारांचे मार्फत, त्यांनी पुन्हा नोकरीस राहण्याबद्दल त्यांना विचारले. परंतु गदाधरांनी " एका भगवानांवांचून मला कोणाचीहि नोकरी करावयाची नाही, " असें स्पष्ट उत्तर त्यांस दिले ! नोकरीसंबंधाने अशा प्रकारचें मत कित्येकदा आम्हीं रामकृष्णांच्या तोंडून ऐकलें आहे.

साधारणपणे स्थिति बरी असतांना सुद्धा चाकरी स्वीकारणाऱ्या मनुष्यास ते हीन समजत. त्यांच्या बालभक्तांपैकी एकजणाने–निरंजनाने–चाकरी धरल्याचे ऐकून ते म्हणाले, “ तो मेला असे ऐकूनहि जितकें दुःख झाले नसते, तितकें दुःख त्याने चाकरी धरल्याचे ऐकून मला झाले ! ” पुढे कांही दिवसांनी त्याची गांठ पडल्यावर, जेव्हां त्यांना समजलें की त्याच्या वृद्ध मातेची द्रव्यभावीं नीट व्यवस्था राहात नाही, म्हणून त्याने चाकरी धरली, तेव्हां त्यांना फार आनंद झाला व त्याच्या अंगावरून हात फिरवीत व तोंड कुरवाळीत ते मोठ्या प्रेमाने म्हणाले, “ मग कांही हरकत नाही ! यासाठी चाकरी करण्याने तुला दोष लागणार नाही, पण आपल्या आईसाठी नसून, जर स्वत साठी चाकरी स्वीकारून तूं इथे येतास, तर माझ्याच्याने तुला स्पर्शमुद्धा करवला नसता !—तरी मी म्हटलेंच की माझा निरंजन, त्याच्यांत इतकेंमुद्धा अंजन ( दोष, डाग ) नाहीं, आणि त्याला अशी कशी आकाबाई आठवली ! ”

निरंजनाला उद्देशून त्यांनी काढलेले हे उद्गार ऐकून, इतर मंडळींना मोठा विस्मय वाटला. एकजण म्हणाला सुद्धा–“ महाराज, आपण चाकरी करण्याला दोष देता; पण चाकरी केली नाही, तर संसार चालावा कसा ? ” रामकृष्णांनी उत्तर दिले–“ ज्यांना करायची असेल त्यानी खुशाल करावी; मी सरसकट साऱ्यांनाच नोकरी करूं नका, असें सांगत नाही. ( बालभक्तांकडे बोट करून ) माझें सांगणें फक्त यांनाच आहे. यांची गोष्ट निराळी, तुमची निराळी. ” आध्यात्मिक उन्नति व चाकरी यांचे आंकडे कधीच जुळणार नाहीत असें पक्कें समजूनच त्यांचा आपल्या बालभक्तांना अशा प्रकारचा उपदेश असे, हें सांगणें नकोच.

वडील भावाकडून मथुरबाबूंची इच्छा कळल्यापासून गदाधर मथुरबाबूंपुढे जाण्याचें अगर त्यांच्या दृष्टीस पडण्याचेंच टाळूं लागले; कारण सत्य व धर्म यांचे पालन करण्यांत ते जशी कोणाची भीडमुरवत धरीत नसत, तसेंच उगीच एखाद्याला कष्ट देणेंहि त्यांच्या जिवावर येत असे, तसेंच कोणतीहि आशा मनांत न धरतां, गुणी व्यक्तीच्या गुणांचा आदर करणें व मानी व्यक्तीला

सरळ चित्ताने मान देणें, हा त्यांचा स्वभावच होता. म्हणून देवालयांत पूजकाचें काम स्वीकारावयाचें की नाही, याचा स्वतःशींच निश्चय ठरण्यापूर्वी मथुरबाबूंच्या प्रश्नाला, त्यांना न रुचेल असें उत्तर जर आपण दिलें, तर त्यांना वाईट वाटेल व तें आपल्यालाहि बरें दिसणार नाही या विचारानेच ते मथुरबाबूंस टाळूं लागले हे खास. अलीकडे दक्षिणेश्वरीं त्यांचा जसजसा अधिक काळ जाऊं लागला होता, तसतसे आपल्यास येथेच राहण्यास मिळेल तर बरें होईल, असेंहि त्यांच्या मनाला वाटूं लागलें होतें व ती जागा अधिकाधिक आवडूं लागली होती. म्हणून आपला ठाम विचार ठरेपर्यंत मथुरबाबूंपासून दूर राहावें असें त्यांस वाटत होतें.

परंतु ते ज्या गोष्टीला भीत होते, तीच गोष्ट एके दिवशीं सहज घडून आली. त्या दिवशीं मथुरबाबू देवीच्या दर्शनास आले असतां, त्यांनीदुरून गदाधरांस पाहिलें व त्यांना बोलावणें पाठवलें. हृदय त्यांच्याबरोबर होताच. मथुरबाबूंना पाहतांच गदाधर त्यांना टाळून दुसरीकडे जाण्याच्या बेतांत होते; इतक्यांत चाकराने "बाबूसाहेब तुम्हांला बोलावीत आहेत" असें सांगितलें. त्यांचेकडे जाण्याचा त्यांचा विचार दिसेना, असें पाहून हृदय म्हणाला, "मामा, बाबू बोलावतात तर चलाना तिकडे!" गदाधर म्हणाले, "जाऊन काय करायचें आहे? 'इथे तूं चाकरी करतोस काय?' असेंच ते विचारणार!" हृदयः—"मग त्यांत काय बिघडलें? थोरामोठयांच्या आश्रयाने राहण्यांत वाईट तें काय?" गदाधरः-"जन्मभर चाकरी करीत बसण्याची माझी मुळीच इच्छा नाही. शिवाय इथे चाकरी धरली तर देवीच्या दागिन्यांबद्दल जबाबदार राहावें लागेल आणि तसली भानगड तर माझ्याच्याने मुळीच व्हावयाची नाही. तरी पण तूं जर ही जबाबदारी पत्करत असशील, तर नोकरी करायला माझी हरकत नाही."

हृदय तरी नोकरीच्या शोधार्थच तेथे आला होता. त्याने गदाधरांचें म्हणणें मोठया आनंदाने कबूल केलें व मग ते दोघे मथुरबाबूंकडे गेले.

गदाधरांच्या अंदाजाप्रमाणे मथुरबाबूंनी त्यांना नोकरीबद्दलच विचारलें. गदाधरांनी आपलें म्हणणें त्यांना स्पष्टपणे कळविलें व मथुरबाबूहि त्याला कबूल झाले. लगेच त्याच दिवशीं त्यांनी गदाधरांना देवीच्या वेषकारी-पदावर नेमलें व हृदयला त्यांच्या व रामकुमारांच्या मदतीस दिलें (१८५६). आपल्या भावाने चाकरी स्वीकारल्याचें पाहून रामकुमार निश्चिंत झाले. याप्रमाणे देवीची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर, तीनच महिन्यांचे आंत गदाधरांनी तेथे पूजकाची जागा पत्करली. पूजेच्या वेळची त्यांची तन्मयता, इतर वेळचा त्यांचा सरळ व्यवहार, त्यांचे सुंदर रूप व आवाज यांनी मथुरबाबूंच्या मनांत त्यांचेविषयी अधिकाधिक आदर व प्रेम उत्पन्न होऊं लागलें.

•

त्याच वर्षी गोकुळअष्टमीच्या दुसऱ्या दिवशीं श्री राधागोविंदजीचा पूजक क्षेत्रनाथ याच्या हातून गोविंदजीची मूर्ति खाली फरशीवर पडून तिचा एक पाय भंगला. पुजारी बिचारा पडला, त्याला लागलें ते कोठेंच गेलें, पण आता मथुरबाबू काय करतात, या भीतीने त्याच्या अंगाचा थरकांप झाला. भंगल्या मूर्तीची पूजा करणें तर शास्त्रनिषिद्ध आहे. मग आता याला काय उपाय? मथुरबाबूंनी एक शास्त्रज्ञ पंडितांची सभा बोलावली व त्यांना याबद्दल मत विचारलें. सभेंत सर्वांनी असेंच सांगितलें की भग्नमूर्ति काढून टाकावी व तिच्याऐवजी दुसरी एक आणून बसवावी. ती मूर्ति सुंदर असल्यामुळे, पंडितांचा हा निर्णय ऐकून मथुरबाबूंना आता ही मूर्ति टाकून द्यावी लागणार, या विचाराने वाईट वाटलें. परंतु बाबा (रामकृष्णांस तो बाबा म्हणत असे) याबद्दल काय म्हणतात तें तर पाहूं असा त्यांनी विचार केला. त्यांना विचारतांच ते म्हणाले—"राणीच्या जावयांपैकी एखाद्याचा पडून पाय मोडला, तर त्याला टाकून देऊन त्याच्या जागीं दुसरा एकजण आणून ठेवावयाचा, की त्याचा पाय दुरुस्त करण्याची व्यवस्था करावयाची? इथेंहि तसेंच केलें पाहिजे!" बाबांचा हा निर्णय ऐकून मथुरबाबू व इतर मंडळी थक्क झाली व मथुरबाबूंना फार आनंद झाला. इतकी सहज गोष्ट कोणाच्याच कशी डोक्यांत आली नाही? इतका

वेळ जी मूर्ति गोविंदजीच्या दिव्य आविर्भावाने जिवंत आहे, अशी दृढ श्रद्धा व विश्वास सर्वांच्या मनांत होता तो सर्व त्या मूर्तीचा पाय भंगताच त्याबरोबरच नाहीसा झाला ? इतके दिवस ज्या मूर्तीच्या आश्रयाने श्रीभगवानाची पूजा करून, त्यांना आपल्या हृदयांतील भक्तिप्रेम अर्पण केलें, ते सर्व त्या मूर्तीचा एक पाय भंगताक्षणींच, खऱ्या भक्ताच्या हृदयांतून नष्ट होईल काय ? की भक्ताचें प्रेम मूर्तीच्या आकाराचेंच असतें ? व त्या मूर्तीचा एक अवयव थोडाफार कमी होतांच, त्याच प्रमाणांत तेंहि कमी होत असते ? पंडितांपैकी कांहींना रामकृष्णांचा हा निर्णय पटला, काहींना पटला नाही. मथुरबाबूंना बाबांचा निर्णय मान्य झाला. रामकृष्णांनी तो भंगलेला पाय अशा बेमालूम रीतीने बसवला की त्या मूर्तीचा पाय भंगलेला आहे असे कोणाच्याहि लक्षांत येऊं नये ! मूर्ति भंगल्याचे समजतांच, मथुरबाबूंनी एक नवीन मूर्ति तयार करण्यास एका कारागिरास सांगितलेंहि होतें. ती मूर्ति तयार होऊन आल्यावर ती राधागोविंदजीच्या मंदिरांत एका बाजूस तशीच ठेऊन दिली व पहिल्याच मूर्तीची पुन्हा एकदा प्राणप्रतिष्ठा मात्र केली. ती दुसरी मूर्ति अजूनहि तेथे तशीच पडून राहिलली आहे. मथुरबाबूंनी क्षेत्रनाथाला कामावरून दूर केलें, गदाधरांना त्याच्या जागीं नेमले व हृदयला रामकुमाराच्याच हाताखाली ठेवले.

हृदय सांगत असे–" मामांची पूजा म्हणजे एक पाहण्यासारखी गोष्ट असे. जे कोणी ती पाहात, ते अगदी मोहून जात ! तसेच त्यांचे गायन. तें कोणी ऐकलें म्हणजे तें त्याच्या आठवणींतून कधीहि जात नसे. त्यांच्या गाण्यांत वस्तादी ढंग अथवा हातवारे वगैरे काहीहि नसे. असे फक्त ताल-लयांची विशुद्धता व गीतोक्त विषयांत तन्मय होऊन, हृदयाला हालवून सोडणाऱ्या मधुर आवाजाने तो व्यक्त करण्याची कुशलता ! भाव हाच संगीताचा प्राण आहे, ही गोष्ट त्यांचें गायन ऐकून पूर्णपणे पटत असे व ताल-लयांची विशुद्धता नसेल तर हा भाव यथायोग्य प्रकट होत नाही, हेंहि, इतरांच्या गाण्यांशीं त्यांच्या गाण्याची तुलना करून समजून येई. राणी रासमणीला त्यांचें गाणें फार आवडे; ती देवीच्या दर्शनास आली म्हणजे तिने नेहमी त्यांच्याकडून गाणीं म्हणवून घ्यावीं.

त्यांचें गायन इतके मधुर लागण्याचें आणखीहि एक कारण असें. ते गात असतां इतके तन्मय होऊन जात, की आपण दुसऱ्या कोणास गाऊन दाखवीत आहों, याचा त्यांना पूर्ण विसर पडे ! गीतोक्त विषयात ते इतके तन्मय होऊन जात की त्यांचे इतर कशाकडेहि लक्ष नसे ! अत्यंत भक्तीने गाणारे सुद्धा श्रोत्याकडून प्रशंसा मिळविण्याची थोडीफार तरी अपेक्षा करीतच असतात. पण रामकृष्णांची गोष्ट तशी नसे व कोणी त्यांच्या गाण्याची प्रशंसा केली, तर हे लोक या गीतोक्त विषयाचीच प्रशंसा करीत आहेत, आवाजाची नव्हे, असेंच खरोखर त्यांना वाटे.

हृदय सांगत असे-" देवीपुढे बसून ते गाणीं, पदे वगैरे गात असत. त्यांच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहात असत व त्यांनी त्यांचे वक्षःस्थल भिजून जाई ! पूजेमध्ये ते इतके तन्मय होऊन जात की त्यावेळीं कोणी तेथे आलें अथवा जवळ उभे राहिलें, तरी त्यांना त्याचे भानच नसे ! " रामकृष्ण स्वतः सांगत-" अंगन्यास वगैरे पूजांगें करीत असता, ते ते मंत्रवर्ण उज्ज्वल अक्षरांनी आपल्या देहावर उमटत आहेत, असें मला प्रत्यक्ष दिसे ! सर्पाकृति कुंडलिनी शक्ति, सुषुम्नामार्गाने सहस्रारकमलाकडे चालली असून, शरीराचा जो जो भाग सोडून ती पुढे जात आहे, तो तो भाग, तत्काळ निस्पंद, बधिर व मृतवत होत आहे, असें मला प्रत्यक्ष अनुभवास येई ! पूजापद्धतीच्या विधानानुसार,-" रं इति जलधारया वन्हिप्राकारं विचिंत्य-" म्हणजे आपल्या भोवती पाण्याच्या धारेने रिंगण करून, पूजकाने " आपल्या भोवती आता अग्नीचें वेष्टन झाले आहे व म्हणून कसलेहि विघ्न त्या जागेंत येऊं शकत नाही " असे चिंतन करावे-इत्यादि मंत्रोच्चार करतांना मला प्रत्यक्ष दिसें की, अग्नीने आपल्या शंभर जिभांनी माझ्या सभोवती एक कोटच तयार केला असून, कसलेंहि विघ्न त्यांतून आंत शिरूं शकत नाही !! " हृदय सांगे की " पूजेच्या वेळचें त्यांचे तेजःपुंज शरीर व तन्मयता पाहून मंडळी आपापसांत म्हणत, साक्षात् ब्रह्मण्यदेवच नरदेह धारण करून पूजा करीत बसला आहे की काय ? " असो.

रामकुमारांनी दक्षिणेश्वरीं नोकरी पत्करल्यापासून त्यांच्या सांसारिक अडचणी बऱ्याचशा कमी झाल्या होत्या खऱ्या; तरी आपल्या धाकट्या भावाचा उत्तरोत्तर वाढणारा उदासीन भाव व निर्जनप्रियता पाहून त्यांना फार काळजी वाटे. याला कसल्याच गोष्टींचा हुरूप नाही, हृदयाशिवाय इतर कोणाशीं, फारसें बोलणें चालणें नाही, वगैरे गोष्टींवरून त्यांना वाटे की, याला आपल्या घरची व आईची फार आठवण होत असेल, म्हणून हा असा उदास झाला असावा. पण कित्येक दिवस झाले तरी, त्याच्या तोंडून घरी जाण्याची गोष्टच निघना, हें पाहून मात्र त्याचा स्वभाव असा होऊं लागण्याचें कांहीच कारण त्यांच्या लक्षांत येईना. पुढे मथुरबाबूंनी त्याला पुजारी नेमल्यावर रामकुमारांस जरा बरें वाटलें. अलीकडे रामकुमारांची प्रकृति ठीक नसे व मध्येच एखादे वेळीं आपलें कांही बरें वाईट झाल्यास, आपल्या कुटुंबाची स्थिति फार वाईट होईल असें त्यांस वारंवार वाटे. म्हणून धाकट्या भावाला पुजारीपणाचीं सर्व कामें नीट शिकवून ठेवावीं, म्हणजे आपल्यामागे तरी तो चार पैसे मिळवूं लागेल असें त्यांना वाटलें. त्या विचाराने रामकुमारांनी गदाधरांना देवीची पूजा, चंडी-पाठ वगैरे सर्व शिकवण्यास सुरुवात केली. गदाधरांची स्मरणशक्ति अलौकिक असल्यामुळे त्यांनी हें सर्व तेव्हांच शिकून घेतलें व पूजेच्या वेळीं या सर्वांचा उपयोग करण्यासहि सुरुवात केली. हें पाहून रामकुमारांस बरें वाटलें व मथुरबाबूंच्या संमतीने गदाधरांना श्रीदेवीची पूजा करावयास सांगून त्यांनी आपण स्वतः राधागोविंदजीची पूजा स्वीकारली. इकडे शक्तिदीक्षा घेतल्यावांचून देवीची पूजा करणें योग्य नाही असें जाणून, गदाधरांनी श्री केनाराम भट्टाचार्य नांवाच्या एका शक्तिउपासक व उच्च दर्जाच्या साधकाकडून शक्तिदीक्षा घेतली. असें सांगतात की, दीक्षा घेतांक्षणीं गदाधरांना भावावेश प्राप्त झाला. त्यांची असाधारण भक्ति पाहून केनारामांसहि अत्यंत आनंद वाटला व त्यांनी त्यांना प्रसन्न चित्ताने आशीर्वाद दिला.

यानंतर कांही दिवसांनी मथुरबाबूंना सांगून हृदयला आपल्या कामावर नेमून कांही दिवस आपल्या घरीं जाऊन येण्याचा रामकुमारांनी विचार केला

परंतु त्यांचे घरी जागे झालें नाही. एक दिवस कलकत्त्याचे उत्तरेस श्याम-नगर येथें ते कांही कामासाठी गेले असतां त्यांना अकस्मात देवाज्ञा झाली (सन १८५७). रामकुमार देवीच्या पूजकपदावर सुमारें एक वर्ष होते.

---

# १४. व्याकुळता व प्रथमदर्शन

“ लज्जा, घृणा, भय हीं तीन असतील तर ईश्वरलाभ होत नाहीं. ”

“ अत्यंत व्याकुळ होऊन ईश्वराचा धांवा करा. मग पाहूं बरें तो कसा दर्शन देत नाहीं तें ! ”

“ पाण्यांत बुडविलें असतां वर येण्यासाठीं जसा प्राण व्याकुळ होतो, तसा ईश्वरदर्शनासाठीं होईल, तेव्हांच त्याचें दर्शन होतें. ”

“ सतीचें पतीवरील प्रेम, आईचें अपत्यावरील प्रेम आणि विषयी माणसाचें विषयावरील प्रेम हीं तिन्ही एकत्र करून ईश्वराकडे लावल्यास त्याचें दर्शन घेतां येतें. ”

“ ईश्वराचें दर्शन घेतां येतें रे ! आत्ता तुमच्या माझ्यांत जशा गप्पागोष्टी चालल्या आहेत, त्याहून अधिक स्पष्टपणे ईश्वराशीं बोलता येतें रे ! खरेंच सांगतों, शपथपूर्वक सांगतों !! ”

“ ईश्वरदर्शनाची व्याकुलता—फार कांहीं नाहीं, तीनच दिवस, नाहीं चोवीसच तास,—मनात टिकवा, की त्याचें दर्शन झालेंच पाहिजे ! ”

—श्रीरामकृष्ण

---

पितृतुल्य रामकुमारांच्या मृत्यूनें गदाधरांना अत्यंत दुःख झालें. रामकुमार त्यांच्याहून ३१ वर्षांनी वडील होते व पित्याच्या मृत्यूनंतर गदाधरांना

त्यांनीच लहानाचें मोठें केलें होतें व त्यांना आपल्या पित्याची आठवण होऊं न देण्याची काळजी घेतली होती.

रामकुमारांचा असा एकाएकी अंत झाल्यापासून गदाधर संसाराविषयी अधिकच उदासीन होऊन, सर्वकाळ देवीच्या पूजाध्यानांतच निमग्न होऊन राहूं लागले व मनुष्याला ईश्वराचें दर्शन होणें खरोखरच शक्य आहे की नाही, याशिवाय त्याना दुसरा विषयच सुचेनासा झाला. आपण इतक्या व्याकुळतेने धांवा करतों, तो एकणारें खरोखरच कोणी असेल काय ? आपली पूजा ग्रहण करणारें, कोणी असेल काय ? या जगाचा नियंता खरोखरीच कोणी असेल काय ? हेच विचार त्यांच्या मनांत आता एकसारखे घोळूं लागले. यावेळेपासून देवीजवळ तन्मय होऊन बसून, त्यांनी दिवस घालवावा; मध्ये मध्ये रामप्रसाद, कमलाकांत, वगैरे भक्तांचीं पदें देवीला ऐकवीत, प्रेमाने व भक्तीने विव्हल होऊन देहभानहि विसरावें ! यावेळेपासून त्यांनी गप्पागोष्टी अगदी बंद केल्या व दुपारच्या वेळीं देवीच्या मंदिराचे द्वार जेव्हां बंद होई, तेव्हां सर्व लोकांच्यापासून दूर पंचवटी * जवळच्या जंगलांत जाऊन तेथे, जगन्मातेच्या चिंतनांत ते आपला वेळ घालवूं लागले.

आपल्या मामांचें असें उदासीन वर्तन हृदयला आवडलें नाही. पण करतो काय ? मनांत येईल तें कोणासहि न भितां बेधडक करण्याचा त्यांचा स्वभाव त्याला पूर्णपणे माहीत होता व म्हणून येथे आपलें कांही चालणार नाही, हें तो जाणून होता. पण दिवसेंदिवस त्यांचा स्वभाव जास्त जास्तच बदलत चाललेला पाहून, कधी कधी त्यांना एखादी गोष्ट सांगितल्यावांचून त्याच्याने राहवेना. रात्रीं सर्वांना झोप लागल्यावर, मामा उठून कोठे तरी निघून जात, यामुळे तर त्याला फारच काळजी वाटे. कारण दिवसां पूजा वगैरेंचे तसे श्रम, आणि रात्रीचें हें

---

* कालीमंदिराच्या आवारांतील एक ठिकाण. येथ अश्वत्थ, बेल, वड, अशोक व आंवळी अशीं पांच झाडे जवळ जवळ उगवलीं आहेत.

असे जागरण: त्यांत आहार कमी झालेला—मग मामांची प्रकृति तरी चांगली राहील कशी ? हा विचार मनांत येऊन याला कांही उपाय शोधून काढण्याचा हृदयने निश्चय केला.

पंचवटीच्या आजूबाजूची जमीन तेव्हां सध्यासारखी सपाट नव्हती. ठिकठिकाणीं खड्डे होते व सर्व जागा झाडाझुडपांनी भरून गेलेली होती. एकतर कबरस्तान: त्यांत चोहोकडे खांचखळगे व झाडेंझुडपे वाढलेलीं—यामुळे त्याठिकाणीं दिवसासुद्धा कोणी फिरत नसे. कोणी गेलेंच, तर जंगलांत तरी जात नसे. मग रात्रीची तर गोष्टच बोलावयास नको ! भुतांखेतांच्या भयानें तिकडे जाण्याचें कोणी नांवहि काढीत नसे. त्या झुडुपांत एक आंवळीचे झाड उगवलें होतें. त्या आंवळीच्या झाडाखाली थोडीशी सपाट जागा असून, त्याचे भोंवतीं अनेक झाडेंझुडुपें वाढलीं असल्यामुळे, त्याखाली कोणी बसल्यास जंगलाबाहेरून ते कोणासहि दिसत नसे. गदाधर रात्रीं याच ठिकाणीं बसून ध्यान, जप वगैरे करीत.

एके दिवशीं रात्रीं नित्याप्रमाणे गदाधर या ठिकाणाकडे जाण्यास निघतांच, हृदयहि उठून त्यांना न कळवितां, त्यांच्या मागोमाग निघाला. गदाधर तेथे जाऊन ध्यान करीत बसतांच, त्यांना भय दाखविण्यासाठीं बाहेरूनच, हृदय ढेकळें दगड तिकडे फेकूं लागला. बराच वेळ झाला, तरी गदाधर बाहेर येईना, म्हणून कंटाळून त्याने घराचा रस्ता धरला. दुसऱ्या दिवशीं त्याने विचारलें, "मामा, रात्रीं जंगलांत जाऊन तुम्ही काय करीत असता ?" गदाधरांनी उत्तर दिलें, "तेथे एक आंवळीचें झाड आहे, त्याखाली बसून जपध्यान करीत असतों. शास्त्रांत सांगितलें आहे की आंवळीच्या झाडाखाली बसून जो जें इच्छितो, तें त्याला प्राप्त होतें." हे ऐकून हृदय गप्प बसला.

यानंतर कांही दिवसांनी गदाधर तेथे जाऊन बसतांच, तेथे दगड, ढेकळें वगैरे येण्यास सुरवात व्हावी ! हें हृदयचेंच काम आहे असे जाणून त्यांनी तिकडे

लक्षच देऊं नये. त्यांना भय दाखविण्याचे आपले प्रयत्न सफल होत नाहीत असे पाहून, आता यापुढे काय करावें हेंच हृदयला समजेना. एक दिवस गदाधर तेथे जाऊन बसण्यापूर्वीच हृदय जंगलांत गेला व आपल्या मामांची वाट पाहात बसला. थोडयाच वेळांत गदाधर तेथे आले व नेसलेलें धोतर फेकून टाकून व गळयांतलें जानवें बाजूस काढून ठेऊन, त्यांनी ध्यानास सुरुवात केली ! हें पाहून हृदयला फार विस्मय वाटला व लगेच उठून, त्यांच्यासमोर येऊन तो त्यांना म्हणाला, " मामा, हे काय ? तुम्हांला वेड तर नाही ना लागलें ? ध्यान करायचें तर करा, पण असें नागडें उघडें होऊं नका ! " दहापांच हांका मारल्यावर गदाधर भानावर आले व हृदयचा प्रश्न ऐकून म्हणाले, " तुला काय ठाऊक आहे ? अशाच रीतीने पाशमुक्त होऊन ध्यान करावें लागतें. लज्जा, घृणा, भय, कुल, शील, जाति, मान व अभिमान या अष्ट पाशांनी मनुष्य जन्मापासून बांधलेला असतो. यज्ञोपवीत सुद्धा " मी ब्राह्मण, मी सर्वाहून श्रेष्ठ " या अभिमानाचेंच चिन्ह असल्यामुळे एक पाशच आहे. जगन्मातेचें ध्यान करितांना हे सर्व पाश फेकून देऊन ध्यान करावे लागते, म्हणून मी असें करतो. ध्यान संपल्यानंतर परत येतांना पुन्हा धोतर नेसेन व जानवे घालीन ! " हृदयने ही तऱ्हा कुठेहि ऐकली नव्हती. पण त्याला यावर कांहीच बोलता येईना व आपल्या मामांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगण्याचे त्याचे सर्व बेत जागच्या जागा जिरून गेले.

या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवणे आवश्यक आहे. कारण ती समजली म्हणजे रामकृष्णांच्या पुढील जीवनांतील कित्येक गोष्टींचें मर्म सहज लक्षांत येईल. वरील गोष्टींवरून वाचकांच्या ध्यानांत ही गोष्ट आलीच असेल की अष्टपाशांचा मनानें त्याग करण्याचा प्रयत्न ते करीत होते, एवढेंच नव्हें तर शरीरानेहि करण्याचा खटाटोप करीत होते. पुढेहि कित्येक प्रसंगीं त्यांनी हाच मार्ग स्वीकारल्याचें दिसून येईल.

अहंकाराचा नाश करून अंगीं यथार्थ नम्रता बाणून घेण्यासाठी, त्यांनी अत्यंत घाणेरडया जागाहि (शौचकूप वगैरे) आपल्या हाताने झाडून काढाव्या!

"समलोष्टाश्मकांचन" झालें नाहीं तर शारीरिक सुखलाभरूप उद्देशापासून परावृत्त होऊन मनुष्याचें मन ईश्वरचरणीं स्थिर राहूं लागणार नाही असें ऐकून कांही नाणीं व ढेंकळें हातांत घेऊन सोन्याला माती व मातीला सोनें म्हणत यांनी तीं दोन्ही गंगेंत फेकून द्यावीं.

सर्व जीव शिवस्वरूप आहेत, ही भावना दृढ करण्यासाठी कालीमंदिरांत भिकाऱ्यांची पंगत उठल्यावर त्यांचें उच्छिष्टान्न देवप्रसाद म्हणून त्यांनी मस्तकीं धारण करावें व त्यांतील थोडें भक्षणहि करावे! नंतर पत्रावळी गोळा करून डोक्यावर घेऊन स्वतः गंगेंत नेऊन टाकाव्या! पंक्तीची जागा सडा टाकून व झाडून स्वच्छ करावी व आपल्या या नश्वर शरीराकडून इतकी तरी शिवसेवा घडली, असें समजून स्वतःस धन्य मानावें!

अशा किती तरी गोष्टी सांगतां येतील. या सर्व प्रसंगीं हें स्पष्टपणे दिसून येतें की, ईश्वरलाभाच्या मार्गांतील प्रतिकूल विषयांचा त्याग नुसत्या मनानेंच करून ते स्वस्थ बसत नसत, तर स्थूलभावानें त्या सर्वांचा प्रथम त्याग करून अथवा आपलीं इंद्रियें व शरीर यांना त्यांच्यापासून शक्य तितके दूर ठेऊन त्यांना त्या विषयांच्या विरुद्ध मुद्दाम वर्तन करावयास लावीत! असें दिसून येते की, या त्यांच्या कृतीने त्यांच्या मनांतील पूर्वसंस्कार समूळ नष्ट होऊन जात व त्यांच्या जागीं त्यांच्या उलट संस्कार उत्पन्न होऊन ते इतके दृढ होऊन जात, की त्यांच्याकडून पुन्हा विपरीत कार्य होऊंच शकत नसे.

पूर्वसंस्कार नष्ट करण्याविषयी अत्यंत उदासीन असलेल्या आम्हां मानवांना असें वाटतें की, रामकृष्णांना अशा प्रकारचें आचरण करण्याची कांही एक आवश्यकता नव्हती. त्यांच्या या आचरणाचा विचार करतांना कोणी म्हणतील की " अपवित्र स्थानें झाडणें, सोनें माती, माती सोनें ' करीत बसणें, भिकाऱ्यांचें उच्छिष्टान्न भक्षण करणें वगैरे गोष्टी म्हणजे त्यांनी आपल्याच मनाने काढलेला साधनामार्ग आहे असें वाटतें व अशा प्रकारच्या अश्रुतपूर्व उपायांचें अवलंबन

करून, त्यांना जें फल मिळालें असेल, तें यापेक्षा इतर सहज उपायांनी मिळूं शकलें नसतें काय ? " त्यांना इतकेंच विचारणें आहे की, अशा प्रकारचें बाह्य अनुष्ठान न करतां, केवळ नुसत्या मनाने सर्व विषयांचा त्याग करून रूपरसादि विषयांपासून पूर्णपणे विमुख होऊन, आजपर्यंत किती जणांना आपलें मन अगदी सोळा आणे, ईश्वरचिंतनांत तन्मय करतां आलें आहे ? मन एका मार्गाने व शरीर त्याच्या विरुद्ध मार्गाने जर जाऊं लागले तर कोणत्याहि महत्वाच्या कामांत सिद्धिलाभ होऊं शकणार नाही; मग ईश्वरलाभाची गोष्टच बोलावयास नको. भोगसुखाला चटावलेल्या मानवमनास ही गोष्ट कळत नाही; अथवा कळली तरी वळत नाही. अमुक एका विषयाचा आपल्याला त्याग केला पाहिजे, ही गोष्ट पटल्यावरहि, तो पूर्वसंस्कारानुसारच वागत राहून, शरीरद्वाराहि त्या विषयाचा त्याग करण्याचा प्रयत्न करीत नाही, व " अं:, शरीराने त्याग केला नाही म्हणून काय झालें ? मी मनाने तर त्याचा त्याग केला आहे ! " असें म्हणून तो स्वतःचीच फसवणूक करीत असतो. योग व भोग हे दोन्हीहि मी एकाच काळीं ग्रहण करीन अशी त्याची भ्रामक समजूत झालेली असते. परंतु प्रकाश व अंधःकार यांप्रमाणे योग व भोग ह्या दोन वस्तु कधीच एकत्र राहूं शकत नाहीत. कामकांचनमय संसार व ईश्वरसेवा, या दोन्ही गोष्टी एकाच काळीं करतां येतील, असा एखादा सोपासा मार्ग, आध्यात्मिक जगतांत आजपर्यंत कोणीहि काढूं शकला नाही. यासाठीच शास्त्राची शिकवण असते की " ज्याचा त्याग करावयाचा, त्याचा कायावाचामनें त्याग केला पाहिजे, ज्याचें ग्रहण करावयाचें असेल, तेंहि तसेंच कायावाचामनें केलें पाहिजे; तरच साधक ईश्वरलाभाचा अधिकारी होईल,— " नान्यः पंथा विद्यतेऽयनाय । " असो.

अग्रजाच्या मृत्युपासून गदाधर अधिकच तन्मयतेने जगदंबेच्या जपध्यानांत निमग्न राहूं लागले व तिच्या दर्शनासाठी जें कांही केलें पाहिजे असें त्यांना वाटे तें ते तात्काळ करूं लागले. रामकृष्ण स्वतः सांगत—" यथारीति पूजा केल्यावर रामप्रसाद वगैरे भक्तसाधकांचीं पदें देवीला म्हणून दाखविणें हें माझें-

पूजांगांपैकीच एक अंग होऊन बसलें. त्यांचीं पदें देवीला म्हणत असतां माझें चित्त अपार उत्साहानें भरून जावें व वाटावें 'रामप्रसाद वगैरेंना तर मातेचें दर्शन झालें होतें, तर मग मातेचें दर्शन घेतां येतें हें खास. मग तें मलाच तेवढें मिळणार नाही काय ?' मग मीं व्याकुळ होऊन म्हणावें, "आई ! तूं रामप्रसादाला दर्शन दिलेंस आणि मलाच तेवढें देत नाहीस अं ? मला धन नको, मान नको, भोगसुख नको—कांही नको. फक्त तुझें दर्शन मात्र दे !" अशी प्रार्थना करीत असतां, त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागाव्या व रडण्यानें हृदयाचा भार जरा हलका झाला म्हणजे त्यांनी पुन्हा गाणीं पदें म्हणूं लागावें ! अशा रीतीनें पूजा, ध्यान, जप, भजन, यांत त्यांचे दिवसचे दिवस जाऊं लागले व त्यांच्या अंतःकरणाची व्याकुळता अधिकाधिक वाढूं लागली. दिवसेंदिवस पूजेचा वेळहि थोडाथोडा वाढूं लागला. पूजा करीत असतां एखादे वेळीं त्यांनी आपल्याच डोक्यावर फुलें वाहून घेऊन दोन दोन तास स्पंदहीन होऊन बसावें; अथवा देवी नैवेद्य ग्रहण करीत आहे या भावनेनें कितीतरी वेळ नैवेद्यच दाखवीत बसावें; पहाटे उठून, सुंदर सुंदर फुलें तोडून आणून, त्यांनी देवीसाठीं माळा स्वतः तयार कराव्या व त्यांनी देवीला सजविण्यांत किती तरी वेळ काढावा; अथवा तिसरे प्रहरी आणि आरतीनंतर अशा तन्मयतेनें पदें म्हणत बसावें, की किती किती वेळ झाला याचें त्यांना मुळीच भान उरूं नये व लोकांनी वरचेवर सांगितल्यावर मग भानावर यावें—असे प्रकार सुरू झाले !!

अशा प्रकारची विलक्षण निष्ठा, भक्ति, व्याकुळता पाहून सर्व लोकांची दृष्टि गदाधराकडे वेधली. साधारण लोक ज्या मार्गानें जात असतात तो मार्ग सोडून जर कोणी निराळ्याच मार्गानें जाऊं लागला, तर प्रथम प्रथम लोक त्याची चेष्टा करतात; पण कित्येक दिवस झाले तरी जेव्हां त्याच्या आचरणांत फरक पडत नाही व तो आपल्याच मार्गानें शांतपणें चालला आहे असें दिसून येतें, तेव्हां त्याच्याविषयीं लोकांची निराळीच धारणा होते आणि त्याचेबद्दल एक

प्रकारचा आदर त्यांना वाटूं लागतो. गदाधराच्या बाबतींत हीच गोष्ट घडून आली. कांही दिवसपर्यंत लोकांनी त्याची चेष्टा केली; पण पुढे त्यांचीं मनें बदललीं व पुष्कळांना तर त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला. असें सांगतात की, गदाधराची पूजा व तन्मय भाव पाहून मथुरबाबूंना फार आनंद होऊन ते राणीस म्हणाले, "आपल्याला मोठा अद्भुत पुजारी लाभला आहे. देवी फार लौकर जागृत होईल?"

दिवसांमागून दिवस जाऊं लागले व गदाधरांची व्याकुलता अधिकाअधिक वाढत जाऊन तिचा परिणाम त्यांच्या शरीरावरहि दिसूं लागला. त्यांचा आहार व निद्रा कमी झाली, वक्षःस्थल सदासर्वकाळ आरक्त दिसूं लागलें; डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा सर्वदा वाहूं लागल्या; आणि पूजेवांचून इतर वेळीं, मनांतील प्रचंड व्याकुळतेने, त्यांच्या शरीरांत एक प्रकारची अशांति व चंचलता नेहमी दिसून येऊं लागली.

श्रीरामकृष्णांच्याच तोंडून असें ऐकलें आहे की, याच सुमारास एके दिवशीं ते नेहमीप्रमाणे तन्मयतेने जगदंबेपुढे गाणीं म्हणत होते व "आई! इतक्या तुला हांका मारतोंय, आणि इतक्या तुझ्या विनवण्या करतोंय, पण त्या तुला ऐकूंच येत नाहीत कां ग? तूं रामप्रसादाला दर्शन दिलेंस आणि मलाच तेवढें देत नाहीस, असें कां ग?" असा त्यांचा एकसारखा आक्रोश चालला होता. ते म्हणत, "आईचें दर्शन झालें नाही, म्हणून हृदयांत भयंकर वेदना उत्पन्न झाल्या. एखादें भिजलेलें वस्त्र जसें पिळावें, तसें माझें हृदय जणूं काय कोणी पिळून काढीत आहे की काय, असें वाटूं लागलें! आईचें दर्शन कधीच होणार नाही की काय, या विचाराने प्राण घाबरा झाला व असें वाटलें की, "तर मग आता जिवंत राहून तरी काय करावयाचें आहे? देवीच्या पायापाशी प्राण द्यावा, म्हणजे झालें." इतक्यांत त्या गाभाऱ्यांत एक तलवार होती तिच्याकडे एकदम नजर गेली. त्याबरोबर तिच्या एका घावाने जिवाचा निकाल करून टाकावा, म्हणून एखाद्या उन्मत्तासारखा तिच्याकडे

धांवलों व ती हातांत घेऊन आता छातींत भोसकणार, इतक्यांत आईचें अपूर्व अद्भुत दर्शन झालें आणि देहभान नाहीसें होऊन खाली पडलों ! ! त्यानंतर बाहेर काय झालं व तो दिवस आणि त्याच्यापुढील दिवस कसा निघून गेला, हें कांहीच समजलें नाही ! अंतःकरणांत मात्र एक प्रकारचा अननुभूत असा आनंदाचा प्रवाह वाहूं लागला !”

दुसऱ्या एका प्रसंगी या दिवसाचें त्यांनी असें वर्णन केलें-“ घर, दार, मंदिर सर्व कुठेच्या कुठे नाहीसे होऊन गेले, कांही एक बाकी राहिलें नाही: आणि मग उरले काय ? तर एक असीम, अनंत, सचेतन ज्योतिःसमुद्र ! जिकडे पाहावें तिकडून त्याच्या उज्वल लाटा मोठा शब्द करीत, मला बुडविण्यासाठीं अत्यंत वेगाने धांवून येत आहेत ! पाहतां पाहतां, त्या जवळ येऊन ठेपल्या आणि माझ्या अंगावर आढळून मला त्यांनीं कोठल्याकोठे बुडवून टाकलें ! आणि मी त्यांत गुदमरून जाऊन, गटांगळ्या खात, संज्ञाशून्य होऊन पडलों ! ”

हें दर्शन झाल्यानंतर, श्रीजगन्मातेच्या चिन्मय मूर्तीचें सदासर्वकाळ अखंड दर्शन व्हावें, म्हणून त्यांनी अशा व्याकुळतेने आक्रोश करावा की सांगतां सोय नाही. सर्वकाळ अंतःकरणांत प्रचंड खळबळ चाललेली असावी. तिच्या वेदना होईनाशा झाल्या म्हणजे त्यांनी जमिनीवर लोळण मारावी व ओक्साबोक्शी रडत-“ आई ! माझ्यावर कृपा कर, मला दर्शन दे ! ” असा एवढ्याने आकांत करावा की तेथे लोकांची गर्दी जमावी ! लोक काय म्हणतील इकडे लक्ष द्यावें कुणी ? रामकृष्ण म्हणत-“ चारी बाजूंला लोक उभे राहिलेले असले तरी तीं माणसें नसून नुसत्या सावल्या अथवा चित्रें आहेत, असेंच वाटावें ! व म्हणून मनांत लज्जा अथवा संकोच मुळीच उत्पन्न होऊं नये. अशा रीतीने असह्य वेदनांनी बेहोष होऊन पडल्यानंतर मात्र आईची ती वराभयकरा, चिन्मयी ज्योतिर्मयी मूर्ति दिसावी ! व असें दिसावें की आई हासत आहे, बोलत आहे, नानाप्रकारांनी सांत्वन करीत आहे व शिकवीत आहे ! ! ”

# १५. मथुरबाबू व श्रीरामकृष्ण

## पहिले रसद्दार मथुरबाबू

"मी म्हणालों, 'आई, जर तूं माझी अशी अवस्था केलीच आहेस, तर आता माझ्या साऱ्या इच्छा तृप्त करील असा एखादा मोठा माणूस मला मिळवून दे;' म्हणून तर त्याने चौदा वर्षे माझी सेवा केली!"

"ब्राह्मणी त्याला प्रतापरुद्र म्हणे."

"आईने त्याला या शरीरामध्ये काय काय गोष्टी दाखविल्या! उगीच का त्याने चौदा वर्षे माझी सेवा केली?"

—श्रीरामकृष्ण

---

श्रीरामकृष्णांच्या साधनाकालीं, ज्या दोघांनी त्यांची अपूर्व सेवा केली, त्यांपैकी एकासंबंधाची (हृदयसंबंधाची) हकीगत वर सांगितलीच आहे. येथे दुसऱ्याची—मथुरबाबूंची—सांगून त्यांचा व श्रीरामकृष्णांचा किती अलौकिक दिव्य संबंध होता, याचें वर्णन करण्याचें योजिलें आहे.

मथुरबाबूंचें दर्शन घडण्याचें भाग्य आमच्यापैकी कोणालाच लाभलें नाही. श्रीरामकृष्णांच्याच सांगण्यावरून त्यांच्यावरची मथुरबाबूंची भक्ति व श्रद्धा इतकी विलक्षण होती असें दिसतें की, तशी कोठेंहि दिसून येणें संभवनीय वाटत नाही. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची इतकी भक्ति करूं शकतो, त्यावर इतकें प्रेम करूं शकतो ही गोष्ट श्रीरामकृष्ण व मथुरबाबू यांचा संबंध आम्हांस

माहीत झाला नसता, तर आम्हांस अथवा कोणासहि शक्यच वाटली नसती. शिवाय बाह्यतः पाहिलें तर, श्रीरामकृष्ण म्हणजे एक यःकश्चित् सामान्य पुजारी, व मथुरबाबू आणि रासमणी म्हणजे जातीने श्रेष्ठ नसलीं तरी धनाने, मानाने, विद्येने, बुद्धीने किती तरी श्रेष्ठ!—शिवाय लहानपणापासून श्रीरामकृष्णांचा स्वभावहि किती विचित्र? धन, मान, विद्या, पदव्या वगैरे मिळविण्यासाठी सर्वसाधारण लोक जेथे एकसारखे धडपडत असतात, तेथे यांचा पूर्ण उदासीनभाव! ते म्हणत—" उंच मनोऱ्यावर उभें राहून खाली बघितलें तर चार चार मजली हवेल्या, उंच उंच झाडें, आणि जमिनीवरचें गवत, हीं सारीं एक झालेलीं दिसतात!" आणि खरेंच त्यांचें मन लहानपणापासून सत्यनिष्ठा व ईश्वरानुराग यांच्या योगाने सर्वदा इतक्या उच्च अवस्थेंत राहात असे की, त्या ठिकाणाहून, ज्या धनमानविद्यादिकांचा थोडा फार अंश मिळविण्यासाठी आम्ही यातायात करीत असतों, तीं सर्व त्यांना एकाच किंमतीचीं दिसत! संसारावरची त्यांची दोषदृष्टीहि किती विलक्षण होती! शिक्षणास सुरुवात केल्यावर साधारणतः लोकांची दृष्टि तर्कालंकार, न्यायरत्न, महामहोपाध्याय, वगैरे पदव्यांकडे जाऊन, त्या मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेकडे लागावयाची; पण श्रीरामकृष्णांची दृष्टि उलट दिशेकडे गेली; हे पदवीधर सुद्धा दुपारची वेळ भागविण्यासाठी थोरामोठयांच्या खुशामती करतात, हेंच त्यांच्या दृष्टीने पाहिलें! विवाह करतांना संसारिक भोगसुखावर दृष्टि जावी, पण यांची गेली संसाराच्या क्षणभंगुरतेकडे व सुखाच्या क्षणिकत्वाकडे! पैसा असला म्हणजे संसारांत अनेक तऱ्हेचें सुख होतें इकडे नजर जावी,—तर त्यांची गेली ईश्वरलाभाच्या कामी पैसा किती निरुपयोगी आहे याकडे! संसारी लोक, दुःखी गरीब लोकांवर दया करून दाता, परोपकारी वगैरे म्हणवून घेतात याकडे यांचें लक्ष जावें, पण नाही;—त्यांनी पाहिलें की सारा जन्म परिश्रम करून काय मोठें मिळविलें? तर घातले दोनचार धर्मार्थ दवाखाने व स्थापल्या दोन चार मोफत शाळा, नाही तर बांधल्या दोन चार धर्मशाळा आणि मरून गेले! व जगाचा अभाव पुन्हा जशाचा तसाच राहिला! असेंच सर्व गोष्टींत!

अशा प्रकारच्या मनःप्रवृत्तीच्या माणसास नीट ओळखणे साधारण माणसांना फार कठीण, त्यांत विद्याभिमानी व श्रीमंत यांना तर अत्यंतच कठीण. कारण, संसारांत स्पष्ट उत्तरें व सरळ गोष्टी त्यांना ऐकावयास सापडत नसल्यामुळे, त्यांची ऐकण्याची क्षमता सुद्धा नष्ट झालेली असते. अर्थातच स्पष्टवक्ता व सरळ व्यवहाराच्या श्रीरामकृष्णांचें हृदय अनेक वेळीं त्यांना न समजून त्यांनी त्यांना असभ्य, वेडा, गर्विष्ठ वगैरे म्हणावें यांत कांही विचित्र नाही: आणि म्हणूनच राणी रासमणी व मथुरबाबू यांची त्यांच्यावरील भक्ति व प्रेम पाहून अत्यंत आश्चर्य वाटतें. असें वाटतें की, केवळ ईश्वराचीच कृपा म्हणून त्यांचे श्रीरामकृष्णावरलें इतकें दृढ प्रेम कमी न होतां कायम राहिलें, एवढेच नव्हें तर तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाऊन, त्यांचा गुरुभाव त्यांच्या अनुभवास येऊन त्यांच्या चरणीं सर्वतोभावाने आत्मविक्रय करण्यास ते समर्थ झाले! नाही तर, देवीप्रतिष्ठापनेच्या दिवशीं आपला वडील भाऊ पूजक असतां व त्यानेहि जगन्मातेचा प्रसाद ग्रहण केला असतां, शूद्रान्नाचें ग्रहण करावें लागेल, म्हणून ज्या श्रीरामकृष्णांनी उपवास केला व पुढेहि कांही दिवस स्वहस्तें करून खाल्लें; मथुरबाबूंनी वरचेवर बोलाविलें तरी विषयी मनुष्य म्हणून त्यांच्याशी बोलणेहि ज्या श्रीरामकृष्णांनी टाळलें; देवीचें पूजकपद ग्रहण करण्यास त्यांनी विनंत्या केल्या असतांना सुद्धा ज्या श्रीरामकृष्णांनी त्या मान्य केल्या नाहीत, त्याच श्रीरामकृष्णांविषयी राणी रासमणी व मथुरबाबू यांच्या मनांत, प्रथमपासून प्रीति उत्पन्न व्हावी व दिवसेंदिवस ती अधिकच वाढत जावी, ही गोष्ट कांही कमी आश्चर्याची नव्हे.

मथुरबाबूंचा श्रीरामकृष्णांवर असलेला अकपट भक्तिविश्वास ऐकून आमच्यासारख्या अविश्वासी संशयी माणसाचें मन म्हणूं लागतें-" होता एक वेडपा, अजागळ, फंदी माणूस झालें! नाही तर, एका माणसाचा दुसऱ्या एखाद्यावर असा भक्तिविश्वास कुठे बसत असतो की काय? त्याच्या जागीं जर आम्ही असतों, तर पाहिलें असतें, आपल्या चरित्रबळाने श्रीरामकृष्णांनी आमच्या मनांत इतका भक्तिविश्वास कसा उत्पन्न केला असता तें!

जगु काय असा भक्तिविश्वास उत्पन्न होणें ही एक अत्यंत निंद्य अशीच गोष्ट आहे ! श्रीरामकृष्णांच्या तोंडून व इतरत्रहि मथुरबाबूंची हकीगत ऐकून, तो म्हणजे वेडपा आणि अजागळ होता असें मुळीच वाटत नाही. तो कांही तुमच्या आमच्या पेक्षा कमी बुद्धिमान व संशयी नव्हता. त्याने देखील श्रीरामकृष्णांचें अलौकिक चरित्र व कार्यकलाप यांविषयी संदिग्ध होऊन, पदोपदीं त्यांची परीक्षा करून, त्यांना कांही थोडें थोडकें सतावलें नाही. पण परीक्षा केली म्हणून काय होतें ? श्रीरामकृष्णांच्या अदृष्टपूर्व विज्ञानवादिनी, प्रेमावर्तशालिनी, अशा महा ओजस्विनी भाव-मंदाकिनीच्या गुरुगंभीर प्रवाहाच्या वेगापुढे, मथुरबाबूंचा संदेहसिकता- सेतु कितीसा वेळ तगावा ? थोडक्याच वेळांत तो कोठच्या कोठे नाहीसा होऊन नामशेष झाला व मथुरबाबूंचे सर्व संशय नाहीसे होऊन ते अनन्य मनाने श्रीरामकृष्णांच्या चरणकमलीं शरण गेले.

मथुरबाबूंचा व श्रीरामकृष्णांचा संबंध म्हणजे एक अत्यंत विलक्षण गोष्ट. मथुरबाबू धनी, विषयी असूनहि भक्त; मोठे हट्टी करारी, पण बुद्धिमान ; क्रोधपरायण असून पुन्हा धैर्यवान; इंग्रजी शिकलेले: कोणी एखादी गोष्ट नीट समजावून सांगितली तर समजून घेणारे: ईश्वरविश्वासी व भक्त खरे, पण धर्माच्या नांवाने कोणी उगीच वाटेल तें सांगितलें, तर ऐकून घेणारे नव्हे—मग तें सांगणारे श्रीरामकृष्ण असोत की गुरु असोत की आणखी कोणी असोत ! उदार व सरळ स्वभावाचे—पण उगीच कोणाच्या थापांनी फसले जाणारे नव्हे. राणीचे इतर जावई हयात असतांहि, तिचा सर्व कारभार पाहण्यांत व त्याचा योग्य बंदोबस्त ठेवण्यांत मथुरबाबू म्हणजे तिचा उजवा हात होते आणि सासू व जावई या दोघांच्या कर्तबगारीनेच, राणी रासमणीचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें होतें.

श्रीरामकृष्णांचा सरळ स्वभाव, मधुर भाषण व सुंदर रूप यांनीच मथुरबाबूंचें मन प्रथम त्यांच्याकडे वेधलें. पुढे साधनांच्या प्रथमावस्थेंत जेव्हां कधी कधी त्यांना दिव्योन्माद होऊं लागला, जेव्हां जगदंबेची पूजा करितांना तन्मय होऊन

स्वतःमध्ये तिच्या मूर्तीचें दर्शन प्राप्त होऊन कधी कधी ते देवीचीं फुलें आपणांसच वाहून घेऊं लागले, जेव्हां अनुरागाच्या प्रबल वेगाने वैधी भक्तीची सीमा उल्लंघन करून, साधारण लोकांच्या दृष्टीने विचित्र आचरण करून लोकांचें हसें व निंदा याचा ते विषय होऊं लागले, तेव्हां तीक्ष्ण बुद्धिसंपन्न मथुरबाबूंनी असें ठरविलें की, ज्याला प्रथम पाहतांक्षणींच " हा सरळ प्रकृतीचा मनुष्य आहे," असें आपण ओळखलें, त्याच्याविरुद्ध कोणी कांही सांगितलें तरी, स्वतःची खात्री करून घेतल्याशिवाय, त्यावर विश्वास ठेवावयाचा नाही. म्हणून मथुरबाबूंनी नकळत दक्षिणेश्वरीं येऊन, श्रीरामकृष्णांचें वर्तन डोळयांत तेल घालून, वरचेवर निरीक्षण करून पाहिल्यावर त्यांचा सर्व संशय नष्ट होऊन, त्यांची खात्री झाली की– " गदाधर ही अनुराग व सरलता यांची मूर्तिमंत प्रतिमाच आहे; व त्यांच्या विचित्र वर्तनाचें कारण त्यांची अत्यंत भक्ति व विश्वास हेंच होय. " म्हणून ( बुद्धिमान् पण विषयी ) मथुरबाबूंनी त्यांना समजावण्याचाहि प्रयत्न केला की " जितकें पचेल तितकेंच खावें, भक्ति विश्वास असणें ठीक आहे, पण असें त्याने बेहोष होऊन कसें चालेल ? अशाने लोक निंदा करतील व चार चौघांचें सांगणें न ऐकतां आपल्याच मनाप्रमाणे वागल्याने बुद्धि भ्रष्ट होऊन वेडहि लागण्याचा संभव." परंतु वरवर असें सांगूनहि त्यांना मनांतल्या मनांत असें वाटे की, " रामप्रसाद वगैरे पूर्वीच्या साधकांचीहि भक्तीच्या भरांत अशीच अवस्था होऊन त्यांचेंहि वर्तन वेडयाप्रमाणे नसे कां होत ? यांची अवस्था व वर्तन त्यांच्याचसारखें नसेल कशावरून ? " असा विचार मनांत येऊन काय काय होतें तें स्वतः लक्ष लावून पाहण्याचा त्यांनी निश्चय केला. विषयी धन्याने आपल्या एका सामान्य चाकरासंबंधाने असे विचार ठरवावे, ही कांही कमी आश्चर्याची गोष्ट नाही.

भक्तीमध्ये एक प्रकारची संक्रामिका शक्ति असते. शारीरिक विकाराप्रमाणे मानसिक भावांचेंहि एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमण होत असतें, म्हणून एकाच्या अंतःकरणांत भक्तिरूप भाव जागृत झाला म्हणजे त्याने दुसऱ्याच्या अंतः-

करणांतील निद्रित भक्तिभाव जागृत करावा, ह्यांत आश्चर्य नाही. म्हणूनच धर्मभाव उद्दीपित करण्याचे कामीं, साधुसंगतीची इतकी महती शास्त्रें वर्णन करीत असतात. मथुरबाबूंच्या भाग्यांत अशीच गोष्ट घडली. त्यांनी श्रीरामकृष्णांच्या वर्तनाचें जसजसें निरीक्षण चालविलें तसतसा त्यांच्या हृदयांतील भक्तिभाव त्यांना न कळत जागृत होऊं लागला. तरी विषयी मनाचें असे होतें की, भक्तिविश्वासाचा आता उदय व्हावा, थोडया वेळाने पुन्हा संशय उत्पन्न व्हावा; तसें वारंवार अनेक दिवसपर्यंत झाल्यावरच त्यांचा विश्वास दृढ झाला व त्यांच्या हृदयांत श्रीरामकृष्णांना अढळपद मिळालें, हें खास. म्हणूनच असे दिसून येतें की, प्रथम प्रथमचें श्रीरामकृष्णांचें आचरण अतिशय भक्तीमुळेच विचित्र विचित्र दिसत आहे, असें त्यांस निःसंशय वाटून सुद्धा, उत्तरोत्तर ते जसें अधिकच वाढूं लागलें, तसें " यांना बुद्धिभ्रंश तर झाला नाही ? " असा मधून मधून संशयहि त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागला. या संशयानें त्यांच्या मनांत काळजी उत्पन्न व्हावी व उत्तम उत्तम नामांकित वैद्य आणून, त्यांच्याकडून श्रीरामकृष्णांची परीक्षा करून, योग्य औषधयोजना करण्याची व्यवस्था त्यांनी करावी !

इंग्रजी विद्येंत मथुरबाबूंची प्रगति कांही कमी नव्हती आणि त्या विद्येच्या प्रभावाने जो एक प्रकारचा स्वतंत्रपणा मनुष्याच्या विचारांत येतो, तोहि कांही मथुरबाबूंत कमी नव्हता. म्हणूनच " ईश्वरप्रेमांत बेहोष होण्याइतकें तन्मय होऊं नये, " अशा प्रकारचा उपदेश त्यांनी श्रीरामकृष्णांस केला असावा. तसेंच एका वेळीं, श्रीरामकृष्ण व मथुरबाबू यांच्यांत असा वाद उत्पन्न झालाः—मथुरबाबू म्हणाले—" ईश्वराला सुद्धा कायद्याप्रमाणे वागावें लागतें ! त्याने एकदा केलेला नियम रद्द करण्याचें, त्याला सुद्धा सामर्थ्य नसतें ! " श्रीरामकृष्ण म्हणत—" मी म्हणालों, ' कसें वेडयासारखें बोलतोस तूं हें ? अरे, ज्याने कायदा केला, तो आपला कायदा वाटेल तेव्हां रद्द करील, किंवा त्याच्या जागीं निराळाच कायदा सुरू करील ! ही त्याच्या खुषीची गोष्ट आहे ' ! " पण

त्यांना कांही केल्या ही गोष्ट पटेना. ते म्हणाले, ' लाल फुलाच्या झाडाला नेहमी लालच फूल यायचें, कारण की एकदा त्यानें तसा नियम घातला.' मी म्हणालों–' अरे, त्याच्या मनांत आलें तर तो वाटेल तें करील, मग पांढऱ्या फुलाची ती काय कथा ? ' त्याला तें कांही पटलें नाही. त्याच्याच दुसऱ्या दिवशी झाऊतलाकडे* शौचास गेलों असतां दिसलें की एका लालजवाच्या झाडावर एकाच डाहाळीला दोन फुलें असून त्यांतील एक तांबडें लाल आणि दुसरें अगदी पांढरें शुभ्र आहे—तांबडया रंगाची त्यावर छटा सुद्धा नाही ! पाहतांक्षणीं मी ती डहाळीच्या डहाळीच मोडून घेऊन मथुरकडे गेलों, आणि ती त्याच्यापुढे फेकून म्हणालों–' तूं नाहीं म्हणत होतास ना ? हें बघ ! ' मथुरने ती डहाळी नीट न्याहाळून पाहिली व चकित होऊन म्हणाला, ' हां बाबा ! मी हारलों ' ! "

अशा रीतीने कांही कौतुकानें, कांही, श्रीरामकृष्णांची व्याकुळता एखाद्या रोगामुळे उत्पन्न झाली आहे, अशा समजुतीनें; कधी कधी त्यांची व्याकुळता ईश्वराच्या अत्यंत प्रेमाने व भक्तीनेच उत्पन्न झाली आहे असे वाटून आश्चर्यानें व भक्तीने विषयी मथुरबाबू हळू हळू त्यांच्या संगतींत अधिक काळ घालवूं लागले व त्यांची नीट व्यवस्था ठेवण्यांत तत्पर राहूं लागले. त्यांनी स्वस्थ बसावें तरी कसें ? कारण नवानुरागाच्या प्रबल वेगाने, श्रीरामकृष्ण तर रोज एकेक नवीनच कारभार करून बसूं लागले. आज काय, स्वतःच्या अंतर्यामीं जगदंबेचें दर्शन प्राप्त झाल्यामुळे त्यानी पूजेचें सारे साहित्य स्वतःलाच वाहून घेतलें ! आज काय, संध्याकाळीं देवीची आरती एकसारखी तीन तास करून इतर नोकर–चाकरांना सतावून सोडिलें ! आज काय जगदंबेचें दर्शन झालें नाही म्हणून जमिनीवर गडबडा लोळून एवढयाने आक्रोश चालविला की, त्यांना झालें तरी काय ?--हें पाहण्यासाठी चोहोकडून लोक धांवून आले !

---

*दक्षिणेश्वर काली मंदिराच्या आवारांतील एक भाग. या बाजूस तेव्हां जंगल असे.

अशा एकेक दिवसाच्या गमती श्रीरामकृष्णांच्याच तोंडून आम्हाला ऐकावयाला सापडल्या आहेत !

एक दिवस शिवमंदिरांत जाऊन श्रीरामकृष्ण महिम्नस्तोत्राने महादेवाची स्तुति करूं लागले. हळू हळू—

असितगिरिसमं स्यात् कज्जलं सिंधुपात्रे ।
सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी ॥
लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालम् ।
तदपि तव गुणानाम् ईश ! पारं न याति ॥

हा श्लोक आला व तो म्हणत असतां, त्यांच्या हृदयांत शिवाच्या अपार महिम्याची जाणीव एकाएकी उत्पन्न झाली; श्लोक म्हणावयाचें तसेंच राहून गेलें व व्याकुळतेने विव्हल होऊन ते एकसारखे मोठमोठ्याने " प्रभो महादेवा ! तुझ्या गुणांचे वर्णन मी कसें करूं ? " असें म्हणूं लागले ! डोळ्यांतून अश्रुधारा एकसारख्या वाहूं लागून वक्षःस्थळ व भूमि भिजून गेली ! त्या रडण्याच्या आवाजाने देवळांतील इतर पुजारी व नोकर-चाकर धांवून आले व त्यांचें तें वेड्यासारखें रडणें व उन्मत्तासारखा व्यवहार पाहून चकित होऊन आता या सगळ्या आरडाओरडीचा काय परिणाम होतो तो पाहाण्यासाठी तेथेच तटस्थ उभे राहिले. कोणी कोणी म्हणूं लागले, " अँः, छोट्या भट्टाचार्यांचीच* वेडाची लहर आहे ना ? आम्हीं म्हटलें की दुसरें कांही आहे वाटतें ! आज स्वारी विशेष रंगांत दिसते ! " कोणी कोणी " बघा बरें, नाही तर स्वारी महादेवावरच स्वार होईल; बघतां काय ? हाताला धरून ओढा बाहेर ! " असें म्हणूं लागले ! चौघांचीं चार तोंडें ! मग काय ? त्यांचे वाटेल तसे तार तुटूं लागले.

---

* नोकर-चाकर लोक रामकृष्णांना छोटे भट्टाचार्य व रामकुमारांना बडे भट्टाचार्य म्हणत.

इकडे श्रीरामकृष्णांना बाहेर काय प्रकार चालला आहे, याची मुळीच शुद्ध नव्हती. शिवमहिम्याच्या अनुभवांत तन्मय होऊन त्यांच्या मनाने बाह्य जगत् सोडून देऊन, कोठे ऊंच भरारी मारली होती. त्या ठिकाणीं कुठलें जग आणि कुठल्या त्यांतल्या गडबडी !

त्या दिवशीं मथुरबाबू देवळांत आले होते. ही सारी गडबड श्रीरामकृष्णां-बद्दल चालली आहे असें ऐकून ते ताबडतोब शिवमंदिरांत गेले. नोकर-चाकर मोठ्या गडबडीने बाजूला झाले. आंत जाऊन श्रीरामकृष्णांची ती तन्मयता पाहतांच त्यांचे हृदय भक्तीने व आदराने भरून आलें. इतक्यांत 'श्रीराम-कृष्णांना बाहेर ओढून काढावें की काय?' असें कोणी विचारतांच क्रोधाने त्याच्याकडे पाहून ते म्हणाले, "खबरदार कोणी त्यांच्या अंगाला हात लावाल तर !" अर्थातच मग भीतीने कोणी पुढे कांहीं म्हणण्यास धजेना.

थोड्याच वेळांत श्रीरामकृष्ण सावध झाले व ती मंडळीची गर्दी व तींत मथुरबाबूहि उभे असलेले पाहून, एखाद्या लहान मुलाप्रमाणे भीतीने त्यांना विचारूं लागले- "बेहोष होऊन मीं भलतें सलतें तर कांही केलें नाहीना?" मथुरबाबू नमस्कार करून त्यांना म्हणाले-"नाही बाबा ! तुम्हीं कांही एक केलें नाही; तुम्ही स्तोत्र म्हणत होतां, आणि न समजून उगीच कोणी तुम्हांला त्रास देईल, म्हणून मी इथे उभा राहिलों होतों !"

श्रीरामकृष्णांच्या ज्वलंत संगतीने एकदा मथुरबाबूंना एक प्रकारचें विल-क्षण दर्शन प्राप्त होऊन त्यांचा श्रीरामकृष्णांवरील भक्तिविश्वास सहस्र पटीने वाढला, असें आम्हीं प्रत्यक्ष श्रीरामकृष्णांच्याच तोंडून ऐकलें आहे. एकदा श्रीरामकृष्ण आपल्याच विचारांत मग्न होऊन, आपल्या खोलीपुढच्या लांब व्हरांड्यांत येरझारा घालीत होते. देवालय व पंचवटी यांच्या मध्यभागीं जें एक अलग घर आहे,—ज्याला "बाबूंचें घर" म्हणून अजून सुद्धा म्हणतात—त्याच्या एका भागांत त्या दिवशीं मथुरबाबू एकटेच बसले होते. तेथून श्रीरामकृष्णांच्या

येरझारा त्यांना स्पष्ट दिसत होत्या. अर्थातच कांही श्रीरामकृष्णांच्या विषयी, तर कांही इतर कामकाजासंबंधी, निरनिराळे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. मथुरबाबू इथें बसले आहेत, याकडे श्रीरामकृष्णाचें मुळीच लक्ष नव्हते.

बघतां बघतां एकाएकीं मथुरबाबू चमकून उभे राहिले आणि धांवत जाऊन श्रीरामकृष्णांच्या पायांवर लोटांगण घालून उठले आणि त्यांचे दोन्ही पाय घट्ट धरून त्यांनी रडण्यास सुरुवात केली! श्रीरामकृष्ण सांगत-" मी म्हणालों, 'तूं हें काय चालविलें आहेस! तूं थोर मनुष्य, राणीचा जावई, तूं असे करावयाला लागलास, तर लोक काय म्हणतील? शांत हो, शांत हो, उठ!" पण माझें ऐकतो कोण? बऱ्याच वेळानें तो जरा शांत झाला आणि म्हणाला- 'अद्भुत दर्शन झालें! बाबा! तुम्ही येरझारा करीत असतांना पुढें जाऊं लागलां म्हणजे असें दिसावें की तुम्ही नाही, तर साक्षात् जगदंबाच पुढें जात आहे! आणि तुम्ही मागें येऊं लागलां, म्हणजे साक्षात् महादेव आहां, असें दिसावें! प्रथम वाटलें की आपल्याला भ्रम झाला; म्हणून डोळे चोळून पाहिलें तरी तेंच! कितीदा तरी डोळे चोळले आणि पाहिले तरी तेंच!' असें म्हणाले आणि पुन्हा रडूं लागले! मी म्हणालों, 'मला तर बुवा यांत कांही समजत नाही!" पण ऐकतो कोण? मग मात्र भीति वाटली, की कुणी हा प्रकार राणीला जाऊन सांगितला तर तिला काय वाटेल? तिला खास वाटेल की, 'मीच कांही तरी जादूटोणा केला.' म्हणून, मग पुन्हां त्याला किती तरी समजावलें, तेव्हां कुठे तो शांत झाला! मथुर कां उगीच इतकी भक्ति आणि सेवा करीत असे? आईने त्याला किती तरी गोष्टी इथें दाखविल्या आणि ऐकविल्या! बाकी असें म्हणतात खरें बुवा, की मथुरच्या पत्रिकेंत असें लिहिलें होतें की, " त्याच्या इष्ट देवतेची त्याच्यावर इतकी कृपादृष्टि राहील, की ती शरीर धारण करून त्याच्या संगतीं फिरेल आणि त्याचें रक्षण करील!"

यावेळेपासून मथुरबाबूंचा विश्वास व भक्ति बरीच दृढ झाली. कारण आत त्यांची बालंबाल खात्री झाली, की अगदी प्रथम दर्शनीं ज्यांच्याबद्दल आपल

चांगला ग्रह झाला व इतर लोक ज्यांना हासत असतांहि आपल्याला ज्यांच्या विचित्र आचरणाचें थोडें फार मर्म समजत असे, ते श्रीरामकृष्ण खरोखरच कांही सामान्य नव्हत. श्रीरामकृष्णांच्या शरीराच्या आश्रयाने साक्षात् जगदंबाच आपल्यावर कृपा करण्यासाठी आली आहे व आपल्या जन्मपत्रिकेंत वर्तविलेलें भविष्य खरोखरच घडून येत आहे !

खरोखरच मथुरबाबूंचें भाग्य फार मोठें होतें यांत संशय नाही. शास्त्रांत सांगितलें आहे की जोंपर्यंत शरीर आहे, तोंपर्यंत चांगलीं व वाईट अशीं दोन्ही प्रकारचीं कर्मे मनुष्याकडून घडणारच. साधारण माणसांची तर गोष्टच नाही, मुक्त पुरुषाकडून सुद्धा साधारण मानव आपापल्या कर्माचीं फळें आपण स्वतःच भोगतात पण मुक्त पुरुषांच्या शरीराकडून घडलीं जाणारीं पापपुण्याचीं फळें कोणी भोगावयाचीं ? ते स्वतः तीं भोगत नाहीतच; कारण अभिमान, अहंकार, हाच तर सुखदुःखाचा भोक्ता आणि मुक्त पुरुषांमधील अहंकार तर कायमचाच समूळ नष्ट झालेला असतो. बरे, कर्म म्हटलें की त्याचें फल आलेंच आणि मुक्त पुरुषांकडून सुद्धा कर्मे होतच असतात; मग हीं फलें भोगावयाची कोणी ? या ठिकाणीं शास्त्रानी* असें सांगितलें आहे की, " जे कोणी बद्ध मानव त्या मुक्त पुरुषांची सेवा करतात, त्यांच्यावर प्रीति करतात, ते त्यांच्या शुभ कर्माचीं व जे कोणी त्यांचा द्वेष करतात ते त्यांच्या अशुभ कर्माचीं फलें भोगतात ! " साधारण मुक्त पुरुषांच्या सेवेने जर अशा प्रकारचें फल लाभतें, तर ईश्वरावतारांच्या भक्ति-प्रीतिपूर्ण सेवेचें केवढें फल मिळत असेल, त्याची कल्पनाच करावी.

दिवसेंदिवस मथुरबाबूंची श्रीरामकृष्णांवरील भक्ति अधिकाधिक वाढूं लागली आणि श्रीरामकृष्णांच्या सर्व इच्छा तत्काळ तृप्त करणें व त्यांची हर-

---

* तस्य पुत्रा दायमुपयति सुहृदः
साधुकृत्यां, द्विषतः पापकृत्याम् ।
वे. सू. ३ अ. ३ पाद २६ सू. भाष्य.

तऱ्हेने निरंतर सेवाचाकरी करणें, हें ते आपलें परम भाग्य समजूं लागले. श्रीरामकृष्णांची वातप्रकृति असल्यामुळे त्यांना रोज सरबत प्यावयास देण्याची त्यांनी व्यवस्था केली. श्रीरामकृष्णांची शरीरप्रकृति बिघडल्यास त्यांस औषध देण्यास त्यांनी कलकत्त्यांतील सुप्रसिद्ध वैद्य गंगाप्रसाद सेन व डॉक्टर महेंद्रलाल सरकार या दोघांची योजना केली; श्रीजगन्मातेला अमुक प्रकारचे दागिने घालावे अशी त्यांची इच्छा झाली की, मथुरबाबूंनी तत्काळ तसले दागिने तयार करून ते श्रीदेवीच्या अंगावर घालावे; वैष्णव तंत्रोक्त सखी भावाची साधना करतांना श्रीरामकृष्णांना स्वतःला स्त्रीवेष धारण करण्याची इच्छा झाल्याबरोबर मथुरबाबूंनी तत्क्षणीं सर्व प्रकारचे हिरेजडित अलंकार, बनारसी साडी, ओढणी वगैरे स्त्रीवेषास लागणारे सर्व जिन्नस आणून दिले; पानीहाटी येथील महोत्सव पाहण्याची श्रीरामकृष्णांची इच्छा होतांच मथुरबाबूंनी तेथे जाण्याचा बंदोबस्त केला; एवढेंच नव्हे तर, तेथे गर्दीत त्यांस इजा होऊं नये म्हणून बरोबर दोनचार शिपाई घेऊन कोणास न कळवितां स्वतः त्यांच्या संरक्षणार्थ तेथे गेले ! अशा प्रकारच्या अद्भुत सेवेच्या हकीकतीबरोबरच, वारांगनांच्या मेळ्यांत सोडून त्यांच्या मनांत असत् भाव उत्पन्न होतो की काय हें पाहणें, देवीची अपार संपत्ति त्यांच्या नांवें लिहून देण्याची गोष्ट काढून त्यांना लोभ सुटतो की काय हें पाहणें, वगैरे तऱ्हांनी त्यांनी त्यांची परीक्षा पाहिल्याच्या गोष्टी आम्हीं श्रीरामकृष्णांच्याच तोंडून ऐकल्या आहेत आणि त्यांवरून मथुरबाबूंचा भक्तिविश्वास हळूहळूच दृढ होत गेला हें दिसून येतें. सर्व परीक्षांत उत्तीर्ण होऊन जसजसा तो विश्वास पूर्ण कसाला लागूं लागला व उत्तरोत्तर अधिकाधिक उज्ज्वल स्वरूप धारण करूं लागला, तसतसे श्रीरामकृष्णांच्या वरचें त्यांचें प्रेम अधिकच वाढत गेलें. मथुरबाबूंनी पाहिलें की, लाखों रुपयांचा लोभ दाखवूनहि यांचें वैराग्य लेशमात्र कमी होत नाही; सुंदर स्त्रिया यांच्या मनांत विकार उत्पन्न करूं शकत नाहीत; ऐहिक मान-यशानें—कारण मनुष्याची भगवान समजून पूजा करणें यापेक्षा अधिक मान तो कसला असतो ?—यांच्या मनांत अहंकाराचा लवलेशहि उत्पन्न होत नाही; सर्व प्रकारच्या ऐहिक विषयांसंबंधी हे पूर्ण उदासीन; बरे, इकडे आपल्या स्वतःच्या

जीवनांतील अनेक दोष पाहून सुद्धा, आपल्यावर किती प्रीति करतात, अनेक संकटांतून वारंवार बाहेर काढतात आणि आपलें सर्व बाजूंनी कल्याण कसें होईल याची चिंता करतात ! खरोखर, मनुष्यवेषधारी असूनहि हे—

न तत्र सूर्यो भाति, न चंद्रतारकं
नेमा विद्युतो भांति कुतोऽयमग्निः ।

अशा एखाद्या दूरच्या राज्यांतील रहिवासी आहेत !

आणखी एक गोष्ट मथुरबाबूंच्या अंतःकरणांत पूर्ण बिंबली आणि ती म्हणजे या अद्भुत चरित्राचें माधुर्य ! असल्या प्रकारच्या अलौकिक ईश्वरी शक्तीचा यांच्यामध्ये पूर्ण विकास झाला असूनहि हे स्वतः जे बालक ते बालकच ! यत्किंचित् सुद्धा अहंकार नाही. काय चमत्कार ! स्वतःच्या अंतःकरणांत कसलाहि भाव उत्पन्न होवो, पांच वर्षाच्या मुलाप्रमाणे तो सरळपणे सांगावयाचा; लेशमात्र छपवाछपवी नाही ! जसें आंत तसें बाहेर ! दुसऱ्याला कधी त्रास द्यावयाचा नाही ! त्याचें नुकसान होईल असें कांही बोलायचें नाही, मग त्याबद्दल स्वतःला कितीहि त्रास होईना !

मथुरबाबूंच्या घरी हालदार म्हणून एक पुरोहित असे. श्रीरामकृष्णांवरील बाबूंची एवढी भक्ति पाहून त्याला अत्यंत मत्सर वाटूं लागला. तो मनांत म्हणे, " या माणसाने कांही तरी जादूटोणा करून आपल्या बाबूंना वश केलें आहे. मी आज किती दिवस आपलें वजन त्यांच्यावर बसवायला बघतों आहे, पण याच्यामुळे कांही जमतच नाही, आणि पुन्हा एखाद्या मुलासारखें सोंग करतो ! इतका अगदी सरळ असेल, तर सांगावी त्याने आपली वशीकरणाची विद्या आम्हांला ! पण तें नाही ! माझी एवढी विद्यान् सारें; बाबू नुकतेच कोठे आपल्या घेऱ्यांत येत होते आणि एवढयांत कुठून ही ब्याद आली कुणास ठाऊक ? " अशा नऱ्हेच्या विचारांनी तो अस्वस्थ होऊन याचें उट्टें काढण्याची संधि पाहूं लागला.

त्याला अशी संधि लवकरच मिळाली. मथुरबाबूंच्या जानबाजारच्या वाडयांत एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास श्रीरामकृष्ण भगवच्चिंतनांत तन्मय

होऊन, अर्धबाह्यदशेंत पडले होते. जवळ कोणीहि नव्हते. श्रीरामकृष्ण समाधींतून उतरून हळूहळू शुद्धीवर येत होते. अशा वेळीं हालदार पुरोहित सहज तेथे आला. श्रीरामकृष्णांना एकटेच पाहून बरी संधि सापडली असें वाटून त्याला आनंद झाला. इकडे तिकडे पाहून जवळ कोणी नाही अशी खात्री करून घेऊन तो श्रीरामकृष्णांच्या जवळ आला आणि श्रीरामकृष्णांस धक्के देत देत म्हणाला— " कारे भटा, बाबूंना जादूटोणा करून वश केलेंस नाही का ! बोल ना, आतारे कां गप्प बसलास ? ढोंग करतोस नाही का ? " अर्धवट समाधींतच असल्यामुळे श्रीरामकृष्णांची तेव्हां बोलण्यासारखी अवस्थाच नव्हती. श्रीरामकृष्ण कांहीच बोलत नाहीत असे पाहून, त्याने रागारागाने, "जा लेका, नाही बोलत तर नाही !" असें म्हणत एक लाथ मारली आणि तेथून काळें केलें ! निरभिमानी श्रीरामकृष्ण, मथुरबाबूंना ही गोष्ट समजली तर ब्राह्मणावर भलताच प्रसंग ओढवेल असें जाणून, त्यांचेजवळ यासंबंधाने एक चकार शब्दहि बोलले नाहीत. यानंतर पुढे कांही दिवसांनी, इतर कांही कारणाने, मथुरबाबूंची हालदारावर खप्पा मर्जी होऊन, त्यांनी त्यास नोकरीवरून दूर केल्यावर एके दिवशीं, सहज गोष्टीवरून गोष्ट निघतां, श्रीरामकृष्णांनी मथुरबाबूंना ही गोष्ट सांगितली. ती ऐकून क्रोधाने व दुःखाने संतप्त होऊन मथुरबाबू म्हणाले—"बाबा, ही गोष्ट अगोदर कळती, तर तो ब्राह्मण खास जिवंत राहता ना ! "

मथुरबाबूंचा भक्तिविश्वास जसजसा वाढूं लागला, तसतसें श्रीरामकृष्णांच्याच संगतींत कसें राहतां येईल, त्यांची याहूनहि अधिक सेवा आपल्याला कशी करावयाला सापडेल, हेच विचार सदा त्यांच्या मनांत घोळूं लागले : ते आपल्या जवळच राहतील तर सेवा करण्यास आपल्याला पुष्कळच जास्त संधि मिळेल, असा विचार करून त्यांनी श्रीरामकृष्णांना मधून मधून आपल्या जानबाजारांतील वाड्यांत राहण्यास घेऊन जावें. तिसरे प्रहरीं " चला बाबा, फिरायला जाऊ या आता," असें म्हणून कलकत्त्यांतील एखाद्या उत्तमशा ठिकाणीं त्यांना बरोबर घेऊन फिरायला जावें; बाबांना जेवायला काय कसली तरी ताटवाटी द्यावयाची ?—असा विचार करून त्यांच्यासाठी मुद्दाम सोन्याचांदीचीं भांडीं त्यांनी तयार करविलीं ;

त्यांना नेहमी उत्तम उत्तम वस्त्रें घेऊन द्यावींत आणि हें सर्व करून वर म्हणावें— "बाबा, तुम्हीच तर या सगळ्याचे मालक! हेंच पाहाना—त्या सोन्याच्या ताटांत, रुप्याच्या वाटींत तुमचें जेवण झाल्यावर, तुम्ही तर इकडे ढुंकून सुद्धा पाहात नाही! मग पुढची घासण्यापुसण्याची, नीट बंदोबस्ताने ठेवण्याची व्यवस्था मलाच करावी लागते की नाही?"

याच सुमारास एक अत्यंत मौल्यवान बनारशी शालीच्या दुर्दशेची हकीगत आम्हीं प्रत्यक्ष श्रीरामकृष्णांच्याच तोंडूनच ऐकली आहे. मथुरबाबूंनी ती हजार रुपयांस विकत घेतली होती आणि हा असला सुंदर व मौल्यवान जिन्नस आणखी कोणाला द्यावयाचा असा विचार करून त्यांनी मोठया आनंदाने तो श्रीराम-कृष्णांना समर्पण केला! ती शाल अंगावर घेतल्यावर त्यांना मोठा आनंद झाला, तिच्याकडे ते वरचेवर बघूं लागले, इकडे तिकडे मोठया डौलानें फिरूं लागले, ज्याला त्याला ती दाखवीत सुटले आणि दाखवतांना—"ही बघ शाल; मथुरेने एक हजार रुपये खर्चून मला आणून दिली!" असें सांगूं लागले! परंतु झालें;— एखाद्या लहान मुलाप्रमाणे थोडयाच वेळांत तो आनंद निघून गेला आणि मनांत निराळाच विचार उत्पन्न झाला—"या शालींत विशेष काय अधिक आहे? इच्यांत तर लोकर व जर यांशिवाय कांही दिसत नाही. ज्या पंचभूतांपासून सर्व जिन्नस तयार होतात, त्यांच्याचपासून ही शाल सुद्धा झाली आहे; नाही म्हणायला या शालीने थंडीचे निवारण मात्र होतें. (थोडा विचार करून) पण तें काम तर एखादी घोंगडी सुद्धा करते! मग इच्यांत एवढें काय जास्त आहे? इतरहि सर्व जिनसांप्रमाणे इनेहि सच्चिदानंद-लाभ होत नाहीच, उलट ही अंगावर घेतल्याने—"मी सगळ्यांमध्ये श्रेष्ठ," असा अहंकार मात्र उत्पन्न होऊन मनुष्य ईश्वरापासून दूर जातो. हा इच्यात दोष आहे." असा विचार करून, त्यांनी ती शाल जमिनीवर फेंकली, "इच्याने सच्चिदानंद-लाभ होत नाही, थूः थूः!" असें म्हणून तिच्यावर थुंकत ती पायाखाली तुडविली व एवढयानेच समाधान न होऊन तिला पेटवून देण्याचा उद्योग त्यांनी चालविला! पण इतक्यांत कोणसें तेथे आलें व त्याने त्या शालीची श्रीरामकृष्णांच्या

हातून सुटका केली ! मथुरबाबूंच्या कानावर ही हकीकत गेल्यावर ते म्हणाले, " बाबांनी ठीक केलें ! "

मथुरबाबू श्रीरामकृष्णांना नानाप्रकारच्या भोगसुखांत व आरामांत सदैव ठेवण्याचा प्रयत्न करीत असून सुद्धा, श्रीरामकृष्णांचें मन नेहमी किती उच्च विचारांत निमग्न असें, हें वरील गोष्टीवरून चांगलें समजून येते. मथुरबाबूंची पत्नीहि त्यांना साक्षात् परमेश्वराप्रमाणे समजत असे. मथुरबाबू व त्यांची पत्नी यांनी श्रीरामकृष्णांपासून कोणतीहि गोष्ट लपवून ठेऊ नये. त्या दोघांनीहि म्हणावे, " बाबा कांही माणूस नव्हत. त्यांच्यापासून एखादी गोष्ट लपवून ठेऊन कसें होईल? त्यांना सर्व गोष्टी कळतात. अगदी मनांतल्या सुद्धा गोष्टी ते जाणतात." तीं दोघे असें नुसतें बोलूनच दाखवीत असें नाही; तर त्यांचें श्रीरामकृष्णांशी आचरणहि तसेंच असे. त्यांनी आपले जेवणखाण, बसणें, उठणें इत्यादि सर्व व्यवहार त्यांना घेऊनच करावे. एवढेंच काय, पण त्यांचें निजणेंसुद्धा किती तरी दिवस एकाच ठिकाणीं असें ! बाबांना कोणत्याहि प्रसंगी वाड्याच्या कोणत्याहि भागांत जाण्यास पूर्ण मोकळीक असे, मोकळीक न देऊन फायदा काय ? कुठे काय चाललें आहे हे सर्व बाबांना समजते, अशी त्यांना पुष्कळ वेळां खात्री पटली होती आणि शिवाय, पुरुषाला बायकांमध्ये मिसळूं न देण्यास मुख्य कारण म्हणजे मानसिक विकार; पण त्या बाबतींत तर बाबांना घरांतल्या एखाद्या संगमरवरी पुतळ्याप्रमाणे अचेतन समजण्यास हरकत नाही ! एखाद्या अपरिचित पुरुषाला पाहून बायकांच्या मनांत जशी लज्जा व संकोच उत्पन्न होतो, तसा मथुरबाबूंच्या घरच्या कोणत्याच स्त्रीच्या मनांत, श्रीरामकृष्णांना पाहून उत्पन्न होत नसे ! त्यांना हे आपल्यांतलेच आहेत, अथवा एखादें लहान पांच वर्षांचें मूल आहे असें वाटावें ! सखीभावाने साधनें करीत असतां, त्यांनी स्त्रीवेष धारण करून या बायकांत मिसळावें; दुर्गापूजेचे वेळीं या स्त्रियांबरोबर आपणहि श्रीजगदंबेवर चामर ढाळावे; एखाद्या स्त्रीचा पति आला असतां, तिला त्यांनी नटवून सजवून पतीबरोबर कसें कसें बोलावे वगैरे शिकवून, तिला पतीच्या शयनमंदिरांत पोहोचवून परत यावें !—वगैरे कित्येक गोष्टी श्रीरामकृष्णांच्या

स्वतःच्याच तोंडून ऐकून, या सर्व स्त्रियांचा, या कामगंधहीन अद्‌भुत श्रीरामकृष्णांशीं कसा अपूर्व भक्तिविश्वासाचा संबंध होता, या विचाराने मन चकित होऊन जातें व त्यांच्या भक्तीची, त्यांच्या विश्वासाची, त्यांच्या निःसंकोच वृत्तीच्या आचरणाची धन्यता वाटते !

---

# १६. श्रीरामकृष्ण व मथुरबाबू

## ( पुढे चालू )

यंदा मथुरबाबूंच्या घरचा दुर्गापूजेचा उत्सव मोठया कडाक्याने व्हावयाचा होता; कारण आज कांही दिवसांपासून बाबा घरींच होते व उत्सव संपेपर्यंत राहावयाचे होते ! आपल्या आईजवळ, लहान मूल जसें निर्भयपणे खेळत असतें, नाना प्रकारच्या खोडया आणि हट्ट करून जसे गमती करीत असतें, निरंतर भावावेशांत निमग्न असणाऱ्या बाबांचीहि अगदी तशीच अवस्था व आचरण ! आजकाल प्रत्यक्ष देवीची मूर्तीहि जागृत झाली आहे की काय, असा भास होई ! साऱ्या घरांतलें वातावरण मुद्धा जणु पवित्र आणि प्रसन्न होऊन गेलें होते !

मथुरबाबूंची राजसिक भक्ति; त्यांनी आपला वाडा शृंगारला होता, मातेची मूर्ति अतिशय उत्तम रीतीने सजविली होती; पत्रें, पुष्पें, फलमूलें वगैरे पूजाद्रव्यांची रेलचेल उडविली होती; मंगलवाद्यें रात्रंदिवस वाजविण्यास लावून दिली होतीं; पूजेच्या कोणत्याहि बाह्य प्रकारांत त्यांनी यत्किंचितहि न्यून पडूं दिलें नाही. सर्व प्रकारचीं व्यवधानें सांभाळण्यांत गढल्यामुळें मथुरबाबू व त्यांची पत्नी या दोघांसहि एका क्षणाचीहि फुरसत नव्हती !

संध्याकाळ झाली; आता थोडयाच वेळांत आरती होणार. आज सखी-भावाने अभिनिविष्ट होऊन, बाबा आपण पुरुष आहोंत, ही गोष्टच अजिबात विसरून गेले होते ! त्यांचें बोलणें-चालणें व इतर सर्व व्यवहार अगदी थेट स्त्रियांसारखे दिसत होते ! जणु काय जन्मोजन्मीं ते श्रीजगदंबेची दासीच किंवा सखीच होते ! जणु काय जगदंबाच त्यांचा प्राण, तीच त्यांचें मन, तीच त्यांचें सर्वस्व—तिच्या सेवेसाठीच जणु काय त्यांचा जन्म व त्यांचें जगणें ! त्यांच्य मुखमंडलावर भावावेशाने अपूर्व तेज झळकत होतें. त्यांनी स्त्रीवेष धारण केल

होता,—कोण म्हणेल की ते पुरुष आहेत ? श्रीरामकृष्णांचें रूप त्या कालीं खरोखरच इतकें सुंदर असें की, जणु काय तें आंत न मावून अंगांतून बाहेर फुटून पडत असे! भावावेषांत शरीराचा रंग अधिकच उज्ज्वल होत असे व शरीरांतून एक प्रकारची दिव्य ज्योति बाहेर फांकत असे ! हें रूप ज्याच्या नजरेस येई, त्याची नजर तेथेच खिळून जात असे. त्याला वाटे—हें रूपच पाहात राहावें ! श्रीमाताजी ( श्रीरामकृष्णांची पत्नी ) सांगत की-" त्यावेळीं त्यांच्या अंगावर जें सुवर्णाचें इष्टकवच सदैव असे, त्याचा रंग व त्यांच्या अंगाचा रंग, अगदी एक असे!" श्रीरामकृष्ण स्वतः सांगत-" तेव्हां असें रूप असें रे की लोक पाहतच राहात ! वक्षःस्थळ व वदन सर्व वेळ लाल दिसें आणि अंगांतून एक प्रकारची ज्योति बाहेर फांकत असे ! पाहाण्यासाठी लोकांची सारखी गर्दीच होऊं लागली; म्हणून मग एका मोठ्या चादरीने सारे अंग झाकून घेऊं लागलों व आईला म्हणूं लागलों-" आई! हें आपलें बाहेरचें रूप घेऊन जा. मला आंतील रूप दे !" आपल्या आंगावर हात फिरवीत मीं म्हणावें, " आंत जा, आंत जा!" मग पुढे किती तरी दिवसांनी बाह्य रूप हें असे मलिन होऊन गेलें !! "

रूपाच्या गोष्टीवरून श्रीरामकृष्णांच्या साधनाकालच्याच दिवसांच्या एका गोष्टीची आठवण होते. त्या दिवसांत श्रीरामकृष्ण दरवर्षी पावसाळ्यांत तीन चार महिने आपल्या जन्मभूमीस—कामारपुकूरास—जाऊन राहात. तेथे असतांना, मधे मधे हृदयाच्या शिउड गावालाहि जात. त्यांच्या सासुरवाडीच्या जयरामवाटी गावावरून, शिउडचा रस्ता असल्यामुळे, जयरामवाटीचे लोकहि त्यांस दोन तीन दिवस आग्रहानें ठेऊन घेत. श्रीरामकृष्णांचा भाचा हृदय, त्यांच्या सेवेसाठी सर्व काळ त्यांच्याच बरोबर असे. कामारपुकूरास असतांना त्यांच्या दर्शनास व त्यांच्या तोंडचे चार शब्द ऐकण्यास, सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोकांची एकसारखी गर्दी असे. बायकांनी सकाळीं लौकर लौकर आपल्या घरचीं सर्व कामें आटोपून, स्नानासाठी व हालदारपुकूरचें पाणी नेण्यासाठी कळशी घेऊन बाहेर पडावें व प्रथम श्रीरामकृष्णांच्या घराची वाट धरावी ! तेथे त्यांचें दर्शन घेऊन, तास अर्धा तास गप्पा गोष्टी मारून, मग पाण्याला जावें. इत-

क्यांत रात्रीं कोठे कांही पक्वान्न वगैरे केलें असल्यास तेथील स्त्रिया, श्रीरामकृष्णासाठी मुद्दाम बाजूस काढून ठेवलेला अग्रभाग घेऊन येत. या बाया सकाळ झाली नाही तोंच आपल्या घराकडे ये जा करूं लागतात, हें पाहून विनोदप्रिय श्रीरामकृष्णांनी केव्हां केव्हां त्यांची चेष्टा करावी. त्यांनी म्हणावें-" वृंदावनांत श्रीकृष्ण असतां, गोपींचें श्रीकृष्णांशीं नाना प्रकारानी व नाना समयीं मीलन होई. यमुनेचें पाणी आणण्यास जातांना गोष्ठ-मीलन, संध्याकाळीं गाई चारून परत येत असतांना गोधूलि-मीलन, त्यानंतर रात्रीं रासमीलन वगैरे मीलनें होत. तसलेंच हें एक तुमचें स्नान-मीलन, होय ना ग बायांनो ? "

श्रीरामकृष्णांचें बोलणें ऐकून त्यांना हसतां हसतां पुरेवाट होई. बायका जिकडल्या तिकडे स्वयंपाकाला गेल्या म्हणजे पुरुषांनी जमावें आणि गप्पागोष्टी कराव्या. तिसरे प्रहरीं पुन्हा बायांनी यावें, संध्याकाळ झाल्यावर पुन्हा कोणी कोणी पुरुषांनी यावें—असा दररोजचा कार्यक्रम असे.

एक दिवस श्रीरामकृष्ण शिउडला जावयाचे होते. जाण्याची सर्व तयारी झाली होती. सदासर्वकाळ भावसमाधींत राहिल्याकारणाने श्रीरामकृष्णांचें अंग एखाद्या लहान मुलासारखें अत्यंत कोमल व नाजुक झालें होतें. जरासें दूर कोठे जावयाचें असल्यास त्यांना गाडी अथवा पालखीशिवाय जाववत नसे. आजच्यासाठी पालखीची व्यवस्था केली होती. हृदय त्यांच्याबरोबर जावयाचा होताच. श्रीरामकृष्णांनी लाल रेशमी वस्त्र परिधान केलें होतें. हातांत सुवर्ण इष्टकवच धारण केलें होतें. दुपारचें जेवण आटोपून विडा खात खात, पालखींत बसण्याच्या बेतांत असतां सभोवार स्त्रीपुरुषांची एकच गर्दी झालेली त्यांस दिसली. ती पाहून आश्चर्य वाटून ते हृदयाला म्हणाले—" हृदू, ही आज एवढी गर्दी कशासाठी झाली आहे रे ? "

**हृदयः**-आणिक कशासाठी ? तुम्ही आज गावाला जाणार आणि कांही दिवस तुम्ही यांना दिसणार नाही, म्हणून तुम्हांला पाहण्यासाठी ही गर्दी झाली आहे !

**श्रीरामकृष्ण**:—मला तर हे सारेजण रोज पाहतात. मग आजच येवढें नवीन काय आहे ?

**हृदय**:-हें रेशमी तांबडें लाल वस्त्र नेसलेलें, जरा पानबीन खाऊन तोंड रंगलेलें रूप मोठें छान दिसते, दुसरें काय ? म्हणून लोक जमले आहेत !

आपल्या सुंदर रूपावर हे सर्व लोक आकृष्ट झाले आहेत, हें ऐकतांच श्रीरामकृष्णांच्या मनाला धक्का बसला. त्यांना वाटलें, "हाय हाय, या क्षणभंगुर बाह्य सौंदर्याकडेच साऱ्यांचें लक्ष. अंतरात्म्याकडे कोणीहि पाहात नाही !" पूर्वीपासूनच रूपाविषयीं त्यांचा उदासीन भाव होता, आज तर तो सहस्रपट वाढला. ते म्हणाले, "काय ? यःकश्चित् एका माणसाला पाहावयाला एवढी गर्दी ? मग काय मी जिथे जाईन तिथे अशीच गर्दी होणार की काय ? जा, आज मी कुठेच जात नाही !" असें म्हणून श्रीरामकृष्ण आपल्या खोलींत जाऊन दुःखाने एका कोपऱ्यांत चूप बसून राहिले आणि त्या दिवसाचें त्यांचे शिउडला जाणे रहित झालें ! हृदयने आणि इतरांनी त्यांना कितीतरी समजावलें, पण व्यर्थ ! काय ही या अलौकिक पुरुषाची आपल्या शरीराविषयी तुच्छ बुद्धि ! नाहीतर आमच्याकडे पाहा ! 'रूप' 'रूप' करून वेड लागण्याची पाळी ! शरीराचें सौंदर्य नसेल तर तें आरशी, रिस्टवॉच, नेकटाय, कॉलर, केस ठेवणें अगर काढणें, वगैरेच्या साहाय्याने सुंदर दिसावें, म्हणून आमची केवढी यातायात ! असो.

जगदंबेची आरती सुरू होण्याची वेळ झाली, परंतु श्रीरामकृष्णांच्या सखीभावाचा उपशम होण्याचें मुळीच चिन्ह दिसेना. बरे, त्यांना तसेंच तेथे ठेऊन, आपण सगळयांना घेऊन आरतीस जावे, हेंहि जगदंबादासीला बरे वाटेना. बरे, आरतीचा आवाज कानावर आला की हे तेथे एकदम धांवत सुटतील, ही तिची खात्री. शिवाय अशा भावावस्थेंत तर त्यांना देहभानहि नसतें, हें तिला माहीत होतें. अशाच अवस्थेंत एकदा ते निखाऱ्यांत पडले होते पण त्यांना त्याची दादहि नव्हती ! तें भाजलेलें बरें होण्यास किती तरी दिवस

लागले होते. आता तसेंच कांही भलतेंच झालें तर ? असे नाना प्रकारचे विचार मनांत येऊन तिला कांही सुचेना. इतक्यांत तिच्या मनांत एक विचार आला व त्याबरोबर आपल्या अंगावरचे बहुमोल दागिने काढून, ते श्रीरामकृष्णांच्या अंगावर घालीत घालीत, ती त्यांच्या कानापाशी एकसारखी म्हणूं लागली, " बाबा, चलनां ना ? आता आरती सुरू होईल, देवीवर तुम्ही चवरी ढाळणार ना ? "

भावावेशाने श्रीरामकृष्ण कितीहि बाह्यसंज्ञाशून्य झालेले असले आणि ज्या मूर्तीच्या ध्यानाने अथवा ज्या भावाच्या आश्रयाने त्यांचें मन समाधिस्थ झालें असे, त्या मूर्तीवांचून सर्व जगत व भाव यांच्यांतून त्यांचे मन कितीहि दूर झालेलें असलें, तरी, नेहमी असें दिसून येई की, त्या मूर्तीचे नांव अथवा त्या भावाला अनुकूल अशा गोष्टीचा त्यांच्या कानाजवळ वारंवार उच्चार केला, म्हणजे त्यांची समाधि उतरत असे ! एकाग्र मनाचा असा गुणधर्मच असतो, असा पातंजल योगसूत्रांत याचा उल्लेख आहे व चित्त एकाग्र करणें ज्यांना दैवयोगाने थोडें फार साध्य झालें असेल, त्यांना याचा अनुभवहि असेल. असो.

जगदंबादासीची युक्ति सफळ झाली. श्रीरामकृष्ण हळूहळू देहभानावर आले व आनंदाने तिच्याबरोबर देवीच्या आरतीस गेले; ते तेथे पोहोचतात तोंच आरती सुरू झाली. श्रीरामकृष्ण देवीवर चौरी ढाळूं लागले. दालनाच्या एका बाजूस मथुरबाबू वगैरे पुरुष मंडळी आरती पाहात उभी होती. त्यांचें लक्ष बायकामंडळीकडे जातांच, आपल्या पत्नीबरोबर कोणी नवीनच स्त्री देवीवर चामर ढाळतांना त्यांना दिसली. त्यांना वाटलें की आपल्या पत्नीच्या ओळखीची कोणी बाई असेल.

आरती संपली. श्रीरामकृष्णांनी आपला स्त्रीवेष उतरून ठेऊन पुरुषवेष धारण केला व बाहेर इतर मंडळींत येऊन ते गप्पागोष्टी करीत बसले. कांही वेळाने मथुरबाबू कांही कामासाठी आंत गेले व आपल्या पत्नीस म्हणाले, " मघाशी आरतीच्या वेळीं तुझ्याबरोबर उभी होती ती बाई कोण ? "

जगदंबादासीने हासून उत्तर दिलें, " तुम्ही नाही ओळखलें वाटतें ? ते बाबा होते. " असें म्हणून तिने त्या दिवसाची सर्व हकीगत त्यांना सांगितली. मथुरबाबू चकित होऊन म्हणाले, " सामान्य विषयांत सुद्धा त्यांनी समजूं दिलें नाही, तर कोण त्यांना जाणूं शकणार आहे ? हेंच पाहा ना, चोवीस तास त्यांच्या संगतींत असून सुद्धा, आज मी त्यांना ओळखूं शकलों नाही. " असो.

सप्तमी, अष्टमी व नवमी मोठ्या आनंदाने पार पडल्या. आज विजया-दशमी. पुरोहित घाईघाईने पूजा आटोपूं लागल; कारण विसर्जनाच्या अगोदर बराच विधि होते व मग संध्याकाळी विसर्जन होणार होतें. देवी आपल्या घरीं जाणार आणि आपल्या घरचा आनंदाचा बाजार मोडणार या विचाराने सर्वांस आज वाईट वाटत होतें.

ही गोष्ट मथुरबाबूंच्या अजून लक्षांतच आली नव्हती. ते आपल्याच आनंदांत गर्क होऊन गेले होते. इतक्यांत पुरोहिताकडून निरोप आला की " आता विसर्जनाची वेळ होईल, त्यापूर्वी देवीस नमस्कार करण्यास येऊन जावें. " प्रथम ही गोष्ट त्यांच्या डोक्यांतच शिरेना. बऱ्याच वेळाने त्यांना आज विजयादशमी असल्याची आठवण झाली आणि त्याबरोबर त्यांच्या हृदयास एक धक्का बसला. " काय ? आज मातेचें विसर्जन करायचें ? कां बरें ? मातेच्या व बाबांच्या कृपेने मला तर कोणत्याहि गोष्टीची उणीव नाही. मग मातेचें विसर्जन काय म्हणून करावयाचें ? " असे विचार करीत ते स्वस्थ बसले. इकडे वेळ होत चालली. पुरोहिताने पुन्हा निरोप पाठविला की ' एकदा येऊन नमस्कार करून जावें. ' त्याच माणसाबरोबर मथुरबाबूंनी सांगून पाठविलें की " मातेचें विसर्जन करायचें नाही ! जशी आज नऊ दिवस पूजा झाली, तशीच ती यापुढेहि चालावयाची. मला न कळवितां कोणी विसर्जन केल्यास, ज्याने त्याने आपला विचार पाहावा; मला ते मुळीच खपणार नाही ! " हा विचित्र निरोप ऐकून सर्वजण स्तंभित होऊन गेले !

मथुरबाबू ज्यांचा मान ठेवीत, अशा सर्वांनी त्यांना सांगून पाहिलें, पण व्यर्थ ! मथुरबाबू आपल्याच विचारांत गर्क ! त्यांनी त्या सर्वांना सांगितलें की

"मी मातेचें विसर्जन करणार नाहीं, नित्य पूजा करीन. मातेच्या कृपेने तसें करण्याचें मला जर सामर्थ्य आहे, तर मी विसर्जन कां करीन ?" सर्वांनी त्यांच्यापुढे हात टेकले. पण आता पुढे उपाय ? हें असेंच चालायचें की काय ? मथुरबाबूंचा हट्टवादीपणा सर्वांना चांगलाच माहीत होता. त्यांच्या संमतीशिवाय आता विसर्जन करणेंच शक्य नव्हतें. शेवटचा उपाय, म्हणून जगदंबादासीने बाबांना आपल्या पतीची समजूत करण्यास विनंति केली. कारण त्यांना संकटां-तून सोडविणारें बाबांच्यावांचून दुसरें कोण होतें ?

श्रीरामकृष्णांनी जाऊन पाहिलें, तों मथुरबाबूंचे मुख गंभीर आणि आरक्त झालेलें आणि डोळे लाल झालेले होते आणि ते एखाद्या मोठ्या गहन विचारांत गढलेल्या माणसासारखे दिसत असून, खाली मान घालून दिवाणखान्यांत येरझारा घालीत होते ! बाबांना पाहतांच मथुरबाबू त्यांच्याजवळ आले आणि म्हणाले, "बाबा, तें काय वाटेल तें असो. मी जिवंत असेतोंपर्यंत मातेचें विसर्जन करणार नाही ! मी आताच सांगून टाकलें आहे की मातेची नित्य पूजा करा-यची ! मातेला सोडून राहायचें कसें ?" श्रीरामकृष्ण त्याच्या छातीवर हात फिरवून म्हणाले—"अं:, एवढीच का तुझी भीति ? आणि तुला तरी आईला सोडून राहा असें म्हणतो कोण ? आणि तूं मोठें विसर्जन केलेंस, तरी ती रे कुठे जाईल ? मुलाला सोडून का आई कुठे राहात असते ? आज तीन दिवस बाहेर दालनांत बसून तिने तुझी पूजा घेतली. पण आजपासून, त्याहीपेक्षा जवळ राहून—प्रत्यक्ष तुझ्या हृदयांत बसून—ती तुझी पूजा घेत जाईल, म्हणजे तर झालेंना ?"

श्रीरामकृष्णांच्या अद्‌भुत स्पर्शाने व भाषणाने मथुरबाबू हळूहळू देह-भानावर आले. अशा रीतीने प्रकृतिस्थ होण्यापूर्वी त्यांना कांही दर्शन वगैरे झालें की काय हें सांगवत नाही, परंतु झालें असावें असें वाटतें व हृदयांतच मातेचा आविर्भाव झाल्याकारणाने, बाह्य प्रतिमेच्या नित्य पूजेचा त्यांचा आग्रह आपोआप दूर झाला असावा, असें वाटतें. प्रतिमेचें थोड्याच वेळाने यथाविधि विसर्जन झालें. असो.

श्रीरामकृष्णांच्या दिव्य संगतींत निरंतर राहून, त्यांचा भावसमाधींतील असीम आनंद पाहून, विषयी मथुरबाबूंनाहि एकदा असें वाटलें की, हा काय प्रकार आहे तो एकदा पाहून घ्यावा. त्यांची अशी दृढ समजूत होती की, "बाबांनी मनांत आणल्यास ते वाटेल तें करूं शकतात." आणि खरोखरच त्यांच्या संगतीचा ज्यांना बरेच वेळ लाभ घडे, त्या सर्वांचीहि अशीच दृढ समजूत होई! मथुरबाबूंच्या मनांत असें येतांच त्यांनी श्रीरामकृष्णापाशी धरणें घेतलें-"बाबा, तुम्ही माझी भावसमाधि लावून दिली पाहिजे! अशा प्रसंगीं श्रीरामकृष्णांचें उत्तर ठरलेलें असें—ते म्हणाले, "अरे बाबा, अशी घाई करून काय होतें? वेळ येईल तेव्हां सर्व कांही होईल. बी पेरतांक्षणीं झाड वाढून, लगेच त्याचें फळ खायला मिळतें की काय? कां बरे? तुझें तर ठीक चाललें आहे; प्रपंच परमार्थ दोन्ही चालले आहेत! तूं समाधींतच राहूं लागलास तर मग तुझा प्रपंच कसा चालणार बरें? मग तुझें इकडे मनच लागणार नाही, आणि मग तुझी सारी संपत्ति चोरापोरी जाईल याची वाट?"

पण त्या दिवशीं हें सारें ऐकतो कोण! मथुरबाबूंनी तर धरणेंच घेतलें होतें. आपला डाव फसला असें पाहून श्रीरामकृष्णांनी दुसरा डाव टाकला. ते म्हणाले-"भक्तांना काय ईश्वराला ऐश्वर्यरूपांत पाहण्याची इच्छा असते काय रे? त्यांना प्रत्यक्ष सेवेची इच्छा असते. पाहिलें, ऐकलें, तर ईश्वराच्या ऐश्वर्य-ज्ञानानें भय उत्पन्न होतें व त्यामुळे प्रेम कमी होतें. ऐकः—श्रीकृष्ण मथुरेला निघून गेल्यावर, गोपी विरहानें व्याकुळ झाल्या. श्रीकृष्णांनी उद्धवाला त्यांची समजूत घालण्यास पाठविलें. उद्धव मोठा ज्ञानी की नाही? वृंदावनांतील वात्सल्यभाव त्याला समजत नसे. तो समजावा व त्यालाहि कांही शिक्षण मिळावें, हा त्याला तेथे पाठ-वण्यांत श्रीकृष्णांचा हेतु होता. उद्धव वृंदावनांत जाऊन गोपींची समजूत करूं लागलाः—"तुम्ही साऱ्याजणी अशा 'कृष्ण' 'कृष्ण' काय करीत बसला आहांत? तो प्रत्यक्ष भगवान् आहे व सर्व ठिकाणीं आहे, हें तर तुम्ही जाणतां ना? मग तो मथुरेंतच आहे आणि वृंदावनांत नाही, असें कसें समजतां? तेव्हां अशा

हताश न होतां डोळे मिटून ध्यान करा, म्हणजे तुम्हांला दिसेल, की आपल्या प्रत्यक्ष हृदयांतच तो नवनीरदश्याम, मुरलीधर वनमाली सर्वदा आहे," इत्यादि. हे ऐकून त्या म्हणाल्या, "उद्धवा, तूं कृष्णाचा सखा, ज्ञानी, असे असून या काय गोष्टी आम्हांला सांगतोस ? आम्ही काय त्याला ध्यान आणि जप आणि तप वगैरे करून पाहिलें की, काय ? अरे, आम्हीं ज्याला साक्षात् पाहिलें, खेळविलें, खाऊं घातलें, सजविलें, त्याचें काय आता ध्यान करून हे सर्व करीत बसूं ? हें ध्यान आणि जपतप आमच्याने होणे शक्य आहे का ? अरे, ज्या मनानें ध्यान वगैरे करावयाचे, तें मन जर आमच्या मालकीचें राहिलें असतें, तर निराळी गोष्ट होती. ते मन तर कधीच श्रीकृष्णाच्या पादपद्मावर अर्पण केलें आहे. आमचें असे म्हणायला आता आमच्यापाशीं कांही शिल्लक तरी उरलें आहे का ? " हें सर्व ऐकून उद्धव चकितच होऊन गेला आणि गोपीचें कृष्णावरील प्रेम म्हणजे काय जिन्नस आहे आणि तें किती गंभीर स्वरूपाचें आहे, हें त्याला तेव्हां समजलें आणि त्यांना गुरु समजून त्याने प्रणाम केला व मथुरेची वाट धरली. यावरूनच पाहाना, की जो खरा भक्त असतो, तो काय भगवानाला ऐश्वर्यस्वरूपांत पाहण्याची इच्छा करतो काय ? त्याच्या सेवेमध्येच त्याला परमानंद वाटतो. पाहणें, ऐकणे इकडे त्याचें इतके लक्ष नसतें. कारण त्या योगें त्याच्या भावाची हानि होते."

यावरहि मथुरबाबू जेव्हां सोडीनात, तेव्हां त्यांनी निर्वाणीचे शस्त्र काढलें. ते म्हणाले-" आपल्याला तर बुवा आणखी कांही समजत नाही. आईला सांगून पाहतों, मग तिला योग्य दिसेल तें ती करील."

या संवादानंतर कांही दिवसांनी मथुरबाबूंना एकाएकी भावसमाधि प्राप्त झाली ! श्रीरामकृष्ण सांगत-" मला बोलावणें पाठविलें. जाऊन पाहतों तों तो जसा मनुष्यच नव्हे ! डोळे लाल दिसत होते आणि डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहात होत्या. ईश्वराच्या गोष्टी बोलत बोलत तो रडून भिजून गेला होता. त्याचें वक्षःस्थळ थर थर कांपत होतें. मला पाहतांच पायांना घट्ट मिठी

मारून म्हणाला—" बाबा, घात झाला ! आज तीन दिवस झाले, असा प्रकार चालला आहे ! प्रयत्न केला तरी संसाराकडे मनच लागत नाही. सारा गोंधळ होऊन गेला आहे ! तुमचा भाव तुम्हांलाच लखलाभ होवो. मला तर तो सहन होत नाही ! मी म्हणालों, " कां बरे ? आता कां ! तूं म्हणाला होतासना, की मला भाव पाहिजे म्हणून ? " तेव्हां तो म्हणाला—" मी म्हणालों होतो खरा, आणि आनदांतहि आहे. पण त्या आनंदाला काय करायचें आहे ? हा इकडे सारा नाश होऊं लागला आहे ना ? बाबा ! हा भाव मला नको, तुम्ही आपला तो परत घेऊन जा ! " तेव्हां मला हसू आलें आणि म्हणालों, " तुला तर हें मी प्रथमच सांगत होतों. ! " तो म्हणाला, " बाबा! होय, तें सर्व खरें पण तेव्हां कुणाला माहीत होतें की हा एखाद्या भुतासारखा मानगुटीवर बसेल म्हणून ? आणि तो फिरवील तसें चोवीस तास फिरायला लागेल म्हणून ? मनांत आलें तरी कांही करतां येत नाही ! " तेव्हां मग त्याच्या छातीवरून कांही वेळ हात फिरविल्यावर त्याचा भाव शांत झाला.

मथुरबाबूंचा श्रीरामकृष्णांशीं किती विलक्षण मधुर संबंध असे ! साधनाकाळीं त्यांना कशाची जरूरी लागली की त्यांनी ' मला अमुक पाहिजे ' असे सांगावयाचा अवकाश, की मथुरबाबूंनी ते त्यांस तत्काळ मिळवून द्यावें. समाधीकाळीं अथवा इतर कोणत्याहि वेळेस, त्यांना जी दर्शनें होत, अगर मनांत जे भाव उत्पन्न होत, तें सारें त्यांनी मथुरबाबूंना प्रथम सांगावें व " हें असें कां बरे झालें ? याबद्दल तुला काय बरें वाटतें ? " असें त्यांना विचारावें ! त्यांच्या संपत्तीचा सद्व्यय कसा होईल, देवीच्या संपत्तीचा व्यय देवसेवेंत व साधुसंतांच्याच सेवेंत होऊन, मथुरबाबूंना त्याचें पुण्य कसे लागेल—या गोष्टींकडे त्यांचें सदैव लक्ष असें. पुण्यवती राणी रासमणी व मथुरबाबू हे दोघेहि कैलासवासी झाल्यावर कांही दिवसांनी, आम्ही श्रीरामकृष्णांच्या आश्रयास आलो, तेव्हां सुद्धा मधून मधून, त्यांचे या गोष्टींकडे लक्ष असल्याचें दिसून येई.

मथुरबाबूंच्या वेळेपासून असा बंदोबस्त असे की श्रीकालीमाता व राधागोविंदजी यांच्या प्रसादांतील एक मोठं ताट-भर प्रसाद आणि एक ताट-भर

फलमूल मिठाई वगैरे, रोज श्रीरामकृष्णांच्या खोलींत त्यांच्या स्वतःसाठी व इतर कोणी जे त्यांच्या दर्शनास येतील त्यांना प्रसाद म्हणून देण्यासाठी, पाठविण्यांत येत असे. एखादे दिवशीं विशेष नैवेद्य झाला, तर त्यांतूनहि कांही भाग त्यांच्याकडे येई.

फलहारिणी पूजेच्या दिवशीं देवालयांत बराच मोठा उत्सव होई. एके वर्षी, त्या उत्सवाच्या दिवशीं, श्रीरामकृष्णांच्या दर्शनास स्वामी योगानंद वगैरे बरीच भक्तमंडळी आली होती. आज श्रीरामकृष्ण मोठ्या आनंदात होते. मधून मधून त्यांना भावावेश होता. मधून मधून एखाद्या पांच वर्षांच्या मुलाप्रमाणे मोठ्या आनंदाने आईचें नामस्मरण करीत ते नाचत होते. जगन्मातेची पूजा संपते तों रात्रहि संपली; जरा थोडी विश्रांति घेतात न घेतात तोंच प्रभात झाली.

सकाळीं आठ नऊ वाजले. तरी अजून त्यांच्या खोलींत, बंदोबस्ताप्रमाणे देवीच्या प्रसादाचीं ताटें आलीं नव्हतीं. कालीघरांतील पुजारी ( त्यांचा पुतण्या रामलाल ) याला हांक मारून त्यांनी याचें कारण विचारलें. पण त्याला ठाऊक नव्हतें. त्याने सांगितलें:—सारा प्रसाद दप्तरखान्यांत खजीनदार बाबूंकडे केव्हांच पाठविला आहे व ते नेहमीप्रमाणे ज्याच्या त्याच्याकडे पाठवीतहि आहेत परंतु इथलाच अजून कां आला नाही, कोण जाणें! " रामलालचें म्हणणें ऐकून तर, त्यांना जास्तच चिंता वाटूं लागली ! " दप्तरखान्यांतून अजून कसा प्रसाद आला नाही, " हेंच ज्याला त्याला विचारूं लागले ! आणखी कांही वेळ लोटला तरी सुद्धा जेव्हां प्रसाद येण्याचें कांहीच चिन्ह दिसेना, तेव्हां श्रीरामकृष्ण स्वतः उठले व जोडा घालून खजिनदार बाबूंकडे गेले आणि त्यांना म्हणाले, " बाबूजी, ( आपल्या खोलीकडे बोट करून ) त्या घरचा नेहमीचा प्रसाद अजून सुद्धा कां बरे पाठविला नाही ? विस्मरण तर नाही झालें ? आज कित्येक दिवसांची प्रसाद येण्याची चाल आहे आणि ती जर विस्मरण होऊन अशी बंद झाली, तर मोठी अन्यायाची गोष्ट आहे ! " खजीनदार बाबू जरा वरमून म्हणाले,

" अँ ! अजून सुद्धा आपल्याकडे प्रसाद आला नाही ? खरीच अन्यायाची गोष्ट आहे. मी आता इतक्यांत पाठवून देतों. "

योगानंद तेव्हां लहान होते. थोर सावर्ण चौधरीच्या कुळांत जन्म झाल्यामुळे, त्यांना मोठा अभिमान वाटत असे. पुजारी, खजीनदार, नोकर वगैरे लोक म्हणजे त्यांना तुच्छ वाटत. ते नुकतेच श्रीरामकृष्णांकडे येऊं लागले होते. पण या लोकांशीं बोलणें त्यांना कमी दर्जाचें वाटे; म्हणून प्रसादाचीं ताटें कां आलीं नाहीत म्हणून जेव्हां श्रीरामकृष्णांनी चौकशी चालविली, तेव्हां ते म्हणाले सुद्धा—" महाराज, नाही आलीं तर नाही आलीं. त्यांत काय मोठे ? आपण तर त्यांतील कशाला शिवत देखील नाही. मग त्याबद्दल एवढी विचारपूस कशाला ?" थोडक्याच वेळांत जेव्हां श्रीरामकृष्ण खजीनदारांकडे स्वतः चौकशी करण्यास निघाले, तेव्हा योगानंद मनांत म्हणूं लागले, " काय आश्चर्य आहे ? आज हे यःकश्चित् एवढयाशा फलमूलमिठाईसाठी इतके फिकिरींत कां पडले आहेत, कोण जाणे ! ज्यांच्या मनाची शांतता कसल्याहि प्रसंगीं ढळत नाही, त्यांनी आज हें काय चालविले आहे ? " परंतु पुष्कळ विचार करून सुद्धा जेव्हां याचें कारण लक्षांत येईना तेव्हां त्यांनी असा सिद्धांत बांधला, की " श्रीरामकृष्ण असोत की, आणिक कोणी असोत, सर्वजण आपल्या वळणावर जातात, हेंच खरें ! यांचा जन्म पुजारी ब्राह्मणाच्या घरीं झालेला, तेव्हां त्या पेशाचा कांहीं तरी गुण अंगीं आलाच पाहिजे ! नाही तर काय ? मोठमोठया संकटसमयी शांत वृत्ति आणि या असल्या यःकश्चित् गोष्टींत इतकी धडपड ? कारण, तसें नसतें तर प्रसादांतला एक तुकडा सुद्धा स्वतः खात नाहीतच आणि तरी सुद्धा त्यासाठी किती धडपड चालविली आहे पाहा ! वंशानुगत संस्कार दुसरें काय ? "

असा विचार योगानंदांच्या मनांत चालू आहे, इतक्यांत श्रीरामकृष्ण तेथे आले व त्यांच्याकडे पाहून म्हणाले, " काय समजलास, साधुसंत, देवदेवता यांची नीट सेवा चालावी, म्हणून राणी रासमणी एवढी संपत्ति ठेवून गेली. या

खोलींत जो प्रसाद येतो, तो सर्व भक्तमंडळीच खातात, ईश्वरदर्शनाला उत्सुक अशींच माणसें तो प्रसाद खातात. त्या योगानेच राणीची संपत्ति योग्य कारणीं लागून, तिच्या दानाचें सार्थक होतें. पण हे देवळांतील इतर ब्राह्मण जें घेऊन जातात, त्याचा योग्य उपयोग होत नाही. त्याचा विकून पैसा करितात ! कोणी कोणी तर वेश्या ठेवल्या आहेत, त्यांना तो प्रसाद नेऊन खायला घालतात ! असे रोजगार चालतात ! म्हणून तसें होऊं नये व राणीच्या दानाचें अंशतः तरी सार्थक व्हावे, यासाठी इतका झगडा करीत आहे ! ” श्रीरामकृष्णांच्या धड-पडीचा हा गूढ अर्थ ऐकून योगानंद चकित झाले व त्यांना आपल्या विचारांची लाज वाटली.

श्रीरामकृष्णांचा मथुरबाबूंशी किती अद्भुत संबंध होता ! मथुरबाबूंचा भक्तिविश्वास वाढत वाढत शेवटीं त्यांना बाबा म्हणजे प्राणाहून प्रिय वाटूं लागले. याचे मुख्य कारण त्यांचें त्यांच्यावरील अहेतुक प्रेम आणि शिवाय त्यांची लहान बालकासारखी अवस्था. सांसारिक सर्व विषयांमध्ये पूर्ण अनभिज्ञ, अशा लहान बालकाबद्दल कोणाला प्रेम वाटत नाही ? तें जवळ असेल तर, खेळ व खोडय करतांना त्याला कांही इजा होऊं नये म्हणून कोण त्याला नीट जपण्याची शक्य ती काळजी घेत नाही ? आणि श्रीरामकृष्णांच्या बालक-भावामध्ये कृत्रिमता किंवा ढोंग यांचा लवलेशहि नव्हता ! या भावांत असतां खरोखरच एखाद्या बालकाप्रमाणे आत्मसंरक्षण करण्यास ते अगदी असमर्थ आहेत असें वाटे ! म्हणून तेजस्वी व बुद्धिमान् मथुरबाबूंच्या मनांत त्यांचें सर्व गोष्टींत रक्षण करण्याची कल्पना उत्पन्न व्हावी, हें साहजिकच होतें. म्हणून एक पक्षीं ते श्रीरामकृष्णांच्या दैवी शक्तीवर अत्यंत दृढ विश्वास ठेवीत, तसाच दुसऱ्या पक्षीं, बाबांना एखादे अनभिज्ञ बालक समजून, त्यांचें रक्षण करण्यास सदैव कमर बांधून तयार असत. सर्वज्ञ गुरुभाव व अल्पज्ञ बालकभाव यांचें हें असलें विचित्र मिश्रण बाबांच्यामध्ये असलेलें पाहून मथुरबाबूंची अशी दृढ भावना झाली की, सर्व गोष्टींत, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष देहरक्षणाच्या कामांत सुद्धा, श्रीरामकृष्णांचें रक्षण आपल्याला केलें पाहिजे आणि मानवी शक्ति व बुद्धि यांच्या आटोक्याबाहेर असलेल्या सूक्ष्म पारमार्थिक

विषयांत आपलें रक्षण बाबा करतील ! सर्वज्ञ बाबा मथुरबाबूंचें उपास्य दैवत असलें तरी, बालकभावाविष्ट सरलता व निर्भरता यांची मूर्तीच अशा बाबांचीहि, कधी कधी मथुरबाबूंना समजूत करावी लागे आणि ही समजूत करण्याची शक्तीहि श्रीरामकृष्णांच्यावरील अपार प्रेमाने त्यांच्या अंगीं उत्पन्न झाली होती.

मथुरबाबूंबरोबर गप्पागोष्टी चालल्या असतां, एक दिवस श्रीरामकृष्ण एकाएकीं मधेच शौचास लागली म्हणून उठून गेले. परत आल्यावर मथुरबाबूंनी पाहिलें, तों, त्यांचा चेहरा फार चिंताक्रांत झालेला दिसत होता. श्रीरामकृष्ण म्हणाले— " ही काय आज भलतीच पंचाईत होऊन बसली, पाहा बरें ! आता एक केवढा थोरला जंत पडला ! एवढा मोठा जंत तर कोणालाहि पडत नाही. मग हें मलाच काय झालें असावें बरें ? " आता एक क्षणापूर्वीच मथुरबाबूंना निरनिराळे आध्यात्मिक विषय समजून सांगणारे बाबा, या यःकश्चित् साध्या गोष्टीने, एखाद्या लहान मुलासारखे चिंताक्रांत होऊन मथुरबाबूंपाशी आश्वासनासाठी आले होते ! त्यांचें बोलणें ऐकतांच मथुरबाबू म्हणाले—" वा ! हें तर फारच छान झालें ! बाबा, सर्वांच्या अंगीं कामकीट असतो आणि तोच त्यांच्या मनांत नानाप्रकारचे कुविचार उत्पन्न करून, त्यांना वाईट कृत्यें करायला लावतो ! जगदंबेच्या कृपेने तुमच्या अंगांतील तो कामकीट पडून गेला; मोठें छान झालें ! त्याबद्दल एवढी चिंता कसली ? " हें ऐकतांच एखाद्या लहान मुलासारखी त्यांची समजूत पटून ते म्हणाले, " वाः, ठीक बोललास ! बरें झालें, की तुझ्याजवळ ही गोष्ट बोललों ! "

बोलतां बोलतां एक दिवस बाबा म्हणाले-" हें बघ, आईने मला दाखवून समजून सांगितलें आहे, की-" तुझे अंतरंग भक्त आहेत ते सारे येतील, तुझ्याकडून ईश्वरीय विषय समजावून घेतील, ऐकतील व प्रत्यक्ष पाहतील; प्रेम भक्तिलाभ करून घेतील. ( स्वतःकडे बोट दाखवून ) या शरीराच्या आश्रयाने आई अनेक खेळ खेळेल, अनेकांवर उपकार करील आणि म्हणून

हा देहाचा पिंजरा तिने अजून मोडूं दिला नाही, जतन करून ठेवला आहे! तूं काय म्हणतोस? हा सारा भ्रम आहे, का हें खरें आहे सांग पाहूं?"

मथुरबाबू म्हणाले—" भ्रम कां असेल? बाबा! आईने तुम्हांला आजपर्यंत जर कांहीच खोटें दाखविलें नाहीं, तर हें तेवढें खोटें कसें असेल? हेंहि खरें असलेंच पाहिजे. अजून सुद्धा तुमचे भक्त का बरे येत नाहीत? ते लौकर लौकर आले म्हणजे आम्ही सारे मिळून आनंद करूं!"

झालें; बाबांची समजूत पटली. ते म्हणाले—" काय सांगावें बुवा ते सगळे केव्हां येतील तें? आईने दाखविलें आहे व सांगितलें आहे खरें, आता या उपर तिची मर्जी!"

या गोष्टीनंतर बरेच दिवसांनी, एके दिवशी मथुरबाबू श्रीरामकृष्णांना म्हणाले, " बाबा, तुम्ही तर म्हणाला होतां, की इथले अंतरंग भक्त येणार आहेत, मग ते अजून कोणी आले नाहीत ते?"

श्रीरामकृष्ण—" ते आता कधी येणार हे कुणी सांगावें? पण ते येणार खास; आईनेच स्वतः हें मला सांगितलें आहे. तिने सांगितलेल्या बाकीच्या साऱ्या गोष्टी एक एक घडून येत आहेत, मग हीच तेवढी कां बरें घडून येत नाही?" असें म्हणून, आईची ही गोष्ट खोटी होणार की काय, ह्या विचारानं ते मोठ्या चिंतेत पडले! त्यांचें तें हिरमुसलेलं तोंड पाहून मथुरबाबूंना वाईट वाटलें व ही गोष्ट आपण काढली हें बरें केलें नाही, असें त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें व बालकस्वभाव श्रीरामकृष्णांची समजूत घालण्यासाठी ते म्हणाले, " बाबा! ते येवोत अथवा न येवोत, मी तर तुमच्या चरणांचा चिरकालचा भक्त आहेना? मग ही गोष्ट खोटी कुठे ठरली? मी एकटाच तुमच्या शंभर भक्तांच्या जागीं नाही कां? म्हणून आईने सांगितलें की पुष्कळ भक्त येतील!" श्रीरामकृष्णांची या बोलण्याने समजूत पटली! ते म्हणाले, " बुवा! तूं म्हणतोस असेंहि असेल; कोणीं सांगावें?"

राणी रासमणीला पुत्र नव्हता. चार मुली मात्र होत्या. रासमणीची तिसरी मुलगी ही मथुरबाबूंची पहिली पत्नी होती. तिच्या मृत्यूनंतर कनिष्ठ कन्येशीं राणीने त्यांचें लग्न लावून दिलें. पुढे आपल्या मुलींत भांडण तंटे होऊं नयेत, म्हणून दूरदृष्टिसंपन्न राणीने आपल्या मृत्यूपूर्वीच आपल्या संपत्तीच्या वाटण्या केल्या होत्या. ह्या वाटण्या झाल्यानंतर, पुढे एक दिवस मथुरबाबूंची पत्नी आपल्या बहिणीच्या भागांतील पुष्करिणीवर स्नानास गेली असतां, तेथील थोडीशी भाजी तोडून घेऊन परत चालली. श्रीरामकृष्ण तेथे होते व त्यांची दृष्टि सहज तिकडे गेली. हें तिचें कृत्य पाहून त्यांच्या मनांत अनेक तऱ्हेचे विचार आले- " सेजगिन्नी * न बोलतां दुसऱ्याची वस्तु घेऊन गेली, हा मोठा अन्याय झाला. तिच्या हें लक्षांत आलें नाही की, न सांगतां दुसऱ्याची वस्तु नेणें म्हणजे चोरी करणेंच होय. पण आधी दुसऱ्याची जिन्नसच मुळी अशा रीतीने घ्यावी कां ? " असे त्यांचे विचार चालू आहेत, इतक्यांत जिच्या भागांत ती पुष्करिणी होती, तीहि तेथे आली. त्याबरोबर श्रीरामकृष्णांनी पाहिलेली सर्व हकीगत तिला साद्यंत सांगितली ! तिने ते सर्व ऐकून घेतलें आणि एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीबद्दल श्रीरामकृष्णांचा हा गंभीर भाव पाहून तिला हसें आवरेना आणि ती म्हणाली, " खरंच, बाबा ! सेजने हा मोठा अन्याय केला. " इतक्यांत सेजगिन्नीहि तेथे आली. तिने आपल्या बहिणीचे हसण्याचें कारण ऐकून म्हटलें-"बाबा, ही गोष्ट सुद्धा तुम्ही तिला सांगितलीत ना ? तिने पाहूं नये म्हणून मी किती लपवून छपवून ती भाजी घेऊन गेलें आणि तुम्हीं हें सारें तिला सांगून माझी फजीती केली ! " असें म्हणून त्या दोन्ही बहिणी हासू लागल्या. तेव्हां श्रीरामकृष्ण म्हणाले, " आता हें काय बुवा आपल्याला ठाऊक ? दौलतीच्या जर नीट वाटण्या झाल्या आहेत तर, असें न सांगतां एखादी जिन्नस घेऊन जाणें चांगलें नाही, असें आपलें मला वाटतें. म्हणून मीं हें सांगून टाकलें. आता याऊपर तिची

---

* मथुरबाबूंच्या पत्नीला श्रीरामकृष्ण सेजगिन्नी व मथुरबाबूंना सेजबाबू म्हणत.

मर्जी ! ” हें ऐकून तर, त्या बहिणी अधिकच हासू लागल्या आणि मनांत म्हणूं लागल्या—“ बाबांचा स्वभाव किती सरळ आहे ? ”

एक पक्षीं बाबांचा असा बालकासारखा सरळ स्वभाव आणि दुसरे पक्षीं कर्तुमकर्तुं समर्थ अशा प्रकारचें सामर्थ्य.

एके वेळीं दुसऱ्या एका जमीनदाराशीं, कांहीं कारणाने भांडण होऊन मथुरबाबूंच्या हुकुमाने मारामारी झाली व तींत त्या जमीनदाराचा खून झाला. मथुरबाबूंनी या संकटसमयीं श्रीरामकृष्णांकडे धांव घेतली व त्यांचे पाय घट्ट धरून म्हणाले-“ बाबा, आता मला वांचवा ! ” बाबांनी प्रथम त्यांची खूप निर्भर्त्सना केली. ते म्हणाले—“ मूर्खा, तूं रोज कांही तरी झेंगट घेऊन येत जा आणि म्हणत जा—“ बाबा, मला वांचवा ! ” मला काय हवें ते करण्याचें सामर्थ्य आहे काय रे मूर्खा ? जा, आता केलेलें निस्तर जा स्वतःच. माझ्याकडे कशाला आलास ? ” पण मथुरबाबू कांही केल्या सोडीनात, तेव्हां ते म्हणाले, “ निघ येथून, पुन्हा असें करूं नको. आईच्या मनांत असेल तसें होईल ! ” आणि खरेंच मथुरबाबूवरचे हें संकट टळून गेलें !

अशा रीतीने दोन्ही तऱ्हेच्या भावांचा मथुरबाबूंना अनेकदा अनुभव आल्यामुळे, त्यांचा असा दृढ विश्वास झाला की, या बहुरूपी बाबांच्या कृपेनेच आपलें सारें,—धन म्हणा, प्रताप म्हणा—टिकलें आहे आणि म्हणूनच त्यांना ते ईश्वरावतार समजून त्यांची भक्ति करीत असत. आपल्या भक्ति-भाजनासाठी केलेल्या खर्चावरून, विषयी लोकांच्या भक्तीची दौड सहज समजून येते. मथुरबाबू—चतुर, हिशोबी, व्यवहारदक्ष व बुद्धिमान् मथुरबाबू—बाबांच्यासाठी किती सढळ हाताने पैसा पाण्यासारखा खर्च करीत, हें पाहूनहि त्यांच्या भक्तीचा अजमास बांधतां येतो. मेळे, नाटक वगैरे ऐकत बसले असतां, श्रीरामकृष्णांपुढे त्यांनी दहा दहा रुपयांच्या पुरचुंडया बांधून चांगल्या गायकांना बक्षीस म्हणून देण्यासाठी ठेऊन याव्या ! गाणें ऐकत असतां एखादें गाणें

श्रीरामकृष्णांस अत्यंत आवडलें, तर त्यांनी एखादे वेळी त्या साऱ्याच्यासाऱ्या पुरचुंडया एकदम त्या गायकांस बक्षीस द्याव्या! मथुरबाबूंना त्याबद्दल कांही वाटूं नये! उलट—"बाबांच्या सारख्या थोरांनी बक्षीसहि तसें थोरलेंच दिलें पाहिजे!" असें म्हणून आणखी पुरचुंडया त्यांच्यापुढे ठेवाव्या! आणखी एखाद्या गाण्याने तब्यत खुश होऊन त्यांनी पुन्हा सारेच्यासारे पैसे त्या गवयाला बक्षीस देऊन टाकावे व तेवढयानेहि तृप्त न होऊन जवळपास देण्यासारखे आणखी कांही नसल्यास एखादे वेळीं नेसलेलें बहुमूल्य वस्त्रहि देऊन टाकून आपण समाधिमग्न होऊन पडावें! आपल्या संपत्तीचें सार्थक झाले असें समजून मथुरबाबूंनी आनंदभरांत त्यांस पंख्याने वारा घालीत बसावें!

बाबांना बरोबर घेऊन मथुरबाबूंनी काशी, वृंदावन वगैरे यात्रा केल्या, तेव्हां बाबांच्या सांगण्यावरून काशींत त्यांनी "कल्पतरु" होऊन दान केलें व ज्याला जें हवें होतें तें त्याला त्यांनी पुरविलें. त्यावेळीं बाबांनाहि कांही देण्याची त्यांची इच्छा झाली पण बाबांना तर कसलाच अभाव दिसेना. त्यांचा फारच आग्रह दिसल्यावरून बाबा म्हणाले—"मला एक कमंडलू दे!" बाबांचा हा अलौकिक त्याग पाहून मथुरबाबूंच्या डोळ्यास पाणी आलें.

तीर्थयात्रा करीत असतां वैद्यनाथाजवळील एका खेडयांतून जात असतां तेथील लोकांचें दारिद्र्य दुःख पाहून बाबांचें हृदय कळवळलें. तें मथुरबाबूंना म्हणाले—"तूं तर आईचा कोठीवाला आहेस, या साऱ्या लोकांना प्रत्येकीं एकेक वस्त्र व एक वेळ डोक्यास पुरेल इतकें तेल दे व पोटभर जेवण घाल." मथुरबाबू प्रथम कांकूं करूं लागले, म्हणाले—"बाबा! या तीर्थयात्रेच्या पायीं फार खर्च झाला आहे आणि हे लोकहि पुष्कळ आहेत. या साऱ्यांना अन्न वस्त्र देऊं लागलें, तर आणखीहि फार खर्च होईल. मग कसें करावें?" पण श्रीरामकृष्ण कांहीच ऐकेनात. गावांतल्या लोकांचें दारिद्र्य व दुःख पाहून त्यांचें हृदय भरून आलें होते व डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या! ते म्हणाले-"दूर हो मूर्खा! तुझ्या काशीला मी येत नाही; जा, मी त्यांच्यांतच राहणार!

यांना कोणी नाही, यांना सोडून मी येत नाही ! " असें म्हणून एखाद्या लहान मुलासारखा गळा काढून ते त्या लोकांत जाऊन रडत बसले ! हा प्रकार पाहून मथुरबाबूंनी लगेच कलकत्त्याहून धान्य व कापड आणविलें आणि बाबांच्या इच्छेप्रमाणे सार्‍या गोष्टी केल्या ! त्या दरिद्री लोकांचा आनंद पाहून बाबांसहि अत्यानंद झाला व त्यांचा निरोप घेऊन ते मथुरबाबूंबरोबर काशीस गेले. आणखी एका प्रसंगीं मथुरबाबूंबरोबर त्यांच्या जमिनी वगैरे पाहण्यास गेले असतां, तेथील लोकांचे दारिद्र्य पाहून, त्यावेळेसहि मथुरबाबूंकडून त्या सर्वांना त्यांनी अन्नवस्त्र देवविलें.

सर्वकाळ भावावस्थेंत असणार्‍या श्रीरामकृष्णांचा मथुरबाबूंशीं अशा प्रकारचा अद्भुत व मधुर संबंध होता. साधनाकाळीं एका वेळीं त्यांनी आपल्या जगन्मातेची अशी प्रार्थना केली होती की-"आई, मला शुष्क साधु करूं नकोस, मला रसांत ठेव. " मथुरबाबूंशीं त्यांचा हा अद्भुत मधुर संबंध म्हणजेच त्या प्रार्थनेचें फल होय आणि यासाठीच जगन्मातेने श्रीरामकृष्णांस दाखवून दिलें होतें की त्यांच्या देहरक्षणादि कामासाठी त्यांच्याबरोबरच चौघेजण रसद्दारहि ( Body guards ) पाठविले आहेत आणि त्या चौघांत मथुरबाबू हे पहिले आणि श्रेष्ठ. ईश्वरी योजना असल्याशिवाय असा संबंध चौदा वर्षे टिकणें शक्य नाही. हाय गे पृथ्वी ! अशा प्रकारचे विशुद्ध व मधुर संबंध तूं आजपर्यंत कितीसे पाहिले आहेस ? आणि भोगवासने ! धन्य तुझी, की मनुष्याचें मन तूं कसें पोलादी साखळ्यांनी जखडून टाकलें आहेस ! अशा प्रकारचा शुद्धबुद्धमुक्तस्वभाव व अहेतुक प्रेम वात्सल्याची मूर्तिमंत प्रतिमाच अशा श्रीरामकृष्णांच्या दर्शनाचा व अद्भुत संगतीचा लाभ मिळून सुद्धा, आमचें मन तुला सोडतां सोडीत नाही ! म्हणून भोगवासने, धन्य तुझी !

एक दिवस श्रीरामकृष्णांच्या तोंडून मथुरबाबूंच्या अनेक गोष्टी ऐकून त्यांच्या अपूर्व भाग्याची धन्यता वाटून, एकजण म्हणाला-" ( मृत्यूनंतर ) मथुरबाबूंचें काय झालें महाराज ? त्याला खात्रीने पुन्हा जन्म घ्यावा लागणार

नाही असें वाटतें." श्रीरामकृष्णांनी उत्तर दिलें—"कुठे तरी एखादा राजा होऊन जन्मला असेल आणि काय ? त्याची भोगवासना नाहीशी झाली नव्हती!' असें म्हणून श्रीरामकृष्णांनी दुसऱ्याच गोष्टी काढल्या.

अशा प्रकारचें मथुरबाबूंचें चरित्र आहे. श्रीरामकृष्णांच्या चरित्राशी, विशेषतः साधनाकालीं, त्यांचा किती संबंध आहे. हें यावरून थोडे फार लक्षांत येईल. अशा प्रकारची सेवा, अशा प्रकारचा भक्तिविश्वास, अशा प्रकारचा आपल्या आराध्यदैवताशीं अत्यंत प्रेममय, भक्तिमय व पूर्ण विश्वासमय दिव्य व अलौकिक संबंध आम्हीं कोठेहि वाचला नाही, की ऐकला नाही की पाहिला नाही!

या अलौकिक संबंधाचा जों जों विचार करावा, तों तों मन अधिकाधिक चकित होऊन जातें! आणि श्रीजगदंबेने श्रीरामकृष्णांच्या दिव्य लीलेला साहाय्य करण्यासाठीच म्हणून मथुरबाबूंना पाठविलें होतें, असेंच निःसंशय वाटूं लागते! पाहा बरें, श्रीरामकृष्णांच्या साधनांच्या सुरवातीसच मथुरबाबूंचा व त्यांचा संबंध घडून आला आणि साधनांचा शेवट होऊन श्रीरामकृष्ण अद्वैतभावभूमीच्या अत्युच्च जागी सदासर्वकाळ अवस्थान करूं लागले व यथार्थ सद्गुरु–पदवीवर आरोहण करून अशेषलोककल्याण साधूं लागले, त्यावेळीं मथुरबाबूंचें देहावसान झालें. त्याचें काम संपलें. परंतु त्यांनी आपलें काम असें करून ठेविलें की, त्या कामाला आध्यात्मिक जगतांत कोठेहि तोड सापडत नाही! धन्य ते मथुरबाबू आणि धन्य ते श्रीरामकृष्ण!

# १७. साधना आणि दिव्योन्माद

" ईश्वरप्रेमाच्या प्रचंड लाटा जेव्हां कांही आगापिछा नसतां मनुष्याच्या मनांत उसळूं लागतात, तेव्हां हजार प्रयत्न करून सुद्धा त्यांना मागे हटवितां येत नाही ; "

" त्यावेळीं आईचें कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने दर्शन झालें तर ठीक; नाही तर प्राण असा व्याकुळ होई, की वाटे की आता जीव जातो ! !—आणि लोक म्हणत की याला वेड लागले आहे ! "

—श्रीरामकृष्ण

---

श्रीजगदंबेच्या प्रथम दर्शनाच्या आनंदांत बुडून गेल्यामुळे, यापुढे श्रीराम-कृष्णांना कांही दिवसपर्यंत कोणतेंच काम करणें अशक्य होऊन गेलें ! श्रीदेवीची पूजा वगैरे नित्यनैमित्तिक काम सुद्धा, त्यांच्याने होईनासें झालें. मथुरबाबूंच्या संमतीने, एका दुसऱ्या ब्राह्मणाच्या मदतीने हृदय तें काम करू लागला व आपल्या मामांस कांही वायुरोग झाला असावा, अशा समजुतीनें त्याने त्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था चालविली ! हृदयचा एका नामांकित वैद्याशीं पूर्वीपासून परिचय होता व त्याचेंच औषध श्रीरामकृष्णांना सुरू करून बरेच दिवस झाले, तरी जेव्हां कांही गुण दिसेना तेव्हां श्रीरामकृष्णांस वायुरोग झाल्याची बातमी त्याने घरीं कामारपुकूरास कळविली.

श्रीजगदंबेच्या दर्शनासाठी अत्यंत व्याकुळ होऊन, श्रीरामकृष्ण ज्या दिवशीं बेहोश होऊन पडत नसत, त्या दिवशीं नेहमीप्रमाणे पूजाअर्चा वगैरे ते करीत. पूजा व ध्यान वगैरे करतांना त्यांच्या मनांत काय चाललें असे व त्यांना काय अनुभव प्राप्त होत असत, याचें थोडेंफार दिग्दर्शन ते आमच्याजवळ कधी कधी करीत असत. ते म्हणत, " जगदंबेच्या नाट्यमंदिरांत* जी एक ध्यानस्थ भैरव मूर्ति आहे ती पाहून, ध्यान करतांना मी मनाला म्हणे, " असे शांत व स्तब्धपणे बसून तूं जगदंबेचें चिंतन केलें पाहिजेस ! " ध्यान करण्यास बसतांक्षणीं मला स्पष्ट ऐकूं येई की शरीराचे सर्व सांधे पायापासून वरपर्यंत खट खट आवाज होऊन बंद होत आहेत ! जणु काय आंतून त्यांना कोणी कुलूपच लावीत आहे ! जोंपर्यंत मी ध्यानस्थ असें, तोंपर्यंत शरीर जरा सुद्धा हालविण्याला किंवा आसन बदलण्याला अथवा मध्येच ध्यान सोडून दुसरें एखादे काम करण्याला मुळी सामर्थ्य नसे ! पहिल्यासारखा खट खट आवाज होऊन,—यावेळीं डोक्यापासून पायापर्यंत,—सांधे मोकळे होईपर्यंत, जणु काय कोणी जोर करून, मला एकाच स्थितीमध्ये बसावयास लावी ! ध्यानाच्या सुरवातीस प्रथम प्रथम काजव्यांच्या पुंजक्याप्रमाणे ज्योतिबिंदूंचे पुंजके दिसत ! कधी कधी धुक्याप्रमाणे ज्योतीने सर्व दिशा व्याप्त झाल्या आहेत असे दिसे अथवा कधी कधी रुप्याच्या समुद्रासारखा चकचकीत ज्योतिःसमुद्र सर्व दिशांना पसरला आहे असें दिसे ! डोळे मिटलेले असतां असें दिसे व कित्येकदा डोळे साफ उघडे असतांहि असें दिसे ! आपण हें काय पाहात आहोंत हें समजत नसे अथवा असें दर्शन होणें चांगलें का वाईट, हेंहि समजत नसे ! म्हणून व्याकुळतेने मी आईची प्रार्थना करी—"आई, हें मला काय होत आहे, तें कळत नाही. तुझी प्रार्थना करण्याचे मंत्र तंत्रहि मला ठाऊक नाहीत; काय केलें असता तुझें दर्शन होईल तें तूंच मला शिकव; तूं जर न शिकवशील तर आई, दुसरें कोण बरें मला शिकवील ? तुझ्याशिवाय मला दुसरें कोण आहे बरें ? " अत्यंत व्याकुळ चित्ताने अशी प्रार्थना करी व रडत बसे ! "

---

* सभामंडप

या वेळीं श्रीरामकृष्णांची पूजा, ध्यान वगैरे कृत्यें कांहीं विलक्षण स्वरूपाचीं झालीं होतीं. तो अद्भुत तन्मय भाव दुसऱ्याला समजावून सांगणें कठीण. त्या भावामध्ये, श्रीजगदंबेचा आश्रय केल्यामुळे त्यांच्या ठिकाणीं बालकाची सरलता, विश्वास, निर्भरता व माधुर्य हीं सर्वकाळ दिसून येत. गांभीर्य अथवा देशकालपात्राप्रमाणे विधिनिषेध मानून चालणें अथवा भावी गोष्टींचा विचार करून, दोन्ही डगरींवर हात ठेऊन व्यवहार करणें—वगैरे गोष्टींचा त्यांत पूर्ण अभाव दिसून येई. त्यांना पाहतांच असें वाटे की, इच्छामयी जगदंबेच्या इच्छेमध्ये आपली क्षुद्र इच्छा व अहंकार बुडवून टाकून, "आई! तुझ्या या एकांत शरणागत बालकाला जे कांहीं सांगायचें असेल, अगर करायचें असेल तें तूंच सांग आणि कर," असें अंतःकरणपूर्वक म्हणून, त्या जगदंबेच्या हातांतील यंत्र होऊन, ते सर्व कर्मे करीत आहेत! परंतु अशा अत्यंत निरहंकार वृत्तीने वागूं लागल्यामुळे इतर लोकांचा विश्वास व त्यांचीं कृत्यें यांच्याशीं, त्यांच्या व्यवहाराचा विरोध उत्पन्न होऊन, निरनिराळे लोक, प्रथम एकमेकांत व पुढे पुढे स्पष्टपणे, नाना प्रकारच्या गोष्टी बोलूं लागले. परंतु अशी स्थिति झाली अथवा लोक असें करूं लागले, तरी त्याचा काय उपयोग? जगदंबेचें हे अलौकिक बालक सर्वतोपरी तिच्या इच्छेप्रमाणे वागत असल्यामुळे, जगांतील गलबला त्याच्या कानांतच शिरत नसे! ते या वेळीं संसारांत असूनहि नसल्यासारखे होते. बाह्य जगत् म्हणजे त्यांना स्वप्नवत् भासूं लागलें होतें, आणि तें पूर्ववत् सत्य समजणें, हें कांहीं केल्या त्यांना शक्य नव्हते. 'सत्य' जर कांहीं कुठे त्यांना या वेळीं भासत असेल, तर तें म्हणजे केवळ श्रीजगदंबेची चिन्मय आनंदघन मूर्ति!

यापूर्वी पूजा ध्यानादि कालीं त्यांना कधी मातेचा एखादा हातच दिसावा, कधी एखादा पायच दिसावा, कधी तिचें मुखकमलच दिसावें, परंतु आता पूजेशिवाय इतर वेळींसुद्धा त्यांना जगदंबेचें पूर्ण दर्शन होई व ती हासत आहे, बोलत आहे, "हें कर, तें करू नको" वगैरे सांगत आहे व आपल्याबरोबर हिंडत आहे, असें दिसे!

नैवेद्य दाखवितांना त्यांना पूर्वी असें दिसे की, "आईच्या नेत्रांतून एक दिव्यज्योति बाहेर पडून ती नैवेद्यांतील सर्व पदार्थांना स्पर्श करून त्यांतील सार भाग शोषून पुन्हा नेत्रांमध्ये प्रविष्ट होत आहे,—" आता त्यांना असें दिसे की, नैवेद्य दाखविण्याचे पूर्वीच, तीच आई आपल्या आंगच्या दिव्य प्रभेने सारें मंदिर प्रकाशित करून, प्रत्यक्ष जेवण्यास बसली आहे! हृदय सांगत असे, "एक दिवस श्रीरामकृष्णांची पूजा चालली असतां मी एकदम तेथे गेलों व पाहतों तों ते श्रीजगदंबेच्या पादपद्मांवर बिल्वार्घ्य अर्पण करण्यासाठी म्हणून तन्मय होऊन उभे होते, इतक्यांत एकाएकी, 'थांब, थांब, अगोदर मंत्र म्हणतो, मग खा,' असें मोठ्याने बोलून त्यांनी पूजा तितकीच टाकून, अगोदर नैवेद्यच दाखविला!"

पूर्वी पूजा, ध्यान वगैरे करतांना त्यांना आपल्या समोरच्या पाषाण-मूर्तीमध्ये श्रीजगदंबेचा साक्षात् आविर्भाव झाला आहे, असे दिसें. आता देवालयांत जाऊन पाहावें, तों त्यांना पाषाणमूर्तीच दिसू नये! तिच्या जागीं, जागृत जिवंत अशी चिन्मयी माता, अभयदान देत आहे, अशी सर्वकाळ दिसावी! श्रीरामकृष्ण सांगत—"नाकाला हात लावून पाहावा, तर खरोखरच आई श्वासोच्छ्वास करीत आहे असं दिसावें! अगदी डोळे फाडून पाहून सुद्धा, रात्रीं देवीच्या अंगाची सावली दिव्यांच्या योगाने भिंतीवर पडलेली कुठेच दिसू नये! आपल्या खोलींत बसलों असतां ऐकू यावें, की आई पायांत पैजण घालून एखाद्या लहान मुलीसारखी मोठ्या आनंदाने झुम झुम आवाज करीत जिन्याने वर जात आहे! हें खरेंच की काय म्हणून पाहाण्यासाठी मुद्दाम बाहेर यावें—तों खरेंच! आई आपले केस मोकळे सोडून सज्ज्यांत उभी आहे व मधेच कलकत्त्याकडे, तर मधेच गंगेकडे पाहात आहे!"

हृदय म्हणे—"श्रीरामकृष्ण जेव्हां मंदिरांत असत तेव्हांची तर गोष्टच नको, पण इतर समयींहि यावेळीं कालीघरांत प्रवेश करतांच अंग कसें रोमांचित होत असे; म्हणून पूजा करितांना श्रीरामकृष्ण काय काय प्रकार करतात तें

पाहण्याची संधि मी मुळीच गमावत नसे. कित्येकदा मी एकदम तेथे जाई व जें तेथे दृष्टीस पडे त्यायोगें त्यावेळीं जरी मन भक्तीने व आश्चर्याने भरून जाई तरी बाहेर येतांच संशय उत्पन्न होई. मला वाटे–" मामांना खरोखरच वेड तर नाही लागलें ? नाही तर, पूजेमध्ये असा भ्रष्टाकार त्यांनी कसा केला असता ? राणी व मथुरबाबू यांना जर हा प्रकार समजला तर ते काय करतील कोण जाणें ? " असा विचार येऊन मनांत भीति उत्पन्न व्हावी. पण इकडे पाहावें तों मामांच्या ही गोष्ट गावीहि नसे व त्यांना सांगितली तरी ते ऐकतच नसत. शिवाय, त्यांना अधिक कांही सांगवतहि नसे. असें कां होई कोण जाणे ! पण एक प्रकारचें भय व संकोच मनांत उत्पन्न होऊन कोणी तरी तोंडच दाबून धरलें आहे असें वाटे. अर्थातच आपल्याकडून त्यांची यथासाध्य सेवा करीत असावें झालें. पण मनांत मात्र आल्यावांचून राहत नसे की एखादे दिवशी भलतेंच कांही न होवो, म्हणजे झालें.

मंदिरांत एकाएकी जाऊन, श्रीरामकृष्णांच्या ज्या विचित्र व्यवहाराने हृदयच्या मनांत भक्ति व भय हे विकार उत्पन्न होत, त्यासंबंधी तो आम्हांस सांगेः—

एक दिवस पाहिलें तों जवा बिल्वार्घ्य तयार करून, मामांनी प्रथम त्यायोगें स्वतःचें मस्तक, वक्ष, सर्व अंग,—इतकेंच काय पण पाय सुद्धा—स्पर्श करून मग तें जगदंबेच्या पायांवर वाहिलें !

एक दिवस असें दिसलें की एखाद्या दारू प्यालेल्या माणसाप्रमाणे, त्यांचे नेत्र व छाती आरक्त झाली असून, त्याच अवस्थेत आपल्या पूजेच्या आसनावरून ते उठले व झोक जात असतांहि सिंहासनावर चढून, जगदंबेची हनुवटी धरून तिला कुरवाळूं लागले, मधेच गाणें गाऊं लागले, मधेच हासूं लागले, मधेच बडबडूं लागले व मातेचा हात धरून नृत्यच करूं लागले ! !

एक दिवस, जगदंबेला नैवेद्य दाखवीत असतांना मामा उठून उभे राहिले व ताटांतील एक घास घेऊन ते भरभर सिंहासनावर चढले व तो घास मातेच्या

मुखांत घालीत म्हणूं लागले-" खा, आई! खा बरे, चांगलें नीट खा!" थोड्या वेळाने म्हणाले—" मी अगोदर खाऊं म्हणतेस? बरं तर मी खातों!" असें म्हणून त्यांतील थोडासा अंश आपण स्वतः खाऊन, पुन्हा तो घांस मातेच्या मुखीं घालीत म्हणाले-" मी तर खाल्ला, आता तूं खा बघूं?"

एक दिवस नैवेद्य दाखवीत असतां, एक मांजर म्यांव म्यांव करीत तेथे आलें, तेव्हां मामानी "खा बेरे, आई! खा," असें म्हणत तो सारा नैवेद्य त्या मांजराला खाऊं घातला!!

एक दिवस रात्रीं जगदंबेला पलंगावर निजविल्यावर मामा एकदम-"मला आपल्याजवळ निजायला सांगतेस? बरे तर निजतों, आई!" असे म्हणून जगदंबेच्या त्या रुपेरी पलंगावर कांही वेळ निजून राहिले!!

पूजा करीत असतां त्यांनी अशा तन्मयतेने ध्यान करीत बसावें की पुष्कळ वेळपर्यंत त्यांना बाह्य जगाचे भान मुळीच असूं नये, असें किती तरी दिवस होई!

पहाटे उठून जगदंबेच्या हारासाठी, मामा स्वतः बागेंत फुले तोडीत असत त्यावेळीं सुद्धा असें दिसावें की, ते कोणाशीं तरी बोलत आहेत, हासत आहेत व गप्पा गोष्टी करीत आहेत!

सारी रात्र, मामांना निद्रा कशी ती मुळीच येऊं नये! केव्हांहि उठून पाहावें तों मामा भावावस्थेंत कोणाशीं तरी बोलत आहेत अथवा गात आहेत अथवा पंचवटीखाली ध्यानस्थ बसले आहेत!

हृदय सांगे की, श्रीरामकृष्णांच्या ह्या कृति पाहून मनांत नानाप्रकारच्या शंका आल्या, तरी त्या दुसऱ्या कोणाजवळ बोलून दाखविण्याचा मला धीर होत नसे! कारण असें भय वाटे की, कदाचित् तो मनुष्य आणखी इतर माणसांजवळ याबद्दल वाटाघाट करील व असें होतां होतां बाबूंच्या कानांवर ही गोष्ट जाऊन त्याचा कांही भलताच परिणाम होईल. पण रोजच्यारोज जर असें घडूं

लागलें तर तें छपून तरी किती दिवस राहावें ? ह्या गोष्टी दुसऱ्यांच्या नजरेस आल्या व ही बातमी खजीनदार बाबूंकडे गेली. ते स्वतः येऊन एक दिवस सर्व कारभार पाहून गेले पण श्रीरामकृष्णांचें तें एखाद्या अंगांत आलेल्या माणसासारखे उग्र स्वरूप व निर्भय निःसंकोच असा व्यवहार पाहून त्यांना कांही बोलण्याचें धाडस त्यांच्याने होईना. दप्तरखान्यांत परत गेल्यावर त्यांच्या मंडळींत वाटाघाट सुरू झाली व तींत ठरलें की, छोटया भट्टाचार्यास* एकतर वेड लागलें असलें पाहिजे किंवा त्यांना एखाद्या भुताने तरी झपाटलें असले पाहिजे. नाहीतर पूजेच्या वेळीं, असलें शास्त्रविरुद्ध वर्तन कोणी कधी करणार नाही. तें कांही असो, एवढे मात्र स्पष्ट आहे की, जगदंबेची पूजा-अर्चा वगैरे कांही एक होत नाही, भट्टाचार्यांनी सारा भ्रष्टाचार माजविला आहे आणि ही गोष्ट बाबूंच्या कानांवर घातलीच पाहिजे."

मथुरबाबूंकडे ही बातमी गेली; त्यांनी कळविलें की "मी स्वतः येऊन ह्या गोष्टी पाहीन. तोंपर्यंत भट्टाचार्यांना तशीच पूजा करू द्यावी." हे कळतांच जो तो म्हणूं लागला की—"आता भट्टाचार्यांची नोकरी खास जाणार. आपल्या पूजेंत असा भ्रष्टाकार देवी किती दिवस सहन करील ?" एक दिवस कोणासहि न कळवितां, पूजेच्या वेळीं येऊन मथुरबाबूंनी बराच वेळपर्यंत श्रीरामकृष्णांचा कार्यकलाप नीट लक्ष लावून पाहिला. भावामध्ये तन्मय असल्यामुळे श्रीरामकृष्णांचें तिकडे लक्ष नव्हतें. पूजेच्या वेळीं सगळे लक्ष जगदंबेकडेच असल्यामुळे, मंदिरांत कोण येत आहे व जात आहे, याचें त्यांना कधीच भान नसे. मथुरबाबूंच्या लक्षांत ही गोष्ट थोडयाच वेळांत आली, नंतर जगदंबेशीं श्रीरामकृष्णांचें बालकासारखे आचरण पाहून, हें सर्व प्रेमभक्तीमुळे झालें आहे असेंहि त्यांच्या लक्षांत आलें. त्यांना असें वाटलें की "अशा प्रकारच्या निष्कपट भक्तिविश्वासाने जर जगदंबा प्रसन्न होणार नाही, तर होईल तरी कोणत्या उपायाने ?" पूजा करीत असतां, श्रीरामकृष्णांच्या नेत्रांतून वाहात असलेल्या अश्रुधारा, त्यांचा उद्दाम उल्हास,

* श्रीरामकृष्णांना देवळांतील नोकरचाकर "छोटे भट्टाचार्य" म्हणत.

त्यांची भावतन्मयता, त्यांचें इतर सर्व विषयांवरील पूर्ण दुर्लक्ष वगैरे पाहून मथुरबाबूंचें हृदय आनंदाने व भक्तीने भरून आलें. मंदिरांत खरोखरच देव-प्रकाश भरून राहिला आहे, असें त्यांना भासूं लागलें आणि भट्टाचार्यांना देवीचें दर्शन खास झालें असलें पाहिजे, अशी त्यांच्या मनाला खात्री वाटूं लागली; नंतर कांही वेळाने, मोठया भक्तियुक्त अंतःकरणाने व अश्रुपूर्ण नयनांनी श्रीजगदंबेला व तिच्या त्या अपूर्व पूजकाला दुरूनच वारंवार नमस्कार करीत–" आज इतक्या दिवसांनी देवीची खरी प्रतिष्ठापना झाली, इतक्या दिवसांनी तिची खरी खरी पूजा होऊं लागली, " असें म्हणत मथुरबाबू कोणापाशी कांही एक न बोलतां, परत आपल्या वाडयांत निघून गेले. दुसरे दिवशी देवालयाच्या कारभाऱ्याला त्यांचा हुकूम आला की, " भट्टाचार्य महाशय वाटेल तशी पूजा करोत त्यांना कोणीहि यत्किंचितसुद्धा त्रास देऊं नये. "

वरील हकीकतीवरून शास्त्रज्ञ वाचकांना असें समजून येईल की, श्रीरामकृष्णांच्या मनामध्ये यावेळीं फार मोठी क्रांति घडून येत होती. वैधीभक्तीची सीमा उल्लंघन करून, यावेळीं ते अहेतुक प्रेमाभक्तीच्या उच्च मार्गाने मोठया झपाटयाने पुढे चालले होते. ही क्रांति इतक्या स्वाभाविक व सहज रीतीने घडून येत होती की, दुसऱ्यांना तर राहोच पण ती त्यांची त्यांना सुद्धा स्पष्टपणे समजली नव्हती. त्यांना तिचें एवढें स्वरूप मात्र समजून चुकलें होतें की जगदंबेवरील अपार प्रेमाच्या अखंड व उद्दाम प्रवाहांत आपण सापडलों आहों व तो प्रवाह नेईल तिकडे आपणास गेलें पाहिजे आणि याच कारणाने मधे मधे त्यांना —" मला असें काय होत आहे ? मी योग्य मार्गानेच जात आहे ना ? " अशी शंका येई. आणि म्हणून, व्याकुळतेने ते आईला म्हणत–" आई, मला हें काय होत आहे, समजत नाही. मी सरळ मार्गाने जात आहे की नाही, हेंहि कळत नाही. यासाठी, मला जें काय करायचें असेल तें तूंच कर, जे शिकावयाचें असेल तें तूंच शिकवून दाखीव आणि सर्वकाळ माझा हात धरून चाल ? " काम, कांचन, मान, यश, सर्व प्रकारचें ऐहिक भोग, ऐश्वर्य यांच्यांतून मनाला काढून,

अंतःकरणाच्या अगदी गाभाऱ्यांतून त्यांनी जगदंबेची वरीलप्रमाणे प्रार्थना करावी. करुणामयीनेहि आपल्या असहाय बालकाचा आक्रोश ऐकला व त्याचा हात धरून आणि त्याचें सर्वतोपरी संरक्षण करून त्याची इच्छा पूर्ण केली आणि त्याच्या साधनाकालीं त्याला जें जें लागलें तें ते व जशा प्रकारचीं माणसें पाहिजे होतीं तीं सर्व, आपण होऊन त्याच्याकडे पाठवून दिलीं व त्याला शुद्धज्ञान नि शुद्धाभक्तीच्या अत्युच्च शिखरावर स्वाभाविक सहज भावाने नेऊन बसविलें !

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ गीता, ९-२२

अशी गीतेमध्ये भगवानांनी जी प्रतिज्ञा केली व जे आश्वासन दिलें तें त्यांनी श्रीरामकृष्णांच्या बाबतींत किती अक्षरशः पाळलें हें यावेळचें त्यांचें चरित्र लक्षपूर्वक पाहतां स्पष्ट दिसून येऊन, मन स्तंभित आणि आश्चर्यचकित होऊन जातें ! " श्रीभगवानांच्या लाभासाठी सर्वस्वाचा त्याग केला, तर अवश्य लागणाऱ्या गोष्टींचा साधकाला कधीहि अभाव भासत नाही, " ही गोष्ट, थोर थोर साधकांनी, सर्व काळीं सांगितली असून सुद्धा, संशयग्रस्त मनुष्याने या विधानाची सत्यता सांप्रतकाळीं जर प्रत्यक्ष पाहिली नसती तर त्याचा या विधानावर कधीहि विश्वास बसला नसता. म्हणून ह्या शास्त्रीय विधानांची सत्यता संशयी व दुष्ट मानव मनाला पटविण्यासाठी श्रीरामकृष्णांना हातीं धरून साक्षात् श्रीजगदंबेने हा अद्भुत लीलाभिनय केला !

श्रीरामकृष्ण म्हणत असत, " ईश्वरप्रेमाच्या प्रचंड लाटा, जेव्हां कांही आगापिच्छा नसतां, मनुष्याच्या मनामध्ये उसळूं लागतात, तेव्हां हजार प्रयत्न करून सुद्धा, त्यांना मागे हटवतां येत नाही. एवढेंच नव्हें, तर अनेक प्रसंगीं त्यांचा प्रबल वेग धारण करण्यास अगदी असमर्थ होऊन, ह्या स्थूल, जड देहाचा चेंदामेंदा होऊन जातो ! अशा रीतीने कित्येक साधक मृत्युमुखीं पडले आहेत ! पूर्णज्ञान अथवा पूर्णभक्ति, यांचे उद्दाम वेग धारण करूं शकेल, अशा प्रकारचें शरीर असणें अत्यंत आवश्यक आहे. आजपर्यंत फक्त अवतारी पुरुषांचीं शरीरें,

मात्र हा उद्दाम वेग सर्वकाळ धारण करूनहि टिकूं शकलीं, म्हणूनच भक्तिशास्त्रांत अवतारी पुरुषांना "शुद्धसत्वविग्रहवान्" असें वरचेवर म्हटलेलें आढळतें. भक्तिशास्त्र म्हणतें, की रज व तम या गुणांचा ज्यांत लवलेशहि नाही, अशा शुद्ध सत्व-गुणाच्या उपादानाने घडलेली शरीरें घेऊन ते इहलोकीं आगमन करतात, म्हणूनच सर्व प्रकारचे आध्यात्मिक भाव ते सहन करूं शकतात अशा प्रकारचें शरीर धारण करून सुद्धा, ईश्वरीय भावाच्या प्रबल वेगाने, अनेक समयीं, त्यांना—विशेषतः भक्तिमार्गाने जाणाऱ्या पुरुषांना—अत्यंत कष्ट झालेले दिसून येतात. भावाच्या प्रबल वेगामुळे येशुख्रिस्त व श्रीचैतन्यदेव यांच्या शरीराचे सांधे शिथिल झाले होते व त्यांच्या शरीराच्या प्रत्येक केसाच्या मुळांतून घामाप्रमाणे थेंब थेंब रक्त बाहेर येत असे—यावरून ही गोष्ट स्पष्ट समजते. अशा प्रकारचे शारीरिक विकार त्यांना अत्यंत कष्टदायक झाले असले तरी, त्यांच्याच साहाय्याने, त्यांच्या शरीरांना पूर्वोक्त असाधारण मानसिक वेग धारण करण्याचा सराव होत गेला. पुढे, हें वेग-धारण त्यांच्या शरीरांत जेव्हां स्वाभाविक व सहज होऊन बसलें, तेव्हां ह्या सर्व विकृति त्यांच्या शरीरांत, पूर्वीप्रमाणे, सर्वकाळ दिसून येत नसत.

भावभक्तीच्या प्रबल वेगाने, श्रीरामकृष्णांच्या शरीरांत या वेळेपासून अनेक अद्भुत विकार उत्पन्न झाले. साधनें करण्यास त्यांनी सुरुवात केल्यावर थोडयाच दिवसांत, त्यांच्या शरीरांत विलक्षण दाह उत्पन्न झाला व तो जसजसा वृद्धिंगत होत गेला तसतसे त्यांना त्यामुळे मनस्वी कष्ट सोसावे लागले. या गात्रदाहाचें कारण स्वतः श्रीरामकृष्णांनी आम्हांस असें सांगितलें-" संध्या, पूजा वगैरे करतांना शास्त्रीय विधानानुसार, " आपल्या हृदयांतील पापपुरुष दग्ध करतां येतो ? साधनांना सुरुवात करतांच गात्रदाह उत्पन्न झाला. मीं मनांत म्हटलें, " हा आणिक आता कसला रोग झाला आहे ? " हळूहळू गात्रदाह फारच वाढत जाऊन पुढे पुढे अगदी असह्य झाला. नानाप्रकारचीं तेलें डोक्याला माखून पाहिलीं, पण व्यर्थ ! पुढे एक दिवस असाच पंचवटीखाली बसलों होतों, तेव्हां दिसलें की (आपल्या शरीराकडे बोट करून) ह्यांतून एक

तांबड्या लाल डोळ्यांचा, भयंकर स्वरूपाचा, एक काळा कुट्ट पुरुष, दारू प्याल्याप्रमाणे झिंगत बाहेर येऊन, माझ्यासमोर उभा राहिला आणि त्याच्याच मागोमाग भगवीं वस्त्रें नेसलेला व त्रिशूल धारण केलेला, असा एक अत्यंत सौम्याकृति पुरुषहि बाहेर आला व त्याने त्या काळ्या पुरुषाशीं युद्ध करून त्याला मारून टाकलें !! या दर्शनानंतर कांही दिवसपर्यंत गात्रदाह कमी झाला. हा पापपुरुष दग्ध होण्याच्या आधी सहा महिनेपर्यंत गात्रदाहाने एकसारखे असह्य कष्ट झाले !"

श्रीरामकृष्णांच्या तोंडून आम्हीं असें एकलें आहे की पापपुरुष नष्ट झाल्यानंतर कांही दिवसपर्यंत त्यांचा गात्रदाह कमी झाला, तरी थोड्याच दिवसांनी तो पुन्हा सुरू झाला, त्यावेळीं श्रीरामकृष्ण वैधी भक्तीची सीमा उल्लंघन करून, प्रेमा भक्तीने जगदंबेच्या सेवेंत तन्मय झाले होते. हळूहळू हा गात्रदाह इतका वाढला की पाण्याने भिजविलेलें वस्त्र, डोक्यावर एकसारखे तीन तास निथळत ठेऊनहि तो दाह कमी होत नसे! पुढे भैरवी ब्राह्मणी आल्यानंतर तिने हा दाह किती सहज उपायाने नाहीसा केला हें पुढे येईलच. यानंतर आणखी एकदा त्यांना गात्रदाहाने असह्य त्रास झाला. त्यावेळीं श्रीरामकृष्ण मधुर भावाने साधनें करीत होते. हृदय सांगत असे, " एखाद्याच्या छातीवर निखारे पसरले तर त्याला जसे क्लेश व वेदना होतील, तशाच श्रीरामकृष्णांना त्यावेळीं होत व त्यामुळे तें एकसारखी तळमळ करीत !" हा गात्रदाह कित्येक दिवसपर्यंत नाहीसा झाला नाही. पुढे बऱ्याच दिवसांनी श्री. कनाईलाल घोषाल यांच्याशीं त्यांचा परिचय झाला. हे गृहस्थ उच्च दर्जाचे शक्ति-उपासक होते. त्यांच्या सांगण्यावरून श्रीरामकृष्ण देवींचें इष्टकवच धारण करूं लागले व त्यायोगें त्यांचा गात्रदाह नाहीसा झाला. असो.

श्रीरामकृष्णांची अशा प्रकारची अद्भुत पूजा पाहून आपल्या घरीं परत आल्यावर मथुरबाबूंनी सारी हकीकत राणी रासमणीला सांगितली. भक्तीमती राणीला हें ऐकून फार आनंद झाला. श्रीरामकृष्णांच्या तोंडून भक्तिरसपूर्ण पदें

ऐकून त्यांच्याविषयी तिला पूर्वीपासून आदर वाटत होताच, शिवाय श्रीगोविंदजीची प्रतिमा भंगली त्यावेळीं त्यांच्या भक्तिपूर्ण हृदयाची थोडीफार ओळख तिला झाली होतीच. या गोष्टींवरून श्रीरामकृष्णांच्या सारख्या सरळ, पवित्र व भक्तिवान पुरुषावर श्री जगदंबेची कृपा होणें स्वाभाविक आहे ही गोष्ट तिला साहजिक पटली व अशा प्रकारच्या अद्भुत पूजकाचा सर्व कार्यकलाप स्वतः पाहावा म्हणून एक दिवस दक्षिणेश्वरीं जाण्याचा तिने बेत केला.

आज राणी रासमणी श्री जगदंबेच्या देवळांत स्वतः आली होती. नोकर-चाकरांची एकच धामधूम उडाली. नेहमीची चुकारतट्टू मंडळीहि आज आपापलीं कामें मोठें मन लावून करीत होती. घाटावर जाऊन, गंगेचें स्नान करून राणी देवालयांत गेली. श्रीजगदंबेची पूजा नुकतीच आटोपली होती. श्रीजगदंबेला प्रणाम करून राणी मूर्तीजवळ बसली व छोटे भट्टाचार्य तेथेच उभे आहेत असें पाहून, तिने त्यांना जगदंबेचीं एकदोन पदें म्हणावयास सांगितलें. श्रीरामकृष्णहि लगेच राणीजवळ बसून अत्यंत तन्मयतेने, रामप्रसाद, कमलाकांत वगैरे साध-कांचीं भक्तिपूर्ण पदें गाऊं लागले. कांही पदें गाऊन झाल्यावर श्रीरामकृष्णांनी एकाएकी गाणें बंद केलें आणि मोठ्या रागाने—" इथे सुद्धा संसाराचे विचार ? इथे सुद्धा संसाराचे विचार ? " असें म्हणून एकाएकी राणीला दोन चापट्या लगावल्या ! आपल्या अपत्याने कांही चूक केली तर बाप रागावून त्याला जशी शिक्षा करतो तसेंच श्रीरामकृष्णांचेंहि आताचें आचरण होतें !

हा विपरीत प्रकार पाहून जवळपास उभे असलेल्या नोकरचाकरांत एकच गोंधळ उडाला. कोणी एकदम श्रीरामकृष्णांना धरण्यासाठी धांवून गेले. देवळांत इतकी गडबड कसली हें पाहण्याठी बाहेरचे कोणी लोक आंत धांवून आले. " प्रत्यक्ष राणीला या वेडया पिराने चापट्या लगावल्या, तेव्हां आता याची शंभर वर्षे खास भरलीं " वगैरे वगैरे बडबड सुरू झाली. पण या साऱ्या गोंधळाचें मुख्य कारण जे श्रीरामकृष्ण व राणी रासमणी, तीं दोघें मात्र अगदी शांत होतीं ! श्रीरामकृष्णांचें या साऱ्या गोंधळाकडे मुळीच लक्ष नव्हतें. ते

आपल्याच विचारांत मग्न होते. आणि “ आपल्या मनांत यावेळीं काय चाललें होतें, तें श्रीरामकृष्णांनी कसें ओळखलें ? ” असें राणीहि आपल्या मनांत आश्चर्य करीत होती. नोकरचाकरांचा गोंधळ व गडबड बरीच वाढली, तेव्हां राणी शुद्धीवर आली आणि निरपराधी श्रीरामकृष्णांना हे लोक मारण्यासहि कमी करणार नाहीत, असें तिच्या लक्षांत येऊन तिने गंभीर स्वराने सर्वांना आज्ञा केली की—“ भट्टाचार्यांचा कांहीहि अपराध नाही. तुम्ही कोणीहि यांना कोणत्याहि तऱ्हेने त्रास देऊं नका ! ” पुढे मथुरबाबूंच्याहि कानावर ही सारी हकीगत गेल्यावर त्यांनीहि राणीचाच हुकूम कायम केला ! या कारणाने त्यांतील कांही कांही मंडळीस दुःख झालें खरें, पण उपयोग काय ? “ थोरामोठयांच्या गोष्टींची आपणा गरीबांना पंचाईत कशाला ? ” असा पोक्त विचार करून सर्वजण बिचारे स्वस्थ बसले; असो.

श्रीजगदंबेच्या चिंतनांतच सदैव निमग्न राहूं लागल्यापासून श्रीरामकृष्णांच्या मनांतील भक्ति व आनंदोल्हास हळूहळू इतका वाढला की, जगदंबेची पूजा-अर्चा वगैरे नित्यनैमित्तिक कार्यें, कशीबशीं सुद्धा पार पाडणें हेंहि त्यांना अशक्य होऊन गेलें ! आध्यात्मिक अवस्थेच्या उन्नतीबरोबर, वैधी कर्में कशी आपोआप गळून पडूं लागतात, यासंबंधाने श्रीरामकृष्ण एक अत्यंत समर्पक दृष्टांत देत. ते म्हणत–“ जोंपर्यंत सूनबाई गर्भवती नसते, तोंपर्यंत तिची सासू तिला वाटेल तें खाण्यास व सर्व प्रकारचीं कामें करण्यास मोकळीक देते. परंतु ती गर्भवती झाल्याबरोबर, या कामीं थोडी फार आवड निवड सुरू होते. जसजसे अधिकाधिक दिवस लोटूं लागतात, तसतशी सासू तिच्याकडे कमी कमी काम देऊं लागते आणि जेव्हां प्रसूतीचे दिवस जवळ येऊन ठेपतात, तेव्हां तर गर्भाला कांही इजा पोहोंचेल या भीतीने सासू तिला अगदीच काम सांगत नाही ! प्रसूतीनंतर बाळंतिणीकडे काम म्हणजे, फक्त आपल्या बाळाच्या सेवाशुश्रूषेंत दंग असणें, हेंच असतें ! ” श्रीरामकृष्णांच्या स्वतःच्या बाबतींतहि श्रीजगदंबेची बाह्य पूजाअर्चा यासंबंधी अगदी असेंच झालें त्यांना आता पूजाअर्चा वगैरे

बद्दल काळ वेळ यांचें भानच राहात नसे. सदैव जगदंबेच्या चिंतनांतच तन्मय होऊन ज्यावेळीं तिची जशी सेवा करण्याची लहर लागेल, त्यावेळीं तशी सेवा ते करीत ! एखादे वेळीं पूजा वगैरे न करतांच, प्रथम नैवेद्यच समर्पण करीत; एखादे वेळीं ध्यानांत निमग्न होऊन, आपलें पृथक्-अस्तित्व संपूर्ण विसरून जाऊन, श्रीजगदंबेच्या पूजासाहित्याने स्वत:चीच पूजा करीत ! आंत, बाहेर, सर्वत्र जगदंबेचें निरंतर दर्शन होत असल्यामुळेच अशा प्रकारचें आचरण त्यांच्याकडून होई, ही गोष्ट त्यांच्या स्वतःच्या तोंडून आम्हीं ऐकली आहे. ते म्हणत— "या तन्मयतेचा लेशमात्र ऱ्हास होऊन, जर एक क्षणभर श्रीजगदंबेचें दर्शन झालें नाही, तर मन असें व्याकुळ होई की, त्या विरहाच्या वेदना असह्य होऊन, मीं जमिनीवर गडबडा लोळावें आणि आपलें तोंड मातींत घांसून, ओक्साबोक्सी रडून व आक्रोश करून आकाश पाताळ एक करून सोडावें ! जमिनीवर लोळण्याने व मातींत तोंड घासल्याने सर्वांग रक्तबंबाळ होऊन जाई पण तिकडे लक्षच जात नसें. पाण्यांत पडलों आहे, की चिखलांत पडलों आहे, की विस्तवांत पडलों आहे, याचे भानच नसें ! कांही वेळ अशा असह्य वेदनांत गेल्यावर, पुन्हा श्रीजगदंबेचें दर्शन व्हावें व पुन्हा मनांत आनंदाचा समुद्र उचंबळूं लागावा ! "

श्रीरामकृष्णांविषयी मथुरबाबूंच्या मनांत अत्यंत भक्ति व आदर होता; तरी जेव्हां त्यांनी राणीलाहि चापट्या लगावल्या तेव्हां मात्र मथुरबाबूंचें मन त्यांच्याविषयी थोडे फार साशंक झालें व त्यांना वायुरोग झाला असावा, असें त्यांच्या मनाने घेतलें आणि असें व्हावें यांत कांही आश्चर्य नाही. कारण असें वाटतें की, मथुरबाबू, कांही असलें तरी विषयबुद्धिसंपन्नच होते व श्रीरामकृष्णांच्या उच्च आध्यात्मिक अवस्थेची ओळख, त्यांना तेव्हां नीट पटली नसावी, म्हणून, त्यांना उन्माद झाला असावा,असें साहजिकच अनुमान त्यांनी काढलें असावें श्रीरामकृष्णांना उन्माद झाला असावा, असें वाटतांच त्यांनी कलकत्त्यांतील सुप्रसिद्ध वैद्य गंगाप्रसाद सेन, यांच्याकडून त्यांची परीक्षा करवून त्यांचें औषध श्रीरामकृष्णांना सुरू केलें.

एवढेंच करून मथुरबाबू स्वस्थ बसले नाहीत. “ आपलें मन नीट आवरून धरावें व तें फारसें भडकूं न देतां यथाशक्ति साधनें करीत जावीं, ” असें तर्कयुक्तीच्या सहाय्याने श्रीरामकृष्णांना पटवून देण्याची त्यांनी आपल्याकडून शिकस्त केली. या तर्कयुक्तीच्या गोष्टी श्रीरामकृष्णांना पटवून देण्यांत, त्यांची कशी फजीती होई, हें मागें सांगितलेल्या तांबडया व पांढऱ्या फुलाच्या गोष्टीवरून समजून येईल.

देवीची नित्य नियमितपणे पूजाअर्चा श्रीरामकृष्णांच्याकडून होणें अशक्य आहे असें जाणून मथुरबाबूंनी त्यासंबंधी निराळी व्यवस्था केली. श्रीरामकृष्णांचा चुलत भाऊ रामतारक हा याच सुमारास कांही काम मिळेल तर पाहण्यासाठीच दक्षिणेश्वरीं आला होता. त्याला मथुरबाबूंनी श्रीरामकृष्ण बरे होईपर्यंत, त्यांच्या कामावर नेमिलें. ही गोष्ट सन १८५८ मध्ये घडली.

रामतारकाला श्रीरामकृष्ण हलधारी असें म्हणत असत. श्रीरामकृष्ण आम्हांला याच्यासंबंधी अनेक गोष्टी सांगत असत. हलधारी हा चांगला पंडित व निष्ठावान् साधक होता. श्रीमद्भागवत, अध्यात्म रामायण वगैरे ग्रंथ त्याच्या आवडीचे असून, तो त्यांचें नेहमी पठण करीत असे. श्रीजगदंबेपेक्षा श्रीविष्णूवरच त्याची अधिक भक्ति असे, तरी देवीबद्दल त्याच्या मनांत अनादर नसे व म्हणूनच त्याने देवीच्या पूजकाचें काम स्वीकारलें. कामावर रुजू होण्यापूर्वी मथुरबाबूंना सांगून आपणांस प्रसादाऐवजी रोज शिधाच मिळत जावा, अशी व्यवस्था त्याने करून घेतली. मथुरबाबूंनी प्रथम या व्यवस्थेला हरकत घेतली. ते म्हणाले, “ कां ? प्रसाद घेण्याला तुझी कां हरकत असावी ? तुझा भाऊ गदाधर व भाचा हृदय हे तर रोज देवीचा प्रसाद ग्रहण करतात, मग ते नाही कोठे शिधा घेऊन हाताने करीत ? ” हलधारीने उत्तर दिलें, “ माझ्या भावाची आध्यात्मिक अवस्था फार उच्च आहे. त्याने कांही केलें तरी त्याला दोष लागणार नाही. माझी स्वतःची इतकी उच्च अवस्था नसल्यामुळे तसें केल्यास, मला मात्र निष्ठाभंगाचा दोष लागेल.” मथुरबाबू या उत्तराने संतुष्ट झाले व त्यांनी

याला शिधा घेऊन स्वहस्तें स्वयंपाक करण्यास परवानगी दिली. हलधारी त्व्हांपासून पंचवटीखाली स्वयंपाक करून जेवीत असे.

हलधारीचा देवीविषयी अनादर नव्हता. तरी देवीला पशु बळी देणे याला आवडत नसे. विशेष पर्वकाळीं देवीला पशु बळी देण्याची दक्षिणेश्वरीं ाहिवाट असल्यामुळे, त्या दिवशीं त्याच्याने रोजच्यासारखी आनंदाने व उल्हा-ाने देवीची पूजा होत नसे. असें सांगतात की, हलधारीने अजमासें एक महिना देवीची पूजा केल्यावर, एके दिवशीं तो संध्या करीत असतां, एकाएकी त्याच्या समोर श्रीजगदंबा उग्र रूप धारण करून उभी राहिली व म्हणाली–" तूं येथून चालता हो, तुझी पूजा मी ग्रहण करणार नाही. तूं मनापासून पूजा करीत नाहीस आणि या अपराधाने तुझा मुलगा लवकरच मृत्यु पावेल!" यानंतर थोड्याच दिवसांत त्याचा मुलगा मरण पावल्याची बातमी त्यास कळली व मग त्याने घडलेली सर्व हकीकत श्रीरामकृष्णांना सांगून श्रीजगदंबेचें पुजारीपण सोडून दिलें. या वेळेपासून हृदय देवीची पूजा करूं लागला व हलधारी त्याच्या जागीं श्रीराधागोविंदजीची पूजा करूं लागला.

# १८. पहिल्या चार वर्षांतील आणखी कांही गोष्टी

## ( १८५५–५८ )

" माझ्या आयुष्यांत बारा वर्षेपर्यंत ईश्वरप्रेमाचें एकसारखें प्रचंड तुफान सुटलें होतें ! आईला निरनिराळ्या रूपांत कसें पाहीन—हाच एकसारखा ध्यास लागला होता ! "

" इथे ( माझ्याकडून ) सर्व प्रकारच्या साधना होऊन गेल्या !—ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग—हटयोगसुद्धा !—आयुष्य वाढविण्यासाठी.—"

—श्रीरामकृष्ण

---

श्रीरामकृष्णांच्या साधनाकालाची हकीगत सांगतांना, प्रथम स्वतः त्या कालासंबंधाने त्यांनी आम्हांस जें मधून मधून सांगितलें, त्याचा विचार केला पाहिजे, म्हणजे मग त्या कालाची नीट सुसंगत हकीकत सांगणें सोपे जाईल. त्यांच्या स्वतःच्या तोंडून आम्हीं असें ऐकलें की, ते एकंदर बारा वर्षेपर्यंत, निरंतर निरनिराळ्या साधनांमध्ये निमग्न होते. दक्षिणेश्वरीं श्रीजगदंबेची प्राणप्रतिष्ठा सन १८५५ च्या मे महिन्याचा ३१ व्या तारखेस गुरुवारी झाली. त्याच सालीं श्रीरामकृष्णांनी तेथे पूजकाचें काम स्वीकारलें. अर्थात् सन १८५५ ते १८६६ पर्यंतचीं बारा वर्षे, हा त्यांचा साधनाकाल होय असें निश्चित ठरतें. स्थूल मानाने हा काल जरी निश्चित ठरला, तरी या काळानंतर तीर्थयात्रेस गेल्यावर

त्या त्या तीर्थांच्या ठिकाणी व तेथून परत आल्यावर कधी कधी दक्षिणेश्वरींहि ते साधनेमध्ये मग्न होत असत, असें दिसून येतें.

स्थूल मानानें, या बारा वर्षांचे तीन भाग करतां येतात, पहिला भाग म्हणजे सन १८५५ ते १८५८ पर्यंतचीं चार वर्षें. या काळांतील मुख्य मुख्य गोष्टी नुकत्याच सांगितल्या आहेत. दुसरा भाग १८५९ ते १८६२ हीं चार वर्षें. या काळांत भैरवी ब्राह्मणीच्या देखरेखीखाली त्यांनी गोकुल व्रतापासून आरंभ करून मुख्य मुख्य चौसष्ट तंत्रांत सांगितलेल्या साधनांचें यथाविधि अनुष्ठान केलें. तिसरा भाग १८६३ ते १८६६ हीं चार वर्षें. या काळांत रामायत पंथाच्या जटाधारी नामक साधूकडून त्यांनी राममंत्राची दीक्षा घेतली व त्याची रामलालची मूर्ति मिळविली; वैष्णव तंत्रांत सांगितलेल्या सखी-भावाचा लाभ करून घेण्यासाठी त्यांनी सहा महिने स्त्रीवेषांतच राहून सखी भावाची साधना केली; श्रीमत् परमहंस तोतापुरी, यांच्या हस्तें संन्यास-दीक्षा घेऊन त्यांनी वेदांतोक्त निर्विकल्प समाधीचा लाभ करून घेतला आणि अखेरीस श्रीगोविंदराय यांच्याकडून इस्लामी धर्माचा उपदेश घेऊन त्या धर्मांत सांगितलेल्या साधना केल्या. याशिवाय या बारा वर्षांच्या काळांतच, त्यांनी वैष्णव तंत्रोक्त सख्यभावाची साधना केली आणि कर्ताभजा, नदरसिक वगैरे वैष्णव मतांतील अवांतर पंथांचीहि माहिती करून घेतली.

पहिल्या चार वर्षांच्या अवधींत, त्यांना दुसऱ्याकडून आध्यात्मिक बाबतींत जर कांही मदत मिळाली असेल तर ती म्हणजे श्रीयुत केनाराम भट्ट यांच्याकडून त्यांनी घेतलेली शक्तिमंत्राची दीक्षा एवढीच होय. ईश्वरप्राप्ती-विषयी त्यांच्या अंतःकरणांत अत्यंत व्याकुळता उत्पन्न झाली होती आणि तिच्याच साहाय्यानें त्यांनी ईश्वराच्या दर्शनाचा लाभ करून घेतला होता. ही व्याकुळता उत्तरोत्तर अधिकाधिक वृद्धिंगत होऊन तिनें त्यांचें शरीर व मन यांचें स्वरूप पार बदलून टाकलें व त्यांच्या ध्यानींमनींहि नसलेले नवे नवे भाव उत्पन्न केले. याशिवाय या व्याकुळतेनेच, त्यांच्या मनांत आपल्या उपास्य दैवताबद्दल अत्यंत प्रेम

उत्पन्न होऊन, वैधी भक्तीचे सर्व बाह्यनियम उल्लंघन करून ते प्रेमाभक्तीचे अधिकारी झाले व लवकरच श्रीजगदंबेच्या दिव्य दर्शनाचा लाभ त्यांना झाला.

यावर कोणी सहजच असे म्हणेल की " तर मग आता बाकी काय राहिलं ? श्रीरामकृष्णांना जर यावेळीं ईश्वराचे दर्शन झाले होते तर मग आता यापुढे साधना करण्याचें त्यांना काय कारण उरले होतें ? " याचें उत्तर असें आहे की, " एका दृष्टीने पाहतां साधनांचें कारण नव्हतें, तरी दुसऱ्या दृष्टीने साधनांची जरूरी होतीच." श्रीरामकृष्ण म्हणत असत, " वृक्ष, लता वगैरेचा साधारण नियम असा आहे की, त्यांना अगोदर फुले येतात व मग फळें येतात; परंतु त्यांतहि कांही अशीं असतात, की त्यांना अगोदर फळे व मग फुले येतात." साधकांच्या बाबतींत श्रीरामकृष्णांच्या मनाचा विकास अगदी अशाच स्वरूपाचा झाला व म्हणूनच एका दृष्टीने त्यांना यापुढे साधना करण्याचें कारण नव्हतें, हे खरें. परंतु साधनाकालाच्या प्रथम भागांत जरी त्यांना निरनिराळीं दर्शनें झालीं, तरी शास्त्रांत वर्णिलेल्या साधकांच्या अनुभवांशीं, स्वतःचे अनुभव जोंपर्यंत त्यांनी मिळवून पाहिले नाहीत, जोंपर्यंत शास्त्रीय प्रणालीचें अवलंबन करून साधना केल्यावर येणारे अनुभव स्वतःच्या अनुभवाशीं त्यांनी जुळवून पाहिलें नाहीत, तोंपर्यंत स्वतःला आलेले अनुभव खरे की खोटे व अशा प्रकारें येणाऱ्या अनुभवांची चरम सीमा तरी कोणती, यासंबंधाने त्यांचें मन साशंकच राहिलें होते. श्रीरामकृष्ण सांगत— " **श्रीजगदंबेचीं निरनिराळीं दर्शनें मला रोजच्यारोज होत पण हीं दर्शनें खरीं आहेत, की हा मनाचा भ्रम आहे, असा मला नेहमी संशय उत्पन्न व्हावा. म्हणून मग ' अमुक गोष्ट घडून येईल तर हीं दर्शनें खरीं असे मानीन ' असे मीं म्हणावें ! आणि नेहमी त्या त्या गोष्टी घडून याव्या.** " अशी स्थिति असल्यामुळे ईश्वरदर्शनानंतर सुद्धा त्यांना साधना करणें जरूर होतें. म्हणून श्रीजगदंबेच्या कृपेने, नुसत्या अंतःकरणाच्या व्याकुळतेने त्यांनी जें कांही पाहिलें होतें व जे कांही अनुभव घेतले होते, तेच पुनः एकदां शास्त्रोक्त मार्गाने व शास्त्रोक्त प्रणालीने साधना करून, त्यांना घेणें भाग पडलें. शास्त्रें सांगतात की, " गुरुमुखांतून

ऐकलेले अनुभव व शास्त्रांत वर्णन केलेले पूर्वकालीन साधकांचे अनुभव, यांच्याशीं आपणांस प्राप्त झालेलीं दिव्य दर्शनें व अलौकिक अनुभव, जोंपर्यंत साधक मिळवून पाहून त्या सर्वांची एकवाक्यता प्रत्यक्ष पाहात नाही, तोंपर्यंत तो सर्वथैव संशयरहित होऊं शकत नाही आणि या तिन्ही अनुभवांची—शास्त्रोक्त अनुभव, इतर साधकांचे अनुभव व स्वतःचे अनुभव यांची—एकवाक्यता त्यानें पाहिली म्हणजेच त्याचे सर्व संशय नाहीसे होऊन तो पूर्ण शांतीचा अधिकारी होतो."

वर सांगितलेल्या कारणाशिवाय ईश्वरप्राप्तीनंतर पुन्हा साधना करण्याला श्रीरामकृष्णांना दुसरेंहि एक गूढ कारण होतें. स्वतःला शांति मिळवणें एवढाच त्यांच्या साधनांचा उद्देश नव्हता. श्रीजगन्मातेने त्याना जगताच्या कल्याणासाठी पृथ्वीवर पाठविले होतें. अर्थातच यथार्थ आचार्य पदवीवर आरूढ होण्यासाठी, त्यांना सर्व प्रकारच्या धर्ममतांची साधना करणें अवश्य होतें आणि त्या त्या धर्ममतांचें अंतिम ध्येय काय हें प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहणें अवश्य होतें. म्हणूनच सर्व धर्मांची व सर्व प्रकारच्या पंथांची साधना करण्याचा एवढा मोठा अट्टाहास त्यांना करावा लागला, एवढेंच नव्हें तर, निरक्षर पण यथार्थ ईश्वरानुरागी अशा पुरुषाच्या हृदयामध्ये सुद्धा, शास्त्रांत वर्णन केलेल्या सर्व अवस्था आपोआप उदय पावतात, हें प्रत्यक्ष दाखविण्यासाठी आणि त्याबरोबर वेद, पुराण, बायबल, कुराण वगैरे सर्व धर्मशास्त्रांची सत्यताहि वर्तमान युगांत पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी, श्रीजगदंबेने श्रीरामकृष्णांच्याकडून सर्व धर्मांची व सर्व मतांची साधना करवून घेतली असावी, असें वाटतें. म्हणूनच स्वतः शांतिलाभ करून घेतल्यावरहि श्रीरामकृष्णांना साधना करावी लागली आणि प्रत्येक धर्ममताच्या सिद्ध पुरुषाला, योग्यवेळीं श्रीरामकृष्णांच्या जवळ आणून त्यांच्याकडून त्या त्या धर्मांची तत्त्वें व त्या त्या धर्माचें ध्येय त्यांना समजावून देऊन, त्या सर्व धर्ममतांमध्ये श्रीरामकृष्णांना सिद्धि मिळवून देण्यांत श्रीजगन्मातेचा हाच उद्देश असावा, असें जों जों त्यांच्या या अद्भुत व अलौकिक जीवनाचें मनन व चिंतन करावें तों तों स्पष्टपणे प्रत्ययास येतें.

पूर्वी सांगितलेंच आहे की पहिल्या चार वर्षांत त्यांना स्वतःच्या मनांतील तीव्र व्याकुळतेचेंच ईश्वराच्या दर्शनाच्या कामीं साहाय्य झालें. शास्त्रनिर्दिष्ट पंथ असुक आहे, त्याने गेलें असतां ईश्वराचें दर्शन होईल, असें सांगण्यास त्यांना त्याकाळीं कोणीहि भेटलें नव्हतें. अर्थातच आंतरिक अत्यंत तळमळ त्यांना त्यावेळीं मार्गदर्शक झाली आणि केवळ त्या तळमळीच्या जोरावर त्यांना श्रीजगदंबेचें दर्शन झालें. यावरून असे स्पष्ट दिसतें की, कोणाचीहि कसल्याहि प्रकारची बाह्य मदत नसली तरी, साधकाला केवळ आंतरिक तळमळीच्या जोरावर ईश्वराचा लाभ करून घेतां येतो. परंतु केवळ आंतरिक व्याकुळतेच्या साहाय्याने ईश्वराचा लाभ करून घेणें असेल तर ती व्याकुळता केवढी प्रचंड असावयास पाहिजे, याचें मात्र अनेकदा आम्हांस विस्मरण होतें. श्रीरामकृष्णांचें त्या वेळचें चरित्र पाहिलें असतां, ती व्याकुळता किती असावयास पाहिजे, ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. त्यावेळीं ईश्वराच्या दर्शनाच्या विलक्षण तळमळीने त्यांचे आहार, निद्रा, लज्जा, भय वगैरे शारीरिक व मानसिक दृढबद्ध संस्कार कोठेच्या कोठे नाहीसे होऊन त्यांचा मागमूसहि राहिला नाही! शरीराच्या स्वास्थ्याची गोष्ट राहो, पण स्वतःच्या जीवाच्या रक्षणाकडेहि त्यांचें मुळी सुद्धा लक्ष नसे! श्रीरामकृष्ण सांगत असत-"त्यावेळीं शरीरसंस्काराकडे मुळीच लक्ष नसल्यामुळे डोक्याचे केस खूप वाढून त्यांस धूळ माती वगैरे लागून, त्यांच्या आपोआप जटा बनल्या होत्या! ध्यान करावयास बसले असता, मनाच्या एकाग्रतेमुळे शरीर असें एखाद्या ठोकळ्यासारखें स्थिर होऊन जाई की, पक्षी सुद्धा निर्भयपणे डोक्यावर येऊन बसत व चोंचीने केस विस्कटून डोक्यांतील धुळीत कांही खाण्यासारखें सापडतें की काय, तें पाहात!! ईश्वराच्या विरहाने अधीर होऊन मीं कधी कधी मातींत इतके तोंड घासावें की, तोंड खरचटून जाऊन तें रक्तबंबाळ होऊन जावें! अशा रीतीने ध्यान, भजन, प्रार्थना, आत्मनिवेदन, यांत दिवस केव्हां उगवला व केव्हां मावळला, याचें भानच राहत नसे! परंतु संध्याकाळीं, द्वादश शिवमंदिरें, गोविंदजीचें मंदिर व श्रीजगदंबेचें मंदिर, या सर्व मंदिरांत आरत्या सुरू होऊन जेव्हां शंख, घंटा, झांजा यांचा एकच आवाज होई, तेव्हां

मात्र माझ्या वेदनांना पारावार उरत नसे. असें वाटे की–" हाय ! हाय ! आणखी एक दिवस फुकट गेला आणि जगदंबेचें आजहि दर्शन झालें नाही ! " या विचाराने प्राण असा व्याकुळ होई की, आता स्वस्थ राहावत नसे. त्या व्याकुळतेच्या भरांत, मी आपलें अंग जमीनीवर टाकून द्यावें आणि मोठमोठ्याने ओक्साबोक्सीं रडत–" आई ! आज सुद्धा दर्शन दिलें नाहीस ना? " असें म्हणून एवढा आक्रोश करावा की चहूकडून लोकांनी धांऊन यावे व माझी ती अवस्था पाहून म्हणावे, " अरे रे ! बिचाऱ्याला पोटशूळाने काय वेदना होत आहेत ! " आम्ही श्रीरामकृष्णांच्या चरणांच्या आश्रयास राहूं लागल्यावर ईश्वराच्या दर्शनासाठी मनांत किती तीव्र व्याकुळता असावयास पाहिजे यासंबधाने आम्हांस उपदेश करीत असतां, कधी कधी ते स्वतःच्या साधनाकालच्या उपरोक्त गोष्टी सांगत व म्हणत–" स्त्री, पुत्र वगैरेच्या मृत्यूबद्दल अथवा पैशाबद्दल लोक डोळ्यांतून घागर घागर पाणी काढतील पण ईश्वराचे आपल्याला दर्शन झाले नाही, म्हणून एक चुळकाभर तरी पाणी कोणाच्या डोळयांतून निघतें का ? आणि उलट म्हणतात–"काय करावें बुवा ? इतक्या एकनिष्ठपणे ईश्वराची सेवा केली, तरी त्याने दर्शन दिलें नाही ! " ईश्वराच्या दर्शनासाठी अशा व्याकुळतेने एकवार तरी डोळ्यांतून पाणी निघूं द्या,—मग पाहूं बरे तो कसें दर्शन देत नाही तें ! " हे त्यांचे शब्द आमच्या हृदयास भेदून जात व आम्हांस वाटे की, स्वतःच्या साधनाकाळीं त्यांनी या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे, म्हणूनच ते इतक्या निःशंकपणे ठासून बोलूं शकतात ।

साधनाकालाच्या प्रथम विभागात नुसतें जगदंबेचेंच दर्शन घेऊन, श्रीरामकृष्ण स्वस्थ बसले नाहीत. श्रीजगदंबेच्या दर्शनानंतर स्वतःची कुळदेवता श्रीरामचन्द्र इचे दर्शन घेण्याकडे त्यांचें मन सहजच वळलें. महावीर हनुमान यांच्या सारखी भक्ति असेल तरच श्रीरामचंद्राचें दर्शन होईल, असे जाणून दास्य-भक्तींत पूर्णत्व मिळविण्यासाठी स्वतःला महावीर समजून, त्यांनी कांही दिवस साधना केली. श्रीरामकृष्ण सांगत–"त्या दिवसांत निरंतर हनुमानाचेंच चिंतन

करतां करतां मीं इतकें तन्मय होऊन जावें, की स्वतःचें पृथगस्तित्व व व्यक्तित्व मीं कांही काळपर्यंत तरी पूर्ण विसरून गेलों होतों ! या दिवसांत आहार-विहारादि सर्व कार्यें हनुमानासारखींच होत ! मी मुद्दाम तसें करीत असें, असें नव्हे, तर तें सर्व आपोआप घडून येई ! धोतराला शेपटीसारखा आकार देऊन तें कमरे-भोवती गुंडाळावें, उडया मारत चालावें, फळें, मूळें यांच्यावांचून इतर कांहीहि खाऊं नये ! तें खातांनासुद्धा टरफलें काढून टाकण्याची प्रवृत्ति होऊं नये ! दिवसाचा बराचसा भाग झाडावर बसूनच काढावा व " रघुवीर ! रघुवीर ! " असा गंभीर स्वराने एकसारखा आवाज करावा ! त्या दिवसांत डोळेहि वानरा-सारखेच सदा चंचल असावे ! व आश्चर्याची गोष्ट म्हणजे पाठीच्या कण्याचा शेवटचा भाग अजमासें एक इंचभर वाढला होता ! ही विलक्षण गोष्ट ऐकून आम्हीं विचारलें, " आपल्या शरीराचा तो भाग अजूनहि तसाच आहे काय ? त्यांनी सरळ उत्तर दिलें, " नाही. महावीराचा भाव मनांतून नाहीसा झाल्यावर तो वाढलेला भागहि हळूहळू कमी होत जाऊन शेवटी पहिल्यासारखा झाला."

दास्यभावाच्या साधनासमयीं श्रीरामकृष्णांना एक विलक्षण दर्शन प्राप्त झालें. ते सांगत असत, " या दिवसांत एक दिवस असाच पंचवटीखाली बसलों होतों. तेव्हां म्हणजे कांही विशेष ध्यान अथवा चिंतन करीत होतों, असे नाही; आपला सहज बसलों होतों; इतक्यांत तेथे एक अनुपम ज्योतिर्मयी स्त्रीमूर्ति प्रगट झाली व तिच्या दिव्य तेजाने तें स्थान प्रकाशित होऊन गेलें ! तेव्हां केवळ ती स्त्रीमूर्तीच दिसत होती असें नव्हे, तर तेथील झाडें, झुडपें, गंगेचा प्रवाह वगैरेहि सर्व दिसत होतें ! असें पाहिलें, की ती स्त्री कोणी तरी मानवीच असावी, कारण त्रिनयन वगैरे देवीलक्षणें तिच्यांत नव्हतीं. परंतु प्रेम, दुःख, करुणा, सहिष्णुता वगैरे विकार स्पष्ट दाखविणारें तिच्यासारखें तसें तेजस्वी व गंभीर मुखमंडळ, मी कुठेंहि पाहिलें नाही. ती मूर्ति प्रसन्न दृष्टीने माझ्याकडे पाहात, हळूहळू पुढे येत होती. मी चकित होऊन-" ही कोण असावी बरे ?" असा विचार करीत होतों; इतक्यांत एक कोठूनसा भला मोठा वानर 'उप,

ऊप ' करीत येऊन तिच्या पायांपाशीं बसला आणि त्याबरोबर एकाएकीं मनाला वाटलें की-" अरे ही सीता ! ही जन्मदुःखिनी, जनकराजनंदिनी, राममय-जीविता सीता ! " मनाला अशी खात्री पटतांच पुढे होऊन तिच्या चरणांवर लोळण घेणार, इतक्यांत तीच चकित होऊन या ( स्वतःकडे बोट दाखवून ) शरीरांत प्रविष्ट झाली आणि आनंदाने व विस्मयाने मीहि बाह्यज्ञान नाहीसें होऊन पडलो ! ध्यान चिंतन वगैरे कांही एक न करतां, अशा प्रकारें तोंपर्यंत कोणाचेंच दर्शन झालें नव्हतें. सीतेचेंच पहिलें दर्शन झालें. ( जरा हासून ) जन्मदुःखिनी सीतेचेच अशा प्रकारें प्रथम दर्शन झालें, म्हणूनच मला वाटतें जन्मापासून मी तिच्यासारखीं दुःखें भोगीत आहे ! " असो.

तपश्चर्येसाठी योग्य अशी एक पवित्र जागा असणें अवश्य आहे, असें वाटून, श्रीरामकृष्णांनी एक नवीन पंचवटी स्थापन करण्याची इच्छा हृदयजवळ प्रदर्शित केली. पंचवटी कशी असावी याबद्दल स्कंद पुराणांत म्हटलें आहेः-

अश्वत्थं बिल्ववृक्षं च वटधात्रीं अशोककम् ।
वटीपंचकमित्युक्तं स्थापयेत् पंच दिक्षु च ।।
अशोकं स्थापयेत् प्राचि बिल्वमुत्तरभागतः ।
वटं पश्चिमभागे तु धात्रीं दक्षिणतस्तथा ।।
अशोकं वन्हिदिक्स्थाप्यं तपस्यार्थं सुरेश्वरि ।
मध्ये वेदीं चतुर्हस्तां सुंदरीं सुमनोहराम् ।।

हृदय सांगत असे-" त्या सुमारास पंचवटीजवळची आजूबाजूची उंचनीच जमीन, नीट भर घालून सारखी केली होती, यामुळे पूर्वी ज्या आंवळीच्या झाडाखाली श्रीरामकृष्ण बसून ध्यान, जप वगैरे करीत असत, तें झाड नाहीसें झालें होतें." तेव्हां, सध्या साधु बैरागी वगैरे लोक उतरण्याची जी जागा आहे तिच्या पश्चिम बाजूस श्रीरामकृष्णांनी स्वतः आपल्या हाताने एक अश्वत्थ वृक्ष लावला व हृदयकडून बेल, अशोक, वड व आंवळी, हीं झाडें लाविलीं आणि या

सर्वांच्या सभोवती तुळशी व अपराजितांचीं रोपें लाविलीं. थोडयाच दिवसांत, हीं सर्व रोपें व झाडें चांगली वाढलीं व श्रीरामकृष्ण आपला बराचसा काळ या पंचवटींत ध्यानधारणा करण्यात घालवूं लागले. तुळशी व अपराजित रोपें बरींच वाढलीं, तरी त्यांच्या सभोवतीं कुंपण नसल्यामुळे, वरचेवर जवळपासचीं गुरें त्यांची नासाडी करीत. एक दिवस श्रीरामकृष्ण—" आता याबद्दल काय करावें ? " असा विचार करीत गंगेकडे पाहात, पंचवटींत सचिंतपणे बसले असतां, त्यांना दिसलें की, गंगेतून एक काटयाकुटयांचा ढीगच्या ढीगच वाहात येत आहे ! त्यांनी लगेच, भर्ताभारी म्हणून एक बागेंतील माळी होता, त्यास हांक मारली व तो ढीग कांठावर ओढून घेण्यास सांगितलें. भर्ताभारीची श्रीरामकृष्णांवर अत्यंत निष्ठा असे व त्यांची सेवा करण्यांत त्यास अत्यंत आनंद वाटे. त्याने ताबडतोब तो ढीग कांठावर ओढला. श्रीरामकृष्ण पाहतात तो त्यांत कुंपण करण्यास योग्य अशा काटया असून त्या ढिगांत दोरी, कुऱ्हाड वगैरे कुंपण बांधण्यास आवश्यक असे सर्व जिन्नसहि होते ! हें पाहून त्या दोघांसहि अत्यंत आश्चर्य वाटलें व ह्या रोपटयांच्या संरक्षणासाठीच जगदंबेने हें सर्व सामान पाठवून दिलें अशी त्यांची खात्री झाली. भर्ताभारी लगेच कामाला लागला व लवकरच तें कुंपण पूर्ण होऊन श्रीरामकृष्ण निश्चिंत झाले ! गुरांढोरांचा असा बंदोबस्त झाल्यामुळे लवकरच तुळशी व अपराजितांचीं तीं रोपें फोफावून इतकीं निबिड बनलीं की, पंचवटींत कोणी बसल्यास बाहेरच्या माणसास आंतील कांहीहि दिसत नसे. श्रीरामकृष्णांनी मथुरबाबूंकडून निरनिराळ्या क्षेत्रांतील पवित्र धूलि आणवून ती पंचवटींत पसरून दिली !

राणी रासमणीने दक्षिणेश्वरीं एक भव्य कालीमंदिर बांधिलें आहे, ही गोष्ट सर्वतोमुखी झाल्यावर, गंगासागर व जगन्नाथ या तीर्थास जातांना व तेथून परत येतांना, बहुतेक सर्व संन्यासी, साधु, बैरागी लोक तेथे कांही दिवस मुक्काम करून जाऊं लागले. श्रीरामकृष्ण सांगत की या मंडळींत सर्व प्रकारचे सर्व दर्जाचे साधक व सिद्धपुरुष असत. त्यांपैकीच एका साधूजवळ याच सुमारास

त्यांनी हटयोगाचा अभ्यास केला. हटयोगांतील सर्व क्रियांचा स्वतः अभ्यास करून व त्यांच्या फलाफलांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊनहि-" हटयोगाचा अभ्यास करूं नका " असें पुढे ते आम्हांला सांगत. आमच्यापैकी कोणी कोणी हटयोगांतील कांही गोष्टी त्यांना विचारीत. तेव्हां ते म्हणत-" तीं सर्व साधनें या कालासाठी नाहीत. कलियुगांत जीव अल्पायु व अन्नगतप्राण असा असतो. हटयोगाचा अभ्यास करून शरीर दृढ केल्यावर मग राजयोगाचा अभ्यास करावयाचा, ईश्वराची भक्ति करावयाची, इतका वेळ या युगांत आहे कुठे? शिवाय हटयोगाचा अभ्यास करावयाचा असल्यास एखाद्या अधिकारी गुरूच्या सहवासांत बराच काळ राहून, आहार, विहार वगैरे सर्व बाबतींत, त्यांच्या सांगण्याप्रमाणे विशेष कडक नियमाने वागलें पाहिजे, नियमामध्ये एवढीशी चूक झाली की साधकाच्या शरीरांत रोग उत्पन्न होतो व साधक मृत्युमुखीं पडण्याचाहि संभव असतो. म्हणून हें सर्व करण्याची कांही आवश्यकता नाही. आणखी एक गोष्ट—प्राणायाम, कुंभक, वगैरे करून वायूचा निरोध करावयाचा, तो तरी मनाचा निरोध करण्यासाठीच ना ? ईश्वराचें भक्तियुक्त अंतःकरणाने ध्यान केलें तर मन प्राण दोन्हीहि आपोआप निरुद्ध होतात. कलियुगांत जीव अल्पायु व अल्पशक्ति असल्यामुळे, भगवानांनी कृपा करून त्याच्यासाठी ईश्वरलाभाचा मार्ग इतका सोपा करून ठेवला आहे. स्त्रीपुत्रादिकांच्या वियोगाने जसा प्राण व्याकुळ होतो व दाही दिशा शून्य वाटूं लागतात, तशी व्याकुळता, ईश्वरासाठी जर कोणाच्या मनांत फक्त चोवीस तासपर्यंत टिकेल, तर त्या काळीं ईश्वर त्याला दर्शन देईलच देईल ! "

हलधारी चांगला पंडित व निष्ठावान वैष्णव होता हें मागें सांगितलेंच आहे. राधागोविंदजीच्या पूजेकडे त्याची नेमणूक झाल्यावर, कांही दिवसांनी तो तन्त्रोक्त वामाचाराची साधना करूं लागला. ही गोष्ट लोकांत कळल्यावर, ते यासंबंधाने कुजबुज करूं लागले, परंतु हलधारी वाक्सिद्ध असल्यामुळे, तो शाप देईल या भीतीने, कोणीहि ह्यासंबंधी त्याच्यासमोर चर्चा करण्यास धजत नसे.

हळूहळू श्रीरामकृष्णांच्या कानावर ही गोष्ट गेली. श्रीरामकृष्ण स्पष्टवक्ते— त्यांच्यापाशी आंत एक, बाहेर एक असें कधीच नसे. " तुम्ही तंत्रोक्त साधन करीत असतां, म्हणून लोक तुम्हांस हासतात–" असें एक दिवस त्यांनी हलधारीस सांगितलें. हलधारी हें ऐकून फार रागावला व म्हणाला, "तूं माझ्यापेक्षा लहान असून अशी माझी अवज्ञा करतोस ; तुझ्या तोंडांतून रक्त पडेल ! " " आपण कांही अवज्ञा करण्याच्या हेतूने बोललों नव्हतों, फक्त लोकांचें म्हणणें तुम्हांला कळवावें, म्हणून बोललों, " वगैरे पुष्कळ गोष्टी सांगून श्रीरामकृष्णांनी त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला, परंतु हलधारीने त्यावेळी त्यांचें कांही एक ऐकलें नाही.

ही गोष्ट घडल्यानंतर एक दिवस, रात्री आठ नऊचे सुमारास, श्रीरामकृष्णांच्या टाळूंतून खरोखरच रक्त निघूं लागून ते मुखावाटे एकसारखे बाहेर पडूं लागलें ! श्रीरामकृष्ण म्हणत–" त्या रक्ताचा रंग अगदी काळाकुट्ट होता व तें इतकें दाट होतें की कांही तोंडांतून बाहेर पडलें व कांही दातांच्या टोकास चिकटून, वडाच्या पारंब्याप्रमाणे बाहेर लोंबूं लागलें ! तोंडांत बोळा घालून रक्त दाबून धरण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ ! तेव्हां मात्र मला भय वाटूं लागलें. चोहोकडे ही बातमी पसरून लोक धांवून आले. हलधारी त्यावेळी मंदिरांत सायंपूजा वगैरे आटोपीत बसला होता. ही बातमी ऐकून त्यालाहि भीति वाटून तो धांवतच आला. त्याला पाहतांच माझे डोळे पाण्याने भरून आले व मी म्हणालों, " दादा ? शाप देऊन तूं ही माझी काय दशा करून टाकलीस, पाहा बरें ? " माझी ती अवस्था पाहून त्यालाहि रडूं कोसळलें.

त्या दिवशीं कालीमंदिरांत एकजण चांगला साधु आला होता. हा सारा गोंधळ ऐकून तोहि तेथे आला व रक्ताचा रंग व तें जेथून बाहेर निघत होतें ती जागा, यांची परीक्षा करून म्हणाला–" भिऊं नका, रक्त बाहेर आलें ही गोष्ट फार चांगली झाली. तूं योगसाधना करीत असतोस असें दिसतें. या साधनेच्या प्रभावाने सुषुम्नेचें तोंड मोकळें झालें असून शरीरांतील रक्त डोक्याकडे

वर चाललें होतें तें डोक्यांत न जातां असें मध्येच तोंडातून बाहेर निघालें, हें खरोखरच फार चांगलें झालें. तें जर माथ्यांत गेलें असतें तर तुला जड समाधि प्राप्त झाली असती व ती मग कांही केलें असतें तरी भंगली नसती. तुझ्याकडून जगदंबेचें कांही विशेष कार्य व्हावयाचें आहे, म्हणूनच तिनें या संकटांतून तुला बचावलें असे दिसतें." त्या साधूने अशी समजूत घातली तेव्हां मला धीर आला. अशा रीतीने हलधारीचा शाप वरच होऊन श्रीरामकृष्णांच्या उपयोगी पडला !

श्रीरामकृष्णांचें हलधारीशीं आचरण मोठें मधुर असे. पूर्वी सांगितलेंच आहे की हलधारी हा श्रीरामकृष्णांचा चुलतभाऊ असून त्यांच्यापेक्षा थोडासा वडील होता. सन १८५८ च्या सुमारास, तो दक्षिणेश्वरीं आला व तेव्हांपासून सन १८६५ पर्यंत श्रीराधागोविंदजीच्या पूजकाचें काम त्याने केलें. म्हणजे श्रीरामकृष्णांच्या साधनाकालापैकी सुमारें साडे सात वर्षे तो तेथे होता व त्या काळांतील साऱ्या गोष्टी त्याच्या डोळ्यांसमोर घडल्या. श्रीरामकृष्णांच्या तोंडून आम्हीं असें ऐकलें आहे की, तो श्रीमत् तोतापुरींच्याबरोबर अध्यात्मरामायण वगैरे वेदांतशास्त्रग्रंथावर चर्चा करीत असे; तरी सुद्धा श्रीरामकृष्णांच्या उच्च आध्यात्मिक अवस्थेची चांगलीशी ओळख त्याला पटली नव्हती, असें दिसतें. हलधारी अत्यंत निष्ठावान् व आचारवान् असे; अर्थातच भावावेशांत श्रीरामकृष्ण आपलें धोतर, जानवें वगैरे फेंकून देत, ही गोष्ट त्याला चांगली वाटत नसे. त्याला वाटे, की आपला धाकटा भाऊ स्वेच्छाचारी अथवा वेडा झाला आहे. हृदय म्हणे, "त्याने केव्हां केव्हां मला बोलूनहि दाखवावें-'हृदू, अरे, हा आपलें जानवें असें काढून टाकतो, आणि धोतर फेडून टाकतो, ही मोठी वाईट गोष्ट आहे. अनेक जन्म पुण्य करावें, तेव्हां कुठे ब्राह्मणाचा जन्म मिळतो आणि याचें पाहावें तर सारेच विपरीत. ह्याला तर आपलें ब्राह्मणत्वहि टाकून द्यावेंसें वाटतें ! अशी काय याची उच्चावस्था आहे की, याने असा स्वच्छंदीपणा करावा ? हृदू, पाहा बुवा, हा तुझेंच कांही थोडे फार ऐकेल तेव्हां तूंच

त्याला या बाबतीत काही समजून सांगितलें पाहिजेस आणि हा असे भलभलते चाळे करणार नाही इकडे लक्ष ठेवलें पाहिजेस. एवढेच काय पण वेळ पड-ल्यास त्याला बांधून ठेवून जरी उपयोग होण्यासारखा असेल, तरी तूं तेवढेंहि केलें पाहिजेस!' "

उलट, पूजेच्या वेळचा त्यांचा तन्मयभाव, त्यांच्या प्रेमाश्रुधारा, भग-वंतांचे गुण ऐकण्याविषयीचा त्यांचा उल्हास, वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजे हलधारीस मोठा विस्मय वाटे व त्याच्या मनांत येई की, "आपल्या धाकट्या भावाची अशी अवस्था ईश्वरी आवेशानेच होत असली पाहिजे, नाहीतर इतर कोणाची कोठे अशी अवस्था होत नाही ती?" तसेंच, हृदयचीहि त्यांच्यावरची निष्ठा पाहून तो चकित होऊन म्हणे, "हृदू, तूं कांही म्हण, तुला त्याच्यासंबंधी कांही तरी साक्षात्कार झाला आहे खास! नाही तर तूं त्याची अशी सेवा कधीहि केली नसतीस!"

अशा रीतीने हलधारीचें मन श्रीरामकृष्णांच्या उच्चावस्थेसंबंधी नेहमी द्विधा झालेलें असे. श्रीरामकृष्ण म्हणत-"कालीमंदिरांत मी पूजा करीत अस-तांना, माझा तन्मयभाव पाहून, मुग्ध होऊन कितीकदा तरी हलधारी म्हणे-"रामकृष्णा! आता मात्र मी तुला खास ओळखलें!" हें ऐकून मी केव्हां केव्हां विनोदाने म्हणावें-"पाहा बरे, नाहीतर आणखी पुन्हा गोंधळ होईल!" त्याने म्हणावें-"आतां मात्र मी तुला फसणार नाही. तुझ्यांत ईश्वरी आवेश खास आहे; आता माझी अगदी पुरी समजूत पटली!" हें ऐकून मीं म्हणावें, "बरे, दिसून येईल!" पुढे मंदिरांतील पूजेचें काम आटोपून हलधारी एक चिमुट तपकीर घेऊन, जेव्हां अध्यात्मरामायण अथवा भागवत, अथवा गीता सांगण्यास बसे, तेव्हां तो आपल्या विद्वत्तेच्या अभिमानाने जणु एक अगदी निराळाच माणूस होऊन जाई! मग मी त्याच्याजवळ जावें व म्हणावें-"दादा, तूं शास्त्रांत जें जें वाचलें आहेस, त्या सर्व अवस्थांचा मीं अनुभव घेतला आहे आणि त्या सर्व गोष्टी मला समजतात!" हें ऐकतांच त्याने म्हणावें, "अहारे

मूर्खा, तुला या साऱ्या गोष्टी समजतात काय ?" मग मी स्वतःकडे बोट दाखवून म्हणावें, "खरेंच सांगतों, या शरीरांत जो कोणी एकजण आहे, तो या सर्व गोष्टी मला समजावून सांगतो ! तूं आता नुकताच म्हणलास ना की तुझ्यांत ईश्वरी आवेश आहे आणि तोच या सर्व गोष्टी समजावून देतो म्हणून !" हें ऐकून त्याने अधिकच रागवावें व म्हणावे, "जा, जा, मूर्ख कुठला ! कलीयुगांत कल्कीशिवाय ईश्वरी अवतार असल्याची गोष्ट कुठल्या शास्त्रांत सांगितली आहे ? तुला उन्माद झाला आहे म्हणून तुझी अशी भलतीच कल्पना झाली आहे !" मग मीं हासून म्हणावें-"पण आतांच तूं म्हणालास ना की, मी पुन्हा फसणार नाही म्हणून ?" पण हें ऐकतो कोण ? हा प्रकार एकदा नव्हे, दोनदा नव्हे, अनेकदा घडला ! पुढे एक दिवस पंचवटींतील वडाच्या एका फांदीवर बसून, मी लघुशंका करीत असतांना त्याने पाहिलें. त्या दिवसापासून त्याचा पक्का समज झाला की, मला ब्रह्मसमंध लागला आहे !"

हलधारीच्या मुलाच्या मृत्यूसंबंधाने उल्लेख वर आलाच आहे, त्या दिवसापासून त्याची अशी भावना झाली की, श्रीकाली तमोगुणमयी अथवा तामसी आहे, आणि एक दिवस बोलतां बोलतां त्याने श्रीरामकृष्णांना म्हणूनहि दाखविलें-"तामसी मूर्तीची उपासना करून कधी आध्यात्मिक उन्नति होऊं शकते काय ? असल्या देवीची तूं इतकी आराधना कशाला करतोस ?" श्रीरामकृष्णांनी हें बोलणें ऐकून घेतलें व त्यावेळीं त्याला कांही उत्तर दिलें नाही; परंतु आपल्या इष्टदेवतेची निंदा ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. ते तसेच श्रीकालीमंदिरांत गेले व रडत रडत श्रीजगदंबेला म्हणाले-"आई, हलधारी मोठा शास्त्रज्ञ पंडित आहे. तो तुला तमोगुणमयी म्हणतो. तूं खरोखरीच तशी आहेस काय?" नंतर श्रीजगदंबेच्या तोंडून या विषयाचें यथार्थ तत्व समजतांच अत्यंत उल्हासाने व उत्साहाने त्यांनी हलधारीकडे धांव घेतली आणि एकदम त्याच्या खांद्यावर चढून बसून एखाद्या उन्मत्ताप्रमाणे त्याला पुन्हा पुन्हा म्हणूं लागले— "तूं आईला तामसी म्हणतोस नाही का ? आई तामसी आहे का ? माझी आई

तर सर्व कांही आहे—त्रिगुणमयी आणि शिवाय शुद्धसत्त्वगुणमयी ! भावाविष्ट श्रीरामकृष्णांच्या या बोलण्याने व स्पर्शाने, त्यावेळीं हलधारीचे डोळे उघडले. तेव्हां तो आसनावर बसला असून पूजा करीत होता. श्रीरामकृष्णांची ही गोष्ट त्याला पटली आणि त्यांच्यांत श्रीजगदंबेचा आविर्भाव आहे, अशी त्याची पुरी खात्री होऊन त्याने जवळच्या पूजेच्या साहित्यांतून, गंध, पुष्पें घेऊन तीं मोठ्या भक्तिभावाने त्यांच्या चरणीं समर्पण केलीं ! यानंतर कांही वेळाने हृदय तेथे आला व हलधारीला म्हणाला–" मामा, तुम्ही म्हणत असतां ना, की रामकृष्णाला भूत लागलें आहे ? मग त्यांची अशी पूजा हो कशी केलीत ? " हलधारी म्हणाला–" काय सांगूं हृदू, त्याने कालीमंदिरांतून परत येऊन, माझी कशीच्या कशीच अवस्था करून टाकली ! आणि मग मी सारें विसरून गेलों ! आणि मला त्याच्यांत खरोखरच साक्षात् ईश्वरी आवेश दिसला ! हृदू, जेव्हां जेव्हां म्हणून मी कालीमंदिरांत जातों, तेव्हां तेव्हां तो माझी अशीच विलक्षण अवस्था करून टाकतो ! मला तर हा सारा एक मोठा चमत्कार वाटतो. मला याचा कांही उलगडा होत नाही ! "

अशा प्रकारें श्रीरामकृष्णांच्यामध्ये, ईश्वरी प्रकाश असल्याचा वरचे वर अनुभव येऊन सुद्धा, हलधारी तपकीरीची चिमूट घेऊन शास्त्रविचार करूं लागला, की पांडित्याच्या अभिमानाने, पुन्हा आपला मूळ पदावर येई ! यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते की, कामकांचनासक्ति नाहीशी झाली नसेल, तर नुसत्या बाह्य शौचाचार व शास्त्रज्ञान यांच्या योगाने विशेषसें कार्य साधत नाही व सत्य तत्त्वाची धारणा मनुष्याला होत नाही. एके दिवशीं कालीमंदिरांत भिकाऱ्यांचें एक जेवण झालें. हे सर्व दरिद्री भिकारी लोक, 'नारायण' आहेत या भावनेने, त्यावेळीं श्रीरामकृष्णांनी त्यांचें उच्छिष्ट भक्षण केलें. हें पाहतांच, हलधारी रागावून श्रीरामकृष्णांना म्हणाला, " मूर्खा, बाटलास ना तूं ? तुला मुली झाल्यावर त्यांचीं लग्नें कशीं होतात हें पाहीन आता ! " वेदांतज्ञानाचा अभिमान बाळगणाऱ्या हलधारीचें हें बोलणें ऐकून श्रीरामकृष्णहि संतप्त होऊन म्हणाले

" आहारे दाद्या ! दीडशहाण्या ! तूंच म्हणत असतोस ना, शास्त्रें सांगतात की जगत् मिथ्या आहे आणि सर्वभूतीं ब्रह्मदृष्टि ठेवावी म्हणून ? तुझा असा समज आहे वाटते की मी तुझ्यासारखें ' जगत मिथ्या आहे ' असें म्हणेन आणि शिवाय मला मुलेबाळेंहि होतील ? धिक्कार असो तुझ्या या शास्त्रज्ञानाला."

कधी कधी हलधारीच्या पांडित्याने फसून जाऊन बालकस्वभावाचे श्रीरामकृष्ण किंकर्तव्यतामूढ होऊन श्री जगदंबेचे मत घेण्यास तिच्याकडे धांव घेत ! एक दिवस, हलधारी त्यांना म्हणाला, " शास्त्रें सांगतात की ईश्वर भावाभावांच्या पलीकडे आहे. तेव्हां तूं भावावस्थेंत जीं ईश्वराचीं रूपें वगैरे पाहातोस, तीं सर्व मिथ्या आहेत ! " हे ऐकून श्रीरामकृष्णांच्या मनाचा गोंधळ होऊन जाऊन, त्यांना काही सुचेनासे झालें. ते म्हणत-" मग मला वाटलें की, ' भावावेशांत मला जीं दर्शने झाली व ज्या गोष्टी मीं ऐकल्या त्या सगळ्या तर मग खोट्याच एकूण ? आईने तर मग मला फसवलें अं ? ' त्या विचाराने मन अत्यंत व्याकुळ झालें व रडत रडत मी म्हणूं लागलों-' आई, एखादा निरक्षर मूर्ख पाहिला म्हणजे त्याला असें फसवावें लागतें कां ग ? ' त्या रडण्याचा वेग त्यावेळीं कांही केल्या थांबेना. कांही वेळाने मी ज्या ठिकाणीं बसून रडत होतो, तेथच्या जमिनींतून एक धुराचा लोट वर येऊं लागला व त्याने जवळपासची सारी जागा व्यापून टाकली. थोडया वेळाने त्या धुरांत एक गौरवर्ण सुंदर तोंड दिसलें ! ती मूर्ति कांही वेळ माझ्याकडे टक लावून पाहून गंभीर स्वराने-' अरे, तूं भावमुखी राहा. ' असे त्रिवार म्हणाली व कांही वेळांत त्या धुरांतच मिसळून नाहीशी झाली ! तो धूरहि क्षणार्धात नाहीसा झाला. मी मात्र हे शब्द ऐकून त्यावेळीं शांत झालों. "

श्रीरामकृष्णांच्या साधकजीवनाचा जितका विचार करावा तितकी ही गोष्ट अगदी स्पष्टपणे दिसून येते की, कालीमंदिरांतील बहुतेकांचा, त्यांना उन्माद झाला आहे असा जरी समज झाला असला, तरी त्यांचा हा उन्माद मेंदूच्या विकाराने अथवा एखाद्या रोगामुळे खास झालेला नव्हता. हा उन्माद नसून

दिव्योन्माद होता. ही ईश्वराच्या दर्शनासाठी त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेली प्रचंड व्याकुळता होती व याच व्याकुळतेच्या प्रबळ वेगामुळे, त्याकाळीं ते स्वतःला आवरूं शकत नसत व एखाद्या उन्मत्तासारखे बेफाम आचरण करीत असत. ईश्वराच्या दर्शनासाठी त्यांच्या हृदयांत एकसारखी प्रचंड ज्वाला पेटली असल्यामुळे इतर साधारण लोकांशीं नेहमीच्या व्यवहारांतील गप्पा गोष्टी ते बोलत नसत, म्हणून ते सर्व लोक–"यांना उन्माद झाला आहे" असें म्हणत इतकेंच. आपणा सांसारिक लोकांची सुद्धा, एखाद्या यःकश्चित् गोष्टीसाठी अशी स्थिति होते. ह्या गोष्टीसंबंधीची तळमळ आपल्या सहनशक्तीच्या आटोक्याच्या बाहेर गेली तर आपलेहि वर्तन पार बदलून जाते व मनांत एक व कृतींत एक असा आपला नेहमीचा प्रकारसुद्धा बदलतो. यावर कोणी कदाचित् असें म्हणेल की–" पण सहनशक्तीची सीमा सर्वांची एकच नसते. कोणी अगदी थोड्या सुखदुःखानेहि गडबडून जातात व कोणी केवढींहि सुखदुःखें आलीं तरी सुद्धा एखाद्या पर्वतासारखे अचल राहतात. म्हणून, श्रीरामकृष्णांच्या सहनशक्तीचे परिमाण किती होते हे समजावें कसें?" याला उत्तर एवढेंच की, त्यांच्या जीवनांतील इतर कित्येक गोष्टींचा विचार केला, तर हें परिमाण असाधारण होते ही गोष्ट स्पष्टपणे समजून येईल. पाहाः– साधनाकालीं पुरीं बारा वर्षेपर्यंत ते अर्धपोटी अथवा उपाशी आणि अनिद्रावस्था अशा विलक्षण स्थितींत राहूनहि स्थिर राहूं शकले. वरचेवर अतुल संपत्ति पायापाशीं चालून येत असतां सुद्धा, " ईश्वरलाभाच्या मार्गांत तो एक मोठा अडथळा आहे," या विचाराने त्यांनी तिला लाथाडून दिलें—इत्यादि गोष्टींवरून त्यांचें शरीर व मन अत्यंत बलिष्ठ व असाधारण शक्तिसंपन्न होतें, ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येईल.

शिवाय या काळच्या त्यांच्या जीवनाचा विचार केला असतां असें दिसून येतें, की घोर विषयासक्त लोकच त्यांना उन्माद झाला आहे असें म्हणत. एक मथुरबाबूंची गोष्ट सोडून दिली तर, त्यांच्या अवस्थेची तर्कयुक्तीच्या साहाय्याने

छाननी करील अशी दुसरी एकहि व्यक्ति त्यावेळीं दक्षिणेश्वरीं नव्हती. श्रीयुत केनाराम भट्ट श्रीरामकृष्णांना मंत्रदीक्षा देऊन जे कोठे निघून गेले, ते गेलेच. त्यांच्याबद्दल हृदयकडून अथवा कोठूनच, कांहीच माहिती मिळाली नाही. श्रीरामकृष्णांची उच्चावस्था कालीमंदिरांतील लोभी व अशिक्षित अशा चाकर-नोकराना समजण्याचा संभवच नव्हता. तेव्हां त्यावेळी तेथे जे साधुसंत येऊन गेले, त्यांचेंच श्रीरामकृष्णांच्या उच्चावस्थेबद्दलचें मत ग्राह्य धरलें पाहिजे आणि हृदय, इतर मंडळी व खुद्द श्रीरामकृष्ण यांच्या सांगण्यावरून असें दिसून येतें की, त्यांना उन्माद झाला आहे असे म्हणणें बाजूलाच राहो पण श्रीरामकृष्णांची अवस्था फार उच्च दर्जाची आहे, असेंच त्या सर्वांचे मत होतें.

या काळानंतरच्या पुढच्या काळांतील गोष्टीचा विचार केला असतां असें दिसून येतें की ईश्वरदर्शनाच्या प्रबळ व्याकुळतेने ज्या वेळीं ते बेहोष होऊन गेलेले असत, त्या वेळा शारीरिक कल्याणासाठी म्हणून त्यांना कोणी जे कांही करावयास सांगे ते, ते ताबडतोब करावयास लागत. मग या गोष्टींत मात्र आपलाच हट्ट चालवीत नसत. चारचौघांनी सांगितले यांना रोग झाला आहे,—वैद्याला प्रकृति दाखविली पाहिजे,—यालाहि कबूल झाले. यांना आपल्या आई-कडे कामारपुकुरास घेऊन जावे म्हणून कोणीं सांगितलें, त्यालाहि कबूल झाले. कोणी म्हटले विवाह केल्यास यांचा उन्माद नाहीसा होईल,—त्या गोष्टीलाहि नाकबूल झाले नाहीत. तेव्हां अशा स्थितींत त्यांना उन्माद झाला होता असें कसें म्हणावें ?

शिवाय असेंहि दिसून येतें की विषयी लोक व व्यवहारांतल्या गप्पा-गोष्टी यांच्यापासून दूर राहण्याचा नेहमी प्रयत्न करीत असतांहि, जेथे अनेक लोक जमून, ईश्वराची पूजा अथवा कीर्तन, भजन वगैरे करीत, अशा ठिकाणी तर ते मुद्दाम आपण होऊन जात. वराहनगरांतील दशमहाविद्येचें स्थान, काली-घाटावरील श्रीजगदंबेचें स्थान, पानिहाटी येथील महोत्सव, वगैरे ठिकाणीं ते वरचेवर जात असत, यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. या ठिकाणींहि निरनिराळ्या

ाधक मंडळीशीं त्यांच्या गांठी भेटी व गप्पागोष्टी होत आणि याबद्दल जी ाय थोडी फार माहिती आम्हांला आहे, त्यावरून ही साधक शास्त्रज्ञमंडळी यांना उच्च दर्जाचे पुरुष समजत, असेंच दिसतें. पानिहाटीच्या महोत्सवांत . स. १८५९ त ते गेले असतां सुप्रसिद्ध वैष्णवचरण यांनी त्यांना पाहतांच, ; कोणी असामान्य कोटींतील महापुरुष आहेत असें ओळखलें. श्रीवैष्णवचरण ांनी तो दिवस यांच्याच सहवास घालविला आणि त्यांच्या खाण्यापिण्याची सर्व यवस्था स्वतः केली. यानतर तीन चार वर्षांनी त्यांची व श्रीरामकृष्णांची ुन्हा भेट होऊन, त्या उभयतांचा चांगलाच स्नेह कसा जमला, ती हकीकत ुढे येईलच.

याच प्रथमच्या चार वर्षांच्या कालांत, कामकांचनासक्ति पूर्ण नाहींशी करण्यासाठी श्रीरामकृष्णानी कित्येक विलक्षण साधना केल्या व या सर्व शत्रूंवर पूर्ण विजय मिळविला. कांचनासक्ति हा एक ईश्वर-लाभाच्या मार्गांतील फार मोठा अडथळा आहे असें पाहून त्यांनी ती आसक्ति नाहींशी करण्यासाठी खालीलप्रमाणे साधना केली. एका हातांत माती व दुसऱ्या हातांत कांही नाणीं घेऊन, त्यानी गंगेच्या किनाऱ्यावर बसावें व म्हणावें-" मना ! याला पैसा म्हणतात. याच्यापासून पुष्कळ प्रकारचें ऐहिक सुख प्राप्त होऊं शकतें. गाडया-घोडीं, दासदासी, कपडेलत्ते, तऱ्हेतऱ्हेचे खाण्यापिण्याचे पदार्थ, नानाप्रकारची चैन हीं सर्व मिळूं शकतात. परंतु जगांतील अर्धी अधिक भांडणें ह्या पैशापायीं होत असतात. हा मिळण्यासाठी श्रम करावे लागतात, याचें रक्षण करण्यासहि श्रम लागतात. हा नाहींसा झाला तर दुःख होतें व जवळ असला तर मनुष्याला अभिमान उत्पन्न होतो. याच्यापासून थोडा फार परोपकार होऊं शकतो खरा, पण याच्यापासून सच्चिदानंदाचा लाभ होत नाही आणि मना ! ज्या वस्तूत इतके दोष आहेत व शिवाय ज्याच्यापासून सच्चिदानंदाचा लाभ होणें बाजूसच राहिलें पण उलट त्याच्या लाभांत अडथळा उत्पन्न होतो, ती वस्तु काय उपयोगाची ? तिची व या मातीची किंमत सारखीच ! मग या पैशालाच

माती कां म्हणूं नये ? " असें म्हणत त्यांनी आपल्या हातांतील वस्तूंची अदला-बदल करावी व " पैसा माती, माती पैसा " असें एकसारखें म्हणत, सच्चिदानंद-लाभाच्या दृष्टीने पाहतां त्या दोहोंचीहि किंमत सारखीच, अशी मनाची पूर्ण खात्री पटवून घेऊन, माती व पैसा एकत्र करून तें सारें गंगेत फेकून द्यावें!!

ही विलक्षण साधना केल्यापासून कांचनासक्तीवर त्यांनी कायावाचामनें एवढा मोठा विजय मिळविला होता, की तशा प्रकारचा विजय आजपर्यंत दुसऱ्या कोणीहि मिळविला नसेल ! पैशासंबंधी नुसती कोणी गोष्ट काढली तर त्यांस खपत नसे ! मथुरबाबू, लक्ष्मीनारायण मारवाडी वगैरेंनी अलोट संपत्ति आणून त्यांच्या पायापाशीं ठेवली असतां, त्यांनी तिकडे ढुंकून सुद्धा पाहिले नाहीं: इतकेंच नव्हे पण एकदा मथुरबाबूंनी त्यांना एक बरीचशी मोठी रक्कम घेण्याचा फारच आग्रह केला असतां " तूं मला विषयासक्त करूं पाहतोस ? " असें म्हणून ते त्यांना मारावयास धांवले ! कांचनासक्तीचा विचार त्यांनी केवळ मनातूनच नाहीसा केला होता, असें नाहीं, तर स्वतःच्या शरीराकडूनहि कांचनाचा त्यांनी पूर्ण त्याग केला होता. पैशाचा विचार करणें हें त्यांच्या मनाला जसें खपत नसे, तसेच पैशाचा स्पर्शहि त्यांच्या शरीराला सहन होत नसे!! स्पर्श झाल्यास त्यांचे हात, पाय वायूचा झटका आल्यासारखे वांकडे होत व त्यांचा श्वासोछ्वास बंद होऊन जाई!! एक दिवस स्वामी विवेकानंद-प्रमुख संन्यासी भक्तांना ते त्यागाचें महत्त्व समजावून देत असतां-" त्याग हा कायावाचामनेंकरूनच झाला पाहिजे-" असें सांगत होते. स्वामी अत्यंत चिकित्सक बुद्धीचे असल्यामुळे, त्यांनी आपल्या गुरुजींची परीक्षा करण्याचा बेत केला! थोड्या वेळाने आपल्या बिछान्यावरून उठून, श्रीरामकृष्ण जरा बाहेर गेले. स्वामींनी लगेच त्यांच्या बिछान्याखाली एक रुपया सारून ठेवला व आता पुढे काय प्रकार घडून येतो, याची ते मोठ्या उत्कंठेने वाट पाहात बसले. बिछान्यावर बसतांक्षणीं, अंगाला कांहीतरी टोचल्याप्रमाणे किंकाळी फोडून, श्रीरामकृष्ण बिछान्याच्या बाहेर येऊन उभे राहिले ! त्यांच्या सर्वांगाला वेदना होत होत्या.

विवेकानंदांशिवाय खरा प्रकार कोणासच ठाऊक नसल्यामुळे, सगळी मंडळी बिछान्यावर कांही सुई, टांचणी अथवा विंचूकाटा आहे की काय, म्हणून पाहूं लागली. बिछाना उसकटल्यावर, खालून एक रुपया खगकन बाहेर पडला ! तो रुपया पाहतांच, श्रीरामकृष्णांच्या ध्यानांत सर्व प्रकार आला. या शोधाशोधींत कांहीएक भाग न घेतां विवेकानंद एका बाजूला चोरासारखे उभे होते. त्यांच्याकडे श्रीरामकृष्णांची दृष्टि गेली व त्यांना आपल्या शिष्याचें फार कौतुक वाटलें ! त्यांचें नेहमी सर्वांना सांगणें असें की-" एखादी गोष्ट मी सांगतों, म्हणूनच तिच्यावर विश्वास ठेऊं नका. तुमच्या अनुभवास ती गोष्ट येईल व तुम्हांस पटेल तरच तुम्ही तिच्यावर विश्वास ठेवा." तसेंच ते म्हणत— " साधूची दिवसा परीक्षा करावी, रात्रीं परीक्षा करावी, तेव्हांच त्याच्यावर विश्वास ठेवावा."

अखेर अखेरच्या दिवसांत हा कांचनत्याग, त्यांच्या देहाचे ठिकाणीं इतका बाणला होता की, पैशास राहो पण एखाद्या धातूच्या भांडयासहि त्यांना स्पर्श करवत नसे ! ! चुकून एखाद्या धातूच्या भांडयास स्पर्श झाला तर, विंचवानें नांगी मारल्यासारख्या त्यांच्या अंगाच्या वेदना होत ! ! यासाठी ते मातीचीं भांडीं वापरीत व एखादे धातूचें भांडे हातीं घ्यावयाचें असलें तर एखाद्या फडक्यांत गुंडाळून मग हातीं घेत ! कांचनासक्तीचा मनांतून त्याग झाल्यावर, ती त्यागवृत्ति त्यांच्या हाडींमांसींहि विलक्षण रीतीने खिळली होती !

कामासक्तीवर विजय मिळविण्याकरिता कित्येक दिवसपर्यंत ते स्वतःच स्त्रीवेषांत राहिले होते. त्या दिवसांत त्यांचें बोलणें चालणें वगैरे सर्व व्यवहार स्त्रियांप्रमाणे होत ! स्त्रीजातीकडे मातृभावाव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि भावानें पाहणें त्यांना अशक्य होऊन गेलें होतें. यासंबंधाची अधिक हकीकत पुढे मधुर-भाव-साधन या प्रकरणांत येणार आहे.

अभिमान दूर करण्यासाठी त्यांनी केलेली साधनाहि अशीच अलौकिक होती. हातांत केरसुणी घेऊन त्यांनी देवळाचे आवार स्वतः झाडून काढावें !

त्यांचे केस त्या दिवसांत चांगले लांब सडक वाढले होते. त्या केसांनी त्यांनी रस्ते, आंगण वगैरे झाडून साफ करावें व झाडत असतां म्हणावें—" आई! माझा सर्व अभिमान नष्ट करून टाक. एखाद्या भंग्यापेक्षाहि मी श्रेष्ठ आहे, असा मुद्धा अभिमान माझ्या मनांत येऊं देऊं नको!" आपणास सर्वाहून नीच समजून भिकाऱ्यांच्या पंगती उठल्यावर तेथील जागा त्यांनी स्वतः साफ करावी व ते भिकारी नारायणस्वरूप समजून त्यांचें उच्छिष्ट प्रसाद म्हणून ग्रहण करावें! कांही दिवस त्यांनी अगदी पहाटे सर्वांच्या अगोदर उठून, जवळपासचे शौचकूपहि झाडून साफ करावे व ते करीत असतां म्हणावें, " आई! माझा सर्व अभिमान नष्ट करून टाक!"

अशा अलौकिक साधनांनी त्यांचा अहंकार समूळ नाहीसा होऊन गेला व आपण कोणीहि स्वतंत्र अशी एखादी व्यक्ति नसून केवळ आपल्या आईच्या—जगदंबेच्या—हातांतील बाहुलें आहोंत अशी त्यांची दृढ समजूत झाली. या सर्व साधनांवरून त्याकाळीं ईश्वरलाभाची केवढी प्रचंड तळमळ त्यांच्या हृदयास लागलेली होती आणि अमुक एक गोष्ट करावयाची असें एकदा ठरल्यावर, ते कायावाचामनेंकरून ती साध्य करून घेण्याच्या मागें कसे लागत, हें स्पष्ट दिसून येईल व त्याबरोबरच हीहि गोष्ट लक्षांत येईल की, इतर कोणापासूनहि विशेषसें साहाय्य न मिळतां, केवळ आपल्या हृदयांतील व्याकुळतेच्या जोरावर त्यांनी श्रीजगदंबेचें दर्शन मिळविलें व याप्रमाणे साधनांचें प्रत्यक्ष फल हस्तगत करून घेऊन, मग आपल्या अनुभवाची, गुरुवाक्य व शास्त्रवाक्य यांच्याशी एकवाक्यता करून पाहण्याच्या ते उद्योगास लागले.

श्रीरामकृष्ण म्हणत—" त्याग व संयम यांचा पूर्णपणे अभ्यास करून, त्यायोगें आपल्या इंद्रियांना व मनाला वश करून घेऊन साधकाचें अंतःकरण जेव्हां शुद्ध व पवित्र होतें, तेव्हां त्याचें मनच त्याचा गुरु होऊन बसतें. त्याच्या त्या शुद्ध मनांत त्यावेळीं जे भावतरंग उत्पन्न होत असतात, ते त्याची कधीहि

दिशाभूल न होऊं देतां, त्याला त्याच्या ध्येयाकडे जलदीने घेऊन जातात. ” प्रथमच्या चार वर्षांच्या काळांत, स्वतः श्रीरामकृष्णांच्या मनाचीहि हीच गोष्ट होती. त्यांचें मन गुरुस्थानीं होऊन, त्यांना काय करावयाचें काय करावयाचें नाही, एवढेंच सांगून स्वस्थ बसत असे, असें नाही; तर कित्येकदा निराळा देहच धारण करून, त्यांच्या शरीरांतून बाहेर निघून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीप्रमाणे, त्यांच्या समोर उभे राही व त्यांना साधना करीत राहण्यास उत्साह देई अथवा त्यांना भीति दाखवून, साधना करावयास लावी; अमुक एक साधना कां केली पाहिजे तें समजावून देई अथवा कधी कधी अमुक साधनेपासून अमुक फल मिळेल असेंहि त्यांना अगोदरच सांगून टाकी ! ! ते एक दिवस असेच ध्यान करीत असतां एक तांबडालाल त्रिशूळ हातांत धरलेला संन्यासी आपल्या देहांतून बाहेर निघालेला त्यांना दिसला. त्यांच्यासमोर उभा राहून तो त्यांना म्हणाला-“ मनांतून इतर सर्व विषयांचे विचार काढून टाकून तूं केवळ आपल्या इष्टदेवतेचेंच चिंतन कर, असें न करशील तर हा त्रिशूळ तुझ्या छातींत भोंसकीन ! ! ” दुसऱ्या एका वेळीं त्यांना दिसलें की आपल्या शरीरांत असलेला भोगवासनामय पापपुरुष बाहेर पडला व त्याच्या मागोमाग तो तरुण संन्यासी बाहेर येऊन त्याने त्या पापपुरुषाला मारून टाकिलें. आणखी एके वेळीं त्यांनी पाहिलें की आपल्या शरीरांत असलेल्या त्या तरुण संन्याशाला निरनिराळ्या देवदेवतांचें दर्शन घेण्याची व भजन कीर्तन ऐकण्याची इच्छा उत्पन्न होऊन तो दिव्यरूप धारण करून बाहेर आला व देवांचें दर्शन घेऊन व भजन ऐकून कांही वेळ आनंद करून पुन्हा आपल्या देहांत प्रविष्ट झाला ! ! अशा तऱ्हेच्या नानाप्रकारच्या दर्शनांच्या गोष्टी आम्हीं खुद्द श्रीरामकृष्णांच्या तोंडून ऐकल्या आहेत.

साधनकालाच्या जवळ जवळ आरंभापासूनच ह्या तरुण संन्याशाचें श्रीरामकृष्णांना वारंवार दर्शन होई व कोणतीहि महत्वाची गोष्ट करण्यापूर्वी श्रीरामकृष्ण त्याचा विचार घेत ! साधनाकालीन या अपूर्वदर्शनादिकांचा उल्लेख करून एक दिवस श्रीरामकृष्ण आम्हांला म्हणाले, “ स्वरूपाने माझ्याच

सारखा एक तरुण संन्यासी कधी कधी या ( स्वतःकडे बोट दाखवून ) देहांतून बाहेर निघून सर्व गोष्टींमध्ये मला उपदेश देई. तो अशा रीतीने बाहेर आला म्हणजे एखाद्या वेळेस थोडीफार शुद्ध असे व एखाद्या वेळेस तर बाह्यज्ञान अजीबात नाहीसें होऊन, मी निश्चेष्ट होऊन पडें. परंतु असा पडलों असतांना मला त्याच्या हालचाली स्पष्ट दिसाव्या व त्याचे बोलणेंहि स्पष्ट ऐकूं यावे ! त्याने पुन्हा या देहांत प्रवेश केला म्हणजे मग मला बाह्यज्ञान पूर्णपणे प्राप्त व्हावे ! त्याच्या तोंडून मी जें ऐकलें होतें त्याचाच उपदेश, न्यांगटा व ब्राह्मणी यांनी येऊन पुन्हा एकवार केला. जे मी एकदा ऐकलें होतें तेंच त्यांनी पुन्हा एकदा ऐकविलें. यावरून असें वाटतें की वेद, शास्त्रें वगैरेंत सांगितलेल्या विधींची मर्यादा रक्षण करण्यासाठींच, त्यांना गुरुस्थानीं मानून मला त्यांच्यापासून पुन्हा उपदेश घ्यावा लागला. नाहीतर सर्व गोष्टी अगोदरच माहित असतां पुन्हा त्या सांगण्यासाठीच न्यांगटा वगैरेंना गुरुरूपाने येण्याचें विशेषसें कांही प्रयोजन सापडत नाही. ”

साधनाकालाच्या या विभागाच्या शेवटी श्रीरामकृष्ण जेव्हां कामारपुकुरास गेले, तेव्हां आणखी एक विलक्षण दर्शन त्याना प्राप्त झालें. एक दिवस (१८५८) ते शिबिकेत बसून कामारपुकुराहून हृदयांच्या शिऊड गावाला चालले होते. त्यावेळचा देखावा अत्यंत मनोहर होता. अफाट मैदानावर, मधे मधे, हिरवींगार धान्यक्षेत्रे पसरलीं होतीं. या सर्व देखाव्यावर आकाशाची स्वच्छ निळ्या रंगाची वाटी जणु काय झाकण ठेविली होती. हवा अत्यंत स्वच्छ असून, त्या विस्तीर्ण मैदानावरील रस्त्यांत, मधून मधून निर्मल पाण्याचे झरे वाहात होते. रस्त्याच्या दोहो बाजूने पिंपळ, वड वगैरे असून त्यांची शीतल छाया थकल्या भागल्या प्रवाशांना मोठ्या प्रेमाने विश्रांति घेण्यासाठी बोलावीत होती. हा सर्व मनोहर देखावा पाहात पाहात, मोठ्या आनंदांत श्रीरामकृष्ण चालले असतां, आपल्या देहांतून दोन लहान लहान मुलें बाहेर पडलेलीं एकाएकी त्यांना दिसलीं!! या मुलांचें रूप अत्यंत सुंदर होतें. बाहेर आल्याबरोबर त्यांनी नानातऱ्हेचे खेळ खेळण्यास सुरुवात केली—मधेच शिवाशिवी खेळावी, मधेच आजूबाजूची

सुंदर फुलें तोडावीं, मधेच पळत पळत खूप लांब जावे, तेथून पुन्हा शिबिकेकडे धांवत यावे; मधेच खूप हसावे, मधेच एकमेकांशी गप्पागोष्टी कराव्या,— अशा तऱ्हेने बराच वेळपर्यंत मजा करून, तीं दोन्हीं मुलें पुन्हा श्रीरामकृष्णांच्या देहांत अंतर्धान पावली ! या विलक्षण दर्शनानंतर सुमारे दीड वर्षाने जेव्हां विदुषी ब्राह्मणी दक्षिणेश्वरी आली, तेव्हां श्रीरामकृष्णांच्या तोंडून ही हकीकत ऐकून मुळी मुद्दा आश्चर्यचकित न होतां, म्हणाली, " बाबा, मग यांत विचित्र तें काय ? तूं पाहिलेंस तें ठीकच आहे. कारण या वेळीं, नित्यानंदाच्या शरीरांत श्रीचैतन्याचा आविर्भाव आहे—श्रीनित्यानंद व श्रीचैतन्य यावेळीं एकत्रच अवतार घेऊन आले असून, तुझ्यामध्येच राहिले आहेत !! " हृदय सांगत असे, " असें म्हणून ब्राह्मणीने चैतन्य भागवतांतले खालील श्लोक म्हणून दाखविले,

अद्वैतेर गला धरि कहेन बार बार ।
पुनः ये करिबे[1] लीला मोरे[2] चमत्कार ।
कीर्तने आनंदरूप हइबे[3] आमार[4] ।।
अद्यावधि गौरलीला करेन गौरराय ।
कोन कोन भाग्यवाने देखिबारे[5] पाय ।।

आम्ही श्रीरामकृष्णांच्या चरणांच्या आश्रयाने राहूं लागल्यावर, एक दिवस गोष्टीवरून गोष्ट निघतां, श्रीरामकृष्ण वरील हकीगतीचा उल्लेख करून म्हणाले-" अशा प्रकारचे दर्शन मला झालें हें खरें व माझ्या तोंडून ही हकीगत ऐकल्यावर ब्राह्मणीहि असें म्हणाली हेंहि खरे. परंतु आता याचा बरोबर अर्थ काय आहे हें मीं कसे सांगावें बरे ! " असो.

श्रीरामकृष्णांची ईश्वरदर्शनाची तळमळ अधिकाधिक वाढूं लागलेली पाहून याच चार वर्षांत केव्हां तरी, मथुरानाथांना असें वाटलें की अखंड ब्रह्मचर्य-

---

१ करील २ माझ्या ३ होईल ४ माझ्या ५ पहावयाला मिळतील

धारणामुळेच, यांच्या डोक्यांत कांही तरी विकार झाला असावा आणि त्याचेच दृश्य स्वरूप म्हणजे, ही ईश्वरदर्शनाची व्याकुलता हें असावें. मथुरानाथांची त्यांचेवर फार भक्ति व प्रेम होतें व त्यांच्या सुखासाठीं ते आपल्या समजुतीप्रमाणे वाटेल तें करण्यास सदैव तयार असत. यावेळीं त्यांना वाटलें की, यांच्या ब्रह्मचर्याचा भंग झाल्यास यांची प्रकृति पुन्हा पहिल्यासारखी होईल; म्हणून त्यांनी लक्ष्मीबाई वगैरे वारांगनांस प्रथम दक्षिणेश्वरीं आणून व पुढे श्रीरामकृष्णांसच कलकत्यास त्यांच्या घरी घेऊन जाऊन, त्यांच्याकडून श्रीरामकृष्णांच्या मनाला मोह पाडण्याचा प्रयत्न केला ! ! श्रीरामकृष्ण स्वतः सांगत असत की-" त्या वेश्यांमध्ये साक्षात् श्रीजगदंबेचे दर्शन होऊन, 'आई ! आई !' असे म्हणत मी एकदम समाधिमग्न झालो ! " असे सांगतात की, हा प्रकार पाहून व समाधि उतरल्यावरचा त्यांचा एखाद्या बालकासारखा सरळ व मोकळेपणाचा व्यवहार पाहून, त्या वेश्यांच्या मनांत वात्सल्यभावाचा उदय झाला ! नंतर अशा पुण्य-पुरुषाला मोह उत्पन्न करण्याचा प्रयत्न करून, आपण अत्यंत घोर अपराध केला, या भावनेने त्यांनी त्यांना वारंवार नमस्कार केला व त्यांची क्षमा मागितली !

# १९. विवाह व पुनरागमन

( १८५९–६० )

( पानांतून थोडें तोंडीलावणें घेऊन बलरामास दाखवून )– "हें बघ, विवाह यासाठी झाला ! नाही तर, कुणी बरें दुसऱ्यानें असें करून घातलें असतें ?"

"मी जेव्हां सोळा प्रकार करून दाखवीन, तेव्हां कुठें तुम्ही एखादा प्रकार केलात तर केलात !"

—श्रीरामकृष्ण

---

इकडे श्रीरामकृष्णांनी पूजेचें काम सोडलें, ही बातमी कामारपुकुरास त्यांच्या आईच्या व भावाच्या कानावर गेली व आता काय करावें अशी चिंता त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. रामकुमार कैलासवासी होऊन दोन वर्षे लोटतात तोंच, गदाधरालाहि वायुरोग झाला असें ऐकून, त्यांच्या वृद्ध मातेला व वडील भावाला काय वाटलें असेल, याची कल्पनाच करावी ! "संकटें कधी एक एक

अशीं येत नाहीत"-असें लोक म्हणतात, त्याची चांगली प्रतीति त्यांना या वेळी आली. गदाधरावर चंद्रामणीची अत्यंत प्रीति असल्यामुळे, ही बातमी ऐकून तिच्याने राहवेना. तिने श्रीरामकृष्णांना दक्षिणेश्वराहून आपल्या गावी आणविलें. परंतु तेथे आणलें तरी श्रीरामकृष्णांचा उदासीन आणि चंचल भाव कायमच होता. "आई!" "आई!" असा घोष रात्रंदिवस एकसारखा चालूच होता; भगवद्दर्शनाच्या व्याकुलतेने एखाद्या लहान मुलासारखें रडणे चालूच होते—हें सर्व पाहून, हा प्रकार बंद होण्याकरिता, तिने औषधें, मंत्रतंत्र, तोडगे, शांति वगैरे नानाप्रकारचे उपाय सुरू केले. ही गोष्ट सन १८५८ च्या आश्विन किंवा कार्तिक महिन्यांतील असावी.

घरीं परत आल्यानंतर, श्रीरामकृष्ण बराचसा वेळ पूर्वीप्रमाणेच घालवीत असत, तरी मधे मधे ईश्वरदर्शनाच्या तळमळीमुळे विव्हल होऊन जात. तसेंच मधे मधे गात्रदाहामुळे त्यांना फार त्रास होई अशा रीतीने एक पक्षीं त्यांचा सरळ व्यवहार, देवभक्ति, मातृभक्ति, स्नेह्यांवरील प्रेम वगैरे सर्व गुण पूर्ववत् असलेल पाहून व दुसऱ्या पक्षीं प्रसंगविशेषीं त्यांचा सर्व विषयांसंबंधी उदासीन भाव, लज्जाभयघृणाराहित्य, ईश्वरदर्शनाबद्दलची त्यांची उद्दाम व्याकुळता आणि आपल्या ध्येयाच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचे त्यांचे आटोकाट परिश्रम, हे सर्व पाहून, लोकांच्या मनांत, त्यांच्याविषयी एक प्रकारचा विलक्षण आदर उत्पन्न झाला. लोकांना वाटले की, कोणी तरी एखादी देवता त्यांच्या अंगांत येत असते!

श्रीरामकृष्णांची आई चंद्रादेवी, बिचारी अत्यंत सरल स्वभावाची, तिच्याहि मनांत कधी कधी असेंच येत असे आणि आता इतरांच्याहि तोंडून तीच गोष्ट ऐकतां, तिने एखाद्या देव-ऋषीला आणण्याचें ठरविलें. श्रीरामकृष्ण म्हणत-"एक दिवस आमच्या घरीं एक देवऋषी आला. त्याने कांही झाडपाला मंत्रून जाळला व ती राख मला हुंगावयास दिली व म्हणाला, 'तूं जर कोणी भूत असशील तर या झाडाला सोडून निघून जा." पण कोठे काय? कांहीच

झालें नाही ! पुढे आणखी एकदोन देवऋषी एका रात्रीं आले व पूजा बलिदान वगैरे झाल्यावर, त्यांतल्या एकाच्या अंगांत आले व तो म्हणाला, "त्यांना (मला) भूत लागलेलें नाही, की त्यांना कोणता रोगहि झाला नाही !" कांही वेळानें सर्वांच्या समक्ष तो मला म्हणाला, "कारे गदाई ? तुला साधु व्हावयाचें आहे ना ? मग तूं इतकी सुपारी कां खातोस ? सुपारीनें तर कामविकार वाढतो !" आणि खरोखरच याचे अगोदर मला सुपारी खाणें फार आवडत असें; पण त्या दिवसापासून मी सुपारी खाणें सोडून दिलें !"

श्रीरामकृष्णांना त्या वेळीं तेविसावें वर्ष लागलें होतें. कामारपुकुरास येऊन कांही महिने लोटल्यावर त्यांची व्याकुळता बरीचशी कमी झाली. याचें कारण म्हणजे, येथे आल्यावर त्यांना वारंवार श्रीजगदंबेचे अद्भुत दर्शन होई हें होय. त्यांच्याच नातलगांकडून समजलेल्या या काळच्या कित्येक गोष्टी खाली दिल्या आहेत.

कामारपुकुराच्या पश्चिमेस व ईशान्येस दोन स्मशानें आहेत, त्यांपैकी एखाद्यांत, दिवसा रात्रीं, जेव्हां वेळ सापडेल तेव्हां श्रीरामकृष्ण एकटेच जाऊन बसत. त्यांच्यामध्ये कांही एक विलक्षण शक्ति आहे अशी त्यांच्या नातलगांना याच सुमारास ओळख पटली. त्यांच्या तोंडून असें ऐकलें आहे की, स्मशानांतील कोल्हीं व भुतेंखेतें यांना देण्यासाठी म्हणून एखाद्या नवीन भांड्यांत फळमूल मिष्टान्न वगैरे घालून, श्रीरामकृष्ण तीं घेऊन स्मशानांत जात. श्रीरामकृष्ण त्यांना सांगत की, भुतांना त्या भांड्यांतील खाद्य दिल्यावर, तें भांडें भरकन् उडून आकाशांत जाऊन नाहीसें होई व कधी कधी तीं भुतेंखेतेंहि माझ्या प्रत्यक्ष दृष्टीस पडत ! कधी कधी, रात्रीं बारा एक वाजून जावेत पण श्रीरामकृष्णांचा पत्ता नसावा. मग रामेश्वरानें स्मशानाकडे जावें व दुरून श्रीरामकृष्णांना हांका माराव्या. श्रीरामकृष्णांनी हांक ऐकून ओ द्यावी व तेथूनच म्हणावें, "आलों रे दादा ! तूं आहेस तिथेच थांब पुढे येऊं नको, नाही तर हीं भुतें तुला कांही अपाय करतील !" यांपैकी एका स्मशानांत श्रीरामकृष्णांनी एक बेलाचें रोप

लावलें होते. त्याच स्मशानांत असलेल्या एका पुरातन पिंपळाच्या झाडाखाली बसून ते बराचसा वेळ जपध्यानांत घालवीत. त्यांच्या नातलगांनी सांगितलेल्या या सर्व हकीगतीवरून असें दिसते की, त्यांना यावेळी कांही अपूर्व दर्शने व साक्षात्कार प्राप्त होऊन, श्रीजगदंबेच्या दर्शनाबद्दलची त्यांच्या अंतःकरणांतील प्रचंड तळमळ यावेळीं बरीचशी कमी झाली होती व त्यावरून असा अंदाज होतो की, श्रीजगदंबेचें दर्शन यावेळीं त्यांना वरचेवर होत असावें व प्रत्येक महत्वाच्या गोष्टींत, तिच्या आदेशाप्रमाणे चालण्यास, त्यांनी या वेळेपासून सुरुवात केली असावी. वरचेवर श्रीजगदंबेचें दर्शन होत गेल्यानें कदाचित् याच वेळेस त्यांची अशी खात्री झाली असेल की, श्रीजगदंबेचे बाधाशून्य असें पूर्ण-दर्शनहि आपल्यास लवकरच प्राप्त होईल, कोणी सांगावें ? असो.

या वेळचे श्रीरामकृष्णांचें वर्तन व बोलणें चालणें, यावरून त्यांच्या घरच्या मंडळीस वाटले की, यांना जो एकाएकी वायुरोग झाला होता, तो आता बराचसा कमी झाला आहे, कारण ते आता पूर्वीसारखे व्याकुळ होऊन रडतांना दिसत नसत. त्यांचें जेवणखाण नियमित वेळीं होत असे व त्यांचे इतर व्यवहारहि इतर सर्व माणसासारखेच असत. त्यांना एवढें बरीक चमत्कारिक वाटे की, ते स्मशानांत जाऊन तेथे बराच वेळ बसतात, कधी कधी नेसलेलें वस्त्र फेडून टाकून निर्लज्जपणाने ध्यान पूजा वगैरे करीत बसतात, त्यांच्या मनांत पूजा, ध्यान, जप वगैरे जें कांही करावयाचें असतें, त्यांत कोणी त्यांना त्रास दिला तर मात्र फार संतापतात व कोणाचेंहि कांही न ऐकतां सर्वकाळ देव, ध्यान,पूजा, जप, यांतच निमग्न राहतात,—पण त्यांना वाटे यांत कांही विशेष नाही. हा तर त्यांचा लहानपणापासूनचाच स्वभाव आहे. त्यांना खरी चिंता वाटे ती त्यांच्या संसाराविषयीच्या पूर्ण उदासीनपणाची. त्यांना वाटे की, त्यांचें जोंपर्यंत संसारांत लक्ष नाही व उदासीनपणा कमी होत नाही, तोंपर्यंत त्यांचा वायुरोग पुन्हा उलटण्याचा फार संभव आहे आणि म्हणून त्यांचें लक्ष संसाराकडे कसें लावतां येईल, याच काळजींत त्यांची प्रेमळ माता व बंधु असत. सरतेशेवटी सर्व प्रकारांनी विचार करून

दोघांनी असें ठरविलें की, "आता गदाधराचा विवाहच केला पाहिजे, त्यावांचून गत्यंतर नाही. सुशील सुस्वरूप अशी पत्नी मिळाल्यास तिच्याबद्दल प्रेम वाटूं लागून, त्यांचें मन असें इतस्ततः भटक्या मारत बसणार नाही. आता याचें वय तेवीस चोवीस वर्षांचें झालें, तरी प्रत्येक गोष्टींत, हा एखाद्या लहान मुलासारखा, आपल्या भावाच्या व आईच्या तोंडाकडे पाहात असतो व 'आपली सांसारिक स्थिति काय, ती सुधारण्याला आपण काय केलें पाहिजे, वगैरे विचार कधीहि याच्या मनांत येत नाहीत! याचें लग्न केल्याशिवाय व स्त्री पुत्रादिकांना पोसण्याचा भार याच्या शिरावर पडल्याशिवाय, हे विचार जावेत तरी कसे!"

असा त्या दोघांनी विचार करून मुली पाहण्यास सुरवातहि केली. गदाधराला असा विचार ठरल्याचें समजलें, तर तो कदाचित् कांही अडथळे उपस्थित करील, म्हणून हा सर्व विचार कोणालाहि न समजू देतां त्यांनी ठरविला होता. तरी पण तीक्ष्णदृष्टिसंपन्न श्रीरामकृष्णांच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाही. पुढे विवाहाची नक्की गोष्ट त्यांच्या कानांवर गेली, तरी सुद्धा त्यांनी त्याबद्दल आपली नापसंती मुळीच दर्शविली नाही; उलट घरीं एखादें कार्य व्हावयाचें असलें म्हणजे लहान लहान मुलें जशीं मजेंत व आनंदांत असतात तसेंच आचरण श्रीरामकृष्णहि करूं लागले! श्रीजगदंबेच्या कानावर ही गोष्ट घालून, यासंबंधी काय केलें पाहिजे हें जाणून, त्यांनी असें आचरण चालविलें असावें; की मुलांना जशी आपल्यावरील जबाबदारीची कल्पना नसते व पुढे होणाऱ्या गोष्टीबद्दल तीं जशीं निश्चिन्त असतात, तसाच प्रकार श्रीरामकृष्णांचाहि असावा; की लग्नासंबंधी पूर्णपणे निश्चिन्त राहण्यामध्ये त्यांचा कांही निराळाच उद्देश असावा! श्रीरामकृष्णांच्या आयुष्यांत, त्यांचा विवाह ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असल्यामुळे या विषयींचें सांगोपांग विवेचन येथे करण्याचें योजिलें आहे.

श्रीरामकृष्णांच्या चरित्राचा विचार करूं जातां, सहजच मनांत येतें की, श्रीरामकृष्णांनी विवाह केलाच कशाला? स्त्रीसह शरीरसंबंध ठेवण्याची ज्यांच्या

मनांत नुसती कल्पनाहि कधी आली नाही, त्यांनी विवाह केला तरी कशाला ? हे खरोखरीच एक गूढ आहे. कदाचित् कोणी म्हणेल की—" त्यांना यौवनदशा प्राप्त झाल्याबर, ते एकसारखे "भगवान्! भगवान्!" करूं लागले व एखाद्या उन्माद झालेल्या माणसासारखें आचरण करूं लागले, म्हणून त्यांच्या घरच्या मंडळींनी, त्यांचें कांही न ऐकतां, त्यांच्या इच्छेविरुद्ध मुद्दाम त्यांचें लग्न करून दिलें असेल." परंतु ही गोष्ट शक्यच दिसत नाही; अगदी लहानपणापासून त्यांच्या इच्छेविरुद्ध, एखादी लहानशी गोष्ट सुद्धा त्यांना करूं लावण्यास कोणीहि कधीहि समर्थ झाला नाही आणि उलट एकदा मनांत घेतलेली गोष्ट केल्याशिवाय ते कधीहि राहिले नाहीत. त्यांच्या लहापणचीच एक गोष्ट घ्या. धनी लोहारणीला " तुला भिक्षामाता करीन " असें त्यांनी सांगितले व कोणाच्याहि म्हणण्याला न जुमानतां, त्यांनी आपलें म्हणणे खरे करून दाखविलें ! हें कुठे ? तर कलकत्त्यासारख्या, धर्मबंधनें शिथिल असलेल्या शहरी नव्हे, तर कामारपुकुरासारख्या पुराणमताभिमानी व धर्मकर्मपरायण अशा गावांत ! अशा ठिकाणीं एखादा मनुष्य, " मी वाटेल तसा वागेन, " असें म्हणेल, तर समाज तें चालूं देत नाही. बरे, घरची मंडळीहि कांही कमी स्वधर्मनिष्ठ होती, असेहि नाही. कुळाची रूढी पाहिली, तर अशी होती की, भिक्षामाता होणारी स्त्री ब्राह्मणाचीच असली पाहिजे. इतक्या सर्व गोष्टी प्रतिकूल असून, सर्वांच्या इच्छेविरुद्ध त्यांनी त्या लहान वयांतहि आपला शब्द खरा करून दाखविला ! " डाळ तांदूळ मिळविणारी विद्या शिकायची नाही, " असें ठरविल्यावर या बाबतींत त्यांनी कोणाचेंहि ऐकिलें नाही. तसेंच त्यांच्या मनांत जोंपर्यंत नव्हते तोंपर्यंत, पुजारीपण स्वीकारण्याच्या मथुरानाथांच्या सर्व विनवण्या त्यांनी धाब्यावर बसविल्या ! या व अशाच इतरहि गोष्टींवरून, जर स्पष्ट दिसून येतें की त्यांनीच आपल्या इच्छेप्रमाणे दुसऱ्यांच्याहि इच्छा फिरवून टाकल्या, तर लग्नासारख्या आयुष्यांतील अत्यंत महत्वाच्या गोष्टींत, ते दुसऱ्यांच्या इच्छेप्रमाणे वागले, असें म्हणणें कसें सयुक्तिक होईल ?

अथवा कदाचित् कोणी म्हणेल की "ईश्वरप्रेमामुळे त्यांच्या मनांत लहानपणापासून, सर्वस्वत्यागाचा भाव होता अशी गोष्ट गृहीत धरण्याची काय आवश्यकता आहे? तेव्हां ही गोष्ट गृहित न धरतां असें म्हटलें म्हणजे झालें की इतर सर्वांप्रमाणे लग्न वगैरे करून संसारसुख उपभोगण्याचें, पहिल्यानें श्रीरामकृष्णांच्या मनांत होतें; परंतु यौवनदशा प्राप्त झाल्यावर, थोड्याच दिवसांत त्यांच्या विचारांत विलक्षण क्रांति घडून आली व ईश्वरप्रेमाची एवढी लाट त्यांच्या अंतःकरणांत उसळली, की तिच्या योगानें त्यांचे पूर्वीचे सर्व विचार पार बदलून गेले आणि "हा बदल होण्याचे पूर्वी श्रीरामकृष्णांचा विवाह झाला होता!" असें म्हटलें म्हणजे सर्वच वाद मिटला. हें म्हणणें वरवर पाहतां मोठें सुंदर दिसतें, परंतु वस्तुस्थिति याचें अगदी उलट आहे. एकतर, ईश्वरप्रेमानें सर्वस्वत्यागाचा भाव त्यांच्या मनांत लहानपणापासूनच होता की नाही, हें त्यांचें बाल्यजीवन पाहिल्यास स्पष्ट दिसून येईल. दुसरी गोष्ट—त्यांचा विवाह तेवीस चोविसाव्या वर्षीं झाला. त्याच्या अगोदर तीन-चार वर्षांपासून त्यांच्या अंतःकरणांत ईश्वरप्रेमाची प्रचंड खळबळ सुरू होती. शिवाय, स्वतःसाठी, ज्यांनी कोणाला कधीहि एवढासा सुद्धा त्रास पडूं दिला नाही, त्यांनी "आपल्यासाठीं एका गरीब मुलीला जन्मभर दुःख भोगावें लागेल," असें जाणूनसुद्धा आपलें लग्न करून घेतलें असेल, ही गोष्ट अगदी असंभवनीय दिसते. तिसरी गोष्ट—श्रीरामकृष्णांच्या आयुष्यांतील कोणतीच घटना निरर्थक नव्हती, हें त्यांच्या आयुष्याचा जितका अधिक विचार करावा, तितकें अधिक स्पष्ट दिसून येतें. चवथी गोष्ट—त्यांनी आपल्या स्वतःच्या इच्छेनेच विवाह केला, हें खास; कारण मुली पाहण्याची गडबड सुरू झाली, तेव्हांच त्यांनी हृदयजवळ व घरांतील इतरहि मंडळीजवळ असें बोलून दाखविलें की, "जयरामवटींत राहणाऱ्या रामचंद्र मुखोपाध्याय यांच्या मुलीशीं माझें लग्न होणार असें कधीच ठरलें आहे!" हे वाचून वाचकांना आश्चर्य वाटेल व कदाचित त्यांचा यावर विश्वासहि बसणार नाही. ते म्हणतील, "या असल्या गोष्टी का कुठे या विसाव्या शतकांत चालतात? या असल्या भविष्य कथनावर कोणाचा विश्वास बसेल?" यावर आमचें एवढेंच उत्तर आहे की "तुमचा उपरोक्त गोष्टीवर विश्वास बसो की न बसो, श्रीरामकृष्णांनी तसें सांगि-

तलें होतें, ही गोष्ट निःसंशय आहे. या गोष्टीच्या सत्यतेची साक्ष पटवून देतील, अशीं कांहीं माणसे सुदैवानें * अजूनहि हयात आहेत. त्यांनाच प्रत्यक्ष विचारून पाहा म्हणजे खात्री पटेल." बरेच दिवस मुली पाहाण्यांत गेले, तरी त्यांच्या घरच्या मंडळीस जेव्हां त्यांतील एकहि मुलगी पसंत पडेना, तेव्हां श्रीरामकृष्णांनी स्वतः मंडळीस सांगितलें की "अमुक गावच्या अमुक गृहस्थाची मुलगी माझ्या-साठी वेगळी काढून ठेवली आहे, पाहून या." यावरून स्पष्ट दिसेल की, आपला विवाह होणार आहे व तो अमुकाच्या मुलीशीं होणार आहे ही गोष्ट श्रीराम-कृष्णांना माहीत होती व असेंहि दिसून येईल की लग्नाच्या बाबतींत त्यांनी मुळींच हरकतहि घेतली नाही. या सर्व गोष्टी त्यांना भावसमाधींतच कळून आल्या असाव्या तर मग श्रीरामकृष्णांच्या विवाहाचा अर्थ काय ?

कोणी शास्त्रज्ञ वाचक कदाचित म्हणतील की "शास्त्रे सांगतात की, ईश्वरदर्शन अथवा पूर्णज्ञान झाल्यावर जीवाच्या संचित व आगामी कर्मांचा नाश होतो, परंतु ज्ञान प्राप्त झालें तरी प्रारब्ध कर्माचा भोग त्याला या शरीरांतच घ्यावा लागतो. पाहा—

> प्रारब्धं बलवत्तरं खलु विदां भोगेन तस्य क्षयः ।
> सम्यग्ज्ञानहुताशनेन विलयः प्राक्संचितागामिनाम् ।।

कल्पना करा की एका व्याधाच्या पाठीवर बाणभाता असून, त्यांत पुष्कळ बाण आहेत. एका पक्षाला मारण्यासाठी त्याने एक बाण हातांत घेतला आहे व एक बाण त्याने नुकताच एका पक्ष्यावर सोडला आहे. इतक्यांत, कल्पना करा की, त्याच्या मनांत एकाएकी वैराग्याचा उदय झाला आणि त्याला वाटलें, कीं आता हिंसा म्हणून करावयाची नाही. लगेच त्याने हातांतील बाण खाली टाकला, पाठीवरील बाणभाताहि फेकून दिला, पण त्याने जो नुकताच एक बाण सोडला होता त्याचें काय ? तो तर त्याला पुन्हा परत घेतां येत नाही ? त्याचप्रमाणे

*१९१४-१५ सालीं.

पाठीवरील बाणभाता म्हणजे जीवाचें जन्मजन्मांतरींचें संचित कर्म, हातांतील बाण म्हणजे आगामी कर्म अथवा जें कर्म आता घडून येणार आहे तें; या दोन्ही कर्मांचा ज्ञानानें नाश होईल. पण त्यानें हातांतून नुकत्याच सोडलेल्या बाणाप्रमाणें त्याचीं जीं प्रारब्ध कर्मे असतात, त्यांचें फल तर त्याला भोगावें लागेल की नाही? श्रीरामकृष्णांसारखे महापुरुष, केवळ आपल्या प्रारब्ध कर्मांचाच या शरीरांत भोग घेत असतात. हा फलभोग कांही त्यांना चुकत नाही."

यावर आमचें एवढेंच उत्तर आहे की "शास्त्रावरून असें दिसतें की यथार्थ ज्ञानी पुरुषांना, आपल्या प्रारब्ध कर्मांचाहि फलभोग घ्यावा लागत नाही. कारण सुखदुःखांचा भोग करणारें कोण? मनच ना? तें मनच तर त्यांनी ईश्वरचरणीं कायमचें अर्पण केलेलें असतें. मग आता त्या सुखदुःखांना राहण्याला जागाच कुठे राहिली? यावर कोणी कदाचित् म्हणेल, की, प्रारब्ध कर्मांचा भोग त्यांच्या शरीरांकडून होतो. पण हें तरी कसें व्हावें? कारण त्यांचें देहाकडे लक्ष तरी कोठे असतें? त्यांचा अहंकारच जर समूळ नष्ट झालेला असतो व देहाची जाणीवहि जर त्यांची नष्ट झालेली असते, तर त्यांचा देह प्रारब्ध कर्मांचा उपभोग घेतो, असें म्हणण्यांत अर्थ काय? आणखी एक गोष्ट—श्रीरामकृष्णदेवांच्या स्वतःच्या अनुभवावर जर विश्वास ठेवावयाचा असेल, तर त्यांना नुसतें "ज्ञानी पुरुष असें म्हणतां येत नाही. त्यांची कोटि याहून उच्च, असेंच मानलें पाहिजे. कारण त्यांच्या तोंडून वारंवार आम्ही ऐकलें आहे— "जो राम जो कृष्ण तोच सांप्रत रामकृष्ण." अर्थात् पूर्वी रामचंद्र व श्रीकृष्ण या रूपांनी ज्यानें अवतार घेतला होता, तोच याकाळीं श्रीरामकृष्णांच्या शरीरांत राहून अपूर्व लीला करीत आहे! आणि या त्यांच्या स्वतःच्या उद्गारावर विश्वास ठेवावयाचा असेल, तर त्यांना नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव ईश्वरावतार असेंच म्हणावें लागतें आणि असें म्हटल्यावर त्यांनाहि प्रारब्ध कर्मांचा फलभोग घ्यावा लागला, असें म्हणून चालत नाही. यासाठी श्रीरामकृष्णांच्या विवाहाची निराळ्याच तऱ्हेनें मीमांसा करणें हेंच युक्तियुक्त होईल.

लग्नाची गोष्ट आमच्या जवळ काढून श्रीरामकृष्ण कधी कधीं मोठा मधुर विनोद करीत. एक दिवस दुपारीं दक्षिणेश्वरीं श्रीरामकृष्ण जेवावयास बसले होते. जवळ श्रीबलराम बसु व इतर बरेच भक्त बसले असून, त्यांच्याशीं नाना तऱ्हेच्या गोष्टी बोलत होते. श्रीरामकृष्णांचा पुतण्या रामलाल याचा विवाह असल्यामुळे, त्याच दिवशीं माताजी ( श्रीरामकृष्णांची पत्नी ) कामारपुकुरास गेल्या होत्या.

श्रीरामकृष्णः—( बलरामांस ) " बरें, पण माझें लग्न कशाला झालें सांग पाहूं ? मारे लग्न झाले, पण काय त्याचा उपयोग ? इथे तर नेसलेल्या धोतराची शुद्ध नसते आणि मग बायको कशाला ? " हे ऐकून बलराम थोडेसे हसले व गप्प बसले.

श्रीरामकृष्णः—अं आलें लक्षांत ! ( पानांतून थोडेसें तोंडीलावणें उचलून व तें बलरामांना दाखवून ) हे बघ, विवाह यासाठी झाला. तो जर झाला नसता, तर मग कुणी दुसऱ्याने असं करून घातले असते बरे ? ( बलराम व इतर मंडळी हसतात. ) खरंच विचारतों, दुसऱ्या कुणी खाण्यापिण्याची अशी व्यवस्था ठेवली असती काय ? ती तर आज निघून गेली ! ( कोण निघून गेलें हें मंडळीच्या लक्षांत आलें नाही असें पाहून ) रामलालची चुलती रे ! रामलालचें लग्न आहे की नाही आता, म्हणून ती कामारपुकुरास गेली ! मी आपला उभा राहून पाहात होतो, पण मनांत कांही सुद्धा आलें नाही, अगदी खरें सांगतों. कुणी तरी निघून चाललें आहे खरें, एवढेंच काय तें मनांत आलें. पण मागून मात्र असें वाटूं लागलें, की आता खायला कोण करून घालणार ? कां वाटलें सांगूं ? वाटेल तो पदार्थ कांही पोटाला सोसत नाही आणि खाण्याची तरी नेहमी शुद्ध असते असेंहि नाही. काय सोसतें, काय नाही, हें सारें तिला ठाऊक आहे, ती आपलें कांही कांही करून घालत असते, म्हणून वाटलें, की आता खायला कोण करून घालील ? "

आणखी एकदा दक्षिणेश्वरीं लग्नाच्या गोष्टी निघाल्या असतां श्रीरामकृष्ण म्हणाले, " विवाह कां करीत असतात माहीत आहे ? ब्राह्मण शरीराला एकंदर दहा प्रकारचे संस्कार असतात. विवाह हा त्यांतीलच एक संस्कार आहे. हे दहाहि संस्कार झाले, तरच " आचार्य " होतां येतें. " शिवाय आणखीहि असे म्हणत–" जे परमहंस असतात, पूर्ण ज्ञानी असतात, ते अगदी झाडूवाल्यापासून तों थेट सार्वभौम बादशहापर्यंत सर्व अवस्था पाहून त्यांचा उपभोग घेऊन आलेले असतात. असें जर न होईल तर ठीक ठीक वैराग्य कसें बरें येईल ? जे अनुभवून पाहिलेलें नसतें व ज्याचा उपभोग घेतलेला नसतो, तें पाहावें व त्याचा उपभोग घ्यावा, असें मनाला वाटून तें चंचल होईल; समजलें ? सोगटी जेव्हां पक्कून येते तेव्हांच ती निघाल्या ठिकाणीं परत जाते; नाहीं ? त्याचप्रमाणे. "

साधारण गुरु व आचार्य, यांच्या विवाहाचें वरीलप्रमाणें कारण जरी त्यांनी सांगितलें, तरी त्यांच्या स्वतःच्या विवाहाचें कांही विशेष कारण असावें असें आम्हांला वाटतें. विवाह भोगासाठी नाही ह्या गोष्टीची आठवण, शास्त्रें आपल्याला पदोपदी देत असतात. शास्त्रें सांगतात, की ईश्वराचा सृष्टिसंरक्षणरूप नियम पाळणें व गुणवान पुत्र उत्पन्न करून समाजाचें कल्याण साधणें, हाच विवाह-कर्माचा उद्देश असणे उचित आहे. परंतु ' यामध्ये स्वार्थाचा अगदी लवलेश सुद्धा असूं नये, ' अशी असंभवनीय गोष्ट कांही शास्त्रांनी सांगितली नाही. दुर्बल मानवाच्या चरित्राचें पूर्ण अवलोकन करून, शास्त्रकार ऋषीवर्यांनी जाणले होतें की, दुर्बल मानवाला स्वार्थाशिवाय या जगांत कोणतीहि गोष्ट समजत नाही. लाभ, नुकसान यांचा विचार केल्याशिवाय, तो अगदी सामान्य कार्य सुद्धा हातीं घेत नाही. ही गोष्ट समजून सुद्धा, शास्त्रकारांनी वरील आज्ञा केली, याचें कारण एवढेंच की, " या स्वार्थबुद्धीला एखाद्या उच्च उद्देशाशीं जर सर्वदा जखडून ठेवलें तरच ठीक; नाही तर, पुन्हा पुन्हा जन्ममृत्यूच्या बंधनांत सापडून मनुष्याला अनंत दुःखें भोगावीं लागतील, " ही गोष्टहि त्यांनी जाणली होती. स्वतःचे नित्यमुक्त स्वरूप विसरल्यामुळेच इंद्रियद्वारा बाह्य जगतांतील

रूपरसादि विषयांचा उपभोग घेण्यासाठी, मनुष्य सर्वदा हापापलेला असतो व मनांत म्हणतो की " हें सर्व विषयसुख किती मधुर व मनोरम आहे ? परंतु जगांतील सर्व सुखें, दुःखाशीं नेहमी जखडलेली असतात; सुखांचा उपभोग घ्यावयास गेलें म्हणजे दुःखांचाहि उपभोग घ्यावाच लागतो, ही गोष्ट किती जगांच्या लक्षांत येते ? स्वामी विवेकानंद म्हणत असत-" दुःखाचा मुकुट डोक्यावर घालून सुख मनुष्याजवळ येऊन उभे राहतें. " मनुष्याला तर निर्भेळ सुखच हवे असते, पण तें मिळावें कसे ? त्याच्या डोक्यावर दुःखाचा मुकुट आहे व सुखाचा उपभोग घ्यावयास गेले तर परिणामीं दुःखाचाहि उपभोग घेतल्यावांचून सुटका नाही. हा विचारच मनुष्याच्या लक्षांत येत नाही. म्हणूनच या गोष्टीचें त्याला स्मरण करून देऊन शास्त्र सांगते, " बाबारे, सुखाचा लाभ हाच तेवढा स्वार्थ, अशी तूं आपली समजूत कां करून घेतोस ? सुख अथवा दुःख यांपैकी कोणतेंहि एक घ्यावयास गेले, तरी त्याचेबरोबर दुसरेंहि घ्यावे लागतें. तूं आपल्या स्वार्थाची तार जरा उच्च सुरावर लावून, असा विचार कर की, सुख हाहि माझा गुरु आहे व दुःख हाहि माझा गुरु आहे ! आणि ज्या योगाने या दोहोंच्याहि हातून माझी सुटका होईल, तोच माझा खरा स्वार्थ आणि तेंच माझ्या आयुष्याचें ध्येय आहे. " यावरून समजून येईल की विवाहित अवस्थेमध्ये, सर्व प्रकारच्या भोगांचें विचारपूर्वक सेवन करून व सुख-दुःखपूर्ण अशा नाना अवस्थांचा अनुभव घेऊन, क्षणभंगुर संसारांतील आपातरमणीय सुखाविषयी तिटकारा मनुष्याच्या मनांत उत्पन्न व्हावा व त्याचें मन ईश्वरचरणी लागावें आणि ईश्वरालाच आपलें सर्वस्व समजून त्याच्या दर्शनाची तळमळ लागावी, अशा प्रकारचाच उपदेश देण्याचा शास्त्रकारांचा हेतु असतो. कोणत्याहि विषयसुखाचा विचारपूर्वक उपभोग घेऊं गेलें असतां, अखेरीस मन त्याचा त्यागच करील, ही गोष्ट अगदी निःसंशय आहे, म्हणूनच श्रीरामकृष्ण म्हणत, " बाबांनो, सदसद्विचार करा. निरंतर विचार केला पाहिजे व मनाला म्हटलें पाहिजे—" मना, तूं सर्वकाळ 'मी अमुक वस्त्र नेसेन, अमुक पदार्थ खाईन, अमुक मजा मारीन,' याच प्रकारच्या मनोराज्यांत गढलेला अस-

तोस. परंतु ज्या पंचभूतांपासून डाळ, तांदूळ वगैरे जिन्नस झालेले असतात, त्याच पंचभूतांपासून लाडू, जिलबी वगैरे जिन्नसहि झालेले असतात. ज्या पंचभूतांच्या हाडें, मांस, रक्त, मज्जा वगैरेंनी एखाद्या स्त्रीचें सुंदर शरीर झालेलें असते, त्यांनीच पुरुष, पशु, पक्षी वगैरेंचेहि झालेलें असतें. असें जर आहे तर मग–" मला हें पाहिजे आणि तें पाहिजे, " अशी तुझी एकसारखी धडपड उगीच कां चाललेली असते ? यांच्यापासून सच्चिदानंद लाभ व्हावयाचा नाही ! " एवढयाने जर मनाची समजूत पटली नाही तर एकदोन वेळ त्या त्या वस्तूंचा विचारपूर्वक उपभोग घेऊन त्यांचा त्याग केला पाहिजे. समजा, जिलबी खावी अशी उत्कट इच्छा मनांत उत्पन्न झाली; काय वाटेल ते केले, तरी जिलबीचा विचार मनांतून जाईनासा झाला व हजार तऱ्हेने विचार करूनहि मनाची समजूत पटेनाशी झाली; तर मग थोडीशी जिलबी आणावी व तिचे लहान लहान तुकडे करून खात खात मनाला म्हणावे–" मना, याला जिलबी म्हणतात बरे ! डाळ तांदूळ यांच्याप्रमाणेच हीसुद्धा पंचभूतापासूनच तयार झाली आहे. ही खाल्ली तर तिच्यापासून रक्त, मांस, मल, मूत्र हेच सारे तयार होतें. बरे, ही जिभेवर आहे, तोपर्यंतच काय ती इची गोडी. एकदा का घशाखाली उतरली, की तिची चव सुद्धा लक्षात राहणार नाही ! जास्ती खाल्ली तर इच्यापासून रोग उत्पन्न होईल. मग या असल्या पदार्थाबद्दल कशाला अशी लाळ घोटत बसतोस ! छे, छे, खाल्ली तेवढी आता पुरे झाली. आता जास्तीची इच्छा करूं नको. ( संन्यासी भक्तमंडळीकडे पाहून ) सामान्य लहानसान विषयांचा याप्रमाणे विचारपूर्वक उपभोग घेऊन त्याग केला तर चालतो. परंतु मोठमोठया विषयांचें असें करून चालत नाही. त्यांचा उपभोग घेऊ गेले असतां बंधनांत पडण्याची फार भीति. म्हणून मोठमोठया वासनांचा एकसारखा विचार करून, त्यांच्यामधील दोष हुडकून काढूनच त्याग केला पाहिजे. "

विवाहाचा इतका उच्च उद्देश आहे असें शास्त्रांनी सांगितल असलें, तरी किती लोक ह्या उपदेशाप्रमाणे आजकाल वागत असतात ? विवाहित जीवनांत यथासाध्य ब्रह्मचर्य पालन करून, कितीजण आजकाल स्वतःचे व समाजाचे

कल्याण साधीत असतात ? कितीशा स्त्रिया, आजकाल, आपल्या पतीच्या मागे उभ्या राहून, त्याला लोकहिताचें उच्च व्रत चालूं ठेवण्यांत—ईश्वरलाभाची गोष्ट बाजूस राहो—प्रेरणा करीत असतात ? अथवा त्याग हेंच जीवनाचें ध्येय असें जाणून, कितीसे पुरुष, आजकाल आपल्या स्त्रीला त्यागाचा उपदेश देत असतात ? हायरे भारतवर्षा ! भोग हेंच सर्वस्व मानणारा पाश्चात्यांचा जडवाद हळूहळू तुझ्या हाडींमांसीं खिळून त्यानें तुझी एखाद्या पशुसारखी कशी केविलवाणी स्थिति करून टाकली आहे, याचा एकवार विचार करून पाहा. उगीच का श्रीरामकृष्णदेव आपल्या संन्यासी भक्तमंडळींना, सध्याच्या विवाहित जीवनांतील दोष दाखवून म्हणत असत—" भोगालाच सर्वस्व अथवा जीवनाचें ध्येय समजणें हाच जर मुळांत दोष आहे, तर लग्न लागत असतां, वधुवरांच्या डोक्यावर चार अक्षता टाकल्या व फुलें उधळलीं, म्हणजे सर्व दोष नाहींसे झाले व सर्व मंगल झालें, असें होईल की काय ? " आणि खरें पाहूं गेलें असतां, विवाहित जीवनामध्ये, सध्याइतकी प्रबल इंद्रियपरता, भारतवर्षात पूर्वी कधींहि दिसून आली नसेल ! इंद्रियतृप्तीशिवाय विवाहाचा दुसरा एक महापवित्र अत्यंत उच्च असा हेतु आहे, या गोष्टीचें तर आम्हांला आजकाल स्मरणहि राहिलें नाही व म्हणून दिवसेंदिवस आम्ही पशूंहूनहि अधम होऊं लागलों आहों. त्या महापवित्र व अत्यंत उच्च अशा हेतूचें आम्हाला स्मरण करून द्यावें व आमची पशुवृत्ति आमच्यांतून नाहींशी करावी, यासाठीच भगवान् श्रीरामकृष्णदेवाचा विवाह होता !! त्यांच्या जीवनांतील इतर सर्व कार्याप्रमाणे हें विवाह-कार्य सुद्धा लोककल्याणासाठीच होतें !

श्रीरामकृष्ण म्हणत असत-" या शरीराकडून जें जे कांही केलें जातें ते ते सारे तुमच्यासाठी. मी जेव्हां सोळा प्रकार करून दाखवीन, तेव्हां कुठे तुम्ही एखादा प्रकार केलात तर कराल आणि मीच जर उभ्यानें मुतूं लागलों, तर लेकांनो, तुम्ही रिंगण धरून मुतूं लागाल ! " यासाठीच विवाहित जीवनाचा अत्यंत उदात्त आदर्श लोकांपुढे ठेवण्यासाठीच श्रीरामकृष्णांचा विवाह होता ! त्यांनी स्वतः जर विवाह केला नसता, तर विवाहित लोक

म्हणाले असते-" स्वतः केला नाही, म्हणून अशा ब्रह्मचर्याच्या गोष्टी चालल्या आहेत! पत्नी व आपण कधी एकत्र राहिले नाहीत, म्हणून ब्रह्मचर्याच्या अशा लांब लांब गप्पा चालल्या आहेत!" असें म्हणण्यास कोणाला जागा राहूं नये, म्हणून श्रीरामकृष्णांनी नुसता विवाह केला, एवढेंच नाही, तर श्रीजगदंबामातेच्या पूर्ण दर्शनाचा लाभ झाल्यानंतर, जेव्हां दिव्योन्मादावस्था त्यांच्या अंगी पूर्णपणे बाणली, तेव्हां पूर्ण यौवन प्राप्त झालेल्या आपल्या पत्नीला, त्यांनी दक्षिणेश्वरीं आणून ठेविलें; श्रीजगदंबेचा आविर्भाव तिच्यामध्ये प्रत्यक्ष पाहून तिची श्रीजगन्माता ज्ञानाने पूजा केली, आठ महिनेपर्यंत तिच्याबरोबर एकत्र वास केला; एवढेंच काय पण तिच्याबरोबर एका शय्येवर शयन सुद्धा केलें! व तिला बरें वाटावें व आनंद व्हावा म्हणून, त्यानंतर कांही वर्षे, कधी कधी कामारपुकुरांत व कधी कधी जयरामवाटीस तिच्या माहेरीं, स्वतः जाऊन ते एक दोन महिने तेथे राहून घालवूं लागले!! दक्षिणेश्वरीं, श्रीरामकृष्ण जेव्हां आपल्या स्त्रीसह एकत्र राहात असत, तेव्हांचा काल आठवून माताजी (श्रीरामकृष्णांची पत्नी) आपल्या स्त्रीभक्तांना सांगत असत,-"त्या दिवसांत ते अशा कांही दिव्य भावावस्थेंत निरंतर निमग्न असत, की तें सांगून समजावयाचें नाही. भावावस्थेच्या भरांत त्यांनी किती गोष्टी सांगाव्या, किती उपदेश द्यावा! केव्हां हसावें, केव्हां रडावें, केव्हां समाधींत निमग्न होऊन जावें! अशा रीतीने सारी रात्र घालवावी! त्या भावावस्थेचा आवेश असा विलक्षण असे की, तो पाहून माझ्या सर्वांगाला कांपरें भरें व रात्र एकदाची केव्हां सरते व दिवस उजाडतो असें मला होऊन जावें! भावसमाधि म्हणजे काय, वगैरे त्यावेळीं मला कांहीच समजत नसे. एक दिवस त्यांची समाधि किती वेळ तरी भंगेना, असें पाहून मी भीतीने रडूं लागलें व हृदयला हांक मारली; त्याने येऊन जगदंबेचें नांव त्यांच्या कानांत किती वेळ तरी उच्चारलें तेव्हां कुठे बऱ्याच वेळाने त्यांची समाधि उतरली! हें त्यांना समजल्यावर, मला पुन्हा असा त्रास होऊं नये म्हणून "अमुक प्रकारचा भाव दिसला, तर अमुक नाम कानांत उच्चारावें, अमुक भाव दिसला तर अमुक बीजमंत्राचा कानांत उच्चार करावा," हें सर्व स्वतः त्यांनी

मला शिकवून ठेवलें! तेव्हांपासून मग तितकें भय वाटत नसे व या उपायांनी ते लवकर शुद्धीवरहि येत. यानंतर अशा रीतीने अनेक दिवस लोटले तरी "केव्हां कोणत्या प्रकारची भावसमाधि लागेल," या काळजींत मी सारी रात्र जागीच असतें व मला झोप मुळीच येत नाही," हें जेव्हां त्यांच्या कानावर गेले तेव्हां त्यांनी मला दुसरीकडे–नौबत खान्यांत–निजण्यास सांगितले. परमपूज्य माताजी म्हणत असत–"समईमध्ये वात कशी ठेवावी, कोणता जिन्नस कोठे व कसा ठेवावा, आपल्या घरांतील कोण माणसें कशी आहेत, कोणाबरोबर कसे वागावे, दुसऱ्याच्या घरीं गेले तर तेथे कशा प्रकारचें वर्तन ठेवावे, या प्रकारच्या सामान्य सांसारिक विषयापासून तो भजन, कीर्तन, ध्यान, समाधि व ब्रह्मज्ञान अशा प्रकारच्या उच्च विषयांपर्यंत, सर्व तऱ्हेच्या गोष्टी त्यांनी मला समजावून सांगितल्या!" विवाहित पुरुषांनो! तुमच्यापैकी कितीजण आपापल्या धर्मपत्नींना या रीतीने शिक्षण देत असतील? समजा, की कांही कारणामुळे तो तुच्छ शरीरसंबंध बंद होण्याची पाळी आली, तर तुमच्यापैकी किती जणांचें, आपल्या पत्नीवर आजीवन, निस्वार्थी प्रेम, कायम राहूं शकेल? म्हणूनच म्हणतो, की श्रीरामकृष्णांनी विवाह करून पत्नीशीं एक दिवस सुद्धा शरीरसंबंध न ठेवतां, प्रेमळ आचरणाचा हा जो अदृष्टपूर्व व अद्भुत प्रकार स्वतः आचरून दाखविला, तो केवळ तुमच्यासाठी! इंद्रियपरायणतेशिवाय विवाहाचा दुसरा एक उच्च उद्देश आहे, असें तुम्हांलाच शिकवावें म्हणून आणि या उच्च ध्येयाकडे दृष्टि स्थिर ठेवून, तुम्ही विवाहित जीवनांत, यथासाध्य ब्रह्मचर्य पाळून स्वतः धन्य व्हावे आणि बुद्धिमान्, तेजस्वी व गुणवान् अशा संतानांस जन्म देऊन, भारतवर्षाच्या सध्यांच्या हतवीर्य, निस्तेज व बलरहित अशा समाजाला वीर्यवान्, सतेज, बलवान् करावे म्हणून त्यांनी विवाह केला! जी गोष्ट श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, बुद्ध, श्रीशंकर, श्रीचैतन्य वगैरे पूर्वीच्या अवतारांसहि करून दाखविण्याचें प्रयोजन पडलें नव्हतें, तीच गोष्ट सध्या अवश्य झाली व ती सांप्रत युगावतार भगवान् श्रीरामकृष्णदेव यांना करून दाखविणें भाग पडलें!

आजीवनव्यापी कठोर तपस्या व साधना यांच्या बळावर, विवाहित जीवनाचा हा अदृष्टपूर्व व अद्भुत सांचा, जगामध्ये प्रथमच तयार झाला आहे आणि श्रीरामकृष्ण म्हणत असत त्याप्रमाणे—“ सांचा तयार झाला आहे, तुम्ही आपापलीं जीवनें, या आदर्श सांचांत घाला आणि त्यांना नवीन तऱ्हेचा आकार द्या ! ”

यावर कदाचित् कोणी म्हणेल की-“ पण ही गोष्ट कांही सर्वांनाच शक्य नाही. ” खरें आहे. ही गोष्ट श्रीरामकृष्णांनाहि समजत नसेल असें नाही पण हें त्यांना ठाऊक होतें की, आपण स्वतः जेव्हां सोळा भाग प्रत्यक्ष आचरून दाखवावे, तेव्हां कुठे लोक एखादा भाग आचरण्याचा प्रयत्न करतील आणि म्हणून स्त्रीसह राहून अखंड ब्रह्मचर्याचे पालन करणें, सर्वांनाच साध्य नसलें तरी, हा उच्च आदर्श सर्वांपुढे असल्यास लोक निदान त्या दिशेने प्रयत्न तरी करतील, म्हणूनच त्यांनी हें असिधाराव्रत प्रत्यक्ष आचरून दाखविलें.

आणखी एका गोष्टीचा विचार करून हें विवाह प्रकरण संपवूं. रूप रसादि विषयांचे दास, बहिर्मुख मानव, अजूनहि कदाचित् म्हणतील-“ पण काहो, श्रीरामकृष्णांनी जर विवाह केला होता, तर एखादा पुत्र जन्मल्यानंतरच त्यांनी पत्नीचा शरीरसंबंध तोडावयाचा होता ! त्यांनी तसं केलं असतें, म्हणजे ईश्वराच्या सृष्टीचें रक्षण करणें, हेंच मनुष्यमात्राचे कर्तव्य आहे, असें त्यांनी दाखविल्यासारखे झाले असतें व त्याबरोबरच शास्त्राची मर्यादाहि राखल्यासारखे झाले असतें ! कारण विवाह करून एका पुत्राला तरी जन्म द्यावा, म्हणजे पितृऋणांतून मनुष्य मुक्त होतो असें शास्त्र सांगतें. ”

या प्रश्नावर आम्ही विचारतों—“ प्रथमतः तुम्ही असं सांगा की, सृष्टि म्हणून जी कांही आहे ती आपण जेवढी पाहतों अथवा ऐकतों अथवा जिचा विचार करितों, तेवढीच आहे की काय; वैचित्र्य हाच तर सृष्टीचा नियम आहे. समजा की, आज या घटकेपासून, आपण सर्व माणसें एकाच प्रकारचें

काम करूं लागलों आणि एकाच प्रकारचा विचार करूं लागलों, तर सृष्टीचा तेव्हांच नाश होऊन जाईल! हें जर खरें असेल, तर आता तुम्हांला असें विचारतों, की सृष्टीचें रक्षण करण्याचे सर्व नियम तुम्हांला समजले आहेत काय? आणि या सृष्टीचें रक्षण करण्याची जबाबदारी तुम्हीं आपल्या डोक्यावर घेतली असल्यामुळेच, तुम्ही आज असे ब्रह्मचर्यविहीन व निस्तेज झालां आहां की काय! याचा तुम्ही आपल्या मनाशीं विचार करा अथवा क्षणभर असें धरून चालूं की, सृष्टिरक्षणाचा हा एक नियम आहे व तो तुम्ही पालन करीत आहां पण दुसऱ्यानें सुद्धा ह्याच नियमाचें पालन करावें असा तुमचा आग्रह कां? ब्रह्मचर्याचें रक्षण करण्यासाठीं आणि उच्च दर्जाच्या मानसिक शक्तीच्या विकासासाठी, सामान्य विषयांत शक्तिक्षय न करणें हाहि एक सृष्टींतलाच नियम आहे! सगळेच जर तुमच्यासारखे हीन दर्जाच्या शक्तिविकासांतच गढून राहूं लागले, तर उच्च दर्जाचा आध्यात्मिक शक्तिविकास दाखविण्यास कोण शिल्लक राहील? आणि मग त्याचा लोप झाल्याशिवाय कसा राहील?

दुसरी गोष्ट—आमचा स्वभावच असा आहे की आपल्याला अनुकूल असतील तेवढयाच गोष्टी शास्त्रांतून नेमक्या निवडून काढावयाच्या व बाकीच्यांच्याकडे दुर्लक्ष करावयाचें. पुत्रोत्पादन हीहि एक अशीच अनुकूल-सिंधूतून निवडून काढलेली गोष्ट आहे. कारण, अधिकार पाहून शास्त्रांनी असेंहि सांगितलें आहे की—

यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्।

'ज्या क्षणीं संसाराविषयीं वैराग्य उत्पन्न होईल, त्याच क्षणीं संसाराचा त्याग करावा.' मग श्रीरामकृष्ण जर तुमच्या मताप्रमाणे चालले असते तर, या शास्त्रवचनाची मर्यादा तरी त्यांना कशी रक्षण करतां आली असती? पितृऋण फेडण्यासंबंधीहि हीच गोष्ट. शास्त्र सांगतें की यथार्थ संन्यासी आपल्या सात पूर्वजांचा व सात वंशजांचा आपल्या पुण्याईच्या बलाने उद्धार करतो. असें

म्हणतात ना, 'बुडत्याला काडीचा आधार,' त्याप्रमाणे चंद्रादेवींना वाटलें, की इतकीं ठिकाणें पाहिलीं, तसें एकदा तेथेहि जाऊन पाहून आलें तर! म्हणून त्यांनी त्या गावीं चौकशी करण्यासाठी कुणाला तरी पाठविलें, गेलेल्या मनुष्याने चौकशी करून येऊन सांगितले की, "बाकीच्या सगळ्या गोष्टी कशाहि असोत मुलगी मात्र फारच लहान आहे. नुकतें सहावें वर्ष लागलें आहे." पण दुसरीकडे कोठे जमण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां चंद्रामणीदेवींनी तीच मुलगी पसंत, केली. लवकरच मुहूर्त निश्चित झाला आणि त्या दिवशीं रामेश्वर आपल्या भावाला घेऊन जयरामवाटीस गेले व तेथे विवाहाचा समारंभ पूर्ण करून तो संपल्यावर आपल्या भावासह परत घरीं आले. ही गोष्ट इ. स. १८५९।६० मध्ये वैशाख वद्य पक्षांत घडली. श्रीरामकृष्णांना तेव्हां चोवीसावें वर्ष लागलें होते.

आपल्या मुलाचे चार हात झालेले पाहून, चंद्रामणीदेवींचा जीव खाली पडला व आता आपल्या मुलाचे संसारांत थोडें फार लक्ष लागूं लागेल, अशी त्यांच्या मनांत आशा उत्पन्न झाली व त्यांचें मन बरेंचसें शांत झाले. परंतु मांडवशोभेसाठी, वधूच्या अंगावर घालण्याकरितां गावच्या जमीनदाराकडून आणलेले दागिने आता परत दिले पाहिजेत, हा विचार त्यांच्या मनांत आल्याबरोबर मात्र, आपल्या दरिद्री संसाराचें चित्र त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिलें! लग्न झाल्या दिवसापासून सूनबाईला त्यांनी आपल्या घरीं आणलें होतें व तिला त्या दिवसापासून त्यांनी अत्यंत प्रेमाने वागविण्यास सुरवात केली होती. तेव्हां आता तिच्या अंगावरील अलंकार कसे काढून घ्यावे हाच त्यांच्या जिवाला मोठा घोर लागला. ही गोष्ट त्यांनी कोणापाशीहि उच्चारली नव्हती. तरी ती गदाधराच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाही. त्याने दोनचार गोष्टी सांगून आपल्या मातेचें सांत्वन केलें व एके रात्रीं आपल्या पत्नीला झोप लागली असतां, तिच्या अंगावरील दागिने, तिला न समजतां, हळूच युक्तीने काढून आणून, आपल्या मातेपुढे ठेविले व तिने दिवस उजाडतांच ते दागिने जिकडचे

तिकडे पोहोचते केले ! पण एवढ्यावरच भागलें नाही. सकाळीं उठल्यावर, आपल्या अंगावर दागिने नाहीत असें दिसतांच, त्या बालिकेनें सासूस विचारलें, —" काल मी जे दागिने घातले होते ते कुठे आहेत ? " हें ऐकून चंद्रादेवीस गहिवर आला व मुलीला मांडीवर घेऊन तिचे सांत्वन करीत त्या म्हणूं लागल्या, " मुली, माझा गदाधर तुला यापेक्षा सुद्धा छान छान दागिने करील बरं !" त्याच दिवशी मुलीचा चुलता तिला भेटण्यासाठी म्हणून तेथे आला होता, त्याला ही दागिन्यांची हकीगत समजतांच तो रागारागानें मुलीला घेऊन जयरामवटीस निघून गेला ! चंद्रादेवीना यामुळे अधिकच दुःख झाले पण श्रीरामकृष्णांनी " आता कांही का होईना, झालेले लग्न तर कांही कुणी रद्द करत नाहीना ? मग काय ? "—वगैरे गोष्टी सांगून आपल्या मातेचें दुःख नाहीसें केलें.

विवाहानंतर सुमारे सहा सात महिनेपर्यंत श्रीरामकृष्ण कामारपुकुरास होते. घरच्या स्थितीकडे लक्ष देऊन व आता येथे बरेच दिवस झाले आहेत असा विचार करून, त्यांनी कलकत्त्यास परत जाण्याचा बेत केला. मातेला हा विचार पसत पडला नाही. कारण आता कुठे याचा वायुरोग बरा होत आहे, तोच हा जर परत गेला व रोगाने पुन्हा उचल खाल्ली, तर कसें होईल, ही काळजी तिला होती. परंतु तिची कशीबशी समजूत घालून व तिचा निरोप घेऊन श्रीरामकृष्ण दक्षिणेश्वरीं परतले व आपल्या कामावर रुजूं झाले ( १८६०-६१ ).परत आल्यास थोडेसे दिवस लोटतात, तोच आपल्या पूजेच्या कामांत ते पुन्हा इतके तन्मय होऊन गेले की, आई, भाऊ, स्त्री, संसार, आपली स्थिति, कामारपुकुरच्या सर्व गोष्टी, वगैरे ते अजीबात विसरून गेले ! ! जगदंबेचें सदासर्वकाळ दर्शन कसें होईल, हा एकच विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला ! रात्रंदिवस नामस्मरण, मनन, जप, ध्यान ह्यांतच निमग्न होऊन राहूं लागल्यामुळे त्यांचें वक्षःस्थल, पुन्हा सर्वकाळ आरक्त दिसूं लागलें ! सांसारिक सर्व गोष्टी पुन्हा विषासारख्या वाटूं लागल्या ! साऱ्या अंगाचा पुन्हा विलक्षण

दाह होऊं लागला आणि डोळ्यावरून झोप पुन्हा कोठल्या कोठे नाहीशी होऊन गेली ! एवढेंच की, अशा प्रकारच्या अवस्थेचा त्यांना एकदा अनुभव आलेला होता म्हणून ते यावेळीं पहिल्यासारखे गडबडून गेले नाहीत.

हृदयच्या तोंडून असे ऐकण्यांत आले आहे, की श्रीरामकृष्णांची पुन्हा उन्मादावस्था झालेली पाहून, मथुरबाबूंनी त्यांचा गात्रदाह व अनिद्रा यांवर गंगाप्रसाद सेन यांचे औषध पुन्हा सुरू केलें. औषधापासून ताबडतोब गुण दिसून आला नाही. तरी पण एवढयानेच निराश न होतां, हृदय श्रीरामकृष्णांना घेऊन गंगाप्रसादांच्या घरीं वरचेवर जाऊं लागला. श्रीरामकृष्ण सांगत असत की—“ एक दिवस गंगाप्रसादांनी विशेष लक्ष लावून परीक्षा केली व निराळेंच एक औषध सुरू केले. त्या दिवशीं तेथे पूर्व बंगाल्यांतील एक वैद्य आले होते, श्रीरामकृष्णांची त्यांनीहि परीक्षा करून म्हटलें, “ त्यांच्या लक्षणांवरून यांना देवोन्माद झाला असावा असें वाटतें. यांची व्याधि योगाभ्यासापासून उत्पन्न झालेली आहे आणि यांना औषधापासून कांही उपयोग होणार नाही. ” व्याधी-सारख्या दिसणाऱ्या माझ्या सर्व शारीरिक विकारांचें खरें कारण, प्रथम त्याच वैद्यांनी ओळखलें. परंतु त्यांच्या सांगण्यावर कोणाचाहि विश्वास बसेना.

दिवसामागून दिवस जाऊं लागले. मथुरबाबू व श्रीरामकृष्णांवर प्रेम असणारी इतर मंडळी आपल्याकडून प्रयत्नांची शिकस्त करूं लागली. परंतु रोग कमी न होतां हळूहळू वाढतच चालला.

थोडयाच दिवसांत ही बातमी कामारपुकूरास पोहोचली, बिचाऱ्या चंद्रादेवी ! आपल्या प्रिय गदाधराचा रोग पुन्हा वाढला, ही बातमी ऐकून त्यांची स्थिति एखाद्या वेडयासारखी झाली. त्यांचें संसाराकडे लक्षच लागेना व अशा उद्विग्न स्थितींत असतां, निराशेच्या भरांत, त्यांनी आपल्या प्रिय पुत्राच्या कल्याणासाठी महादेवापाशी धरणें धरण्याचा निश्चय केला व तेथील “ म्हाताऱ्या शंकराच्या ” देवळांत जाऊन, त्या प्रायोपवेशन करूं लागल्या !

परंतु तेथे त्यांना असा दृष्टांत झाला की, " तूं मुकुंदपुरच्या महादेवापुढे धरणें धरून बस, म्हणजे तुझी इच्छा पूर्ण होईल." तेथून उठून त्या मुकुंदपुरच्या शिवालयांत जाऊन, प्रायोपवेशन करूं लागल्या. दोन तीन दिवस लोटल्यावर, एका रात्रीं शंकराने स्वप्नांत येऊन त्यांना सांगितलें-" भिऊं नको, तुझ्या मुलाला वेड लागलें नाही व कांही रोगहि झाला नाही. ईश्वरदर्शनाच्या व्याकुळतेनें त्याची अशी अवस्था झाली आहे. " धर्मपरायण व श्रद्धाळू चंद्रामणीदेवींची चिंता या स्वप्नाने बरीचशी दूर झाली. असो-

या दिवसांत ईश्वरदर्शनाची केवढी प्रचंड तळमळ त्यांच्या अंतःकरणाला लागली होती, यासंबंधाने श्रीरामकृष्ण आम्हांला सांगत-" साधारण जीवाच्या शरीरांत व मनांत, तशा प्रकारची दूरच राहो, पण त्याच्या एक चतुर्थांश खळबळ जर उत्पन्न झाली, तर शरीर तेव्हांच नष्ट होऊन जाईल ! दिवसा, रात्रीं, सर्वकाळ जगन्मातेचें कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने दर्शन झाले तर बरे, नाहीतर प्राण असा कासावीस होऊन जाई, की आता प्राण जातो असें वाटे ! येथून पुढे, पुरीं सहा वर्षेपर्यंत एक दिवस सुद्धा झोप कशी ती आली नाही ! डोळ्याच्या पापण्यांतील जीवच नाहीसा होऊन गेला होता व मनांत आणलें तरी पापण्या मिटवितां येत नसत ! वेळाचें भान नाहीसें झालें होतें व शरीराची जाणीव पार नष्ट होऊन गेली होती ! मातेच्या चरणांवरून एखादे वेळीं शरीराकडे थोडेंसें लक्ष जाई; तेव्हां फार भय वाटे, मनांत येई मला वेडबीड तर लागलें नाहीना ? आरशासमोर उभे राहून डोळ्यांत बोट घालावें व पापण्या पडतात की नाही तें पाहावें, पण काय ? बुबुळाला बोट लागलें तरी पापण्या जशाच्या तशाच ! हे पाहून फार भीति वाटावी व रडत रडत म्हणावें, " आई ! तुझी एकाग्र चित्ताने इतकी भक्ति केल्याचें व तुझ्यावर इतका पूर्ण विश्वास ठेवल्याचे मला हे फल दिलेंस कां ग ? पण मग लगेच पुन्हा म्हणावें, "आई ! तुझी जशी इच्छा असेल तसें होऊं दे, शरीर जावयाचें असेल तर जाऊं दे, तूं मात्र मला टाकून कुठे जाऊं नकोस. मला दर्शन दे, माझ्यावर कृपा कर, तुझ्याशिवाय मला दुसरें कोण

आहे बरें आई?" अशा रीतीने रडतां रडतां, मनांत पुन्हा विलक्षण उत्साह उत्पन्न व्हावा, शरीर म्हणजे कःपदार्थ असें वाटूं लागावें व कांही वेळांत जगन्मातेचें दर्शन होऊन व तिचें बोलणें ऐकून मन शांत व्हावें!"

याच सुमारास, मथुरानाथांना श्रीरामकृष्णांच्या शरीरांत श्रीशंकराचे व कालीमातेचे दर्शन झाले, याचे सविस्तर वर्णन "श्रीरामकृष्ण व मथुरानाथ" या प्रकरणांत आलें आहे. हें दर्शन झाल्यापासून मथुरानाथ श्रीरामकृष्णांकडे निराळ्याच दृष्टीने पाहूं लागले व त्यांच्या मनांतील त्यांच्याविषयींची भक्ति व श्रद्धा अधिकच वाढली. साधक अवस्थेंत, मथुरानाथांसारखा एखादा धनवान् व श्रद्धासंपन्न तेजस्वी भक्त श्रीरामकृष्णांना अवश्य पाहिजेच होता व म्हणूनच या दोघांचा इतका अद्भुत प्रेमसंबंध जगन्मातेने घडवून आणला, असें तर नसेल? कोणी सांगावें? श्रीरामकृष्णांच्या जीवनांत इतक्या कांही अचिंत्य गोष्टी घडून आल्या आहेत, की त्या सहजासहजी घडलेल्या असाव्यात असें म्हणण्याला मन धजत नाही. मथुरानाथ व श्रीरामकृष्ण यांचा अलौकिक प्रेमसंबंध ही अशीच अचिंत्य गोष्ट आहे. दुसरी एक-भैरवी ब्राह्मणीचे दक्षिणेश्वरी आगमन ही आहे. कथानुक्रमाने ह्याच गोष्टीची सविस्तर हकीगत पुढील प्रकरणांत सांगण्याचें योजिलें आहे.

# २०. भैरवी ब्राह्मणींचें आगमन

## ( १८६१–६२ )

" तिचे मोकळे सुटलेले केस आणि वात्सल्यभावाने झालेली विव्हल अवस्था पाहून, लोकांना—' ही गोपाल–विरहाने व्याकुळ झालेली नंदराणी यशोदाच आहे की काय,' असे वाटे ! "

—श्रीरामकृष्ण

विवाह करून परत आल्यावर थोडयाच दिवसांत, श्रीरामकृष्णांच्या आयुष्याशीं बराच संबंध असलेल्या दोन गोष्टी घडून आल्या. १८६१ च्या आरंभीं राणी रासमणी ग्रहणी रोगानें आजारी पडली. श्रीरामकृष्णांच्या सांगण्यांत असें आलें आहे की, एक दिवस सहज फिरत असतां, राणी एकाएकी जमीनीवर पडली व तिचें अंग बरेचसें ठेचलें. त्याच दिवशी तिला खूप ताप भरला, साऱ्या अंगाला ठणका लागला आणि तीन चार दिवसांतच तिला ग्रहणी रोग झाला.

मागे सांगितलेंच आहे की, दक्षिणेश्वरचें काली-मंदिर तयार झाल्यावर त्यांत ३१ मे १८५५ रोजीं श्रीजगदंबेची प्राणप्रतिष्ठा झाली. देवालयाची सर्व व्यवस्था सुरळित चालावी, कोठे कांही न्यून पडूं नये, या हेतूने, तिने याच वर्षी २९ ऑगस्ट रोजी २,२६००० रुपयांस, दिनाजपूर जिल्ह्यांत कांही जमीन खरेदी केली. त्या जमीनीचें कायद्याप्रमाणे व्यवस्थेशीर दानपत्र करण्याचें तिच्या मनांत असूनहि, अनेक कारणामुळे, तें काम कित्येक दिवस तसेंच राहून गेलें. ग्रहणी रोगाने तिने आंथरूण धरल्यावर, या गोष्टीचा निकाल लावण्याची

तिच्या मनाने पुन्हा उचल खाल्ली. तिच्या चार मुलींपैकी दुसरी श्रीमती कुमारी व तिसरी श्रीमती करुणामयी, या कालीमंदिर पूर्ण होण्याच्या अगोदरच मृत्यु पावल्या होत्या. अर्थातच, या तिच्या अखेरच्या दुखण्यांत, तिच्याजवळ सर्वांत वडील श्रीमती पद्ममणी व सर्वांत कनिष्ठ श्रीमती जगदंबा याच मुली होत्या. असो. दानपत्र तयार होऊन आल्यावर, पुढे या संपत्तीबद्दल तंटे ऊपस्थित होऊं नयेत म्हणून राणीने-" हे दानपत्र आम्हांस मान्य आहे-" अशा आशयाचें समतिपत्र तयार करवून त्यावर आपल्या दोन्ही मुलींना सही करण्यास सांगितले. जगदंबा दासीने सही दिली. परंतु वडील मुलगी पद्ममणी इने मात्र सही दिली नाही. या कारणानें मृत्युशय्येवरहि राणीच्या जीवाला शांतता नव्हती. अखेरीस श्रीजगदंबेची जशी इच्छा असेल तसें होईल, असें आपल्या मनाचें समाधान करून राणीने दानपत्रावर अठरा फेब्रुवारी १८६१ रोजीं स्वत:ची सही केली. त्याच्याच दुसऱ्या दिवशीं, म्हणजे १९ फेब्रुवारी रोजीं तिचा रोग वाढला व त्याच दिवशीं तिचें प्राणोत्क्रमण झालें.

श्रीरामकृष्ण सांगत असत-" अखेरच्या दिवसांत राणी रासमणी गंगातीरावरील आपल्या वाड्यांत राहण्यास आली होती. तिचें देहावसान होण्याचे एकदोन दिवस अगोदर, एका रात्रीं तिचें लक्ष जवळपास लावलेल्या दिव्याकडे गेलें. त्याबरोबर ती एकदम म्हणाली, " हे सारे दिवे येथून काढून टाका ! ही सारी रोषनाई मला नको, आता ही पहा जगन्माताच इथे आली आहे ! तिच्या अंगाची प्रभा पाहा, कशी चोहोकडे फांकली आहे !" थोडें थांबून ती पुन्हा म्हणाली, " आई आलीस ? पद्मेने सही दिली नाही, आता कसें होईल आई ? " यावरून असें वाटतें की, रोगापेक्षा या चिंतेचाच तिच्या मनावर अधिक परिणाम झाला होता. असो.

कालीमंदिरांत श्रीजगदंबेची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून तेथील सर्व व्यवस्था मथुरानाथच पाहात असत. अर्थातच राणीच्या मृत्यूनंतरहि तेथील व्यवस्था पूर्वीप्रमाणे तेच पाहूं लागले. अगोदरपासूनच त्यांचे श्रीरामकृष्णांवर अत्यंत

प्रेम होतें. त्यांतच, राणीच्या मृत्यूने देवालयाची सर्व व्यवस्था आता त्यांच्या एकट्याच्या हातांत आली, यामुळे श्रीरामकृष्णांना साधनाकाळीं लागणारें हर-एक प्रकारचें साहाय्य देण्यास, त्यांना पूर्ण अवसर सापडला. एवढया अलोट संपत्तीचे मालक होऊन सुद्धा, त्यांची प्रवृत्ति कुमार्गाकडे वळली नाही व श्रीराम-कृष्णांना हरतऱ्हेने साह्य करण्यांत त्यांना धन्यता वाटूं लागली, यावरून त्यांचें भाग्य केवढें होतें, याची कल्पना करावी. असो.

श्रीरामकृष्णांच्या उच्च आध्यात्मिक अवस्थेची कल्पना ह्या वेळेपर्यंत फारच थोडयांना होती. बहुतेक लोक तर त्यांना " माथेफिरू " " वेडा " असेंच समजत. ज्या माणसाला स्वतःचे हिताहित कळत नाही, ज्याला कोण-त्याहि सांसारिक गोष्टीचा उल्हास नाही, राणी रासमणी व मथुरानाथ यांची वहाल मर्जी असूनहि, जो स्वतःचा कांहींच फायदा करून घेत नाही—अशा माणसाला, त्यांनी तरी दुसरें काय म्हणावें ? सर्वांना एवढे मात्र दिसें की, या वेडया माणसांत कांही अजब मोहिनी भरली आहे व तिच्या योगाने हा ज्याला त्याला हवासा वाटतो. बहुतेकांची अशी समजूत असली, तरी मथुरानाथ म्हणत– " यांच्यावर श्रीजगदंबेची कृपा झाली आहे, म्हणूनच यांचे वागणें एखाद्या उन्मत्तासारखें दिसतें. "

राणी रासमणीच्या मृत्यूनंतर लवकरच, श्रीरामकृष्णांच्या जीवनांत अत्यंत महत्त्वाची अशी एक दुसरी गोष्ट घडून आली. दक्षिणेश्वरीं कालीमंदिराच्या आवारांत पश्चिमेच्या बाजूला गंगेच्या काठावर, त्या वेळीं एक सुंदर फुलबाग होती. त्या बागेंत नाना तऱ्हेचीं फुलझाडें असून, त्यांच्या सुगंधाने दशदिशा दरवळून जात. या फुलबागेंत श्रीरामकृष्ण नित्यनेमाने जात व श्रीजगदंबेच्या हारासाठी फुले जमा करीत. बागेंतूनच गंगेवर उतरण्यासाठी पायऱ्या बांधल्या होत्या. जवळच बायकांसाठी म्हणून निराळा घाट बांधला होता. त्या घाटावर एक बकुळीचा मोठा वृक्ष असे, म्हणून त्या घाटाला " बकुळतलाचा घाट " असें म्हणत.

एका प्रातःकाळीं या फुलबागेंत फुलें तोडीत असतां, एक नौका बकुळ-तलाच्या घाटाजवळ येत असलेली श्रीरामकृष्णांना दिसली. ती नौका घाटाजवळ थांबली आणि तींतून पुस्तकें वगैरे असलेलें एक गाठोडें हातांत घेऊन एक स्त्री उतरली व दक्षिणेच्या बाजूच्या घाटावर असलेल्या घराकडे जाऊं लागली. त्या स्त्रीचे केस लांब सडक असून ते मोकळेच होते. तिचा वेश भैरवीचा होता व तिने भगवें वस्त्र परिधान केलें होतें. तिचें वय अंदाज चाळीस वर्षांचें असून तिचें रूप इतकें अलौकिक होतें की, हिचें इतके प्रौढ वय असेल असें कोणासहि वाटत नसे. तिला पाहिल्याबरोबर एखादें आपलें माणूस जसें दृष्टीस पडावे, तशी स्थिति श्रीरामकृष्णांची झाली. ते लगेच आपल्या खोलींत परतले व हृदयला म्हणाले–" हृदू, त्या घाटावर आता इतक्यांत एक भैरवी आलेली आहे, तिला इकडे घेऊन ये, जा." हृदय म्हणाला—" पण मामा, ती स्त्री अनोळखी. तिला बोलावून, ती उगीच कशी इकडे येईल?" श्रीरामकृष्ण म्हणाले–" तिला मी बोलावलें आहे म्हणून सांग, म्हणजे येईल." त्या अनोळखी संन्यासिनीची भेट घेण्याचा आपल्या मामांचा हा आग्रह पाहून, हृदयला फार आश्चर्य वाटलें, पण करतो काय? मामांची आज्ञा पाळलीच पाहिजे. म्हणून लगेच त्या घाटावर गेला व " माझे मामा मोठे ईश्वर-भक्त आहेत, त्यांनी तुमचें दर्शन घेण्यासाठी तुम्हांला बोलाविलें आहे." असें त्या भैरवीला म्हणाला. हें ऐकतांच हृदयला कांही एक प्रश्न न करितां, ती संन्यासिनी उठली व त्याच्याबरोबर येण्यास निघाली! हें पाहून तर त्याच्या आश्चर्याला सीमाच उरली नाही!

हृदयबरोबर ती संन्यासिनी श्रीरामकृष्णांच्या खोलींत आली व त्यांना पाहतांच तिला इतका आनंद झाला, की तो गगनांत मावेना! तिचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले व ती म्हणाली, " बाबा! एकूण तूं इथे होतास तर! कोठे तरी गंगेच्या काठीं तूं आहेस, असें समजल्यावरून मी इतके दिवस तुला धुंडीत होतें. अखेरीस तूं इथे सापडलास!"

बालकस्वभाव श्रीरामकृष्णांनी विचारलें, “ पण आई, माझी हकीकत तुला कशी समजली बरे ? ” संन्यासिनी म्हणाली, “ तुम्हां तिघांच्या भेटी होणार असल्याचें, श्रीजगदंबेच्या कृपेने मला मागेच समजलें होतें. बाकीच्या दोघांच्या भेटी पूर्व बंगाल्यांत मागेच झाल्या आणि आता इथे तुझीहि भेट झाली ! ”

नंतर एखादें लहान मूल जसें आपल्या आईजवळ बसून लडिवाळपणाने तिच्याशीं गप्पागोष्टी करीत असतें, त्याप्रमाणे त्या सन्यासिनीच्या जवळ बसून श्रीरामकृष्ण नानातऱ्हेच्या गोष्टी बोलूं लागले. आपल्याला कोणती कोणती अलौकिक दर्शनें प्राप्त झाली; ईश्वराच्या चिंतनाने आपलें बाह्यज्ञान कसें नष्ट होत असतें, आपल्या अंगाचा कसा एकसारखा दाह होत असतो; आपली झोप कशी नाहीशी झाली आहे; वगैरे साऱ्या गोष्टी ते मन मोकळें करून तिला सांगूं लागले व विचारूं लागले, “ माझी ही अशी अवस्था कां बरे झाली आहे ? खरोखरच मला वेड लागलें आहे का ग आई ? आणि जगदंबेची अगदी मनापासून भक्ति क[illegible] खरंच एखादा रोग झाला आहे का ग ? ” श्रीरामकृष्णांच्या तोंडून या साऱ्या गोष्टी ऐकत असतां, तिचें अंतःकरण आनंदाने उचंबळत होतें. श्रीरामकृष्णांची हकीगत संपल्यावर ती मोठ्या वात्सल्याने श्रीरामकृष्णांस म्हणाली, “ बाबा, तुला कोण वेडा म्हणतो ? हें वेड नव्हें, हा **महाभाव** आहे, म्हणूनच तुझी अशी अवस्था झाली आहे. ही अवस्था समजणें तरी कुणाला शक्य आहे काय ? म्हणूनच ते बिचारे तुला वेडा म्हणतात ! अशी अवस्था झाली होती एक श्रीमती राधेची व दुसरी श्रीचैतन्य महाप्रभूंची ! ! ह्या सर्व गोष्टी भक्तिशास्त्रांत आहेत. माझ्या जवळ त्या साऱ्या पोथ्या आहेत. त्यांवरून मी तुला असें दाखवून देईन की, जे कोणी अगदी अंतःकरणपूर्वक ईश्वराची भक्ति करतात, त्यांचीच अशी अवस्था होत असते ! ”

हृदय जवळच उभा होता. त्या दोघांचा हा सारा संवाद ऐकून व त्यांचें एकमेकांशीं अगदी ओळखीच्या माणसासारखें वर्तन पाहून, तो आश्चर्याने चकित होऊन गेला !

अशा रीतीने मोठया आनंदांत कांही वेळ गेल्यावर, आता बराच उशीर झाला हें पाहून, श्रीरामकृष्णांनी देवीचा प्रसाद, फळें, मिठाई वगैरे आणवून, तो त्या संन्यासिनीला दिला. तिने त्यांतील कांही भाग ग्रहण केला. श्रीरामकृष्णांनी तिच्यावरोबर फिरून, तिला सर्व मंदिर दाखविलें. देवदर्शन व फराळ झाल्यावर, आपल्या मुखांत ठेवलेल्या रघुवीरशिलेच्या नैवेद्यासाठी तिने कोठींतून शिधा-सामुग्री घेतली व स्नान वगैरे आटोपून, पंचवटीखाली स्वयंपाकास सुरुवात केली.

स्वयंपाक तयार झाल्यावर, तिने आपल्या तोंडांतली रघुवीरशिला काढली व तिच्यापुढे नैवेद्याचें ताट वाढून ठेऊन आपण ध्यानस्थ बसली. त्या ध्याना-मध्ये तिला एक अपूर्व दर्शनाचा लाभ झाला व त्यायोगें तिची समाधि लागली. तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रुधारा वाहूं लागल्या व तिचें बाह्यज्ञान अजीबात नष्ट झालें ! इकडे श्रीरामकृष्ण आपल्या खोलींत बसले असतां त्यांना त्याच वेळीं पंचवटीकडे येण्याची अत्यंत उत्कट इच्छा उत्पन्न झाली. ते उठले व पंचवटीकडे येत असतां, वाटेतच त्यांना भावावस्था प्राप्त झाली. त्या अवस्थेंतच ते तेथे पोहोचले व आपण काय करतों याचे बिलकुल भान न राहून ते त्या रघुवीर शिलेपुढील नैवेद्य खाऊं लागले ! कांही वेळाने ब्राह्मणीची समाधि उतरली व भावावेशांतील श्रीरामकृष्णांची हि कृति पाहून विस्मयाने व आनंदाने तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले ! आणखी कांही वेळाने श्रीरामकृष्णहि भानावर आले व आपल्या हातून हें काय घडलें याचें त्यांनाहि आश्चर्य वाटून ते म्हणाले, " ही विलक्षण गोष्ट माझ्या हातून कशी झाली बुवा ? मला तर कांहीच समजत नाही ! " हें ऐकून ब्राह्मणी त्यांना आईप्रमाणे धीर देऊन म्हणाली, " बाबा, तूं ठीक केलेस. ही गोष्ट तूं केली नाहीस, तर तुझ्यामध्ये जो कोणी आहे त्याने केली आहे. मी आताच ध्यानस्थ बसले असतां जें कांही पाहिलें, त्यावरून ही गोष्ट कोणी केली व कां केली, हें मला पूर्णपणे कळून आलें आहे. मला आता पूर्वीप्रमाणे पूजा करण्याची आवश्यकता राहिली नाही, इतके दिवस पूजा केल्याचें आज सार्थक झालें ! " असें म्हणून कांही एक संकोच न करतां,

ब्राह्मणीने श्रीरामकृष्णांच्या पानांतील राहिलेले अन्न, देवप्रसाद म्हणून भक्षण केलें! श्रीरामकृष्णांच्या शरीरांत श्रीरघुवीराचा आविर्भाव प्रत्यक्ष पाहून, तिचें अंतःकरण भक्तीने व प्रेमाने भरून आलें, कंठ दाटून आला, डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले व त्याच अवस्थेत असतां, इतके दिवस पूजिलेल्या श्रीरघुवीर शिलेला तिने गंगेमध्ये जलसमाधि दिली!

पहिल्याच दिवशीं उत्पन्न झालेलें त्या दोघांच्या मनांतील प्रेम व वात्सल्यभाव दिवसेंदिवस अधिकाधिक वाढूं लागला व ब्राह्मणी दक्षिणेश्वरींच राहूं लागली. ईश्वरविषयक गोष्टींत व इतर आध्यात्मिक विषयांच्या चर्चेत, दोघांचे दिवसामागून दिवस कसे निघून चालले, याचें त्यांना भानहि राहिनासें झाले. श्रीरामकृष्णांनी आपली आध्यात्मिक दर्शनें व अवस्था यासंबंधी सर्व गूढ गोष्टी मोकळ्या मनाने ब्राह्मणीस सांगाव्या व त्यासंबंधीं नानातऱ्हेचे प्रश्न विचारावे व ब्राह्मणीने नाना प्रकारच्या तंत्रग्रंथांच्या आधाराने उत्तरें देऊन, त्यांचें समाधान करावे व कधी कधी चैतन्य भागवत व चैतन्य चरितामृत या ग्रंथांतील उतारे वाचून दाखवून ईश्वरप्रेमाच्या प्रबल वेगाने अवतारिक पुरुषांच्या देह-मनामध्ये कशा प्रकारचीं लक्षणें व विकार उत्पन्न होतात, याचें विवेचन करून, त्यांचे संशय नाहीसे करावे,—अशा दिव्य आनंदाचें पंचवटींत तुफान सुटलें!

सहा सात दिवस अशा दिव्य आनंदांत लोटल्यावर तीक्ष्णदृष्टिसंपन्न श्रीरामकृष्णांच्या मनांत आलें की, दोषाचा तिळमात्र संपर्क नसला तरी ब्राह्मणीला या ठिकाणीं ठेवून घेणें चांगलें नाही. कामकांचनासक्त लोक या पवित्र संन्यासिनीबद्दल, नाही नाही त्या शंका घेतील; असें वाटून त्यांनी ब्राह्मणीजवळ तसें बोलूनहि दाखविलें. ब्राह्मणीलाहि त्यांचें म्हणणें पटलें व जवळच्या एखाद्या खेडयावर राहून, रोज श्रीरामकृष्णांच्या भेटीला येत जावे, असा मनांत बेत करून, त्याच दिवशीं तिने आपलें बिऱ्हाड दक्षिणेश्वराहून उचललें व तेथून जवळच असलेल्या दक्षिणेश्वर खेडयांतील देवमंडळ घाटावर नेलें. त्या खेडयाच्या साध्या भोळ्या व धर्मनिष्ठ मंडळींना, ब्राह्मणी आपल्या अलौकिक गुणांनी लवकरच

प्रिय झाली व तिची राहण्याची व भिक्षेचीहि नीट सोय लागली. तिने नित्य नेमाने श्रीरामकृष्णांच्याकडे जावे व आपल्या ओळखीच्या बायांकडून नानाप्रकारचे खाण्याचे पदार्थ भिक्षा मागून आणून जातांना आपल्याबरोबर घेऊन जावे व अत्यंत वात्सल्याने ते श्रीरामकृष्णांना खाऊं घालावे ! असें सांगतात की, त्या घाटावर राहात असतां, वात्सल्यभावाने तिचें अंतःकरण भरून जावें व त्या अवस्थेंत तिने हातांत लोण्याचा गोळा घेऊन " गोपाळ, गोपाळ " म्हणून मोठमोठयाने हांका माराव्या व त्याच वेळी इकडे श्रीरामकृष्णांनाहि ब्राह्मणीला भेटण्याची अत्यंत उत्कट इच्छा उत्पन्न व्हावी ! असें सांगतात की, त्यावेळीं एखादें लहान मूल जसे आपल्या आईकडे धांवून जातें, त्याचप्रमाणे श्रीरामकृष्ण तिच्याकडे धांवून जात व तिच्या हातांतील तें लोणी भक्षण करीत ! श्रीरामकृष्ण म्हणत-" तिचे मोकळे सुटलेले केस आणि वात्सल्यभावाने झालेली विव्हल अवस्था पाहून लोकांना ही गोपालविरहाने व्याकुळ झालेली नंदराणी यशोदाच आहे की काय असें वाटे ! "

श्रीरामकृष्णांच्या तोंडून, त्यांचे आध्यात्मिक अनुभव व अवस्था ऐकून ब्राह्मणीची खात्री झाली, की ही सर्व अवस्था असाधारण ईश्वरप्रेमामुळेच उत्पन्न झाली आहे आणि ईश्वराच्या गोष्टी चालल्या असतां श्रीरामकृष्णांना किती आनंद होतो व वरचेवर त्यांचें देहभानहि कसे नाहीसें होतें, हें प्रत्यक्ष पाहून तिला निःसंशय वाटलें की, हे कांही सामान्य साधक नव्हत. जिवाच्या उद्धारार्थ, पुन्हा चैतन्यदेवांचा अवतार होणार असल्याबद्दल, श्रीचैतन्यचरितामृत व श्रीचैतन्य भागवत या ग्रंथांत असलेल्या उल्लेखांची, श्रीरामकृष्णांना पाहून तिला वरचेवर आठवण होऊं लागली. चैतन्यदेवांची चालचलणूक, आचार, व्यवहार वगैरे बद्दल त्या ग्रंथांत जें कांही वाचले होतें तें सर्व श्रीरामकृष्णांच्या बाबतींत तंतोतंत जुळतें, असें पाहून तिला आश्चर्य व समाधान वाटलें. चैतन्यदेवांचा गात्रदाह व अमानुष क्षुधा, ज्या सोप्या उपायांनी नाहीशी केल्याचें त्या ग्रंथांत वर्णन आहे, तेच उपाय तिने श्रीरामकृष्णांच्या बाबतींत करून पाहिले

व आश्चर्याची गोष्ट, त्यांनी त्यांना तत्काळ गुणहि आला! ह्या सर्व गोष्टींवरून तिचा पूर्ण समज झाला की या वेळीं श्रीचैतन्य व नित्यानंद या दोघांचाहि एकाच शरीरांत अवतार आहे! मागें सांगितलेंच आहे, की शिऊड गांवाला जात असतां श्रीरामकृष्णांना झालेलें तें विचित्र दर्शन त्यांच्याच तोंडून ऐकून ब्राह्मणी म्हणाली–" यावेळीं नित्यानंद व चैतन्य यांचा एकाच देहांत अवतार आहे!"

ब्राह्मणी संसारांतील कोणत्याहि गोष्टीबद्दल कोणावरहि अवलंबून नसल्या-मुळे, कोणाच्याहि रागलोभाला जुमानण्याचें तिला बिलकुल कारण नव्हतें. म्हणून श्रीरामकृष्णांच्या संबंधीची आपली धारणा, कोणापाशीहि स्पष्टपणे बोलण्यांत, तिला मुळीच संकोच वाटत नसे. तिने श्रीरामकृष्णांच्या विषयीचें आपलें मत प्रथम त्यांनाच व मग हृदयला सांगितलें. इतर कोणीहि विचारल्यास ती आपलें मत स्पष्टपणे सांगे. एक दिवस श्रीरामकृष्ण व मथुरबाबू दोघे पंचवटींत बसले होते, हृदय जवळच होता. गोष्टी निघतां निघतां, आपल्या संबंधी ब्राह्मणी काय म्हणते, हे श्रीरामकृष्णांनी मथुरबाबूंना सांगितलें. ते म्हणाले–" ती म्हणते की, अवतारी पुरुषांची जीं लक्षणें असतात, तीं सारीं तुमच्यामध्ये आहेत तिने कितीतरी शास्त्रांचें अध्ययन केलें आहे आणि त्या साऱ्या पोथ्याहि तिच्या-जवळ आहेत." श्रीरामकृष्णांचें हें साधे व मोकळेपणाचें बोलणे ऐकून, मथुर-बाबूंना गंमत वाटली व ते हसत हसत म्हणाले–" पण बाबा, तिने कांही म्हटलें तरी, अवतार तर दहाहून अधिक नाहीत ना? मग तिचें म्हणणे कसें बरें खरें असेल? तरी पण तुमच्यावर जगदंबेची कृपा आहे, एवढी गोष्ट मात्र खरी."

त्यांच्या अशा गोष्टी चालल्या आहेत, इतक्यांत तेथे एक संन्यासिनी येत असलेली त्यांना दिसली. तिला पाहून मथुरबाबूंनी श्रीरामकृष्णांना विचारलें, " हीच का ती?" श्रीरामकृष्ण होय म्हणाले. तिच्या हातांत एक मिष्टान्नांनी भरलेलें ताट होतें व त्यांतील पदार्थ श्रीरामकृष्णांना आपल्या हाताने खाऊं घालण्यासाठी ती येत होती. जवळ आल्यावर श्रीरामकृष्णांपाशी बसलेल्या

मथुरबाबूंकडे तिची दृष्टि जातांच तिने आपला भाव आवरला व आपल्या हातां-तील ताट हृदयच्या जवळ दिलें. इतक्यांत एखादें लहान मूल जसें आपल्या आईजवळ कोणाचें गाऱ्हाणें सांगतें तसें मथुरबाबूंकडे बोट करून, श्रीरामकृष्ण तिला म्हणाले–" हें ग कसें ! तूं मला म्हणत असतेस, तें मीं आताच याला सांगितलें, पण हा तर म्हणतो की, अवतार तर दहाच आहेत ? " इतक्यांत मथुरबाबूंनी संन्यासिनीला नमस्कार केला व आपण असें खरेंच म्हणालों, असें तिला सांगितलें. संन्यासिनीने त्यांना आशिर्वाद देऊन म्हटलें, " कां बरे ? प्रत्यक्ष श्रीभागवतांत मुख्य मुख्य चोवीस अवतारांची गोष्ट सांगून पुढेहि असंख्य अवतार होतील असें नाही कां सांगितलें ? शिवाय, वैष्णव ग्रंथांत महाप्रभु श्रीचैतन्य देव यांचा पुन्हा अवतार होणार असल्याचें स्पष्ट सांगितलें आहे. श्रीचैतन्यदेव व हे यांच्यामध्ये पुष्कळ साम्य दिसून येतें. श्रीमद्भागवत व इतर वैष्णव ग्रंथ जाणणाऱ्या कोणाहि पंडिताला विचारून पाहा, त्याला ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. मी आपल्या म्हणण्याचे समर्थन करण्यासाठी त्याच्याशीं वाद करण्यासहि तयार आहे ! " ब्राह्मणीचें हें स्पष्ट आत्मविश्वासाचें बोलणें ऐकून मथुरबाबू चकित होऊन स्वस्थ बसले. परंतु एखाद्या पूर्ण अपरिचित, भिक्षावृत्तीने राहणाऱ्या संन्यासिनीच्या बोलण्यावर व पांडित्यावर, त्यांच्यासारखा चिकित्सक मनुष्याचा एकदम कसा विश्वास बसावा ? नुकतेच एक वैद्यबोवाहि त्यांना महा-पुरुष म्हणून गेले होते, तसेंच ही संन्यासिनी सुद्धा म्हणत असेल, इतकेंच,— असें त्याना वाटलें. तरी ब्राह्मणीच्या बोलण्याचें त्यांना फार कौतुक वाटलें व श्रीरामकृष्णांच्याहि आग्रहावरून तिच्या म्हणण्याप्रमाणे एक पंडितांची सभा बोलावण्याचा त्यांनी विचार ठरविला. श्रीरामकृष्ण तर एखाद्या लहान मुलासारखे त्यांच्यापाशी हट्ट धरून बसले–" चांगले चांगले पंडित बोलावून आण. ब्राह्मणी म्हणते तें खरें की खोटें, याचा निकाल लावला पाहिजे ! ". असा श्रीरामकृष्णां-नीच हट्ट धरल्यावर मथुरबाबूंना काय ? सर्व तऱ्हेची अनुकूलता असल्यावर एखादा प्रेमळ पिता आपल्या एकुलत्या एक मुलाचे लाड पुरविण्यांत जसा

आनंद व धन्यता मानतो, तीच स्थिति मथुरबाबूंची! त्यांनी मोठ्या कौतुकाने लगेच एक पंडितांची सभा बोलावली.

या बोलावलेल्या पंडित मंडळींत वैष्णवचरण हे प्रमुख होते. वैष्णवचरण श्रीमद्भागवतावर अत्यंत सुंदर पुराण सांगत असत व याबद्दल त्यांची. कीर्ति चहूकडे पसरली होती.

वैष्णवचरण हे पंडित होते एवढेच नाही, तर ते भक्त व साधकहि होते. आपल्या ईश्वरभक्तीने व शास्त्रावलोकनाने—विशेषतः भक्तिशास्त्राच्या—ते त्या काळच्या वैष्णवसमाजाचे एक प्रमुख पुढारी म्हणून गणले जात व त्याच दृष्टीने वैष्णवसमाजांत त्यांचा मानहि असे. धर्मासंबंधी एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास, त्यावर वैष्णवचरणांचें काय मत आहे, तें ऐकण्यास सर्वजण उत्सुक असत. तसेंच अनेकजण भक्त साधकहि, त्यांनीच सांगितलेल्या मार्गाने साधन-भजन करीत असत.

कोणी कोणी म्हणतात, वैष्णवचरणांची माहिती प्रथम ब्राह्मणीनेच मथुरबाबूंस करून दिली व त्यांना निमंत्रण देण्यास सांगितलें. तें कसेंहि असो, सभेसाठी वैष्णवचरणांना मथुरबाबूंनी बोलविलें होते खरं. सभेचा दिवस उजाडला व वैष्णवचरण व इतर पंडित मंडळी सभेंत आली. विदुषी ब्राह्मणी व मथुरबाबूंची मंडळीहि सभेंत हजर होती.

सभेला सुरवात झाली व श्रीरामकृष्णांच्या अवस्थेसंबंधी वाटाघाट चालली. ब्राह्मणीने श्रीरामकृष्णांच्या अवस्थेसंबंधाने लोकांच्या तोंडून जें ऐकलें होतें व स्वतः जें कांही पाहिलं होतें त्या सर्वांचा उल्लेख करून, पूर्वी होऊन गेलेल्या महान् भगवद्भक्तांच्या ज्या अवस्था भक्तिशास्त्रांत वर्णन केल्या आहेत त्या, व हल्लीची श्रीरामकृष्णांची अवस्था अगदी एकाच प्रकारच्या आहेत, असें आपलें स्वतःचें मत असल्याचें सांगितलें व वैष्णवचरणांना उद्देशून ती म्हणाली—"आपलें जर

याविषयी निराळें मत असेल, तर आपलें तसें मत कां आहे, याची मला फोड करून सांगावी." आपल्या मुलाचा कैवार घेऊन माता जशी दुसऱ्याशीं भांडावयाला उठते, तोच भाव आज ब्राह्मणीचाहि होता ! आणि ज्यांच्याविषयी आजचा हा सारा वादविवाद होता ते श्रीरामकृष्ण ? आमच्या डोळ्यांसमोर त्यांचें त्यावेळचें चित्र स्पष्ट दिसत आहे ! सर्व सभा बसली आहे, त्या पंडित मंडळींतच साध्या वेषांत तेहि बसले आहेत; ते आपल्याच आनंदांत निमग्न असून, त्यांच्या तोंडावर मृदु हास्य झळकत आहे ! जवळच बदाम, पिस्ते, मनुकांनी भरलेला एक बटवा असून, त्यांतून एखाद-दुसरा दाणा ते मधून मधून तोंडांत टाकीत सारा संवाद इतका लक्ष देऊन ऐकत आहेत, की जणु काय तो दुसऱ्याच एखाद्या माणसाबद्दल चालला आहे ! आणि मधेच वैष्णवचरणांना स्पर्श करून, स्वतःची एखादी विशेष अवस्था—"हें पाहा, मला हें असें होत असते !" अशा रीतीने वर्णन करून सांगत आहेत !

कोणी कोणी म्हणतात, श्रीरामकृष्णांना पाहिल्याबरोबरच हे कोणी महापुरुष आहेत, असें वैष्णवचरणांनी आपल्या दिव्य दृष्टीने जाणलें होतें, परंतु जाणलें असो वा नसो, श्रीरामकृष्णांच्या अवस्थेसंबंधी ब्राह्मणीने जें विवेचन केलें होतें, तें त्यांना पूर्ण पटलें व आपलेंहि मत तसेंच असल्याचें त्यांनी भर सभेंत सांगितलें, हें आम्हीं श्रीरामकृष्णांच्याच तोंडून ऐकलें आहे. एवढेंच नव्हें तर वैष्णवचरणांनी असेंहि सांगितलें की " जे एकोणीस प्रकारचे निरनिराळे भाव अथवा ज्या अवस्था एकत्र असल्या म्हणजे त्यांना महाभाव म्हणतात व ज्या अवस्था आजपर्यंत फक्त श्रीराधा व श्रीचैतन्य महाप्रभु यांच्याच ठिकाणीं दिसून आल्या, त्या सर्व अवस्था यांच्यामध्ये प्रकाशित असल्याचें दिसून येतें ! एखाद्या महाभाग्यवानाला जर महाभावाचा थोडासा आभास प्राप्त झाला, तर या एकोणिसांपैकी फार फार तर दोन चार अवस्थाच त्याच्या ठिकाणीं प्रकाशित होतात. या सर्व एकोणीसहि अवस्थांचाहि उद्दाम वेग सहन करण्यास, आजपर्यंत कोणाहि मानवाचें शरीर समर्थ झालें नाही ! ! "

मथुरानाथ वगैरे सर्व मंडळी वैष्णवचरणांचें हें भाषण ऐकून अगदी चकित होऊन गेली ! श्रीरामकृष्णांनाहि हें ऐकून गंमत वाटली व आनंद झाला व ते मथुरबाबूंना म्हणाले-"ऐकलेसना ते काय म्हणाले तें ? बाकी तें तुमचें कांहीहि का असेना ? मला रोग झालेला नाही, हें ऐकून मात्र फार समाधान झालें ! "

# २१. वैष्णवचरण व गौरीपंडित यांची हकीगत

" मतें तितके मार्ग ! स्वतःच्या मतावर निष्ठा ठेवावी, पण दुसऱ्याच्या मताची निंदा करूं नये. "

" सिद्धि ह्या परमेश्वरलाभाच्या मार्गांतील मोठे अडथळे आहेत. "

" विवेकवैराग्यावांचून शास्त्रज्ञान व्यर्थ. "

—श्रीरामकृष्ण

---

वैष्णवचरणांनी श्रीरामकृष्णांच्या विषयीचें आपलें जें मत सांगितलें तें उगीच कांही तरी मत द्यावें म्हणून सांगितलें होतें, असें मुळीच नाही व याचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे, या दिवसापासून त्यांची श्रीरामकृष्णांवरील श्रद्धा व भक्ति उत्तरोत्तर वाढत चालली हें होय. श्रीरामकृष्णांच्या संगतीचा लाभ मिळावा म्हणून ते वरचेवर दक्षिणेश्वरीं येऊं लागले. आपल्या सर्व गुप्त साधनांची हकीगत श्रीरामकृष्णांना सांगून, त्या बाबतीत त्यांचें म्हणणें ऐकूं लागले व आपल्यासारखाच आपल्या माहितीच्या इतर साधकांनाही श्रीरामकृष्णांच्या दिव्य सहवासाचा लाभ व्हावा म्हणून, मधून मधून श्रीरामकृष्णांना त्यांच्याकडे घेऊन जाऊं लागले. श्रीरामकृष्णांनाहि त्यांच्याच संगतीपासून गुप्त साधनांसंबंधीची माहिती झाली. साधारण लोकांच्या दृष्टीने दूषणीय व निंद्य अशाहि साधना जर कोणी खरोखरच "भगवंताचा लाभ व्हावा" ह्याच हेतूने अंतःकरणापासून

करीत असेल, तर त्यांच्या अनुष्ठानाने साधकाचा कधीहि अधःपात न होतां, तो हळूहळू त्यागी व संयमी होऊन, त्याची उत्तरोत्तर आध्यात्मिक उन्नतीच होत जाते व अखेरीस त्यालाहि शुद्धाभक्तीचा लाभ होतो," हे तत्व श्रीराम-कृष्णांना योग्य रीतीने यांच्याच संगतीने समजलें. अशा प्रकारच्या साधनांच्या गोष्टी ऐकून व कांही साधना प्रत्यक्ष पाहून, श्रीरामकृष्ण म्हणत-" मला प्रथम प्रथम वाटे की, 'ही सर्व मंडळी मोठ्यामोठ्या गोष्टी सांगतात आणि असल्या हीन प्रकारच्या साधना कां करतात !' परंतु या मंडळींपैकी जे खरोखरच श्रद्धावान् होते, त्यांची पुढे आध्यात्मिक उन्नति होत असलेली प्रत्यक्ष पाहून, त्यांच्या मनांतील हा संशय नाहीसा झाला, असे त्यांच्याच तोंडून आम्हीं ऐकलें आहे. अशा प्रकारच्या साधनामार्गाचे अवलंबन करणाऱ्या लोकांविषयींची, आमच्या मनांतील तिरस्कारबुद्धि नाहीशी करण्याच्या उद्देशाने ते म्हणत-" बाबांनो ! तिरस्कारबुद्धि कां म्हणून असावी ? असेंच समजा की, तोहि एक पंथच आहे, इतकेंच काय तें;—घरांत जाण्याला पुष्कळ निरनिराळ्या वाटा नसतात का ?—मोठा दरवाजा, दिंडी, एखादी खिडकी—शेतखाने साफ करणाऱ्या भंग्यासाठी म्हणून एक निराळे दार वगैरे ? असे समजा की, हाहि एक तसलाच दरवाजा आहे. घराच्या कोणत्याहि वाटेने आंत गेले, तरी सगळे एकाच ठिकाणीं पोहोचतात ना ? मग असे असलें म्हणून त्यांचा तिरस्कार करावा की काय ? की, त्यांच्याशीं मिळूनमिसळून वागावें ? " असो.

श्रीरामकृष्णांचें अद्भुत चरित्रबल, पवित्रता, अलौकिक ईश्वरभक्ति व भावसमाधि, वगैरे गोष्टींचा वैष्णवचरणांच्या मनावर एवढा परिणाम झाला की, श्रीरामकृष्णांना सर्वांच्या समक्ष 'ईश्वरावतार' म्हणण्यास त्यांना बिलकुल संकोच वाटत नसे.

वैष्णवचरण श्रीरामकृष्णांकडे येऊं लागल्यास थोडेसे दिवस लोटल्यावर प्रख्यात गौरी पंडितहि दक्षिणेश्वरीं आले. गौरी पंडित हे एक विशिष्ट तांत्रिक साधक होते. ते दक्षिणेश्वरीं कालीमंदिरांत येऊन पोहोचतात, तोंच एक

मजेची गोष्ट घडून आली. ही गोष्ट आम्हीं प्रत्यक्ष श्रीरामकृष्णांच्याच तोंडून ऐकली आहे. ते म्हणत--“ गौरीपंडिताला तपस्येने एक सिद्धि प्राप्त झाली होती. वादासाठी म्हणून त्यांना कोठे आमंत्रण असलें, म्हणजे त्या घरांत प्रवेश करतांना व त्या सभास्थानीं प्रवेश करतांना ते-“ हा रे रे रे, निरालंबो लंबोदरजननि ! कं यामि शरणम् ! ” हा आचार्यकृत देवीस्तोत्रांतील चरण, उच्च स्वराने कांही वेळां म्हणत व मग त्या ठिकाणीं प्रवेश करीत ! त्यांच्या तोंडचा हा गंभीर स्वराने म्हटलेला चरण ऐकतांच, ऐकणाऱ्यांच्या हृदयांत एक प्रकारची भीतीची धडकी भरे ! ह्याने दोन कामें साधून जात—एक तर, या चरणाच्या आवृत्तीनें गौरीपंडितांची स्वतःची आंतरिक शक्ति नीट जागृत होई व दुसरें ह्या योगाने त्यांचे प्रतिस्पर्धी गडबडून जात व त्यांचें बल नष्ट होऊन जाई ! हा चरण गर्जत व पहिलवानाप्रमाणे दंड थोपटीत, गौरीपंडित सभास्थानीं प्रवेश करून, जेव्हां तेथे वीरासन घालून बसत, तेव्हां त्यांना वादांत जिंकण्यास कोणीहि समर्थ होत नसे ! ”

गौरीपंडितांच्या ह्या सिद्धीची श्रीरामकृष्णांना कांहीच माहिती नव्हती; “ हा रे रे रे ” हा चरण म्हणत, गौरींनी कालीमंदिरांत प्रवेश केला, तोच इकडे श्रीरामकृष्णांनाहि काय स्फूर्ति झाली कोणास ठाऊक, त्यांनी हाच चरण गौरी-पेक्षाहि मोठया आवाजाने म्हटला ! तें ऐकून गौरींनी त्यांच्यापेक्षा उच्च स्वर काढला, तो ऐकून श्रीरामकृष्णांनी त्यावरहि ताण केली ! असें तीन चार वेळां झालें. हा गोंधळ काय आहे, कोणासच कांही समजेना. जे ते आपापल्या जागीं चित्रासारखे तटस्थ उभे राहिले ! कालीमंदिराचे पहारेकरी मात्र, हातांत मारे काठया आणि सोटे घेऊन धांवून आले व पाहतात तों विशेष कांही नसून श्रीरामकृष्ण व नवीन आलेले पंडित यांची चढाओढ लागली आहे ! हा प्रकार पाहून सगळयांची हासतां हासतां मुरकुंडी वळली. इकडे श्रीरामकृष्णांपेक्षा अधिक उच्च स्वर काढतां न आल्यामुळे गौरीपंडित बिचारे थंड पडले व त्यांनी खिन्न मनाने काली मंदिरांत प्रवेश केला. इतर मंडळीहि जिकडची तिकडे निघून

गेली. श्रीरामकृष्ण म्हणत,—"त्यानंतर मला जगदंबेने दाखविलें की, ज्या सिद्धीच्या बळावर, गौरीपंडित दुसऱ्याचें बल हरण करून अजिंक्य होऊन जाई, त्या सिद्धीचा इथे असा पराभव झाल्यामुळे, ती त्याची सिद्धिच नष्ट झाली! त्याच्याच कल्याणासाठी, त्याची सिद्धि (स्वतःकडे बोट करून) मातेने या देहांत आकर्षण करून घेतली!" आणि खरोखरच असे दिसून आलें की श्रीरामकृष्णांवर गौरीपंडितांची अधिकाधिक भक्ति जडूं लागली.

गौरीपंडित तांत्रिक साधक होते, असें वर सांगितलेंच आहे. श्रीरामकृष्ण सांगत असत की, "दरवर्षी दुर्गापूजेच्या दिवसांत गौरीपंडित सर्व प्रकारची पूजासामग्री तयार करी व स्वतःच्या पत्नीला वस्त्रालंकारांनी भूषित करून, तिला देवपूजेच्या आसनावर बसवून तिची तीन दिवस मोठ्या भक्तिभावाने श्रीजगदंबाज्ञानाने पूजा करीत असे!" जितक्या स्त्रीमूर्ति तितकीं सारी श्रीजगदंबेचीं निरनिराळी रूपें समजावीं व त्या सर्वांत जगत्पालिनी व आनंददायिनी जगन्मातेची शक्ति भरलेली आहे अशी भावना ठेवावी, अशी तंत्रशास्त्राची शिकवण असल्यामुळे, स्त्रीमात्राची मनुष्याने पवित्रभावाने पूजाच करणें उचित आहे. स्त्रीमात्रामध्ये श्रीजगन्माता स्वतः विद्यमान आहे हें विसरून सकाम भावाने स्त्रीशरीराकडे पाहिल्यास ती प्रत्यक्ष श्रीजगन्मातेचीच अवमानना केल्यासारखी होते. यच्चावत् स्त्रीमात्राकडे देवी भावाने पाहणारे महापुरुष या जगांत किती असतील ते असोत!

गौरीपंडितांच्या आणखी एका सिद्धीची गोष्ट श्रीरामकृष्ण सांगत असत. विशिष्ट तांत्रिक साधक जगन्मातेच्या नित्यपूजनानंतर होम करीत असतात, गौरीपंडित सुद्धा कधी कधी होम करीत असत. पण त्यांची होम करण्याची तऱ्हा फार अजब होती. इतर लोक ज्याप्रमाणे जमिनीवर मृत्तिकेची वेदी तयार करून, तिच्यावर समिधा, काष्ठें रचून अग्नि प्रज्वलित करतात व मग त्यांत आहुति देतात तसें गौरीपंडित करीत नसत. ते आपला डावा हात पुढे पसरून, त्यावरच एका वेळीं मणभर लाकडें रचून तीं पेटवीत व त्या अग्नींत आपल्या

उजव्या हाताने आहुति टाकीत ! ! होमाला कांही थोडा काळ लागत नाही; तो सर्व संपेपर्यंत हात तसाच पसरून ठेवून, त्यावरचें एक मण लाकडांचें ओझें व धडकलेल्या अग्नीच्या ज्वाला सहन करून, मन शांत ठेवून भक्तिपूर्ण अंतः-करणाने, त्या अग्नींत यथाविधि आहुति टाकावयाच्या—हें कर्म केवढें असंभवनीय वाटतें ? म्हणून, प्रत्यक्ष श्रीरामकृष्णांच्या तोंडून ही गोष्ट ऐकूनहि आम्हांपैकी पुष्कळांचा यावर एकदम विश्वास बसत नसे. परंतु आमच्या मनांतील भाव जाणून श्रीरामकृष्णानी म्हणावें–"मीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी त्याचा होम पाहिला आहे रे ! हे सर्व तो आपल्या सिद्धीच्या जोरावर करूं शकत असे."

गौरीपंडित दक्षिणेश्वरीं आल्यानंतर कांही दिवसांनी मथुरबाबूंनी, वैष्णवचरण वगैरे पंडितांना बोलावून, पुन्हा एक सभा भरविली. या सभेचा उद्देश श्रीरामकृष्णांच्या सांप्रतच्या अवस्थेसंबंधी नवीन आलेल्या पंडितजींच्या बरोबर शास्त्रीय रीत्या वादविवाद करणें हाच होता. ही सभा श्रीजगदंबेच्या समोरच्या सभामंडपांत सकाळींच भरली. वैष्णवचरणांना कलकत्त्याहून येण्यास उशीर आहे असें समजतांच, श्रीरामकृष्ण गौरीपंडितांना बरोबर घेऊन अगोदरच सभास्थलीं जाण्यास निघाले. प्रथम ते श्रीजगन्मातेच्या मंदिरांत गेले व अत्यंत भक्तिभावाने श्रीजगदंबेचें दर्शन घेऊन भावावेशांत झोक जात जात, श्रीकालीमंदिराच्या बाहेर पाऊल टाकतात, तोंच वैष्णवचरणांनी येऊन त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें. हें पाहतांच श्रीरामकृष्ण भावावेशांत एकदम समाधिमग्न होऊन, वैष्णवचरणांच्या खांद्यावर जाऊन बसले व यायोगें आपण कृतार्थ झालों असें समजून आनंदाने अंतःकरण भरून येऊन, वैष्णवचरणहि तत्क्षणींच संस्कृत श्लोक रचून श्रीरामकृष्णांची स्तुति करूं लागले ! श्रीरामकृष्णांची ती समाधिमग्न, प्रसन्न व तेजस्वी मूर्ति व वैष्णवचरणांची आनंदाच्या भरांत चाललेली स्तोत्ररचना पाहून, तेथे असलेली मथुरबाबू वगैरे मंडळी भक्तिपूर्ण अंतःकरणाने अजूबाजूस उभी राहून, हें अपूर्व दृश्य टक लावून पाहात होती ! बऱ्याच वेळाने श्रीरामकृष्णांची समाधि उतरल्यावर सर्व मंडळी त्यांच्याबरोबर सभास्थलीं जाऊन बसली.

थोडयाच वेळांत सभेच्या कामास सुरवात झाली. परंतु गौरीपंडित प्रथमच म्हणाले, “ वैष्णवचरणांवर ज्या अर्थी आताच यांनी ( श्रीरामकृष्णांनी ) कृपा केली आहे, त्या अर्थी आज यांच्याशीं वाद करण्याची माझी इच्छा नाही, मी आज वाद करूं लागल्यास, त्यांत निःसंशय माझाच पराजय होईल; कारण, आज वैष्णवचरणांच्या अंगीं दैवी बल संचारलें आहे आणि शिवाय मला असें दिसतें की त्यांचेंहि मत माझ्याच मतासारखें आहे. श्रीरामकृष्णांच्या संबंधी माझी जी धारणा आहे तीच यांचीहि आहे. मग वादविवादाला जागाच कोठे उरली ? ” नंतर कांही वेळ इतर कांही गप्पागोष्टी होऊन सभा बरखास्त झाली. गौरीपंडित म्हणजे वैष्णवचरणांशीं वाद करण्यास भ्याले असें मुळीच नाही. कांही दिवस श्रीरामकृष्णांच्या संगतींत राहून त्यांची पूर्ण खात्री झाली होती की, हे कोणी थोर महापुरुष आहेत, कारण या नंतर थोडयाच दिवसांनी गौरीपंडितांच्या मनांतील भाव समजून घ्यावा, म्हणून एक दिवस त्यांना श्रीरामकृष्ण म्हणाले, “ हें पाहा, वैष्णवचरण ( स्वतःकडे बोट करून ) या देहाला अवतार म्हणतो. ही गोष्ट शक्य आहे काय ? तुम्हांला काय वाटतें सांगा पाहूं ? ”

गंभीरपणाने गौरींनी उत्तर दिलें, “ काय ? वैष्णवचरण आपणाला अवतार म्हणतात ? ही तर कमीपणाची गोष्ट आहे ! माझी तर खात्री आहे की, ज्यांच्या अंशाने युगायुगांत लोककल्याणासाठी अवतार होतात आणि ज्यांच्या शक्तीच्या बळावर ते हें कार्य साधतात, तेच प्रत्यक्ष आपण आहांत ! ” यावर श्रीरामकृष्ण हसत हसत म्हणाले, “ अरे बापरे ! तुम्ही तर त्यांच्याहि पुढे गेलांत ! पण हें कशावरून ? अशी कोणती गोष्ट तुम्ही माझ्यांत पाहिलीत ? ” गौरी म्हणाले– “ शास्त्रप्रमाणावरून व स्वतःच्या अनुभवावरून; याबद्दल जर कोणाला वाद करावयाचा असेल तर त्यालाहि माझी तयारी आहे ! ”

श्रीरामकृष्ण एखाद्या लहान मुलाप्रमाणें म्हणाले—“तुम्ही तर बाबांनो सगळे इतक्या गोष्टी बोलतां, पण मला तर यांत कांहीच समजत नाही. ” गौरी—“ वा ! ठीकच आहे. शास्त्र सुद्धा असेंच म्हणतें, स्वतःच स्वतःला कोणी

जागत नाही! मग दुसऱ्याने तरी तुम्हांला कसें जागावें सांगा बरें? आपणच जर एखाद्यावर कृपा केली तर तो मात्र जाणूं शकेल!"

पंडितजींचें हे बोलणें ऐकून श्रीरामकृष्ण हसू लागले.

दिवसेंदिवस गौरीपंडितांची श्रीरामकृष्णांवरील भक्ति वाढूं लागली आणि इतके दिवसांची त्यांची साधना व शास्त्रविचार श्रीरामकृष्णांच्या दिव्य संगतीने फलास येऊन, त्यांच्या अंतःकरणामध्ये तीव्र वैराग्याचा उदय झाला व सर्वसंग परित्याग करून आपले तनमनधन ईश्वराच्या सेवेकडे लावण्याचा त्यांनी निश्चय केला. दक्षिणेश्वरीं येऊन त्यांना बरेच दिवस झाले होते व त्यांच्या घरीं अशी बातमी पोहोचली होती, की पंडितजी हे एका गोसाव्याच्या नादीं लागले आहेत. या कारणाने ताबडतोब येण्याबद्दल, त्यांना घरून पत्रांवर पत्रें येऊं लागलीं. हे पाहून "कदाचित घरची मंडळी येथेहि येऊन आपल्याला पुन्हा संसारांत ओढण्याचा प्रयत्न करतील," या भीतीने त्यांनी दक्षिणेश्वर सोडण्याचा बेत केला व एके दिवशीं श्रीरामकृष्णांच्या पायांवर मस्तक ठेऊन, सद्गदित अंतःकरणाने त्यांनी त्यांचा निरोप मागितला.

श्रीरामकृष्णः—"हे हो काय पंडितजी? एकाएकी निरोप घेऊन कोठे निघालांत?"

गौरीपंडितः-"ईश्वराचें दर्शन झाल्यावांचून, संसारांत पुन्हा न फिरण्याचा बेत केला आहे. माझी इच्छा पूर्ण होईल असा मला आशीर्वाद द्या."

असें म्हणून पंडितजींनी दक्षिणेश्वर सोडलें. परंतु ते घरीं गेले नाहीत व कोठे गेले याचाहि कधी कोणास पत्ता लागला नाही!

---

# २२. विपरीत क्षुधा आणि गात्रदाह

मागील प्रकरणावरून असें दिसून येईल की, श्रीरामकृष्णांचें त्या वेळचें आचरण व व्यवहार यांचा इतर साधारण माणसांना जरी नीट अर्थ कळला नाही तरी वैष्णवचरण, गौरीपंडित वगैरे मोठमोठ्या शास्त्रज्ञांना, ' ते वेडे आहेत,' असें मुळीच न वाटतां ते अत्यंत थोर अधिकारी पुरुष आहेत, किंबहुना ते ईश्वरावतार आहेत, असेंच वाटत असे. स्वार्थैकदृष्टि, विषयलोलुप अशा लोकांना त्यांच्या उच्च अवस्थेची ओळख न पटावी, यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीहि नाही. असो.

इकडे भैरवी ब्राह्मणीला, श्रीरामकृष्णांच्या अवस्थेविषयींचें आपलेंच मत खरें असल्याबद्दल, एक उत्तम प्रमाण सापडलें. भैरवी ब्राह्मणी दक्षिणेश्वरीं येण्याच्या अगोदरपासूनच, श्रीरामकृष्णांना गात्रदाहापासून अत्यंत त्रास होत असे. तो कमी व्हावा म्हणून मथुरबाबूंनी अनेक वैद्यांचीं औषधें त्यांना देऊन पाहिलीं होतीं, पण गुण आला नव्हता. श्रीरामकृष्ण सांगत असत-" सूर्योदयापासून दुपारपर्यंत, अंगाची तलखी एकसारखी वाढत असे आणि बारा वाजण्याच्या सुमारास तर, ती इतकी असह्य होऊन जात असे, की मीं गंगेत गळ्याइतके अंग बुडवून ठेऊन डोक्यावर कापडाचा एक तुकडा भिजवून ठेवावा व अशा रीतीने दोनतीन तास पाण्यांत बसून घालवावे !! जास्त वेळ पाण्यांत बसून राहिल्यास, कदाचित एखादा भलताच रोग मागे लागेल या भीतीने, इच्छा नसतांहि, पाण्यांतून बाहेर यावें व घरांत परत येऊन तेथील संगमरवरी फरशी-वर कांही तरी वस्त्र भिजवून आंथरावें व दारें बंद करून त्या भिजलेल्या वस्त्रावर गडबडा लोळावें ! ! "

ब्राह्मणीचें मात्र श्रीरामकृष्णांच्या या अवस्थेसंबंधी निराळेंच मत झालें. ती मथुरबाबूंना म्हणाली–" हा काही रोग नव्हे खास. श्रीरामकृष्णांच्या मनांत ईश्वरप्रेमाने प्रचंड खळबळ उडाली आहे तिचाच हा परिणाम आहे. ईश्वर-दर्शनाच्या व्याकुळतेने अशाच प्रकारची अवस्था श्रीमती राधा व श्रीचैतन्य देव यांची होत असे. या गात्रदाहावर अगदी साधे औषध आहे—सुगंधी पुष्पाच्या माला धारण करणें व सर्वांगाला सुवासिक चंदनाचा लेप करणें !"

मथुरबाबू वगैरेंचा ब्राह्मणीच्या म्हणण्यावर विश्वास बसला नाही; तरी त्यांना वाटलें की, इतकीं औषधें देऊन पाहिलीं, मग हेंच कां पाहूं नये ? असें वाटून मथुरबाबूंनी ब्राह्मणीने सांगितल्याप्रमाणे वरील उपाय सुरू केला आणि आश्चर्याची गोष्ट ही की चौथेच दिवशीं त्यांचा हा विलक्षण गात्रदाह पूर्ण नाहीसा झाला ! !

यानंतर कांही दिवसांनी निराळीच भानगड उपस्थित झाली व ब्राह्मणीच्या सहज उपायानेच तीहि नाहीशी झाली. श्रीरामकृष्ण म्हणत, " त्यावेळीं, कांही दिवसपर्यंत, विलक्षण भूक लागत असे ! कितीहि खाल्ले तरी, पोट म्हणून भरूंच नये ! रात्रंदिवस एक सारखी 'खा' सुटे, आणि ती कांही केल्या कमी होत नसे. वाटलें की आता ही काय नवीनच भानगड निघाली बुवा ? ब्राह्मणीला सांगितलें—ती म्हणाली, 'बाबा, कांही हरकत नाही. ईश्वरप्राप्तीच्या मार्गात जे साधक असतात, त्यांची अशी अवस्था कधी कधी होत असते. शास्त्रांत सुद्धा ही गोष्ट सांगितली आहे, मी तुझा हा रोग नाहीसा करतें, भिऊं नको.' असें म्हणून मथुरबाबूंना सांगून, तिने एका खोलींत, मोठमोठीं ताटें भरून, खाण्याचे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ मांडून ठेवविले व मला म्हणाली, 'बाबा, तूं या खोलींतच बसून राहा व जें मनास येईल तें खुशाल हवें तितकें खात जा !' मग मी त्या खोलींतच बसूं उठूं लागलों व जेव्हां जें वाटेल, तें तेव्हां खाऊं लागलों ! अशा रीतीने तीन दिवस गेल्यावर ती विपरीत क्षुधा एकदाची समूळ नाहीशी झाली, तेव्हां वांचलों !"

श्रीरामकृष्णांच्या आयुष्यांत अशाच तऱ्हेच्या विपरीत क्षुधेची किती तरी उदाहरणें घडून आलीं आहेत. त्यांतील कांही येथे सांगितल्यास तें अप्रासंगिक होणार नाही.

श्रीरामकृष्णांच्या तपश्चर्येचा काळ एकंदर बारा वर्षांचा होता असें मागे सांगितलेंच आहे. अत्यंत कठोर अशा तपश्चर्येमुळे त्यांची वज्रासारखी बळकट व दृढ शरीरप्रकृतीहि ढासळून गेली होती व म्हणून पुढे कांही वर्षेपर्यंत दर चातुर्मासांत ते आपल्या जन्मभूमीस जाऊन राहात असत.

एके वर्षी ते याप्रमाणे चातुर्मासासाठी कामारपुकुरास गेले होते. एक दिवस रात्रीं बारा वाजण्याचा सुमार झाला असावा, श्रीरामकृष्णांच्या दर्शनासाठी जमलेली मंडळी आपापल्या घरीं परत गेली होती व घरांतील सर्व मंडळीहि निजली होती. अलीकडे श्रीरामकृष्णांना अग्निमांद्य व पोटदुखीचा विकार जडला असल्यामुळे, रात्रीं ते अगदी हलके कांही तरी अन्न खात. त्याप्रमाणे थोडेंसें कांही तरी खाऊन श्रीरामकृष्ण निजले होते.

बारा वाजण्याच्या सुमारास आपल्या खोलीचे दार उघडून भावावेशांत झोक जात जात श्रीरामकृष्ण, एकाएकी बाहेर आले व रामलालदादांची आई वगैरे बायकांना हांका मारून म्हणूं लागले, "तुम्ही सगळ्याजणी निजलांत का ग इतक्यांत ? आम्हांला खायला घातल्याशिवाय निजलांत का ग साऱ्या ?" रामलालची आई म्हणाली, " अग बाई ! हें काय ? तुम्हीं आताच नाही का खाल्लेत ? " श्रीरामकृष्ण म्हणाले–" आता कधी खाल्लें ? मी तर हा दक्षिणेश्वराहून आताच आलोंना ? तुम्हीं कधी मला खायला घातलेंत ? "

हे ऐकून त्या सर्व बायका चकित होऊन एकमेकींच्या तोंडाकडे पाहूं लागल्या. त्यांना समजून चुकलें की श्रीरामकृष्ण हें सारें भावावेशांत बोलत आहेत. पण आता याला उपाय काय ? बरे घरांतहि आता त्यांना खायला देण्यासारखे कांही नव्हते. पण आता कसें करावयाचें ? शेवटी रामलालची आई भीत

भीत म्हणाली—"हें पाहा, आता रात्र नाही का बरे झाली ? आता घरांत खायला कांही उरलेलें नाही. पोहे देऊं का आणून थोडे ?" असें म्हणून त्यांच्या उत्तराची वाट न पाहता तिने एका ताटांत थोडे पोहे आणून त्यांच्यापुढे ठेवले; तें पाहून श्रीरामकृष्ण रागारागाने ताटाकडे आपली पाठ करून बसले व एखाद्या लहान मुलासारखे म्हणूं लागले-"आम्हांला नकोत तुझे पोहे जा ! नुसते पोहे आम्ही नाही खात !" त्यांची पुष्कळ समजूत घातली-" तुमची प्रकृति ठीक नाही, दुसरें कांही खाऊन पचणार नाही; बरें, कांही बाजारांतून आणावें म्हटलें तर आता सारीं दुकाने बंद झालीं असतील, म्हणून आता एवढे पोहे खाऊन निजा, सकाळी उठल्याबरोबर कढी भात करून खायला घालूं !" पण हें सारें ऐकतो कोण ? त्यांचा आपला एखाद्या लहान मुलासारखा एकच हट्ट-" नुसते पोहे आम्ही खात नाही जा !"

शेवटी हे कांही केल्या ऐकत नाहीत असें पाहून रामलालदादा उठले; त्या तेवढया रात्रीं बाजारांत गेले व एका ओळखीच्या हलवायाला झोंपेतून जागे करून, एक शेर मिठाई विकत घेऊन घरीं आले. ती मिठाई व साधारण मनुष्य जेवढे खाऊं शकेल तेवढे पोहे एका ताटांत घालून तें ताट रामलालदादांच्या आईने त्यांच्यापुढे ठेवलें ! मिठाई पाहून श्रीरामकृष्णांना आनंद झाला व ती सारी मिठाई व तेवढे सारे पोहे त्यांनी तेव्हांच खाऊन फस्त केले ! साऱ्या मंडळींना भीति वाटली की आता यांची पोटदुखी खास वाढणार व हे आजारी पडणार. पण आश्चर्याची गोष्ट ही, की त्यांना यापासून कांहीहि अपाय झाला नाही !

एके दिवस दक्षिणेश्वरी असतां, असेच रात्रीं दोनचे सुमारास उठून, श्रीरामकृष्ण लगबगीने आपल्या खोलीबाहेर येऊन, रामलालदादांना हांका मारून म्हणाले, " दादा, भयंकर भूक लागली आहे, कांही खायला मिळेल का बघ." रामलालदादांनी नौबतखान्यांत जाऊन, माताजींना ही बातमी दिली व त्यांनी लगेच चूल पेटवून अंदाज एक शेर शिरा तयार केला. त्याच दिवशीं एक स्त्री भक्त श्रीरामकृष्णांच्या दर्शनासाठी आली होती व नौबतखान्यांतच माता-

जींच्या खोलींत निजली होती, तिला उठवून तिच्याबरोबर तें शिऱ्याचें ताट माताजींनी श्रीरामकृष्णांकडे पाठविलें. श्रीरामकृष्ण लगेच खायला बसले व त्या भावावस्थेंत तो सारा शिरा त्यांनी खाऊन टाकला ! हे पाहून त्या स्त्रीला फार आश्चर्य वाटले. श्रीरामकृष्ण खातां खातां मधेच तिला म्हणाले, "हा शिरा कोण खात आहे सांग पाहूं ? मी की दुसरेंच कोणी ? " स्त्री–"मला वाटतें आपल्या अंतर्यामीं कोणीतरी आहे, तोच खात आहे." " वा ठीक बोललीस ! " असें म्हणून श्रीरामकृष्ण हसूं लागले !

अशा विपरीत क्षुधेचे किती तरी प्रसंग सांगतां येतील. नेहमी असें दिसून येई की, त्यांच्या प्रबल भावतरंगांनी, श्रीरामकृष्णांच्या शरीरांत अशी विलक्षण उलथापालथ होऊन जाई, की त्या वेळीं " हे श्रीरामकृष्ण नव्हत तर दुसरेंच कोणी तरी असले पाहिजेत, " असाच भास होई ! त्यावेळीं त्यांचें चाल-चलन, आहार, व्यवहार वगैरे पार पदलून जाई ! बरें, मनांत उसळलेला भाव नाहीसा झाल्यावर, त्यांच्या शरीरांत या विपरीत आचरणानें कांही विकारहि उत्पन्न होत नसे ! आंत असलेलें मनच आमच्या स्थूल शरीराला प्रत्येक क्षणीं घडवीत असते, मोडीत असतें, नवीन आकार देत असतें—ही गोष्ट वरचेवर ऐकूनहि आम्हांला पटत नाही, समजूनहि उमजत नाही. परंतु श्रीरामकृष्णांच्या जीवनांतील निरनिराळ्या प्रसगांचा जितका विचार करून पाहावा तितकी या गोष्टीची सत्यता अधिक निदर्शनास येते; असो.

ब्राह्मणीच्या या सहज उपायांनी श्रीरामकृष्णांचा गात्रदाह व क्षुधारोग नाहीसा झालेला पाहून मात्र, मथुरबाबू व इतर मंडळी, यांच्या मनांत ब्राह्मणी-विषयी आदर उत्पन्न झाला व आपली धारणा खरी ठरल्याबद्दल ब्राह्मणीच्याहि मनाला समाधान वाटलें. श्रीरामकृष्ण हे कोणीतरी थोर महापुरुष आहेत याबद्दल तिला स्वतःला शंकाच नव्हती. कारण त्यांना साधनांत साहाय्य करण्यासाठी त्यांच्याकडे जाण्याचा तिला श्रीजगदंबेकडूनच आदेश मिळाला होता. परंतु

इतरांचीहि याबद्दल थोडी बहुत खात्री होऊं लागलेली पाहून तिला समाधान वाटलें. असो. तिच्या देखरेखीखाली श्रीरामकृष्णांनी ज्या तंत्रोक्त साधना केल्या, त्यांची थोडी फार माहिती देण्यापूर्वी स्वतः ब्राह्मणीची व तिने उल्लेख केलेल्या त्या दोघा साधकांची हकीगत पुढील प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे.

# २३. ब्राह्मणी, चंद्र व गिरिजा यांची हकीगत

श्रीरामकृष्णांच्या साधनाकालीन गोष्टीमध्ये एक गोष्ट विशेष प्रामुख्याने नजरेस येते; ती ही की त्यांना कोणत्याहि धर्ममतसाधनाचे वेळीं गुरूला धुंडत बसावें लागले नाही—गुरूच आपण होऊन त्यांच्याकडे धांवून आले !! तंत्रमत-साधनेचे वेळीं, वात्सल्यभाव-साधनेचे वेळी, वेदांतमत-साधनेचे वेळीं, इस्लामधर्म-साधनेचे वेळीं—या सर्व वेळीं, त्या त्या मतांतील सिद्ध पुरुषांचें दक्षिणेश्वरीं आगमन झाले, यावरून वरील गोष्ट सिद्ध होते. श्रीरामकृष्ण नहमी म्हणत,-" ईश्वरावर सर्व भार समर्पण करून, त्याच्या दर्शनासाठी, त्याची व्याकुळतेने प्रार्थना करीत असावें, म्हणजे तो सर्व कांही व्यवस्था करून देतो. " तसच येथेहि झालें; असो.

श्रीरामकृष्णांच्या तोंडून असें ऐकण्यात आलें आहे, की ब्राह्मणीचा जन्म कुठे तरी पूर्व बंगाल्यांत झाला. तिला पाहतांच असं वाटें, की कुठल्या तरी थोर कुळांत इचा जन्म झाला असावा. पण तें कुळ कोणतें अथवा तिचें सासर कोठे व कोणत्या घराण्यांत होतें अथवा इतक्या प्रौढ वयांत, संन्यासिनी होऊन देशीं विदेशीं भ्रमण करण्याला तिला कारण तरी काय झालें अथवा ती एवढी शिकली कोठे व केव्हां, व तिने आपली उन्नति तरी कशी व कोठे करून घेतली, वगैरे गोष्टींची कांही एक माहिती आम्हांला मिळाली नाही अथवा श्रीरामकृष्णांच्या सांगण्यांतहि कधी आली नाही. साधनांमध्ये ती अत्यंत उच्च पदाला पोहोचली होती, हें निराळें सांगण्याची जरूरीच नाही. प्रत्यक्ष श्रीजगन्मातेकडूनच श्रीरामकृष्णांना साहाय्य करण्याचा तिला आदेश मिळालेला होता, यावरून ही गोष्ट आपोआपच सिद्ध होते.

गुणांनी तशीच रूपानेहि ब्राह्मणी असामान्य होती. श्रीरामकृष्ण सांगत असत–" ब्राह्मणीचें अलौकिक रूपलावण्य पाहून व तिचें एकटें राहणें व स्वतंत्र वृत्ति पाहून, मथुरबाबूंच्या मनांत तिच्या चारित्र्याविषयी प्रथम प्रथम संशय उपस्थित झाला होता. एक दिवस ती श्रीजगन्मातेचें दर्शन घेऊन मंदिरांतून बाहेर पडत असतां, तिला चेष्टेने ते म्हणूनहि गेले–" भैरवी, तुझा भैरव कुठे आहे ? " मथुरानाथांनी अकस्मात केलेला हा प्रश्न ऐकून यत्किंचितहि न गडबडतां अथवा न रागावतां तिने मथुरानाथांकडे शांतपणे क्षणभर पाहिले आणि जगदंबेच्या पायाखाली शवरूपाने* पडून असलेल्या महादेवाच्या मूर्तीकडे, तेथूनच बोट दाखविले ! संशयी व विषयी मथुरबाबू एवढयाने थोडेच गप्प बसणार होते ? ते म्हणाले, "वा ? तो भैरव तर अचल आहे !" हें ऐकून ब्राह्मणीने गंभीर स्वराने उत्तर दिलें—" मला जर अचेतनाला सचेतन करिता येत नसेल, तर मग एवढी भैरवी तरी झाले कशाला ? " हें शांत व गंभीर उत्तर ऐकून मथुरबाबू लाजले व ब्राह्मणीची अशी भलतीच थट्टा केल्याचें त्यांना वाईट वाटलें. पुढे ब्राह्मणीचे थोर गुण व स्वभाव यांची त्यांना ओळख होऊन, त्यांच्या मनांतील हा दुष्ट संशय गळून नाहीसा झाला. "

श्रीरामकृष्णांच्या पहिल्या भेटीच्या वेळेसच ब्राह्मणीने त्यांना चंद्र व गिरिजा यांच्याविषयी सांगितले. ती म्हणाली, " बाबा, तुमच्यापैकी दोघांची गांठ याचेपूर्वीच पडली आणि आज इतके दिवस धुंडाळतां धुंडाळतां तूं सापडलास ! पुढे केव्हां तरी त्यांच्याशीं तुझी गांठ घालून देईन. " आणि खरोखरच पुढे कांही दिवसांनी तिने चंद्र व गिरजा यांना दक्षिणेश्वरीं आणवून, त्यांची व श्रीरामकृष्णांची गांठ घालून दिली. श्रीरामकृष्णांच्या सांगण्यांत असें आलें आहे की हे दोघेहि उच्च दर्जाचे साधक होते. परंतु साधनांच्या मार्गामध्ये पुष्कळ उन्नत होऊन सुद्धा, त्यांना ईश्वराच्या दर्शनाचा लाभ झाला नाही.

---

* महादेव शव होऊन पडले असून, जगदंबा त्यांच्या छातीवर पाय देऊन उभी आहे—अशी दक्षिणेश्वरची श्रीकालीची मूर्ति आहे.

श्रीरामकृष्ण म्हणत असत-"चंद्र मोठा प्रेमळ व भक्तिमान ईश्वरभक्त होता. त्याला गुटिका सिद्धि प्राप्त झाली होती. मंतरलेली गुटिका त्याने अंगावर धारण केली म्हणजे तो कोणालाहि दिसत नसे. परंतु अशा प्रकारची एखादी सिद्धि प्राप्त झाली म्हणजे मनुष्याला अहंकार उत्पन्न होतो. अहंकाराबरोबरच निरनिराळ्या वासना मनांत उत्पन्न होतात व त्या वासनांच्या जाळ्यांत मनुष्य गुरफटला की तो आपल्या उच्च ध्येयापासून च्युत होतो. अहंकारवृद्धि म्हणजेच पुण्याचा ऱ्हास व पापाची वृद्धि आणि अहंकाराचा ऱ्हास म्हणजेच पुण्याची वृद्धि व पापाचा ऱ्हास. अहंकारवृद्धीनेच धर्महानि; त्याच्या नाशानेच धर्मलाभ; स्वार्थपरता म्हणजेच पाप व स्वार्थनाश म्हणजेच पुण्य—ह्या गोष्टी किती तरी वेळां श्रीरामकृष्ण आम्हांला निरनिराळ्या तऱ्हेने समजावीत. ते म्हणत-" बाबांनो, अहंकारालाच शास्त्रांत चिज्जडग्रंथी असें म्हटलेलें आहे. चित् म्हणजे ज्ञानस्वरूप आत्मा व जड म्हणजे देह इंद्रियें वगैरे. या दोन निरनिराळ्या वस्तूंची, अहंकारच एकत्र गांठ बांधून, मनुष्याच्या मनांमध्ये " मी देहेंद्रियबुद्ध्यादिविशिष्ट असा जीव आहे, " असा भ्रम उत्पन्न करीत असतो. ही चित् व जड वस्तूंची गांठ सुटल्याशिवाय तो जात नाही. त्याचा त्याग केला पाहिजे. आईने मला दाखवून दिलें आहे की सिद्धि या विष्ठेसमान आहेत. त्यांच्याकडे कधीहि मन जाऊं देऊं नये. साधना करीत असतां साधकाला या सिद्धि केव्हां केव्हां आपोआप प्राप्त होत असतात, परंतु त्यांच्याकडे लक्ष दिलें की, साधकाची उन्नति खुंटलीच म्हणून समजावें."

साधना करीत असतां एकदा विवेकानंदांना दूरदर्शनाची व दूरश्रवणाची शक्ति एकाएकी प्राप्त झाली. ध्यान करीत असतां एखाद्या दूर ठिकाणीं कोण काय बोलतें आहे, हें त्यांना सर्व समजावें ! दोन तीन दिवसांनी, श्रीरामकृष्णांना ही गोष्ट सांगतांच ते म्हणाले-" सिद्धि म्हणजे ईश्वरलाभाच्या मार्गांतील अडथळे होत. तूं कांही दिवसपर्यंत ध्यानच करीत जाऊं नकोस ! " असो.

गुटिका-सिद्धि प्राप्त झाल्यामुळे चंद्राच्या मनांत अहंकार उत्पन्न झाला आणि एका धनाढ्य मनुष्याच्या मुलीवर आसक्त होऊन आपल्या सिद्धीच्या

बळावर तो तिच्याकडे येऊं जाऊं लागला. अशा रीतीने अहंकार व स्वार्थपरता यांच्या वृद्धीने, हळूहळू त्याची सिद्धि नष्ट झाली व त्याची नानाप्रकारें फजिती झाली.

गिरिजाच्या* अंगींहि अशीच अलौकिक शक्ति उत्पन्न झाली होती. एक दिवस श्रीरामकृष्ण गिरिजाबरोबर शंभू मल्लिकांच्या बगीच्यांत फिरण्यास गेले होते. शंभू मल्लिकांची श्रीरामकृष्णांवर फार प्रीति असे. श्रीरामकृष्णांची कोणत्याहि तऱ्हेची सेवा करावयास मिळाल्यास, त्यांना मोठी धन्यता वाटे. त्यांनी माताजींच्यासाठी म्हणून, मुद्दाम जवळच थोडीशी जमीन विकत घेऊन, तेथे एक लहानसें घर बांधून दिलें होतें. माताजी गंगास्नानास अथवा श्रीरामकृष्णांच्या दर्शनास आल्या, म्हणजे त्याच घरांत पुष्कळदा राहात. शंभू मल्लिकांची पत्नी माताजींची देवताज्ञानाने पूजा करी. मथुरबाबूनंतर कित्येक दिवसपर्यंत श्रीरामकृष्णांचें कलकत्त्यास जाण्यायेण्याचें भाडे, नेहमी शंभूबाबूच देत. त्यांना विशेष कांही वस्तूंची गरज दिसल्यास ती त्यांना लगेच आणून देत. मथुरानाथांच्या मागून श्रीरामकृष्णांच्या सेवेचा अधिकार शंभूबाबूंनाच प्राप्त झाला होता. श्रीरामकृष्ण शंभूबाबूंना आपले "द्वितीय देहरक्षक" (Body guard) असे म्हणत. त्यांचा बगीचा कालीमंदिरापासून जवळच असल्यामुळे श्रीरामकृष्ण नेहमी तेथे फिरावयास जात व शंभूबाबूंशी तासतास ईश्वरविषयक गोष्टी करून परत येत; असो.

त्या दिवशीं श्रीरामकृष्ण व गिरिजा तेथे फिरावयास गेले. श्रीरामकृष्ण म्हणत–"भक्तांचा स्वभाव गांजाखोरासारखा असतो. गांजाखोर चिलीम भरून, तिचा एक दम आपण स्वतः ओढून, ती चिलीम दुसऱ्याच्या हातीं देतो. असा एखादा दुसरा गांजाखोर जवळ नसला म्हणजे एकटे चिलीम ओढून त्याला चांगलीशी निशा चढत नाही व त्याचें समाधान होत नाही! भक्तां-

---

* यांचें नांव "गिरिजानाथ" अथवा "गिरिजाशंकर" असावें.

चेंहि असेंच होतें ! दोघे भक्त एका ठिकाणीं मिळाले, म्हणजे त्यांतील एकजण ईश्वरीय कथाप्रसंगांत तन्मय होऊन आनंदमय होऊत चुप बसतो व ईश्वरीय कथा सांगण्याला दुसऱ्याला अवसर देतो आणि त्या कथा ऐकून आपल्या आनंदांत अधिकच निमग्न होतो." त्या दिवशींहि असेंच झालें. ईश्वरीय कथा-प्रसंगांत वेळ किती झाला याचें कोणासच भान राहिलें नाही. संध्याकाळ टळून जाऊन एक प्रहर रात्र झाली, तेव्हां कुठें परत जाण्याची श्रीरामकृष्णांना शुद्ध आली ! शंभूबाबूंचा निरोप घेऊन गिरिजाबरोबर ते परत फिरले व काली-मंदिराच्या रस्त्याने चालूं लागले. पण रात्र बरीच झाली असल्यामुळें, अंधार फार पडला होता व डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नव्हते ! रस्ता चुकूं लागला व पावलोपावलीं ठेचा लागूं लागल्या ! श्रीरामकृष्ण गिरिजाचा हात धरून कसे तरी हळूहळू ठेचाळत चालले होते; पण यामुळे त्यांना अत्यंत कष्ट होऊं लागले. हे पाहून गिरिजा म्हणाला–" दादा ! जरा उभे राहा पाहूं, मी तुम्हांला उजेड दाखवितों." असें म्हणून तो त्यांना पाठमोरा उभा राहिला आणि त्यांच्या पाठींतून, प्रकाशाचे लांबच लांब किरण बाहेर निघून, त्या साऱ्या रस्त्यावर चक्क उजेड पडला ! ! श्रीरामकृष्ण सांगत–" त्या उजेडाने काली-मंदिराच्या फाटकापर्यंतचा सर्व रस्ता लख्ख दिसूं लागला व त्या उजेडांतच मी त्या रस्त्याने निघून आलों !" असें म्हणून श्रीरामकृष्ण थोडेंसे हासले व पुन्हा म्हणाले, " परंतु गिरिजाची ही शक्ति यापुढे फार दिवस टिकली नाही. कांही दिवसांच्या इथल्या ( माझ्या ) सहवासाने ती सिद्धि नाहीशी झाली !" याचें कारण विचारतां ते म्हणाले–" त्याच्या कल्याणासाठी मातेने त्याची ती सिद्धि ( स्वतःकडे बोट दाखवून ) या शरीरांत आकर्षण करून घेतली ! यानंतर त्याचें मन सिद्धीवरून उडून जाऊन ईश्वराच्या मार्गांत अधिकाधिक अग्रसर होऊं लागलें."

---

# २४. श्रीरामकृष्णांची तंत्रसाधना

## ( १८६१-६३ )

"………मुख्य मुख्य चौसष्ट तंत्रांमध्ये ज्या ज्या साधना सांगितल्या आहेत, त्या त्या सर्व, ब्राह्मणीने माझ्याकडून, एकामागून एक करून घेतल्या. काय त्या कठीण साधना ! त्या करूं लागल्या असतां बहुतेक साधक पथभ्रष्ट होतात, पण आईच्या कृपेने मी त्या साऱ्यांतून पार पडलों."

"कोणत्याहि साधनेला मला तीन दिवसांहून अधिक वेळ लागला नाही."

—श्रीरामकृष्ण

---

भैरवी ब्राह्मणीचें दक्षिणेश्वरीं आगमन झालें, त्यावेळीं श्रीरामकृष्णांना श्रीजगदंबेचें दर्शन झालेलें होतें. अर्थातच त्यांचा अधिकार त्यावेळीं फार मोठा होता व साधना करण्याचा जो उद्देश असतो, तो त्यांचा साध्य झाला होता. असे होतें तर मग, त्यांना ईश्वरदर्शनानंतरहि पुन्हा साधना करण्याचें काय प्रयोजन होतें व ब्राह्मणीला हा एवढा खटाटोप करण्याचें काय कारण होतें, हे दोन प्रश्न सहजच उद्भवतात.

पैकी पहिल्या प्रश्नाचें उत्तर देणें फार कठीण आहे. ईश्वरदर्शनानंतर आपल्याला साधना कां कराव्या लागल्या, याबद्दल वेगवेगळ्या वेळीं, स्वतः श्रीरामकृष्णांनी वेगवेगळीं कारणें सांगितलीं आहेत. (१) एकदा ते म्हणाले:— वृक्षलतादिकांचा साधारण नियम असा आहे की, त्यांना अगोदर फुलें येतात व

मग फळें येतात. परंतु त्यांतील एखादें असें असतें की, त्याला अगोदर फळ व मागाहून फूल येतें. माझ्याहि बाबतींत असेंच झालें. ” परंतु यावरूनहि-‘असें कां झालें, ’ हा प्रश्न शिल्लकच राहतो.

( २ ) आणखी एकदा ते म्हणाले-“ हे पाहा, जो समुद्राच्या किनाऱ्यावर राहतो, त्याला कधी कधी वाटतें की, या रत्नाकरांत कोणकोणतीं रत्नें आहेत, हें पाहावें. त्याचप्रमाणे आईची कृपा झाल्यावर मला असें वाटावें की, सच्चिदानंद-सागरांत काय काय रत्नें पडलेलीं आहेत ते पाहावें. म्हणून तीं पाहण्यासाठी आईजवळ मी हट्ट धरून बसे व माझी परमकृपाळू आईहि माझा अत्यंत आग्रह पाहून माझे हट्ट पुरवी ! अशाच रीतीने निरनिराळ्या धर्मांच्या साधना माझ्याकडून घडल्या ! ” या त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असाच दिसतो की, ह्या निरनिराळ्या मतांच्या साधना त्यांनी केवळ जिज्ञासेने—कौतुकाने केल्या.

( ३ ) आणखी एकदा ते म्हणाले-“ स्वरूपाने माझ्याचसारखा एक तरुण संन्यासी कधी कधी ( स्वतःकडे बोट दाखवून ) या देहांतून बाहेर निघून सर्व गोष्टींमध्ये मला उपदेश देई;······त्याच्या तोंडून मी जे ऐकलें होतें, त्याचाच उपदेश न्यांगटा व ब्राह्मणी यांनी येऊन पुन्हा एकवार केला...... यावरून असें वाटतें की, वेदशास्त्रें वगैरेंत सांगितलेल्या विधींची मर्यादा रक्षण करण्यासाठीच त्यांना गुरुस्थानीं मानून मला त्यांच्यापासून पुन्हा उपदेश घ्यावा लागला; नाही तर सर्व कांही अगोदरच माहीत असतां, पुन्हा त्या गोष्टी सांगण्यासाठी न्यांगटा* वगैरेंना गुरुरूपाने येण्याचें कांही प्रयोजन सापडत नाही. ” यावरून त्यांच्या ईश्वरदर्शनानंतरच्या साधना म्हणजे केवळ शास्त्रांची मर्यादा रक्षण करण्यासाठी होत्या, त्यांना स्वतःला त्यांची तादृश आवश्यकता नव्हती, असें म्हणावें लागतें.

---

* श्रीमत् तोतापुरींना श्रीरामकृष्ण न्यांगटा म्हणत.

(४) त्याचप्रमाणे त्यांनी स्वतःच असेंहि म्हणून दाखविलें आहे की, " तेव्हां मला नानाप्रकारची ईश्वरीय रूपांचीं दर्शनें होत. परंतु 'हा सर्व माझ्या डोक्याचा भ्रम तर नाहीना ?' असा मला संशय वाटे. म्हणून हें खरें की खोटें याचा पडताळा पाहण्यासाठी 'अमुक गोष्ट घडून येईल तर हें दर्शन मी खरें आहे असें समजेन-' असें मी म्हणावें आणि तेव्हां तसें घडूनहि यावें !' याच्या उदाहरणादाखल ते सांगत, 'एकदा मी म्हणालों-'राणी रासमणीच्या दोन मुली यावेळीं येथे येऊन पंचवटीखाली उभ्या राहून जर मला हांक मारतील, तर मी हे सर्व खरें आहे असें मानीन '* आणि त्या मुली त्याच वेळीं तेथे येऊन त्यांनी मला हांक मारली व म्हटलें, 'तुम्हांवर जगदंबा लवकरच कृपा करील !' तसेंच आणखी एकदा म्हणालों-' जर हे समोरचे दगड बेडकासारख्या टण टण उडया मारतील तर माझी दर्शनें खरीं आहेत. असें मी समजेन !!, आणि खरोखर ते दगड बेडकाप्रमाणे उडया मारीत आहेत असें मला दिसलें ! " यावरून असें दिसतें की, आपल्याला प्राप्त झालेलीं दर्शनें आणि अनुभव खरे आहेत की खोटे आहेत, असा अत्यंत प्रबल संशय त्यांच्या मनांत वरचेवर उत्पन्न होई.

या उपरोक्त वचनांची एकवाक्यता कशी करतां येईल हें पाहण्यासाठी खालील गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. त्यांच्या वचनांवरून एवढें स्पष्ट दिसतें की—

(१) ईश्वरदर्शनानंतर कांही काळपर्यंत तरी स्वतःला प्राप्त झालेल्या अनुभवांसंबंधी ते पूर्णपणे निःसंशय झाले नव्हते.

(२) ब्राह्मणी, श्रीमत् तोतापुरी वगैरेंनी त्यांच्याकडून ज्या साधना करवून घेतल्या त्यांच्या फलाफलाची त्यांना अगोदरपासूनच माहिती होती.

---

* राणीच्या घरीं पडदा-पद्धति असल्यामुळे घरांतील स्त्रिया कधीहि बाहेर पडत नसत.

( ३ ) श्रीजगदंबेचें दर्शन झाल्यानंतर इतर मतांच्या साधना त्यांनी केवळ कौतुकानें इतर मतांत काय सांगितलें आहे तें सहज पाहावें या इच्छेने केल्या.

हें लक्षांत ठेवून ईश्वरदर्शनानंतर साधना करण्याच्या कारणाची मीमांसा करू लागल्यास असें म्हणतां येईल की, श्रीजगदंबेचें दर्शन झाल्यानंतर त्यांना जे आध्यात्मिक अनुभव प्राप्त होऊं लागले, त्यांविषयी त्यांचें मन साशंकच असल्याने त्यांची संशयनिवृत्ति होण्याची अत्यंत आवश्यकता होती. त्यांच्या शरीरांतून बाहेर येऊन त्यांना उपदेश देणाऱ्या संन्याशाने हेंच काम केलें व त्यांचे मन संशयरहित केले. पुढें ब्राह्मणी व श्रीमत् तोतापुरी वगैरे गुरुमंडळी आल्यानंतर त्यांच्या सांगण्याप्रमाणे श्रीरामकृष्णांनी ज्या साधना केल्या, त्या केवळ कौतुकाने म्हणून केल्या—अथवा निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—हें त्यांचे देह-प्रारब्ध होतें. श्रीजगदंबेने त्यांस ह्या साधना करण्याची आज्ञा देण्यांत अशा पुरुषाचा, वंग देशांत विशेषेंकरून रूढ असलेला आणि सांप्रतकालीं अधिक उपकारक, असा तंत्र-संप्रदाय कायम ठेवण्याच्या आणि उत्तेजित करण्याच्या कार्यांत उपयोग करावा, असा हेतु असणेंहि शक्य आहे.

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते ॥ गी. ३।१७

अशा अधिकाराच्या सत्पुरुषांची धर्मसंस्थापनेच्या कामांत जगन्नियंत्या-कडून वेळोवेळीं योजना झालेली पाहण्यांत येते. इंद्र, मनु, वसिष्ठ, व्यास इत्यादि नांवें एकेका व्यक्तीचीं नसून, वेळोवेळीं विशिष्ट कार्यें करण्यास नियुक्त केलेल्या भिन्न भिन्न व्यक्तींस, ते ते अधिकार मिळाल्याने, प्राप्त होत असतात, असें पुराणें, योगवासिष्ठ, शारीरिक भाष्यादि ग्रंथांत आढळतें. यावरून सत्पुरुषांची विशिष्ट कार्यें करण्यांत योजना होणें ही जगन्नियंतृत्वाच्या क्रियेतील नेहमीची पद्धति आहे, असें स्पष्ट दिसतें. या पद्धतीस अनुसरून श्रीरामकृष्णांची योजना तांत्रिक संप्रदायाची शुद्ध परंपरा कायम ठेवण्यास आणि ती विशेष प्रच-लित करण्यासहि जगन्मातेने केली असावी, हें शक्य आहे. श्रौतकर्मांत

अमुक धान्यें, अमुक वृक्षाच्या समिधा, इत्यादि साहित्याची आणि विशिष्ट कुंड, मंडप, यूप, वेदी आणि विधान यांची निरनिराळ्या यज्ञयागांस आवश्यकता असते त्याप्रमाणेच तांत्रिक उपासनेंतील, अंतर्यागाच्या पूर्तीस अंगभूत असलेल्या बाह्य विधानांस ब्राह्मणीने उपयोगांत आणलेल्या भिन्न भिन्न पदार्थांची आवश्यकता पडणें अपरिहार्य होतें, असें दिसतें आणि म्हणूनच, निमूटपणे जगन्मातेच्या आज्ञेचें पालन करण्याच्या हेतूने—बागेचा माळी नेईल तिकडे पाणी वाहात जातें त्याप्रमाणे—विधिवाक्यास आणि ब्राह्मणीच्या आज्ञेस अनुसरून तांत्रिक साधना करीत असतां, श्रीरामकृष्णांनी आपली वागणूक ठेविली होती, असे दिसते.

या दृष्टीने विचार केल्यास—"श्रीरामकृष्णांना ईश्वरदर्शनानंतर साधना करण्याचे काय प्रयोजन होते," या प्रश्नाचा बराचसा उलगडा होईल, असें वाटते. या प्रश्नाचा आणखी एका निराळ्या दिशेने विचार प्रस्तावनेंत झालाच आहे.

दुसऱ्या प्रश्नाचेंहि एकच असे स्पष्ट उत्तर देतां येत नाही. ब्राह्मणीच्या मतें त जर अवतार होते, तर त्यांनीहि साधारण जीवाप्रमाणे साधना केल्या पाहिजेत, असे तिला कां वाटले ? यावरून असें म्हणतां येईल की, त्यांच्या विषयीचे हें ऐश्वर्यज्ञान जर ब्राह्मणीच्या मनांत सदोदित कायम राहिलें असतें, तर मात्र श्रीरामकृष्णांनी साधना वगैरे केल्या पाहिजेत, असें तिला वाटण्याचा संभव नव्हता परंतु तसें झाले नाही. पूर्वीच सांगितले आहे की, पहिल्या भेटीपासूनच ब्राह्मणीच्या मनांत श्रीरामकृष्णांविषयी स्वतःच्या मुलासारखें प्रेम उत्पन्न झालें होतें व या अपत्यप्रेमानेच तिला श्रीरामकृष्णांच्या ऐश्वर्यज्ञानाचा विसर पडला होता ! श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण वगैरे अवतारी पुरुषांच्या चरित्रांतहि हीच गोष्ट घडून आलेली दिसून येईल. त्यांच्या माता व इतरहि निकट संबंधी, यांच्या मनांत त्यांच्या अवतारत्वाची व आध्यात्मिक ऐश्वर्याची जाणीव जरी मधे मधे उत्पन्न होई, तरी पण प्रेमाच्या अद्‌भुत आकर्षणाने, थोडयाच वेळांत त्यांना त्यांच्या महिम्याचा विसर पडे. अशीच गोष्ट ब्राह्मणीची झाली असावी. त्यांचा अलौ भावावेश व शक्तिप्रकाश पाहून ब्राह्मणी वरचेवर स्तंभित होऊन जाई, तरी

त्यांचें तिजविषयींचें अकृत्रिम मातृप्रेम, तिच्यावरचा पूर्ण विश्वास व अत्यंत सरळ वर्तन, हीं सर्व पाहून, तिच्या मनांतील वात्सल्यभाव जागृत होई व यामुळे ती त्यांचा महिमा विसरून जाई व त्यांना यत्किंचित् सुख होण्यासाठी वाटेल ते कष्ट सहन करण्यास, दुसऱ्याच्या हातून होणाऱ्या त्रासापासून त्यांचा बचाव करण्यास आणि साधनेमध्ये त्यांना हरएक प्रकारची मदत करण्यास, ती नेहमी कमर बांधून तयार होई. असेंहि असण्याचा संभव आहे.

अथवा या प्रश्नाचा दुसऱ्याहि दृष्टीने विचार करतां येण्यासारखा आहे. ऋणत्रयांतील ऋषिऋण फेडण्यास, स्वाध्याय आणि प्रवचन अथवा अध्ययन आणि अध्यापन करणें, जसें ब्राह्मणास आवश्यक आहे तसेंच संप्रदायखंडन होऊं न देणें, हें प्रत्येक अधिकृत साधकाचें कर्तव्य आहे. त्यास अनुसरून ब्राह्मणीस, श्रीरामकृष्णांच्या सारखा अधिकारी सच्छिष्य मिळतांच, आपलें कर्तव्य पूर्ण करण्याची इच्छा झाली असावी. अथवा—आपणांस जे प्रिय असेल त्याचा आपल्याबरोबरच नाश न होतां, आपण असतांना व आपल्या मागेहि त्याचा उपयोग आपल्या जिवलग आप्तांस मिळावा अशी मनुष्यांची इच्छा असते. या इच्छेच्या प्राबल्याने मृत्युपत्र करणें, दत्तक घेणें इत्यादि उपायांची योजना व्यवहारांत करण्यांत येत असते. याच इच्छेच्या प्राबल्याने विश्वामित्रासारख्या तपोधनाने, सिद्धाश्रम सोडून यज्ञरक्षणाच्या मिषाने श्रीरामचंद्रांसारख्या अवतारी पुरुषास याचना करून आपल्याबरोबर नेल्याचें व त्यास सर्व अस्त्रविद्या शिकविल्याचें उदाहरण, आदिकवीच्या जगद्वंद्य काव्यांत आपणांस सापडतें. त्याच इच्छेच्या प्राबल्याने ब्राह्मणीने हा खटाटोप केला असेल, हेंहि शक्य दिसतें. असो.

सच्छिष्य मिळाला म्हणजे सद्गुरूला अत्यंत समाधान होतें. सध्याच्या काळीं श्रीरामकृष्णांसारखा अलौकिक सच्छिष्य आपल्याला मिळेल, अशी ब्राह्मणीला कल्पना नव्हती; अर्थातच श्रीरामकृष्ण शिष्य म्हणून लाभल्यावर तिला केवढा आनंद झाला असेल याची कल्पनाच करावी. इतक्या दिवसांच्या आपल्या

साधनांचें व तपश्चर्येचें फल शक्य तितक्या थोडया वेळांत श्रीरामकृष्णांच्या पदरांत कसें टाकतां येईल, हाच एक विचार तिच्या मनांत आता घोळूं लागला.

साधनांना सुरुवात करण्याचे अगोदर, यासंबंधी श्रीरामकृष्णांनी श्रीजगन्मातेला विचारून तिची परवानगी घेतली होती, असें आम्हीं प्रत्यक्ष त्यांच्याच तोंडून ऐकिले आहे. अर्थातच एकदा जगन्मातेची परवानगी मिळाल्या-वर व साधना करावयाची असें ठरल्यावर, मग श्रीरामकृष्णांच्या उत्साहाला काय विचारावयाचे आहे ? त्यांतच आणखी ब्राह्मणीच्या उत्तेजनाची भर ! झालें. त्यांना आता साधनेवांचून दुसरें कांही सुचेनासें झालें ! एकसारखी त्यांना आतां हीच तळमळ लागली. त्या तळमळीची तीव्रता केवढी जबरदस्त होती, याची आमच्यासारख्या साधारण मानवांस कल्पनासुद्धा करतां येणार नाही. कारण आमचें मन पडलें नानाप्रकारच्या विचारांत विभागलेलें; तेव्हां. आमच्याजवळ श्रीरामकृष्णांसारखी उपरति व एकाग्रता कोठली सापडावी ? आत्मस्वरूपरूपी समुद्राच्या पृष्ठभागावरील चित्रविचित्र लाटांनी मोहित होऊन न जातां, त्याच्या तळाचीं रत्ने हस्तगत करण्यासाठी एकदम त्यांत बुडी मारण्याचें असीम साहस, आमच्या अंगीं कोठलें सापडावें ? " एकदम बुडी मारून बसा ," " आत्मस्वरूपांत बुडी मारा, " असें म्हणून श्रीरामकृष्ण ज्या तऱ्हेने आम्हांला वरचेवर उत्तेजन देत, त्या तऱ्हेने जगांतील सर्व पदार्थ व स्वतःचें शरीर, यांवरील सर्व माया ममता दूर झुगारून देऊन, आत्मस्वरूपात एकदम बुडी मारण्याचें सामर्थ्य आमच्यांत कोठलें सापडावें ? हृदयांतील असह्य वेदनांनी व्याकुळ होऊन " आई दर्शन दे ग, " असा आक्रोश करीत पंचवटीखाली ते आपलें डोकें आपटून घेत आणि मातींत गडबडा लोळत व असा प्रकार कित्येक दिवस चालूनहि त्यांची व्याकुळता कमी होत नसे, ही गोष्ट जेव्हां आम्ही ऐकतों, तेव्हां केवळ—" नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें, " अशीच आमची स्थिति होते; या गोष्टीला अनुरूप अशा प्रकारची संवेदना आमच्या हृदयांत उत्पन्न झाल्याचा आम्हांला बिलकुल अनुभव येत नाही ! आणि तो यावा तरी कसा ? श्रीजगन्माता म्हणजे खरोखर आहे आणि सर्व-

स्त्राचा होम करून व्याकुळ हृदयाने तिचा धांवा केला तर खरोखरच तिचें दर्शन होऊं शकतें, या गोष्टीवर श्रीरामकृष्णांच्यासारखा सरळ विश्वास आमचा कधी तरी बसतो काय ?

साधनाकाळीं श्रीरामकृष्णांच्या मनांतील उत्साह व तळमळ हीं किती तीव्र होतीं, याची थोडीशी कल्पना, काशीपुरांतील बगीच्यांत राहात असतांना आम्हांला त्यांनी दिली. स्वामी विवेकानंद यांना त्यावेळीं ईश्वरदर्शनाची केवढी प्रचंड तळमळ लागलेली होती, हे तर आम्ही प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहात होतों. वकीलीच्या परिक्षेला बसण्यासाठी फी जमा करीत असतां त्यांना एकाएकीं कसें तीव्र वैराग्य प्राप्त झालें व त्या भरांत फक्त एक धोतर नेसून, अनवाणीच एखाद्या उन्मत्तासारखें शहरापासून तों काशीपुरापर्यंत धांवत जाऊन त्यांनी श्रीरामकृष्णांचे चरण धरून आपल्या मनाची व्याकुळता त्यांना कशी सांगितली; त्या दिवसापासून आहार, निद्रा, यांकडेहि पूर्ण दुर्लक्ष करून ते रात्रंदिवस कसे जप, ध्यान, भजन यांतच निमग्न होऊन, राहूं लागले; साधनांच्या उत्साहाने त्यांचें कोमल हृदय वज्रासारखे कठोर होऊन, ते आपल्या घरच्या स्थितीविषयी कसे पुरे उदासीन बनले आणि श्रीरामकृष्णांनी सांगितलेल्या साधनामार्गाचें अत्यंत श्रद्धेने अवलंबन करून, केवळ तीन चार महिन्यांच्या अवधींत त्यांनी निर्विकल्प समाधिसुखाचा कसा अनुभव घेतला;—या सर्व गोष्टी आमच्या नजरेसमोर घडत असल्यामुळे, त्यांच्या वैराग्याची, उत्साहाची व व्याकुळतेची आम्हांला पूर्ण कल्पना आली होती. श्रीरामकृष्णसुद्धा अत्यंत आनंदाने, स्वामीजींच्या उत्साहाची व व्याकुळतेची मनमुराद प्रशंसा करीत. त्या सुमारास एक दिवस स्वामीजींची व आपली स्वतःची, साधनोत्साहासंबंधाने तुलना करून श्रीरामकृष्ण म्हणाले—“ नरेंद्राचा साधनोत्साह व व्याकुळता अत्यंत अद्भुत तर खरीच; परंतु त्यावेळीं ( साधना करीत असतां ) या उत्साहाने व व्याकुळतेने इथे ( स्वतःच्या मनांत ) जी प्रचंड खळबळ उडवून दिली होती, तिच्यापुढे नरेंद्राची म्हणजे कांहीच नव्हे—तिच्या पासंगालाहि ती

पुरणार नाही ! " श्रीरामकृष्णाच्या या शब्दांनी आम्ही किती चकित होऊन गेलों असूं, याची वाचकांनीच कल्पना करावी. असो.

याप्रमाणे आता श्रीरामकृष्ण इतर सर्व गोष्टी पूर्णपणे विसरून श्रीजगदंबेच्या अनुमतीने, साधनांमध्ये निमग्न झाले व साधनांना लागणारे सर्व तऱ्हेचे नानाप्रकारचे पदार्थ कोठून कोठून आणून त्यांचा साधना-क्रियांमध्ये कशा रीतींने उपयोग करावा, हे ब्राह्मणी श्रीरामकृष्णांना समजावून देऊन त्यांना हरतऱ्हेचें साह्य करूं लागली. गंगाहीन प्रदेशांतून तिने मोठया प्रयत्नाने नृमुंड आदिकरून पांच जीवांची मुंडें आणविलीं व कालीमंदिराच्या आवारातील बागेच्या उत्तरेस असलेल्या बिल्ववृक्षाखाली एक व श्रीरामकृष्णांनी स्वहस्ते लावलेल्या पंचवटी-खाली एक अशा दोन वेदिका साधनेसाठी तिने निर्माण करवल्या* आणि यांपैकी ज्या वेदिकेवर बसून ज्या ज्या साधना करावयाच्या असतात, त्या वेदिकेवर बसून त्या त्या साधना करण्यांत आणि जप, ध्यान व पुरश्चरण यांत श्रीरामकृष्णांचा सर्व काळ जाऊं लागला. कित्येक महिनेपर्यंत, दिवस केव्हां आला व संपला, रात्र केव्हां आली व संपली याचे या अद्‌भुत साधकाला मुळीच भान नसे ! श्रीरामकृष्ण म्हणत—" रोज दिवसा ब्राह्मणीने इकडे तिकडे खूप हिंडून तंत्रांत सांगितलेल्या नानातऱ्हेच्या दुष्प्राप्य वस्तु मिळवाव्या व संध्याकाळ होतांच बेलाखालील अथवा पंचवटीखालील वेदिकेजवळ त्या आणून ठेवून, मला हांक मारावी; नंतर माझ्याकडून त्या वस्तूंनी श्रीजगन्मातेची यथाविधि पूजा करवावी आणि ती

* साधारणपणे सर्व ठिकाणीं पंचमुंडयुक्त अशी एकच वेदिका साधने-साठी तयार करीत असतात. परंतु ब्राह्मणीनें दोन वेदिका तयार करविल्याचें स्वतः श्रीरामकृष्णांच्या तोंडून आम्हीं ऐकलें आहे. त्यांपैकी बिल्ववृक्षाखाली तयार केलेल्या वेदिकेखाली तीन नृमुंडें पुरलेलीं होतीं व पंचवटीखालील वेदिके-खाली पांच प्रकारच्या जिवांचीं मुंडे पुरलेली होतीं. साधना संपल्यावर ह्या वेदिका त्यांनी मोडून टाकल्या व हीं सर्व मुंडें त्यांनी स्वतः उकरून काढून गंगेमध्ये फेंकून दिलीं.

संपल्यावर मला जप, ध्यान वगैरे करण्यास सांगावें. ब्राह्मणीने सांगितल्याप्रमाणे मीं सर्व करीत जावें; परंतु जप वगैरे फार वेळ करावा लागत नसे, एक वेळ माळ फिरवितों व फिरवितों तोंच समाधि लागत असे! याप्रकारें त्याकाळीं किती अद्‌भुत दर्शनें व किती विचित्र विचित्र अनुभव प्राप्त झाले, त्यांची गगतीच नाही. मुख्य मुख्य चौसष्ट तंत्रांमध्ये ज्या ज्या कांही साधना सांगितल्या आहेत, त्या त्या सर्व माझ्याकडून ब्राह्मणीने एकामागून एक करून घेतल्या! काय त्या कठीग साधना! त्या करूं लागल्या असतां बहुतेक साधक पथभ्रष्ट होतात, पग आईच्या कृपेने मी त्या साऱ्यांतून पार पडलों.

" एक दिवस तिन्हीसाजा झाल्यावर, कोठूनशी एक सुस्वरूप तरुण स्त्री बरोबर आणून, मला हांक मारून, ब्राह्मणी म्हणाली,–' बाबा, हिला देवी समजून हिची पूजा कर.' पूजा संपूर्ग झाल्यावर ब्राह्मगी त्या स्त्रीला विवस्त्र करून म्हगाली–' बाबा, आता हिच्या मांडीवर बसून जप कर!!' हे ऐकून भीतीने माझ्या हृदयांत धडकी भरली व व्याकुळ होऊन रडत रडत मी म्हणूं लागलों, ' आई जगदंबे! या तुझ्या दीन दासाला ही काय आज्ञा करीत आहेस? या तुझ्या दीन बालकाला एवढें साहस करण्याचें सामर्थ्य कुठे आहे बरें?' असे म्हगत असतां माझ्या अंगांत जगु काय कोगाचा संचार झाला आणि हृदयांत कुठून तरी अपूर्व बल एकाएकी उत्पन्न झालें. मग एखाद्या झोपेंत असलेल्या माणसाप्रमागे, आपग काय करीत आहों हें न समजतांच, मंत्रोच्चारण करीत करीत पुढे होऊन, त्या स्त्रीच्या मांडीवर बसतों न बसतों, तोंच समाधि लागली! देहभानावर आल्यावर पाहातों तों मला शुद्धीवर आणण्यासाठी ब्राह्मगी मोठ्या प्रेमाने माझी शुश्रूषा करीत आहे! मी शुद्धीवर येतांच ब्राह्मगी म्हगाली–' बाबा, भिऊ नको, क्रिया संपूर्ग झाली बरें! इतर साधक या अवस्थेंत मोठ्या कष्टाने धैर्य धरून उगीच थोडासा जप करतात व ही क्रिया संपवितात. तू आपलें देहभानच विसरून जाऊन समाधिमग्न झालास!' हें ऐकून माझा जीव खाली पडला आणि या कठीग दिव्यांतून नीटपणे पार पाडल्याबद्दल मी कृतज्ञतापूर्ण अंतःकरणाने श्रीजगन्मातेला वरचेवर नमस्कार करूं लागलों!

" आणखी एक दिवस, एका शवाच्या कवचीमध्ये ब्राह्मणीने कांही मांसे तळून त्यांचा श्रीजगन्मातेला नैवेद्य दाखविला आणि मलाहि, तसेंच करून, तो प्रसाद ग्रहण करण्यास तिने सांगितलें ! तिच्या आज्ञेवरून मीं तेंहि केलें, तरी-सुद्धा मनामध्ये मुळीच घृणा उत्पन्न झाली नाही.

" परंतु दुसऱ्या एका दिवशीं, ती नरमांसाचा एक तुकडा घेऊन आली व त्याचा जगदंबेला नैवेद्य दाखवून मला म्हणाली–' बाबा, याला जिव्हेने स्पर्श कर ? ' तेव्हां मात्र मनांत अतिशय किळस उत्पन्न झाली व मी म्हणालों–' छे बुवा, ही गोष्ट आपल्याच्याने नाही होणार ! ' हें ऐकून ती म्हणाली–' नाही कशी? हें बघ, तुला मी करून दाखवितें ! ' असे म्हणून तो तुकडा तिने आपल्या तोंडांत घातला व ' घृणा करूं नये, ' असें म्हणत त्यांतील कांही भाग पुन्हा माझ्यापुढे केला. तिला तो तुकडा तोंडांत घालतांना पाहून श्रीजगदंबेची विक्राळ चंडिका मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली आणि ' आई, आई," म्हणत म्हणत मी भावाविष्ट होऊन पडलों ! त्या स्थितींतच ब्राह्मणीने तो तुकडा माझ्या तोंडांत घातला व त्यावेळीं अर्थातच माझ्या मनांत मुळीच घृणा उत्पन्न झाली नाही. अशा रीतीने पूर्णाभिषेक क्रिया होईपर्यंत माझ्याकडून ब्राह्मणीने रोज रोज नव्या नव्या ज्या तांत्रिक साधना करून घेतल्या, त्यांची गणतीच नाही. त्या सव साधना आता लक्षांतहि नाहीत. एवढें मात्र लक्षांत आहे की, ज्या दिवशीं आईच्या कृपेने, प्रणयी-युगुलाच्या चरम आनंदाकडे दिव्य दृष्टीने पाहण्यास मी समर्थ झालों, आणि त्यांची ती क्रिया पाहूनहि साधारण मनुष्यबुद्धीचा बिंदुमात्र उदय न होतां, केवळ ईश्वरीय भावाचेंच उद्दीपन होऊन मी समाधिस्थ होऊन पडलों त्या दिवशीं समाधि उतरल्यावर ब्राह्मणी मला म्हणाली—' बाबा, आता मात्र तूं आनंदासनावर सिद्धकाम होऊन, दिव्य भावांत पूर्णपणे अढळ बसलास ! वीर भावाची हीच अखेरची साधना ! ' तंत्रोक्त साधना करीत असतां, माझ्या मनांत स्त्री जातीविषयी मातृभाव सदैव वास करीत असे. त्याचप्रमाणे कांही साधनांमध्ये मद्याचें ग्रहण करण्याचें कारण पडे, तरी मी कधीहि मद्याला

शिवलोंहि नाही. मद्याच्या नुसत्या नांवाने अगर वासाने माझ्या मनांत जगत्कारण ईश्वराचें स्मरण होऊन, मला एकदम समाधि लागे." श्रीरामकृष्ण सांगत असत की, साधनाकाळीं कोणतीहि साधना करण्यास त्यांना तीन दिवसांहून अधिक वेळ कधीच लागला नाही! "एखादी साधना करण्यास सुरुवात केली, म्हणजे त्या साधनेचें फल प्राप्त होण्यासाठी, व्याकुळ अंतःकरणाने श्रीजगन्माते-जवळ हट्ट धरून बसावें, की तीन दिवसाच्या आंतच काम होई!"

दक्षिणेश्वरीं एक दिवस, आपला स्त्रीजातीविषयी निरंतर मातृभाव असल्याचें सांगून, श्रीरामकृष्णांनी आम्हांला गणपतीची एक गोष्ट सांगितली ती अशी-" लहानपणीं एक दिवस एक मांजर गणपतीच्या तावडीत सापडली. पोरवयच ते! गणपतींनी त्या मांजरीला खूप मारलें; तें इतकें की, त्या बिचारीचें अंग रक्ताने भरून गेलें! ती मांजर खूप धडपड करून कशीबशी एकदाची त्यांच्या हातून निसटून पळून गेली. ती गेल्यावर गणपती आपल्या आईकडे गेले पण पाहतात तों तिच्या अंगावर जागोजागीं माराचे वळ उठलेले! हें पाहून त्यांना अतिशय भीति वाटली व दुःख झालें. तसें होण्याचें कारण विचारतांच आईने खिन्न होऊन उत्तर दिलें-' बाळा, हा सगळा तुझाच प्रताप बरें!' हें ऐकून मातृभक्त गणेशांना अत्यंत विस्मय वाटला व दुःखाने डोळ्यांतून अश्रु गाळीत ते म्हणाले-' आई, मी ग तुला कधी मारलें? उगीच कांही तरी सांगतेस झालें!' यावर श्रीपार्वती म्हणाली-' आज तूं एखाद्या प्राण्याला मारलेंस की नाही, याची नीट आठवण कर पाहूं?' गणपतींनी उत्तर दिलें—' मघाशीं एका मांजरीला मारलें खरें.' ज्याची ती मांजर होती त्यानेच आपल्या आईला मार दिला, असें वाटून गणपती रडूं लागले! हें पाहून पार्वतीने गणेशांना पोटाशीं धरून म्हटलें-' बाळ, रडूं नको, मला प्रत्यक्ष कोणी मारलें नाही, पण मांजर तरी काय, माझेंच स्वरूप नव्हे का बरें? म्हणूनच माराचे वळ माझ्या अंगावर उठले आहेत! तुला ही गोष्ट माहीत नव्हती, म्हणून यांत तुझा कांही अपराध नाही, उगा राहा, रडूं नको. पण आता मात्र लक्षांत ठेव,

की जगांत जेवढीं म्हणून स्त्रीरूपें आहेत, तेवढीं सर्व माझ्या अंशापासून उत्पन्न झालीं आहेत व जेवढीं म्हणून पुरुषरूपें आहेत, तेवढीं सर्व तुझ्या पित्याच्या अंशापासून उत्पन्न झाली आहेत—शिव आणि शक्ति यांच्याशिवाय या जगांत दुसरें कांहीहि नाही.' श्रीगणेशांनी आपल्या मातेचें हें बोलणें नीट लक्षांत ठेवलें व पुढे विवाहाचा समय येतांच, आपण कोणाशींहि विवाह केला तरी काय, तो मातेशींच केल्यासारखा होणार असें पाहून, त्यांनी विवाहच करण्याचें नाकारिलें!"

श्रीगणेशांच्या स्त्रीजातीविषयीच्या या मातृभावाचा उल्लेख करून श्रीरामकृष्ण म्हणाले—"स्त्रीजातीविषयी माझाहि हाच भाव आहे आणि म्हणूनच स्वतःच्या पत्नीमध्ये सुद्धा श्रीजगदंबेचें मातृस्वरूप प्रत्यक्ष पाहून मी तिची पूजा केली."

स्त्रीजातीविषयी नेहमी मातृभाव मनांत वागवून, तंत्रोक्त वीरभावाची साधना कोणत्याहि साधकाने कधीहि केल्याचें आमच्या एकण्यांत नाही. वीरमताचा आश्रय करणारे साधक आजपर्यंत साधनाकाळीं स्त्रीग्रहण करीतच आलेले आहेत. वीरमताचा आश्रय करणाऱ्या सर्व साधकांनी स्त्रीग्रहण केलेलें पाहून लोकांची अशी एक दृढ समजूत होऊन बसली आहे की, तसे केल्यावांचून त्या साधनेमध्ये सिद्धि अथवा जगदंबेची कृपा प्राप्त होणें अशक्य आहे! आणि मुख्यतः या चुकीच्या समजुतीमुळेच तंत्रशास्त्राविषयी लोकांचा गैरसमज झाला आहे. स्त्रीजातीविषयी मनांत नेहमी मातृभाव कायम राखून, श्रीरामकृष्णांकडून तंत्रोक्त साधना करविण्यांत, लोकांचा हा गैरसमज दूर करण्याचा जगन्मातेचा हेतु असेल काय? कोणी सांगावें? स्त्रीग्रहण न करतां अशा रीतीने इतक्या थोड्य वेळांत त्यांची कोणत्याहि प्रकारची वीरभावाची साधना पूर्ण होई, यावरून एवढें स्पष्ट दिसतें की, स्त्रीग्रहण हें कांही अशा साधनेंतील प्रधान अंग नव्हें; आपले मन ताब्यांत नसलेले साधक, आपल्या मनोदौर्बल्याला बळी पडून, तसें करीत असतात. साधकांनी तसें केलें, तरी तंत्रशास्त्राने त्याला अभयच दिलें आहे व पुन्हा पुन्हा प्रयत्न केल्यास, साधक दिव्य भावाचा अधिकारी होईल, अ अभयदान दिलें आहे. यावरून उलट तंत्रशास्त्राची परम कारुणिकता मा

दिसून येतें आणि यावरून रूपरसादि जे पदार्थ मनुष्याला मोह पाडून त्याला वरचेवर जन्ममरणाच्या फेऱ्यांत पाडतात व त्याला ईश्वरदर्शनाचा व आत्मज्ञानाचा अधिकारी होऊं देत नाहीत, ते सर्व पदार्थ ईश्वराच्याच मूर्ति आहेत, अशी साधकाच्या मनांत संयम व सतत अभ्यास यांच्या द्वारा दृढ धारणा उत्पन्न करावी, हाच तांत्रिक क्रियांचा उद्देश होय, असें सहज दिसून येतें. साधकाचा संयम व त्याची मनोरचना यांच्या तारतम्याचा विचार करूनच तंत्राने पशु, वीर व दिव्य असे साधकांचे तीन भाग केले आणि क्रमशः पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भावांच्या आश्रयाने ईश्वराची उपासना करण्याचा उपदेश केला. परंतु कठोर संयम हाच तंत्रशास्त्रोक्त साधनांचा पाया आहे आणि जो संयमी असेल तोच त्या साधनांचे फल हस्तगत करील, ही गोष्ट कालक्रमाने साधक जवळ जवळ विसरूनच गेले होते व अशा साधकांनी केलेल्या कुकर्माचे सर्व खापर तंत्रशास्त्राच्याच डोक्यावर फोडून, लोक त्या शास्त्राचीच निंदा करूं लागले होते; म्हणून, स्त्रीजातीविषयी निरंतर मातृभाव मनांत ठेवून, श्रीरामकृष्णांनी ह्या तंत्रोक्त साधना करून व त्यांचे फल हस्तगत करून, आपल्या उदाहरणाने यथार्थ साधकांवर अगणित उपकार करून ठेवले व त्याचप्रमाणे तंत्रशास्त्रांचे प्रामाण्यहि सिद्ध करून त्या शास्त्राची महती वाढविली.

तीन चार वर्षेपर्यंत तंत्रोक्त गूढ साधनांचें यथाविधि अनुष्ठान करून सुद्धा श्रीरामकृष्णांनी आम्हांपैकी कोणाजवळहि त्यांच्या परंपरेचें विस्तृत विवेचन कधीच केलें नाही. तरी पण, आमच्या मनांत साधनांविषयी उत्साह उत्पन्न करण्यासाठी म्हणून, कांही कांही साधनांच्या गोष्टी मात्र ते सांगत व क्वचित् एखाद्या साधकाला विशेष एखादी साधना करण्यास सांगत. तंत्रोक्त क्रियांचें अनुष्ठान करून, त्यांच्या फलांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहिल्याशिवाय, पुढे त्यांच्याकडे येणाऱ्या भिन्न भिन्न स्वभावांच्या भक्तांना त्यांच्या अवस्थेस योग्य अशी साधनांची व्यवस्था त्यांना करतां येणार नाही, म्हणूनच श्रीरामकृष्णांकडून श्रीजगन्मातेने ह्या सर्व साधना करवून घेतल्या असाव्या, असें म्हणावें लागतें; असो.

तंत्रोक्त साधनाकाळीं प्राप्त झालेलीं दर्शनें व अनुभव श्रीरामकृष्ण कधी कधी आमच्याजवळ सांगत असत. ते म्हणत, " तंत्रोक्त साधना करीत असतां माझा स्वभाव समूळ बदलून गेला. श्रीजगदंबा कधी कधी कोल्हीचें रूप धारण करीत असते असें ऐकून, कुत्रा हा भैरवाचें वाहन आहे असें जाणून, मी त्यांचें उच्छिष्ट, यावेळीं प्रसाद म्हणून ग्रहण करीत असे, तरी मनामध्ये कधीच किळस येत नसे !

" मी आपला देह, मन, प्राण एवढेच काय पण आपलें सर्वस्व, श्रीजगदंबेच्या पादपद्मीं अर्पण केलें असल्यामुळे, मी त्या दिवसांत, स्वतःला नेहमी, आंत बाहेर, ज्ञानाग्नीने वेढलेला प्रत्यक्ष पाहात असें !

" कुंडलिनी शक्ति जागृत होऊन मस्तकाकडे वर चालली आहे व मूलाधारापासून तों सहस्रारपर्यंतचीं सर्व अधोमुख व मुकलित कमलें उर्ध्वमुख व उन्मीलित होत आहेत आणि तीं जसजशीं उन्मीलित होत चाललीं आहेत, तसतसे नानातऱ्हेचे अपूर्व व अद्भुत अनुभव हृदयांत उदित होत आहेत, असें मला त्या दिवसांत प्रत्यक्ष दिसत असे ! कधी कधी तर असें दिसें की, माझ्याच वयाचा एक तेज:पुंज दिव्य पुरुष, सुषुम्ना नाडीमधून त्या प्रत्येक कमळाजवळ जात आहे व त्या कमळाला आपल्या जिव्हेने स्पर्श करून तें प्रस्फुटित करीत आहे ! "

एके वेळीं, स्वामी विवेकानंद ध्यान करावयास बसतांच त्यांना आपल्यापुढे एक प्रचंड ज्योतिर्मय त्रिकोण दिसूं लागे व तो जिवंत असल्याचा त्यांना भास होई ! दक्षिणेश्वरीं आल्यावर एके दिवशीं त्यांनी श्रीरामकृष्णांना ही गोष्ट सांगतांच ते म्हणाले–" ठीक, ठीक, तुला ब्रह्मयोनीचें दर्शन झालें ! बेलाखाली साधना करीत असतां, एक दिवस मलाहि तिचें दर्शन झालें आणि ती प्रतिक्षणीं असंख्य ब्रह्मांडें प्रसवत आहे असेंहि मला दिसलें ! "

तसेंच ते म्हणत—" ब्रह्मांडामधील सर्व निरनिराळे ध्वनि एकत्र होऊन त्यांचा एक प्रचंड ध्वनि जगामध्ये प्रतिक्षणीं होत आहे, असें मी प्रत्यक्ष

पाहिलें !" आमच्यापैकी कांहीजण म्हणत, की "या कालीं पशुपक्षी वगैरे मनुष्येतर सर्व जीवजंतूंचें बोलणें आपल्याला समजत असे," असें श्रीरामकृष्णांच्या तोंडून आम्हीं ऐकलें आहे. ते म्हणत—स्त्रीयोनीमध्ये साक्षात् श्रीजगदंबा अधिष्ठित असल्याचें त्या दिवसांत मला दर्शन झालें.

साधनाकालाच्या शेवटीं, आपणामध्ये अणिमादि अष्ट सिद्धि आविर्भूत झाल्या असल्याचा श्रीरामकृष्णांना अनुभव आला. हृदयच्या सांगण्यावरून त्यांचा प्रयोग कधी करीत जावा की नाही, या संबंधाने त्यांनी श्रीजगदंबेचें मत विचारतां, त्यांना असें कळलें की, सिद्धि या विष्ठसमान तुच्छ व त्याज्य आहेत. श्रीरामकृष्ण म्हणत-" असे समजल्यापासून सिद्धीच्या नुसत्या नांवाने माझ्या मनांत किळस उत्पन्न होते !"

श्रीरामकृष्ण म्हणत, "त्याच सुमारास, श्रीजगन्मातेच्या मोहिनी मायेच दर्शन व्हावें अशी मनाला अत्यंत उत्कंठा लागली आणि एक दिवस मला एक अद्भुत दर्शन प्राप्त झालें. एक अत्यंत लावण्यवती स्त्री गंगेमध्ये प्रगट होऊन मोठया गंभीरतेने पंचवटीकडे येत आहे असे मला दिसले. ती बरीच जवळ आल्यावर दिसले की ती गर्भवती आहे. ती स्त्री माझ्याजवळ आली व लगेच तेथेच प्रसूत होऊन तिला एक अतिशय सुंदर मुलगा झाला व त्याला मोठया ममतेने पदराखाली घेऊन ती पाजूं लागली. थोडयाच वेळाने त्या स्त्रीचें स्वरूप बदललें. तिचें तोंड मोठें आक्राळविक्राळ आणि भयंकर दिसूं लागले आणि एकदम ताडकन् उठून तिने तें मूल आपल्या तोंडांत घातलें, चघळून चघळून तें गिळून टाकलें आणि आल्या वाटेने परत जाऊन तिने गंगेंत उडी टाकली !"

या अद्भुत दर्शनाशिवाय, श्रीजगन्मातेच्या द्विभुजामूर्तीपासून तों दशभुजामूर्तीपर्यंत, सर्व प्रकारच्या मूर्तींचें त्यांना त्या काळीं दर्शन झालें. त्यांपैकी कांही कांही मूर्ति त्यांच्याशीं बोलत व त्यांना नानाप्रकारचे उपदेश देत. या सर्व मूर्तींचें सौंदर्य अत्यंत विलक्षण असे, तरी या सर्वांत श्रीराजराजेश्वरी अथवा

षोडशी मूर्तीचें सौंदर्य कांही अपूर्व होतें. श्रीरामकृष्ण म्हणत–“ षोडशी अथवा त्रिपुरासुंदरीचे सौंदर्य इतकें अद्‌भुत होतें की, तिच्या अंगांतून रूप-लावण्य खरोखरच खाली गळून पडत आहे आणि चारी दिशांना पसरत आहे, असें मला दिसलें !” याशिवाय अनेक भैरव, देव, देवता यांचें दर्शन श्रीरामकृष्णांना या काळीं झाले. या तंत्रसाधनेच्या काळापासून श्रीरामकृष्णांना नित्य किती नवीं नवीं अलौकिक दर्शनें आणि अनुभव प्राप्त होत असत, हें त्यांचें त्यानाच ठाऊक ! इतरांना त्याची कल्पनाहि यावयाची नाही.

तंत्रोक्त साधनेच्या वेळेपासून श्रीरामकृष्णांचें सुषुम्नाद्वार पूर्णपणे मोकळें होऊन, त्यांच्या अंगीं बालकाची अवस्था पूर्णपणे बाणली, असें आम्हीं त्यांच्याच तोंडून ऐकलें आहे. यावेळेपासून, नेसलेलें धोतर व यज्ञोपवीत वगैरे नेहमी अंगावर धारण करणें हे प्रयत्न करूनहि, त्यांना शक्य होत नसे ! न समजता धोतर वगैरे केव्हां गळून पडे आणि कोठे पडे याची त्यांना शुद्धच नसे ! श्रीजगदंबेच्या पादपद्मीं, मन नेहमी तल्लीन होऊन राहूं लागल्यामुळे, जेथें शरीराचीहि दाद राहात नसे, तेथें धोतर आणि जानवे यांची काय कथा ? इतर परमहंसांप्रमाणे धोतराचा त्याग करून नग्न राहण्याचा मुद्दाम अभ्यास असा त्यांनी कधीच केला नाही, हेंहि आम्हीं त्यांच्याच तोंडून ऐकलें आहे. ते म्हणत–“ साधना समाप्त झाल्यावर, माझ्या अंगीं अद्वैतबुद्धि इतकी बाणून गेली की, लहानपणापासून ज्या वस्तु अगदी तुच्छ, त्याज्य व अपवित्र अशा वाटत, त्या वस्तूहि अत्यंत पवित्र आहेत, अशी माझ्या मनाची दृढ धारणा झाली, तुळस व भांग एकच वाटूं लागली ! ”

याशिवाय, या काळापासून पुढे कांही वर्षे त्यांची अंगकांति इतकी तेजःपुंज होऊन राहिली होती की, त्यांच्याकडे लोकांनी नेहमी टकमका पाहात असावें ! श्रीरामकृष्ण म्हणजे निरभिमानतेचे मूर्तिमंत पुतळे ! त्यांना या गोष्टीचे फार वाईट वाटे व आपली दिव्य अंगकांति नाहीशी करण्यासाठी ते व्याकुळ अंतःकरणाने श्रीजगन्मातेची प्रार्थना करीत की–“ आई, मला हें तुझें बाह्यरूप

नको. तें तूं आपलें घेऊन जा आणि मला आंतरिक आध्यात्मिक रूपाचें दान दे!" स्वतःच्या रूपाविषयी त्यांच्या मनांत केवढा तिरस्कार होता याची थोडीशी कल्पना "श्रीरामकृष्ण व मथुरबाबू" या प्रकरणांतील कांही गोष्टींवरून आलीच असेल.

या सर्व तंत्रोक्त साधनांच्या कामीं ब्राह्मणीने श्रीरामकृष्णांना जसें साहाय्य केलें त्याचप्रमाणे पुढे दिव्य भावारूढ होण्याचें कामीं त्यांनीहि तिला साहाय्य केलें. ब्राह्मणीचें नांव योगेश्वरी होतें व श्रीरामकृष्ण म्हणत, "ती साक्षात् योगमायेचाच अवतार होती."

तंत्रोक्त साधनांच्या प्रभावाने उत्पन्न झालेल्या दिव्य दृष्टीच्या योगाने त्यांना या काळीं असें कळून आलें की, पुढे पुष्कळ लोक आपल्याजवळ धर्माचा लाभ करून घेण्यासाठी येणार आहेत व ही गोष्ट त्यांनी मथुरबाबू व हृदय यांच्यापाशी बोलूनहि दाखविली. ती ऐकून मथुरबाबू मोठ्या आनंदाने म्हणाले, "वा बाबा! मग तर फारच चांगलें झालें! आम्ही सगळे मिळून तुमच्याबरोबर खूप आनंद करूं!"

---

# २५ जटाधारी व वात्सल्यभावसाधना

## ( १८६४-६५ )

"......मग यायला लागले रामायत पंथाचे साधु ! उत्तम उत्तम त्यागी भक्त वैरागी बाबाजी !...त्यांच्यापैकी एकाजवळून तर रामलाला माझ्याकडे आला !"

"त्याला ( जटाधारीला ) प्रत्यक्ष दिसे की रामलाला नैवेद्य खात आहे अथवा एखादा पदार्थ मागत आहे अथवा फिरायला न्या म्हणत आहे !......आणि या सर्व गोष्टी मलाहि दिसत !"

—श्रीरामकृष्ण

---

भैरवी ब्राह्मणी सन १८६१ मध्ये दक्षिणेश्वरीं आली व अजमासें तीन वर्षेपर्यंत तिच्या देखरेखीखाली श्रीरामकृष्णांनी तंत्रोक्त साधनांचें यथाविधि अनुष्ठान केलें. त्यानंतर वात्सल्यभावाच्या आणि मधुरभावाच्या साधनेचे वेळीं त्यांना भैरवीची पुष्कळ मदत झाली. मथुरबाबूंची श्रीरामकृष्णांच्या आध्यात्मिक अवस्थेसंबंधी, अगोदरपासूनच उच्च धारणा होती व तंत्रोक्त साधनाकालीं त्यांचा आध्यात्मिक शक्तिविकास दिवसेंदिवस वाढत चाललेला पाहून तर, त्यांच्याहि आनंदाला आणि भक्तीला अधिकाधिक भरती येत चालली. राणी रासमणीच्या मृत्यूनंतर मथुरबाबूच तिच्या अपार संपत्तीचे व्यवस्थापक झाले व श्रीरामकृष्णांच्या साधनाकालापासून, ते जें काम हातीं घेत त्यांत त्यांना

यशच मिळूं लागलें ! हें पाहून त्यांची अशी दृढ समजूत झाली की "आपणाला जें कांही धन, मान, यश मिळत आहे तें सर्व श्रीरामकृष्णांच्याच कृपेमुळे. या साऱ्या संपत्तीचे तेच खरे मालक आहेत व आपण केवळ त्याचे मुखत्यार मात्र आहों ! आपली सर्व तऱ्हेने काळजी घेणारे व संकटांतून सोडविणारे तेच आहेत. तेच आपले सर्वस्व आहेत. त्यांची निरंतर सेवा आपल्याला कशी करावयाला मिळेल ? त्यांच्या साधनांमध्ये त्यांना हरतऱ्हेचें साहाय्य करणें व त्यांच्या देहाचे संरक्षण करणें हेंच आपलें मुख्य काम !"

अशा प्रकारची दृढ धारणा आणि विश्वास मनामध्ये उत्पन्न झाल्यामुळे, मथुरबाबूंना श्रीरामकृष्णांच्या सेवेवांचून दुसरें कांही सुचनासे झाले. त्यांच्या तोंडून एखादा शब्द बाहेर पडण्याचा अवकाश, की त्याप्रमाणे काम झालेंच ! श्रीरामकृष्णांना ज्यांपासून आनंद होईल अशा गोष्टी त्यांनी नेहमी शोधीत असावे व त्या करण्याने श्रीरामकृष्णांना आनंद झाला, म्हणजे स्वतःला अत्यत भाग्यवान समजावें ! सन १८६४ मध्ये मथुरबाबूंनी अन्नमेरु-व्रताचें अनुष्ठान केले. हृदय सांगत असे की, " त्यावेळीं मथुरबाबूंनी उत्तम उत्तम पंडित बोलावून आणून, त्यांना सोन्यारुप्याचे अलंकार, भांडीं वगैरे दान केले ! त्याचप्रमाणे एक हजार मण तांदूळ व एक हजार मण तीळहि, असेंच दान केलें ! उत्तम उत्तम हरदास आणि गवई बोलावून आणून पुष्कळ दिवसपर्यंत, दक्षिणेश्वरीं रात्रंदिवस कीर्तनें, भजनें, गाणीं चालविलीं. मथुरबाबू स्वतः हें सर्व ऐकण्यास बहुतेक नेहमी हजर असत. श्रीरामकृष्णांची तर काय, घरांत एखादें मंगल कार्य असले म्हणजे मुलांची जशी स्थिति होते, तशी स्थिति ! भक्तिरसपूर्ण अशीं गाणी ऐकतांना त्यांना वरचेवर भावावेश होत असे आणि ज्या गवयाच्या गाण्याने श्रीरामकृष्णांना आनंद होऊन समाधि लागेल, त्याचेंच गाणें उत्तम, अशी गाण्याच्या उत्तमपणाची कसोटी ठरवून, मथुरबाबू त्या गवयाला मूल्यवान शालजोडया आणि रेशमी वस्त्र व शंभर शंभर रुपये बक्षीस देत असत ! श्रीरामकृष्णांविषयी त्यांच्या मनांत केवढी भक्ति व निष्ठा उत्पन्न झाली होती, हें यावरून दिसून येईल.

याच सुमारास, बरद्वानच्या राजाच्या पदरीं असलेले प्रख्यात पंडित पद्मलोचन यांच्या गुणांची व निरभिमानतेची कीर्ति श्रीरामकृष्णांच्या कानावर आल्यावरून ते त्यांस मुद्दाम भेटावयास गेले होते, अन्नमेरुव्रतानुष्ठानांत पद्मलोचनांस आणवून त्यांचा सन्मान करण्याचें मथुरबाबूंच्या फार मनांत होतें व श्रीरामकृष्णांवरहि त्यांची विशेष भक्ति असल्याचें ऐकून तर मथुरबाबूंनी हृदयला त्यांना निमंत्रण करण्यास मुद्दाम पाठविलें. पद्मलोचनांना आल्यावांचून आता गत्यंतरच नव्हतें. दक्षिणेश्वरीं ते आल्यावर, मथुरबाबूंनी त्यांचा योग्य सन्मान केला. पद्मलोचनांची आगखी माहिती पुढे येईल.

तंत्रोक्त साधना समाप्त झाल्यावर वैष्णवमताची साधना करण्याची श्रीरामकृष्णांच्या मनांत उत्कट इच्छा उत्पन्न झाली आणि याला कांही तशीच स्वाभाविक कारणेंहि होतीं. पहिलें कारण हे की भक्तिमती भैरवी ब्राह्मणी वैष्णव तंत्रोक्त पंचभावाश्रित साधनांमध्ये स्वतः पारंगत होती आणि यांपैकी कोणत्या तरी भावामध्ये ती सदोदित तल्लीन होऊन गेलेली असे. नंदराणी श्रीयशोदा हिच्या वात्सल्यभावाने आविष्ट होऊन गोपालज्ञानाने श्रीरामकृष्णांस ती जेऊं घालीत असल्याचें, मागें सांगितलेंच आहे. तेव्हां तंत्रशास्त्रोक्त साधना श्रीरामकृष्णांकडून करविल्यावर, वैष्णवभावाची साधना करण्याचा तिनें श्रीरामकृष्णांस आग्रह केला असावा. दुसरें असें की, वैष्णव कुळामध्ये जन्म झाला असल्यामुळे, वैष्णव मताची साधना करण्याची श्रीरामकृष्णांना इच्छा झाली असणें, अगदी स्वाभाविक आहे. कामारपुकुरच्या बाजूला वैष्णवमताचा बराच प्रसार असल्यामुळे, त्या मताविषयी लहानपणापासूनच त्यांच्या मनांत श्रद्धा होती आणि या कारणांनी, तंत्रोक्त साधना समाप्त झाल्यावर वैष्णव तंत्रोक्त साधनांकडे त्यांचें लक्ष वेधलें असावें.

साधनाकालांतील दुसऱ्या चार वर्षांत ( १८५९-६२ ) त्यांनी वैष्णव तंत्रोक्त शांत, दास्य व सख्य या भावांचें अवलंबन करून, साधना करून, त्या सर्वांत सिद्धि प्राप्त करून घेतली होतीच. यासाठी आता बाकीचे दोन

मुख्य भाव जे वात्सल्य व मधुर त्यांच्या साधनांस त्यांनी सुरुवात केली. ( १८६३-६६ ). श्री महावीराच्या दास्य भावाचा आश्रय करून त्यांनी श्रीरामचंद्राचें दर्शन प्राप्त करून घेतलें होतें व श्रीजगदंबेची सखी अथवा दासी या भावाचा आश्रय करूनहि कांही काल त्यांनी घालविला होता.

दक्षिणेश्वरावरून पुरीला जाण्याचा रस्ता असल्यामुळे अनेक साधु, संन्यासी, फकीर, बैरागी लोक दक्षिणेश्वरीं मुक्काम करून राणी रासमणीच्या देवळांतील पाहुणचार दोन तीन दिवस घेतल्यावांचून जात नसत. श्रीरामकृष्ण कधी कधी आम्हांला म्हणत-" केशवसेन येथे येऊं लागल्यापासूनच तुमच्यासारख्या ' यंग बेंगाल ' मंडळीचें येथे येणें सुरू झालें. त्यापूर्वी येथे किती साधु-संत, त्यागी, संन्यासी, बैरागी, बाबाजी येत जात असत,* तें तुम्हांला कुठे ठाऊक आहे ? आगगाडी सुरू झाल्यापासून ते लोक आता इकडून येत जात नाहीत. आगगाडी होण्याचे पूर्वी ते लोक गंगेच्या तीराने पायवाटेने, गंगासागराचें स्नान करण्यास आणि श्रीजगन्नाथाच्या दर्शनास जात. वाटेंत येथे त्यांचा एखादा दुसरा मुक्काम अगदी हटकून होई. कांही साधु तर येथे कांही दिवसपर्यंत राहतहि असत. साधु लोक " दिशा जंगल " व अन्नपाण्याची सोय असल्यावांचून एखाद्या ठिकाणीं मुक्काम करीत नाहीत. " दिशा जंगल " म्हणजे शौच वगैरेसाठी निराळी निर्जन जागा व अन्नपाणी म्हणजे भिक्षा. भिक्षेवरच त्यांचें शरीरधारण असल्यामुळे, जेथे भिक्षा मिळूं शकेल तेथेच ते मुक्काम करतात. इथे रासमणीच्या बागेंत भिक्षेची चांगली सोय आणि गंगामाईच्या कृपेने पाण्याचीहि कमतरता नाही. शिवाय दिशा जंगलाची उत्तम सोय, या कारणांनी साधु लोक येथे एखादा मुक्काम हटकून करीत. "

" एकदा मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली की हे इथे इतके साधुसंत येतात, तर भिक्षेशिवाय त्यांना इतर ज्या कांही वस्तूंची गरज असेल, त्याहि

* यांची हकीगत पुढील प्रकरणांत येईल.

येथेच मिळण्याची कांही तरी सोय करून द्यावी, म्हणजे ते अगदी निश्चिंत होऊन साधन-भजनांत निमग्न होतील आणि तें पाहून आपण आनंद करूं! मनांत येतांच मथुरबाबूंना ही गोष्ट बोललों. ते म्हणाले, 'अँः, एवढेंच ना बाबा? त्यांत काय आहे? मी आता पहा सारी व्यवस्था करून देतों. ज्याला जें द्यावेंसें वाटेल, तें त्याला देत जा!' कालीमंदिराच्या भांडारखान्यांतून सर्वांना शिधासर्पण मिळण्याची सोय होतीच, त्याशिवाय साधु लोकांना ज्याला जें हवें असे, तें देण्यासाठी, लोटे, कमंडलू, आसनें, कांबळीं, नशा करणाऱ्या-साठी भांग, गांजा, तांत्रिक साधूंसाठी मद्य वगैरे सर्व जिनसांची मथुरबाबूंनी व्यवस्था केली. त्यावेळी तांत्रिक साधु बरेच येत. त्यांच्या श्रीचक्राच्या अनु-ष्ठानास लागणाऱ्या सर्व जिन्नसांची मी अगोदरपासूनच व्यवस्था करून ठेवीं. त्या सर्व पूजाद्रव्यांनी ते जगदंबेची पूजा करीत, त्या वेळीं मला फार समाधान वाटे. श्रीचक्राच्या अनुष्ठानाचे वेळीं ते कधी कधी मलाहि बोलावून नेत व मद्य ग्रहण करण्याचा आग्रह करीत. पण त्यांना जेव्हां समजून येई की, मी मद्याचें कधीच ग्रहण करूं शकत नाही, त्याच्या नुसत्या नामोच्चारानेच मला नशा प्राप्त होते, तेव्हां ते आग्रह करीत नसत. त्यांच्याजवळ बसले म्हणजे मद्याचें ग्रहण करावें लागतेंच, म्हणून मी त्याचा आपल्या कपाळीं टिकला लावावा अथवा तें हुंगावे अथवा फार फार तर त्याचा एखादा बिंदु अंगुलीवर घेऊन तो आपल्या मुखांत सोडावा! त्यांपैकी कांही साधु मद्याचें ग्रहण करून ईश्वर-चिंतनांत तन्मय होऊन जात; परंतु बरेचसे कांही सुमार न ठेवून भांडींच्या भांडीं रिचवीत आणि शेवटी पुरते झिंगून जात. एक दिवस ह्याचा अतिरेक झालेला पाहून, नशा करण्याचे सर्व पदार्थ देणेंच मी बंद करून टाकलें."

"एक एक वेळेला, एकेक प्रकारची साधूंची जशी रहदारी लागे! एके वेळीं संन्यासी परमहंस साधूच येऊं लागले! उगीच पोटभरू बैरागी नव्हत, तर खरे खरे संन्यासी परमहंस! (आपल्या खोलीकडे बोट दाखवून) त्या खोलींत त्यांची एकसारखी ये जा सुरू असे आणि रात्रंदिवस एकसारखी 'अस्ति

भाति प्रिय ' यांच्या अर्थाची चर्चा व साऱ्या वेदांताच्या गोष्टी चालत ! रात्रंदिवस वेदांत वेदांत, दुसरें कांही नाही ! त्या वेळीं मला रक्त आमांश झाला होता. हातांतला तांब्या कांही खाली ठेवावयाची सोय नसे ! खोलीच्या एका कोपऱ्यांत हृदयने माझ्यासाठी एक घमेले ठेवून दिलेलें होतें. इकडे हा भोग भोगावा आणि तिकडे त्यांचा विचार ऐकावा ! आणि एखाद्या प्रश्नावरील वादविवाद जर मिटेनासा झाला, तर ( स्वतःकडे बोट करून ) आंतून एखादी अशी सोपीशी गोष्ट आई वदवी की, ती ऐकून त्यांच्या प्रश्नाचें समाधान व्हावें व त्यांचा त्यावरील वाद मिटून जावा ! असे किती दिवस गेले ! मग हे संन्यासी परमहंस साधु येण्याचें मान कमी झाले ! त्यांचें येणें कमी झाल्यावर यायला लागले रामायत पंथाचे साधु; उत्तम उत्तम त्यागी भक्त बैरागी बाबाजी ! त्यांचे मेळेच्या मेळे येऊं लागले ! अहाहा, काय ती त्यांची भक्ति, निष्ठा आणि विश्वास ! त्यांच्यापैकी एकाजवळून तर रामलाला माझ्याकडे आला. "

ज्या रामायत पंथी साधूजवळून " रामलाला " श्रीरामकृष्णांना मिळाला, त्याचें नांव जटाधारी असें होतें. त्याचा श्रीरामचंद्रावरील अद्भुत अनुराग व प्रेम, यांचा उल्लेख श्रीरामकृष्ण वरचेवर करीत. श्रीरामचंद्राची बालमूर्तीच त्याला अत्यंत प्रिय असे आणि त्या मूर्तीची पुष्कळ दिवसपर्यंत भक्तियुक्त अंतःकरणाने पूजा केल्यामुळे, त्याचें मन श्रीरामचंद्रचरणीं निरंतर इतकें तन्मय झालेलें असें की, श्रीरामचंद्राची ज्योतिर्मय बालमूर्ति, आपल्या सन्मुख खरोखरीच आविर्भूत होऊन आपली पूजा ग्रहण करीत आहे, असें दर्शन दक्षिणेश्वरीं येण्याच्या अगोदरपासून, त्याला होत असे ! प्रथम प्रथम असे दर्शन त्याला नेहमीच प्राप्त होत नसे, परंतु त्याची भक्ति व अभ्यास हीं जशीं वाढत गेली, तसें हें दर्शनहि त्याला वारंवार प्राप्त होऊं लागलें. श्रीरामचंद्राची बालमूर्ति सदासर्वकाळ आपल्याबरोबर वागत असते, असें त्याला दिसूं लागलें ! अर्थातच त्याचें चित्त इतर विषयांवरून अजीबात उडालें व ज्या प्रतिमेच्या सेवेने हें दिव्य दर्शन त्याला प्राप्त झालें होतें, ती बालरामचंद्राची " रामलाला " नामक मूर्ति

घेऊन, तो सदैव आपल्याच आनंदांत तल्लीन राही. जटाधारी अनेक तीर्थे करीत करीत दक्षिणेश्वरीं येऊन पोहोचला.

रामलालाच्या सेवेमध्ये सदोदित तन्मय होऊन राहणाऱ्या जटाधारीने, आपल्याला मधून मधून श्रीरामचंद्राच्या बालमूर्तीचें दर्शन होतें, ही गोष्ट कोणाजवळहि बोलून दाखविली नव्हती. तो सदा सर्वकाळ श्रीरामाच्या एका बालमूर्तीची अत्यंत अपूर्व निष्ठेने सेवा करण्यांत निमग्न असतो, एवढें मात्र लोकांना दिसे. परंतु भावराज्यांतील अद्वितीय अधीश्वर श्रीरामकृष्ण, यानी मात्र जटाधारीला प्रथम पाहतांच, त्याचें गूढ रहस्य जाणले आणि त्यामुळे त्यांच्या मनांत, त्याचेविषयी विशेष श्रद्धा उत्पन्न होऊन, त्याला लागणाऱ्या सर्व वस्तूंची त्यांनी नीट व्यवस्था करून दिली. दररोज, त्यांनी त्याच्याजवळ पुष्कळ वेळपर्यंत बसावें व त्याची पूजा नीट लक्षपूर्वक पाहावी. अशा रीतीने जटाधारी बाबाजीवरील श्रीरामकृष्णाची श्रद्धा दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चालली.

मागे सांगितलेंच आहे की, या समयीं श्रीरामकृष्ण श्रीजगदंबेची सखी अथवा दासी या भावांतच तन्मय होऊन राहात असत. श्रीजगदंबेसाठी पुष्पांच्या सुंदर सुंदर माळा गुंफण्यांत, तिला पंख्याने वारा घालण्यांत, मथुरबाबूंना सांगून नवे नवे दागिने करून तिला सजविण्यांत व स्वतः स्त्रीवेष घेऊन तिला गाणीं गाऊन दाखविण्यांतच ते सदोदित निमग्न असत. अशा वेळीं दक्षिणेश्वरीं जटाधारीचें आगमन झालें व त्यांच्या मनांतील श्रीरामचंद्राविषयींची भक्ति व प्रीति एकदम जागृत झाली ! त्यांना श्रीरामचंद्राचें जें दर्शन झालें होतें, तेंहि त्यांच्या बालमूर्तीचेंच; म्हणून, पूर्वोक्त प्रकृतिभावाच्या प्राबल्याने या दिव्य बालकाविषयी त्यांच्या मनांत वात्सल्यभावच उत्पन्न व्हावा, हें साहजिक दिसतें. मातेला आपल्या हृदयांत आपल्या बालकाविषयी जो एक अपूर्व प्रेमाकर्षणाचा अनुभव येतो, तसाच, त्या बालमूर्तीविषयी श्रीरामकृष्णांच्या हृदयांत उत्पन्न झाला आणि सदैव रामलालाच्या संगतींत राहण्यांत त्यांना आता काळवेळाचे भान राहिनासें झालें !

श्रीरामकृष्णांच्या मनाची रचना अशी विलक्षण होती, की कोणतेंहि काम अर्धवट करणें, त्यांना बिलकुल सहनच होत नसे! जगांतील इतर सर्व व्यवहारांत दिसून येणारा हा त्यांचा स्वभाव, आध्यात्मिक विषयांमधेहि तसाच दिसून येई. असें दिसून येई की स्वाभाविक प्रेरणेने एखादा भाव त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाला, म्हणजे ते त्यांत इतके तन्मय होऊन जात, की त्या भावाची चरम सीमा गांठल्याशिवाय ते कधीहि स्वस्थ म्हणून बसत नसत! कदाचित यावर कोणाला असें वाटेल की, " पण हें असें होणें चांगलें आहे काय? मनांत एखादा विचार उत्पन्न होतांच एखाद्या बाहुलीप्रमाणे तो नाचवील तसे नाचल्याने, मनुष्याचें कल्याण होणें कधी तरी शक्य आहे काय? मनुष्याच्या मनांत चांगले आणि वाईट दोन्ही तऱ्हेचे विचार येत असतात. मग काय, त्याने या दोन्ही तऱ्हेच्या विचारांप्रमाणे वागावें? श्रीरामकृष्णांच्या मनात वाईट विचार येणें एक शक्य नसेल, म्हणून सारींच माणसे कांही रामकृष्ण बनलीं नाहीत. त्यांचें कसे व्हावें? त्यांनी अर्थात् आपल्या मनावर संयमाच्या योगाने ताबा ठेवून आपले वाईट विचार आवरून धरावयास नकोत काय?"

वरवर पाहतां ही गोष्ट युक्तिसंगत अशी वाटली, तरी त्याबद्दल आम्हांलाहि कांही सांगण्यासारखे आहे. कामकांचनासक्त, भोगलोलुप अशा मनुष्याने, स्वतःवर इतका विश्वास कधीहि ठेऊं नये, हे अगदी खरे आहे व म्हणून अशा प्रकारच्या मनुष्याला संयम वगैरेची अत्यंत आवश्यकता आहे. परंतु शास्त्रें सांगतात की, कांही कांही साधकांना संयम हा अगदी निश्वासप्रश्वासासारखाच सहज होऊन बसतो आणि तेव्हां त्यांचें मन कामकांचनासक्तीपासून पूर्णपणे मुक्त होऊन, त्यांत सदैव केवळ चांगलेच भाव आणि विचार राहूं लागतात. श्रीरामकृष्ण म्हणत, " ज्या मनुष्याने आपला सर्व भार श्रीजगदंबेवर घातलेला असतो, त्याच्या मनांत कोणताहि कुभाव आपलें डोकें वर काढूं शकत नाहीं; आई त्याचा पाय कधीहि बेताल पडूं देत नाही!" अशी अवस्था प्राप्त झालेल्या मनुष्याने, स्वतःच्या प्रत्येक मनोभावावर विश्वास ठेवला तरी त्यापासून त्याचें कधीहि

अनिष्ट होणार नाही. कारण ज्या देहाभिमानविशिष्ट क्षुद्र अहंकाराच्या प्रेरणेनेच आम्ही स्वार्थपरायण होऊन, जगांतील सर्व भोग, सुख, अधिकार यांचा लाभ करून घेण्याची हाव धरीत असतो, तो क्षुद्र अहंकार, ईश्वराच्या इच्छेमध्ये कायमचा बुडवून टाकला असल्यामुळे, अशा प्रकारच्या मनुष्याच्या मनांत, त्यावेळीं स्वार्थसुखाचा विचार उद्भवणेंच अशक्य होऊन जाते. त्याची अशी दृढ भावना होते की, आपण केवळ यंत्र आहों व तें यंत्र ईश्वर जसें चालवील तसें चालत आहे. आपल्या मनांत जे विचार उत्पन्न होतात, ते ईश्वराच्याच इच्छेवरून होतात आणि अशा प्रकारची दृढ भावना उत्पन्न झाली, म्हणजे मनुष्याच्या मनांत अपवित्र अथवा अनिष्ट असा कोणताहि भाव उदय पावत नाही व मनामध्ये उदय पावणाऱ्या कोणत्याहि भावाचें अवलंबन करून तो वागूं लागला, तरी त्याचें कधींहि अकल्याण होत नाही, म्हणून श्रीरामकृष्णांच्या पूर्वोक्त मनोरचनेवरून सर्वसाधारण लोकांना जरी नाही, तरी पूर्ण स्वार्थगंधहीन अशा साधकांना पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. अशा प्रकारच्या अवस्थासपन्न पुरुषाच्या आहार-विहाराच्या सामान्य स्वार्थवासनांना शास्त्रांनी भाजलेल्या बियांची उपमा दिली आहे. म्हणजे बीं जर भाजलें तर त्यांतील जीवनशक्ति जशी नाहीशी होते व तिच्यापासून जसे झाड उत्पन्न होऊं शकत नाही, तसें अशा प्रकारच्या पुरुषांची सर्व संसारवासना संयम व ज्ञानाग्नि यांनी दग्ध झाली असल्यामुळे, तिच्यापासून भोगतृष्णारूप अंकुर कधीहि उत्पन्न होत नाही. श्रीरामकृष्ण म्हणत, " परिसाच्या स्पर्शाने लोखंडाच्या तरवारीचें सोनें झाल्यावर, तिचा तो आकार मात्र कायम राहतो, पण ती मग हिंसेच्या कामीं चालत नाही ! "

उपनिषत्कार ऋषि म्हणतात की, अशा प्रकारची अवस्था प्राप्त झालेले साधक सत्यसंकल्प होतात, म्हणजे त्यांच्या मनांत उत्पन्न होणारे सर्व सकल्प नेहमी खरेच होतात. अनंत भावमय श्रीरामकृष्णाच्या मनांत वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या भावांची आम्हीं जितके वेळ परीक्षा करून पाहिली, तितके वेळ ते सर्व भाव अगदी खरे असल्याचेंच आमच्या निदर्शनास आलें. आम्हीं असें पाहिलें

आहे की, एखाद्याने दिलेल्या कांही आहार्य वस्तूंचें जर श्रीरामकृष्णांच्याने ग्रहण करवलें नाही, तर तपास करतां असेंच दिसून येई की, ती वस्तु खरोखरच स्पर्शदोषदुष्ट झाली होती; एखाद्या व्यक्तीशी ईश्वरीय चर्चा करीत असतां जर त्यांचें तोंड मध्येच बंद झालें, तर ती व्यक्ति त्या विषयासंबंधी अगदी अनधिकारी आहे, असेंच दिसून आले आहे ! एखाद्या व्यक्तीला या जन्मीं धर्मलाभ व्हावयाचा नाही, अगर फारच थोडा होईल, अशी त्यांची धारणा झाल्यास तेंच खरें ठरलें आहे ! एखाद्याला पाहतांच, त्यांच्या मनांत एखाद्या विशिष्ट भावाची अगर देवदेवतेची आठवण झाली, तर तपास करतां असें दिसून येई की, तो मनुष्य त्या भावाचा साधक अथवा त्या देवतेचा भक्त आहे; अंतःस्फूर्तीने एखाद्याला एकाएकी एखादी गोष्ट ते बोलून गेले, तर ती गोष्ट त्याला विशेष रीतीने मार्गदर्शक व्हावी व त्याचें जीवन त्यामुळे अजीबात बदलून जावें ! श्रीरामकृष्णांच्या संबंधाने अशा किती तरी गोष्टी सांगतां येतील; असो.

आपली कुलदेवता श्रीरघुवीर हिची यथाविधि पूजाअर्चा आपल्याकडून व्हावी, म्हणून लहानपणींच त्यांनी राममंत्र घेतला होता. परंतु आता श्रीरामचंद्राच्या बालमूर्तीविषयी त्यांच्या हृदयांत वात्सल्यभाव उत्पन्न झाल्यामुळे, जटाधारीकडून तो मंत्र यथाशास्त्र ग्रहण करण्याची त्यांना अत्यंत उत्कट इच्छा उत्पन्न झाली. जटाधारीजवळ त्यांनी ही गोष्ट काढतांच त्यानेहि मोठ्या आनंदाने श्रीरामकृष्णांना आपल्या इष्टदेवतेच्याच मंत्राची दीक्षा दिली आणि श्रीरामकृष्ण सदोदित त्या बालमूर्तीच्या चिंतनांत तन्मय होऊन राहूं लागले !

श्रीरामकृष्ण सांगत *"जटाधारी बाबाजी रामलालाची किती तरी दिवसांपासून सेवा करीत असे. तो जेथे जाई तेथे रामलालाला आपल्याबरोबर नेत असे, जी कांही भिक्षा मिळे तिचा तो प्रथम रामलालाला नैवेद्य दाखवी, एवढेंच

* ही रामलालाची हकीकत श्रीरामकृष्णांनी निरनिराळ्या वेळीं सांगितली; तरी विषयाच्या सोईसाठी ती येथे एकदमच दिली आहे.

नव्हे, तर त्याला प्रत्यक्ष असे दिसें की रामलाला आपला नैवेद्य खात आहे अथवा एखादा पदार्थ मागत आहे अथवा फिरायला न्या म्हणत आहे अथवा एखाद्या गोष्टीबद्दल हट्ट धरून बसत आहे ! या रामलालाच्या सेवेंत जटाधारी निमग्न राहून त्याच आनंदांत स्वतःचें देहभानहि विसरून गेलेला असे ! रामलाला ह्या सर्व गोष्टी करीत आहे, असें मलाहि दिसे, म्हणून मग मीहि रात्रंदिवस त्या बाबाजीजवळ बसून रामलालाच्या लीला बघत असे !

" जसजसे दिवस जाऊं लागले, तसतशी रामलालाचीहि माझ्यावर प्रीति वाढूं लागली ! जोपर्यंत मी बाबाजीजवळ बसलेला असे, तोंपर्यंत रामलालाहि तेथे चांगला असे, नीट हौसेने खेळे, मजा करी आणि मी तेथून उठून आपल्या खोलीकडे निघून आलोरे आलों, की रामलालाने माझ्यामागे धांव घेतलीच ! ' माझ्यामागे येऊ नको, ' म्हणून त्याला किती सांगावें पण ऐकतो कोण ! प्रथम प्रथम वाटे की, हा सारा माझ्याच डोक्याचा खेळ असावा, नाही तर, या बाबाजीचा तो नेहमीच्या पूजेचा देव, त्याच्यावर त्या बाबाजीचें प्रेम तरी केवढें आणि त्या बाबाजीला सोडून हा माझ्याकडे येतो, हें कसें ! मला दिसावें की—अगदी तुम्ही सारेजण मला जसें आता दिसत आहां तसें दिसावें—रामलाला कधी माझ्यापुढे, तर कधी मागे, असा नाचत नाचत माझ्याबरोबर येत आहे ! एखादे वेळीं मांडीवर बसण्याचाच त्याने हट्ट धरावा. बरे, एखादे वेळीं त्याला चांगला मांडीवर घ्यावा पण मग त्याची सारी खाली उतरायचीच घाई ! कांही म्हणून कांही केल्या त्याने मांडीवर राहूंच नये ! खाली उतरलारे उतरला, की त्याने उन्हांत धूम ठोकलीच कांट्याकुट्यांत जाऊन फुलेंच तोड, गंगेंत जाऊन बुडयाच मार, हा असला सगळ खेळ ! त्याला किती सांगावें,-' बाळ, उन्हांत फिरूं नये; पायाला फोड येतील बाळ, इतकें पाण्यांत डुंबूं नये, थंडी होईल ! ' पण ऐकतो कोण ? जसें कांह मी दुसऱ्याच कोणाला सांगत आहे ! फार तर, उगीच एखादे वेळीं, त्याने त्य पद्मपत्रासारख्या सुंदर डोळ्यांनी माझ्याकडे टक लावून पाहावें आणि खदाखद हसावें, झाले ! त्याचा आपला अवखळपणा सुरू आहेच ! मग मात्र मला खरं

राग येई आणि मग मी म्हणे–'थांब बरं का, आता तुला धरून असा मार देतों की, चांगली आठवणच राहील !' असे म्हणून त्याला उन्हांतून, नाही तर पाण्यांतून ओढून खोलींत न्यावें आणि त्याला कांही तरी खेळायला देऊन खोलींतच बसवून ठेवावें ! पण तरी काय ? त्याच्या खोडया आपल्या सुरू आहेतच ! मग मात्र त्याला एखाद् दुसरी चापट मारावी ! आणि असा जरा मार बसला, की लगेच त्याचे डोळे पाण्याने भरून यावे आणि मोठया केविलवाण्या मुद्रेने त्याने माझ्या तोंडाकडे पाहावें. त्याचें तें केविलवाणें तोंड पाहून मात्र मनाला फार दुःख व्हावें आणि त्याला मांडीवर घेऊन त्याची समजूत करावी व त्याला उगी करावें !

"एक दिवस स्नान करायला निघालों, त्यानेहि हट्ट धरला, की मी येतों ! मग काय करणार ? त्याला आपल्याबरोबर घेऊन गेलों झालें ! पण नदीवर काय ? त्याने एकदा जी नदींत उडी मारली, तो कांही केल्या बाहेरच येईना ! त्याला किती सांगून पाहिलं, पण काही नाही; त्याचें आपलें डुंबणं सुरू आहेच ! मग मात्र राग येऊन, मी नदींत उतरलों आणि त्याला पाण्यांत दडपून धरून म्हणालों–'आता डुंब कसा डुंबतोस तो ! मघापासून जसें थैमान मांडलं आहे !' आणि काय सांगावे, खरोखरच त्याचा प्राण कासावीस होऊन तो पाण्यांत एकदम ताड्कन उभा राहिला आणि धापा टाकूं लागला ! तेव्हा त्याची ती अवस्था पाहून माझ्या डोळ्यांना पाणी आलें आणि 'अरेरे, मीं चांडाळाने हें काय केलें !' असें वाटून मी त्याला पोटाशीं धरून, नदींतून बाहेर घेऊन आलों !

"आणखी एक दिवस, असेंच त्याच्याबद्दल मनाला जे काय कष्ट झाले आणि किती वेळ रडलों ते सांगता सोय नाही. त्या दिवशीं त्याने असाच कांही हट्ट घेतला, म्हणून त्याची समजूत करण्यासाठी, त्याला थोडेसे पोहे, न निवडतांच खायला दिले. थोडया वेळाने पाहतों तों त्यांतल्या फोलकटांनी, त्याची ती नरम जीभ चिरली आहे ! हें बघून मात्र, मला ब्रह्मांड आठवलें ! त्याला मग मांडीवर घेऊन बसलों आणि गळा काढून रडायला सुरुवात केली ! हाय हाय ! ज्याच्या

तोंडाला इजा होऊं नये म्हणून, कौसल्या मातेने नेहमी काळजी घ्यावी आणि दूध, लोणी असले मऊ मऊ पदार्थच खाऊं घालावे, त्याच्या तोंडांत त्या दिवशीं ते तसले दारिद्री पोहे भरतांना, मला चांडाळाला एवढा सुद्धा संकोच वाटला नाही!' बोलता बोलतां श्रीरामकृष्णांचा तो त्यावेळचा शोक पुन्हा उसळला आणि आमच्यासमोर गळा काढून, ते एवढ्याने ओक्साबोक्सी रडूं लागले की, त्यांच्या या दिव्य प्रेमाचा लवलेशहि आम्हांला समजला नाही, तरी आमचे डोळे पाण्याने भरून आले!

मायाबद्ध आम्ही मानव, रामलालाच्या या गोष्टी ऐकून स्तंभित आणि हतबुद्ध होऊन गेलों! भीतभीत रामलालाकडे चोरून पाहावें—आपल्यालाहि श्रीरामकृष्णांच्यासारखे कांही दिसतें की काय? पण छे, कांही सुद्धा नाही! आणि काही दिसावें तरी कसें? रामलालावरचे श्रीरामकृष्णाचें प्रेम आमच्यापाशी कुठे आहे? श्रीरामकृष्णांसारखी भावतन्मयता आमच्यापाशी कुठे आहे, की आमच्या या चर्मचक्षूंना रामलालाची मूर्ति जिवंत दिसावी! आम्हांला तर त्या मूर्तीवांचून कांहीच दिसत नाहीं आणि मनांत मात्र वाटतें की श्रीरामकृष्ण सांगत तसे खरोखरच घडले असेल काय? संसारांतील सर्व विषयांत आमची हीच स्थिति होत असते आणि संशयपिशाच नेहमी आमच्या मानुगटीला बसलेलें असतें. अविश्वाससागरांत आम्ही नेहमी गटंगळ्या खात असतों. पाहाना, ब्रह्मज्ञ ऋषींनी सांगितलें- "सर्व खल्विदं ब्रह्म, नेह नानास्ति किंचन-" जगतामध्ये एक सच्चिदानंद ब्रह्मवस्तूवांचून दुसरें कांही नाही, जगतामध्ये दिसणारे 'नाना' पदार्थ व 'नाना' व्यक्तींपैकी एकहि वास्तविक सत्य नाही.-" आम्ही मनांत म्हणालो- "असेलहि कदाचित्!" संसाराकडे मोठ्या तीक्ष्ण दृष्टीने आम्ही पाहूं लागलों. पण काय? 'एकमेवाद्वितीयम्' अशा ब्रह्मवस्तूचा नामगंधहि कुठे आम्हांला आढळून आला नाही! आम्हांला दिसलें फक्त, लाकूड माती, घर दार, माणसे जनावरें, नाना तऱ्हेचे व रंगाचे पदार्थ, हेंच सारें! हें पाहून वाटलें-" ऋषी भांगबिंग तर प्याले नसतील? नाही तर, असला भलताच सिद्धांत त्यांनी कसा

सांगितला?" पण ऋषींनी पुन्हा सांगितलें, " बाबांनो, तसें नव्हे, अगोदर तुम्ही कायावाचामनें संयम व पवित्रता यांचा अभ्यास करा. आपल्या चित्ताला स्थिर करा, म्हणजे मग आम्ही काय म्हणतों तें तुम्हांला नीट समजून येईल आणि तुम्हांला असा प्रत्यक्ष अनुभव येईल की, हें जगत् म्हणजे तुमच्या केवळ आंतील कल्पनांचा बाह्य प्रकाश मात्र आहे. तुमच्या आंत 'नाना' आहे, म्हणून तुम्हांला बाहेरहि 'नाना' च असल्याचें दिसून येतें." आम्ही म्हणालों, " ऋषींनो! या पोटाच्या विवंचनेपुढे आणि इंद्रियांच्या झगडयापुढे आम्हांला हे सर्व करायला फुरसत कुठे आहे?" अथवा म्हणालो-" ऋषींनो, तुम्ही ती ब्रह्मवस्तु पाहण्यासाठी जें जें कांही करायला सांगत आहां, ते कांही दोनचार दिवसांचे अथवा वर्षाचे काम नव्हें, त्याला सारें आयुष्य तरी पुरें होईल की नाही, याचीहि शंकाच. बरे, समजा, तुमची ही गोष्ट ऐकून या विषयाच्या मागे लागलों आणि समजा की, ती तुमची ब्रह्मवस्तु आम्हांला दिसली नाही आणि तुमचा तो अनंत आनंदलाभ आणि शांति वगैरे सर्व जर नुसत्या कविकल्पनाच ठरल्या तर मग धड हेंहि नाही आणि तेंहि नाही असें होऊन, आमची त्रिशंकूसारखी केविलवाणी स्थिति होईल! क्षणभंगुर असो, की आणिक कांही असो, पण या पृथ्वींतल्या सुखाला आम्ही आंचवूं आणि तुमचें तें अनंत सुखहि हातीं लागणार नाही! छे छे, ऋषींनो! तुम्ही आपले त्या अनंत सुखाचा खुशाल आस्वाद घेत राहा. तुमचें तुम्हांलाच तें लखलाभ होवो! आम्हांला आपलें हें रूपरसादि विषयांपासून जें कांही थोडें बहुत सुख मिळेल तेवढेंच पुरें. उगीच हजार तर्क, युक्त्या आणि विचार यांचें झेंगट आमच्या मागे लावून आम्हांला भलत्याच फंदांत पाडूं नका आणि आमच्या या सुखाची उगीच माती करूं नका!

बरे, ही ब्रह्मज्ञानाची गोष्ट सोडा; परंतु इतर गोष्टींत,—संसारांतील गोष्टींत तरी—आमचें मन सर्वथैव संशयहीन असतें काय? आप्तवाक्यावर पूर्ण विश्वास ठेवून, वाटेल तसे प्रसंग आले तरी, त्याप्रमाणे वर्तन करण्याचें धैर्य, किती लोकांत दिसून येतें? विश्वास, श्रद्धा यांचा जोर नसेल, हातांत एकदा घेतलेली

गोष्ट तडीला लावण्यांत प्रयत्नांची शिकस्त करण्याची चिकाटी नसेल, तर संसारांतील गोष्टींत तरी आम्हांला यश कसें मिळावें ? असो.

रामलालाच्या अशा प्रकारच्या अद्भुत कथा सांगतां सांगतां श्रीरामकृष्ण म्हणत–" पुढे पुढे असें होऊ लागलें, की बाबाजींनी नैवेद्य तयार करून किती तरी वेळ वाट पाहावी, पण रामलालाचा पत्ताच नाही ! त्यांना या योगें फार वाईट वाटावें व त्यांनी त्याचा शोध करीत इथे येऊन पाहावें, तो रामलाला खोलींत खुशाल खेळत बसला आहे ! तेव्हां अभिमानाने बाबाजींनी त्याला खूब बोलावें. त्यांनी म्हणावें—' मी केव्हांचा नैवेद्य तयार करून, तुला जेऊं घालण्यासाठी तुझी वाट पाहात आहे आणि तूं आपला इथे खुशाल खेळत बसला आहेस अं ? तुझी रीतच अशी आहे, की मनांत जें येईल तें करावें ! तुला दयामाया कांही नाही. आईबापाला टाकून वनांत निघून गेलास, बाप बिचारा तुझ्या नांवाने धाय मोकलीत मरून गेला, तरी सुद्धा परत फिरला नाहीस आणि त्याला दर्शन दिलें नाहीस ! ' बाबाजींने असे किती तरी बोलावें व मग त्याचा हात धरून त्याला ओढून नेऊन जेऊं घालावें ! हा असा प्रकार किती तरी दिवस चालला ! बाबाजी इथे पुष्कळ दिवस राहिले होते; कारण रामलाला मला सोडून जाईना व बाबाजींनाहि त्याला इथेच टाकून जाववेना.

" पुढे एक दिवस, बाबाजी एकाएकी माझ्याकडे येऊन, अश्रुपूर्ण नयनांनी माझ्याकडे पाहात म्हणाले—' रामलालाने मला जसें पाहिजे होते तसे दर्शन देऊन आज माझ्या प्राणांची तळमळ शांत केली ! आता माझी कांहीहि इच्छा नाही, की मला आता कसलें दुःखहि नाही ! तुम्हांला सोडून माझ्याबरोबर येण्याची त्याची इच्छा नाही. तुमच्याजवळ तो आनंदांत राहात आहे व खेळत आहे, हेंच पाहून मी आनंद मानीन. कुठे का राहीना, तो आनंदांत असला म्हणजे झालें ! म्हणून आता त्याला तुमच्याजवळ ठेवून दुसरीकडे जायला मला हरकत नाही. तुमच्याजवळ तो सुखी आहे, असेंच ध्यान करून

मी आनंदाने दिवस घालवीन ! ' असें म्हणून मला रामलाला देऊन बाबाजी येथून दुसरीकडे निघून गेले. तेव्हांपासून रामलाला इथेच आहे. ”

रामायत पंथी साधूंच्या जवळ श्रीरामकृष्ण बरीच पदें शिकले, त्यांतील कांही कांही ते पुढे कधी कधी म्हणत असत.

# २६. नाना साधुसंप्रदाय, पद्मलोचन व नारायणशास्त्री

मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे, की श्रीरामकृष्ण साधनांमध्ये निमग्न असतां, निरनिराळ्या पंथाचे साधुसंत, दक्षिणेश्वरीं येण्याला सुरवात झाली होती. एवढेंच नव्हे, तर ज्या भावांच्या साधनांत ते निमग्न झालेले असत त्या भावांच्या साधकांची दक्षिणेश्वरीं जशी रहदारी सुरू असे. श्रीरामचंद्राची उपासना करून त्यांनी श्रीरामचंद्रदर्शनाचा लाभ प्राप्त करून घेतला, तोंच रामायत पंथाचेच साधु येऊं लागले; वैष्णवतंत्रोक्त साधनांत त्यांनी सिद्धि मिळविली, तों लगेच त्याच भावाचे यथार्थ साधक त्यांचेकडे येऊं लागले. वेदांतोक्त अद्वैतज्ञानाची चरमसीमा जी निर्विकल्प समाधि, ती त्यांनी प्राप्त करून घेतली, तों दक्षिणेश्वरीं वेदांत संप्रदायाचे साधक येऊं लागले, असें दिसून आलें आहे.

भिन्न भिन्न संप्रदायाचे साधक अशा रीतीने त्या त्याच वेळीं श्रीरामकृष्णांकडे येऊं लागण्यांत, एक विशेष गूढ अर्थ दिसून येतो. श्रीरामकृष्ण म्हणत असत—" फूल उमललें म्हणजे त्याच्याकडे भ्रमर चोहोकडून धांवत येतात." श्रीरामकृष्णांच्या स्वतःच्या बाबतींतहि हा नियम खरा झालेला दिसून येतो. एखादा अवतारिक महापुरुष एखाद्या विशेष प्रकारच्या सत्याचा अनुभव घेऊन सिद्ध झाला, म्हणजे तो अनुभव प्राप्त करून घेण्यासाठी यथार्थ जिज्ञासु साधक, त्याचेजवळ आपोआप उपस्थित होतात, असें कोणत्याहि धर्माचा इतिहास पाहतां दिसून येतें. वर्तमानयुगावतार, अनंतभावमय श्रीरामकृष्ण एकेक प्रकारच्या पंथाचा व एकेक प्रकारच्या साधनेचा स्वतः अनुभव घेऊन,

तिच्या मार्गांमध्ये जसजसे सिद्ध होत गेले, तसतसे त्या त्या मार्गांचे साधक, त्यांच्या अनुभवांचा फायदा घेण्यासाठी, एका अज्ञेय शक्तीने त्यांचेकडे ओढले गेले.

या निरनिराळ्या पंथांच्या साधना करीत असतां, त्या त्या साधनांत श्रीरामकृष्ण इतके तन्मय होऊन जात, की त्यावेळीं त्या साधनांखेरीज दुसरें कांही सुद्धा त्यांच्या मनात येत नसे. बाह्य दृष्टीने, लोकांना या त्यांच्या धरसोडी अर्थच न समजल्यामुळे व इतकी आध्यात्मिक उच्चावस्था समजण्याचेंहि ज्ञान नसल्यामुळे, ते त्यांना वेडा म्हणत. पण पुढे या विलक्षण वेडयाचा अतिमानुष शक्तिविकास जसजसा त्यांच्या दृष्टीस पडूं लागला, तसतसें त्यांचें मत बदलत गेले. तरी सुद्धा कोणाकोणाला ते वेडे वाटतच असत.

साधारण ब्राह्मसमाजाच्या आचार्यांपैकी एकजण, परमपूज्य शिवनाथ शास्त्री यांनी आमच्यापैकी कोणा कोणाजवळ एकदा असें म्हणून दाखविले की, श्रीरामकृष्णांची भावसमाधि हा खरोखर कांहीतरी स्नायुविकारापासून उत्पन्न झालेला रोग आहे आणि असा रोग झालेल्या माणसाला जशी मधे मधे मूर्च्छा येते, तसाच प्रकार श्रीरामकृष्णांचाहि होतो! श्रीरामकृष्णांच्या कानावर ही गोष्ट गेली. शिवनाथशास्त्री श्रीरामकृष्णांकडे बरेच दिवसांपासून येत असत. एक दिवस ते दक्षिणेश्वरीं आले असतां श्रीरामकृष्ण त्यांना म्हणाले, "का हो शिवनाथ! तुम्ही म्हणे याला रोग म्हणतां? आणि या रोगामुळे मला मूर्च्छा येते असें म्हणतां? लाकूड, माती, पैसा, संपत्ति वगैरे जड वस्तूंचें रात्रंदिवस चिंतन करून, तुमची डोकीं तेवढीं ठिकाणावर राहिलीं आणि ज्याच्या शक्तीमुळे हा सगळा जगत्-संसार चैतन्यमय झाला, त्याचे रात्रंदिवस चिंतन करून मला रोग झाला आणि माझे डोकें खराब झालें अँ? ही कुठल्या शहाणपणाची बुद्धि तुमची?" हें ऐकून शिवनाथबाबू निरुत्तर झाले.

"दिव्योन्माद" "ज्ञानोन्माद" वगैरे शब्दांचा प्रयोग श्रीरामकृष्णांच्या बोलण्यांत नित्य येत असे, आणि ते सर्वांच्या जवळ म्हणून दाखवीत की,

" माझ्या आयुष्यांत ईश्वरानुरागाचें बारा वर्षेपर्यंत प्रचंड तुफान सुटलें होतें. वावटळीने ज्याप्रमाणे दशदिशा धुळीने भरून जातात व मग हें झाड आंब्याचें, हें चिंचेचें, असा भेद समजणें तर बाजूलाच राहो, पण ही झाडें सुद्धा ज्याप्रमाणे धड दिसत नाहीत, अगदी तशीच अवस्था माझी झाली होती रे! चांगलें-वाईट, निंदा-स्तुति, शुचि-अशुचि हा सारा भेद-भाव नष्ट होऊन गेला होता! मनाला रात्रंदिवस एक ध्यास-' ईश्वराचा लाभ कसा होईल?' आणि रात्रंदिवस त्यासाठी धडपड! आणि लोक म्हणत-' याला वेड लागलें आहे!' "

असेंच आणखी एकदा गोष्टीवरून गोष्ट निघतां, श्रीरामकृष्ण स्वामी विवेकानंदांना म्हणाले-" बाळ, असें समज की, एका खोलींत एक चोर बसलेला आहे व पलीकडील खोलीत, एका पेटींत एक सोन्याचा गोळा ठेविला आहे, हें त्याला माहीत आहे; तर त्याला त्या ठिकाणीं सुखाने बसवेल काय? तो गोळा पटकावण्यासाठी तो जसा अधीर होईल व प्रसंगीं आपला जीव देखील धोक्यांत घालण्याला मागे पुढे पाहणार नाही, तशी स्थिति ईश्वलाभाविषयी माझी झाली होती!" असो.

श्रीरामकृष्ण विशिष्ट साधना करीत असतां दक्षिणेश्वरीं जे त्या त्या पंथाचे साधुसंत व साधक येऊन गेले, त्यांपैकी कांही कांहींच्या गोष्टी श्रीरामकृष्ण अम्हांला सांगत. ते म्हणत—" एकदा एक साधु आला होता. त्याचें मुखमंडल अत्यंत तेजःपुंज दिसे. तो केवळ एका जागीं बसे आणि एकसारखा हासे! फक्त सकाळीं एकदा व संध्याकाळी एकदा खोलींतून बाहेर येई व झाडें, आकाश, गंगा, देऊळ यांच्याकडे नीट न्याहाळून पाही आणि आनंदाने बेहोश होऊन, दोन्ही हात वर करून नाचे! एखादे वेळीं हासून हासून गडबडा लोळे आणि म्हणे—' वा वा! कशी माया आहे! कसा प्रपंच बनविला आहे!' आणि हीच त्यांची उपासना! त्याला आनंदलाभ झाला होता.

"आणखी एक दिवस एक साधु आला होता—काय तो त्याचा ज्ञानोन्माद! दिसायला एखाद्या पिशाच्चासारखा नागडा; अंगावर, डोक्यांत धूळ, नखें केस खूप वाढलेलीं; मढयावर घालतात तसलें एक वस्त्र मात्र अंगावर होतें! कालीमंदिरासमोर उभा राहून त्याने अशा रीतीने स्तव केला, की मंदिर जणु काय थरथर कांपूं लागलें आणि जगन्माता प्रसन्न होऊन जणु हासूं लागली!! नंतर भिकाऱ्यांना जेथे अन्न वांटतात, तेथे त्यांच्याबरोबर अन्न मिळेल म्हणून जाऊन बसला, पण त्याचें तें ध्यान पाहून पहारेकऱ्यांनी त्याला मारून तेथून हांकलून लावलें! तेथून, ज्या ठिकाणीं उष्टी खरकटीं पानें टाकतात, तेथे तो गेला. तेथे एक कुत्रें पानें चाटीत होतें, त्याच्या अंगावर हात ठेवून म्हणाला, 'वा! वा! हें काय बरें? तुम्हीं तेवढें जेवावें, आम्हीं तेवढं उपाशी राहावें होय?' असें म्हणून त्या कुत्र्याबरोबर, त्या पानांतले उष्ट गोळा करून तो खाऊं लागला! तें कुत्रेंहि तेथे खुशाल पानें चाटीत उभें होतें! हा सारा प्रकार पाहून मला भय वाटलें आणि धांवत जाऊन हृदयच्या गळ्याला मिठी मारून म्हणालों-'हृदू, शेवटी माझी देखील अशीच अवस्था होऊन मला असेंच भटकत फिरावें लागेल कारे? हा तर वेडा नव्हे, हा ज्ञानोन्माद!' हें ऐकून हृदय त्याला पाहावयाला गेला तेव्हां तो बागेंतून बाहेर पडत होता. हृदय त्याच्याबरोबर बराच दूरपर्यंत गेला व म्हणाला-'महाराज, ईश्वरलाभ कसा होईल? कांही उपाय सांगा.' प्रथम त्याने कांहीच उत्तर दिलें नाही. पण हृदयने त्याला सोडलें नाही. तो त्याच्यामागून चाललाच होता. मग कांही वेळाने तो म्हणाला-'हें नाल्याचें पाणी आणि तें गंगेंतलें पाणी सारखेंच पवित्र आहे असा जेव्हां बोध होईल, तेव्हां ईश्वरलाभ होईल.' त्याने बोलावें म्हणून हृदयने जंग जंग पछाडलें, म्हणाला—'महाराज, मला आपला चेला करून घ्या'-पण कांही नाही. तरी हृदय त्याच्याबरोबर चाललाच होता. हें पाहून त्याने एक दगड उचलला व हृदयवर फेकण्यासाठी उगारला. मग मात्र हृदयने पळ काढला व कांही वेळाने मागे वळून पाहतो तों तो साधु, नाहीसा झाला होता. अशा प्रकारचे साधु, उगीच लोक आपल्याला त्रास देतात, म्हणून अशा वेषांत राहतात. ह्या साधूची अत्यंत उच्च परमहंस अवस्था होती.

" आणखी एक दिवस एक साधु आला. त्याचा नामावरच अत्यंत विश्वास ! तो रामायतपंथी होता. त्याच्याजवळ सामानसुमान दुसरें कांही नव्हतें. फक्त एक लोटा व एक पोथी, इतकेंच. त्या पोथीवर त्याची फार भक्ति. तो रोज तिची गंध, फुलें वाहून पूजा करी व मधें मधें उघडून पाही. त्याची थोडी फार ओळख झाल्यावर, मीं एक दिवस त्याची पोथी पाहावयास मागितली, हो नाही करतां करतां, माझा फारच आग्रह दिसल्यामुळे त्याने ती मजजवळ दिली. मी मोठया उत्कंठेने उघडून बघतों तों काय ? आंत लाल शाईने, मोठमोठया अक्षरांनी केवळ " ॐ राम " हींच अक्षरें अथपासून इति पर्यंत लिहिलेलीं ! ! तो साधु म्हणाला–' उगीच सटरफटर ग्रंथ वाचून काय करायचे आहे ? एका भगवंतापासूनच तर, वेद पुराणे उत्पन्न झालीं आणि तो व त्याचें नाम हीं तर एकच आहेत; म्हणून चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें, यांत जें कांही आहे, तें सारें त्याच्या नामांत आहेच ! म्हणून मी त्याच्या नामालाच धरून बसलों आहे ! ' त्या साधूचा नामावर एवढा प्रचंड विश्वास होता ! "

श्रीरामकृष्णांकडे येणाऱ्या या साधकमंडळीपैकी, कित्येक त्यांचेकडून दीक्षा व संन्यास घेऊन परत गेले. अशाच पैकी पंडित नारायण शास्त्री हे एक होते. श्रीरामकृष्ण सांगत असत की पूर्वकालीन ब्रह्मचाऱ्यांप्रमाणे नारायण शास्त्र्यांनी गुरुगृहीं वास करून निरनिराळ्या शास्त्रांच्या अध्ययनांत पंचवीस वर्षे घालविली होतीं. षड्दर्शनांपैकी प्रत्येकांत पूर्णपणे पारंगत होण्याच्या इच्छेने त्यांनी काशी वगैरे निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या गुरूंच्या जवळ राहून त्या त्या दर्शनांत प्राविण्य मिळविलें होतें. परंतु बंगाल्यांतील नवद्वीपाच्या सुप्रसिद्ध नैय्यायिकांखेरीज, इतरत्र न्यायदर्शनाचा सांगोपांग अभ्यास होणें शक्य नाही, असें जाणून दक्षिणेश्वरीं येण्याचे अगोदर आठ वर्षे नवद्वीपास राहून त्यांनी न्याय-शास्त्रांतहि प्राविण्य मिळविलें होतें आणि घरीं परत जाण्यापूर्वी, एकदा कलकत्ता शहर पाहावें व दक्षिणेश्वरास जाऊन यावें या हेतूने ते दक्षिणेश्वरीं आले होते.

बंगाल्यांत येण्यापूर्वी त्यांची पंडित म्हणून चोहोकडे ख्याति झाली होती व जयपूरच्या महाराजांनी एकदा त्यांना आपले सभापंडित होण्याचीहि विनंति केली होती. परंतु न्यायशास्त्राचा अभ्यास करण्याचें त्यांचें शिल्लक राहिलें होतें, म्हणून त्यांनी महाराजांचे म्हणणें मान्य केलें नाही.

नारायणशास्त्री हे इतर साधारण पंडिताप्रमाणे नुसते पुस्तकी पंडित नव्हते. शास्त्रज्ञानाबरोबरच त्यांच्या अंतःकरणांत वैराग्याचाहि उदय झाला होता. वेदांत शास्त्रांत ते प्रवीण होते आणि हें शास्त्र नुसतें वाचण्यापुरतेंच नसून, अनुभवाचें आहे, हे त्यांनी जाणलें होतें. म्हणून वाचून झालेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी, साधना करण्याची त्यांना तळमळ लागली होती व घरीं परत जाऊन साधनेंत निमग्न होण्याचा त्यांनी संकल्पहि केला होता, अशा मनःस्थितींत त्यांचें दक्षिणेश्वरीं आगमन झालें आणि तेथे श्रीरामकृष्णांची गांठ पडून, त्यांच्याबद्दल नारायणशास्त्र्यांच्या मनांत प्रेम उत्पन्न झालें !

नारायणशास्त्री एक विख्यात पंडित; अर्थातच दक्षिणेश्वरीं त्यांची चांगली व्यवस्था लागली. दक्षिणेश्वर रम्य ठिकाण, त्यांतहि जेवणाखाणाची आयती सोय आणि शिवाय श्रीरामकृष्णांची दिव्य संगती, तेव्हां शास्त्रीबोवांनी कांही दिवस तेथे राहून, मग परत जाण्याचा विचार केला; परंतु श्रीरामकृष्णांच्या संगतींत त्यांना इतका आनंद वाटूं लागला की, त्यांना सोडून जावेंसेंच त्यांना वाटेना. सरलहृदयी श्रीरामकृष्णांनाहि नारायणशास्त्र्यांच्या सहवासांत आनंद वाटूं लागला व ईश्वरीय कथाप्रसंगांत त्या उभयतांचे दिवस आनंदांत जाऊं लागले.

वेदांतोक्त सप्तभूमिका आणि समाधि वगैरेच्या गोष्टी शास्त्रीजींनी वाचल्या होत्या. परंतु श्रीरामकृष्णांचा सहवास त्यांना प्राप्त झाल्यावर या सर्व गोष्टी त्यांना प्रत्यक्ष पाहावयास मिळाल्या. त्यांना दिसून आलें की, आपण समाधि वगैरे शब्द नुसते तोंडाने बोलत असतों, परंतु हा महापुरुष त्या अवस्थेचा सदा सर्वकाळ प्रत्यक्ष अनुभव घेत आहे ! त्यांनी विचार केला की

अशी संधि सोडतां कामा नये. शास्त्रांतील गूढ अर्थ समजावून देण्याला च्याशिवाय दुसरा कोण अधिक योग्य पुरुष सापडेल ? म्हणून वाटेल तें करून च्यापासून ब्रह्मसाक्षात्कार करवून घेण्याची खटपट केली पाहिजे. " असा चार करून त्यांनी परत घरीं जाण्याचा विचार रहित केला,

दिवसांमागून दिवस जाऊं लागले व श्रीरामकृष्णांच्या दिव्य संगतीत रायणशास्त्र्यांच्या अंतःकरणांतील वैराग्य व व्याकुळताहि वाढूं लागली. डित्याच्या प्रदर्शनाने सर्वांस चकित करीन, महामहोपाध्याय होऊन संसारांत र्वांपेक्षा अधिक नाम, यश, प्रतिष्ठा मिळवीन या सर्व गोष्टी आता त्यांना तुच्छ ाटूं लागल्या ! त्यांनी श्रीरामकृष्णांच्या संगतींत सर्वकाळ घालवावा, त्यांच्या ोंडून निघणारे शब्द एकचित्ताने श्रवण करावे, मनांत म्हणावें—" अहाहा ! या नुष्यजन्मामध्ये जे कांही जाणावयाचें व समजावयाचें आहे, तें सर्व समजून ऊन, हा महापुरुष कसा निश्चिन्त होऊन राहिला आहे ! मृत्यु देखील याला य दाखवूं शकत नाही ! उपनिषदें सांगतात की, अशा प्रकारचे पुरुष सिद्ध-कल्प असतात. त्यांची कृपा झाल्यास, मनुष्याची संसारवासना नष्ट होऊन, याला ब्रह्मज्ञान प्राप्त होतें. तर मग यांनाच कां शरण जाऊं नये ? "

शास्त्रीजींच्या हृदयांत यावेळीं कसें तीव्र वैराग्य उत्पन्न झालें होतें, हें खालील गोष्टीवरून समजेल. प्रसिद्ध कवि मायकेल मधुसूदन दत्त हे एकदा कांही कामासाठी, दक्षिणेश्वरीं आले होते व तें काम संपल्यावर ते श्रीरामकृष्णांची भेट घेण्यास गेले. शास्त्रीजी तेथे होते. मायकेलनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता, म्हणून शास्त्रीजींनी त्यांना तसें करण्याचें कारण विचारलें. माय-केलनी सांगितलें की, मी तें पोटासाठी केलें ! हें उत्तर ऐकून शास्त्रीजींना फार राग आला व ते म्हणाले, " काय ? या क्षणभंगुर संसारांत, पोटाची खळगी भरण्यासाठी स्वधर्माचा त्याग केलांत ? धिःकार असो अशा माणसाला ! एक दिवस मरायचें तर आहेच, मग आपल्या धर्मात राहून मेला असतां, तर काय जग ओस पडलें असतें ? " मायकेल निघून गेल्यावर, शास्त्रीजींनी श्रीराम-

कृष्णांच्या खोलीच्या दरवाज्याजवळच्या भिंतीवर एका कोळशाने मोठमोठ्या अक्षरांनी लिहून ठेवलें—" पोटासाठी स्वधर्माचा त्याग करणारांना धिःकार असो ! " असो.

शास्त्रीजींच्या मनांतील वैराग्य दिवसेंदिवस वाढूं लागलें व श्रीरामकृष्णांची कृपा कशी होईल, ही त्यांना एकसारखी तळमळ लागली. लवकरच एक दिवस त्यांनी श्रीरामकृष्णांना एकटेच गाठले व " मला आपण संन्यास-दीक्षा द्या, " असें त्याच्यापाशी धरणें घेतलें. श्रीरामकृष्ण अर्थातच या गोष्टीला एकदम संमत झाले नाहीत, तरी शास्त्रीजीचें तीव्र वैराग्य पाहून त्यांनी त्यांना संन्यासदीक्षा दिली. आपली इच्छा पूर्ण झाली असें पाहून शास्त्रीजींना अत्यंत धन्यता वाटली आणि वसिष्ठाश्रमांत जाऊन तपश्चर्या करण्याचा त्यांनी संकल्प केला. पुढे लवकरच त्यांनी श्रीरामकृष्णांचा निरोप घेतला व वसिष्ठाश्रमाकडे प्रयाण केलें. तेथे अत्यंत उग्र तपश्चर्या करीत असता त्याचें शरीर क्षीण होत जाऊन त्यांचा देहांत झाला.

एखाद्या ठिकाणीं कोणी यथार्थ साधु, साधक अथवा भगवद्भक्त अथवा कोणी शास्त्रज्ञ पंडित असल्याचें समजताच त्याच्या भेटीला जाण्याची. श्रीरामकृष्णांना इच्छा होई व ते कसेहि करून त्याचेकडे जाऊन, त्याच्याशी चार ईश्वरीय गोष्टी बोलल्यावांचून स्वस्थ बसत नसत. मग तेथे आपला योग्य सन्मान होईल की नाही, आपल्याला लोक काय म्हणतील, वगैरे गोष्टींचा ते बिलकुल विचारच करीत नसत. पंडित पद्मलोचन, स्वामी दयानंद सरस्वती वगैरेकडे ते असेच आपण होऊन गेले होते.

पंडित पद्मलोचन न्यायशास्त्रांत अत्यंत निपुण होते. न्यायशास्त्राचें अध्ययन पूर्ण झाल्यावर काशीस राहून त्यांनी वेदांतशास्त्राचें उत्कृष्ट अध्ययन करून त्यांतहि प्राविण्य मिळविलें होतें आणि त्यांच्या विद्वत्तेची ख्याति ऐकून बरद्वानच्या महाराजांनी त्यांना आपले मुख्य सभापंडित केलें होतें.

पंडित पद्मलोचन हे अत्यंत उदार अंतःकरणाचे होते. माझेंच मत चांगले, व दुसऱ्याचें वाईट, असा एकदेशीपणा त्यांना बिलकुल आवडत नसे. श्रीरामकृष्ण म्हणत–" एकदा बरद्वानच्या राजसभेंत, पंडितांमध्ये 'शिव श्रेष्ठ की विष्णु श्रेष्ठ' हा वाद माजला. शास्त्राचे आधार दाखवून आणि शब्दांचा कीस काढून, जो तो आपापल्या पक्षाचे समर्थन करीत होता. परंतु अशा रीतीने, बराच वेळ मोठा कडाक्याचा वाद चालूनहि त्याचा कांहीच निकाल लागला नाही. सभेंत पद्मलोचन नव्हते. येतांक्षणींच प्रश्न ऐकून ते म्हणाले–'मी कधी शिवालाहि पाहिलें नाही आणि विष्णूलाहि पाहिलें नाही, तेव्हां हा श्रेष्ठ की तो श्रेष्ठ हें मी कसे सांगूं? तरीपण, शास्त्रांवरूनच ठरवावयाचें असेल, तर असें म्हणावें लागेल की शैवशास्त्रांत शिवाला श्रेष्ठ म्हटलें आहे व वैष्णव-शास्त्रांत विष्णूला श्रेष्ठ म्हटलें आहे. ज्याचें जें इष्ट, तेच त्याला इतर देवतां-पेक्षा श्रेष्ठ' असें म्हणून, पंडितजींनी शिव आणि विष्णु यांचे श्रेष्ठत्वदर्शक कांही श्लोक म्हणून दाखविले व शिव आणि विष्णु हे दोघेहि सारखेच श्रेष्ठ आहेत, असें आपलें मत सभेंत सांगितलें! पंडितजींच्या या सरळ व स्पष्ट भाषणाने वाद मिटला व सर्वजण त्यांच्या प्रतिभेची प्रशंसा करूं लागले."

पद्मलोचन नुसते पंडितच नव्हते, तर अत्यंत सदाचारी, निष्ठावान व उदार अंतःकरणाचे तपस्वी व वैराग्यवान असे भगवद्भक्त होते. श्रीराम-कृष्णांनी, त्यांच्या गुणाची कीर्ति ऐकून त्यांची भेट घेण्याचा बेत केला. मथुर-बाबूंनी श्रीरामकृष्णांची इच्छा पाहून त्यांना बरद्वानास पाठविण्याची तयारी केली; पण इतक्यांत त्यांना असें समजलें की, पंडितजींची प्रकृति जरा नादुरुस्त असल्यामुळे हवापालट करण्यासाठी व औषधोपचारासाठी, त्यांना कलकत्त्यास आरियादहाच्या घाटाजवळ एका बागेंत आणलें असून त्यांची प्रकृतीहि तेथे सुधारत आहे. ही बातमी खरी की खोटी हे पाहण्यासाठी त्यांनी हृदयला पाठविले. हृदयने येऊन सांगितलें–' बातमी खरी आहे व श्रीरामकृष्णांची हकीगत त्यांच्या कानावर गेली असून, त्यांना भेटण्याची पंडितजींना फार इच्छा झाली आहे,' हें ऐकून श्रीरामकृष्णांनीच त्यांचेकडे जाण्याचें ठरवून, दिवसहि नक्की केला.

त्या दिवशीं हृदयला बरोबर घेऊन श्रीरामकृष्ण पंडितजींच्या भेटीस गेले व परस्परांच्या भेटीनें परस्परांना फार समाधान वाटलें. पंडितजींच्या गुणांची कीर्ति यथार्थ आहे, असें श्रीरामकृष्णांना दिसून आलें आणि श्रीरामकृष्णांची उच्च आध्यात्मिक अवस्था व समाधि पाहून, हे कोणी थोर महापुरुष आहेत अशी पंडितजींची खात्री झाली. श्रीरामकृष्णांच्या तोंडून जगदंबेचीं एक दोन गाणीं ऐकून पंडितजींचे नेत्र भरून आले आणि श्रीरामकृष्णांची भावतन्मयता व वरचेवर होणारा बाह्यचैतन्याचा लोप पाहून आणि त्या अवस्थेंत प्राप्त होणारे अनुभव त्यांच्या तोंडून ऐकून, पंडितजी चकित होऊन गेले.

यानंतर पुढे पुष्कळदा श्रीरामकृष्ण व पंडितजी यांच्या भेटी झाल्या व उत्तरोत्तर श्रीरामकृष्णाच्या अलौकिकत्वाची, पंडितजींना अधिकाअधिक ओळख पटत जाऊन, अखेरीस साक्षात् ईश्वरभावाने ते श्रीरामकृष्णांची भक्ति करूं लागले !

पंडितजींचा विश्वास एवढा दृढ होण्याला एक कारण झालें. वेदांतज्ञान-विचाराबरोबरच पंडितजी थोडी फार तंत्रोक्त साधनाहि करीत असत. त्या साधनांचें थोडें फार फलहि त्यांना मिळालें होतें. त्यांच्या साधनांनी प्रसन्न होऊन, त्यांच्या इष्टदेवतेने त्यांना एक वर दिला होता व त्याच्या योगाने मोठमोठया पंडितांच्या सभेंत ते सदैव विजयीच होत. तो प्रकार असाः–त्यांच्याजवळ नेहमी एक पाण्याने भरलेला तांब्या व हातरुमाल असे. कोणत्याहि प्रश्नाच्या मीमांसेला प्रवृत्त होण्यापूर्वी तो तांब्या हातांत घेऊन ते कांही वेळ येरझारा करीत व मग त्यातील पाण्याने तोंड धुवून चुळा भरून टाकीत आणि हातपाय पुसून मग आपल्या कामाला लागत. अशा रीतीने तयार होऊन ते वादास प्रवृत्त झाले, म्हणजे त्यांचा पराजय करण्याचें सामर्थ्य कोणालाहि नसे ! ही गोष्ट पंडितजींनी कधीहि कोणाजवळ बोलून दाखविली नाही व त्यांच्या अशा हात, पाय व तोंड धुण्यांत कांही विशेष रहस्य असेल, ही कल्पनाहि कधी कुणाच्या मनाला शिवली नाही.

श्रीरामकृष्ण सांगत असत—" आईच्या कृपेने ही गोष्ट मला समजली व एक दिवस मी त्यांचा तांब्या व हातरुमाल त्यांना न कळत दडवून ठेवला! त्या दिवशीं असाच काही प्रश्न निघाला होता व त्याचा खल करण्यास पंडित जमले होते. तेथे जाण्यापूर्वी पंडितजी नेहमीच्या रीतीप्रमाणे तोंड धुण्यासाठी आपला तांब्या पाहूं लागले, परंतु तो कुठे सापडेना, म्हणून ते तसेच सभेस गेले. परंतु तेथे त्या वादांत त्यांची मतीच चालेना, म्हणून परत फिरून, ते आपला तांब्या व हातरुमाल शोधूं लागले. मग त्यांना जेव्हां समजलें की मीच तो तांब्या जाणून बुजून मुद्दामच दडवून ठेवला, तेव्हा त्यांच्या आश्चर्याला सीमा उरली नाही. प्रत्यक्ष इष्ट देवताज्ञानाने ते माझी स्तुति करूं लागले!" त्या दिवसापासून पंडितजी श्रीरामकृष्णाना साक्षात् ईश्वरावतार समजून त्याप्रमाणे त्यांची भक्ति करूं लागले! श्रीरामकृष्ण म्हणत–" पंडित पद्मलोचन एवढा मोठा जाडा विद्वान, पण त्याची मजवर देवासारखी भक्ति असे. तो म्हणे–' मी साऱ्या पंडितांना बोलावून सभा भरवून सगळयांना सांगतों की, तुम्ही ईश्वरावतार आहां; कोणाची छाती असेल तर त्याने माझे म्हणणें खोडून काढण्यास पुढे यावें!" मथुरबाबूंनी एकदा कांही कारणाने दक्षिणेश्वरीं पंडितांची सभा भरवली होती. पद्मलोचन म्हणजे अत्यंत आचारवान् आणि निर्लोभी; शूद्राचें दान ग्रहण करणें हें त्यांना अगदी असंमत, म्हणून कदाचित् ते सभेस येणार नाहीत असे वाटून, त्यांना येण्याचा आग्रह करण्यास मथुरबाबूंनी मला सांगितलें. मी त्यांना विचारतांच ते म्हणाले," तुम्ही बरोबर असाल, तर एखाद्या भंग्याच्या घरीं जेवायला देखील जायची माझी तयारी आहे! मग कोळ्याच्या घरच्या एखाद्या यःकिश्चित् सभेची काय गोष्ट?"

पुढे ही सभा झाली, परंतु पद्मलोचन त्या सभेला जाऊं शकले नाहीत. सभा बोलावण्यापूर्वीपासूनच त्यांची प्रकृति जास्त बिघडली होती व म्हणून पुन्हा हवा-पालट करण्यासाठी, त्यांनी अत्यंत सद्गदित अंतःकरणाने श्रीरामकृष्णांचा निरोप घेतला. तेथून ते काशीस गेले आणि तेथे थोडयाच दिवसांत त्यांचा अंत झाला.

यानंतर पुढे पुष्कळ दिवसांनी कलकत्त्यांतील भक्तमंडळी जेव्हां श्रीरामकृष्णांच्या चरणकमलाच्या आश्रयास येऊं लागली, तेव्हां त्यांपैकी कोणी

कोणी, भक्तीच्या उत्कटतेने त्यांना उघड उघड ईश्वरावतार म्हणूं लागले. ही गोष्ट श्रीरामकृष्णांच्या कानावर जातांच, त्यांनी त्यांना असें न करण्यास सांगितलें. परंतु भक्तीच्या भरानें ही भक्तमंडळी आपलें ऐकत नाहीत असें ऐकून, एक दिवस ते रागावून आमच्याचवळ म्हणाले-" कोणी डॉक्टरकी करतो, कोणी थिएटरची मॅनेजरी करतो आणि ही असली मंडळी इथे येऊन मला अवतार म्हणतात ! त्यांना वाटतें की, यांना अवतार म्हटले म्हणजे यांची मोठी कीर्ति वाढवली आणि यांना एखाद्या मोठ्या पदावर बसविले ! अवतार कशाला म्हणतात, याचें यांना काय ज्ञान झालें आहे, कोणास ठाऊक ? यांच्या येण्याच्या अगोदर, नारायणशास्त्री आणि पद्मलोचन असे मोठे मोठे दिग्गज पंडित, कोणी तीन तर कोणी सहा शास्त्रांचें अध्ययन केलेले, सारा जन्म ज्यांनी ईश्वरचिंतनांत घालवलेला, असे कितीएक पंडित इथे येऊन मला अवतार म्हणून गेले ! आता अवतार म्हणवून घेणे म्हणजे अगदी तुच्छ गोष्ट वाटते. तेव्हां आता ही मंडळी अवतार म्हणून पुकारा करून माझी काय कीर्ति वाढविणार आहेत कोणास ठाऊक ? "

पंडित पद्मलोचनांखेरीज आणखीहि कांही पंडितांच्या श्रीरामकृष्णांनी गांठी घेतल्या. त्यांच्या अंगीं श्रीरामकृष्णाना जे गुण दिसून आले त्यांचा उल्लेख कधी कधी ते आपल्या संभाषणांत करीत.

आर्यमतप्रवर्तक स्वामी दयानंद सरस्वती, एकदा कांही कामासाठी कलकत्त्यास आले होते. त्यावेळीं पंडित म्हणून त्यांची ख्याति चोहोकडे पसरली होती, तरी त्यावेळीं त्यांनी आर्यसमाजाची स्थापना केलेली नव्हती. त्यांची भेट घेण्यास श्रीरामकृष्ण ते उतरले होते तेथे गेले. त्यांच्याविषयी श्रीरामकृष्ण म्हणत, " दयानंदांची भेट घेण्यास गेलों; असें दिसलें की त्यांच्यामध्ये थोडीफार शक्ति उत्पन्न झाली आहे. त्यांचें वक्षःस्थल सर्वदा आरक्त असलेलें दिसे. वैखरी अवस्था ! रात्रंदिवस, चोवीस तास, एकसारख्या शास्त्राच्या गोष्टी बोलत ! व्याकरणाच्या जोरावर अनेक शास्त्रवाक्यांच्या अर्थाची त्यांनी उलटापालट करून

टाकली!" मी अमुक करीन, मी आपले मत प्रस्थापित करीन," असा अहंकार त्यांच्यामध्ये दिसला.

जयनारायण पंडितांसंबंधी ते म्हणत-" एवढे मोठे पंडित. पण अहंकाराचा लवलेशहि त्यांच्यामध्ये नव्हता. स्वतःच्या मृत्यूची वेळ त्यांना समजली होती. ते एकदा म्हणाले, 'काशीस जाईन व तेथेच माझा अंत होईल.' आणि अखेरीस तसेंच झाले."

आरियादह-निवासी कृष्णकिशोर भट्टाचार्य यांच्या श्रीरामचंद्रावरील अपार भक्तीचा उल्लेख ते अनेक प्रसंगीं करीत. कृष्णकिशोर यांच्या घरीं श्रीरामकृष्णाचे नेहमी जाणे येणे असे व कृष्णकिशोर व त्यांची परम भक्तिमती पत्नी या दोघांचीहि श्रीरामकृष्णांच्या ठिकाणीं अत्यंत निष्ठा असे. रामनामावर कृष्णकिशोरांची ज्याप्रमाणे अपार निष्ठा असे, त्याचप्रमाणे, पूर्वी ऋषींनीच सांगितलेले म्हणून, "मरा, मरा" या शब्दावरहि त्यांची तेवढीच निष्ठा असे! कारण, पुराणांतरीं वर्णन आहे की, नारदांनी वाल्या कोळ्याला हाच मंत्र जप करण्यास सांगितलें होतें व याच मंत्राच्या प्रभावाने वाल्या कोळ्याचें वाल्मीकी ऋषि झाले! कृष्णकिशोर यांना संसारांत अनेक आघात सोसावे लागले. त्यांचा एक कर्ता सवरता मुलगा वारला. श्रीरामकृष्ण म्हणत-" पुत्रशोकाचा असा जबरदस्त प्रभाव आहे की, एवढा मोठा विश्वासी भक्त कृष्णकिशोर ना, पण त्याला सुद्धा कांही दिवस पुत्रशोकाने वेडयासारखें केलें होतें!"

याशिवाय श्रीरामकृष्ण, महर्षि देवेंद्रनाथ, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर वगैरेंना भेटण्यास गेले होते. महर्षींच्या उदार अंतःकरणाची व भक्तीची व ईश्वरचंद्रांच्या निष्काम कर्मयोगाची आणि अपार दयेची ते आमच्याजवळ अनेकदा प्रशंसा करीत.

# २७. मधुरभावाची मीमांसा

" कामगंधशून्य झाल्याशिवाय, महाभावमयी श्रीमती राधेचा भाव समजणें शक्य नाही ! "

" तुम्ही या लीलेंतील श्रीकृष्णावरील राधेचें अलौकिक प्रेमच लक्षांत घ्या, म्हणजे झालें. ईश्वराबद्दल इतकें प्रेम मनामध्ये उत्पन्न झालें, म्हणजे त्याची प्राप्ति होते. पाहा बरें, वृंदावनांतील गोपी, पतिपुत्र, कुलशील, मान-अपमान, लाजलज्जा, लोकभय, समाजभय—हें सारें सोडून देऊन, श्रीकृष्णासाठी कशा वेडया झाल्या होत्या ? तुम्हांला जर परमेश्वराचें असें वेड लागलें, तर तुम्हांला सुद्धा त्याची प्राप्ति होईल. "

— श्रीरामकृष्ण

---

स्वतः साधक असल्याशिवाय साधकजीवनाचा इतिहास समजणें कठीण आहे. कारण, साधना म्हणजे सूक्ष्म भावराज्यांतील गोष्टी. त्याठिकाणीं रूपरसादि विषयांच्या स्थूल मोहक मूर्ति दृग्गोचर होत नाहीत अथवा बाह्य वस्तु व व्यक्ति यांच्याशीं असणारा संबंध तेथे असत नाही अथवा रागद्वेषादिकांनी भरलेलें मानव मन, प्रवृत्ति प्रेरणेने अस्थिर होऊन नानातऱ्हेचीं भोगसुखें मिळविण्यासाठी ज्या प्रकारच्या धडपडी करीत असतें—व ज्यांना संसारांत ' शूरत्व ', ' वीरत्व ', ' महत्त्वाकांक्षा ' वगैरे गोंडस नांवें देण्यांत येतात,—त्या प्रकारच्या धडपडीहि

तेथे नसतात. तेथे साधकाचें स्वतःचें अंतःकरण आणि त्यांतील जन्मजन्मांतराचे अनंत संस्कारप्रवाह, यांवांचून कांहीहि नसतें. बाह्य वस्तु व व्यक्ति यांच्याशीं संबंध येऊन उच्च भाव व उच्च ध्येय यांकडे आकृष्ट होणें व त्या उच्च भावाकडे व ध्येयाकडे मनाची एकाग्रता करण्यासाठी व ते ध्येय हस्तगत करण्यासाठी, प्रतिकूल संस्कारांबरोबर एकसारखा निकराचा संग्राम, ह्याच गोष्टी भावराज्यामध्ये असतात. त्या ठिकाणीं बाह्य विषयांपासून विमुख होऊन, निजानंदामध्ये निमग्न होण्यासाठी, साधकाची एकसारखी धडपड चालू असते. ही धडपड चालू असतां साधक हळूहळू आंतरराज्यांतील अधिकाधिक गहन प्रदेशांत प्रवेश करून, अधिकाधिक सूक्ष्म भावांचा अनुभव घेतो व अखेरीस आपल्या अस्तित्वाच्या अत्यंत गहन अशा प्रदेशांत उपस्थित होऊन, अशब्द, अस्पर्श, अरूप, अव्यय, एकमेवाद्वितीय अशा वस्तूचा साक्षात्कार करून घेऊन त्या वस्तूशीं तो एक होऊन राहतो. पुढे त्याचे अनंतजन्मोपार्जित संस्कारसमूह समूळ नष्ट होऊन, संकल्प-विकल्पात्मक धर्म जोंपर्यंत कायमचा नष्ट झालेला नसतो, तोंपर्यंत ज्या मार्गाचें अवलंबन करून त्याच्या मनाने अद्वय वस्तूचा साक्षात्कार करून घेतलेला असतो, त्याच मार्गाने विलोमभावाने, समाधि अवस्थेंतून त्याचें मन बाह्य जगतामध्ये उतरतें. अशा रीतीने बाह्य जगतामधून समाधि व समाधींतून बाह्य जगत् अशा त्याच्या मनाच्या येरझारा सुरू होतात. जगताच्या आध्यात्मिक इतिहासामध्ये, कांही अलौकिक साधक असेहि दिसून येतात की, पूर्वोक्त समाधिअवस्था हीच ज्यांच्या मनाची स्वाभाविक अवस्था असते आणि इतर साधारण मानवांच्या कल्याणासाठी म्हणून, ते मोठ्या जबरदस्तीने आपल्या स्वाभाविक समाधि अवस्थेला बाजूला ठेवून, बाह्य जगतामध्ये कांही काळपर्यंत वास करतात ! श्रीरामकृष्णदेवांचा साधनेतिहास नीट लक्षपूर्वक पाहिल्यास असे दिसून येतें की, तेहि याच कोटींतील साधक होते. कारण त्यांनी स्वतः आमच्याजवळ असें बोलून दाखविलें आहे की, लहानसान एखाददुसरी वासना मुद्दाम राखून ठेवून तिच्या साह्याने मी आपल्या मनाला तुमच्यासाठी खालच्या

पायरीवर रोखून ठेवतों ! नाही तर त्याची स्वाभाविक प्रवृत्ति अखंडामध्ये मिळून जाऊन राहण्याकडे आहे ! ”

समाधि अवस्थेमध्ये ज्या अखंड अद्वय वस्तूचा साक्षात्कार होतो, तिला प्राचीन ऋषिवर्यांपैकी कोणी “ सर्व भावांचा अभाव ” अथवा “ शून्य, ” तर कोणी “ सर्व भावांची सम्मीलनभूमि ” अथवा “ पूर्ण ” असें म्हटलें आहे. नांवें निराळीं असलीं तरी सर्वांच्या म्हणण्याचा सारांश एकच. कारण, सर्व भावांची उत्पत्ति व अखेर तेथेच होते, ही गोष्ट सर्वांनाच मान्य आहे. भगवान बुद्ध तिला “ सर्व भावांची निर्वाणभूमि शून्य वस्तु ” असे म्हणाले, भगवान शंकराचार्य तिलाच “ सर्व भावांची सम्मीलनभूमि, पूर्ण वस्तु ” असें म्हणाले.

‘ शून्य ’ अथवा ‘ पूर्ण ’ या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या अद्वैतभावभूमीलाच उपनिषदांत व वेदांतांत भावातीत अवस्था म्हटलेले आहे. कारण, त्या अवस्थेमध्ये साधकाचें मन अढळ झालें म्हणजे तें सगुणब्रह्माच्या अथवा ईश्वराच्या सृजन, पालन, संहार वगैरे लीलांच्या सीमेपलीकडे गेलेलें असतें. यावरून असें दिसून येईल की, आध्यात्मिक राज्यांत प्रविष्ट होऊन शांत, दास्य वगैरे ज्या पंचभावावलंबनाने मनुष्याचे मन, ईश्वरासहित आपला संबंध ठेवीत असतें, त्या पंचभावांहून अद्वैतभाव ही एक निराळी गोष्ट आहे आणि इहपरलोकीं प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या भोगसुखांविषयी पूर्णपणे उदासीन होऊन मनुष्याचें मन अत्यंत पवित्र झालें, म्हणजेच त्याला या अद्वयभावाचा अनुभव प्राप्त होतो आणि त्याच्याच साहाय्याने तें निर्गुण ब्रह्मवस्तूचा साक्षात्कार करून घेऊन कृतार्थ होतें.

अद्वैतभाव व त्यायोगें उपलब्ध होणारे निर्गुण ब्रह्म यांची गोष्ट सोडून दिली तर, आध्यात्मिक जगतामध्ये शांत, दास्य, सख्य, वात्सल्य व मधुर असे निरनिराळे पांच भाव असलेले दिसून येतात. यांपैकी प्रत्येकाची साध्य वस्तु म्हणजे ईश्वर अथवा सगुण ब्रह्म ही होय. अर्थात् सर्वशक्तिमान, सर्वनियंता, नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाववान् अशा ईश्वराशीं, या पांचांपैकी एखादा भावसंबंध कल्पून, साधक त्याचा साक्षात्कार करून घेण्याची खटपट करतो आणि सर्वां-

तर्यामी, सर्वभावाधार ईश्वरहि त्याच्या मनाची एकांतिक निष्ठा पाहून साधकाच्या भावाला अनुरूप असें स्वरूप धारण करून, त्याला दर्शन देऊन कृतार्थ करतो. अशा रीतीने, निरनिराळ्या युगांमध्ये ईश्वराने निरनिराळीं भावमय चिद्घन रूपें धारण केल्याचें, एवढेंच काय पण कित्येकदा साधकांच्या कल्याणासाठी स्थूल मनुष्यरूपहि धारण केल्याचें, शास्त्रांवरून दिसून येतें.

या संसारामध्ये जन्म ग्रहण करून मनुष्य इतर सर्वांशीं ज्या निरनिराळ्या भावाने संबंध ठेवतो, त्या स्थूल भावसमूहाचीच शांत, दास्य आदिकरून पंचभाव हीं सूक्ष्म व शुद्ध रूपें आहेत. या संसारांत पिता, माता, बंधु, भगिनी, पति, पत्नी, सखा, प्रभु, भृत्य, पुत्र, कन्या, राजा, प्रजा, गुरु, शिष्य, इत्यादिकांशीं आपला निरनिराळा संबंध असल्याचें आपल्या अनुभवास येत आणि शत्रूखेरीज इतरांशीं नेहमी शांत भावाने व्यवहार करणें, हें आपलें कर्तव्य आहे असें आपण समजतों. भक्ताचार्यांनी या निरनिराळ्या संबंधाचे शांत, दास्य आदिकरून पांच भाग केले आहेत व परमेश्वर व आपण यांमध्ये या पांचांपैकी एखादा संबंध कल्पून त्या भावाच्या अवलंबनाने परमेश्वराची भक्ति करीत जावी, असा त्यांनी उपदेश केला आहे. संसारामध्ये ह्या भावांचा स्थूलरूपाने प्रत्यक्ष अनुभव येत असल्यामुळे, त्यांपैकी एखादा भाव ईश्वराच्या ठिकाणीं कल्पून त्या भावाच्या अवलंबनाने त्याची भक्ति केल्यास, ते मनुष्यास सोपें जाईल, एवढेंच नव्हे तर, संसारांतील इतरांशीं येणाऱ्या संबंधामुळे, ज्या रागद्वेषादि वृत्ति त्याच्या मनांत उत्पन्न होऊन, त्याच्याकडून नाना तऱ्हेचीं कुकर्मे करवितात, त्या वृत्तींचे मोड फिरविल्यास, त्याला ईश्वरदर्शनाच्या ध्येयाकडे अधिक जलदीने अग्रसर होतां येईल; जसें—विषयभोगाचा काम सोडून देऊन ईश्वरदर्शनाचाच काम तो हृदयांत ठेवील; इतर लोकांवर क्रोध करण्याचें सोडून देऊन, ईश्वरदर्शनाच्या मार्गांतील अडथळ्यांवरच तो रागावेल; क्षणभंगुर सुखांचा लोभ सोडून, तो ईश्वरदर्शनाचाच लोभी होईल, इत्यादि.

भावपंचकाचा याप्रमाणे ईश्वरावर आरोप करण्याचे शिक्षण मनुष्याला एकदम अथवा एकाच व्यक्तीकडून मिळालें नाही. निरनिराळ्या महापुरुषांनी

या पंचभावांपैकी एक अथवा दोन भावांचा आश्रय करून ईश्वरप्राप्तीसाठी साधना केल्या व त्या त्या भावामध्ये तन्मय होऊन आपलें ईश्वरप्राप्तीचें ध्येय प्राप्त करून घेतलें व तसेंच करण्याविषयी इतर साधारण लोकांसहि उपदेश केला. या सर्व महापुरुषांच्या अलौकिक जीवनांचें परिशीलन केलें असतां असें दिसून येईल की, प्रेम हाच सर्व भावसाधनांचा पाया असून ईश्वराचें कोणतें ना कोणतें तरी साकार रूपच त्या प्रेमाचा विषय असतो. कारण, असें दिसून येतें की, जोंपर्यंत मनुष्याला अद्वैतभावाचा अनुभव प्राप्त झालेला नसतो, तोंपर्यंत ईश्वराच्या कोणत्या ना कोणत्या तरी साकार रूपाचीच कल्पना करणें त्याला शक्य असते.

प्रेमाच्या गुणधर्मांचें पर्यालोचन केलें असतां असें दिसून येतें की प्रेम हें, प्रेम करणारा व तो जीवर प्रेम करतो ती व्यक्ति, या दोघांमधील ऐश्वर्यज्ञानमूलक भेदभाव हळूहळू नष्ट करून टाकतें. भावसाधनांत मग्न असलेल्या साधकाच्या मनांतूनहि प्रेम हें, ईश्वराच्या अपार ऐश्वर्याची व शक्तीची जाणीव हळूहळू नष्ट करून टाकतें आणि साधकाच्या भावानुरूप ईश्वराच्या स्वरूपाची कल्पना त्याच्या मनामध्ये उत्पन्न करून ती दृढ करिते. याच कारणानें, ईश्वर हा सर्वस्वी आपलाच आहे अशी दृढ भावना करून तो त्याचेजवळ हट्ट धरतो, त्याचेवर रागावतो, त्याच्यावर रुसतो. असें करतांना आपण कांही विलक्षण गोष्ट करीत आहों, असें त्याला मुळीच वाटत नाही. या पंचभावांपैकी कोणत्याहि भावाचा आश्रय केला तरी साधकाला ईश्वरप्राप्ति होते. अर्थातच शांतादि भावपंचकांपैकी ज्याच्या अवलंबनानें साधकाला ईश्वराच्या ऐश्वर्यज्ञानाचा सर्वांत अधिक विसर पडतो व त्याला ईश्वराच्या प्रेमाचा व माधुर्याचाच अनुभव प्राप्त होतो, तोच भाव सर्व भावांत श्रेष्ठ, असें म्हणावयास कांही हरकत नाही. शांतादि भावपंचकाची या दृष्टीने परीक्षा करून, भक्ताचार्यांनी मधुरभावालाच सर्वांत श्रेष्ठ ठरविलें आहे.

भावपंचकांपैकी प्रत्येकाच्या अत्युच्च अवस्थेमध्ये, साधकाला स्वतःचा पूर्ण विसर पडतो. ‘ आपल्या प्रेमास्पदाला ज्यांत सुख, त्यांतच आपल्याला सुख, ’ असें वाटण्याइतका तो आपल्या प्रेमास्पदाशीं एकजीव होऊन जातो. त्याच्या

विरहकालीं त्याच्या चिंतनांत तो इतका तन्मय होऊन जातो की, त्याला आपल्या अस्तित्वाचेंहि भान राहात नाही ! श्रीमद्भागवतादि भक्तिग्रंथांवरून असें दिसून येतें की, श्रीकृष्णाच्या विरहानें, व्रजगोपिकांची अगदी अशीच अवस्था झाली होती; एवढेंच नव्हें, तर श्रीकृष्णाशीं त्या इतक्या एकरूप होऊन गेल्या होत्या की, त्या केव्हां केव्हां आपणांसच श्रीकृष्ण समजूं लागत ! जीवाच्या कल्याणासाठी येशुख्रिस्तानें क्रूसावर ज्या यातना भोगल्या, त्यांचें चिंतन करतां करतां, कांही ख्रिस्ती साधूंच्या शरीरांतून प्रत्यक्ष रक्त बाहेर आल्याचें ख्रिस्ती भक्तिग्रंथांत प्रसिद्ध आहे. * यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येईल की, शांतादि भावपंचकांपैकी प्रत्येकाच्या अत्यंत उच्च अवस्थेंत, साधक आपल्या प्रेमास्पदाच्या चिंतनांत तल्लीन होऊन, प्रेमाच्या उत्कटतेने, त्याच्याशीं पूर्णपणे एक होऊन जातो व अशा रीतीनें अद्वैतभावाचा त्याला अनुभव प्राप्त होतो. भगवान् श्रीरामकृष्णदेवांच्या अलौकिक साधकजीवनानें या विषयावर अद्भुत प्रकाश पाडलेला आहे. भाव-साधनांमध्ये अग्रसर होऊन, प्रत्येक भावाच्या अत्यंत उच्च अवस्थेंत ते आपल्या प्रेमास्पदाशीं अगदी तन्मय होऊन जात व आपलें अस्तित्व पूर्णपणे विसरून, अद्वैतभावाचा अनुभव घेत.

येथे कदाचित् कोणी अशी शंका घेईल की शांत, दास्य वगैरे भावांच्या अवलंबनानें, मनुष्याच्या मनाला सर्व भावातीत अशा अद्वय वस्तूचा कसा अनुभव येईल ?

याचें उत्तर असें आहे की, कोणताहि भाव जसजसा अधिकाधिक परिपुष्ट होत जातो, तसतसा, तो आपला विस्तार वाढवून साधकाच्या मनांतून इतर सर्व विरोधी भाव हळूहळू नाहीसे करून टाकतो आणि जेव्हां त्याची पूर्ण परिपुष्टि होते, तेव्हां साधकाचें तन्मय झालेलें अंतःकरण, ध्यानकालीन " तूं " ( सेव्य ) " मी " ( सेवक ) व या दोहोंमधील दास्यसंबंध, हें सर्व विसरून

* सेण्ट फ्रॅन्सिस ऑफ ॲसिसी व सेण्ट कॅथराइन ऑफ सिएना यांचें चरित्र.

केवळ " तूं " शब्दनिर्दिष्ट सेव्य वस्तूमध्ये प्रेमाने एकजीव होऊन, अचल भावाने राहूं लागतें. शास्त्रें सांगतात की, मनुष्याचें मन, मी, तूं व या दोहों-मधील संबंध, यांचा एकाच वेळीं केव्हांहि अनुभव घेऊं शकत नाही. त्याला एकदा " तूं " शब्दनिर्दिष्ट वस्तूचा, तर एकदा " मी " शब्दनिर्दिष्ट वस्तूचा अनुभव येत असतो व या दोन्ही पदार्थांमध्ये लौकर लौकर परिभ्रमण करतां यावें म्हणून, या दोघांमध्ये एखादा विशेष संबंध त्याच्यामध्ये उदय पावत असतो. तेव्हां असा भास होतो, की जणु काय तें मन, मी, तूं व त्या दोघां-मधील संबंध, या सर्वांचा एकाच वेळीं अनुभव घेत आहे. परिपुष्ट भावाच्या प्रभावाने मनाची चंचलता नष्ट होऊन जाते व तें हळूहळू पूर्वोक्त गोष्ट समजूं लागतें. ध्यानाभ्यासाने मन जसजसें वृत्तिहीन होत जातें, तसतसें त्याला असें कळून येतें की, एकाच अद्वय पदार्थाला दोन बाजूंनी, दोन निरनिराळ्या दृष्टींनी पाहिल्यामुळेच, मी व तूं अशा दोन पदार्थांची कल्पना उत्पन्न झाली आहे.

शांतदास्यादि भावांपैकी एकेका भावाचा पूर्ण विकास होऊन, वर सांगि-तल्याप्रमाणे अद्वय वस्तूचा अनुभव प्राप्त होण्याला किती साधकांना किती कालपर्यंत परिश्रम करावे लागले आहेत, याचा विचार केल्यास आश्चर्य वाटतें. शास्त्ररूप आध्यात्मिक इतिहासाचें अवलोकन केले असतां असें दिसून येतें की, एकेका युगांत मनुष्याच्या मनाने यांपैकी एकेका भावाचा आश्रय उपासनेच्या कामीं केला आहे, व त्या भावाच्या आश्रयानेच त्या त्या युगांतील साधकांनी ईश्वराचा व त्यांपैकी कांहींनी अद्वय वस्तूचा साक्षात्कार करून घेतला आहे. असें दिसून येते, की वैदिक आणि बौद्ध युगांत मुख्यतः शांत भाव, औपनिष-दिक युगामध्ये, शांतभावाच्या पूर्ण विकासाने अद्वैतभाव व दास्य आणि पितृभाव; रामायण युगांत व भारत युगांत शांत आणि निष्कामकर्मसंयुक्त दास्यभाव; तांत्रिक युगांत ईश्वराचा मातृभाव व मधुरभावाचा कांही अंश मात्र आणि वैष्णव युगांत सख्य, वात्सल्य व मधुरभावाचा पूर्ण विकास—अशा रीतीने पंच-भावांचा स्थूलमानाने विकास झालेला आहे.

भारतवर्षाच्या आध्यात्मिक इतिहासामध्ये, अशा रीतीने अद्वैतभावाबरोबरच शांतादि पंचभावांचा पूर्ण विकास झालेला जरी दिसून येतो, तरी भारतेतर देशांतील धर्मसंप्रदायामध्ये केवळ शांत, दास्य व ईश्वराचा पितृभाव एवढयाच भावांचा प्रकाश दिसून येतो. यहुदी, ख्रिस्ती व मुसलमान धर्मसंप्रदायांमध्ये राजर्षि सॉलोमन यांचीं कांही सख्य व मधुरभाव-सूचक गीतें प्रचलित असल्याचें दिसून येतें. तरी त्या धर्मामध्ये या भावांचें पूर्णार्थाने ग्रहण झाल्याचें दिसून येत नाही. मुसलमान धर्मामधील सुफी संप्रदायामध्ये सख्य व मधुरभावाचा विकास दिसून येतो तरी, मुसलमान लोक अशा भावाची ईश्वरोपासना कुराणमतविरोधी आहे असेंच समजतात. तसेच ख्रिस्तीधर्मातील कॅथॉलिक संप्रदायामध्ये, येशु ख्रिस्ताची माता मेरी हिच्या पूजेच्या योगाने जगन्मातेच्या पूजेची कल्पना प्रचलित असली तरी, तिचा संबंध प्रत्यक्ष ईश्वराच्या मातृभावाशीं येत नसल्याकारणाने भारतामध्ये प्रचलित असलेल्या जगन्मातेच्या पूजेप्रमाणे, साधकाला, "अखंड सच्चिदानंदाचा साक्षात्कार करविणें व स्त्रीमात्रामध्ये ईश्वरीय विकास प्रत्यक्ष दाखविणें," हें फल ती देऊं शकत नाही.

वर सांगितलेंच आहे की, कोणत्याहि भावसंबंधाच्या अवलंबनाने साधकाचे मन ईश्वराकडे आकृष्ट झालें म्हणजे तें हळूहळू त्या भावामधे तन्मय होतें व अखेरीस बाह्य जगतापासून विमुख होऊन स्व-स्वरूपामध्ये मग्न होऊन जातें. अशा रीतीने मग्न होण्याचे वेळीं त्यांतील पूर्वसंस्कार त्याच्या मार्गामध्ये अडथळे आणून त्याला स्व-स्वरूपांत मग्न होऊं न देतां बहिर्मुख करण्याचा प्रयत्न करतात. या कारणाने एका एका भावामध्ये तन्मय होण्याला पूर्वसंस्कारविशिष्ट साधारण साधकमनाला, पुष्कळ वेळां एक जन्म सुद्धा पुरा पडत नाही! अशा स्थलीं, साधक प्रथम निरुत्साह होतो, साध्य वस्तूच्या प्राप्तीविषयी हताश होतो व अखेरीस साध्य वस्तूवरील विश्वासच हरवून बसून, बाह्य जगांतील रूपरसादि विषयांसच सार समजून, त्यांच्यामागे पुन्हा

धांवत सुटतो. म्हणूनच, बाह्यविषयविमुखता, प्रेमास्पदाच्या ध्यानांत तन्मयत्व व भावजन्य उल्हास, ह्याच, साधकाची उत्कटता व अधिकार समजण्याच्या कसोट्या आहेत,

एखाद्या भावामध्ये तन्मयत्व प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत असतां पूर्वसंस्कारसमूहाशीं होणाऱ्या झगडयांचा ज्यांनी अनुभव घेतला नाही त्यांना, साधकाला आपल्या अंतःसंस्काराशीं केवढा दारुण संग्राम करावा लागतो, याची कल्पनाहि येणार नाही. ज्याने असा प्रयत्न केला आहे त्यालाच, एखाद्या भावामध्ये तन्मयत्व प्राप्त करून घेण्याला केवढा खटाटोप पडतो, हें समजेल व श्रीरामकृष्णांनी एकामागून एक अशा सर्व भावामध्ये, थोडया थोडया वेळांत तन्मयत्व प्राप्त करून घेतल्याचें पाहून तो चकित होऊन जाईल व त्याची निःसंशय खात्री होईल की ही गोष्ट मानवी शक्तीच्या पलीकडील आहे.

भावराज्यांतील सूक्ष्म तत्वें, मानवबुद्धीला समजण्यास फार कठीण आहेत. म्हणूनच अवतारिक महापुरुषांचे साधनेतिहास लिहिले गेले नसावेत. श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, महंमद, श्रीशंकराचार्य वगैरेंचा साधनाकालीन जीवनेतिहास कुठेहि लिहिलेला नाही. भगवान बुद्धदेवांचा थोडासा सापडतो श्रीचैतन्यदेवांच्या साधनाकालीन जीवनाचा मात्र बराचसा इतिहास लिहिलेला सापडतो. श्रीचैतन्य देव व त्यांचे मुख्य लीलासहचर, यांच्या सख्य, वात्सल्य व मधुर भावांच्या साधनाचा अथपासून इतिपर्यंत बहुतेक इतिहास सापडतो. प्ररंतु असें असलें तरी "या भावत्रयापैकी प्रत्येकाच्या अत्यंत विकासावस्थेमध्ये साधकाचें मन इतकें तन्मय होऊन जातें की, तें आपल्या प्रेमास्पदाशीं सर्वतोपरी एक होऊन अद्वय वस्तुमध्ये विलीन होऊन जातें"—हें चरम तत्व कोठेहि लिहिलेलें आढळून येत नाही. भगवान् श्रीरामकृष्णदेवांच्या अलौकिक चरित्रावरून व अदृष्टपूर्व साधनेतिहासावरून सांप्रत युगांत ही गोष्ट सर्व जगाला स्पष्टपणे समजली की, जगतांतील सर्व धर्म आणि संप्रदाय यथार्थ साधकाला एकाच ठिकाणीं नेऊन सोडतात.

वर सांगितलेंच आहे की, श्रीचैतन्यप्रमुख वैष्णवाचार्यांचा व मधुरभावसाधनेचा साद्यंत इतिहास आपणांस पाहावयास सापडतो. मधुरभावसाधनेचा मार्ग त्यांचेकडून जर कळला नसता, तर ईश्वर-लाभाच्या या एका प्रधान मार्गाचें यथार्थ ज्ञान लोकांस झालें नसतें. भगवान् श्रीकृष्णाची वृंदावनलीला कांही निरर्थक घडलेली गोष्ट नव्हे, हें प्रथम त्यांनीच जगाला दाखविलें.

पाश्चात्यांच्या अनुकरणाने केवळ बाह्य घटनाच लिपिबद्ध करण्यांत तत्पर असे सांप्रत कालचे इतिहासलेखक म्हणतील-" पण, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणे वृंदावनलीला खरोखरच घडून आली, याविषयी कांही एक पुरावा सापडत नाही. म्हणून हें सारें तुमचे रडणें आणि हसणे, भाव आणि महाभाव, हें सारें वाळूच्या पायावर उभारलेल्या इमारतीसारखें आहे ! " यावर वैष्णव आचार्य असें म्हणतात की, " पौराणिक दृष्टीने, आम्ही म्हणतों त्याप्रमाणे वृंदावनलीला झालीच नाही, याविषयी तुम्ही तरी काय खात्रीलायक पुरावा पुढे आणतां ? तुमचा इतिहास जोपर्यंत असा कांही बेमालूम पुरावा पुढे आणूं शकत नाही, तोंपर्यंत आम्हीहि असेंच म्हणूं की, तुमच्या संशयाची इमारत सुद्धा वाळूच्याच पायावर उभारलेली आहे. दुसरी गोष्ट—समजा की, तुम्ही कधी काळीं अशा प्रकारचा खात्रीलायक पुरावा पुढे आणूं शकलां, तरी सुद्धा, त्या योगाने आमच्या विश्वासाची अशी काय हानि होणार आहे ? नित्य वृंदावनांतील नित्य लीलेला त्याचा यत्किंचितहि स्पर्श होणार नाही ! भावराज्यांतील ही नित्यवृंदावनलीला सदैव सारखीच सत्य राहील. चिन्मयधामामध्ये चिन्मय राधाश्यामाची या प्रकारची अपूर्व प्रेमलीला पाहाण्याची जर तुमची इच्छा असेल, तर प्रथम कायावाचामनें कामगंधहीन व्हा व श्रीराधेच्या सख्यांपैकी एखाद्या सखीप्रमाणे निःस्वार्थ सेवा करण्याचें शिका. असें झालें म्हणजे तुम्हांला दिसून येईल की, तुमच्या हृदयांतच श्रीहरीची लीलाभूमि जें वृंदावन तें नित्य प्रतिष्ठित झालें आहे आणि तेथे तुमच्याबरोबरच त्या वृंदावनलीलेचा नित्य अभिनय होत आहे !

भावराज्याची सत्यता ज्याच्या अनुभवास आलेली नाही व बाह्य घटना-रूप आलंबन विसरून, शुद्ध भावेतिहासाची ज्याला कल्पना होऊं शकत नाही त्याला श्रीवृंदावनलीलेच्या सत्यतेचा व माधुर्याचा कधीहि उपभोग घेतां येणार नाही. भगवान् श्रीरामकृष्णदेव या लीलेचें तन्मय होऊन वर्णन करीत असतां, जेव्हां पाहात की ह्या लीलेच्या गोष्टी, आपल्याकडे आलेल्या इंग्रजी शिकलेल्या तरुण श्रोते मंडळीस मोठयाशा रुचिकर वाटत नाहीत व पटत नाहीत तेव्हां ते म्हणत, " तुम्ही या लीलामधील श्रीकृष्णावरील राधेचें अलौकिक प्रेमच लक्षांत घ्या, म्हणजे झालें. ईश्वराबद्दल इतकें प्रेम मनांत उत्पन्न झालें म्हणजे त्याची प्राप्ति होते. पाहा बरे, वृंदावनांतील गोपी, पतिपुत्र, कुलशील, मान-अपमान, लाजलज्जा, लोकभय, समाजभय—हें सारें सोडून देऊन, श्रीकृष्णासाठी कशा वेडया झाल्या होत्या ! तुम्हांला सुद्धा जर परमेश्वराचें असे वेड लागेल, तर तुम्हांला सुद्धा त्याची प्राप्ति होईल ! " आणखी ते म्हणत–" कामगंधशून्य झाल्या-शिवाय महाभावमयी श्रीमती राधेचा भाव समजणें शक्य नाही सच्चिदानंदघन श्रीकृष्णाच्या नुसत्या दर्शनाने गोपींच्या मनात कोटी रमणसुखाहूनहि अधिक आनंद होत असे ! त्यांची देहबुद्धीच मुळी नष्ट होऊन जात असे मग अशा स्थितींत त्यांच्या मनांत तुच्छ कामभावाचा उदय झाला असेल का रे ? श्रीकृष्णाच्या अंगांतून बाहेर पडणाऱ्या दिव्य ज्योतीचा स्पर्श झाल्याबरोबर त्यांना प्रतिरोम-कूपाच्या ठिकाणीं, रमणसुखाच्या कोटीपट आनंदाचा अनुभव होत असे ? "

एकदा स्वामी विवेकानंद, श्रीरामकृष्णांजवळ श्रीराधाकृष्णांच्या वृंदावन-लीलेच्या ऐतिहासिक सत्यतेसंबंधी वाद उपस्थित करून, ' ती गोष्ट खोटी आहे ', –असे सिद्ध करण्याचा प्रयत्न करू लागले. श्रीरामकृष्ण त्यांचें सर्व म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन म्हणाले, " ठीक आहे. कबूल केलें, की श्रीमती राधिका या नांवाची गोपी कधीहि होऊन गेली नाही आणि राधेचे चरित्र हा एका प्रेमिक साधकाच्या कल्पनेचा खेळ आहे; परंतु मला असें सांग, की ह्या चरित्राची कल्पना करतांना, तो साधक श्रीराधेच्या भावामधे अत्यंत तन्मय होऊन गेला

होता, एवढी गोष्ट तरी तुला कबूल आहे की नाही? झालें तर मग, हा तुझा साधकच, हें चरित्र लिहितांना स्वतःला विसरून राधा बनला होता आणि अशा रीतीने स्थूलभावाने तरी वृंदावनलीलेचा अभिनय खरोखरच घडून आला, ही गोष्ट तरी तुला पटते की नाही ? ”

आणि वास्तविक पाहतां, वृंदावनांतील श्रीभगवानांच्या प्रेमलीलेसंबंधी जरी शेकडो शंका उपस्थित केल्या, तरी चैतन्यप्रमुख महान वैष्णव भगवद्भक्तांनी प्रथम आविष्कृत केलेला व त्यांच्या शुद्ध व पवित्र जीवनांमध्ये प्रत्यक्ष प्रकाशमान दिसणारा मधुरभाव-संबंध चिरकाल सत्यच राहील आणि चिरकाल या विषयाचे अधिकारी साधक, स्वतःला स्त्री आणि भगवानाला पति स्वरूप समजून त्यांच्या पुण्यदर्शनाच्या लाभाने धन्य होतील आणि या भावाच्या अत्यंत उच्च अवस्थेंत शुद्धाद्वय ब्रह्मवस्तूमध्ये प्रतिष्ठित होतील, यांत तिळमात्र संशय नाही.

श्रीभगवानांच्या ठिकाणीं पतीची भावना ठेऊन साधनामार्गामध्ये अग्रसर होणें, हे स्त्रीजातीला स्वाभाविक व सहजसाध्य असलें तरी, पुरुषशरीरधारी साधकांच्या दृष्टीने पाहतां, ही गोष्ट अस्वाभाविक वाटण्याचा संभव आहे. मग असें आहे तर, श्रीचैतन्यदेवांनी हा असा विसंगत मार्ग लोकांमध्ये कां प्रचलित केला, असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. त्याचे उत्तर असे आहे, की युगावताराची सर्व कार्ये लोककल्याणासाठीच केलेलीं असतात. श्रीकृष्णचैतन्यांच्या या कार्याचीहि तीच गोष्ट आहे. साधकांना त्या काळीं आध्यात्मिक राज्यामध्ये ज्या प्रकारचा आदर्श प्राप्त होण्याची उत्कंठा लागली होती, त्याकडे लक्ष ठेऊन श्रीचैतन्यदेवांनी त्यांना मधुरभावरूप नवीन मार्ग दाखवून दिला. नाहीतर ईश्वरावतार नित्यमुक्त श्रीचैतन्यदेवांना, स्वतःच्या कल्याणासाठी या भावसाधनेमध्ये मग्न होऊन तिचा पूर्णादर्श लोकांपुढे ठेवण्याचेंहि कांही कारण नव्हतें. श्रीरामकृष्णदेव म्हणत असत— “ हत्तीचे बाहेरील दांत ज्याप्रमाणे शत्रूला मारण्यासाठी व आंतील दांत ज्याप्रमाणे आपलें खाणें नीट चघळून लठ्ठ होण्यासाठी असतात, त्याचप्रमाणे श्रीगौरांगांमध्ये*

---

* श्रीचैतन्यदेव.

आंत व बाहेर दोन प्रकारचे भाव असत. बाहेरील मधुरभावाच्या साहाय्याने ते लोकांचें कल्याण करीत आणि आंतील अद्वैतभावाच्या योगाने, प्रेमाच्या अत्यंत उच्च अवस्थेंत, ब्रह्मभावांत निमग्न होऊन स्वतः भूमानंदाचा अनुभव घेत ! ”

तत्वेतिहासज्ञ म्हणतात की, बौद्ध युगाच्या अखेरीस, भारतवर्षांत वज्राचार्यांचा अभ्युदय झाला होता. त्यांनी या मताचा प्रसार केला की—“निर्वाण-पदवी प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करीत असतां, मन बहुतेक वासनाशून्य होऊन महाशून्यांत लीन होण्याच्या बेतात असतें, इतक्यांत ‘ निरात्मा ’ नामक देवी त्याच्यासमोर उभी राहून, त्याला तसें होऊं न देतां आपल्या शरीराचे ठिकाणीं तें वेढून ठेवतें व अशा रीतीने साधकाच्या स्थूल शरीराला जरी नाही, तरी सूक्ष्म शरीराला यच्चावत् इंद्रियजन्य भोगसुखाचा अनुभव ती देवता प्राप्त करून देते. ” स्थूल विषयोपभोगांचा त्याग केला असतां, भावराज्यांतील सूक्ष्म निरवच्छिन्न भोगसुखाची प्राप्ति होते, असें त्यांनी प्रचलित केलेलें मत कालांतराने विकृत होऊन गेलें; ‘ भोगसुखप्राप्ति हाच धर्मानुष्ठानाचा मूळ उद्देश आहे ’ अशी घातुक समजूत प्रचारांत आली व देशामध्ये या कारणाने व्यभिचार माजला. भगवान् श्रीचैतन्यदेवांच्या आविर्भावाच्या वेळीं, सर्व देशभर अशिक्षित लोकांमध्ये याच विकृत बौद्धधर्ममताचा फैलाव झाला असून, त्यांमध्येहि अनेक संप्रदाय उत्पन्न झाले होते. उच्च वर्गामध्ये पाहावें तर, त्यांतील बहुतेक लोक तंत्रोक्त वामाचाराचे अनुयायी बनले असून जगन्मातेची सकाम पूजा व उपासना यांच्या द्वारें, सिद्धि आणि भोगसुखें प्राप्त करून घेण्याच्या मागे लागले होते. बरे, त्यावेळीं जे कोणी यथार्थ साधक होते, त्यांची या ‘ मतांच्या गलबल्यांत ’ दिशाभूल होऊन जाऊन, त्यांना मार्ग दाखविणारा कोणीच उरला नव्हता. अशा धर्मग्लानीच्या वेळीं श्रीचैतन्यदेवांचा अवतार झाला. त्यांनी प्रथम आपल्या जीवनामध्ये अद्भुत त्यागवैराग्याचें अनुष्ठान करून तो आदर्श सर्व साधकांच्या समोर ठेवला. नंतर, ‘ शुद्ध पवित्र होऊन स्वतःला स्त्री कल्पून ईश्वराची पतिभावाने उपासना केल्यास, मानवाला सूक्ष्म भावराज्यामध्ये निरवच्छिन्न दिव्यानंदाचा लाभ खरोखर

होतो,' हें त्यांनी दाखविलें आणि स्थूलदृष्टिसंपन्न साधारण लोकांना या गूढ गोष्टी कळणार नाहीत म्हणून, त्यांच्यासाठी ईश्वराच्या नाममहात्म्याचा प्रचार केला. अशा रीतीने त्यांच्या कृपेने पथभ्रष्ट झालेले अनेक विकृत बौद्धसंप्रदाय, पुन्हा योग्य आध्यात्मिक मार्गाला लागले. विकृत-वामाचाराचें अनुष्ठान करणारे लोक प्रथम प्रथम उघडपणे त्यांच्या सांगण्याविरुद्ध वागले, तरी, त्यांच्या अदृष्टपूर्व जीवनाच्या अद्भुत आकर्षणाने त्यागशील होऊन निष्कामभावाने पूजा करून, जगन्मातेच्या दर्शनासाठी प्रयत्न करूं लागले. म्हणूनच भगवान् श्रीचैतन्यदेवाचें अलौकिक चरित्र लिहितांना, कोणी कोणी ग्रंथकारांनी असेंहि लिहिलें आहे की श्रीचैतन्यदेवांचा अवतार होण्याचे वेळीं शून्यवादी बौद्धसंप्रदायांनीहि आनंद प्रदर्शित केला.

सच्चिदानंदघन परमात्मा श्रीकृष्ण हेच एक पुरुष आणि जगांतील सर्व स्थूल, सूक्ष्म पदार्थ व जीव, हे सर्व त्यांच्या महाभावमयी प्रकृतीच्या अंशापासून उत्पन्न झालेले, अर्थात् हे सर्व त्यांच्या स्त्रिया; म्हणून, शुद्ध व पवित्र होऊन, त्यांना पति समजून त्यांची उपासना केल्यास जीवाला मुक्ति आणि निरवच्छिन्न आनंदाचा लाभ होतो—हें चैतन्यमहाप्रभूंनी प्रचलित केलेल्या मधुरभावाचें सारतत्त्व आहे. महाभावामध्ये सर्व भावांचा एकत्र समावेश आहे; सर्वश्रेष्ठ गोपी श्रीराधा हीच महाभावस्वरूपिणी आणि इतर गोपिकांपैकी कोणी एक भावरूपिणी तर कोणी दोन अथवा अधिक भावरूपिणी, अर्थातच, व्रजगोपिकांचें अनुकरण करून साधनांस प्रवृत्त झाल्यास, साधक हे सर्व भाव प्राप्त करून घेतो व अखेरीस महाभावजन्य महानंदाची त्याला प्राप्ति होऊन तो धन्य होतो. अशा रीतीने "महाभाव-स्वरूपिणी श्रीराधेच्या भावाच्या ध्यानांत तन्मय होऊन स्वतःच्या सुखाच्या इच्छेचा पूर्ण परित्याग करून कायायाचामने, सर्वस्वीं श्रीकृष्णांच्या सुखांतच सुखी होणें"—हें या मार्गांतील साधकाचें अंतिम ध्येय आहे.

समाजामध्ये, विवाहित स्त्रीपुरुषांचें परस्पर प्रेम, जाति, कुल, शील, लोकभय प्रभृति अनेक बाह्य उपाधींनी मर्यादित झालेलें असतें. विवाहित

स्त्रीपुरुष या सर्व नियमांच्या सीमेमध्ये राहून, नानातऱ्हेचीं कर्तव्यें अकर्तव्यें यांच्याकडे लक्ष देऊन, परस्परांच्या सुखासाठी यथासाध्य परिश्रम करीत असतात. विवाहित स्त्री, सामाजिक कठोर नियमबंधनाचें यथायोग्य पालन करीत असतां, अनेक प्रसंगीं आपलें पतीवरील प्रेम कमी करण्यास अथवा प्रसंगविशेषीं तें पूर्ण विसरून जाण्यासहि कमी करीत नाही. स्वाधीना स्त्रीचें प्रेमाचें आचरण याहून कांही निराळेंच असतें. प्रेमाच्या उत्कटतेने ती अनेक प्रसंगीं हीं असलीं सामाजिक बंधनें खुशाल पायांखाली तुडवून टाकते; एवढेंच नव्हे तर, ती आपल्या प्रेमास्पदासाठी आपला सामाजिक अधिकारहि आणि आपले सर्वस्वहि झुगारून देण्यास मागे पुढे पाहात नाही! अशा प्रकारचा सर्वग्रासी प्रेमसंबंध, ईश्वराशीं ठेवण्याचा वैष्णव आचार्यांनी उपदेश केला आहे आणि एवढयाचसाठी त्यांनी वृंदावनाधीश्वरी श्रीराधेला, आयान घोषाची विवाहित पत्नी असूनहि, श्रीकृष्णांसाठी तिने सर्वस्वाचा त्याग केला म्हणून, अत्यंत श्रेष्ठ ठरविलें आहे.

वैष्णव आचार्यांनी मधुरभाव हा शांत, दास्य, सख्य, वात्सल्य या चारी भावांची सारसमष्टि असून शिवाय त्याहून अधिक आहे, असें वर्णन केलें आहे. कारण प्रेमिका स्त्री आपल्या प्रेमास्पदाची एखाद्या विकत घेतलेल्या दासाप्रमाणे सेवा करते; सखीप्रमाणे सर्व अवस्थांमध्ये त्याची काळजी घेऊन, त्याच्या आनंदाने आनंदी व त्याच्या दुःखाने दुःखी होते; मातेप्रमाणे त्याच्या हितचिंतनांत सदैव मग्न असते आणि अशा रीतीने स्वतःला पूर्णपणे विसरून आपल्या प्रेमास्पदाच्याच चिंतनामध्ये सदैव तन्मय होऊन, त्याच्या मनाला अत्यंत आनंद व शांति देण्यासाठी सदा सर्वकाळ झटत असते;—अशाच प्रकारच्या स्त्रीचें प्रेम सर्वांत श्रेष्ठ असून तिला भक्तिशास्त्रांत "समर्था प्रेमिका" असें म्हटलें आहे. स्वार्थी विचारांनी दूषित झालेल्या इतर सर्व प्रकारच्या प्रेमाचे "समंजस व साधारण" असे दोन विभाग केले आहेत. जी स्त्री आपल्या प्रेमास्पदाच्या सुखाबरोबरच आपल्याहि सुखाकडे नजर ठेवते तिला "समंजसा प्रेमिका" आणि जी केवळ आपल्यालाच सुख व्हावें म्हणून आपल्या प्रेमास्पदाला प्रिय समजते, ती "साधारणी प्रेमिका," असें समजावें. असो.

यथार्थ साधकांनी शुद्ध, पवित्र आणि अत्यंत वैराग्यसंपन्न होऊन श्रीकृष्णाची पतिभावाने उपासना करावी, असे शिकवून आणि साधारण लोकांसाठी नाममहात्म्याचा प्रचार करून, भगवान् श्रीकृष्णचैतन्यांनी त्याकाळीं देशांत धर्माच्या नांवाखाली माजलेला व्यभिचार मोडण्याची आणि लोककल्याण करण्याची खटपट केली आणि याचा परिणामहि असा की, अनेक पथभ्रष्ट साधकांना त्यांच्या उपदेशाने मार्गावर आणलें; समाजाचीं शिथिल झालेली बंधनें दृढ केलीं, जातीबाहेर गेलेल्यांना 'भगवद्भक्तरूप' एका नवीन जातीत आणलें आणि सर्व संप्रदायांसमोर वैराग्याचा पवित्र उच्चादर्श ठेवून त्यांच्यामध्ये नवीन जोम उत्पन्न केला; एवढेच नव्हे तर, इतर साधारण प्रेमी स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं अत्युत्कट प्रेमामुळे उत्पन्न होणारे सर्व मानसिक आणि शारीरिक विकार सुद्धा, मधुरभावाने साधना करण्याऱ्या शुद्ध व पवित्र साधकाचे ठिकाणीं ईश्वरध्यानाच्या तीव्रतेने उत्पन्न होतात, ही गोष्ट श्रीचैतन्यांनी स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध करून, तत्कालीन अलंकारशास्त्रावरहि अध्यात्माची छाप बसविली. शृंगारपूर्ण काव्यांवरहि अध्यात्मशास्त्राची छाप बसवून, तीं काव्ये साधकाला म्हणण्याला योग्य अशीं केलीं आणि कामक्रोधादिकांचे मोड ईश्वरप्राप्तीकडे वळविण्याचे शिक्षण देऊन साधकांचा मार्ग अतिशय सुगम करून ठेवला !

पाश्चात्यांकडून शिक्षण मिळालेल्या सांप्रतकाळच्या नवीन संप्रदायाच्या दृष्टीने, मधुरभाव हा पुरुषांना अस्वाभाविक व विसदृश असा असला, तरी त्याची खरी किंमत वेदांततत्त्वज्ञान्यांच्या तेव्हांच लक्षांत येईल. त्यांना ठाऊक असतें की मनांतील भावनांचेंच अनेक दिवसांच्या अभ्यासाने दृढ-संस्कारांत पर्यवसान होतें आणि जन्मजन्मांतरीच्या अशा संस्कारामुळेच मनुष्याला एका अद्वय ब्रह्म वस्तूच्या जागीं हें विविध व विचित्र जग दिसूं लागतें. ईश्वरकृपेने जर आता या क्षणीं त्याची " हें जगत् नाही " अशी निःसंशय भावना झाली, तर त्याच्या दृष्टीपुढून हें जग ताबडतोब कोठल्या कोठे नाहीसें होईल. " जग आहे "

अशी भावना केल्यामुळेच हें जग उत्पन्न झालें आहे. " मी पुरुष आहे " अशी भावना केल्यामुळेच पुरुषत्व प्रात्प झालें आहे, दुसऱ्यांनी " मी स्त्री आहे " अशी भावना केल्यामुळे त्यांना स्त्रीत्व प्राप्त झालें आहे. शिवाय मनुष्याच्या हृदयांत एक भाव प्रबल झाला म्हणजे तो इतर सर्व भावांना नाहीसे करतो, ही गोष्ट नित्यपरिचयाची आहे. म्हणून कांट्यानेच ज्याप्रमाणे कांटा काढतात त्याप्रमाणे ' ईश्वराच्या ठिकाणीं मधुरभावसंबंधाचा आरोप करून त्याच्या साहाय्याने, इतर सर्व भाव नाहीसे करण्याचा प्रयत्न साधक करीत असतो ' असेंच वेदांतशास्त्रवेत्ते समजतात. मानवमनांतील सर्व संस्कारांमध्ये " मी देही " आणि त्या बरोबरच " मी पुरुष " अथवा " मी स्त्री " हेच संस्कार अत्यंत प्रबल असतात. श्रीभगवानांना पति समजून " मी स्त्री " अशी भावना करतां करतां, साधक पुरुष आपलें पुरुषत्व विसरूं शकला, म्हणजे मग त्यानंतर " मी स्त्री " ही भावनाहि टाकून देण्यास तो समर्थ होऊन भावातीत अवस्थेचा त्याला सहज अनुभव प्राप्त होईल, ही गोष्ट उघड आहे. म्हणून मधुरभावामधे साधक सिद्ध झाला म्हणजे तो भावातीत भूमीच्या अगदी जवळ प्राप्त झाला असेंच वेदांततत्त्वज्ञानी समजतात.

इथे कोणी असा प्रश्न करील की " मग काय, नुसता राधाभाव प्राप्त होणें, हेंच मधुर भावानुयायी साधकांचें अंतिम ध्येय आहे की काय ? " यावर उत्तर असें की, सांप्रत काळीं साधकाला महाभावमयी राधेचा भाव प्राप्त होणें, हें अशक्य असून, नुसता सखीभावच प्राप्त करून घेण्याचें त्याने ध्येय ठेवावें, असें वैष्णव आचार्यांचें मत असल्याचें जरी दिसून येतें, तरी साधकाने श्रीराधेचा भाव प्राप्त करून घेण्याचेंच ध्येय आपणासमोर ठेवावें हें उचित आहे. कारण असें दिसून येतें की, सख्या व श्रीमती राधिका यांच्या भावांत फरक नसून, तो केवळ प्रेमाच्या उत्कटतेमध्येच आहे. असें दिसून येतें की, सख्या सुद्धा राधेप्रमाणेच श्रीकृष्णाची पतिभावाने उपासना करीत व श्रीराधेच्या सहवासांतच श्रीकृष्णाला सर्वात जास्त आनंद होत असतो हें जाणून, श्रीकृष्णाच्या संतोषासाठी

त्या राधा-कृष्णाचेंच मीलन घडवून आणण्याचा नेहमी प्रयत्न करीत, तसेच श्रीरूप, श्रीसनातन, श्रीजीव वगैरे प्राचीन महाभगवद्भक्त वैष्णव आचार्यांनी मधुरभावाच्या परिपुष्टीसाठी वृंदावनांत जाऊन राहिल्यानंतर श्रीकृष्णाच्या प्रतिमेबरोबरच श्रीराधिकेच्याहि प्रतिमेची सेवा केली नाही, याचें कारण हेंच की, ते स्वतःलाच राधा समजून मधुरभावाची साधना करीत; असो,

मधुरभावाचें एवढेंच स्थूलभावाने दिग्दर्शन येथे पुरें आहे. मधुरभावाच्या साधनेस आरंभ करून श्रीरामकृष्णांनी केवढी उच्च अवस्था प्राप्त करून घेतली होती, हें समजण्यास ठीक पडावें म्हणून मधुरभावाच्या अवश्य तेवढयाच गोष्टींचे येथे संक्षिप्त विवेचन केलें आहे.

# २८. श्रीरामकृष्णांची मधुरभावसाधना

( १८६४–६५ )

" मी किती तरी दिवस राधाभावाने घालविले ! त्यावेळीं मी स्त्रियांसारखा वेष करीत असे, स्त्रीवेषासाठी लागणारें सर्व जिन्नस दागिनेसुद्धा—मथुरने आणून दिले ! "

" एकोणीस प्रकारचे भाव एकाच ठिकाणीं प्रकाशित असल्यास त्यास महाभाव असें म्हणतात. जन्मभर साधना करून, साधक फार तर एखाद्या दुसऱ्या भावांत सिद्धि मिळवूं शकतो. ( स्वतःकडे बोट करून ) इथे मात्र एकाधाराने एके ठिकाणीं एकोणीसहि भाव पूर्णपणे प्रकाशित आहेत ! ! "

" मी त्या ( महाभावाच्या ) अवस्थेंत तीन दिवस संज्ञाशून्य होऊन एका जागीं पडलों होतों ! शुद्धीवर आल्यावर ब्राह्मणी मला धरून स्नानास घेऊन गेली. पण अंगाला हात लावायची सोय नव्हती ! अंगावर एक चादर होती, तिला धरून ती मला घेऊन गेली ! ! अंगाला लागलेली माती करपून गेली होती ! ! "

—श्रीरामकृष्ण

श्रीरामकृष्णांच्या शुद्ध आणि एकाग्र चित्तामध्ये ज्यावेळीं ज्या कोणत्या भावाचा उदय होत असे, त्या भावांत ते कांही काळपर्यंत अगदी तन्मय होऊन राहात असत; असें झालें म्हणजे त्यांच्या मनांतील इतर सर्व भाव अगदी नाहीसे होत, एवढेच नव्हे तर त्यांचे शरीरहि, त्या भावाच्या पूर्ण प्रकाशाला अनुरूप अशा रीतीनें बदलून जाई! त्यांच्या मनाचा असा भाव असल्याचें त्यांच्या अगदी लहानपणापासून दिसून येतें. दक्षिणेश्वरीं त्यांच्या चरणांच्या आश्रयाचा लाभ झाल्यावर, त्यांच्या मनाच्या अशा प्रकारच्या स्वभावाचीं उदाहरणें आम्हांला नेहमी पाहावयास मिळत. असें दिसे की, एखादें गाणें ऐकून अथवा इतर एखाद्या कारणाने, त्यांचें मन एखाद्या विशिष्ट भावांत मग्न झालेलें असतां, जर एखाद्यानें दुसऱ्या एखाद्या भावाचें गाणे अगर बोलणे सुरू केलें, तर त्यांच्या मनाला अत्यंत वेदना होत! एखाद्या विशिष्ट लक्ष्याकडे चाललेल्या चित्तवृत्तीच्या गतीचा, असा एकाएकी निरोध झाल्यामुळेच त्यांना वेदना होत, हें उघड आहे. महामुनि पतंजलींनी "एकाच भावाने भावित अशा चित्तवृत्तियुक्त मनालाच "सविकल्प समाधिस्थ मन" असें म्हटलें आहे आणि याच स्थितीला भक्तिशास्त्रामध्ये भावसमाधि, भावावस्था, भावावेश अशीं नांवे दिलीं आहेत.

साधनाकालीं त्यांच्या मनाचा हा स्वभाव अत्यंत विकास पावला होता. त्यांचें मन त्यावेळीं, पूर्वीप्रमाणे एखाद्या विशिष्ट भावांत थोडा वेळ राहण्यानेच शांत होत नसे; तर त्या भावामधे तन्मय होऊन त्या भावाच्या अत्यंत उच्चावस्थेंत अद्वैतभावाचा अनुभव जोंपर्यंत त्यांना प्राप्त होत नसे, तोंपर्यंत त्या भावांतच ते सर्व काळ राहात असत. उदाहरणार्थ–दास्यभावाची चरमसीमा गांठल्याशिवाय त्यांनी मातृभावाच्या साधना केल्या नाहीत; तंत्रशास्त्रोक्त मातृभावसाधनेची चरमसीमा गांठल्याशिवाय त्यांनी वात्सल्यादि भावांच्या साधना केल्या नाहीत; त्यांच्या साधकावस्थेमध्ये सर्वत्र हीच गोष्ट दिसून येते.

भैरवी ब्राह्मणीचें दक्षिणेश्वरीं आगमन झालें त्यावेळीं श्रीरामकृष्णांचें मन, ईश्वराच्या मातृभावांत तन्मय झालें होतें. जगांतील सर्व प्राणी व पदार्थ यांमध्ये, विशेषतः सर्व स्त्रियांच्या ठिकाणीं, त्यांनी श्रीजगदंबेचा साक्षात् आविर्भाव असल्याचें प्रत्यक्ष पाहिलें होतें म्हणून, ब्राह्मणी तेथें येतांच त्यांनी तिला "आई" म्हटलें, आणि स्वतःला तिचें बालक समजून कधी कधी तिच्या मांडीवर बसून, तिच्या हातून भरवून घेतलें, वगैरे गोष्टींतील इंगित समजून येईल. हृदयनाथ सांगत असे की, "ब्राह्मणी या काळीं एखादे समयीं व्रजगोपिकांच्या भावांत तन्मय होऊन मधुरभावात्मक गाणीं गाऊं लागली तर तीं गाणीं मामांना आवडत नसत व ती बंद करून मातृभावात्मक गाणीं गाण्यास ते तिला सांगत!" अर्थातच ही गोष्ट श्रीरामकृष्णांच्या मधुरभावसाधनेच्या पुष्कळ पूर्वीची आहे, परंतु यावरून त्यांच्या भावतन्मयतेची पूर्ण ओळख पटून, एका भावाची चरमसीमा गांठल्याशिवाय, त्यांना इतर भाव कसे आवडत नसत, हें स्पष्ट दिसून येईल.

श्रीरामकृष्णांच्या चरित्राचा विचार करितां असें दिसून येतें की, स्वतः पूर्णपणे निरक्षर असून व शास्त्रज्ञानांत पूर्णपणे अनभिज्ञ असूनहि त्यांचेकडून शास्त्रमर्यादेचें कधीहि उल्लंघन झालें नाही. गुरुग्रहण करण्यापूर्वी सुद्धा केवळ स्वतःच्या हृदयांतील तळमळीच्या प्रेरणेने ज्या कांही साधनांचें अनुष्ठान त्यांनी केलें, तें सुद्धा कधीहि शास्त्रविरोधी नसून शास्त्रानुगामीच होतें. शुद्ध, पवित्र व ईश्वरप्राप्तीसाठी व्याकुळ, अशा हृदयांत उठणारे तरंग नेहमी असेच असावयाचे आणि थोडा विचार करतां असें दिसून येईल की, यांत विलक्षण असें कांहीहि नाही. कारण श्रीरामकृष्णांसारख्या शुद्ध व पवित्र अंतःकरणांतील तरंगाचें दृश्य फल, म्हणजेच शास्त्रें होत! श्रीरामकृष्णांच्या सारख्या शुद्ध, पवित्र व ईश्वरदर्शनासाठी व्याकुल, अशा निरक्षर पुरुषांचें कोणतेहि कार्य शास्त्रविरोधी झालें नाही व त्या त्या कार्याच्या अनुष्ठानाने त्यांना शास्त्रोक्त सर्व फलें मिळत गेलीं, यावरून उलट शास्त्रांचेंच प्रामाण्य अढळ रीतीने प्रस्थापित झालें आहे! स्वामी

विवेकानंदांनी या संबंधाने म्हटलें आहे की–"शास्त्रामध्ये सांगितलेल्या सर्व अवस्थांची व अनुभवांची सत्यता प्रस्थापित करण्यासाठीच या काळीं ईश्वराने निरक्षर होऊन अवतार घेतला ! ! "

श्रीरामकृष्णांकडून शास्त्रमर्यादेचें स्वभावतःच कसें रक्षण होत गेलें, याच्या दृष्टांतादाखल, त्यांना निरनिराळ्या साधनांच्या वेळीं, निरनिराळे वेष घेण्याची कशी इच्छा होत गेली, ही एकच गोष्ट येथे सांगितल्यास पुरेशी होईल. ते ज्यावेळीं ज्या भावाच्या साधनेंत निमग्न असत, त्यावेळीं त्या भावानुरूप वेष धारण करण्याची त्यांना स्वभावतःच इच्छा होई व त्याप्रमाणे ते तसे वेष धारण करीत ! तंत्रोक्त मातृभावसाधनेचे वेळीं ते रक्तवस्त्र, विभूति, शेंदूर, रुद्राक्ष–वगैरे धारण करीत असत; वैष्णव तंत्रोक्त भावांच्या साधनांचे वेळीं टिळे, श्वेतवस्त्र, श्वेतचंदन, तुलसीमाला वगैरे धारण करीत असत; वेदोक्त अद्वैत-भावसाधनेच्या वेळीं त्यांनी शिखासूत्रांचा त्याग करून भगवीं वस्त्रें परिधान केलीं होतीं; त्याचप्रमाणे, पुरुषभावाने साधना करीत असतां, ज्याप्रमाणे ते पुरुषवेष धारण करीत, त्याचप्रमाणे स्त्रीजनोचित भावसाधनांच्या वेळीं त्यांनी स्त्रीवेष धारण करण्यास बिलकुल मागे पुढे पाहिलें नाही ! ! त्यांची वारंवार अशी शिकवण असे की–"लज्जा, घृणा, भय आणि जन्मजन्मागत जाति, कुल, शील इत्यादि अष्टपाशांचा समूळ त्याग केल्याशिवाय, कधीहि कोणाची ईश्वरलाभाच्या मार्गांत उन्नति व्हावयाची नाही." असो.

मधुरभावसाधनेचे वेळीं त्यांना स्त्रियांना योग्य असा वेष धारण करण्याची इच्छा झाली व परमभक्त मथुरबाबूंना ही त्यांची इच्छा समजतांच त्यांनी त्यांच्यासाठी, बहुमूल्य स्त्रीजनोचित वस्त्रें आणविलीं आणि नानातऱ्हेचे दागदागिने तयार करविले त्यांच्यासाठी एक केसांचा टोपहि आणविला ! आम्ही विश्वसनीय व्यक्तींच्या तोंडून ऐकलें आहे की, मथुरबाबूंच्या या भक्तिपूर्ण उदारतेला आणि श्रीरामकृष्णांच्या कठोर त्यागाला, नांवें ठेवून त्याला कलंक लावण्यासहि कांही हरीच्या लालांनी त्यावेळीं कमी केलें नाही ! परंतु मथुरबाबू व

श्रीरामकृष्ण या दोघांनीहि लोकांच्या म्हणण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून आपल्या ध्येयाकडेच दृष्टि ठेवली होती. इकडे, 'बाबांच्या' संतोषाने, आणि 'ते कोणतेंहि काम उगीच निरर्थक करणार नाहीत,' या विश्वासाने, मथुरानाथांना त्यांच्या सेवेमधे परमानंद वाटत होता आणि तिकडे अशा प्रकारच्या सुंदर वस्त्रालंकारांनी भूषित होऊन, व्रजगोपिकांच्या भावामधे श्रीरामकृष्ण हळूहळू इतके तन्मय होऊन गेले होते की, आपण पुरुष असल्याची जाणीव त्यांच्या मनांतून समूळ नाहीशी होऊन त्यांचें बोलणें चालणें, त्यांचा कार्यकलाप, एवढेंच काय पण त्यांचे विचारहि स्त्रियांसारखे होऊन गेले! श्रीरामकृष्णांच्या स्वतःच्या तोंडून असें ऐकलें आहे की, त्यांनी मधुरभावसाधनेचे वेळीं सहा महिनेपर्यंत स्त्रीवेष धारण केला होता!!

असें सांगण्यात आलेंच आहे की श्रीरामकृष्णांच्या ठिकाणीं स्त्री व पुरुष या दोन्ही भावांचें अपूर्व संमीलन होतें; आता ते स्त्रीवेषांतच राहूं लागल्यावर त्यांच्या ठिकाणचा स्त्रीभाव पूर्णपणे जागृत झालाच; पण या काळीं त्या स्त्रीभावाची त्यांच्यांत इतकी पराकाष्ठा होऊन गेली की, बोलणें, चालणें, हसणें, पाहणें, हावभाव आणि शारीरिक व मानसिक सर्व व्यवहार अगदी थेट स्त्रियांसारखे होऊन गेले! ही गोष्ट आम्हीं स्वतः श्रीरामकृष्ण आणि हृदय या दोघांच्याहि तोंडून ऐकली आहे. दक्षिणेश्वरीं श्रीरामकृष्णांच्या चरणांच्या आश्रयाला गेल्यावर, त्यांनी विनोदाने स्त्रियांचा अभिनय केल्याचें आम्हीं अनेक वेळां पाहिलें आहे. तो इतका सर्वांगसंपूर्ण असे की तो पाहून स्त्रिया देखील आश्चर्यचकित होत!

याच सुमारास मथुरबाबू श्रीरामकृष्णांना कधी कधी आपल्या जानबाजारांतील वाड्यांत राहण्यास घेऊन जात. तेथे असतां श्रीरामकृष्ण घरांतील बायकामंडळींतच उठत बसत असत. तेथील सर्व मंडळींना पुष्कळ दिवसांपासून त्यांच्या कामगंधहीन पवित्र चरित्राची माहिती झालेली असून, ते सर्व त्यांना देवाप्रमाणे मान देत आणि आता तर त्यांचा वेष आणि वागणें सर्व स्त्रियांसारखें झालेलें पाहून आणि त्यांच्या अद्भुत कामगंधहीन प्रेमाने त्या स्त्रिया इतक्या मुग्ध

होऊन गेल्या की, त्या त्यांना आपल्यापैकीच एकजण समजूं लागल्या. त्यांच्याशीं वागतांना, त्यांना लज्जा अगर संकोच मुळीच वाटेनासा झाला ! श्रीरामकृष्णांच्या स्वतःच्या तोंडून असें ऐकलें आहे, की मथुरबाबूंच्या मुलींपैकी एखाद्या मुलीचा पति, आपल्या सासऱ्याकडे चार दिवस राहण्यास आल्यास, त्यांनी स्वतः त्या मुलीची वेणीफणी करावी, तिचे सारे दागदागिने आपल्या हातांनी तिच्या अंगावर घालावे, आपल्या पतीशीं कसें बोलावें व त्याला कसें संतुष्ट करावें, हें तिला समजून सांगावें आणि तिचा हात धरून एखाद्या सखीप्रमाणे, तिला तिच्या पतीजवळ नेऊन बसवून परत यावें !! श्रीरामकृष्ण म्हणत–"त्या मुलीहि मला आपली सखी समजून अगदी निःसंकोच रीतीने वागत" !

हृदय सांगत असे की, " मामा अशा रीतीने स्त्रियांमध्ये राहात असतां, त्यांच्या नेहमीच्या परिचयाच्या माणसांना सुद्धा ओळखणें कठीण जाई ! एक दिवस मथुरबाबू मला आपल्या अंतःपुरांत घेऊन जाऊन म्हणाले, " या बायकांमध्ये तुझे मामा कोणते आहेत तें ओळख पाहूं?" मी इतके दिवस त्यांच्याबरोबर राहिलेला, त्यांची नेहमी सेवाशुश्रूषा केलेली, पण मला सुद्धा त्यावेळीं त्यांना ओळखतां आलें नाही ! त्याकाळीं दक्षिणेश्वरीं असतां, मामा दररोज पहाटे उठून, परडी घेऊन फुलें तोडण्यास जात, तेव्हां प्रत्येक वेळीं मीं असें पाहिलें आहे की, चालतांना स्त्रियांप्रमाणे त्यांचा डावा पायच प्रथम पुढे पडे !! भैरवी ब्राह्मणी म्हणे की, ' ते फुलें तोडीत असतां, त्यांना पाहून मला कित्येकदा, 'ही साक्षात श्रीमती राधाराणीच असावी,' असा भास होई !" फुलें तोडून आणून त्यांनी त्यांच्या चित्रविचित्र माळा गुंफून, त्या श्रीराधागोविंदजीला घालाव्या व कधी कधी तर त्या माळा श्रीजगदंबेला घालून व्रजगोपिका कात्यायनीची प्रार्थना करीत असत त्याप्रमाणे, श्रीकृष्ण आपल्याला पति मिळावा अशी सद्गदित अंतःकरणाने प्रार्थना करावी !! "

अशा रीतीने, श्रीकृष्णाचें दर्शन व्हावें व तो आपणांस पति मिळावा या हेतूने, या वेळीं श्रीरामकृष्ण श्रीजगदंबेची व श्रीराधाकृष्णांची अनन्यभावाने

व अत्यंत व्याकुळ अंतःकरणाने प्रार्थना करीत दिवस कंठूं लागले ! रात्रीं दिवसा एकसारखा श्रीकृष्णदर्शनाचा ध्यास आणि तो आपल्याला पति मिळावा, म्हणून अत्यंत व्याकुळतेने प्रार्थना,—असे दिवसाचे दिवस, आठवडेच्या आठवडे, महिनेच्या महिने चालले; पण त्यांच्या मनामध्ये एक क्षणभरहि निराशेचा किंवा अविश्वासाचा लवलेशहि कधी उत्पन्न झाला नाही की त्यांच्या व्याकुल प्रार्थनेंत कधी खंड पडला नाही ! ! हळूहळू त्यांच्या हृदयाची तळमळ इतकी वाढली की, त्यांना आहारनिद्रादिकांचीहि शुद्ध नाहीशी झाली. एकसारखा श्रीकृष्णाच्या दर्शनाचा ध्यास ! इतक्या व्याकुळ अंतःकरणाने प्रार्थना करून सुद्धा कृष्णदर्शन होत नाही, म्हणून त्यांनी रडून आक्रांत करावा, आपले तोंड मातींत घासावें आणि श्रीकृष्णविरहाच्या दुःखाने बेहोष होऊन संज्ञाशून्य होऊन पडावें ! !अत्यंत प्रिय व्यक्तीच्या विरहाने मनुष्याच्या शरीराची व मनाची जशी अवस्था होऊन जाते, तशी स्थिति यावेळीं श्रीरामकृष्णांची झाली. श्रीकृष्णविरहाने त्यांच्या अंगाचा पूर्वीप्रमाणे आता पुन्हा दाह होऊं लागला ! एकसारखी अंगाची तलखी तलखी होऊं लागून त्या वेदना त्यांना असह्य होऊन गेल्या ! श्रीरामकृष्ण स्वतः सांगत की, “ या वेळीं श्रीकृष्णाच्या अत्यंत असह्य विरहाने माझ्या प्रत्येक लोमकूपांतून, मधून मधून थेंब थेंब रक्त बाहेर येत असे ! मी बसलेल्या ठिकाणची जमीन, माझ्या अंगांतील दाहाने करपून जात असे ! आणि अंगाचे सर्व सांधे अगदी शिथिल होऊन गेल्यामुळे, साऱ्या इंद्रियांचीं कार्ये बंद पडून माझे शरीर कधी कधी मेल्यासारखे निश्चेष्ट आणि संज्ञाशून्य होऊन पडत असे ! ! ”

देहाशींच नित्य जखडलेल्या आणि देहबुद्धीवांचून दुसरें कांही न समजणाऱ्या आम्हां मानवांची प्रेमाची कल्पना म्हणजे-“ एका देहाचें दुसऱ्या देहाकडे आकर्षण, ” याहून पलीकडे धांवतच नाही. अथवा कल्पनेने फारच भरारी मारली तर “ प्रेम, म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं प्रकाशित असलेल्या गुणांकडे आकर्षण, ” असें समजून, त्याला “ अतींद्रिय प्रेम ” असें

भपकेदार नांव देऊन, आम्ही त्याची केवढी मोठी प्रशंसा करीत सुटतो ! परंतु आमचें हें थोरामोठयांनी वर्णिलेलें " अतींद्रिय प्रेम " स्थूलदेहबुद्धि आणि सूक्ष्म भोगलालसा यांना सोडून कधीच राहूं शकत नाही. श्रीरामकृष्णांच्या जीवनांत प्रकाशित झालेल्या यथार्थ अतींद्रिय प्रेमाशी तुलना केली असतां हें आमचे ' अतींद्रिय प्रेम ' किती तुच्छ आणि अंतःसारशून्य आहे, हें तेव्हांच समजून येतें.

भक्तिशास्त्रांत सांगितलें आहे की, अशा प्रकारच्या यथार्थ अतींद्रिय प्रेमाची पराकाष्ठा, एका व्रजेश्वरी श्रीमती राधेवांचून, इतर कोणाच्याहि जीवनांत आजपर्यंत दिसून आली नाही. लज्जा, घृणा, भय सोडून; लोकभय समाजभय यांना न जुमानून; जाति कुल, शील वगैरे सर्व बाह्य संसारबंधनें पूर्णपणे विसरून; एवढेंच काय पण स्वतःच्या देहाविषयी आणि सुखाविषयी पूर्ण उदासीन होऊन, भगवान श्रीकृष्णांच्या सुखांतच स्वतःचे सुख अनुभवणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीचें उदाहरण, भक्तिशास्त्रांत दिसून येत नाही. म्हणून भक्तिशास्त्रांत असे सांगितले आहे, की श्रीमती राधेची कृपा झाल्याशिवाय, या प्रेमाचा अंशतः सुद्धा, कोणाला लाभ होणार नाही आणि त्याला श्रीकृष्णाचें दर्शनहि पण घडणार नाही; कारण श्रीमती राधेच्या कामगंधहीन दिव्य प्रेमाने, भगवान श्रीकृष्ण कायमचा बांधला गेला असून, तिच्याच इच्छेप्रमाणे तो भक्तजनांचे मनोरथ पूर्ण करीत असतो; कामगंधहीन प्रेमाची मूर्तिमंत पुतळीच जी श्रीराधा, तिच्यासारखे प्रेम मनामध्ये उत्पन्न झाल्याशिवाय, ईश्वराचा पति-भावाने कोणासहि लाभ होणार नाही अथवा कोणासहि अशा दिव्य प्रेमाची माधुरीहि अनुभवतां यावयाची नाही.

व्रजेश्वरी श्रीमती राधेच्या श्रीकृष्णावरील अशा प्रकारच्या दिव्य आणि अदृष्टपूर्व प्रेमाचें, साक्षात् श्रीशुकदेव यांच्यासारख्या आत्मानंदांत मग्न असणाऱ्या परमहंसश्रेष्ठ मुनिवर्यांनी अनेकदा वर्णन केलें असलें तरी, त्याचा जीवनामध्ये प्रत्यक्ष अनुभव कसा घ्यावयाचा, ही गोष्ट भारतवर्षांतील साधारण लोकांस कित्येक


दिवसपर्यंत समजली नव्हती. गौडदेशीय गोस्वामीगण म्हणतात की, ही गोष्ट लोकांना शिकविण्यासाठीच भगवंतांना श्रीमती राधेसह एकाच शरीरांत अवतार घ्यावा लागला आणि तोच हा, अंतःकृष्ण बहिर्गौर अथवा राधारूपाने प्रकाशित असलेला, मधुरभावाचा पूर्णादर्श लोकांना दाखविण्यासाठीच झालेला, श्रीगौरांग अथवा श्रीकृष्णचैतन्यदेवांचा अवतार! त्यांनी असेंहि लिहून ठेवलें आहे की, श्रीकृष्णप्रेमाच्या उत्कटतेने, श्रीराधाराणीच्या शरीरावर व मनामध्ये जीं लक्षणें व विकार उद्भवल्याचें दिसून येतें, तीं सर्व पुरुषशरीरधारी असूनहि श्रीगौरांगांच्या ठिकाणीं, ईश्वरप्रेमाच्या पराकाष्ठेमुळे दिसून आलीं! यामुळेच श्रीगौरांगांना "श्रीमती" असेंहि म्हणण्यांत येतें. श्रीगौरांगदेव हे याप्रमाणे अतींद्रिय, दिव्य, कामगंधहीन, अशा प्रेमाच्या अत्युच्चावस्थेचें दुसरें उदाहरण होत. असो

श्रीमती राधेच्या कृपेवांचून श्रीकृष्णाचें दर्शन होणें असंभवनीय, असें जाणून, श्रीरामकृष्ण अत्यंत तन्मय होऊन श्रीराधेच्याच उपासनेमधे मग्न झाले आणि आपल्या हृदयाची तळमळ तिच्या चरणापाशी निवेदन करूं लागले! अशा तन्मयतेमधे कांही दिवस गेल्यावर त्यांना श्रीराधेचें दर्शन झाले आणि पूर्वीच्या इतर सर्व देवदेवींप्रमाणे श्रीराधेचीहि मूर्ति स्वतःच्या शरीरांत प्रविष्ट झाल्याचें त्यांनी पाहिलें! ते म्हणत-" श्रीकृष्णप्रेमामधे सर्वस्वाचा होम करणाऱ्या, त्या निरुपम, पवित्रोज्ज्वल मूर्तीच्या महिम्याचें आणि माधुर्याचें वर्णन करणें अशक्य आहे! श्रीमतीची अंगकांति नागकेशरपुष्पांतील केसरांसारखी गौरवर्ण होती."

या वेळेपासून आपण स्वतः श्रीमती राधा आहों, अशी त्यांची दृढ भावना झाली. श्रीमतीचें ध्यान आणि एकसारखें चिंतन यांच्या योगाने श्रीरामकृष्णदेव आता तिच्याच भावांत इतके तन्मय होऊन गेले की, आपल्या स्वतःच्या पृथगस्तित्वाचें त्यांना समूळ विस्मरण होऊन त्यांचें मधुरभावजन्य ईश्वरप्रेम इतकें वाढलें की, श्रीराधेची व त्यांची अवस्था एक होऊन गेली! कारण वर सांगितलेल्या दर्शनापासून त्यांचे ठिकाणीं, श्रीमती राधा व श्रीगौरांग

यांच्या ठिकाणीं दिसून आलेलीं, मधुरभावाच्या पराकाष्ठेने उत्पन्न होणारीं, महाभावाचीं सर्व लक्षणें दिसून येऊं लागलीं. वैष्णव आचार्यांच्या ग्रंथामध्ये महाभावाचीं लक्षणें कोणतीं याचें सविस्तर वर्णन आहे. वैष्णवतंत्रांत निपुण असलेल्या भैरवी ब्राह्मणीने आणि पुढे वैष्णवचरणादि शास्त्रज्ञ साधकांनी, श्रीरामकृष्णांच्या अंगीं दिसून येणारीं महाभावाचीं सर्व लक्षणें पाहून आश्चर्यचकित होऊन, त्यांची अवतार म्हणून स्तुति केली ! या गोष्टीचा उल्लेख करून श्रीरामकृष्ण आम्हांला कित्येकदा म्हणाले की–" एकोणीस प्रकारचे भाव, एकाच ठिकाणीं प्रकाशित झाल्यास त्याला महाभाव म्हणतात, असें भक्तिशास्त्रांत सांगितलें आहे. जन्मभर साधना करून साधक फार तर एखाददुसऱ्या भावांत सिद्धि मिळवूं शकतो. ( स्वतःकडे बोट करून ) इथे मात्र एकाधाराने एके ठिकाणीं * एकोणीसहि भाव पूर्णपणे प्रकाशित आहेत ! "

त्याकाळीं श्रीकृष्णविरहाच्या दारुण यातनांनी श्रीरामकृष्णांच्या शरीराच्या प्रत्येक लोमकूपांतून थेंब थेंब रक्त बाहेर येत असे, असे वर सांगितलेंच आहे. स्त्रीत्वाची भावना त्यांच्या रोमरोमांत इतकी भिनून गेली होती, की आपण



पुरुष आहों, असें स्वप्नांत सुद्धा त्यांच्या मनांत येईनासें झालें व त्यांच्या शरीराचीं व इंद्रियांचीं सर्व कामें स्त्रीशरीरासारखीच होऊं लागलीं ! !

महाभावामधे, वर दाखविल्याप्रमाणे, कामात्मिका आणि संबंधात्मिका या दोन्ही प्रकारच्या भक्तीच्या एकोणीसहि पोट-प्रकारांचा, एकत्र समावेश होतो. श्रीरामकृष्णांनी या ठिकाणीं याचाच निर्देश केला आहे. त्यांच्या स्वतःच्या तोंडून आम्हीं असें ऐकलें आहे की, स्वाधिष्ठान चक्र असलेल्या भागाच्या सर्व रोमकूपांतून त्याकाळीं दर महिन्यास ठराविक वेळीं शोणितस्त्राव होत असे आणि तो स्त्रियांप्रमाणे तीन दिवसपर्यंत चालत असे ! ! त्यांचा भाचा हृदयराम याने आम्हांला सांगितलें की " हें सर्व मीं आपल्या डोळ्याने पाहिलें आहे आणि नेसलेलें वस्त्र दूषित होऊं नये म्हणून ते त्या काळीं कौपीन धारण करीत असत, असेंहि मीं पाहिलें आहे ! ! "

वेदांतशास्त्राचा असा सिद्धांत आहे की, मनुष्याचें मनच त्याचे शरीर तयार करीत असतें आणि तीव्र वासना आणि इच्छा यांच्या प्रबलतेने तें आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं बदलत असतें. श्रीरामकृष्णांच्या साधनाकालीं त्यांच्या देहामध्ये भावनांच्या उत्कटतेमुळे झालेले फरकहि या वेदान्त सिद्धांतांचीं उत्तम उदाहरणे आहेत. श्रीरामकृष्णांच्या आणि पूर्वकालीन ऋषींच्या आध्यात्मिक अनुभवांची आणि उपलब्धींची तुलना करूनच पद्मलोचनादि प्रसिद्ध पंडित म्हणाले, " आपले अनुभव आणि उपलब्धि वेदपुराणांना मागे टाकून फार पुढे गेल्या आहेत ! " असो.

अशा रीतीने श्रीमती राधेचें दर्शन आणि तिची कृपा झाल्यानंतर लवकरच सच्चिदानंदघन भगवान् श्रीकृष्णांच्या दर्शनाचाहि लाभ त्यांना झाला ! नेहमीप्रमाणे ती श्रीकृष्णमूर्ति त्यांच्याच देहांत प्रविष्ट झाली. या दर्शनानंतर दोन तीन महिन्यांनी, परमहंस श्रीमत् तोतापुरींचें दक्षिणेश्वरीं आगमन झालें व त्यांच्या देखरेखीखाली श्रीरामकृष्ण वेदांतोक्त अद्वैतभावाच्या साधनेंत निमग्न झाले. ह्या मधील काळ त्यांनी मधुरभावाने तन्मय होऊन, ईश्वरप्रेमाची माधुरी चाखण्यांत-

घालविला. त्यांच्या तोंडून आम्हीं असें ऐकलें आहे, की या काळीं श्रीकृष्णचिंतनांत ते इतके तन्मय होऊन गेले होते, की आपल्या पृथक् अस्तित्वाचा त्यांना समूळ विसर पडून, आपणच स्वतः श्रीकृष्ण आहोंत असा त्यांना बोध झाला आणि मधे मधे या जगांतील सर्व चराचर वस्तु श्रीकृष्णस्वरूप आहेत असे त्यांना प्रत्यक्ष दिसूं लागले; पुढे एक दिवस दक्षिणेश्वरीं बागेंत हिंडत असतां त्यांना एक गवती फूल सापडलें. ते आम्हांला अत्यंत उत्कंठेने दाखवून ते मोठया हर्षाने म्हणाले—" मधुरभावसाधनाकाळीं मला जी श्रीकृष्णमूर्ति दिसत असे, तिच्या अंगाचा रंग या फुलाच्या रंगासारखा होता ! "

यौवनारंभीं ते कामारपुकुरास असत; तेव्हांपासून त्यांच्या अंतःकरणांतील प्रकृतिभावाच्या प्राबल्यामुळे, त्यांच्या मनांत मधे मधे एक इच्छा येत असे. व्रजगोपींनी स्त्रीशरीरामध्ये जन्म घेऊन प्रेमाच्या उत्कटतेने सच्चिदानंद श्रीकृष्णाचा पतिरूपाने लाभ करून घेतला होता असें ऐकून त्यांना वाटे, 'मी जर स्त्री असतों तर, त्या गोपींच्याचसारखी श्रीकृष्णाची पतिभावाने भक्ति करून, त्यांचा लाभ करून घेतला असता.' आपलें हे पुरुषशरीर श्रीकृष्णलाभाच्या मार्गातील जबरदस्त अडथळा आहे, असें त्यांना वाटे ! त्यांना वाटे—" पुन्हा जर पुढे जन्म घेण्याचीच पाळी आली तर, एखाद्या ब्राह्मणाच्या घरीं अत्यंत सुस्वरूप दीर्घकेशी अशा बालविधवेचा जन्म घेईन आणि श्रीकृष्णावांचून इतर कोणालाहि पति म्हणून समजणार नाही. निर्वाहापुरतें अन्नआच्छादन असावें; एखादें लहानसें कुडाचें घर असावें; त्याच्याभोवती थोडीशी जमीन असावी; त्या जमीनींत पांचचार प्रकारच्या भाज्या उत्पन्न करतां याव्या; घरी एक दुभती गाय असावी; तिची सर्व सेवा- शुश्रुषा स्वतःला करतां येऊन तिची धारहि काढतां यावी आणि एक सूत काढण्याचा चरखा असावा, म्हणजे दिवसाउजेडी, सगळें घरकाम आटोपून त्या चरख्यावर सूत काढतां काढतां, श्रीकृष्णाचीं गाणीं म्हणेन आणि तिन्हीसांजा झाल्या म्हणजे त्या गाईच्या दुधांत तयार केलेली खीर वगैरे हातांत घेऊन श्रीकृष्णाला आपल्या हातांनी खाऊं घालण्यासाठी, एकांतांत बसून अत्यंत

व्याकुळतेने रडत रडत त्याचा धांवा करीन ! ! श्रीकृष्णाला सुद्धा माझी दया येईल आणि बालकवेषाने येऊन तो माझ्या हातांतील ते सारे पदार्थ ग्रहण करील आणि असेंच रोज रोज, दुसऱ्याला कळवूं न देतां गुपचुप येऊन तो माझ्या हातून खाण्याचे पदार्थ घेत जाईल ! ! " श्रीरामकृष्णांच्या मनांतील ही इच्छा अशा रूपाने पूर्ण झाली नाही, तरी मधुरभावसाधनाकालीं पूर्वोक्त प्रकाराने ती पूर्ण झालीच.

मधुरभावसाधनाकालीं श्रीरामकृष्णांना घडलेल्या एका दर्शनाची गोष्ट सांगून या विषयाचा उपसंहार करूं. याकालीं एक दिवस, विष्णुमंदिरांत ते श्रीमद्भागवत ऐकत बसले होते. ऐकतां ऐकतां भावावेशांत त्यांना श्रीकृष्णाच्या ज्योतिर्मय मूर्तीचें दर्शन झालें ! त्या मूर्तीच्या चरणकमलापासून एखाद्या दोरीप्रमाणे दोन ज्योति बाहेर निघाल्या; त्यांतील एक त्या भागवताच्या पोथीला स्पर्श करून राहिली व दुसरी त्यांच्या स्वतःच्या वक्षःस्थळाला चिकटून राहिली ! आणि त्या ज्योति कांही वेळपर्यंत तशाच स्थितींत राहिल्या !

ते म्हणत–" ह्या दर्शनापासून माझ्या मनाची अशी दृढ धारणा झाली की भागवत, भक्त आणि भगवान हे निरनिराळे पदार्थ दिसत असले तरी वास्तविक ते एकच होत ! भागवत ( शास्त्र ), भक्त आणि भगवान ते तिन्ही एकच आहेत. एकाचींच हीं तीन रूपें आहेत ! "

# सूची

## अ


अतींद्रिय प्रेम—३२५

अवतार-केव्हां होतो ? ५, ६ कोठे होतो ? ८-९

अष्टपाश—११३

अहंकारत्याग—१९३, २५०

**अक्षय**—रामकुमारांचा मुलगा, ५५, ९९


## आ


आहारनिष्ठा—९६


## ई


ईश्वरप्रेमाचा वेग—१६४

**ईश्वरचंद्र विद्यासागर**—२९९


## उ


उद्धव—१४३


## क


कर्मफलोपभोग—२०५-२०६

कर्मक्षय—१६८-६९

कांचनासक्ति-त्याग—१९०-९३

कामत्याग—१९२-९३

**कामारपुकुर**—श्रीरामकृष्णांचें जन्मस्थान १०, १३७-३८, १९५, १९९-२०२, २४४

कुंडलिनी—२६७


## ग


**गदाधर**—श्रीरामकृष्णांचें बाळपणचें नांव, " रामकृष्ण " पाहा.

गयाविष्णु—श्रीरामकृष्णांचा बाळपणाचा सवंगडी, ४८, ४९

गात्रदाह—१६५-६६, प्रकरण २२ वें २४२

गायन—श्रीरामकृष्णांचें ८५, १०७, १६७

गिरिजा—श्रीरामकृष्णांचा गुरुबंधु; प्रकरण २३ वें २५१-५२

गोपीप्रेम—१४३-४४

**गौरीपंडित**—प्रकरण २१ वें २३६-४०

## च

चरखा—३२९

चाकरी—१०३

**चैतन्यदेव**—६५, २२६, २२९, २४३, ३११-३१३, ३१५

चंद्र—श्रीरामकृष्णांचा गुरुबंधु; प्रकरण २३ वें २४९-५०

**चंद्रामणी देवी**—श्रीरामकृष्णांची माता १२, लग्न १२, पतीवरील संकट १३, कामारपुकुरास आगमन १३, स्वभाव, संसार १८, २५, स्नेह व प्रेमळपणा २६, त्यांचे विचित्र अनुभव २६-२९, श्रीरामकृष्णांचा जन्म ३१, गदाधराला उपदेश ३७, अत्यंत सरल स्वभाव ३८, पतिनिधन ४२, दुःखाचे दिवस ४३, १९८-९९, २१७-१८, देवापुढे धरणें २१९-२०

## ज

जयरामवाटी—श्रीरामकृष्णांची सासुरवाडी १३७, २१६

**जगदंबा दासी**—मथुरबाबूंची पत्नी १३४, १३९-४१

**जटाधारी**—श्रीरामकृष्णांचा राममंत्रदाता गुरु; प्रकरण २५ वें २७६-७७, २८०-८१, २८५-८६

## त

तन्मयता—१५७-६३, १६९, १७६-७७

तिरस्कारबुद्धि—२३६

तीर्थयात्रा—१५३

त्याग—" वैराग्य ". पाहा.

## द

**दयानंद सरस्वती**—२९८
**दक्षिणेश्वर**—चे कालीमंदिर ९०,९३
दास्यभक्ति १७८-७९
**देवेंद्रनाथ ठाकुर** ( महर्षी ) २९९

## ध

धनी ( लोहारीण )—श्रीरामकृष्णांची भिक्षामाता २७, ३०, ३१, ४९
धर्मग्लानि—५, ६
धर्मदास लाहा—कामारपुकुरचे जमीनदार ३४, ३६, ४८
ध्यान—७९
ध्येय—पाश्चात्यांचें ३, भारतवर्षाचें ३

## न

**नारायणशास्त्री**—पंडित. २९१-९४
निष्ठा व अनुदारता--९६

## प

**पद्मलोचन**--पंडित २७३, २९४-९८
पापपुरुष—१६५-६५
पापपुण्याचीं फळें—मुक्त पुरुषांच्या-१२९
पाश्चात्यांचें ध्येय-३
**पंचवटी**—श्रीरामकृष्णांचें साधनास्थान ( दक्षिणेश्वरच्या कालीमंदिराच्या आवारांतील )—११२, १७९-८०
प्रेम—३०४-३०५

## ब

**बुद्ध**-६५, ३०२
**ब्राह्मणी**-भैरवी, नांव योगेश्वरी. श्रीरामकृष्णांच्या गुरूंपैकी एक. हिंने श्रीरामकृष्णांकडून तंत्रशास्त्रोक्त निरनिराळ्या साधना करवून

घेतल्या व त्यांच्या निरनिराळया साधनांच्या वेळीं त्यांना अनेक तऱ्हेने साहाय्य केलें १९६, दक्षिणेश्वरीं आगमन २२५-२७, वात्सल्यभाव २२९, श्रीरामकृष्णांच्या विषयींची धारणा २२७-३०, पंडितांशीं वाद २३२-३३, आणखी कांही माहिती २४८-२४९

भ

भक्तिमार्ग—७८-८०, भक्तीचे पोटविभाग ३९७

भारताचें ध्येय-३

भाव-६७, भावपंचक ३०२-३०८

**भैरवी**—" ब्राह्मणी " पाहा.

भंगलेली मूर्ति—१०५-१०६

भ्रम—७३-७६

म

**मथुरानाथ विश्वास**—मथुरबाबू. श्रीरामकृष्णांचे परमभक्त व दक्षिणेश्वरच्या कालीमंदिराचे मालक-८९, ९८, ९९, श्रीरामकृष्णांना चाकरीचा आग्रह-१०४-१०५, "मथुरबाबू व श्रीरामकृष्ण" प्रकरणें १५ व १६, मथुरबाबूंचा स्वभाव-१२२, श्रीराम०शीं वाद १२४-१२५, शिवशक्तिदर्शन १२७-२८, श्रीराम०ची अलौकिक सेवा १२९-३०, १३२, १५२, भावसमाधीबद्दल श्रीराम० ना आग्रह-१४२-४५, अन्नमेरुव्रतानुष्ठान २७२, साधुसेवा २७३, ३२१-२२

**मधुरभावमीमांसा**—प्रकरण २७ वें. मधुरभावाचें सारतत्व ३१३

**मधुसूदन दत्त**—मायकेल—बंगाल्यांतील सुप्रसिद्ध कवि २९३

मन—साधकाचा गुरु १९३-९४ मनच शरीर बनवितें २४६, ३२८
साधकाने मनाचें ऐकावें काय ? २७८, २७९

महाभाव—२१६, ३४४

माणिकराजा—११, ३९, ४०, ६३

**माताजी**—श्रीरामकृष्णांची पत्नी, " शारदा " पाहा

## य

**योगेश्वरी**—" ब्राह्मणी " पाहा

## र

राधा—२४३, ३१४, ३१६–१७, ३१८, ३२५ २८

**रामकुमार**—श्रीरामकृष्णांचे सर्वात वडील बंधु १२, लग्न–२०, अध्ययन २०–२१, संसार २१, ४३, ५४, सिद्धिलाभ २१, पत्निवियोग ५४, कलकत्त्यास आगमन ५५, गृहस्थिति ८६, पूजकपदस्वीकार ९२, ९४, मृत्यु १०९, १११

**रामकृष्ण**—लहानपणचें नांव 'गदाधर'. जन्म ३१, बालपण ३३, उष्टावण ३४, आकर्षण शक्ति ३४, धारणाशक्ति ३५, ३८, ८३, खोडकर स्वभाव ३६, शाळेंतील दिवस ३६, ४५, प्रत्येक गोष्टीचें कारण समजण्याची इच्छा ३६, ३७, अभ्यास, गणिताचा कंटाळा ३८, ५३, मूर्ति तयार करणें ३८, ६३, १०२, चित्रकलानैपुण्य ३८, ६२, ६३, स्मरण-शक्ति ३८, आनंदी वृत्ति ३८, गोड आवाज ४०, ८५ १०६, १६७, लोकप्रियता ४०, भावतन्मयता ४१, पितृवियोग ४२, वृत्तींत बदल ४४, साधुसंग ४५, भावसमाधि ४७, ४८, उपनयन ४९, पंडितांच्या सभेंत ४९, ५०, ईश्वरसेवा व दिव्यदर्शनें ५०, ५१, शंकराची भूमिका ५१, लेखनवाचन ५२, ५३, लोकप्रियता ५७, ६१, अभिनयप्रभुत्व ५८, दुर्गादासची फजीती ५९, नाटकमंडळी ६२, ६३, कलकत्त्यास आगमन ६४, निर्भयस्वभाव ८५, अवलोकनशक्ति ८५, ८६, पुजारीपण ८५, अभ्यासाकडे दुर्लक्ष ८६, ८९, आहार-निष्ठा ९५, ९६, १०१, गंगाभक्ति ९५, दक्षिणेश्वरीं वास्तव्य ९८, पूजकपदग्रहण प्रकरण १३ वें. वंशावळ ९९, पूजकपदग्रहण १०६, पूजातन्मयत्व १०७, शक्तिदीक्षाग्रहण १०८, ईश्वरदर्शनाची व्याकुळता, प्रकरण १४ वें ११०–१८, **प्रथमदर्शन** ११७–११८

**श्रीरामकृष्ण**—(पुढे चालूं) अलौकिक स्वभाव ११९-२०, शिवमंदिरांत १२६, निरहंकार १३१, शालजोडीची दुर्दशा १३३, स्त्रीवेष १३४-३६, अत्यंत सुंदर रूप १३७-३८, विनोदप्रियता १३८, मथुरबाबूंचा हट्ट व समजूत १४१-४२, सरळ स्वभाव १४९-५०, त्याग १५३, दिव्योन्माद १५६-६२, गात्रदाह १६५-६६, रासमणीला शिक्षा १६७-६८, ईश्वरदर्शनाची तळमळ १७५, दास्यभक्ति १७८, सीतादर्शन १७८-७९, पंचवटीरोपण १७९-८०, हठयोगाचा अभ्यास १८१, हलधारीशीं वर्तन १८३-८६, कांचनासक्तीचा त्याग १९०-९२, कामत्याग १९२, अहंकारत्याग १९३-९५, विवाह प्रकरण १९ वे. १९८. त्यांच्या विवाहाची मीमांसा २०२—१२, ईश्वरदर्शनाची तळमळ २२०, ब्राह्मणीचे आगमन २२२, तिचे श्रीरामकृष्णाविषयी मत २२६, २२९, २३०, वैष्णवचरण व गौरीपंडितांचे मत २३५-४०, विपरीत क्षुधा व गात्रदाह-प्रकरण २२ वें. २४२-४७, तंत्रसाधना-प्रकरण २४ वे २५३-७०, साधना कां कराव्या लागल्या? २५३-५५, साधनोत्साह २५९, साधनांसाठी वेदिका २६१, तंत्रोक्तसाधना २६३-६४, स्त्रीजातीविषयी मातृभाव २६४-६५, तंत्रसाधनाकाळचीं दर्शनें २६७, वात्सल्यभावसाधना, प्रकरण २५ वे. २७१-८६, स्वभाव २७७-७८, सत्यसंकल्पत्व २७९-८०, राममंत्रग्रहण २८०, रामलाला व त्याच्या लीला २८०-२८३, भावतन्मयता २८८, ईश्वरदर्शनाची तळमळ २८९, साधुसंग २८९-९१, मधुरभाव-साधना प्र. २८ वें ३१८-३३०

**रामतारक**—उर्फ हलधारी. ' हलधारी ' पाहा.

**रामलाला**—बाल-रामाची जटाधारीजवळून श्रीरामकृष्णांना मिळालेली मूर्ति २७६-७७, २८०-८३

**रामेश्वर**—श्रीरामकृष्णांचा मधला भाऊ २१, ५३, ५६, ९९

**रासमणी**-राणी, हिने दक्षिणेश्वरचें कालीमंदिर बांधलें. तिची हकीगत ८७-९०, रासमणीला शिक्षा १६७-१६८, मृत्यु २२३

व

वात्सल्यभावसाधना—प्रकरण २५ वे पान २७१-२८६

वासनात्याग—२१०-११.

विवाह—श्रीरामकृष्णांचा, प्रकरण १९ वें १९८-२२१

**विवेकानंद**—६७-६८; १९१-९२, ३१०, ३२१

वैराग्य म्हणजे काय ? ७७, १५३-५४

**वैष्णवचरण**—पंडित-१९०, २३२-३६, २३९

व्याकुळता—ईश्वरदर्शनाची १६९, १७६-७७, २२०

वृंदावनलीला २१०-१२

श

**शारदादेवी**—श्रीरामकृष्णांची पत्नी. २१२, २१६, २१७

**शिवनाथशास्त्री**—ब्राह्मसमाजाचे एक पुढारी २८८

**शंकराचार्य**—३०२

**शंभुचंद्र मल्लिक**—श्रीरामकृष्णांचे एक परम भक्त २५१

स

सदसद्विचार—२०९

समाधि—सविकल्प ७८-८१

**सर्वमंगला**—श्रीरामकृष्णांची बहीण ३५, ५३, ६३

साधक व साधना—प्रकरण १० वें. ७२-८१, साधना म्हणजे काय ? ७३-७७, साधनांचे कालखंड १७२

साधना—श्रीरामकृष्णांना कां कराव्या लागल्या ? १७४-७५, २५३-५५

सिद्धि—२५०, २६८

सीतेचें दर्शन १७८-७९

**सुखलाल गोस्वामी**—क्षुदिरामांचे आश्रयदाते १०, १३, १४

स्त्रीवेष—श्रीरामकृष्णांचा १३४-३७

## ह

हठयोगाभ्यास—१८१-८२

**हलधारी**—श्रीरामकृष्णांचा चुलतभाऊ. १९, १७०-७१, १८१-८७

हालदारपुकूर—१०, ३६

हालदार पुरोहित—१३१-३२

**हेमांगिनी**—श्रीरामकृष्णांची आतेबहीण १८-१९, ९९

**हृदयराम मुकर्जी**—श्रीराम० चा भाचा व त्यांचा अत्यंत एकनिष्ठ भक्त-सेवक १९, त्याची माहिती ९९-१०१, १०४-१०५

## क्ष

**क्षुदिराम चतर्जी**—श्रीरामकृष्णांचे वडील. जन्म (सुमारे १७७५) ११, १२, गुण १२, लग्न १२, संसार १२, संकट १३, देरे गावाहून प्रयाण १४, कामारपुकुरास आगमन व वास्तव्य १५, धर्मनिष्ठा व उच्च अवस्था १७, ३९, ईश्वरभक्ति २०, रामेश्वरची यात्रा २०, गयेची यात्रा २२, अद्भुत स्वप्न, गदाधराचा वर २३, श्रीरामकृष्णांचा जन्म ३१, गदाधराबद्दल काळजी ३६, मृत्यु ४२

क्षुधा—विपरीत क्षुधा व गात्रदाह. प्रकरण २२ वें २४२-४७

## ज्ञ

ज्ञानमार्ग—७७, ७८, ७९.

# आमचें अन्य प्रकाशन

## मराठी विभाग

१. **श्रीरामकृष्ण-चरित्र**—द्वितीय भाग, (द्वितीय संस्करण) छापत आहे.
२. **श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**—( द्वितीय संस्करण ) ।।।=)
३. **शिकागो-व्याख्यानें**—स्वामी विवेकानंद ।।=)
४. **माझे गुरुदेव**—( द्वितीय संस्करण )-स्वामी विवेकानंद ।।=)
५. **हिंदु-धर्माचें नव-जागरण**—स्वामी विवेकानंद ।।-)
६. **पवहारी बाबा**—स्वामी विवेकानंद ।।)
७. **साधु नागमहाराय-चरित्र** (भगवान श्रीरामकृष्णांचे सुप्रसिद्ध शिष्य)-
(द्वितीय संस्करण)-छापत आहे.

## हिन्दी विभाग

१-३. **श्रीरामकृष्णवचनामृत**-तीन भागों में-अनु० पं. सूर्यकान्त त्रिपाठी 'निराला'; प्रथम भाग (द्वितीय संस्करण)—मूल्य ६);
द्वितीय भाग—मूल्य ६); तृतीय भाग-मूल्य ७।।)
४-५. **श्रीरामकृष्णलीलामृत**—( विस्तृत जीवनी )—(द्वितीय संस्करण)-
दो भागों में, प्रत्येक भाग का मूल्य ... ... ५ )
६. **विवेकानन्द-चरित**-(विस्तृत जीवनी)--सत्येन्द्रनाथ मजूमदार, मूल्य ६)
७. **विवेकानन्दजी के संग में**-(वार्तालाप)-शिष्य शरच्चन्द्र, मूल्य ५।)

## स्वामी विवेकानन्द कृत पुस्तकें

८. **भारत में विवेकानन्द**-(विवेकानन्दजी के भारतीय व्याख्यान) ५)
९. **पत्रावली ( प्रथम भाग )** ( प्रथम संस्करण ) २=)
१०. **धर्मविज्ञान** ( प्रथम संस्करण ) १।।=)
११. **कर्मयोग** ( प्रथम संस्करण ) १।।=)
१२. **हिन्दू धर्म** ( प्रथम संस्करण ) १।।)
१३. **प्रेमयोग** ( द्वितीय संस्करण ) १।=)
१४. **भक्तियोग** ( द्वितीय संस्करण ) १।=)
१५. **आत्मानुभूति तथा उसके मार्ग** ( तृतीय संस्करण) १।)

१६. परिव्राजक (तृतीय संस्करण) १।)
१७. प्राच्य और पाश्चात्य (तृतीय संस्करण) १।)
१८. महापुरुषों की जीवनगाथायें (प्रथम संस्करण) १।)
१९. राजयोग ,, १=)
२०. स्वाधीन भारत! जय हो! (प्रथम संस्करण) १=)
२१. धर्मरहस्य (प्रथम संस्करण) १)
२२. भारतीय नारी (प्रथम संस्करण) ।॥)
२३. शिक्षा (प्रथम संस्करण) ॥=)
२४. शिकागो वक्तृता (पञ्चम संस्करण) ॥=)
२५. हिन्दू धर्म के पक्ष में (प्रथम संस्करण) ॥=)
२६. मेरे गुरुदेव (चतुर्थ संस्करण) ॥=)
२७. वर्तमान भारत (तृतीय संस्करण) ॥)
२८. पवहारी बाबा (प्रथम संस्करण) ॥)
२९. मेरा जीवन तथा ध्येय (प्रथम संस्करण) ॥)
३०. मरणोत्तर जीवन (प्रथम संस्करण) ॥)
३१. मन की शक्तियाँ तथा जीवनगठन की साधनायें ॥)
३२. भगवान रामकृष्ण धर्म तथा संघ—स्वामी विवेकानंद, स्वामी शारदानन्द, स्वामी ब्रह्मानन्द, स्वामी शिवानन्द, मूल्य ॥=)
३३. मेरी समर-नीति (प्रथम संस्करण) ।≡)
३४. ईशदूत ईसा (प्रथम संस्करण) ।=)
३५. परमार्थ-प्रसंग—स्वामी विरजानन्द, (आर्ट पेपर पर छपी हुई)
कपड़े की जिल्द, मूल्य ३॥)
कार्डबोर्ड की जिल्द ,, ३।)
३६. विवेकानन्दजी की कथायें (प्रथम संस्करण) १।)

रामकृष्ण आश्रम, धन्तोली, नागपूर-१, मध्यप्रदेश.